## आमची काही प्रकाशने

- **खेळखंडोबाच्या नावानं...**
  प्रवीण बांदेकर — ५० रु.
- **धर्म : मानवी संस्कृती व विकास**
  रावसाहेब कसबे — २५ रु.
- **'लव्हाळी' : काही दृष्टिक्षेप**
  संपादन : विलास खोले — ७० रु.
- **एका 'अनफिट' पोलीस अधिकाऱ्याची डायरी**
  द. सा. साळगांवकर — २५० रु.
- **नपेक्षा**
  अशोक शहाणे — १९० रु.
- **शिक्षण**
  संपादन : विलास रणसुभे — १५० रु.
- **धर्म, धर्मश्रद्धा आणि अंधश्रद्धा**
  वसंत पळशीकर — १० रु.
- **भगवान बुद्धांचा जनवादी धर्म**
  अ. म. सहस्रबुद्धे — ३०० रु.
- **बुद्धवाणी**
  संकलक : अ. म. सहस्रबुद्धे — ४० रु.
- **सडक नाटक**
  अविनाश कदम — १७० रु.
- **अरुण कोलटकरांची 'गच्ची' : एक निरूपण**
  राजा ढाले — १५ रु.
- **एक होता कारसेवक**
  अभिजित देशपांडे — ५० रु.

मूल्य : ५० रुपये

ISBN 81-86995-06-4

मॅक्झिम गॉर्की

# आई



# आई

मॅक्झिम गॉर्की

अनुवाद : प्रभाकर उध्वरेषे

लोकवाङ्मय गृह

**आई** / मॅक्झिम गॉर्की
**Aai /** Maxim Gorky
अनुवाद : प्रभाकर उर्ध्वरेषे

म / ९६०
© लोकवाङ्मय गृह
आठवी आवृत्ती (II) : जानेवारी २००२
नववी आवृत्ती (II) : मे २००३
दहावी आवृत्ती (II) : जून २००४
अकरावी आवृत्ती (II) : मार्च २००५
बारावी आवृत्ती (III) : जानेवारी २००६
तेरावी आवृत्ती (II) : डिसेंबर २००६

मूल्य : ५० रुपये

ISBN 81-86995-06-4

मुद्रक/प्रकाशक
प्रकाश विश्वासराव
लोकवाङ्मय गृह
भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड, प्रभादेवी
मुंबई - ४०० ०२५

मुद्रणस्थळ
न्यू एज प्रिंटिंग प्रेस
भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड
प्रभादेवी
मुंबई - ४०० ०२५

## अनुक्रमणिका

१. प्रस्तावना . . . . . . . . . . . . ५
२. भाग पहिला . . . . . . . . . . . ११
३. भाग दुसरा. . . . . . . . . . . .२३४
४. समारोपादाखल दोन शब्द . . . . . . .४८५

# प्रस्तावना

**(प्रो. बो. बुर्सोव)**

प्रत्येक देशाच्या इतिहासात त्या देशाच्या इतिहासाला कलाटणी देणारे प्रसंग घडून येतात; आणि त्या प्रसंगांना अनुरूप अशी पुस्तकेही त्या देशाच्या वाङमयात आढळून येतात. गोर्कीची 'आई' ही कादंबरी, आम्हा रशियनांच्या दृष्टीने, अशा पुस्तकांत मोडते.

'आई' ही कादंबरी इ. स. १९०७ साली रशियात प्रसिद्ध झाली; त्या वेळी गोर्कीचे वय सुमारे चाळीस वर्षांचे होते; वाङमयीन आणि सार्वजनिक कार्याची पंधरा वर्षांची आराधना त्यांच्या पाठीशी उभी होती. इ. स. १८९८ साली त्यांचा पहिला कथासंग्रह 'निबंध आणि लघुकथा' या नावाने प्रसिद्ध झाला आणि वाचकवृंदात त्याला अमाप यश मिळाले. 'फोमा गोर्देयेव' ही त्यांची कादंबरी त्यानंतर वर्षानेच प्रसिद्ध झाली. त्याच सुमारास तोलस्तोय यांची 'पुनरुत्थान' ही कादंबरी प्रसिद्ध झाली. 'पुनरुत्थान'ने रसिकांना जेवढे वेड लावले जवळजवळ तेवढेच वेड 'फोमा गोर्देयेव'नेही लावले. त्यानंतर त्यांची 'तिघे' ही कादंबरी बाहेर पडली; काही नाटकेही प्रसिद्ध झाली आणि लवकरच त्यांच्या कीर्तीचा सुगंध स्वदेशाच्या सीमा ओलांडून साऱ्या जगभर दरवळू लागला.

त्यांच्या या सुरुवातीच्या लेखनात वास्तववादी सत्यप्रियता आहे; त्यांचे स्वतःचे जीवन अतिशय कष्टमय गेले होते आणि तरीही त्यांच्या या लेखनात विस्मयजनक वाटणारा उत्साहवर्धक सूर आहे; 'शूरांच्या वेडेपणा'वर त्यांनी चढविलेला गौरवाचा साजशृंगार आहे. म्हणजेच या लेखनात भविष्यकाळातील त्यांच्या महान कलाविलासची सर्व बीजे आढळून येतात. परंतु त्या काळात त्यांना अद्याप समाजवादी जागृती आलेली नव्हती;

कामगारवर्गाच्या इतिहासदत्त भूमिकेची जाणीव अजून झालेली नव्हती. त्या काळात त्यांनी कामगारवर्गाचे जे चित्र रंगविलेले आहे ते एका शोषित, दलित, आणि सोशिक वर्गाचे चित्र आहे; भांडवलशाहीच्या दास्याच्या जोखडातून स्वतःची आणि स्वतःबरोबर इतर समग्र शोषित जनतेची मुक्तता करून घेण्याचे सामर्थ्य अंगी असलेली एक महान शक्ती या दृष्टीने या वर्गाचे चित्र अजून त्यांनी रेखाटले नव्हते. मूल्यांचे पुनर्मापन करण्यासाठी एक धक्का बसण्याची गरज होती आणि इ. स. १९०५ मध्ये देशातील एका महान क्रांतिकारक उठावाच्या रूपाने हा धक्का बसलाही.

या उठावाने गोर्कींना साद घातली; आणि त्यातून स्फूर्ति घेऊन त्यांनी आपले 'वादळी पक्षाचे गाणे'ही कविता लिहिली; उठावाने घातलेल्या सादाला त्यांचा हा प्रतिसाद होता. दुसरेही एक स्फूर्तिस्थान होते; ते म्हणजे या काळातील त्यांची लेनिन यांच्याशी झालेली ओळख. ही ओळख प्रथम त्यांच्या लेखनामार्फत आणि विचारांमार्फत झाली; पुढे त्यांची या महान क्रांतिकारक नेत्याशी प्रत्यक्षच ओळख झाली आणि लेनिन हे त्यांचे मित्र, गुरू आणि नेता बनले.

गोर्की लेनिनवादाकडे वळले ते स्वतःच्या विशिष्ट मार्गाने वळले. मानवतेचे प्रश्न हाताळता हाताळता ते लेनिनवादाच्या मंदिरात जाऊन पोहोचले. इ. स. १९०१ साली त्यांनी 'छोटी माणसे' हे नाटक लिहिले. त्यात त्यांनी समाजवादाची जागृती प्राप्त झालेल्या एका कामगाराचे चित्र रेखाटले आहे; पण क्रांतिकारक कामगार या दृष्टीने अजून तो शून्यच आहे. त्यानंतर त्यांनी आणखी एक नाटक लिहिले; त्याचे नाव 'आणखी खोल पाताळात'. या नाटकात त्यांनी खऱ्या आणि खोट्या मानवतावादाच्या प्रश्नांचा अधिक सखोल आणि विस्तृत विचार केला आहे. त्यात त्यांनी ल्युका नावाचे एक पात्र रंगविले आहे. त्याचे समग्र तत्वज्ञान एका वाक्यात साठविलेले आहे: 'जे आहे असे तुम्हाला वाटते ते आहे'. ल्युकाच्या या 'सांत्वनपर थोतांडा'चे भांडे या नाटकात गोर्कींनी फोडून टाकले आहे. या तडजोडवादी निष्क्रिय मानवतावादाविरुद्ध गोर्कींनी क्रांतिकारक लढ्याचा मानवतावाद उभा केला आहे; जीवन आणि मानव दोघांनाही बदलून टाकण्यासाठी, आतून आणि बाहेरून दोही बाजूंनी त्यांची मुक्तता करण्यासाठी जीवनातील वास्तव परिस्थितीला धैर्याने तोंड द्यायला तयार व्हा, अशी हाक देणारा हा मानवतावाद आहे. या नाटकातील 'मानव हेच सर्वश्रेष्ठ सत्य आहे', 'मानव, या शब्दाला केवढा अभिमानास्पद नाद आहे!' 'सर्व काही मानव आहे; सर्व काही मानवासाठी आहे,' ही तेजस्वी वाक्ये तेव्हापासून कोट्यवधी लोकांच्या ओठावर नाचत आली आहेत.

हा क्रांतिकारक मानवतावादाचा प्रश्न त्यांनी पुनः एकदा 'आई' कादंबरीत मांडला आहे. ही कादंबरी त्यांनी १९०७ साली लिहिली. गोर्कींच्या या पुस्तकाला हजारो वाचक लाभले. कोट्यवधी लोकांच्या भवितव्यावर तिचा सरळसरळ आणि जबरदस्त प्रभाव पडला. इतक्या प्रचंड प्रमाणावर जनमनावर प्रभाव पाडणारी दुसरी कादंबरी जागतिक वाङ्मयाच्या सबंध इतिहासात सापडणार नाही, असे छातीठोकपणे सांगता येईल.

एक नवा सर्वांगपरिपूर्ण नायक — कामगार — जगाच्या इतिहासाच्या रंगभूमीवर दाखल होताच, २०व्या शतकातील सर्वश्रेष्ठ सूर कोणता याची गोर्कींना ताबडतोब जाणीव झाली. आणि नव्या शतकाच्या या नव्या नायकाचा शाहीर, चरित्रकार आणि वाङ्मयीन प्रतिनिधी म्हणून गोर्की पुढे झाले. त्यांनी 'आई' या आपल्या कादंबरीत नायकाच्या या विकासाचे कलापूर्ण सर्वांगसुंदर चित्र उभे केले आहे.

ही कादंबरी प्रत्यक्ष ऐतिहासिक घटनांवर आधारलेली आहे, हे बऱ्याच जणांना माहीत आहे. त्यात वर्णिलेले कामगारांचे मे-दिनाचे निदर्शन, त्याच्यावर झालेला पोलिसांचा लाठीमार आणि पुढाऱ्यांवर भरण्यात आलेले खटले या साऱ्या गोष्टी सोर्मोवो या शहरात घडल्या. काही वर्षांनी या प्रसंगांच्या आठवणी लिहिताना स्वतः गोर्कींनी म्हटले होते:

"सोर्मोवोचे निदर्शन घडून आल्यानंतर लागलीच निझ्नी येथे असताना माझ्या मनात विचार आला की आपण कामगारांच्या जीवनावर एक पुस्तक लिहावे. ताबडतोब साधनसामुग्रीची जुळवाजुळव करण्याच्या आणि टीपा तयार करण्याच्या कामाला मी लागलो." तेव्हा एका अर्थाने गोर्की यांची कादंबरी हा एक ऐतिहासिक दस्तऐवज आहे. अर्थात या पुस्तकातील पायाभूत घटनांची कादंबरीकाराने कलेच्या दृष्टीतून फेरमांडणी केली; त्याने मूळ नायकांना (प्योत्र झलोमोव आणि त्याची आई या सत्य सृष्टीतील व्यक्तींना) एक नवे जीवन दिले; नव्या पात्रांच्या आणि नव्या घटनांच्या परिसरात एक नवजीवन दिले. आणि त्यातून १९०५ च्या क्रांतीच्या उषःकालातील रशियातील कामगारवर्गाच्या जीवनाचे व लढ्याचे एक विशाल व सर्वसामान्य चित्र या कादंबरीच्या रूपाने उभे केले.

हे पुस्तक लिहून लेखकाला जणू काही असे सांगायचे आहे की रशियाच्या क्रांतीचा मार्ग कठीण आणि गुंतागुंतीचा होता; पण त्याचबरोबर तोच एक योग्य मार्ग होता. उज्ज्वल भवितव्याकडे नेणारा हाच मार्ग होता. ह्या भवितव्याला साकार रूप देण्यासाठी समग्र जनता जो लढा लढवीत होती त्याचा पुढारी कामगारवर्ग आहे, हे 'आई' या कादंबरीने दाखवून दिले. आपले महान ध्येय प्रत्यक्षात उतरविण्यासाठी कृतीला हात घालणारा कामगारवर्ग हा या पुस्तकाचा विषय आहे. आपले गुण, तसेच अपुरी राजकीय व वैचारिक परिपक्वता या सारखे आपल्यातील दोष ज्यात कामगारांना स्वतःलाच दिसून आले असे हे पुस्तक होते; कामगारांसाठी हे पुस्तक होते, कामगारवर्ग आणि रशियातील एकंदर जनता दोघांनाही अत्यंत उपयुक्त ठरले असे हे पुस्तक होते.

गोर्कीशी बोलताना लेनिन यांनी 'आई' विषयी उदगार काढले होते: "ह्या पुस्तकाची आज फार गरज आहे; कारण क्रांतिकारक चळवळीच्या हेतूंची जाणीव नसलेले, तिच्यात उत्स्फूर्तपणे भाग घेणारे असे शेकडो कामगार आहेत; त्यांना 'आई' ही कादंबरी वाचून फार फायदा होईल... हे पुस्तक अगदी योग्य वेळी बाहेर पडले."

ल्येव तोलस्तोय यांनी एकदा म्हटले होते: "वाङमयीन कृतीतील एकात्मता तिच्यातील पात्रांत किंवा घटनांत ऐक्य प्रस्थापित केल्याने साध्य होत नाही; तर ती लेखकाच्या नैतिक अधिष्ठानाच्या ऐक्यातून साध्य होते." गोर्कींनी आपल्या नैतिक अधिष्ठानाचे दर्शन आपल्या कादंबरीतील निलोव्ना–आई–या प्रमुख पात्रामार्फत घडविले आहे. कादंबरीच्या सुरुवातीची निलोव्ना इतर तिच्याचसारख्या शेकडो श्रमिक मातांप्रमाणे आहे; तिच्यात वेगळे असे काही नाही. कारखान्यात पाठीचा कणा मोडेपर्यंत राबराब राबून थकून भागून घरी परतणारी, आणि नशा करून आलेल्या नवऱ्याच्या हातचा मार खाणारी ती इतर कामगारस्त्रियांपैकीच एक स्त्री आहे. पण कारखान्याच्या त्या छोटचाशा गावातील रुळलेल्या जीवनाचा गाडा सोडून तिचा मुलगा स्वतंत्र वृत्तीने वागू लागला आणि क्रांतिकारक बनला, तेव्हांपासून त्याच्या आईनेही त्याच्या खांद्याला खांदा भिडवून लढ्यात भाग घ्यायला सुरुवात केली. कामगारवर्गातील व्यक्ती क्रांतीच्या रिंगणात कशी उतरते ते निलोव्नाच्या कथेत दिसून येते. निलोव्ना सरळ मनाची ममताळू स्त्री आहे; तिचे न्यायी व दयाळू अंतःकरण, तिची सदसद्विवेकबुद्धी, चांगल्या विषयीच्या



तिच्या कल्पना, लोकांनी कसे जगावे याविषयीचे तिचे विचार हाच गोर्कीचा नीतिविषयक प्रमुख मानदंड बनला. आणि म्हणून आपण वाचकही तिच्याच डोळ्यांतून जगाकडे पाहू लागतो; तिचेच मानदंड वापरून घडणाऱ्या घटनांचे मोजमाप घेऊ लागतो. पावेलचे मित्रही तिला 'आई' म्हणूनच हाक मारीत आणि याच गोष्टीत गोर्कीच्या कादंबरीचा भावार्थ साठविलेला आहे. पावेलच्या क्रांतिकारक मित्रांना आपल्यातील आत्मिक ऐक्याची जाणीव होते ती निलोव्नाकडे, आईकडे, पहाण्याच्या त्यांच्या दृष्टीतूनच होते. जगातील सर्व माणसे एकमेकांची भावंडे आहेत याची समूर्त जाणीव त्यांना तिच्या मार्फतच होते. आंद्रेई नखोदका हा पावेलचा जिवलग मित्र म्हणतो: "आपण सर्व एकाच आईची लेकरं आहोत, सर्व जगातील कामगार बंधु आहेत ही श्रद्धा सर्वांच्या अंतःकरणात वास करीत आहे व तीच आम्हाला स्फूर्ति देत असते." रिबिन हा शेतकरी आहे; तोही स्वातंत्र्याच्या संयुक्त लढ्याच्या प्रवाहात इतरांबरोबर ओढला गेला आहे. त्यालाही ह्या गोष्टीची नीट जाणीव झाली आहे. तो म्हणतो: "लोकांना त्यांच्या बंधुभावाची व ऐक्याची जाणीव करून देणं हे फार मोठे काम आहे. जे आपल्याला हवं आहे, तेच लाखो लोकांनाही पाहिजे आहे, हे माहीत झाल्यानं अंतःकरणात दयाभाव निर्माण होतो–आणि दयाळूपणा ही फार प्रचंड शक्ती आहे!"

'आई'ही केवळ क्रांतिकारी लढ्याविषयीची एक कादंबरी नाही: या लढ्याच्या धाईगर्दीत, निर्मल विशुद्ध करणाऱ्या तिच्या ज्वालांत, साधीसुधी माणसे अंतस्थतः कशी बदलून जातात आणि आत्मिकदृष्ट्या त्यांचा कसा पुनर्जन्म होतो, ते या पुस्तकात दाखविले आहे.

निलोव्नाने क्रांतिकारी लढ्याच्या मार्गावर एकदा पदार्पण करताच तिला स्वतःचे एक सत्यदर्शन होते; ती म्हणते: "ते माझा आत्मा चिरडू शकत नाहीत–माझा आत्मा असाच जिवंत राहील!"

गोर्कींनी असे एक पुस्तक लिहिले हा काही योगायोगाचा प्रकार नव्हता. स्वतः लढे लढलेला लेखकच लढवय्यांचे जीवन इतक्या सत्यतेने चितारू शकतो. तरुण वयातच 'परिस्थितीशी लढता लढता मानव निर्माण होतो,' ही ज्याला जाणीव झाली आहे असाच कलावंत जीवनात परिवर्तन घडवून आणण्याची कामगिरी हाती घेतलेले लोक आत्मिक-दृष्ट्या कसे तीव्रतेने परिपक्व होत जातात त्याचे चित्र रेखाटू शकतो.

...हे छोटेसे पुस्तक प्रसिद्ध झाल्याला जेमतेम ७० वर्षे झाली आहेत.

एवढ्याशा काळात ते सर्व देशांतील कामगारांची 'गाथा' बनले आहे. आतापर्यंत जगातील वेगवेगळ्या भाषांमधून ३०० वेळा ते छापले गेले आहे आणि सोविएत संघराज्यात ते २०० वेळा छापले गेले. त्याच्या एकूण ७०००००० प्रती निघाल्या आहेत.

दि. २८ मार्च १९६८ रोजी आपण गोर्की यांचा जन्मशताब्दिदिन साजरा केला. ते मृत्युवश झाल्यालाही आता ४० वर्षे झाली; पण आजही जगातील क्रांतिकारक प्रक्रियेत ते केंद्रपुरुष म्हणून उभे आहेत.

# भाग पहिला

## १

रोज सकाळी कारखान्याचा कर्कश भोंगा त्या कामगारवस्तीच्या धुरकट, तेलकट वातावरणात घुमू लागे, आणि ती हाक कानी पडताच त्या वस्तीतील लोक भेदरलेल्या झुरळांप्रमाणे आपल्या खुराडेवजा घरांतून पटापट बाहेर पडू लागत. झोप पुरी न झाल्यामुळे आळसावलेली व अपुऱ्या विश्रांतीमुळे आंबलेली शरीरे बाहेर पडताना साहजिकच त्यांच्या मुद्रांवर उदासीनतेचे भाव उमटलेले दिसत. पण ते तसेच त्या पहाटेच्या गारठ्यात, काळोखातून, फरसबंदी न केलेल्या रस्त्यांवरून कारखान्याच्या उंच दगडी कोठड्यांच्या दिशेने चालू लागत. ती भयाण इमारतही थंडपणे व निर्विकारपणे त्यांची वाट पहात आपल्या डझनावारी नेत्रांसारख्या चौकोनी दिव्यांचा प्रकाश रस्त्यावर पाडीत असायची. ते शेकडो लोक त्या वाटेने चालू लागले म्हणजे त्यांच्या पायाने तुडवल्या जाणाऱ्या चिखलाचा दमट वास सुटे. ते आपल्या भसाड्या व झोपेमुळे जड झालेल्या आवाजात आरडाओरडा करीत व अर्वाच्य शिव्यांचा भडिमार करीत. त्या गोंगाटाने सारे वातावरण भरून जाई, व त्यातच यंत्रांची घरघर अन् इंजिनाच्या वाफेचे फूत्कार मिसळून जात. त्या कारखान्याची भयाण व भेसूर दिसणारी उंच, काळीकुट्ट धुराडी म्हणजे जणू काय त्या कामगारवस्तीवर भले मोठे सोटेच उगारले आहेत असा भास होई.

संध्याकाळच्या वेळी मावळत्या सूर्याची निस्तेज किरणे घरांच्या खिडक्यांवर रेंगाळत असताना, जणू काय आपल्या दगडी आतड्यांत साचलेली घाणच बाहेर फेकीत असल्याप्रमाणे तो कारखाना सर्व कामगारांना हाकून लावी व ते सगळेजण आल्या वाटेने माघारी चालू लागत. यावेळी त्यांचे

चेहरे धुराने काळवंडलेले, कळकट झालेले असत, त्यातच त्यांच्या भुकेल्या दातांची चकाकी उठून दिसे. त्यांच्या अंगालाही यंत्राच्या तेलाचा चिकट व उग्र दर्प येत असे. पण त्यांच्या आवाजात मात्र एक प्रकारचा उत्साह, आनंद प्रतीत होई. अन् ते स्वाभाविकच होते. निदान आजच्या दिवसापुरते तर काबाडकष्ट संपले होते, आता घरी पोचताच पोटाला अन्न व शरीराला विश्रांती या दोहोंचा त्यांना लाभ होणार होता.

तो सारा दिवस कारखान्याने गिळंकृत केला होता व तेथील यंत्राने कामगारांची आवश्यक तेवढी शक्ती शोषून घेतली होती. त्या दिवसाचे अस्तित्व पार नाहीसे झाले होते व आता त्याचा मागमूससुद्धा उरला नव्हता. मानवाने मरणाच्या दिशेने आणखी एक पाऊल पुढे टाकले होते. परंतु आता शरीराला मिळणारी विश्रांती व धुराने भरलेल्या दारूच्या गुत्त्यातील चैन त्याला समोर दिसत होती. तेवढ्यावरच तो संतुष्ट होता.

रविवारी अन् सुटीच्या दिवशी त्या वस्तीतले लोक खुशाल सकाळी दहादहा वाजेपर्यंत ताणून देत. नंतर मग प्रतिष्ठित विवाहित लोक सणासुदीचे कपडे चढवून चर्चमध्ये प्रार्थनेसाठी जात. मात्र अशा वेळी तरुण पिढी धर्माची पर्वा करीत नाही म्हणून तोंडसुख घ्यायला ते चुकत नसत. आणि प्रार्थनेहून परत आल्यावर "पिरोगी" * वर हात मारून ते जे पुनः घोरू लागत ते थेट संध्याकाळपर्यंत.

वर्षानुवर्षे असे कष्टाचे आयुष्य काढल्यामुळे त्यांची भूकही मंदावलेली असायची, म्हणून ती पुनः उत्तेजित करण्यासाठी ते तिच्यावर मद्याचे सिंचन करीत, आणि "वोड्का"**च्या झणझणीत पेयाने आपला जठराग्नी प्रज्वलित करून घेत.

संध्याकाळी ते रस्त्यावरून हिंडायला निघत. ज्यांच्याजवळ रबरी बूट असत ते हे बूट चढवीत आणि ज्यांच्याजवळ छत्र्या असत ते त्या घेऊन बाहेर पडत. बाहेर रस्ते कोरडे असले व पावसाची मुळीच लक्षणे नसून हवा सुरेख पडली असली तरी हा सरंजाम असायचाच!

चार मित्रमंडळी एकत्र आली की आपला कारखाना, त्यातील यंत्रे, आपले मुकादम, यांविषयीच त्यांच्या गप्पा चालायच्या. आपल्या कामाशी

---

* **पिरोगी** – एक प्रकारचा रशियन समोसा.

** **वोड्का** – एक कडक रशियन दारू.



संबंध नसलेला कोणताच विषय त्यांच्या बोलण्यात कधी येत नसे. क्वचित् काही अंधुक अडखळते विचार त्यांच्या ठरीव साच्याच्या जीवनात चमकून जात. पुरुषमाणसे घरी परतल्यावर बायकांशी भांडत व पुष्कळदा त्यांच्यावर हात देखील टाकीत. तरुण लोक दारूच्या गुत्त्यांत अगर दोस्तांच्या घरी जात, तेथे गाणंबजावणं, अचकटविचकट गाणी, नाच, शिव्यागाळी, दारू पिऊन तर्र होणं, यात त्यांचा वेळ निघून जाई. अतिश्रमाने थकलेल्या त्यांच्या शरीरांवर मद्याचा अंमल बसायला वेळ लागत नसे. अन् एकदा दारू चढू लागली म्हणजे त्यांना आतल्याआत कसली तरी आग भडकल्यासारखं वाटू लागे व ती बाहेर पडण्यासाठी त्यांना बेचैन करून सोडी. त्या भरात अगदी क्षुल्लक कारणांवरूनसुद्धा ते परस्परांवर हिंस्र पशूंप्रमाणे तुटून पडत. भयंकर मारामाऱ्या होत, त्यांत कुणाला जबर दुखापती होत व क्वचित् प्रसंगी खुनापर्यंतही मजल जाई.

या लोकांच्या परस्परसंबंधांत एक प्रकारचा सुप्त वैरभाव होता, आणि त्यांच्या स्नायूंचा असाध्य थकवा जितका पुरातन होता तितकाच हा वैर-भावही पुरातन होता. या आंतरिक व्यथेचा वारसा त्यांना आपल्या वाडव-डिलांकडून मिळालेला होता व काळ्याकुट्ट सावलीप्रमाणे तो रोग थेट स्मशा-नापर्यंत त्यांचा पिच्छा पुरवीत असायचा. त्यापायीच त्यांच्या हातून अनन्वित व अघोर कृत्ये घडत.

रविवारी रात्री तरुण मंडळी खूप उशीरा घरी येत. त्यावेळी कपडे फाटलेले, अंग धुळीने व चिखलाने माखलेले, डोळे सुजलेले, नाकातून रक्त वाहात असलेले असा त्यांचा अवतार असायचा. त्यातच कधी आपण दोस्तांना कसे ठोसे लगावले याची द्वेषभरित व बढाईखोर बडबड सुरू असायची, तर कधी आपला अपमान झाला म्हणून ते दुर्मुखलेले, संतापाने लाल झालेले असायचे व कधीकधी रडणंही चालायचं. दारूच्या नशेमुळे त्यांची स्थिती फारच केविलवाणी व तिरस्करणीय होत असे. आईबापांना आपली तरुण मुले गुत्त्यात अगर भिंतीच्या सावलीत दारूच्या नशेमुळे बेशुद्धावस्थेत पडलेली दिसायची. ती वडीलधारी माणसं त्या पोरांना शिव्या देत, वोड्का पिऊन झिंगलेल्या त्यांच्या शरीरावर चापटाबुक्क्यांचा वर्षाव करून त्यांना उचलून घरी नेत, व काळजीपूर्वक बिछान्यांवर झोपवीत आणि सकाळी कारखान्याचा कर्णकटू भोंगा वाजू लागला म्हणजे त्यांना हालवून जागे करीत!

ही वडील माणसं आपल्या मुलांना शिव्या देत व निर्दयपणे चोपूनही काढीत खरी, पण तरुणीताठी पोरं म्हटली की दारू पिणार, मारामाऱ्या करणार, हे ते धरूनच चालत. त्यांचे बापही स्वतःच्या तरुणपणी असेच दारू पिऊन झिंगत होते, त्यांनीही अशाच मारामाऱ्या केल्या होत्या, अन् आईबापांच्या हातचा मारही खाल्ला होता. फार पूर्वीपासून हे असंच चालत आलं होतं. जीवनाचा गढूळ प्रवाह वर्षानुवर्षे असाच संथ व शांतपणे वाहात आलेला होता, आणि दररोजच्या त्याच त्या आचारविचारांच्या चाकोरीतून जाण्याच्या सवयी सगळयांच्या हाडीमासी खिळून गेल्या होत्या.

अधूनमधून काही नवे लोक त्या वस्तीत राहायला येत. आरंभी आरंभी केवळ ते नवीन म्हणून त्यांच्याकडे लक्ष वेधले जाई, नंतर काही दिवस त्यांच्या पूर्वीच्या कामाच्या ठिकाणच्या हकीकती ऐकण्यासाठी त्यांच्याविषयी वरकरणी कुतूहल शिल्लक राही. पण लवकरच त्यातलं नाविन्य संपून जाई, अन् मग ते नवे लोकही जुने बनून जात व त्यांच्याकडे कुणीच लक्ष देत नसत. या नव्या लोकांच्या सांगण्यावरून हेच स्पष्ट व्हायचं की कामगारांचे जीवन सगळीकडे सारखंच. अन् हे जर खरं असेल तर रोजरोज त्याच गोष्टींबद्दल बोलायचे तरी काय?

पण कधीकधी या नवीन लोकांपैकी काहीजण त्या वस्तीतील लोकांनी कधीच न ऐकलेल्या अशा गोष्टी सांगत. अशा वेळी त्यांच्याशी कुणी वाद घालीत नसे, पण त्या गोष्टींवर विश्वास ठेवणं त्यांना कठीण वाटे. काहींना या नव्या माणसांचं बोलणं ऐकून राग येई, काहींना कसलीतरी भीती वाटे, आणि इतर काहींना कसले तरी अंधुक आशेचे किरण दिसू लागत. आणि त्यांचे जीवन जास्तच गुंतागुंतीचे करणारी ही नवी भीती घालवून देण्यासाठी ते नेहमीपेक्षा जास्तच दारू पिऊन धुंद होत.

अशा नवीन येणाऱ्यांपैकी एखादा माणूस जरा निराळ्या प्रकारचा असल्याचे दिसले तर त्या वस्तीतले लोक त्याच्याविषयी प्रतिकूल ग्रह करून घेत, व आपल्यापेक्षा निराळा असलेला कोणताही माणूस त्यांना नकोसा वाटू लागे. जणू काय आपला ठरीव साच्याचा नित्यक्रम कंटाळवाणा असला, तरी निदान संथपणे चालू आहे त्यात हा नवा प्राणी काहीतरी बिघाड करणार अशीच त्यांना भीती वाटे. आपले जीवन कितीही दुःखमय, कितीही कष्टाचे असले तरी त्याची त्यांना सवय झाली होती, आणि या परिस्थितीत कधी तरी सुधारणा होईल अशी आशा करण्याला जागाच नव्हती. म्हणूनच या



ठरीव जीवनात काही बदल झालाच तर त्यामुळे आपले जीवन अधिकच दुःखी होईल, जुलुम अधिकच वाढेल, अशी भीती त्यांच्या मनात ठाण मांडून होती.

म्हणूनच कोणी काही नवे विचार पुढे मांडू लागला तर हे कामगार न बोलता त्याच्यापासून चार पावले दूर राहात. त्यामुळे असा नवा माणूस सहसा तेथे न राहाता लवकरच निघून जाई. अगदी क्वचित् कोणी राहिलाच तर तो इतरांसारखा बनून जाई किंवा इतरांपासून दूर राहू लागे.

सर्वसाधारणपणे तिथले लोक हे अशा प्रकारचे जीवन जगत आणि आयुष्याची पन्नासएक वर्षे अशीच काढल्यावर या जगाचा निरोप घेत!

## २

मिखाइल व्लासोव हा मेकॅनिकही असेच जीवन कंठीत होता. तो स्वभावाने तुसडा, केसाळ शरीराचा, सर्वांकडे संशयाने पहाणाऱ्या लहान डोळयांचा प्राणी होता व त्याच्या जाड भुवयांखालच्या त्या डोळयांत सदा इतरांविषयीचा तुच्छभाव दिसायचा. कारखान्यातला सर्वात हुशार मेकॅनिक व त्या वस्तीतला सर्वात ताकदवान माणूस म्हणून त्याची ख्याती होती, परंतु वरिष्ठांशी उद्धटपणे वागण्याच्या त्याच्या सवयीमुळे त्याची मिळकत बेताचीच होती. सुटीचा दिवस आला की कुणाला तरी बडवून काढल्यावाचून त्याला राहावत नसे, व त्यामुळे सगळे त्याचा द्वेष करीत व त्याला वचकूनही राहात. त्याचे उट्टे काढण्याचे सारे प्रयत्न निष्फळ ठरत. आपल्याला मारण्यासाठी कोणी येत आहेसे दिसले की तो हातात दगड किंवा फळकुट, नाहीतर लोखंडी कांब घेऊन दोन्ही पाय रोवून शांतपणे शत्रूचा सामना करण्यासाठी उभा राही. त्याचे केसाळ बाहु आणि डोळयांपासून मानेपर्यंत दाट काळ्या दाढीने भरलेला उग्र चेहरा पाहिला की कुणालाही भीती वाटे. विशेषतः त्याच्या डोळयांची लोकांना फारच भीती वाटायची. त्याच्या लहान पण भेदक डोळयांची नजर रोखली गेली म्हणजे भीती वा दयेचा लवलेशही नसलेला कुणी हिंस्र पशूच आपल्यावर तुटून पडण्याला सज्ज झाला आहे असेच वाटल्यावाचून राहात नसे.

असे कोणी अंगावर आले तर तो त्यांच्यावर ओरडे, "चला, चालते व्हा इथून! कुत्तेकी अवलाद!" अन् असे ओरडताना त्याचे मोठे पिवळे

दात त्याच्या दाढीच्या जंगलातून चमकू लागत. त्याचा तो भेसूर अवतार पाहून लोक नुसतेच दातओठ चावीत व भेकडपणे शिव्याशाप पुटपुटत तिथून काढता पाय घेत.

"कुत्तेकी अवलाद!" तो पुन: त्यांच्यावर ओरडे व त्याचे डोळे त्यांच्या-विषयीच्या तुच्छभावाने खंजिराच्या पात्याप्रमाणे चकाकू लागत. मग तो त्या पळ काढणाऱ्यांचा पाठलाग करी व दिमाखाने मान ताठवून विचारी,

"चला, कुणाला मरायचं आहे त्याने पुढं यावं!"

अर्थात्‌च मरायची तयारी कोणाची असणार?

त्याचे बोलणे फारच कमी होते. अन्‌ 'कुत्तेकी अवलाद' ही त्याची आवडती शिवी होती. पोलिस, अंमलदार, कारखान्यातले वरिष्ठ अधिकारी, सर्वांचाच तो या संबोधनाने उद्धार करी. स्वत:च्या बायकोलाही तो अशीच शिवी देऊन हाक मारी. तिला असंच संबोधून तो तिच्यावर खेकसे, "माझी विजार फाटली आहे, ती तुला दिसली नाही का, रांडे!"

त्याचा मुलगा पावेल चौदा वर्षांचा असताना एकदा त्याने त्याच्या झिंज्या ओढण्याचा प्रयत्न केला. पण पावेलने एक जड हातोडा उचलून बापाला बजावले,

"खबरदार, माझ्या अंगाला हात लावाल तर!"

"काय म्हणालास?" एखाद्या काळ्याकुट्ट मेघाची छाया उंच एरंडाच्या वृक्षावर झडप घालते तद्वत्‌ आपल्या उंच किडकिडीत मुलावर झडप घालण्या-साठी पुढे सरसावून व्लासोव ओरडला.

"मी पुष्कळ छळ सहन केला. यापुढे हा छळ मी सहन करणार नाही." पावेल हातोडा उगारीत उद्‌गारला.

बापाने त्याच्याकडे एक भेदक नजर टाकली व आपले केसाळ हात पाठीमागे घेतले. त्याने किंचित्‌ हसून एक उसासा टाकला व तो पावेलला म्हणाला, "असं काय! ठीक आहे. तुला मी कुत्तेकी अवलाद म्हणतो ते योग्यच आहे."

थोड्याच वेळाने त्याने बायकोला सुनावले;

"यापुढे तुला माझ्याकडून एक पैही मिळणार नाही! पावेलच तुझं पोट भरील, समजलीस!"

"अन्‌ तुम्ही आपली सगळी कमाई दारू पिण्यात खर्च करणार, असंच ना?" तिने जरा हिंमत करून त्याला टोमणा दिला.



"तुला माझ्या भानगडीत तोंड घालायची जरूर नाही, समजलीस! मला वाटलं तर मी सगळे पैसे एखाद्या पोरीवरसुद्धा खर्च करीन!" असे म्हणून त्याने पुन: तिला शिवी हासडली.

त्याने म्हटल्याप्रमाणे एखादी बाई गाठली नाही, पण त्या दिवसापासून नंतर सुमारे दोन वर्षांनी त्याचा मृत्यु होईपर्यंत त्याने पावेलकडे मुळीच लक्ष दिले नाही व त्याच्याशी चकार शब्दानेसुद्धा भाषण केले नाही.

व्लासोवने एक स्वत:सारखाच धिप्पाड व केसाळ कुत्रा पाळला होता. तो रोज सकाळी धन्यापाठोपाठ कारखान्याच्या फाटकापर्यंत जात असे व संध्याकाळी तिथेच त्याची वाट पहात उभा राही. सुटीच्या दिवशी व्लासोव निरनिराळ्या गुत्त्यांत फेरी मारून येई. तो कोणाशी बोलत नसे, पण कुणाला तरी शोधत असल्यासारखा लोकांचे चेहरे न्याहाळत राही. तो कुत्रा सारा दिवस आपले केसाळ शेपूट हालवीत धन्यामागोमाग हिंडत राही. संध्याकाळी व्लासोव दारूने तर्र होऊन घरी येई व जेवायला बसल्यावर आपल्या हिश्श्याच्या अन्नातून कुत्र्याला खाऊ घाली. त्याला त्याने कधी मारले नाही की शिव्या दिल्या नाहीत, पण कधी लाडही केले नाहीत. जेवण संपताच बायकोने पटापट भांडी आवरली नाहीत तर तो ती जमिनीवर भिरकावून देई व वोड्‌काची बाटली समोर ठेवी. पाठ भिंतीला टेकून डोळे मिटून घेई आणि तोंड वासून आपल्या भसाड्या आवाजात एखादे करुण गीत गायला प्रारंभ करी. त्या भेसूर सुरांच्या आवाजात त्याच्या जाडजूड मिशांचे केस वरखाली होत व त्यात अडकलेले पावाचे तुकडे उडून जात. गाणे गातागाता तो आपल्या जाडजूड बोटांनी दाढीमिशा कुरवाळीत राहायचा. त्याच्या तोंडातून घडपडत बाहेर पडणारे गीतांचे शब्द अस्पष्ट असत व सूर तर इतके भेसूर असत की कुणालाही हिवाळ्यातील लांडग्यांच्या ओरडण्याचीच आठवण व्हावी. बाटलीत दारू असेतोंवर त्याचे गाणे चालू राही आणि मग तो बसल्या जागीच बाकावर अंग टाकून अगर टेबलावर डोके टेकून जो झोपी जाई तो थेट सकाळी कारखान्याचा भोंगा होईपर्यंत! त्याचा कुत्रा तिथे त्याच्या बाजूलाच पडलेला असायचा.

शेवटी तो रक्तस्रावाने मरण पावला. असह्य वेदनांमुळे पाच दिवस तो बिछान्यात सारखा तगमगत होता. त्याचा चेहरा काळा ठिक्कर पडला होता, डोळे गच्च मिटून घेतलेले होते व तो सारखा करकरा दात खात

होता. मधूनमधून तो बायकोला म्हणे, "मला थोडं आर्सेनिकचं विष तरी आणून दे... मारून टाक मला..."

डॉक्टरने पोटीस बांधायला सांगितले व ताबडतोब ऑपरेशन करण्यासाठी इस्पितळात नेण्याचा सल्ला दिला. पण मिखाइल डॉक्टरवरच भडकला. त्याला नेहमीची शिवी देत तो ओरडला, "तूच काळं कर इथून! मरायसाठी तुझ्या मदतीची गरज नाही, समजलास! कुत्तेकी अवलाद!"

डॉक्टर निघून गेल्यावर व्लासोवला त्याच्या बायकोने अश्रूपूर्ण नयनांनी ऑपरेशन करून घ्या म्हणून विनवले तेव्हा तो तिलाच वळलेली मूठ दाखवून ओरडला, "मरू दे मला! मी बरा झालो तर तुझीच धडगत नाही, समजलीस!"

सकाळी कारखान्याचा भोंगा वाजत असतानाच व्लासोवने कायमचे डोळे मिटले. त्याचा मृत देह शवपेटीत ठेवण्यात आला तरीही त्याचे तोंड वासलेलेच होते व त्याच्या भुवया संतापाने व रागाने उंचावलेल्या भासत होत्या. त्याची बायको, मुलगा, त्याचा कुत्रा, कारखान्यातून बडतर्फ झालेला दानिलो वेसोवश्चिकोव नावाचा एक चोर व दारुड्या म्हातारा, आणि वस्तीतले काही भिकारी, एवढेच त्याच्या अंत्यसंस्काराचे वेळी उपस्थित होते. त्याच्या बायकोने थोडे अश्रू ढाळले, पण पावेलच्या डोळ्यांतून मात्र टिपूस सुद्धा आले नाही. ती लहानशी प्रेतयात्रा स्मशानाकडे जात असताना वाटेत वस्तीतल्या ज्यांनी पाहिली त्यांनी थांबून क्रूसची खूण केली व ते आपापसांत कुजबुजले,

"हा खलास झाला म्हणजे चांगली ब्याद टळली असं वाटून पेलाग्येयाला आनंदच झाला असेल, नाही!"

"त्याच्या लायकीप्रमाणे त्याला कुत्र्याच्याच मोतीने मरण आलं!" इतर काही जणांनी पुष्टी दिली.

त्याचे प्रेत पुरण्यात आल्यानंतर माणसे तेवढी तिथून निघून गेली, पण त्याचा कुत्रा मात्र तिथेच त्या थडग्यावर नुकतीच माती टाकली होती तीवर बसून थडगे हुंगत राहिला.

थोड्याच दिवसांनी त्या कुत्र्यालाही कुणीतरी यमसदनाची वाट दाखवली...



## ३

बापाच्या मृत्युनंतर दोनच आठवड्यांनी एका रविवारी पावेल दारू पिऊन घरी आला. तो झोकांड्या खात धडपडतच घरात शिरला आणि कसाबसा टेबलाजवळ जाऊन बाकावर बसत थेट आपल्या बापाप्रमाणेच टेबलावर मूठ आपटून आईवर ओरडला,

"जेवण हवं आहे मला!"

त्याची आई त्याच्याजवळ आली व शेजारी बसून तिने त्याला हाताने जवळ ओढले व त्याचे मस्तक आपल्या छातीशी लावले. पण तिला दूर ढकलून तो ओरडला,

"लवकर जेवण आण पाहू आई! अगदी लवकर!"

"वेडा कुठला!" आई त्याचा हात बाजूला करीत म्हणाली. तिच्या स्वरात ममता व दुःख दोन्हींचे मिश्रण होते.

"मला तंबाखू ओढायची आहे! बाबांचा पाइप दे मला!" पावेल अडखळत म्हणाला. त्याची जीभ जड झाल्यामुळे त्याला नीट बोलताही येत नव्हते.

दारू पिऊन धुंद होण्याची पावेलची ही पहिलीच वेळ होती. वोड्काच्या परिणामी त्याची गात्रे शिथिल झाली होती, पण त्याची शुद्ध नाहीशी झाली नव्हती. त्याच्या डोक्यात एक प्रश्न सारखा गोंधळ माजवीत होता,

"मी दारू प्यालो आहे? मला दारूनी नशा चढली आहे?"

आईच्या वागणुकीतील ममतेमुळे व तिच्या नेत्रांत स्पष्ट दिसणाऱ्या दुःखामुळे तो बेचैन झाला. त्याला रडावेसे वाटू लागले आणि डोळ्यांतले अश्रू रोखून धरण्यासाठी त्याला वास्तविक जेवढी नशा चढली होती त्यापेक्षा अधिकच चढल्याची तो बतावणी करू लागला.

आईने त्याचे ओलसर, विस्कटलेले केस नीट केले व प्रेमळपणाने त्याला थोपटले व ती शांतपणे म्हणाली,

"तू असं करायला नको होतं, बेटा!"

त्याला मळमळू लागलं. मग त्याला सपाटून उलट्या झाल्या. नंतर आईने त्याला हळूच बिछान्यावर निजवलं व त्याच्या फिकट पडलेल्या कपाळावर ओल्या टॉवेलची घडी ठेवली. त्यामुळे त्याला काहीसं बरं वाटू लागलं, त्याची नशाही किंचित् उतरली, पण अजून त्याला चक्कर आल्यासारखं वाटत

होतं व डोळे जड होऊन पापण्या उचलत नव्हत्या. तोंडातली कडवट चवही अजून गेली नव्हती. अर्धवट मिटलेल्या डोळ्यांनीच तो आईच्या चेहऱ्याकडे टक लावून पाहू लागला. त्याला वाटू लागले,

"मी अजून फार लहान आहे, नाही? इतके सगळे लोक पितात पण त्यांना काहींच होत नाही! मलाच का असं मळमळू लागावं?"

कुठून तरी दूरवरून आवाज यावा तसा आईचा मृदु स्वर त्याच्या कानी आला.

"बेटा, तू अशी पिण्याला सुरवात केलीस तर माझं पोट कसं भरणार?"

"पण सगळेच पितात की!" कसेबसे उत्तर देत त्याने डोळे घट्ट मिटून घेतले.

आईने सुस्कारा सोडला. तो म्हणाला ते खरे होते. तिथल्या लोकांना आपलं दुःख विसरून थोडा तरी आनंद लुटायला दारूचा गुत्ता ही एकमेव जागा होती हे ती नाकारू शकत नव्हती. तरीसुद्धा ती मुलाला म्हणाली, "तरी तू पिता कामा नये. तुझ्या वडिलांनी आपल्या स्वतःच्या व तुझ्याही वाटचाची दारू संपवली. त्यांच्या हातून माझा छळ झाला तेवढा पुरे, असं नाही वाटत तुला? आपल्या आईची तुला थोडीसुद्धा दया येत नाही कां?"

आईचे हे प्रेमळ, करुण उद्गार ऐकताना पावेलला ही जाणीव झाली की त्याच्या वडिलांच्या जिवंतपणी मार खाण्याच्या भीतीने ती इतकी गप्प व शांत असे की तिच्या अस्तित्वाची घरात कुणीच, त्याने सुद्धा, कधी दखल घेतली नव्हती. बापाला टाळण्यासाठी म्हणून तो स्वतः शक्य तितका बाहेर राहात असल्यामुळे आई त्याला दुरावली होती. आता तो शुद्धीवर येत होता तसतशी त्याला ही जाणीव होऊन तो आईकडे निरखून पाहू लागला.

ती चांगलीच उंच होती, पण वयोमानाप्रमाणे थोडी वाकली होती. सारा जन्म काबाडकष्ट करण्यात व नवऱ्याच्या हातचा मार खाण्यात गेल्यामुळे ती जर्जर झाली होती. चालतानासुद्धा कशावर तरी अडखळू नये म्हणून ती एका बाजूला वाकून व अजिबात आवाज न करता चालायची. तिचा चेहरा गोल व रुंद होता. चेहऱ्यावर सुरकुत्या पडल्या होत्या. त्या वस्तीतल्या बहुतेक स्त्रियांप्रमाणे तिच्या काळ्याभोर डोळ्यांत तिने भोगलेल्या दुःखाचे व भीतीचे प्रतिबिंब दिसत असे. तिच्या उजव्या भुवईवर एक खोल व्रण होता त्यामुळे ती भुवई किंचित् वर उचलल्यासारखी झाली होती व त्या योगे जणू काय तिचा उजवा कान डाव्या कानापेक्षा थोडा उंच भासे.



यामुळे ती नेहमीच चिंतातुरपणे कान टवकारून काहीतरी ऐकत असल्यासारखे वाटे. तिच्या दाट काळ्याभोर केसांत रुपेरी केसही चमकू लागले होते. एकंदरीत ती मार्दव, करुणा व नम्रता यांची जणू मूर्तीच होती...

तिच्या गालांवरून आसवे ओघळत होती.

पावेल हळू आवाजात तिला म्हणाला,

"रडू नकोस आई! मला काहीतरी प्यायला दे."

"थांब. मी तुझ्यासाठी बर्फाचं पाणी आणते."

पण ती पाणी घेऊन आली तेव्हा पावेल स्वस्थ झोपी गेला होता. ती मिनिटभर त्याच्याकडे पहात स्तब्ध उभी राहिली. तिच्या हातातील पाण्याचं भांडं कापत होतं, व आतील बर्फ हिसळून कडांवर आपटत होते. तिने भांडं टेबलावर ठेवलं व समोरच्या पवित्र मूर्तीसमोर गुडघे टेकले. खिडकीच्या बाहेर दारू पिऊन झिंगलेल्यांची आरडाओरड सुरू होती. रात्रीच्या थंडीत व काळोखात वाद्यांचा कर्कश आवाज घुमत होता, कोणीतरी भसाडचा आवाजात गात होतं, दुसरे कुणीतरी अभद्र शिव्यांची माळ जपत होतं आणि त्यातच थकलेल्या व चिडलेल्या बायकांचे आवाजही ऐकू येत होते...

व्लासोव कुटुंबाच्या लहानशा घरकुलातील जीवन पूर्वीपेक्षाही शांत व संथपणे, इतरांच्या संसारापेक्षा काहीशा निराळ्या तऱ्हेने, चालू लागले. त्यांचे घर त्या वसाहतीच्या एका टोकाला, दलदलीच्या बांधावर उंच ठिकाणी नसले तरी चढावर उभे होते. त्या घराचा तिसरा हिस्सा स्वैपाकघर व तिथेच फळ्या घालून केलेल्या लहानशा खोलीने व्यापला होता. त्याच खोलीत आई झोपत असे. पुढची खोली मागच्या खोलीच्या दुप्पट मोठी, चौकोनी होती व तिला दोन खिडक्या होत्या. त्या खोलीच्या एका कोपऱ्यात पावेलचा झोपण्याचा पलंग होता व दुसऱ्या कोपऱ्यात एक टेबल व दोन बाकडी ठेवलेली होती. खोलीच्या बाकीच्या भागात थोडचा खुर्च्या, एक आरशाचे टेबल, एक कपडचांची पेटी, भिंतीवर एक घडचाळ व कोपऱ्यात दोन मूर्ती–एवढचा जिनसा होत्या.

पावेलच्या वयाची तरुण माणसे जशी वागणं शक्य होतं तसाच तो वागत असे. त्याने स्वतःसाठी एक वाद्य, एक कडक इस्त्रीचा शर्ट, भडक रंगाचा नेकटाय, बर्फात वापरायचे उंच बूट, एक छडी, एवढ्या जिनसा खरेदी करून आणल्या व अशा रीतीने आपल्या बरोबरीच्या मुलांप्रमाणे तो छानछोकीने राहू लागला. संध्याकाळी तो पाटर्यांना जाऊ लागला, तिथे

आवश्यक असलेल्या नृत्यप्रकारात तो प्रवीण झाला, व रविवारी दारू पिऊन तर्र होऊन घरी येऊ लागला. पण वोड्का पिऊन झिंगल्यावर त्याला नेहमीच मळमळू लागे. सोमवारी सकाळी उठल्यावर सुद्धा त्याला डोके जड झाल्यासारखे वाटे, छातीत जळजळ सुरू असायची व त्याचे तोंड सुकून पांढरेफट्ट पडल्यागत होऊन जाई.

एकदा त्याच्या आईने त्याला विचारलं,

"काल रात्री तुझा वेळ मजेत गेला ना?"

"मजेत? कसली मजा न् कसलं काय!" तो चिडखोर आवाजात उत्तरला. "पुढच्या खेपेला मी मासे पकडायलाच जायचं ठरवलं आहे! नाहीतर एक बंदूक विकत आणून शिकारीलाच जाईन म्हणजे झालं!"

पावेल आपलं काम मन लावून करी. कधी खाडा नाही की उशीर केल्याबद्दल दंडही व्हायचा नाही. तो जात्याच अबोल होता आणि त्याच्या मोठ्या निळ्या डोळ्यांत त्याच्या आईच्या डोळ्यांप्रमाणेच असमाधान तरळत असे.

पावेलने म्हटल्याप्रमाणे बंदूक खरीदली नाही व तो मासे धरायलाही गेला नाही, पण तो इतरांपेक्षा काहीतरी निराळ्या मार्गाने जाऊ लागला होता हे मात्र लवकरच स्पष्ट झालं. त्याने पाटर्यांना जाणं कमी केलं. आणि आता रविवारच्या सुटीच्या दिवशी तो कुठेतरी नाहीसा झाला तरी दारू न पिता घरी परत येई. त्याचा चेहरा बारीक दिसू लागला होता, त्याचे डोळे गंभीर भासू लागले होते, व त्याचे ओठ आवळलेले असत अन् त्यायोगे त्याच्या चेहऱ्यावर एक प्रकारचा निर्धार व कठोरपणा तळपू लागला होता. त्याच्यात होणारा हा बदल त्याच्या आईच्या तीक्ष्ण नजरेतून सुटला नव्हता. तो आतल्या आत काहीतरी दुःख लपवीत असावा, किंवा कसला तरी आजार त्याच्या प्रकृतीची खराबी करीत असावा, अशी लक्षणे दिसत होती. पूर्वी त्याचे मित्र नेहमी त्याला भेटण्यासाठी येत असत, परंतु आता तो घरी सापडेनासा झाल्यामुळे तेही येईनासे झाले. आपला मुलगा कारखान्यातील इतर तरुण मुलांसारखा नाही, याचे आईला समाधान वाटे, पण सर्वांच्या जीवनाच्या ठरीव चाकोरीपेक्षा काहीतरी निराळा मार्ग शोधण्याची त्याची निर्धाराची धडपड पाहून तिला काहीशी काळजी व भीतीही वाटू लागली.

"तुला काही होत तर नाही ना, पाशा?" ती कधी कधी त्याला विचारी.



"छे ग! माझी तब्येत अगदी झकास आहे." तो सांगे.

"पण मग तू असा वाळलेला का दिसतोस?" आई उसासा टाकून म्हणे.

हळूहळू पावेल पुस्तके घरी आणू लागला. तो ती चोरून वाचत असे व वाचून होताच लपवून ठेवी. कधीकधी तो एखाद्या पुस्तकातून काही मजकूर उतरून घेऊन तो कागदही लपवून ठेवी.

त्या मायलेकांची भेट फारशी होत नसे, अन् भाषण तर जवळजवळ दुर्मिळच! सकाळी तो काही न बोलता चहा पिऊन सरळ कामावर जाई व दुपारी जेवणासाठी परत येई. जेवतानासुद्धा अगदी नावापुरताच दोनचार शब्द तो बोलायचा. जेवण होताच तो जो बाहेर जाई तो संध्याकाळपर्यंत. संध्याकाळी आल्यावर स्नान, जेवण झालं की लगेच तो पुस्तक घेऊन बसे. रविवारी तो सकाळीच घराबाहेर पडे व रात्री उशीरा परत येई. तो शहरात जात असे व कधीकधी नाटकंही पहात असे, एवढं त्याच्या आईला ठाऊक होतं, पण शहरातून मात्र त्याच्या भेटीला कधीच कोणी येत नसे. दिवसेंदिवस तो अधिकच अबोल बनत चालला होता, पण त्याचबरोबर तिला न समजणारे नवेनवे शब्दही त्याच्या बोलण्यात येऊ लागल्याचं तिच्या ध्यानात आलं होतं. तसंच त्याच्या बोलण्यातले अशुद्ध व ग्राम्य प्रयोगही लोप पावत होते हेही तिने ओळखलं होतं. त्याच्या वागणुकीत कितीतरी नवेनवे बदल होत चालल्याचं तिला दिसत होतं. पूर्वीप्रमाणे छचोर पोषाख घालणं त्याने आता सोडून दिलं होतं. उलट तो आपलं शरीर व कपडे स्वच्छ ठेवण्याकडे मात्र कटाक्षाने लक्ष पुरवू लागला होता. त्याच्या हालचालीत जास्त मोकळेपणा दिसू लागला, त्याचे वागणे व रीतिभातीही अधिक साध्या पण सौजन्यपूर्ण बनल्या. या सर्व फेरबदलाचा अर्थ त्या बिचारीला आकलन होईना, त्यामुळे तिला एक नवीनच काळजी वाटू लागली.

त्याच्यातील या परिवर्तनाबरोबरच त्याच्या आईबरोबरच्या वर्तनातही बदल घडून आला. कधीकधी तो घर झाडून काढी, रविवारी आपला बिछाना झटकून नीट करी, व तिच्या कामात तिला हरतऱ्हेने मदत करण्याचा प्रयत्न करी. त्या वस्तीतले कोणी पुरुष असली कामं कधीच करीत नसत, ती तो आता करू लागला.

एक दिवस त्याने एक चित्र आणून भिंतीवर लावले. रस्त्याने जाणारी तीन माणसे एकमेकांशी बोलण्यात गर्क आहेत असे त्या चित्रात दाखविले होते.

"येशू ख्रिस्त इमॉसकडे जात आहे" असा त्या चित्राचा आशय असल्याचे पावेलने आईला समजावून सांगितले. तिला ते चित्र आवडले, पण ती स्वतःशीच म्हणाली,

"येशू ख्रिस्तावर जर याची एवढी भक्ती आहे तर हा चर्चमध्ये कधीच का जात नाही?"

पावेलची एका सुताराशी बरीच दोस्ती जमली होती, त्याने पावेलला सुबक अशी पुस्तकांची कपाटे बनवून दिली होती. त्यातील पुस्तकांची संख्या सारखी वाढत होती व एकंदरीने त्याच्या खोलीचीही शोभा वाढत होती.

तो बहुधा तिला 'आई' म्हणून हाक मारी, पण कधीकधी तो तिला अधिकच प्रेमाने 'ममी' म्हणू लागला. तो तिला सांगे,

"ए ममी ग! माझी वाट पाहू नकोस अं! मी आज रात्री उशीरा घरी येईन, बरं का!"

तिला या प्रेमळ उद्‌गारांनी हर्ष होई. त्याच्या शब्दांतही कसला तरी निर्धार व गांभीर्य तिला प्रतीत होई.

पण तिची काळजी मात्र वाढतच गेली. त्या काळजीचं कारण तिचं तिला समजत नव्हतं, परंतु काहीतरी विशेष घडणार आहे खास, अशी शंका तिच्या काळजात घर करून बसली होती व त्यामुळे ती बेचैन होती. कधीकधी तिला आपल्या मुलाचा रागसुद्धा येई व ती स्वतःशीच म्हणायची,

"हा इतर सगळ्यांसारखा का राहात नाही? जणू काय एखादा संन्या-सीच बनला आहे! इतका गंभीरपणा याच्या वयाला तरी शोभतो कां?"

कधी तिला शंका येई,

"एखाद्या पोरीच्या तर हा नादी लागला नसेल ना?"

पण पोरीच्या नादी लागायचं म्हणजे चैन करायला पैसे लागतात, अन् पावेल पर जवळजवळ सगळी कमाई आईच्या स्वाधीन करायचा!

अशातच दिवसांमागून दिवस जात जात कित्येक आठवडे व महिने निघून गेले, आणि दोन वर्षे लोटली—अस्पष्ट विचार व वाढती काळजी यांनी भरलेल्या अशा या विचित्र व शांत जीवनाची दोन वर्षे लोटली.



## ४

एकदा रात्रीचं जेवण आटोपून पावेलने खिडकीचा पडदा ओढून घेतला व खुर्चीच्या वरच भिंतीतील खिळ्याला दिवा टांगून तो कोपऱ्यात बसून वाचू लागला. स्वयंपाकघरातली आवरासावर झाल्यावर आई बाहेर आली व हळूच त्याच्याजवळ जाऊन उभी राहिली. त्याने डोके वर करून तिच्याकडे पाहिले. 'हिला काय हवं आहे?' असाच प्रश्न त्याचे डोळे विचारीत होते.

"काही नाही, उगीच आले होते, पाशा!" एवढंच पुटपुटून ती लगेच घरात निघून गेली. पण तिच्या मनात खळबळ माजली होती ते तिच्या नजरेत स्पष्ट दिसत होतं. आत जाऊनही तिला चैन पडेना. ती हात धुवून परत बाहेर आली व त्याच्याजवळ जाऊन अखेर तिने त्याला विचारलेच,

"तू सारखा काय वाचीत असतोस रे एवढं?"

त्याने पुस्तक मिटले व तो म्हणाला,

"बैस इथे, ममी!"

आता आपल्याला काहीतरी विशेष महत्त्वाचे ऐकायला मिळणार अशा तयारीने ती त्याच्याजवळ बसली व मनाचा हिय्या करून तो काय सांगतो त्याची वाट पाहू लागली.

पावेल तिच्याकडे न पाहाताच हळू आवाजात बोलू लागला. त्याच्या आवाजात कां कुणास ठाऊक एक प्रकारचा करारीपणा होता. तो म्हणाला,

"सरकारने आक्षेपार्ह ठरविलेली ही पुस्तकं मी वाचीत असतो. आपल्या कामगारांच्या परिस्थितीची खरीखुरी जाणीव करून देणारं सत्य त्यांत सांगितलं आहे, म्हणून सरकारने त्यांच्यावर बंदी घातली आहे. ही पुस्तकं गुप्तपणे छापली जातात व ती मजजवळ सापडली तर ते मला पकडून तुरुंगात डांबतील—हे सत्य जाणून घेण्याचा प्रयत्न केल्याबद्दल मला तुरुंगाची हवा खावी लागेल! आलं का लक्षात?"

हे ऐकून आपला श्वास कोंडला जात आहे असे आईला वाटू लागले. तिने आपले डोळे उघडले व ती मुलाकडे पाहू लागली तेव्हा समोर कोणी तरी परका, अपरिचितच माणूस बसला आहे की काय असा तिला भास झाला. त्याला आवाज निराळा भासत होता—नेहमीपेक्षा गंभीर, सकंप अन् खोल! तो आपल्या ऐटदार मऊ मिशांवरून बोटं फिरवीत होता व खाली वळलेल्या भुवयाखालून त्याचे डोळे कोपऱ्यात विचित्रपणेच टक लावून

पाहात होते. तिला त्याची भीती वाटली व त्याच्या विषयी अनुकंपाही वाटू लागली.

"हे तू का करतोस, पाशा?" तिने विचारले.

त्याने मस्तक वर उचलून तिच्याकडे पाहिले व शांतपणे उत्तर दिले, "मला सत्य समजून घ्यायचे आहे म्हणून!"

त्याचा स्वर मृदु पण निश्चयी होता. त्याच्या नजरेतही करारीपणा होता. आपल्या मुलाने कसल्या तरी गुप्त व भयंकर कार्याला वाहून घेतले आहे एवढे तिला कळून चुकले. घडणाऱ्या गोष्टी अपरिहार्य असतात असे समजून त्या स्वीकारण्याची व निमूटपणे मान तुकविण्याची सवय तिच्या अंगी भिनून गेली होती. आतासुद्धा पाशाने जे सांगितलं त्यामुळे ती दुःखाने इतकी दडपून गेली व तिच्या अंतःकरणात अशा असह्य वेदना सुरू झाल्या की तिच्या तोंडातून एक शब्दसुद्धा बाहेर पडला नाही. ती फक्त मुळुमुळू रडू लागली.

"रडू नकोस, आई." पावेल अत्यंत मृदु व प्रेमळ स्वरात तिला म्हणाला. पण तिला मात्र त्या स्वरात असा अर्थ ध्वनित झाला की तो आपला निरोप घेऊन कोठेतरी दूर जाण्याला निघाला आहे!

"आपण हे कसलं आयुष्य जगतो याचा तूच विचार कर, आई! तूच आता चाळीस वर्षांची आहेस, पण तुझ्या वाट्याला आजवर काही तरी सुख आलं आहे का? बाबा तुला मारीत—त्यांना स्वतःला जो छळ सहन करावा लागला, जे खडतर जीवन जगावं लागलं, त्याचा सगळा राग ते तुझ्यावर काढीत होते, हे त्यातलं रहस्य आता मला समजलं आहे. कोणतीतरी शक्ती त्यांना दडपून टाकीत होती, पण ते काय होतं हे त्यांना उमजलं नाही. तीस वर्षे ते या ठिकाणी गुलामासारखे राबले. इथल्या कारखान्यात त्यांनी कामाला सुरवात केली तेव्हा फक्त दोन विभाग होते, त्या ठिकाणी आता सात झाले आहेत!"

ती उत्सुकतेने त्याचं म्हणणं ऐकत होती, पण त्याचबरोबर तिला एक प्रकारचं भयही वाटत होतं. तिच्या मुलाच्या नेत्रांत एक प्रकारचं तेज विलसत होतं. समोरच्या टेबलावर छाती टेकून तिच्या अश्रुपूर्ण नयनांकडे पाहात तो त्याला नव्यानेच आकलन झालेल्या सत्याचं विवरण करणारं त्याचं पहिलं भाषण करीत होता. त्याच्या बोलण्यात तारुण्याचा दुर्दमनीय उत्साह, आपल्याला प्राप्त झालेल्या ज्ञानाचा विद्यार्थ्याला साजेसा अभिमान व त्यावरील दृढ श्रद्धेमुळे वाटणारा आत्मविश्वास, प्रतीत होत होता. त्याच्या बोलण्याचा मुख्य हेतु आईला समजावून सांगण्यापेक्षाही स्वतःची कसोटी पाहणे हा होता. काही वेळ बोलून झाल्यावर योग्य शब्द सुचेनात म्हणून तो थांबला तेव्हा त्याला आपल्यासमोर बसलेल्या आईच्या व्यथित चेहऱ्याची तीव्रतेने जाणीव झाली. तिच्या प्रेमळ नेत्रांत अश्रू तरळत होते व ती त्याच्या बोलण्याने चकित होऊन त्याच्याकडे टक लावून पहात होती. आपल्या आईची त्याला करुणा आली व तो तिच्या जीवनाविषयी पुनः बोलू लागला.

"तुला आतापर्यंत कोणतं सुख भोगायला मिळालं? आनंदाचे असे काही तरी प्रसंग तुला आठवतात का?"

तिने त्याचं बोलणं ऐकून दुःखाने आपली मान हालवली. तिला काहीतरी नव्याच प्रकारची संवेदना होत होती. तिला दुःख होत होतं व आनंदही होत होता. तिच्या आजवर सतत विव्हळणाऱ्या अंतःकरणावर मायेची फुंकर घातली जात होती. आजवर कुणीच तिच्याशी तिच्या जीवनाबद्दल बोलल नव्हतं. मुलाच्या शब्दांनी तिच्या सुप्त विचारांना नव्याने चालना मिळाली होती. जीवनाविषयी तिला वाटणाऱ्या उबगाची व असंतोषाची भावना जवळजवळ मरून गेली होती ती पुनः उचंबळून आली. विस्मृतीच्या उदरात गडप झालेल्या तारुण्यातील भावना व आशा आकांक्षा पुनः जाग्या झाल्या. तरुणपणी ती बरोबरीच्या मैत्रिणींशी संसाराविषयी बोलायची, पण ती स्वतः व त्या मैत्रिणीसुद्धा दुःखाच्याच कर्मकहाण्या सांगत. आपल्या खडतर जीवनाचे मूळ कशात आहे याबद्दल कुणीच कधी विचार केला नव्हता. पण आज तिचा पुत्र तिच्यासमोर बसून जे बोलत होता व त्याच्या डोळ्यांत व चेहऱ्यावर जे भाव व्यक्त होत होते ते तिच्या अंतःकरणाला जाऊन भिडत होते. आपल्या मुलाला आपल्या आईचे जीवन पूर्णपणे समजले आहे, आपल्या दुःखाला त्याच्या तोंडून वाचा फुटत आहे व त्याला आपल्याविषयी सहानुभूती वाटत आहे, या जाणिवेने तिचे अंतःकरण त्याच्याविषयीच्या अभिमानाने भरून आले.

मातेच्या दुःखाची जाणीव कुणालाच नसते, हे ती जाणून होती. परंतु आज तिचा मुलगा स्त्रियांच्या कर्मकहाणीविषयी जे बोलत होता ते तिच्या परिचयाचे कटु सत्य होते, व त्याच्या त्या बोलण्याने तिच्या हृदयातील मृदु भावना चाळवल्या जाऊन तिच्या अंतःकरणाचे पाणीपाणी होत होते.

"पण मग तू काय करणार आहेस?" तिने त्याला मध्येच थांबवून विचारले.

"मी प्रथम स्वतः अभ्यास करणार, अन् मग इतरांना शिकवणार. आम्ही कामगारांनी अभ्यास करायला हवा. आपले जीवन इतके खडतर कां असते हे नीट समजून घ्यायला हवं."

त्याच्या निळ्या नेत्रांतील नेहमीचा कठोरपणा व गांभीर्य जाऊन त्याजागी मार्दव व प्रेमळपणाचे नवे तेज दिसू लागले ते पाहून ती हर्षित झाली. तिच्या ओठांवर स्मिताची रेखा उमटली. तिच्या अंतरंगात दोन परस्परविरोधी भावनांचा संघर्ष सुरू होता. जीवनातील दुःखांची इतकी तीव्र व स्पष्ट जाणीव आपल्या मुलाला झाली आहे हे पाहून तिला त्याच्याविषयी एकीकडे अभिमान वाटत होता, तर त्याचबरोबर दुसरीकडे त्याचे वय अजून फार कोवळे आहे, आणि तो इतरांपेक्षा अजिबात निराळं बोलत आहे व तिच्या स्वतःसकट सर्वांनाच अटळ वाटणाऱ्या जीवनातील दुःखांविरुद्ध व हालअपेष्टांविरुद्ध एकाकीच लढण्याचा त्याचा निर्धार आहे, या विचाराने ती चिंताग्रस्त होत होती.

तिला वाटले, आपण याला म्हणावे, "बेटा! तू एकटा काय करणार?"

पण आपण असं म्हटलं तर त्याच्याविषयीचं वाटणारं कौतुक व आदर यात काहीतरी कमीपणा येईल, अचानकपणे इतकी हुशारी दाखविणाऱ्या व आपल्याला अगम्य असं काहीतरी नवंच बोलणाऱ्या आपल्या मुलाच्या मोठेपणाला त्यामुळे बाधा येईल, असा विचार येऊन तिने ओठावर आलेले ते शब्द मागे परतवले.

आपल्या आईच्या ओठांवरचे स्मित, आपलं बोलणं ऐकण्यातील तिची एकाग्रता, तिच्या नेत्रांतील प्रेमळ भाव, हे सर्व पावेलने पाहिले आणि आपण प्रतिपादन करीत असलेले सत्य तिला पटवून देण्यात आपल्याला यश आले आहे असे त्याला वाटले. आपल्या शब्दांतील ही शक्ती प्रत्ययास येऊन त्याला युवकसुलभ अभिमान वाटला व त्यायोगे त्याचा आत्मविश्वास दुणावला. तो आवेशाने बोलत होता. मधूनमधून त्याच्या चेहऱ्यावर स्मित दिसू लागे, तर क्षणात त्याच्या कपाळावर आठ्यांचे जाळे पसरे. मधूनमधून त्याच्या शब्दांत जळजळीत चीड व्यक्त होई व त्याचे शब्द इतके कठोर असत की ते ऐकून ती भयभीत होऊन जाई व मस्तक हालवून त्याला मृदु स्वरात विचारी,

"तू म्हणतोस ते शक्य आहे, पाशा?"

"होय, शक्य आहे!" तो निर्धाराने उत्तर देई, आणि मग बहुजनसमाजाचे हित साधण्याची तळमळ असलेले काही लोक जनतेत सत्याचा प्रचार कसा करीत होते आणि त्यामुळे मानवजातीचे शत्रू त्यांना तुरुंगांत डांबून व सक्तमजुरीची शिक्षा देऊन त्यांचा कसा छळ करीत होते, याचे वर्णन करू लागे.

"असा ज्यांचा छळ होत आहे असे लोक माझ्या माहितीचे आहेत. ते खरोखर धरतीमातेचे सुपुत्र आहेत," तो आवेगाने म्हणाला.

त्या लोकांविषयीच्या विचाराने तिला अधिकच भय वाटू लागलं व हे सारं खरंच का म्हणून पुनः विचारावंसं तिला वाटलं, पण तिला ते शब्द उच्चारण्याचा धीर झाला नाही. ज्या लोकांनी हे भयंकर विचार आपल्या मुलाच्या डोक्यात भरवले होते व ज्यांच्याविषयी नीट आकलन होणे तिच्या तर्कशक्तीपलीकडचे होते, त्यांच्याबद्दलच्या हकीकती ती श्वास रोखून ऐकू लागली. अखेर ती त्याला म्हणाली,

"पहाट होत आली आता. तू आता जाऊन थोडी तरी झोप घे पाहू."

"हो, झोपतोच मी आता," तो तिच्याकडे वाकून म्हणाला. "पण मी सांगितलं ते सारं समजलं ना तुला?"

"हो," ती उसासा टाकून म्हणाली. पुनः तिच्या नेत्रांतून अश्रू वाहू लागले व ती एकदम मोठ्याने म्हणाली, "अशानं तुझा सत्यानाश होईल, बेटा!"

तो उठला व खोलीच्या दुसऱ्या टोकाकडे चालू लागला.

"ते काही असू दे, पण मी काय करतो, कुठे जातो, हे मी तुला सांगितलं आहे. आणि तुझं माझ्यावर खरोखर प्रेम असेल तर तू माझ्या या कार्याच्या आड येऊ नकोस अशी मी तुझ्याजवळ भीक मागतो, ममी!"

"माझ्या लाडक्या बेटा!" ती हुंदके देत म्हणाली. "कदाचित् तू मला हे सारं सांगितलं नसतं तरच बरं झालं असतं रे!"

त्याने आईजवळ जाऊन तिचा हात हातात घेऊन प्रेमभराने घट्ट दाबून धरला.

त्याने ज्या सहृदयतेने 'ममी' हा शब्द उच्चारला होता व ज्या विलक्षण व नव्याच आवेगाने तिचा हात दाबला होता त्याने ती भारावून गेली.

ती अडखळत म्हणाली, "नाही बेटा, मी तुझ्या आड येणार नाही. पण जपून राहा बरं, जपून राहा बाळ!" कोणत्या संकटापासून त्याचा बचाव करायचा होता याची तिलाच स्पष्ट कल्पना नव्हती, म्हणून ती शोकाकुलपणे

एवढंच म्हणाली, "तू दिवसेंदिवस किती सारखा वाळत चालला आहेस रे!"

तिने आपली प्रेमळ नजर त्याच्या उंच शरीरावर वरपासून खालपर्यंत फिरवली व ती म्हणाली,

"तुला योग्य वाटेल तसं कर. मी तुझ्या मार्गाच्या आड कधीच येणार नाही. पण माझं एकच सांगणं आहे. कोणाशीही बोलताना सावधगिरीने वाग. लोकांपासून जपून राहा. लोक एकमेकांना पाण्यात पहात असतात. लोक फार स्वार्थी, लोभी अन् मत्सरी असतात. दुसऱ्याच्या वाईटावर टपलेले असतात. तू एकदा त्यांच्याकडे बोटं दाखवून त्यांचे दोष काढू लागलास म्हणजे ते तुझा द्वेष करतील अन् तुझा नाश करतील!"

पावेल दरवाज्यातच उभा राहून तिचे हे व्यथित अंतःकरणातून निघणारे उद्‌गार ऐकत होता. तिचे बोलणे झाल्यावर तो किंचित हसून म्हणाला,

"तू म्हणतेस ते बरोबर आहे—लोक वाईट आहेत हे खरं आहे. पण सत्य नावाची काही तरी चीज आहे हे मला कळून आल्यापासून मला वाटू लागलं आहे की लोक काही तितके वाईट नाहीत. माझ्यात हा बदल कसा झाला ते मला ठाऊक नाही, पण मी अगदी लहान होतो तेव्हा मला सर्वांची भीती वाटे, नंतर मी मोठा होऊ लागलो तसा सर्वांविषयी तिरस्कार वाटू लागला. काही लोक फार क्रूर होते म्हणून, आणि इतरांचा का ते मला ठाऊक नाही, पण तिरस्कारच वाटत होता एवढं खरं! पण आता सगळंच निराळं वाटू लागलं आहे. मला आता लोकांचा राग येण्याऐवजी त्यांची दया येते. कां कुणास ठाऊक, पण लोक दुष्ट असतात त्याला सर्वस्वी ते जबाबदार असतात असं नाही हे कळून आल्यापासून मला त्यांच्याविषयी सहानुभूती वाटू लागली आहे..."

मधूनच जणू काय आपल्या अंतरंगातून येणारा आवाज ऐकण्यासाठी तो थांबला व नंतर विचारमग्न होत शांतपणे उद्‌गारला, "हा सर्व सत्याचं आकलन झाल्याचा परिणाम!"

त्याच्याकडे एक नजर टाकून उसासा टाकीत आई पुटपुटली,

"देवा तूच याचं रक्षण कर! तुझ्यात काहीतरी भयंकरच बदल घडून आला आहे बेटा!"

थोडचा वेळाने पावेलला झोप लागल्यावर आई स्वतःच्या बिछान्यावरून हळूच उठून त्याच्या बिछान्याजवळ जाऊन उभी राहिली. तो गाढ झोपी गेला होता. त्याच्या तांबूस चेहऱ्यावरील कठोर व निश्चयी भाव व्यक्त



करणाऱ्या रेषा पांढऱ्या शुभ्र उशीवर स्पष्ट उठून दिसत होत्या. ती हात छातीवर घट्ट दाबून उभी होती. तिचे ओठ हालत होते, पण त्यातून शब्द बाहेर पडत नव्हते. तिच्या नेत्रांवाटे बाहेर पडणारे टपोरे अश्रूंचे थेंब तिच्या गालांवर ओघळत होते.

## ५

वरील प्रसंगानंतर पुनः पूर्वीसारखंच त्यांचं शांत जीवन सुरू झालं. त्या दोघांत एक प्रकारचं अंतर कायम असूनही ती आता एकमेकांच्या फार निकट आली होती.

एकदा मधल्यात्र एका वारी सुटी आली. त्या दिवशी घराबाहेर पडताना पावेलने आईला सांगितले,

"या शनिवारी शहरातले काही लोक माझ्याकडे येणार आहेत."

"काय, शहरातले?" आईने विचारले, व ती एकाएकी हुंदके देऊ लागली.

"काय झालं आई तुला असं रडायला?" पावेल जरा चिडून म्हणाला.

आईने पदराने डोळे पुसले व ती उसासा टाकीत म्हणाली,

"नाही, तसं काही विशेष नाही! पण आपलं मला वाटलं—"

"काय वाटलं तुला? भीती वाटली?"

"हो," तिने कबुली दिली.

तो तिच्या बाजूला झुकला व थेट आपल्या बापासारखा संतापाने बोलू लागला,

"ही भीती—या भीतीमुळेच आमची दुर्दशा झाली आहे. या आमच्या भीतीचाच फायदा घेऊन आमच्यावर सत्ता गाजविणारे लोक आम्हाला दडपून ठेवतात, दमदाटी करीत राहातात."

"असा रागावू नकोस बेटा," आई त्याला विनवू लागली. "मला भीती वाटते यात माझा दोष का आहे? सर्व आयुष्यभर ही भीती माझ्या अंगात मुरली आहे. माझा सारा अंतरात्माच या भीतीने आच्छादून टाकला आहे. मग मी तरी काय करू?"

"तुला दुखवल्याबद्दल मला माफ कर आई. पण माझा नाइलाज आहे," आपल्या स्वरात थोडे मार्दव आणून तो बोलला व तडक बाहेर पडला.

नंतरचे तीन दिवस तिच्या मनात भीतीने ठाण मांडले होते. ती नवखी

व विलक्षण माणसं आपल्या घरी येणार ही कल्पना मनात येताच ती दचके व तिच्या अंतःकरणाचा थरकाप होई. तिच्या मुलाने अंगिकारलेला नवा मार्ग त्याच भयंकर माणसांनी त्याला दाखवला होता!

शनिवारी सायंकाळी पावेल कारखान्यातून घरी आला, त्याने आंघोळ करून कपडे बदलले व तो बाहेर पडला.

जातेवेळी त्याने आईकडे न पाहाताच तिला सांगितले,

"हे पहा, कुणी आलं तर मी हा आता परत येतोच आहे म्हणून सांग. अन् तुझी ही भीती सोडून दे पाहू कशी!"

तिला भोवळ आल्यासारखे वाटून ती मटकन् बाकावर बसली. त्याच्या कपाळावर आठ्या पसरल्या व तो तिच्याकडे पाहू लागला.

"आज रात्रीपुरतं तू दुसरीकडे जातेस का मग?" त्याने सुचवलं. ही सूचना करून त्याने तिचे मन दुखविले होते.

"छे! तसं काय म्हणून?" ती उत्तरली.

ते नोव्हेंबरचे अखेरचे दिवस होते. बाहेर रस्त्यावर दिवसभर बारीक बर्फवृष्टि झाली होती, ते बर्फ तुडवीत पावेल निघाला होता त्याचा खसखस आवाज तिच्या कानांत शिरत होता. खिडकीच्या तावदानांतून बाहेर दिसणारा काळोख आपल्यावर नजर ठेवून आहे, तो काळोख म्हणजे आपला वैरी आहे असेच तिला भासत होते. पावेल दूर निघून गेला तरी ती तशीच दोन्ही हातांनी बाकाला घट्ट धरून बसून राहिली होती. तिची नजर दरवाजावर खिळलेली होती.

तीच ती भयंकर माणसं, विचित्र पोषाख घातलेली माणसं अंधारातून किंचितसुद्धा आवाज न करता फिरताहेत असेच तिच्या मनाने घेतले. मग कोणी-तरी काळोखात चाचपडत घराशी आलं व भिंतीला धरून पुढं सरकू लागलं.

थोड्या वेळाने खरोखरच एक शीळ ऐकू आली. त्या ध्वनीच्या करुण कर्णमधुर लहरी त्या काळोखाच्या शांत वातावरणात घुमल्या व जणू काय कुणाचा शोध घेत असल्यासारख्या जवळ येत येत अचानक तिच्या घराच्या खिडकीजवळच थांबल्या व भिंतीच्या लाकडी फळ्यांत शिरून नाहीशा झाल्या.

दाराबाहेर पावले वाजल्याचा आवाज आला. आई दचकून उभी राहिली. तिच्या भुवया उंचावल्या होत्या.

दार उघडले गेले. प्रथम एक उंच, केसाळ टोपी दिसू लागली. नंतर त्या ठेंगण्या दारातून वाकून आत येणाऱ्या व्यक्तीचा उंच देह आत शिरला.



आत येताच तो सरळ उभा राहिला. आईला अभिवादन करण्यासाठी त्याने हात उचलले व जोराने श्वास घेत खणखणीत आवाजात तो उद्गारला,

"नमस्ते!"

आईने न बोलताच मान हालवून त्याच्या अभिवादनाचा स्वीकार केला.

त्यानेच विचारले,

"पावेल घरी आहे का?"

त्याने सावकाशपणे आपले लोकरीचे जाकीट काढले, एक पाय वर उचलून डोकीवरच्या टोपीनेच बुटांवर साचलेले बर्फ झटकून टाकले, दुसरा पाय उचलून तसेच केले, व टोपी कोपऱ्यात फेकून देऊन तो पलिकडच्या खुर्चीकडे चालू लागला. ती खुर्ची आपले वजन सहन करण्याइतकी मजबूत आहे की नाही हे पाहिले व मग तिच्यावर आसन ठोकून तोंडावर हात ठेवून त्याने एक मोठी जांभई दिली. त्याचे डोके गोल होते व केस व्यवस्थित बारीक कापलेले होते. त्याचा चेहराही दाढी केल्यामुळे साफ दिसत होता. त्याच्या ओठावरच्या मिशांची टोके लोंबत होती. त्याने आपल्या मोठमोठ्या डोळ्यांनी सर्व खोली नीट न्याहाळली. बसल्याबसल्या खुर्ची मागेपुढे हालवीत व पायावर पाय आडवा ठेवीत तो म्हणाला,

"हे तुमचं स्वतःचं घर, की भाड्याचं?"

"भाड्याने घेतलेलं." समोरच बसलेल्या आईने उत्तर दिले.

"काही विशेष चांगलं घर दिसत नाही," त्याने मत दिले.

"पाशा लवकरच परत येईल, तोवर थांबायला सांगितलं आहे त्यानं."

"हां! तेच करतो आहे की!" तो शांतपणे उत्तरला.

त्याचा शांतपणा, त्याच्या आवाजातील मार्दव, व त्याची साधीभोळी मुद्रा पाहून तिची भीती कमी होऊन तिला जरा धीर आला. त्याच्या मोठाल्या डोळ्यांत प्रसन्नतेची चमक होती व त्यांत स्नेहार्द्रता भरलेली होती. त्याचा बांधा किरकोळच पण किंचित् वाकलेला होता व पाय लांबसडक होते. पण एकंदरीत त्याची तिच्यावर चांगली छाप पडली. त्याने अंगात निळा शर्ट घातला होता व सैल विजारीचा खालचा भाग बुटांत खोचलेला होता.

तिला वाटलं, याला विचारावं की, बाबा रे, तू कोण, कुठला, पावेलशी तुझा परिचय जुना की अलिकडचा?

पण ती काही बोलण्यापूर्वीच खुर्चीला एक झोका देऊन तो पुढे सरसावला व तिला म्हणाला,

"तुमच्या कपाळाला ही खोक पडली आहे ती कुणी मारल्यामुळे, नेनको*?"

त्याच्या आवाजात मार्दव होतं व नेत्रांतही स्मित चमकत होतं, तरीसुद्धा त्याच्या या प्रश्नाने आईला राग आला.

"त्याच्याशी तुम्हाला काय करायचं आहे?" तिने ओठ घट्ट आवळून घेऊन थंडपणे विचारलं.

सबंध शरीर वाकवून तिच्याकडे वळून तो म्हणाला,

"रागावू नका अं! माझ्या मानलेल्या आईच्या डोक्यात सुद्धा अशीच खोक पडली होती म्हणून विचारलं. ती ज्याच्या जवळ राहिली होती त्यानेच तिला मारलं. तो एक चांभार होता. त्याने जोडे बनविण्याच्या लाकडी साचाच तिला फेकून मारला. ती कपडे धुण्याचं काम करीत असे. तो चांभारकाम करायचा, अन् पक्का दारुड्या होता. तिने त्याला कुठे गाठला, राम जाणे! मला तिने दत्तक घेतल्यावर मग तिचं त्याच्याशी जुळलं! त्याने तिला असं भयंकर मारलं की माझे तर भीतीने डोळे पांढरे व्हायचीच वेळ आली!"

त्याची ही अगदी मोकळी वागणूक व स्पष्ट बोलणं पाहून आईच्या मनातली भीतीही पुष्कळच कमी झाली. उलट आपण त्याला आरंभी अगदी तुटकपणाने उत्तर दिल्याचं पावेलला कळलं तर तो आपल्यावर रागावेल अशीच तिला भीती वाटू लागली. आधी तसं वागल्याबद्दल अपराधीपणाचा भाव चेहऱ्यावर आणून स्मित करीत ती बोलू लागली,

"मी खरोखरच रागावले नव्हते. पण तुम्ही अगदी अचानक तो प्रश्न विचारल्यामुळे तसं झालं. मला सुद्धा माझ्या घरधन्यानेच मारल्यामुळे ही खोक पडली. ते आता ह्यात नाहीत. बरं पण तुम्ही तातार आहात काय?"

त्याने आपले पाय झटकले व इतके तोंड वासून स्मित केले की त्याचे कानसुद्धा हालले. नंतर तो गंभीर चेहरा करून म्हणाला,

"नाही, अजून तरी मी तातार बनलो नाही!"

"तुमची बोलण्याची तऱ्हा रशियन लोकांपेक्षा निराळी आहे म्हणून तसं म्हटलं मी!" असा खुलासा तिने केला, पण तातार शब्दावर त्याने केलेल्या कोटीचं तिला हसू आल्यावाचून राहिलं नाही.

---

*नेनको: युक्रेनमध्ये आईला प्रेमाने हाक मारताना नेनको म्हणतात.



"माझं बोलणं रशियनांपेक्षा सरस आहे, आई!" तो हसत म्हणाला, "मी खोखोल* आहे, अन् मूळचा कानेवचा."

"इथे येऊन बरेच दिवस झाले का तुम्हाला?"

"पलिकडच्या शहरातच मी वर्षभर काढलं. अन् आता महिन्यापूर्वीच कारखान्यात लागलो. इथे तुमचा मुलगा अन् त्याच्यासारखेच काही चांगले लोक भेटले म्हणून आता बहुधा मी इथेच राहीन," मिशीच्या टोकांना पीळ देत त्याने सांगितले.

त्याच्या या बोलण्यामुळे तिला तो आवडू लागला व आपल्या मुलाला त्याने चांगलं म्हटल्याबद्दल तिला कृतज्ञता वाटू लागली. तिने त्याला विचारले,

"चहा घेणार ना?"

"मी एकटाच?" खांदे उडवीत तो उत्तरला. "बाकीची मंडळी येताहेत तोवर थांबू या. सगळेजण आल्यावर मगच चहा द्या."

आणखी मंडळी येणार आहेत ही त्याने आठवण करून देताच तिला पुन: आपल्या भीतिदायक विचारांची आठवण झाली, अन् ती स्वत:शीच म्हणाली,

"ती इतर माणसं याच्यासारखीच असली तर किती बरं होईल!"

पुन: बाहेर पावलं वाजू लागली. कुणीतरी दरवाजा उघडला व आई पुन्हा उठून उभी राहिली. एक तरुण मुलगी आत शिरली. ते पाहून आई चकित झाली. तिचा बांधा लहानसरच होता व तिच्या चेहऱ्याची ठेवण एखाद्या खेडवळ शेतकरी कुटुंबातील स्त्रीसारखी होती. आपल्या काळ्याभोर केसांची तिने एकच वेणी घातली होती.

"मला उशीर तर झाला नाही ना?" त्या मुलीने मृदु स्वरात विचारले.

"नाही," हे पहात दरवाजातून आणखी कोणी आत शिरतं आहे का खोखोल म्हणाला. त्याने तिला पुढे विचारले, "थेट चालतच आलीस तू?"

"हो, चालतच तर काय?" तिने त्याला उत्तर दिले व ती आईकडे वळून म्हणाली. "नमस्ते! तुम्ही पावेलच्या आईच ना? माझं नाव नाताशा."

"आणि आडनाव?" आईने विचारले.

---

*खोखोल: युक्रेनियन लोकांना रशियन लोकांनी दिलेले टोपण नाव.

"वासिल्येव्ना. अन् तुमचं?"

"निलोव्ना. सबंध नाव पेलाग्येया निलोव्ना."

"ठीक. आता आपला परिचय झाला."

"होय, झाला खरा," आई म्हणाली. तिला आता पुष्कळ मोकळं दाटत होतं. ती त्या मुलीकडे पाहून किंचित् हसली सुद्धा.

त्या खोखोलने मुलीला अंगातला कोट काढण्याला मदत करीत म्हटले,

"बाहेर फार थंडी आहे, नाही?"

"कमालीची! अन् वारं तर इतकं गार सुटलं आहे!"

तिचा आवाज गोड अन् स्पष्ट होता. तिचा चेहरा लहानसाच अन् जिवणी मोठी होती. तिचा चेहरा एकंदरीने सफरचंदासारखा गोल अन् ताजा टवटवीत दिसत होता. कोट काढून ठेवल्यावर तिने थंडीमुळे लाल झालेले गाल आपल्या लहानशा हातांनी खूप चोळले व ती पुढच्या खोलीत गेली. तिच्या साध्या बुटांचा आवाज झाला तो ऐकून आई स्वतःशीच म्हणाली, "थंडीचे उंच बूट दिसत नाहीत हिच्याकडे!"

"हुऽ हुऽऽ," थंडीने कुडकुडत नाताशा उद्‌गारली. "काय थंडी ही! मी तर गारठून गेल्ये अगदी!"

"जरा थांबा. मी आता गरम चहा करून आणत्येच," आई म्हणाली व ती आत स्वयंपाक घरात गेली.

या मुलीला जणू काय आपण फार पूर्वीपासून ओळखतो असे आईला वाटू लागले व नाताशाविषयी तिचे मातृहृदय प्रेमाने भरून गेले. बाहेरच्या खोलीतलं बोलणे ऐकता ऐकता तिच्या चेहऱ्यावर स्मित विलसू लागले.

"तुझा चेहरा असा चिंताग्रस्त का दिसतो, नाखोद्‌का?" नाताशा खोखोलला विचारीत होती.

"नाही, विशेष काहीच नाही," तो शांतपणे उत्तरला. "पण या म्हातारीचे डोळे थेट माझ्या आईसारखेच भासले मला. मला पुष्कळदा माझ्या आईची आठवण येते अन् ती जिवंतच असावी असं वाटू लागतं."

"पण तू तर म्हणाला होतास की तुझी आई वारली म्हणून!"

"ती मानलेली आई. आता मी म्हणालो ते माझ्या सख्ख्या आईबद्दल. ती कदाचित् किएव शहरातल्या रस्त्यांवर भीक मागत अन् वोड्का पीत हिंडत असेल! कदाचित् ती दारू पिऊन झिंगल्यावर पोलिस तिला मारीतही असतील, कुणी सांगावं!"



"अरेरे! गरीब बिचारा!" आत आई एक उसासा टाकून पुटपुटली.

बाहेर नाताशा हलक्या आवाजात व भावनावेगाने काहीतरी बोलली. त्यानंतर पुनः खोखोलचा खणखणीत आवाज ऐकू आला.

"तू बच्ची आहेस! जगाचा तुला काहीच अनुभव नाही. मुलांना जन्म देणं तर कठीण असतंच, पण त्यांना नीट वाढवून चांगल्या सवयी लावणं हे तर त्याहूनही बिकट असतं, समजलीस!"

"बिचारा!" आई पुन: स्वत:शीच म्हणाली. तिला खोखोलची कीव येत होती व बाहेर जाऊन त्याचे सांत्वन करण्याची इच्छा होत होती. पण तेवढ्यात बाहेरचा दरवाजा उघडला आणि निकोलाय वेसोव्श्चिकोव आत आला. त्याचा बाप दानिलो याला वस्तीतले सगळे लोक अट्टल चोर म्हणून ओळखीत. स्वतः निकोलायसुद्धा अत्यंत माणूसघाण्या म्हणून सर्वांच्या माहितीतला होता. तो नेहमी सगळ्यांपासून दूर असायचा, व त्याबद्दल त्याची टिंगलही होत असे.

"कोण निकोलाय? काय काम आहे बाबा?" त्याला तिथे पाहून वाटलेलं आश्चर्य तिच्या आवाजातही व्यक्त होत होतं.

"पावेल घरी आहे ना?" त्याने तिला नमस्कारही न करता विचारलं. हे म्हणतानाच त्याने आपला रुंद, देवीच्या वणांनी भरलेला चेहरा हाताने पुसला. त्याने आतल्या खोलीत नजर टाकली व तो आईकडे दुर्लक्ष करून आत शिरला.

"नमस्ते, कॉम्रेड्स!" तो आत शिरत म्हणाला.

'म्हणजे! हा सुद्धा यांच्यांतलाच की काय?' आई स्वत:शी म्हणाली. तोही त्यांच्यांतला असावा हे तिला आवडले नव्हते.

तो आत शिरतांच नाताशाने हस्तांदोलनासाठी हात पुढे केलेला पाहून तर आईला फारच आश्चर्य वाटले.

निकोलायच्या नंतर दोघेजण आले. ते दोघेही पोरसवदाच होते. त्यांच्यापैकी एक फ्योदोर हा सिझोव नावाच्या फार जुन्या कामगाराचा पुतण्या होता व आई त्याला ओळखत होती. त्याचे नाकडोळे रेखीव होते, केस कुरळे होते व कपाळपट्टी रुंद होती. दुसरा मुलगा लाजाळू दिसत होता. त्याने आपले केस डोक्यावर चापूनचोपून बसवलेले होते. आई त्याला ओळखत नव्हती, पण तो काही भयंकर दिसत नव्हता.

सर्वांत शेवटी पावेल घरी आला. त्याच्या बरोबर दोन तरुण कामगार होते. त्यांना आई ओळखत होती.

आईला चहा करताना पाहून पावेल मृदु स्वरात तिला म्हणाला,

"तू चहा करते आहेस ना? बरं झालं!"

"मी जाऊन वोड्का घेऊन येऊ का?" कशाबद्दल तरी तिला आज धन्यता व कृतज्ञता वाटत होती ती कशी व्यक्त करावी हे न सुचून तिने वोड्का आणण्याची तयारी दर्शवली.

"नाही, तशी जरूरी नाही! आम्ही कोणीच पीत नाही!" पावेल हसत उत्तरला.

त्याच्या प्रसन्न चेहऱ्याकडे पाहिल्यावर तिच्या मनात एकाएकी अशी कल्पना डोकावली की आपली फजिती करून गंमत पहावी म्हणून तर याने आपल्याला या मंडळीविषयी भयंकर काही तरी सांगून घाबरवून सोडलेलं नाही ना?

तिने श्वास रोखून अगदी हळू आवाजात विचारले,

"तू गुप्त मंडळी म्हणत होतास ती हीच का?"

"हो हो!' तेच लोक आहेत हे!" पावेलने उत्तर दिले व तो दुसऱ्या खोलीत निघून गेला.

"अस्सं काय! याचं पोरपण अजून गेले नाही हेच खरं!" त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पहात ती म्हणाली. तिच्या स्वरात व चेहऱ्यावर प्रेमळपणा व मुलाविषयीचा अभिमान स्पष्टपणे व्यक्त होत होता.

## ६

चहा तयार होताच तो घेऊन आई पुढच्या खोलीत आली. सर्व मंडळी टेबलाभोवती बसली होती. नाताशा कोपऱ्यात दिव्याखाली बसून एक पुस्तक वाचीत होती.

"लोकांना इतकं खडतर जीवन का जगावं लागतं हे समजून घेण्यासाठी –" ती वाचू लागली.

"अन् लोक स्वतःसुद्धा इतके कठोर का असतात –" खोखोलने मध्येच तोंड घातले.

नाताशाने पुढे वाचले, "...आपण त्यांच्या सामाजिक दर्जाचा व परिस्थितीचा अभ्यास केला पाहिजे –"



"जरूर तसा अभ्यास करा, मुलांनो! जरूर करा!" आई एकीकडे चहा ओतता ओतता म्हणाली.

सगळेजण चकित होऊन तिच्याकडे पाहू लागले.

"तुला काय म्हणायचंय, आई?" पावेलने जरा नापसंतीच्या स्वरात विचारले.

"मला?" आई चपापली. तिने वर पाहिले तो सगळयांच्या नजरा तिच्याकडे लागलेल्या होत्या.

"नाही, काही नाही! मी स्वतःशीच पुटपुटत होते," ती जरा ओशाळून म्हणाली. "तुम्ही अभ्यास करणार असाल तर जरूर करा! दुसरं मी काय सांगणार?"

नाताशा मोठ्याने हसली. पावेलने नुसतेच स्मित केले.

"तुम्ही चहा दिला याबद्दल आम्ही तुमचे आभारी आहोत." खोखोल उद्गारला.

"वा! हे ठीक! चहा पिऊन पाहाण्यापूर्वीच आभार मानता!" आई त्याला म्हणाली. नंतर तिने पावेलकडे वळून विचारले, "पण माझी तुम्हाला अडचण होत असेल, नाही?"

"वा! असं कसं होईल? तुमच्याच घरी आम्ही आलो अन् तुमचीच अडचण!" नाताशा म्हणाली. "पण ते जाऊ द्या. तुम्ही मला लवकर चहा द्या कसा! मी थंडीने कुडकुडते आहे अगदी! माझ्या पायांचं तर बर्फच झालं आहे जसं काही!" एखाद्या बालकाप्रमाणे काकुळतीला येऊन ती बोलत होती.

"हो, हो! देतेच! हा घ्या!" आई लगबगीने म्हणाली.

नाताशाने चहा पिऊन संपवल्यावर समाधानाचा सुस्कारा टाकला, एका खांद्यावर आलेल्या वेणीला झटका दिला व हातांतील सचित्र पिवळया पुस्तकातून ती पुनः वाचू लागली.

तिच्या वाचनात व्यत्यय येऊ नये म्हणून आई बिलकुल आवाज न करता चहादाणीतून चहा ओतीत वाचनाकडे लक्ष देत होती. चहादाणीतून निघणारा वाफेचा सूंऽऽ आवाज नाताशाच्या मंजुळ आवाजात मिसळून जात होता. कोणे एके काळी लोक गुहांमध्ये राहून केवळ दगडांनी शिकार करून उपजीविका कशी करीत, वगैरे गोष्टी नाताशा वाचीत होती. त्या गोष्टी अगदी साध्या कल्पित कथांप्रमाणेच होत्या. असल्या गोष्टी बेकायदेशीर व

आक्षेपार्ह कां असतात, असे पावेलला विचारावेसे आईला वाटू लागले व ती त्याच्या चेहऱ्याकडे पाहू लागली. पण थोड्या वेळात तिला त्या पुस्तकातले वाचलेले ऐकण्याचा कंटाळा आला आणि कोणाच्याही ध्यानात येणार नाही अशा प्रकारे तिथे जमलेल्यांच्या चेहऱ्यांचे ती निरीक्षण करू लागली.

पावेल नाताशाच्या शेजारीच बसला होता. तिथे जमलेल्यात तोच सर्वात देखणा होता. नाताशा वाकून पुस्तक वाचीत होती व कपाळावर येणारे केस एका हाताने वारंवार मागे सारीत होती. मधूनमधून ती वर पाहून मानेला झटका देई, पुस्तकात न पहाता व सभोवती बसलेल्या माणसांकडे प्रेमळ नजरेने पहात अगदी हलक्या आवाजात ती आपले मत जाहीर करी.

खोखोल टेबलाच्या एका कोपऱ्याशी बसला होता व मिशांच्या टोकांना पीळ भरीत तिरळ्या डोळ्यांनी नाकाच्या शेंड्यावरून त्यांच्याकडे पहाण्यात मग्न होता. निकोलाय वेसोव्श्चिकोव एखाद्या काठीसारखा ताठ बसला होता व हाताचे तळवे त्याने गुडघ्यावर ठेवले होते. देवीचे वण असलेला, भुवया नसलेला व बारीक ओठांचा त्याचा निर्विकार चेहरा एखाद्या मुखवट्या-सारखा दिसत होता. समोरच्या पितळी चहादाणीत दिसणारे स्वतःचे प्रतिबिंब तो आपल्या बारक्या डोळ्यांनी टक लावून पहात होता व त्याचा श्वास रोखलेला होता. लहानशा बांध्याचा फ्योदोर वाचलेला मजकूर ऐकत असताना जणू काय तेच शब्द स्वतःशी घोकीत असल्याप्रमाणे आवाज न करता ओठ हालवीत होता. त्याच्याबरोबर आलेला दुसरा मुलगा वाकून बसला होता. त्याने हाताचे कोपर गुडघ्यांवर टेकवले होते व तळहात गालां-वर टेकवून तो स्वतःशीच काहीतरी विचार करीत होता व त्याच्या ओठांवर स्मिताची रेषा उमटली होती. पावेलच्या बरोबर आलेल्यांपैकी एका माणसाचे केस कुरळे अन् पिंगट रंगाचे होते. त्याचे डोळेही हिरव्या रंगाचे व आनंदी वृत्तीचे निदर्शक होते. तो सारखा चुळबूळ करीत होता त्यावरून त्याला काहीतरी बोलायचे आहे असे दिसत होते. पावेलबरोबर आलेल्या दुसऱ्या माणसाचा वर्ण तांबूस होता व बारीक कापलेल्या आपल्या केसांवरून तो सारखा हात फिरवीत होता. त्याची नजर जमिनीवर खिळलेली असल्या-मुळे त्याचा चेहरा आईला नीट दिसत नव्हता.

त्या खोलीत विलक्षण ऊब वाटत होती व तिथले वातावरण आईला जरा निराळेच भासत होते. नाताशाचे वाचन चालू होते तशी आईला आपल्या तरुणपणच्या दिवसांची आठवण होत होती. त्यावेळीही तरुण मंडळी



जमून खिदळत असत. पण त्यांचं बोलणं अचकटविचकट असायचं, बीभत्स थट्टामस्करी सुरू असायची व सगळ्यांच्या तोंडाला वोड्काची मनस्वी घाण यायची! त्या आठवणींच्या दृश्यांचा चित्रपट तिच्या मनश्चक्षूंसमोरून सरकू लागला तशी तिला स्वतःचीच कीव करावीशी वाटू लागली.

आपल्या पतीशी आपलं लग्न कसं ठरलं तो प्रसंग तिला आठवला. एकदा अशाच पार्टीच्या वेळी त्याने काळोखात तिला गाठून भिंतीशी दाबून धरलं होतं अन् दरडावणीच्या स्वरात विचारले होते,

"माझ्याशी लग्न करशील ना? बोल करशील ना?"

त्याच्या या धसमुसळेपणाचा तिला त्रास होत होता व ती चिडली सुद्धा. पण त्याने तिची छाती गच्च दाबून धरली होती व त्याच्या उष्ण श्वासोच्छ्वासाबरोबर दारूचा भपकारा तिच्या तोंडावर येत होता. ती त्याच्या तावडीतून निसटण्याचा प्रयत्न करीत होती, पण तो तिला घट्ट पकडून ठेवून गुरगुरला,

"थांब! चाललीस कुठं? माझ्या प्रश्नाचं उत्तर दे! ए! ऐकू येतंय की नाही?"

शरम व अपमान यांमुळे तिच्या तोंडून एक शब्दही बाहेर पडणे अशक्य झाले होते.

तेवढ्यात कोणीतरी दार उघडले म्हणून त्याने तिच्याभोवतीची मिठी सैल केली व जाता जाता तिला बजावले,

"येत्या रविवारी मी लग्न पक्कं करायला माणसं पाठवीन बरं का!"

आणि त्याने म्हटल्याप्रमाणे खरोखरच माणसं पाठवली अन् लग्न ठरलं!

त्या आठवणीसरसे आईने डोळे घट्ट मिटून घेतले व एक दीर्घ निश्वास टाकला...

"कोणे एके काळी लोक कसे राहात ते नको, तर आज कसं राहायला पाहिजे ते हवं आहे मला!" वेसोव्श्चिकोवने तक्रार केली.

"याचं म्हणणं बरोबर आहे!" पिंगट केसवाला इसम उठून उभा राहात उद्गारला.

"मुळीच नाही!" फ्योदोर जोराने म्हणाला.

वाद वाढत चालला तसे शब्द आगीच्या ज्वालांप्रमाणे भडकू लागले. एवढा आरडाओरडा कशासाठी होत होता ते आईला कळेना. सगळेच आवेशाने बोलत होते व त्यायोगे त्यांचे चेहरेही लाल झालेले दिसत होते,

पण कोणी संतापलेला दिसत नव्हता व तिच्या परिचयाचे झालेले अपशब्दही कोणी उपयोगात आणीत नव्हता. असं कां, याचा विचार करून आईने स्वत:शी ठरवलं,

'यांच्यात ही मुलगी आहे म्हणूनच त्यांना अपशब्द काढण्याची लाज वाटत असावी!'

येथे जमलेली सर्व मुलंच आहेत या आविर्भावाने नाताशा सर्वांकडे निरखून पहात होती तेव्हा तिच्या चेहऱ्यावरील गांभीर्य आईला आवडले.

"जरा थांबा, कॉम्रेड्स!" नाताशा अचानक ओरडून म्हणाली. सगळ्यांचे बोलणे थांबले व ते तिच्याकडे पाहू लागले.

"आपण सर्व गोष्टींचं ज्ञान मिळविले पाहिजे असं तुमच्यापैकी जे प्रतिपादन करीत आहेत त्यांचं म्हणणं बरोबर आहे. आपण स्वत:ला ज्ञानाच्या प्रकाशाने उजळून घेतलं पाहिजे म्हणजेच अंधारात चाचपडणाऱ्या लोकांना आपण दिसू शकू. प्रत्येक प्रश्नाचं अगदी खरं व प्रामाणिक उत्तर आपल्याला देता आलं पाहिजे. संपूर्ण सत्य अन् असत्य यांची आपल्याला नीट माहिती असायला हवी –"

खोखोल तिचे म्हणणे ऐकून तिच्या शब्दांना मान डोलवीत होता. निकोलाय वेसोव्श्चिकोव, तो पिंगट केसवाला व पावेलबरोबर आलेल्यांपैकी एक तरुण कामगार, हे तिघे मात्र बाजूला एक गट करून उभे होते. आणि का कुणास ठाऊक पण आईचा त्या तिघांबद्दल मात्र अनुकूल ग्रह झाला नाही.

नाताशाने बोलणे थांबविले तसा पावेल बोलायला उभा राहिला.

"फक्त पोट भरलं म्हणजे आपलं उद्दिष्ट साध्य झालं असं होईल काय? नाही. तसे मुळीच नाही." बाजूला उभ्या असलेल्या त्या तिघांकडे पहात तो शांतपणे म्हणाला. "आपल्या मानगुटीवर बसून आपल्या डोळ्यांवर झापडी बांधून ठेवणाऱ्यांना आपण दाखवून दिलं पाहिजे की, आपण सगळं पाहू शकतो. आपण मूर्ख नाही. आपल्याला माणसासारखं सुसंस्कृत जीवन जगण्याची इच्छा आहे. आपण आपल्या शत्रूला हे सप्रमाण दाखवून दिलं पाहिजे की त्यांनी आपल्याला काबाडकष्टाच्या रगाड्यात पिचत ठेवलं असलं तरी त्यामुळे बुद्धिमत्तेच्या बाबतीत त्यांची बरोबरी करणं आम्हाला अशक्य करून सोडण्यात त्यांना यश आलेलं नाही! फार काय आम्ही बौद्धिकदृष्ट्या त्यांच्यापेक्षा सुद्धा श्रेष्ठ ठरू शकतो!"



पावेलचं हे वक्तृत्व ऐकत असता आईचं अंत:करण त्याच्या-विषयीच्या अभिमानाने भरून आलं. त्याचं भाषण किती अस्खलित व मुद्देसूद होतं!

"ज्यांना पोटभर खायला मिळतं असे अनेक लोक आहेत, पण दुष्काळ आहे तो प्रामाणिक माणसांचा!" खोखोल बोलू लागला. "आमचं आजचं हे भिकार पशुतुल्य जीवनाचं डबकं व मानवी बंधुभावावर आधारलेले भावी कालातील सुखाचं साम्राज्य यांना साधणारा एक पूल आपल्याला बांधला पाहिजे. आपल्यासमोरचं कार्य हे असं आहे, कॉमरेड्स!"

"लढायची वेळ आली आहे तर मग असे हातावर हात ठेवून स्वस्थ का बसलात?" वेसोव्श्चिकोव गुरगुरला.

त्या सर्वांची बैठक संपून ते जायला निघाले तेव्हा मध्यरात्र उलटून गेली होती. वेसोव्श्चिकोव व पिंगट केसांचा माणूस हे दोघे सर्वांत आधी बाहेर पडले. आईचा त्यांच्याविषयीचा प्रतिकूल ग्रह त्यामुळे अधिकच वाढला. त्यांनी जाताना अगदी औपचारिक रीत्या तिला अभिवादन केले तेव्हा ती स्वत:शी पुटपुटली,

"या दोघांनाच कसली घाई झाली आहे बाहेर पडायची!"

"नाखोद्का, तू मला घरी पोचवायला येतोस का?" नाताशाने विचारले.

"अवश्य!" खोखोल म्हणाला.

नाताशा स्वयंपाकघरात जाऊन कोट व पायमोजे चढवू लागली तशी आई म्हणाली,

"या असल्या थंडीच्या मानाने तुझे मोजे फारच पातळ आहेत, नाही? मी तुझ्यासाठी लोकरीचे मोजे विणले तर चालेल ना?"

"तुम्ही एवढा लोभ दाखवता हेच खूप झालं, आई! पण लोकरीचे मोजे बोचतात." नाताशा हसत म्हणाली.

"पण मी असे विणून देईन ते मुळीच बोचणार नाहीत."

नाताशा डोळे बारीक करून आईकडे पहात होती. तिच्या तशा पाहाण्याने आई बेचैन झाली.

"मला आपलं वेडीला वाटलं तसं बोलले! पण मी मनापासून तसं म्हटलं होतं हो!" आईने सांगून टाकलं.

"तुम्ही खरोखरच किती चांगल्या आहात, आई!" नाताशा भावना-वेगाने म्हणाली व तिने प्रेमाने आईचा हात दाबला.

नाताशाच्या पाठोपाठच नाखोद्‌काही बाहेर पडला. त्याने जाताजाता आईचा निरोप घेतला व ठेंगण्या दारातून वाकून बाहेर पडतापडता आईच्या नेत्रांकडे पाहून घेतले.

आई आपल्या मुलाकडे पहात होती. तो दारात उभा राहून तिच्याकडे पाहून स्मित करीत होता.

"तू हंसतोस काय म्हणून, रे?" तिने अस्वस्थ होत विचारले.

"नाही, विशेष काही नाही. पण एकंदरीत मी खुषीत आहे एवढं खरं."

"मी म्हातारी असेन अन् वेडी सुद्धा असेन, पण तरीसुद्धा चांगलं काय नि वाईट काय यातला फरक मला समजतो बरं, पाशा!" ती जरा कडकपणे म्हणाली.

"मला आनंद आहे त्याचा!" पावेल म्हणाला. "पण आता पुष्कळच रात्र झाली आहे. तुला झोपायचं नाही का?"

"हो ना! ही निघालेच झोपायला!"

टेबलावरची चहाची भांडी आवरण्यात तिने उगीचच बराच वेळ लावला. ती आज फारच आनंदात होती, इतक्या आनंदात की त्यामुळे ती घामाघूम झाली होती. सगळी संध्याकाळ इतकी आनंदात पार पडली व सर्व प्रसंग शांतपणे पार पडला याचंच तिला फार समाधान वाटत होतं.

"पाशा! तू आज आपल्या घरी या लोकांना बोलावलंस हे फार चांगलं केलंस. तो खोखोल फारच चांगला माणूस आहे. अन् ती पोरगी! किती हुशार नि तडफदार आहे! ती काय करते बरं?" आईने विचारले.

"शिक्षकीण आहे ती!" पावेल येरझारा घालीत तुटकपणे उत्तरला.

"फारच गरिबीची परिस्थिति दिसते बिचारीची! अंगावर धड कपडे सुद्धा घालायला नाहीत. अशी थंडी बाधायची सुद्धा त्यामुळं! तिचे आईबाप कुठे असतात?"

"मॉस्कोत!" पावेल म्हणाला. मग तो थेट आईच्या समोर उभे राहून हळूच पण गंभीरपणे सांगू लागला,

"तिचा बाप खूप श्रीमंत आहे. त्याचा लोखंडाचा व्यापार आहे अन् त्याची पुष्कळ मोठी इस्टेट आहे. ती या चळवळीत आली म्हणून त्याने तिचं नाव टाकलं. ती फार सुखात वाढली आहे, ती मागेल ते तिला मिळत असे, पण आता ती इतक्या रात्रीची एकटी चार मैल चालत जाते!"

ही माहिती ऐकून आई थक्क झाली. खोलीच्या मध्यभागी भुवया



उंचावून मुलाकडे पहात ती स्तब्ध उभी राहिली. काही क्षण तसेच गेल्यावर त्या शांततेचा भंग करून तिने विचारले,

"ती आता थेट शहरात गेली, होय?"

"होय."

"अग बाई! तिला भीती नाही वाटत?"

"तू पहातेच आहेस की!" पावेलने हसत उत्तर दिले.

"पण मग ती गेलीच कशाला? रात्रीची इथेच माझ्याजवळ झोपली असती तर चाललं नसतं का?"

"नाही, ते बरोबर झालं नसतं. सकाळी ती इथे कुणाच्या तरी दृष्टीस पडती, अन् तसं व्हायला आम्हाला नको आहे."

आई विचारमग्न होऊन खिडकीतून बाहेर पाहू लागली. ती हळूच म्हणाली,

"यात असं भयंकर काय आहे हेच मला समजत नाही! तुम्ही करता त्यात काही चुकीचं तर नाही ना?"

याच गोष्टीची तिला चिंता लागलेली होती, व तसे काही नाही याविषयी तिला खात्री करून घ्यावयाची होती.

"नाही, आम्ही करतो त्यात चुकीचं असं काहीच नाही, आई!" पावेल शांतपणे तिच्या नजरेला नजर देत निर्धाराने म्हणाला. "पण तरीसुद्धा आम्हा सर्वांना कधी न कधी तुरुंगाची हवा खावी लागणार हे नक्की! हो, तुलाही ही कल्पना असलेली चांगली!"

तिचे हात कापू लागले. ती घोगऱ्या आवाजात म्हणाली,

"पण देवाची मर्जी असेल तर तुम्ही त्यातून वाचाल सुद्धा!"

"नाही, आई!" पावेल मृदु स्वरात म्हणाला. "मी तुझी फसवणूक करू इच्छीत नाही! त्यातून निसटण्याची मुळीच शक्यता नाही!"

नंतर तो हसून म्हणाला,

"जा आई! झोप आता. तू दमली आहेस. बराय!"

ती झोपण्याच्या खोलीत एकटीच राहिल्यावर खिडकीपाशी जाऊन बाहेर पाहू लागली. बाहेर गारठा होता व बर्फवृष्टीमुळे वातावरण धुंद झाले होते. आसपासच्या खुराडेवजा घरांच्या छपरावरील बर्फ वाऱ्याने उडत होते. तोच वारा भिंतीवर आपटत होता व सूं सूं करीत जमिनीवर आदळून रस्त्यांवरून उडणाऱ्या बर्फाचा पाठलाग करीत होता.

"प्रभु येशु! आम्हा लेकरांवर दया कर!" आई ईश्वराची करुणा भाकू लागली.

तिच्या अंतःकरणात भीती दाटून आली व नेत्रांत आसवे तरळू लागली. तिच्या मुलाने ज्या भावी संकटाची इतक्या शांत व निर्भयपणे तिला कल्पना दिली होती तेच रात्री घिरट्या घालणाऱ्या एखाद्या वटवाघुळाप्रमाणे तिला भेडसावू लागले.

तिला असा भास झाला की तिच्या समोर एक लांबच लांब बर्फमय मैदान पसरले होते व सोसाट्याच्या वाऱ्यामुळे बर्फ सारखे सैरावैरा उडत होते. त्या वाऱ्याचा कर्कश्य शीळ घातल्यासारखा आवाज येत होता. त्या मैदानाच्या मध्यभागी एका मुलीची लहान काळी आकृती हालत असलेली अंधुक दिसत होती. वारा तिच्या पायाभोवती फेर धरून नाचत होता. तिचे वस्त्र उडत होते व तोंडावर बर्फाचा मारा होत होता. ती मोठ्या मुष्किलीने बर्फातून अडखळत मार्ग काढीत होती. ते दृश्य विलक्षण होते. ऐन हिवाळ्यातील वाऱ्यामुळे एकाकी सापडलेले तृणाचे पाते वाकून जावे, तशी तिची तनुलता कमानीसारखी वाकलेली होती. तिच्या उजवीकडे दलदलीच्या भूमीत उगवलेल्या उंचसडक बर्च व निष्पर्ण ॲस्पेन वृक्षराजींची जणू भिंतच उभी होती व त्या वृक्षांची भयाण भासणारी कुजबूज ऐकू येत होती. पलीकडे, बऱ्याच दूर अंतरावर शहरातले दिवे लुकलुकत होते.

आई भीतीने कापत होती व देवाचा धावा करीत होती, "हे दयाघन प्रभो! आमच्यावर कृपावंत हो!"

७

एखाद्या जपमाळेतले मणी कोणी एकामागून एक ओढीत असावे त्या-प्रमाणे दिवसांमागून दिवस जात होते. असेच दिवसांचे आठवडे होत होत कित्येक महिने निघून गेले. दर शनिवारी पावेलची मित्रमंडळी त्याच्या घरी जमत होती. ती प्रत्येक सभा म्हणजे जणू काय एका उंच शिडीची एकेक पायरी होती. या शिडीने लोक हळूहळू वर कुठे तरी दूरवर दिसणारे शिखर गाठण्याचा प्रयत्न करीत होते.

जुन्या मंडळींना नवे लोक येऊन मिळत होते. व्लासोव कुटुंबाच्या घरातील ती लहानशी खोली भरून जाऊन लोक दाटीदाटीने बसू लागले.



नाताशा तिथे येऊन पोहोचे तेव्हा ती थकलेली व गारठलेली असायची. पण ती नेहमीच उत्साही व आनंदी दिसे. पावेलच्या आईने म्हटल्याप्रमाणे लोकरीची मोजे विणून ते स्वतःच्या हातांनी नाताशाच्या लहान पायांत चढवले तेव्हा नाताशा प्रथम हसली, पण मग एकदम ती स्तब्ध होऊन विचारमग्न दिसू लागली. मग ती हळू आवाजात आईला सांगू लागली,

"लहानपणी माझी एक दाई होती, ती सुद्धा अशीच कमालीची प्रेमळ होती. किती आश्चर्याची गोष्ट आहे पहा आई, कामगारांचं आयुष्य किती खडतर, किती अन्याय व जुलुमाने भरलेले असतं, अन् तरी सुद्धा ते इतर लोकांपेक्षा किती तरी प्रेमळ अन् मायाळू असतात." आणि 'इतर लोक' म्हणतांना तिने आपल्यापासून फार दूर, अतिशय दूर असलेल्या लोकांकडे अंगुलीनिर्देश केला.

"तू तरी एक विचित्र पोरगी आहेस!" आई बोलू लागली. "स्वतःच्या आईबापांना सोडून इतक्या दूर..."

आईला आपले विचार व्यक्त करणे जमेना. तिने एक उसासा टाकला व ती स्तब्ध झाली. ती नाताशाच्या चेहऱ्याकडे पाहू लागली तशी तिच्या अंतःकरणातील कृतज्ञतेची भावना पुनः उचंबळून आली. तिला ही भावना शब्दांनी स्पष्टपणे व्यक्त करता येत नव्हती. ती नाताशाच्या समोरच जमिनीवर बसली. नाताशा आपले मस्तक खाली वाकवून विचारमग्न अवस्थेत बसली होती. तशाच स्थितीत तिने आईकडे पाहून स्मित केले.

"आईबापांना सोडून?" आईचेच शब्द पुनः उच्चारून नाताशा बोलू लागली. "त्यात मी काही विशेष केलंय अशातला भाग नाही. माझे वडील फार वाईट आहेत. माझा भाऊही तसलाच, अन् वर दारूबाज पण! माझी वडील बहीणही बिचारी दुःखी आहे. तिचं तिच्यापेक्षा वयाने कितीतरी मोठ्या अशा एका श्रीमंत पण लोभी माणसाशी लग्न झालंय! माझ्या आईचंच मला फार वाईट वाटतं. ती बिचारी एक तुमच्यासारखीच साधी-भोळी बाई आहे. ती सर्वांनाच भिते अन् त्यामुळे एखाद्या उंदरासारखं अंग चोरून राहाते अन् कुणालाही भिऊन दूर पळते. कधीकधी मला तिला भेटण्याची फारच तीव्रतेने इच्छा होते–"

"माझी बाळ ती!" आई खिन्नपणे मान हालवीत म्हणाली.

नाताशाने मानेला एक मागे झटका दिला व काहीतरी दूर ढकलीत असल्यासारखे हात करून ती एकदम म्हणाली,

नाही नाही, तसं काही नाही! कधीकधी मी इतकी आनंदात असते– खूपच आनंदात!"

तिचा चेहरा निस्तेज झाला व निळ्या नेत्रांत तेज चकाकू लागले. आईच्या खांद्यावर हात ठेवून अत्यंत भावनावेगाने ती म्हणाली,

"आम्ही ज्या कार्यात गुंतलो आहोत ते किती भव्य न् उदात्त आहे याची जर तुम्हाला कल्पना आली–"

आईला क्षणभर त्या पोरीचा हेवा करावासा वाटला व ती जमिनीवरून उठत खिन्नपणे म्हणाली,

"माझं आता फार वय झालं! अन् शिवाय मी अशी अडाणी–"

असे दिवस जात होते. पावेल आता पुष्कळच जास्त बोलू लागला होता. अधिक मोठी भाषणे व जोरजोराने वादविवाद करण्यात तो आता पटाईत झाला होता. पण त्याच बरोबर तो अंगाने रोडावतही चालला होता. तो जेव्हाजेव्हा नाताशाकडे पाही किंवा तिच्याशी बोले त्यावेळी त्याच्या डोळ्यांतील नेहमीचे कठोर भाव जाऊ मृदु भाव दिसू लागत, त्याच्या आवाजातही मार्दव येई व त्याचे एकंदर वागणेच मार्दवपूर्ण होई, असा आईने आपल्या निरीक्षणातून अंदाज बांधला. याचा विशिष्ट अर्थ लावून ती स्वतः-शीच हसत म्हणे,

"देव करो अन् असंच होवो!"

कधीकधी त्यांच्या सभांमधील वादविवाद फारच खडाजंगीचे होऊन रण माजले म्हणजे तो खोखोल उठे व एखादी मोठी घंटा हालवावी तसे आपल्या शरीराला मागेपुढे हेलकावे देई व अगदी साध्या व प्रेमळ शब्दांनी अशी समजूत घाली की सगळेजण एकदम शांत होत व सर्वांची डोकी ठिकाणावर येत. वेसोव्श्चिकोव फार उतावळ्या स्वभावाचा होता व तो सारखा सर्वांना काहीतरी करून दाखविण्याचा आग्रह करीत असायचा. तो आणि तो दुसरा पिंगट केसवाला सामोइलोव हे दोघेच नेहमी वाद उकरून काढीत. इवान बुकिन नावाचा एक वाटोळ्या डोक्याचा व सदा जणू काय सोड्याच्या मिश्रणात बुचकळून काढल्यासारखा पांढराफटक दिसणारा माणूस होता तो त्या दोघांची बाजू घेई. नेहमी अगदी तरतरीत व टापटिपीने राहणारा याकोव सोमोव नावाचा अबोल तरुण आणि मोठ्या भुवयांचा फ्योदोर माझिन हे दोघे मात्र पावेल व खोखोल यांच्या बाजूला असत.



कधीकधी नाताशाच्या ऐवजी निकोलाय इवानोविच नावाचा चष्मा लावणारा व लहानशी पिंगट रंगाची दाढी असलेला इसम येई. तो मूळचा कुठल्या तरी दूरच्या प्रांतातला होता व त्यामुळे "जो" चा उच्चार करण्याची त्याची लकबही जरा निराळीच होती. एकंदरीने तो "दूरचाच" भासे. तो बोलत असे ते अगदी साध्या साध्या गोष्टींबद्दल. प्रपंच, मुलंबाळं, व्यापार, पोलिस, अन्नधान्याचे व मांसाचे बाजारभाव वगैरे लोकांच्या दैनंदिन जीवनातले विषयच त्याच्या बोलण्यात येत. अन् या विषयांवर बोलतानाच तो लोकांची फसवणूक कशी होत असते, लबाडी कशी चालते, काही काही अगदी मूर्खपणाचे व हास्यास्पद प्रकार कसे चालतात हे स्पष्टपणे दाखवून देई, व त्यामुळे लोकांची हानी कशी होते हेही तो समजावून सांगे. त्याचं बोलणे ऐकून आईला वाटलं की हा माणूस अशा कुठल्यातरी राज्यातून आला असावा की जिथे सारा कारभार अगदी सरळ व प्रामाणिकपणाने चालत असावा, आणि म्हणून त्याला इथलं सगळंच काहीतरी निराळं, विचित्र वाटत असावं. अन् हे पटत नसल्यामुळे व आवडत नसल्यामुळे या जीवनात बदल घडवून आणून ते त्याच्या देशातल्यासारखं करण्याची त्याला तळमळ वाटत असावी. निकोलायचा चेहरा पिंगट रंगाचा होता व त्याच्या डोळ्यांभोवती रेखीव वर्तुळं होती. त्याचा आवाज मृदु होता व त्याचे हातही मांसल व गरम भासत. तो आईशी हस्तांदोलन करी तेव्हा तो तिचा सबंध तळहात अशा प्रेमळपणे दाबी की त्यात त्याची आत्मीयता व जिव्हाळा प्रत्ययाला येऊन तिला बरे वाटे.

हळूहळू शहरातले काही इतर लोकही या सभांमध्ये दिसू लागले. त्यातल्या त्यात एक उंच, किडकिडीत, मोठ्या डोळ्यांची व फिकट चेहऱ्याची मुलगी बरेच वेळा येई. तिचं नाव साशा. तिच्या बोलण्याचालण्यात एक प्रकारचा पुरुषीपणा होता. ती बोलू लागली म्हणजे तिच्या जाड, काळ्याभोर भुवयांना आठ्या पडत व तिच्या सरळ नासिकेच्या दोन्ही नाकपुड्या हालताना दिसत.

"आपण सोशालिस्ट आहोत!" अशी त्या बैठकीत प्रथम साशानेच खड्या आवाजात घोषणा केली.

तिने आपल्या खणखणीत आवाजात ही घोषणा केली तेव्हा आई भीतियुक्त नजरेने तिच्याकडे पाहू लागली. आईने असे ऐकले होते की सोशा-लिस्ट लोकांनीच झारचा खून केला होता. तो प्रकार घडला तेव्हा ती तरुण

होती. त्यावेळी अशाही अफवा पसरल्या होत्या की झारने भूदासांची गुलाम-गिरीतून मुक्तता करणारा कायदा केल्यामुळे जमीनदार लोक झारवर चिडले होते व त्यांनी त्याचा सूड घेण्याचे ठरवून त्याला ठार करीपर्यंत केस न कापण्याची प्रतिज्ञा केली होती! आणि म्हणून या जमीनदारांनाच सोशालिस्ट म्हणत असेही तिने ऐकल्याचे तिच्या स्मरणात होते.

'सोशालिस्ट' शब्द ऐकताच आईला हे सारं आठवलं. त्यामुळे आपला मुलगा व त्याचे सहकारी स्वत:ला सोशालिस्ट का म्हणवतात हेच तिला कळेना!

सगळेजण घरोघर गेल्यावर आई पावेलजवळ गेली व तिने विचारले,

"तू सोशालिस्ट आहेस का रे, पाशा?"

"हो, पण का?" तो नेहमीप्रमाणे ताठ उभं राहून उत्तरला.

आईने एक दीर्घ नि:श्वास टाकला व तिची नजर खाली वळली. ती आवेगाने म्हणाली,

"खरंच, पावेल? पण सोशालिस्ट म्हणजे तर झारच्या विरुद्ध ना? त्यांनीच एका झारचा खून करण्यापर्यंत मजल गाठली, खरं ना?"

पावेल येरझारा घालीत व तळहाताने गाल चोळीत हसत हसत म्हणाला,

"पण आम्हाला तसं काही करण्याची गरज भासत नाही, आई!"

त्यानंतर मग तो बराच वेळ तिच्याशी बोलत होता. गंभीरपणे व हळू आवाजात तो तिला बऱ्याच गोष्टी समजावून सांगत होता. तो ते सांगत असता त्याच्या चेहऱ्यावरचे भाव न्याहाळून त्याच्याविषयीच्या विश्वासाने आई स्वत:शीच म्हणाली,

"याच्या हातून कोणतंच वाईट कृत्य कधी घडणार नाही! वाईट गोष्ट करणं त्याला जमणंच शक्य नाही!"

त्यानंतर तिथल्या संभाषणात तो भयंकर शब्द वारंवार वापरण्यात येऊ लागला त्यामुळे त्या शब्दाची तीव्रता व धार बोथट झाली व ते लोक आईला विचित्र वाटणाऱ्या अनेक शब्दांचा उपयोग करीत त्या शब्दांप्रमाणेच हा नवा शब्द ऐकण्याचीही तिच्या कानांना सवय झाली. परंतु साशाविषयी तिचा ग्रह फारसा अनुकूल झाला नाही, त्यामुळे ती असली म्हणजे आई नेहमी अस्वस्थ व बेचैन असे.

एक दिवस आईने आपली ही भावना खोखोलजवळ बोलून दाखवली. आपली नापसंती व्यक्त करण्यासाठी ओठ दाबून ती म्हणाली,



ही फारच कडक स्वभावाची दिसते! ज्याला त्याला हे करा न् ते करा म्हणून सारखे हुकुम सोडीत असते ती!"

यावर खोखोल मोठ्याने हसला व म्हणाला,

"तुम्ही अचूक हेरलंत, नेनको! काय, पावेल, तुझं काय म्हणणं आहे यावर?"

नंतर तो आईकडे पाहून डोळे मिचकावीत मिस्किलपणे म्हणाला,

"खानदानी घराण्याचं पाणी म्हणतात ते असंच असतं, होय ना?"

"ती एक चांगली मुलगी आहे." पावेल थंडपणे उद्गारला.

"ते खरं आहे," खोखोल बोलू लागला. "पण तिला एक मात्र नक्कीच समजत नाही. तिच्या मते प्रत्येक गोष्ट अगदी 'झालीच पाहिजे' अशा थाटात ती बोलते. आपण तसं बोलत नाही. अमुक गोष्ट शक्य आहे, असं करायला हवं, असं आपण म्हणतो."

मग त्यांचा बराच वाद सुरू झाला. पण तो आईला आकलन होण्या-जोगा नव्हता.

आईने आणखी एक गोष्ट हेरली होती. साशा पावेलशी वागताना सर्वात जास्त कडकपणा धारण करी. कधी कधी ती त्याच्यावर ओरडे देखील. अशा वेळी पावेल काहीच बोलत नसे. तो फक्त हसे व पूर्वी तो नाताशाकडे पाही तसाच मृदु कटाक्ष साशाकडे टाकून तिच्या तोंडाकडे पहात राही. त्याचे हे वागणेही आईला पसंत नव्हते.

कधीकधी त्या बैठकीतल्या लोकांना अचानकपणे हर्षवायु झाल्यासारखं होऊन ते फार खुशीत येत, हे पाहून आईला आश्चर्य वाटे. ज्या दिवशी परदेशातील कामगार चळवळीच्या बातम्या वर्तमानपत्रांतून ते वाचीत त्याच-वेळी साधारणत: ते अशा प्रकारे खुशीत येत. मग त्यांचे डोळे चमकू लागत, आणि ते थेट लहान मुलांप्रमाणे आपला हर्ष व्यक्त करू लागत. मनमोकळ्या दिलखुलास हास्याचे फवारे उडू लागत व एकमेकांच्या पाठींवर थापा बसत.

मग कोणीतरी ओरडे, "आमच्या जर्मन कॉमरेड्सचा विजय असो!" आणि त्या सुरात इतका उत्साह ओसंडत असायचा की जणु काय त्याने स्वत:चं काहीतरी पराक्रम गाजवलेला आहे!

दुसऱ्या एखाद्या प्रसंगी ते घोषणा करीत, "इटालियन कामगार चिरायु होवोत!"

अशा प्रकारे त्यांना अजिबात न ओळखणाऱ्या व त्यांची भाषाही न

समजणाऱ्या दूर देशांतील कामगारांचा ते जयघोष करीत व त्यांच्या यशाविषयी शुभेच्छा व्यक्त करीत. त्यावेळी ते अशा विश्वासाने वागत असत की जणु त्यांचा जयघोष व आनंद नक्कीच त्या दूरदेशांतील लोकांना ऐकू येत होता.

एकदा खोखोलने सुचवलं,

"आपण त्यांना पत्र लिहून आपलं मनोगत कळवलं तर! त्यांना न् आमचा धर्म एकच आहे आणि आपण त्याच धर्माचा प्रसार करीत आहोत, त्यांचं नि आपलं ध्येय एकच आहे, आणि त्यांच्या विजयाने आम्हीही हर्षित होतो, असं आपण त्यांना कळवलं तर रशियातही आपल्याला असे मित्र आहेत हे कळून त्यांना किती बरं वाटेल!"

हे बोलत असताना खोखोलच्या नेत्रांत याच स्नेहाच्या भावनेचे तेज चमकत होते.

फ्रान्स, इटली, स्वीडन वगैरे देशांच्या लोकांविषयीही जणु ते आपले मित्रच आहेत अशा भावनेने ते बोलत. या निरनिराळ्या देशांतले लोक त्यांना अगदी जवळचे वाटत, त्यांच्याविषयी त्यांना आत्मीयता व आदर वाटे, आणि त्यांच्या सुखदुःखाशी ते समरस होत. त्यामुळे या लोकांविषयी बोलताना त्यांचे चेहरे उत्साहाने फुललेले असत.

अशा प्रकारे त्या कोंदट खोलीतही सर्व जगातील कामगारांशी बंधुत्वाचे नाते जोडणारी पवित्र भावना निर्माण झाली. आपण सारे एक आहोत ही भावना सर्वांच्या ठायी उत्पन्न झाली. आईला या भावनेचा अर्थ समजत नव्हता तरी तीही त्या भावनेशी एकरूप झाली. त्या भावनेतील तारुण्याचा उत्साह व उन्माद, तिच्यातील दुर्दमनीय आशा, या शक्तीने आईही भारली गेली.

एकदा ती खोखोलजवळ म्हणाली, "तुम्हा लोकांचं पहावं ते सारं विलक्षणच! ज्यू, आर्मेनियन, ऑस्ट्रियन, सगळेच लोक तुमचे कॉमरेड आहेत! त्या सर्वांच्या सुखदुःखाचे तुम्ही वाटेकरी असता! असं कसं रे?"

"हो तर! सगळ्यांच्या! अगदी सगळ्यांच्या सुखदुःखाचे, नेनको!" खोखोल उत्साहाने बोलू लागला. "आम्ही जात ओळखत नाही की राष्ट्रही जाणत नाही! आम्ही फक्त दोनच जाती मानतो, एक आमच्या कॉमरेड्सची, अन् दुसरी शत्रूंची! जगातले सगळे कामगार आमचे दोस्त आहेत, आणि सगळे श्रीमंत लोक, सगळी सरकारे आमचे दुश्मन! सबंध जगाकडे नजर



टाकली अन् आपणा कामगारांची संख्या किती अफाट आहे व आपली शक्ती किती प्रचंड आहे हे पाहिलं म्हणजे मग आमच्या आनंदाला पारावार उरत नाही! फ्रेंच किंवा जर्मन कामगारांना किंवा इटालियन कामगारांना सुद्धा असंच वाटतं, नेनको! आपण सर्व एकाच आईची लेकरं आहोत, सर्व जगातील कामगार बंधु आहेत ही श्रद्धा सर्वांच्या अंतःकरणात वास करीत आहे व तीच आम्हाला स्फूर्ति देत असते. ही श्रद्धा म्हणजे जणू कामगारांच्या अंतःकरणरूपी स्वर्गात तळपणाऱ्या सूर्यासारखी आहे, आणि या स्वर्गात सर्वत्र खरा न्याय भरलेला आहे. सोशालिस्ट म्हटला की सदा आमच्या भावासारखाच! मग तो कोणीही असो व स्वतःला काही म्हणवून घेत असो! आजच नव्हे तर नेहमीसाठी त्याच्याशी आमचं हे बंधुत्वाचं नातं कायमच राहाणार!"

लहान मुलांसारख्या उत्साहाने पण निर्धारपूर्वक ते आपली ही श्रद्धा अधिकाधिक प्रमाणात वारंवार व्यक्त करू लागले व दिवसेंदिवस ती श्रद्धा एखाद्या प्रचंड शक्तीचे रूप धारण करू लागली. आईला हे दिसलं तेव्हा तिची मनोमन अशी खात्री पटली की खरोखरच आकाशातील सूर्याप्रमाणे महान् व सर्वांना प्रकाश देणारी, प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांना पाहता येईल अशी काही तरी नवीन शक्ती या जगात उदयाला आली आहे.

अनेकदा ते लोक गाणी गात. खुल्या आवाजात व अत्यंत उत्साहाने ते पुष्कळदा सर्वांच्या परिचयाची साधी गाणीच म्हणत, परंतु कधीकधी ते काही नवीन, अर्थपूर्ण गाणीही म्हणत. या गाण्यांच्या चाली अगदीच निराळ्या, पण अत्यंत गोड व सुस्वर असत. जणु काय चर्चमधील प्रार्थना-संगीतच म्हणत आहोत अशा दबलेल्या आवाजात ते ही गीते गात. ही गीते गातांना त्यांचे चेहरे उजळून निघत व त्यांच्या कंठातून बाहेर पडणाऱ्या शब्दांतून प्रचंड शक्ती प्रगट होई.

या नवीन गीतांपैकी एका गाण्याने आईच्या अंतःकरणावर फारच परिणाम झाला. एखादा दुःखाने विव्हळ झालेला जीव संशय व अनिश्चिततेच्या भोवऱ्यात सापडून एकाकी धडपडत आहे, असलं काही त्या गाण्यात नव्हतं. किंवा दारिद्र्याने गांजलेल्या, भीतीने पछाडलेल्या कळाहीन, व्यक्तित्वहीन प्राण्यांची करुण कहाणीही त्यात नव्हती. किंवा अंतराळात चाचपडणाऱ्या कोणा असहाय्य जीवांचे शोकपूर्ण निःश्वास, अथवा भल्याबुऱ्यांची पर्वा न करता सदा साहस करण्यास तयार असलेल्या धाडसी शक्तीच्या

आव्हानांचा आक्रोश, हेही त्या गीताचे विषय नव्हते. तसेच कशाच्या निर्मिती-ऐवजी विध्वंसातच मग्न होणाची व परिणामाची क्षिती न बाळगता सूड-बुद्धीने प्रहार करीत सुटण्याची मनीषाही त्या गीतात व्यक्त झालेली नव्हती. थोडक्यात म्हणजे, गुलामगिरीच्या जुन्या जगाच्या मनोवृत्तीचा लवलेशही त्या गीतात नव्हता.

त्या गीतातील कडक शब्द, व त्याची कठोर चाल आईला आवडली नाही. पण त्या शब्दांच्या व स्वरांच्या मागे अशी काही विलक्षण भावना दडलेली होती की शब्द आणि स्वर यांच्या पलिकडे काहीतरी अचाट, विचारांना आकलन न होणारं असं गूढ त्यात दडलेलं आहे असं वाटल्याखेरीज राहात नसे. ते गूढ तिला त्या तरुण मंडळींच्या नेत्रांत व चेहऱ्यावर प्रति-बिंबित झालेलं दिसे, त्यांच्या अंतरंगात त्याचा वास आहे असं तिला वाटे, आणि म्हणून शब्द व संगीताच्या सीमांच्या पलिकडे असलेल्या त्या शक्तीने आकर्षिली जाऊन ती इतर कोणत्याही गीतांपेक्षा तेच गीत जिवाचे कान करून ऐकत राही व ते ऐकताना तिचं अंतःकरण उचंबळून येई.

ती तरुण मंडळी ते गीत इतर गीतांपेक्षा मृदु स्वरात गात, पण असं असूनही ते अधिक परिणामकारक वठत असे व वसंतऋतूचे आगमन सूचित करणाऱ्या मार्च महिन्यातील दिवसाच्या चित्त प्रसन्न करणाऱ्या आल्हाददायक वाऱ्याप्रमाणे ते गीत ऐकणाऱ्यांना भारून टाकी.

ते गीत गाऊन झाल्यावर कधी कधी वेसोव्श्चिकोव म्हणे, "आता आपण भर रस्त्यात हे गीत गात हिंडण्याचा काळ आला आहे!"

एकदा वेसोव्श्चिकोवचा बाप पुनः चोरी करून तुरुंगात गेला तेव्हा तो आपल्या कॉम्रेड्सना म्हणाला,

"आता आपण माझ्या घरीच जमू या!"

बहुधा रोज सायंकाळी पावेल कामावरून परत येई त्यावेळी त्याचा एक मित्र त्याच्याबरोबर असे. घरी येताच ते दोघे वाचीत बसत व टाचणे करीत ते त्या कामात इतके मग्न असत की हातपाय धुण्याचं सुद्धा त्यांना भान नसायच. जेवण किंवा चहा घेतेवेळी सुद्धा त्यांच्या हातांतली पुस्तकं सुटत नसत. दिवसेंदिवस त्यांचं बोलणेही अशा प्रकारचं होऊ लागलं की आईला त्यातलं काहीच आकलन होईना.

पावेल अनेकदा त्या मित्राला म्हणायचा, "आपल्याला आता वर्तमानपत्र सुरू करायलाच हवं!"



त्या मित्रमंडळीचे जीवन दिवसेंदिवस गडबडीचे व धावपळीचे होऊ लागले. मधमाशा एका फुलावरून दुसऱ्या फुलाकडे धाव घेतात तसे ते पटापट एका पुस्तकावरून दुसऱ्या पुस्तकाकडे वळू लागले.

एकदा वेसोव्श्चिकोव म्हणाला, "ते आपल्याबद्दल बोलू लागले आहेत. लवकरच धरपकड सुरू होण्याचा रंग दिसतो."

त्यावर खोखोल म्हणाला, "माशाचा जन्मच मुळी जाळ्यात अडकण्या-करिता असतो, नाही का?"

आईला दिवसेंदिवस खोखोल जास्तच आवडू लागला. तो तिला 'नेनको' म्हणून हाक मारी तेव्हा एकाद्या लहान मुलाचे कापसासारखे मऊ हात आपल्या गालावर फिरत असल्यासारखे वाटून ती हर्षित होई. एखाद्या रविवारी पावेल कामात असला तर खोखोल येऊन लाकडं फोडून देई. त्यांच्या अंगणातील पायरी मोडली होती ती पाहून एक दिवस तो एक फळी घेऊन आला व कुऱ्हाड घेऊन झटपट त्याने नवी पायरी बसविण्याचे काम करून टाकले. एकदा असंच त्याने काही न बोलता कुंपण दुरुस्तीचे कामही उरकून घेतले. ही सगळी कामं करताना तो कसल्या तरी करुण गीताच्या सुरांची शीळ घालीत राही.

मग एक दिवस आई पावेलला म्हणाली,

"आपण या खोखोलला आपल्या घरीच येऊन राहायला सांगू या. तुम्हा दोघांनाही ते बरं. उगाच एकमेकांच्या घरी हेलपाटे घालीत बसायला नको!"

"पण तू कशाला उगाच तुझ्यावर आणखी कामाची जबाबदारी ओढवून घेतेस?" पावेल खांदे उडवीत म्हणाला.

"वा रे वा! त्रास कसला त्यात? माझा सारा जन्म काबाडकष्ट करण्यात गेला! नि ते कष्ट सुद्धा निष्कारण! मग आता त्याच्यासारख्या एका सज्जन माणसासाठी थोडे कष्ट करावे लागले तर बिघडलं कुठं?"

"मग तुझ्या म्हणण्याप्रमाणे करू या तर. तो राहायला आला तर मला आनंदच होईल," पावेल उत्तरला.

अशा रीतीने खोखोल त्यांच्याच घरी येऊन राहू लागला.

८

वस्तीच्या अगदी कडेला असलेले ते घर हळूहळू लोकांच्या कुतूहलाचा विषय बनले. शिकारी कुत्र्यासारखी अनेकांची नजर त्या घरावर खिळून राहू लागली व भिंतीच्या आड काय चालले आहे हे हुडकून काढण्याचा प्रयत्न करू लागली. अफवांना पंख फुटले व ते त्या घराभोवती घिरट्या घालून फडफड करू लागले. दलदलीच्या बंधाऱ्यावरील एका टोकाला वसलेल्या त्या घराचे रहस्य काय असावे याविषयी नाना तर्ककुतर्क ऐकू येऊ लागले. काही लोकांची तर रात्रीच्या वेळी खिडक्यांतून डोकावून पहाण्यापर्यंत मजल गेली. त्यातले काहीजण तावदानांवर टक टक सुद्धा करीत, पण तेवढं केल्यावर मात्र तेथे न थांबता घाबरून पळ काढीत.

एक दिवस गावातील दारूच्या गुत्त्यांचा मालक बेगुन्त्सोव याने रस्त्यात आईला थांबविले व तो तिच्याशी बोलू लागला. तो वयाने म्हाताराच पण दिसायला चांगला देखणा होता. तो अंगात नेहमी जांभळ्या मखमलीचे जाकीट घाली व त्याचा जाड लालबुंद गळा काळ्या रेशमी गळपट्टयाने बांधलेला असे. त्याचे नाक धारदार होते व त्यावर नेहमी कासवाच्या पाठीच्या हाडाने बनवलेला काळ्या दांडीचा चष्मा चढवलेला असे. त्या चष्म्यावरून लोकांनी त्याचं 'हाडांच्या डोळ्यांचा माणूस' असं टोपण नाव ठेवलं होतं. हा बेगुन्त्सोव आईला भेटला तेव्हा त्याने तिला थांबवून तिच्यावर प्रश्नांचा सारखा भडिमार केला.

"काय पेलाग्येया निलोव्ना, ठीक चाललं आहे ना? तुझ्या मुलाचं कसं चाललं आहे? त्याचा लग्नबिग्न करायचा विचार आहे की नाही? मला तर वाटतं आता त्याचं लग्न करून टाकावं हे चांगलं! मुलांची लग्नं जितक्या लवकर होतील तितकं आईबापांना बरं असतं. माणूस संसारात पडला म्हणजेच ठीक राहातं. लोणचं जसं मुरलेलं चांगलं तसाच माणूसही संसारात मुरला म्हणजे चांगला बनतो. मी तुझ्या जागी असतो पर नक्कीच या वेळपर्यंत त्याचे दोहोंचे चार हात करून टाकले असते. आजकालचा काळ असा आहे की कोण कसा वागतो हे पाहाण्यासाठी डोळ्यांत तेल घालून जपलं पाहिजे. आजकाल लोक फारच बहकून स्वतःच्या लहरी-प्रमाणे वागू लागले आहेत. चर्चमध्ये जाण्याऐवजी ते कुठे तरी अंधारात जमतात न् गुप्त खलबत करतात. मी म्हणतो, ही सगळी कुजबुज कशासाठी, कळू तरी द्या एकदा! काय करायचं न् बोलायचं ते चार लोकांच्या देखत न करता चोरूनमारून काय म्हणून? तुम्हाला चर्चाच करायची आहे तर माझ्या गुत्त्यातल्या सारख्या ठिकाणी उघड उघड का करीत नाही? आपल्याला ही गुप्त रहस्यं न् खलबतं हवीतच कशाला? गुप्त असं काही असलंच तर ते बोलण्याची जागा म्हणजे आपलं चर्च! इतर कुठेही कानाकोपऱ्यात चोरून कुजबुज चाललेली दिसली की जरूर काही काळंबेरं आहे असं खास समजावं! बरं आहे! येतो मी. देव तुझं भलं करो!"

एका दमात त्याने ही सगळी बडबड संपवली व आईच्या उत्तराची वाटही न पहाता डोक्यावरची टोपी हातात काढून ती हालवीत त्याने तिचा निरोप घेतला व क्षणार्धात तो दिसेनासा झाला.

त्याच्या या सरबत्तीने आई अर्थात्‌च बुचकळ्यात पडली. या माणसाला काय म्हणायचं आहे हेच तिला कळेना.

आणखी एकदा आईला असंच तिच्या एका विधवा शेजारणीने भर बाजारात हटकलं. या शेजारणीचं नाव मरिया कोर्सुनोवा असं होतं व ती एक लोहारीण होती. तिथल्या कारखान्याच्या फाटकावर काही खाण्याचे पदार्थ विकून ती आपला चरितार्थ चालवी. तिने आईला थांबवून सांगितलं,

"पेलाग्येया! तुझ्या मुलावर जरा नजर असू दे ग बाई!"

"म्हणजे! असं झालं तरी काय?" आईने विचारलं.

"बाई ग! लोकांमध्ये पुष्कळच अफवा उठल्या आहेत." मरिया अगदी गुपित सांगत असल्याप्रमाणे हळू आवाजात बोलू लागली. "अन् ते काय नाही नाही ते बोलताहेत. लोक म्हणतात तुझा मुलगा कसला तरी गुप्त पंथ काढण्याच्या खटपटीत आहे. ते ख्लिस्ती * लोक असतात ना तसलाच! ते ख्लिस्ती लोक म्हणे एकमेकांना चाबकाने बडवतात, तसंच हेही लोक करणार आहेत म्हणतात —"

"ही सारी क्षुद्र व मूर्खपणाची बडबड आहे, मरिया!"

"विस्तवाशिवाय धूर नसतो निघत." मरिया म्हणाली.

बाहेर लोक आपल्याला काय म्हणतात ते आईने पावेलला सांगितलं तेव्हा त्याने नुसते खांदे उडवले आणि खोखोलने त्यावर नेहमीप्रमाणे आपलं मंद स्मित केलं.

---

* **ख्लिस्ती :** एक धर्मवेडा पंथ

आई त्यांना पुढे म्हणाली, "गावातल्या तरुण पोरी सुद्धा तुमच्यावर नाराज आहेत. तुम्ही चांगले धट्टेकट्टे कष्टाळू आहात. त्यात दारूचं व्यसनही नाही तुम्हाला. कोणतीही पोरगी हसत तुमच्याशी लग्न करील. पण तुम्ही त्यांच्याकडे पहायला सुद्धा तयार नाही! त्या म्हणतात, तुम्ही शहरातल्या नखरेल मुलींच्या नादी लागले आहात!"

"बस! पुरे झालं! लोक काय वाटेल ते बोलतात!" पावेल तुटकपणे उद्गारला.

"डबक्यातील सगळ्याच वस्तूंना घाण येते." खोखोल उसासा टाकून म्हणाला. "नेनको, लग्न झालेल्या बायकांना कसलं खडतर जीवन जगावं लागतं हे एकदा तुम्ही त्या खुळ्या पोरींना समजावून सांगा ना! ते कळलं म्हणजे मग या खोड्यात मान अडकवून घेण्याची त्यांना इतकी घाई होणार नाही!"

"अरे बाबांनो! त्यांना हे सगळं दिसत नाही अन् समजत नाही असं का वाटतं तुम्हाला? पण कसंही असलं तरी लग्नाखेरीज दुसरं करणार तरी काय त्या?" आई म्हणाली.

"त्यांना खरोखरच ते नीट समजलं असतं तर त्यांनी नक्कीच काहीतरी दुसरा मार्ग शोधून काढण्याची धडपड सुरू केली असती." पावेलने आपले मत सांगून टाकले.

त्याच्या निश्चल मुद्रेकडे पहात आई म्हणाली,

"मग तुम्ही त्यांना शिकवा की! त्यातल्या त्यात हुशार पोरी असतील त्यांना इथं बोलवीत चला म्हणजे त्या शिकतील."

"नाही, ते शक्य नाही," पावेल थंडपणे उत्तरला.

"पण आपण प्रयत्न करून पहायला काय हरकत आहे?" खोखोलने सुचवले.

पावेल काही वेळ स्तब्ध होता. मग तो म्हणाला,

"तसं केलं म्हणजे मग लोक जोडप्यानं हिंडू लागतील, काहींची लग्नं होतील, अन् मग सगळंच ऑफिस!"

पावेलच्या या उद्गारांनी आईच्या अंतःकरणात खळबळ माजली. पावेल एखाद्या सन्यस्त वृत्तीच्या ब्रह्मचाऱ्याप्रमाणे कडक वागत होता हे पाहून ती अस्वस्थ झाली. तिला हे स्पष्ट दिसत होतं की सगळे जण, अगदी वयाने मोठे असलेले खोखोलसारखे कॉमरेड्स सुद्धा, पावेलचा सल्ला घेत, पण



त्यांना पावेलची भीती वाटत होती, आणि त्याच्या या कडवटपणामुळे त्याच्यावर कुणाचं प्रेम नव्हतं.

एक दिवस ती तशीच रात्रीच्या वेळी निद्रादेवीची आराधना करीत बिछान्यावर पडली होती. पावेल व खोखोल पलिकडे वाचीत बसले होते. थोड्याच वेळात तिला त्यांचं काही तरी हळू आवाजात बोलणं सुरू झाल्याचं ऐकू आलं व ती कान टवकारून ऐकू लागली.

"ती नाताशा आहे ना, ती मला फारच आवडते," खोखोल एकाएकी म्हणाला.

"हूं! मला कल्पना आहे त्याची!" जरा थांबून पावेल म्हणाला.

यावर खोखोल हळूच उठला व अनवाणी पायांनी खोलीत फेऱ्या घालू लागला हे त्याच्या पावलांच्या आवाजावरून तिने ओळखले. नंतर तो बारीक सुरात शीळ घालू लागला. त्या शीळेच्या सुरातही त्याची एकाकीपणाची भावना व कारुण्य जाणवत होते. मध्येच शीळ थांबवून तो हळू आवाजात पावेलला म्हणाला,

"तिच्या लक्षात हे आलं आहे की नाही कोण जाणे!"

पावेल काहीच बोलला नाही. मग खोखोलने आणखी हळू आवाजात त्याला विचारलं, "तुझा काय अंदाज आहे?"

"तिने ते ओळखलं आहे. आणि तिने आजकाल इथे येणं बंद केलं आहे त्याचं कारणही तेच आहे," पावेलने सांगितले.

खोखोल पुनः जड पावलांनी फेऱ्या घालू लागला व त्याची बारीक सुरातील शीळ खोलीत घुमू लागली.

"मी तिला तसं स्पष्टच सांगितलं तर?" खोखोल पुनः बोलू लागला.

"काय सांगणार तिला तू?"

"की – की मी –" खोखोल सांगण्याचा प्रयत्न करू लागला.

"पण का? कशासाठी सांगायचं तिला?" पावेलने मध्येच त्याला अडवले.

खोखोलच्या फेऱ्यांचा आवाज बंद पडला व त्याने स्मित केले असावे असा आईने अंदाज बांधला.

"पण आपलं एखाद्या मुलीवर प्रेम बसलं असलं तर तिला ते सांगायलाच हवं, नाही का? नाहीतर त्याचा उपयोग काय?"

पावेलने एकदम पुस्तक बंद केले व विचारले, "पण त्यातून काय निष्पन्न व्हावं असं वाटलं तुला?"

बराच वेळ त्या दोघांपैकी कोणीही काहीच बोललं नाही. नंतर पुनः खोखोलनेच त्या शांततेचा भंग करून विचारले, "मग तुझं म्हणणं तरी काय?"

"हे पहा, तुला काय हवं आहे याची तुला स्वतःला स्पष्ट कल्पना असणं आवश्यक आहे, आंद्रेइ!" पावेल संथपणे बोलू लागला. "समजा, तिचंही तुझ्यावर प्रेम आहे – मला त्याबद्दल शंकाच आहे म्हणा, पण समजा आहे! तर मग काय? तुम्ही लग्न करणार! वा! काय पण जोडा शोभेल! ती एक सुशिक्षित बुद्धिजीवी स्त्री, अन् तू साधा कामगार! लग्न झालं की पोरंबाळं आलीच! अन् त्या सर्वांच्या पोटापाण्याची सोय लावण्यासाठी तुला रात्रंदिवस गुलामासारखं राबावं लागणार! दोन वेळ गोळाभर अन्न, घरभाडं, पोरांची सोय, याच विवंचनेत तू घाण्याच्या बैलासारखा संसाराच्या गाड्याला जुंपला जाणार, अन् तसं झालं म्हणजे तुमची चळवळ संपलीच! तुम्हा दोघांचाही मग चळवळीला काहीच उपयोग नाही! नाही का?"

काही वेळ पुनः स्तब्धता पसरली. मग पुनः पावेलच बोलू लागला. आता तो जरा सौम्य व समजावणीच्या स्वरात बोलत होता.

"तू हा भलताच विचार सोडून द्यावा हेच बरं, आंद्रेइ! तू तसं केलं नाहीस तर तिलाही ते फार जड जाईल."

पुनः स्तब्धता पसरली. घड्याळाचा लंबक एकेका सेकंदाचा टिक्‌टिक् आवाज करीत होता. तेवढाच काय तो आवाज त्या स्वतब्धतेचा भंग करीत होता.

शेवटी खोखोल रुद्ध कंठाने उद्‌गारला,

"माझं अर्धं अंतःकरण प्रेमाने व्यापलेलं, अन् अर्ध्यात तिरस्कार भरलेला! याला अंतःकरण तरी कसं म्हणावं?"

नंतर पुस्तकांच्या पानांनी सळसळ ऐकू येऊ लागली. पावेलने बहुधा पुनः वाचनाला सुरुवात केली असावी. आई आपल्या बिछान्यावर स्वस्थ पडली होती व ती आपला श्वासोच्छ्‌वास सुद्धा रोखून धरण्याचा प्रयत्न करीत होती. तिचं अंतःकरण खोखोलविषयीच्या सहानुभूतीने भरून आलं होतं, पण पावेलची तिला त्याहूनही अधिक कीव येत होती. "बिचारा पाशा!" ती स्वतःशीच उदगारली.



मग एकाएकी खोखोल पावेलला म्हणाल्याचं तिला ऐकू आलं,

"तर मग तुझ्या मते मी तिला काहीच सांगू नये?"

"हो! मला तरी तसंच वाटतं!" पावेल शांतपणे उत्तरला.

"ठीक आहे तर मग मी तिला सांगणार नाही." एवढं बोलून खोखोल थोडा वेळ थांबला व मग पुनः रुद्ध कंठाने म्हणाला, "तुझ्यावर अशीच वेळ येईल तेव्हा तुलाही असा निर्णय घेणं कठीणच जाईल, पावेल!"

"तसं आत्तांच वाटतं आहे की!"

बाहेर सोसाट्याचा वारा भिंतीवर आपटून सूंऽऽ आवाज करीत होता व आत घड्याळाचा लंबक एकेक सेकंदाने कालगती मोजीत होता.

"हा निर्णय म्हणजे काही चेष्टा नव्हे, पावेल! हे मनाला समजावणं खरोखरच फार कठीण काम आहे." खोखोल जडपणे उद्‌गारला.

हे उद्‌गार ऐकून आईने उशीत डोकं खुपसलं व ती आवाज न करता अश्रू गाळू लागली.

सकाळी उठल्यावर आईला असं भासलं की आंद्रेइ जणु काय तो होता त्यापेक्षा लहान व अधिक आकर्षक दिसू लागला आहे. उलट पावेल मात्र नेहमीसारखाच ताठ, कृश अन् नेहमीसारखाच स्तब्ध होता. आतापर्यंत ती खोखोलला आंद्रेइ ओनिसिमोविच अशा त्याच्या नावानेच तिऱ्हाइताप्रमाणे हाक मारीत असे, पण आज ती स्वतःला नकळतच त्याला आंद्रुशा असं अधिक आपलेपणानं, अगदी मुलासारखं संबोधू लागली व त्याला प्रेमळपणे म्हणाली,

"आंद्रुशा, तुझे बूट दुरुस्त करून घे बाबा! नाहीतर ही थंडी बाधेल हो तुला!"

"येत्या पगाराला मी नवेच बूट घेणार आहे, आई!" आंद्रेइ हसत म्हणाला. नंतर लडिवाळपणे आपला एक हात तिच्या खांद्यावर ठेवीत तो म्हणाला, "कदाचित् तूच माझी खरी आई असशील! पण मी हा असा कुरूप असल्यामुळे तू ते कबूल करीत नाहीस, असंच ना?"

तिने काही न बोलता त्याचे हात प्रेमाने थोपटले. तिच्या मनातून पुष्कळच बोलून त्याच्यावर मायेचा वर्षाव करायचा होता, परंतु त्याच्या-विषयीची कीव वाटून तिचे अंतःकरण असे पिळवटून निघत होते की त्यामुळे तिच्या ओठापर्यंत आलेले शब्द बाहेर पडू शकले नाहीत.

# ९

काही दिवसांनी त्या वस्तीत सोशालिस्टांविषयी चर्चा ऐकू येऊ लागली. हे सोशालिस्ट निळ्या शाईत लिहिलेली पत्रके वाटू लागले होते. या पत्रकांतून कारखान्याच्या कारभारावर कडक टीका असे, पीटर्सबर्ग व दक्षिण रशियातील संपांच्या बातम्या असत, आणि कामगारांना आपल्या हक्कांच्या रक्षणासाठी एकजूट उभारण्याची हाक दिलेली असे.

कारखान्यात बरेच दिवस काम करून चांगली कमाई करणारे प्रौढ लोक ही पत्रके वाचून संतापाने खवळून जात व म्हणत, "हे सगळे चिथावणीखोर लोक आहेत. या हरामखोरांची चांगली डोकी फोडली पाहिजेत!" आणि त्यांपैकी काही लोक ती पत्रके आपल्या वरिष्ठांना नेऊन देत.

याउलट तरुण कामगार मात्र उत्साहाने ती पत्रके वाचीत व "यात लिहिलं आहे ते अगदी खरं आहे!" असे उद्‌गार काढीत.

घाण्याला जुंपलेल्या बैलाप्रमाणे रोज काम करून हताश झालेले बहुसंख्य कामगार मात्र ही पत्रके वाचूनही थंड रहात. ते म्हणत, "यातून काही निष्पन्न होणार नाही! आहे ही परिस्थिती अशीच राहणार! त्यात बदल होणं अशक्य आहे!"

पण एकंदरीत या पत्रकांमुळे कामगारांत बरीच खळबळ माजली होती यात मात्र संशय नाही. एकदा एका आठवड्याचं पत्रक निघालं नाही तेव्हा कामगार आपापसांत बोलू लागले, "त्यांनी ही पत्रकं काढणं बंद केलं की काय?" पण नंतर सोमवारी नवी पत्रके वाटली गेली व कामगारांत पुनः हलक्या आवाजात त्याबद्दल चर्चा सुरू झाली.

नंतर कारखान्यात व दारूच्या गुत्त्यात बरेच नवेनवे अनोळखी चेहरे दिसू लागले. हे लोक सारखे चौकसपणे पाहात, शोधक नजरेने निरीक्षण करीत, लोकांना प्रश्न विचारून नाना प्रकारच्या चौकशा करीत. या लोकांच्या फाजील चौकसपणामुळे व प्रत्येकाच्या नसत्या चौकशा करण्यामुळे सर्वांचे लक्ष त्यांच्याकडे जाऊ लागले व त्यांच्याविषयी सर्वांनाच निरनिराळे संशय येऊ लागले.

त्या वसाहतीत हे नवीनच खळबळीचे वातावरण निर्माण झाले होते त्याला आपल्या मुलाचे कार्यच कारणीभूत होते हे आईने ओळखले. त्याच्याकडे लोक आकर्षित होऊ लागले व त्याची लोकप्रियता वाढत चालली या



जाणिवेने तिला त्याच्याबद्दल सार्थ अभिमान वाटू लागला, पण त्याचबरोबर त्याला कोणत्या धोक्याला तोंड द्यावे लागणार आहे या आशंकेनेही तिचे मातृहृदय व्यथित झाले.

एके दिवशी संध्याकाळची वेळ होती. अचानकपणे मरिया कोर्सुनोवाने व्लासोव कुटुंबाच्या घराच्या खिडकीवर टिचकी मारून टक्‌टक् केले. आईने दार उघडले तेव्हा ती शेजारीण कुजबुजल्याप्रमाणे पण मोठ्याच आवाजात सांगू लागली,

"सांभाळ ग बाई, पेलाग्येया! त्यांना सगळा पत्ता लागला आहे बरं! आज ते तुमच्या घराची झडती घ्यायला येणार आहेत बघ! माझिन अन् वेसोव्श्चिकोव यांच्या घराची सुद्धा अशीच झडती व्हायची आहे."

मरिया हे बोलत असता तिचे जाड ओठ एकमेकांवर आपटत होते व तिच्या मोठाल्या नाकपुड्या जोराने श्वास चालू असल्यामुळे उडत होत्या. रस्त्यावरून कोणी आपल्याला पहात नाही ना म्हणून ती दोन्ही बाजूला दृष्टी टाकून बोलत होती.

सांगायचं ते सांगून झाल्यावर ती म्हणाली,

"अन् हे पहा, मला काऽही माहीत नाही अन् मी तुला काही सांगितलं नाही, अन् मी तुला भेटलेच नाही असं समजायचं बरं का! समजलीस?"

एवढं बोलून ती तेथून सटकली.

आईने खिडकी बंद करून घेतली व ती मटकन् खुर्चीत बसली. पण क्षणार्धातच आपल्या मुलावर ओढवू घातलेल्या संकटाच्या जाणिवेने ती उठली. तिने घाईघाईने कपडे केले, डोक्याभोवती शाल लपेटली व तं जवळजवळ धावतच फ्योदोर माझिनच्या घरी पोचली. माझिन आजारी असल्यामुळे कारखान्यात कामाला गेलेला नव्हता. ती आंत शिरली तेव्हा तो खिडकीशी पुस्तक वाचीत बसला होता. त्याच्या उजव्या हाताचा अंगठा जायबंदी झालेला होता व तो तोच हात चोळीत होता. आईने झडतीची बातमी सांगताच त्याचा चेहरा खाड्‌कन् उतरला व तो ताड्‌कन् उठून बसला.

"अशी गोष्ट आहे काय?" तो पुटपुटला.

"मग आता आपण या प्रसंगाला कसं तोंड देणार?" थरथर कापणाऱ्या हाताने कपाळावरचा घाम पुशीत आईने विचारले.

"जरा थांबा, पाहून घेऊ आपण घाबरण्याचं काही कारण नाही,"

फ्योदोर उत्तरला. हे बोलत असतानाच त्याने डाव्या हाताने आपले कुरळे केस मागे सारले.

"मला घाबरू नको म्हणता, पण तुम्ही स्वतःच भेदरले आहात की!" आई जोराने म्हणाली.

"मी? छे! मी कुठे घाबरलोय?" असे म्हणत असतानाच त्याला आपण खरंच घाबरल्याची जाणीव होऊन त्याचा चेहरा लज्जेने लाल झाला. "हं... काय बरं?... आपण ही बातमी पावेलला कळविण्याची व्यवस्था केली पाहिजे. ठीक आहे. मी पाठवतो कुणाला तरी. तुम्ही आता खुशाल घरी जा आणि निर्धास्त रहा. ते आलेच तरी आपल्याला मारणार आहेत थोडेच!"

आई घरी पोचताच तिने सगळी पुस्तके उचलली अन् ती छातीशी धरून ती येरझारा घालू लागली. तिने शेगडीत अन् खाली डोकावून पाहिले, अन् नंतर ती पाण्याच्या पिंपात डोकावून पाहू लागली. पावेलला बातमी पोचताच तो काम तसंच सोडून धावत घरी येईल अशा कल्पनेने ती सारखी त्याच्या वाटेकडे डोळे लावून बसली होती, पण तिची कल्पना चुकीची ठरली. बराच वेळ झाला तरी पावेल येईना तेव्हा ती पार थकून जाऊन स्वयंपाक-घरातील एका बाकावर पुस्तके ठेवून स्वतः त्यावर बसली. तिला तेथून हालण्याची सुद्धा भीती वाटत असल्यामुळे ती तेथेच बसून राहिली. अखेर बऱ्याच वेळानंतर पावेल व खोखोल दोघेही घरी आले तेव्हा ते येताक्षणीच तिने बाकावरून न उठताच विचारलं,

"तुम्हाला कळलं का रे?"

"हो, कळलं की!" पावेल स्मित करीत उत्तरला. त्याने पुढे विचारले, "तू घाबरलीस वाटतं?"

"तर काय रे! माझा जीव उडून गेला आहे अगदी!"

"छे, छे! बिलकुल घाबरायचं नाही, बरं का!" खोखोलने तिला समजावण्याचा प्रयत्न केला. "घाबरून फायदा तरी काय?"

"वा! तू तर चहाचं पाणी देखील ठेवलं नाहीस आज वाटतं?" पावेल म्हणाला.

"या यांच्यामुळे मी अडकून पडले होते," बाकावरून उठून पुस्तकांकडे बोट दाखवीत आई म्हणाली. आपलं काही तरी चुकलं अशा जाणिवेचा भावही तिच्या चेहऱ्यावर दिसत होता.



तिचं हे स्पष्टीकरण ऐकून पावेल व खोखोल दोघेही जोराने हसू लागले व त्यामुळे आईच्या मनाचं दडपण दूर होऊन तिला जरा हलकं वाटलं. नंतर पावेलने त्याच पुस्तकांतली काही पुस्तकं निवडून बाजूला काढली व ती लपवून ठेवण्यासाठी तो बाहेर घेऊन गेला.

खोखोल आत चहा करीत होता तो आईला समजावू लागला,

"यात भिण्यासारखं असं काहीच नाही, नेनको! परंतु ते लोक असल्या मूर्खपणाच्या गोष्टीत निरर्थक वेळ घालवतात ही मात्र लज्जास्पद गोष्ट आहे. कमरेच्या पट्ट्यात तलवार अडकवलेली व बुटांच्या टाचांना अणकुचीदार खिळे ठोकलेले अशा थाटात असलेली प्रौढ माणसं असतात ती! आता ते इथे येतील अन् सगळं सामान उचकतील, खाटेखाली अन् चुलीत, तळघरात अन् माळ्यावर सगळीकडे काही हाती लागतंय का म्हणून शोध शोध शोधतील. या सर्व प्रकारात त्यांच्या चेहऱ्यांवर कोळिष्टकं मात्र लागतील अन् मग ते चिडून फूत्कार टाकतील. इतकेही करून काहीही सापडलं नाही म्हणजे ते स्वतःवरच चिडतील अन् त्यांना लाजही वाटेल, अन् त्यावर पांघरूण घालण्यासाठी ते खूप चिडल्याचा व संतापल्याचा आव आणतील. आपली नोकरी किती वाईट व दुष्टपणाची कृत्यं करायला लावणारी आहे हे ते जाणून असतात. एकदा त्यांनी माझ्या वस्तूंची झडती घेता घेता इतका पसारा करून ठेवला की त्याची त्यांनाच लाज वाटून ते झडती तशीच थांबवून निघून गेले. दुसऱ्या खेपेस ते मला पकडून घेऊन गेले व त्यांनी मला चार महिने तुरुंगात डांबून ठेवलं. तुरुंगात तर कामच नाही. नुसते स्वस्थ बसून राहा अन् काय होतं याची वाट पहात राहा. नंतर मग शिपाई हुकुम घेऊन येतात अन् रस्त्यांतून मिरवीत मिरवीत कुठल्या तरी बड्या अधिकाऱ्याकडे घेऊन जातात. तिथे प्रश्नांची सरबत्ती सुरू होते. या बड्या अधिकाऱ्यांना बुद्धी कमीच असते. ते बरीचशी निरर्थक बडबड करतात अन् मग कैद्याला पुन्हा तुरुंगात घेऊन जाण्याचा शिपायांना हुकुम सोडतात. असंच इकडून तिकडे न् तिकडून इकडे हिंडवणं सारखं चालू असतं. एवढा पगार खातात तसं काही काम केल्यासारखं दाखवायला तर हवं! अन् शेवटी अर्थातच ते धरून आणलेल्यांना सोडून देतात! बस! दुसरं काय!"

"कशी रे ही बोलण्याची तऱ्हा तुझी, आंद्रयूशा!" आई म्हणाली.

आंद्रेइ शेगडीत विस्तवाचा जाळ करण्यासाठी खाली वाकलेला होता तो

आपला लालबुंद चेहरा आईकडे वळवून मिशांवर हात फिरवीत म्हणाला,

"कसली तऱ्हा?"

"जसं काही तुला कधी त्रास सहन करावाच लागला नाही इतक्या सहजतेनं बोलतो आहेस तू!"

"पण ज्याला त्रास मुळीच सहन करावा लागला नाही असा माणूस या जगात तरी सापडेल का?" तो हसत म्हणाला व उठून मान हालवीत पुनः बोलू लागला,

"त्यांनी खरोखर मला इतकं छळलं आहे की आता मी तिकडे लक्षच देण्याचं सोडून दिलं आहे. लोक आहेत हे असे आहेत! त्याला आपण काय करणार? आपल्याला त्रास किती होतो तिकडे लक्ष देत बसलं तर कामात तर व्यत्यय येतोच, पण त्यावर विचार करीत रहाणं म्हणजे निव्वळ वेळेचा अपव्यय आहे! जग हे असंच आहे! प्रथम प्रथम मला लोकांचा राग यायचा, नाही असं नाही, पण नंतर मी पाहिलं की त्यात काही अर्थ नाही. प्रत्येकाच्या मनात अशी भीती वाटत असते की आपला शेजारी आपल्यावर हल्ला करायला टपून बसला आहे, म्हणून तो स्वतःच आधी त्याला ठोसा लगावून मोकळा होतो! जग हे असं आहे, नेनको!"

त्याच्या या संथ व शांत बोलण्याने झडतीविषयीची तिच्या मनातील भीती नाहीशी झाली व ती त्याच्या मोठाल्या डोळ्यांकडे पाहू लागली तेव्हा तो दिसायला कुरूप असूनसुद्धा त्याच्या अंगी एक प्रकारची तडफ असल्याचं आणि त्याच्या डोळ्यांत निश्चयाची व त्याचबरोबर स्मिताची चमक असल्याचं तिला दिसून आलं.

तिने एक सुस्कारा टाकून भावनावेगाने म्हटले, "देव तुला सुखी ठेवो, आंद्र्युशा!"

खोखोल पुनः चहाच्या तयारीला बसत पुटपुटला,

"थोडंसं सुख माझ्या वाटचाला आलं तर मी ते नाकारणार आहे थोडाच! पण मी सुखाची भीक मागत बसणार नाही खास!"

तेवढ्यात पावेल बाहेरून आत आला व हात धूत म्हणाला, "आता या जन्मात त्यांना ती पुस्तकं सापडणं शक्य नाही!"

नंतर हात कोरडे करता करता आईकडे वळून तो म्हणाला,

"तू मात्र घाबरल्यासारखं त्यांना मुळीच दाखवू नकोस, बरं का! नाहीतर त्यांना वाटेल, ही बाई थरथरा कापते आहे त्याअर्थी या घरात



नक्की संशयास्पद काही असलंच पाहिजे. आम्ही करतो आहो त्यात खरोखरच वाईट काही नाही हे तू जाणतेसच! आपण न्यायासाठी झटत आहोत. न्याय आपल्या बाजूला आहे, आणि आम्ही आजन्म त्यासाठी झगडणार आहोत. आमचा काही गुन्हा असलाच तर तो हा आहे! आपल्या मनाची ही खात्री असल्यावर आम्हाला घाबरण्याचं कारणच काय?"

"नाही पाशा! मी सगळं धीरानं घेईन बघ!" तिने मोठ्या निश्चयाने सांगितलं. पण दुसऱ्याच क्षणी ती दुःखावेगाने म्हणाली, "पण ते एकदाचे झटपट येऊन गेले अन् जे काय व्हायचं असेल ते होऊन गेलं म्हणजे सुटले एकदाची!"

पण त्या रात्री पोलिस आलेच नाहीत. दुसऱ्या दिवशी सकाळी पोरं आपली चेष्टा करणार हे ओळखून आईनेच आधी स्वतः फार घाबरल्याबद्दल थट्टेने बोलण्याला सुरवात केली. ती म्हणाली,

"मी तरी कशी वेडी! काही होण्यासवरण्यापूर्वीच उगाच घाबरले!"

## १०

त्या दिवसानंतर जवळजवळ एक महिनाभर पोलिस आलेच नाहीत. आणि मग अचानक एक दिवस त्यांची धाड आली. निकोलाय वेसोव्श्चिकोव हा पावेल व आंद्रेइला भेटायला आला होता व ते तिघेजण त्यांच्या वर्तमानपत्राविषयी बोलत बसले होते. रात्र बरीच झाली होती. जवळजवळ मध्यरात्रीचाच सुमार होता. आई बिछान्यावर पडली होती व त्यांच्या चर्चेतील काही शब्द अस्पष्टपणे अर्धवट झोपेत तिच्या कानावर पडत होते. एवढ्यात आंद्रेइ उठला व बिलकुल पाय न वाजवता स्वयंपाकघरातून बाहेर गेला. त्याने जाताना दरवाजा लोटून घेतला. नंतर लगेच बादली पडल्याचा आवाज आला व आंद्रेइ दरवाजा उघडून स्वयंपाकघरात शिरला.

"बुटांची खाड्खाड् ऐकू येत आहे बरं का!" तो कुजबुजल्याप्रमाणे पण जरा मोठ्यानेच म्हणाला.

ते शब्द ऐकून आई ताड्कन् उठून बसली व कापऱ्या हाताने कपडे गोळा करू लागली. तिची ही धांदल पाहून पावेल दरवाजात येऊन उभा राहिला व त्याने शांतपणे तिला सांगितले,

"तू बिछान्यावर पडून राहा आई! तू आजारी आहेस!"

नेवढ्यात बाहेर सळसळ ऐकू आली. पावेल दरवाजाकडे गेला व दार उघडून त्याने विचारले, "कोण आहे?"

करडया रंगाच्या पोषाखातील एक उंच माणूस पुढे आला, त्याच्या मागोमागच आणखी एकजण होता. दोन पोलिसांनी पावेलला बाजूला सारले आणि त्याच्या दोन्ही बाजूला ते उभे राहिले व मग ते पहिले दोघे आत शिरले.

त्यांच्यापैकी एकजण मोठ्या आवाजात व हेटाळणीच्या सुरात म्हणाला, "तुम्ही ज्यांची वाट पहात होता ते आम्ही नव्हे, नाही?"

हे शब्द उच्चारणारा अधिकारी उंच किडकिडीत इसम होता व त्याच्या ओठावर बारीक काळ्या मिशा दिसत होत्या.

नंतर फेद्याकिन नावाचा स्थानिक पोलिस शिपाई आईच्या बिछान्याकडे गेला. एका हाताने तिच्याकडे अंगुलिनिर्देश करीत व दुसऱ्या हाताने टोपीकडे हात नेऊन त्या अधिकाऱ्याला सलाम करीत त्याने सांगितले,

"ही त्याची आई आहे, सरकार!"

आणि मग पावेलकडे हात करून तो म्हणाला,

"आणि हा तो!"

"पावेल व्लासोव?" त्या अधिकाऱ्याने डोळे लहान करीत पावेलवर नजर रोखून विचारले.

पावेलने मानेनेच रुकार दिला.

तो अधिकारी आपल्या मिशांना पीळ देत बोलू लागला,

"मला या घराची झडती घ्यायची आहे, समजला! ए बाई, चल उठ पाहू! अन् त्या तिकडे कोण आहे?" असे म्हणत तो दरवाजातून नजर टाकीत दुसऱ्या खोलीत शिरला.

"तुमची नावं?" पलिकडून त्याचा आवाज आला.

नंतर त्यांनी बरोबर आणलेले दोन साक्षीदार आत आले. त्यांच्यापैकी एकजण कारखान्यातला जुना कामगार होता. त्याचं नाव त्वेर्याकोव. दुसरा इसम होता त्याचं नाव रिबिन. तो चांगला धिप्पाड होता व कारखान्यात भट्टीवर कामाला होता. तो त्वेर्याकोवच्याच घरात एक खोली भाड्याने घेऊन राहात असे.

आत आल्यावर रिबिनने घोगऱ्या आवाजात आईला म्हटले, "नमस्ते, निलोव्ना!"



आई कपडे करीत होती व आपण घाबरलेलो नाही असे दाखविण्यासाठी स्वत:शीच पण मोठ्याने पुटपुटत होती,

"असले प्रकार कधी ऐकले नाहीत बाई! ऐन मध्यरात्री यायचं, लोक झोपलेले असतात त्यांची झोपमोड करायची, म्हणजे कमालच म्हणायची!"

त्या लहानशा खोलीत आता भलतीच गर्दी झाली होती व बूट पॉलिशचा भयंकर वास येत होता. दोन पोलिस व स्थानिक पोलिस इन्स्पेक्टर यांनी मिळून कपाटातली पुस्तकं धाड्धाड् करून काढली व मुख्य अधिकाऱ्या-समोरच्या टेबलावर त्यांचा ढीग रचला. दुसऱ्या दोघांनी भिंती कोठे पोकळ आहेत कां हे पाहाण्यासाठी ठोकून पाहिले, खुर्च्यांच्या खाली वाकून बघितले व त्यांच्यापैकी एकाने तर चुलीत सुद्धा डोकावून पाहाण्याला कमी केले नाही.

खोखोल व निकोलाय एका बाजूला कोपऱ्यात उभे राहून हा प्रकार पहात होते. निकोलायचा देवीचा वण असलेला चेहरा रागाने लाल झाला होता व त्याचे लहान करड्या रंगाचे डोळे त्या अधिकाऱ्यावर रोखलेले होते. खोखोल शांतपणे मिशीला पीळ देत उभा होता. आई त्या खोलीत आली तेव्हा तिला धीर देण्यासाठी तो हसला व त्याने तिच्याकडे पाहून "हूं! काही विशेष नाही!" असे सुचवीत मान हालवली.

आई नेहमी थोडी एका बाजूला वाकून चालत असे, पण आज स्वत:च्या मनातली भीती घालवून लावण्यासाठी म्हणून मुद्दाम ती छाती पुढे काढून ताठ चालत होती. तिच्या या आविर्भावामुळे तिची उसनी ऐट फार मजेदार दिसत होती. ती चालताना मुद्दाम पाय मोठ्याने आपटीत होती, पण तिच्या भुवया मात्र आकुंचित झालेल्या होत्या व थरथरत होत्या.

त्या अधिकाऱ्याने समोरच्या ढिगातली पुस्तके तपासून पाहिली. आपल्या पांढऱ्या हाताच्या बारीक बोटांनी तो एकएक पुस्तक घेऊन त्याची पाने भराभर चाळून पहात होता व मग मोठ्या ऐटीत ते बाजूला भिरकावून देत होता. त्यातली काही पुस्तके टेबलावर न पडता धपकन् खाली पडत होती.

खोलीत संपूर्ण स्तब्धता होती. कोणीच काही बोलत नव्हते. पोलिस धामाधूम होऊन जोराने श्वास घेत होते व मधूनमधून खाडखाड बूट वाजवीत एकमेकांना विचारीत होते

"या इथे पाहिलं का? पहा बरं!"

आई पावेलच्याच शेजारी भिंतीला टेकून उभी होती. तिनेही त्याच्याच-प्रमाणे छातीवर हात बांधले होते व तिचे डोळे त्या अधिकाऱ्याच्या हाल-चालीचं निरीक्षण करण्यात गुंतले होते. तशी उभी असतानाच आपले गुडघे कापत आहेत व डोळ्यांपुढे अंधारी येत आहे असं तिला वाटत होतं.

मग अचानक निकोलायच्या कठोर आवाजाने त्या शांततेचा भंग केला. त्याने अधिकाऱ्याला विचारले,

"ती पुस्तकं खाली फेकली नाहीत तर नाही का चालणार?"

आता काय होणार या भीतीने आई दचकली. दोन्ही साक्षीदारही बिचकलेच. त्वेर्याकोवने तर जणु काय आपल्यालाच कोणी तरी धक्का दिला अशा प्रकारे डोके गदगदा हालवले. रिबिनने एक आवंढा गिळला व तो निकोलायकडे टक लावून पाहू लागला.

तो अधिकारी निकोलायच्या देवीचे वण असलेल्या निश्चल दगडी चेहऱ्याकडे पाहू लागला. त्याने निकोलायकडे एक जळजळीत नजर टाकली व तो अधिकच भराभर पुस्तकं चाळू लागला. मधूनच तो आपले करड्या रंगाचे डोळे मोठे करी, तेव्हा जणु काय याला काहीतरी भयंकर वेदना होत असून त्यापायी हा आता असहायपणे ओरडणार असा भास होई.

मग निकोलायच पुनः जोरात बोलला. "ए, शिपाया! ती पुस्तकं उचलून नीट वर ठेव पाहू!"

सर्व पोलिस मागे वळून प्रथम त्याच्याकडे व नंतर त्या अधिकाऱ्याकडे पाहू लागले. अधिकाऱ्याने वर नजर करून मर्मभेदक दृष्टीने निकोलायचे धिप्पाड शरीर आपादमस्तक न्याहाळले व नंतर नाकातून उच्चार करीत उंऽऽ असे म्हणत त्याने पोलिसांना सांगितले, "बरं आहे, उचलून ठेवा ती पुस्तकं."

एक पोलिस खाली वाकून ती इतस्ततः पसरलेली पुस्तकं गोळा करू लागला.

"निकोलायने खरं म्हणजे गप्प बसायला हवं, नाही का रे?" आई पावेलच्या कानात कुजबुजली.

पावेलने नुसते खांदे उडवले. खोखोल मस्तक वाकवून खाली पाहू लागला.

"हे बायबल कोण वाचतं?" अधिकाऱ्याने विचारलं.



"मी वाचतो," पावेल उत्तरला.

"ही सगळी पुस्तकं कुणाच्या मालकीची आहेत?"

"माझ्याच." पावेलने सांगितले.

"अस्सं! ठीक!" अधिकारी उद्गारला व तो खुर्चीवर मागे रेलून बसला. नंतर त्याने आपल्या बारक्या हातांची बोटे कडकडा मोडली व टेबलाखाली पाय पसरले. एका हाताने मिशा साफसूफ करीत त्याने निकोलायला विचारले,

"आंद्रेइ नाखोद्का तूच का?"

"होय, मीच!" निकोलाय पुढे होत उत्तरला.

पण खोखोलने त्याला खांद्याला धरून मागे सारले व स्वतः पुढे येऊन अधिकाऱ्याला सांगितले,

"नाही, तो नव्हे! मी आंद्रेइ–"

अधिकारी हात वर उचलून निकोलायकडे बोट करीत म्हणाला, "तू जरा सांभाळून राहा! मी सांगून ठवतो!"

इतकं बोलून तो कागद चाळण्यात गढून गेला.

चांदण्यात न्हाऊन निघालेली रात्र थंडपणे व उदासीनतेने खिडकीतून आत डोकावत होती. घराजवळून हळूच फिरत असलेल्या कुणाच्या तरी पाया-खाली चिरडल्या जाणाऱ्या बर्फाचा खस्‌खस्‌ आवाज ऐकू येत होता.

नंतर अधिकाऱ्याने विचारले, "नाखोद्का! राजकीय गुन्ह्यांसाठी तू तुरुंगाची हवा खाऊन आलेला आहेस, नाही?"

"होय. एकदा रोस्तोव अन् दुसऱ्यांदा सारातोव येथे मला पकडलं होतं. पण तिथले पोलिस पुष्कळच सभ्यपणाने वागले!"

अधिकाऱ्याने उजवा डोळा मिटून तो चोळला. नंतर आपले छोटे दात विचकीत तो म्हणाला, "बरं बरं! पण इथल्या कारखान्यात भयंकर पत्रकं वाटणारे बदमाश कोण आहेत हे तुला ठाऊक असेल नाही?"

खोखोल हसला व पायाच्या पंजावर उभा राहून काहीसा डोलू लागला. आणि तो काही उत्तर देणार एवढ्यातच निकोलायचा खणखणीत आवाज घुमला,

"बदमाश लोक असे आजच आम्ही प्रथम पहातो आहोत."

एक क्षणभर सगळीकडे स्तब्धता पसरली. कोणाच्या तोंडून शब्दच उमटेना.

आईच्या चेहऱ्यावरची व्रणाची जागा पांढरी फटफटीत पडली व तिची उजवी भुवई वर उचलली गेली. रिबिनची काळी दाढी थरथर हालू लागली, व तो तीतून बोटं फिरवीत नजर खाली करून उभा राहिला.

"या बदमाशाला इथून घेऊन चला!" अधिकाऱ्याने हुकूम सोडला.

दोघा पोलिसांनी निकोलायचे हात पकडले व त्याला ओढीत स्वयंपाक-घराकडे नेले. पण तिथे त्याने जमिनीवर पाय घट्ट रोवून त्यांना थांबायला भाग पाडले व तो जोरात त्यांना म्हणाला, "थांबा जरा! मला माझा कोट घालू द्या!"

स्थानिक पोलिस इन्स्पेक्टर बाहेरच्या बागेतून आत आला व त्याने अधिकाऱ्याला सांगितले, "आम्ही सगळी ठिकाणं शोधली. तिकडे बाहेर तरी काही नाही!"

"बरोबरच आहे, नसणारच! इथे या एका अनुभवी माणसाशी गाठ आहे ना आपली!" अधिकारी तुच्छतापूर्वक हास्य करीत उद्गारला.

त्याचं हे बारीक किरट्या आवाजातलं बोलणं चालू असता आई भयभीत होऊन त्याच्या फिकट पिवळसर चेहऱ्याकडे पाहात होती. हा माणूस अगदी निर्दय शत्रू आहे, त्याला सामान्य लोकांविषयी प्रेमाऐवजी तिटकारा वाटत असला पाहिजे, हे तिने बरोबर ताडले. अशा लोकांशी तिचा आजवर कधीच संबंध आला नव्हता व त्यामुळे असेही लोक जगात असतात याचाच जणु तिला विसर पडला होता.

"त्या पत्रकांमुळे जे चिडतात ते लोक हे असले असतात तर!" ती स्वतःशीच पुटपुटली.

तेवढ्यात तो अधिकारी बोलला,

"आंद्रेइ ओनिसिमोव, अनौरस औलाद व नाखोद्का नाव लावणारा, तुला अटक केली जात आहे."

"कशाबद्दल?" खोखोलने शांतपणे विचारले.

"ते मागाहून कळेल!" अधिकाऱ्याने आपल्या शब्दांत गोडवा आणण्याचे ढोंग करीत उत्तर दिले.

नंतर आईकडे वळून त्याने विचारले, "तुम्हाला लिहायवाचायला येतं का?"

"नाही!" पावेलनेच तिच्या वतीने उत्तर दिले.

"मी तुला विचारीत नाही!" अधिकारी चिडून म्हणाला, "हं बाई! सांगा पाहू!"



आईला त्या माणसाविषयी कल्पनातीत तिरस्कार वाटू लागला. अचानक-पणे जणु काय बर्फासारख्या थंडगार पाण्यात उडी मारल्याप्रमाणे तिला कापरे भरले. पण तिने लगेच स्वतःला सांवरले. तिच्या चेहऱ्यावरची व्रणाची जागा पांढरी फटफटीत दिसू लागली व तिच्या भुवया थरथरू लाग-ल्या, व तशा अवस्थेतच ती हात पुढे करून म्हणाली, "असं ओरडण्याची काही गरज नाही. जगात दुःख अन् संकटं काय असतात हे कळण्याइतकं अजून तुमचं वय झालेलं दिसत नाही."

"शांत हो, आई! शांत हो!" पावेल तिला गप्प करण्याच्या उद्देशाने सांगू लागला.

"थांब, पावेल." ती ओरडली व एकदम टेबलाजवळ जाऊन उभी राहिली व त्या अधिकाऱ्याला म्हणाली, "तुम्ही या लोकांना असे पकडून नेता ते काय म्हणून?"

"तो तुमचा प्रश्न नाही! चूप बसा!" तो अधिकारी ओरडला व खुर्चीवरून उठत त्याने हुकूम सोडला,

"त्या खोलीतून वेसोव्श्चिकोवलाही आणा! त्यालाही अटक करण्यात आलेली आहे!"

नंतर तो एक कागद अगदी नाकाजवळ धरून वाचू लागला.

पोलिसांनी निकोलायला धरून त्या खोलीत आणले तेव्हा त्याच्याकडे पाहून आपले वाचणे थांबवीत अधिकारी त्याच्यावर खेकसला, "ती टोपी काढून ठेव पाहू!"

रिबिन आईजवळ आला व तिला आपल्या खांद्याने हळूच धक्का देत म्हणाला, "तुम्ही घाबरू नका, आई!"

निकोलायने अधिकाऱ्याच्या वाचनाच्या आवाजापेक्षाही चढा आवाज करून टोपी काढण्याच्या हुकुमाला प्रत्युत्तर दिले,

"हे लोक माझे हात सोडत नाहीत, मग मी टोपी कशी काढणार?"

अधिकाऱ्याने तो कागद वाचून संपवला व टेबलावर फेकीत तो ओरडला, "चला, सह्या करा त्यावर!"

त्यावर सह्या होत असताना त्यांच्याकडे पहाता पहाता आईच्या संतापाचा भर ओसरला. तिचा जीव पार गळून गेला होता. दुःख व असहायतेच्या जाणिवेने तिचे डोळे अश्रूंनी भरून आले. पूर्वी नवरा जिवंत असता लग्नापासूनची वीस वर्षेपर्यंत ती अनेक अश्रू ढाळीत आली होती, परंतु

अलिकडच्या काळात ती त्यांचा उष्ण स्पर्श जणु काय पार विसरून गेली होती.

अधिकारी मोठ्या शिष्ठपणाचा आव आणीत तिला सांगू लागला, "इतक्यातच सगळं रडून घेऊ नको बाई! नाहीतर पुढे आणखी रडायला पाणीच उरणार नाही!"

आई पुनः संतापाने खवळली व तिने अधिकाऱ्याला सुनावले, "आईच्या डोळ्यांत कधीच पाणी कमी पडत नाही, समजलं! तुम्हाला आई असेल तर तिलाच हे कळू शकेल!"

यावर अधिकाऱ्याने घाईघाईने आपल्या नव्याकोऱ्या चामडी हँडबॅगेत कागद ठेवून बॅगेचे कुलुप लावले व हाताखालच्या लोकांना हुकूम सोडला, "चला!"

पावेलने आंद्रेइ व निकोलाय यांच्याशी प्रेमाने हस्तांदोलन करून त्यांना निरोप दिला, तसा तो अधिकारी दात विचकीत त्याला म्हणाला, "तुमची बहुधा लवकरच भेट होईल!"

वेसोव्श्चिकोवचा श्वास जोरजोराने चालत होता. त्याची जाडजूड मान लाल झाली होती व त्याच्या डोळ्यांतून संतापाच्या जणु ठिणग्या पडत होत्या. खोखोल मात्र शांत असून त्याच्या चेहऱ्यावर स्मित झळकत होते. त्याने मान हालवून आईच्या कानांत काहीतरी सांगून तिचा निरोप घेतला, तेव्हा ती क्रूसची खूण करून त्याला आशीर्वाद देत म्हणाली, "कोणाचं खरं आहे हे सगळं देव पहातो आहे बरं! देव जागा आहे!"

नंतर करड्या रंगाचे पोषाखवाले ते सगळे इसम एकदाचे बाहेर पडून त्यांनी अंगणात गर्दी करून सोडली व मग बुटाच्या टाचांचा खाडखाड आवाज करीत ते तिथून निघून गेले.

रिबिन सर्वांच्या मागून गेला व जातानाही त्याची नजर मागे रेंगाळत होती. नंतर जाता जाता काहीतरी विचारात असल्यासारख्या नजरेने त्याने पावेलकडे पहात त्याचा निरोप घेतला व "बराय, येतो आता!" असे म्हणत खोकत खोकत दाढी हालवीत तो दरवाजातून बाहेर पडला.

पावेल पाठीमागे हातात हात अडकवून खोलीत सावकाशपणे फेऱ्या घालू लागला. जमिनीवर पुस्तके व कपडे पसरलेले होते त्यावरून पाय देत चालता चालता तो खिन्नपणे म्हणाला, "पाहिलंस, आई? हे असं काम असतं त्यांचं!"



त्या सगळ्या पसाऱ्याकडे पाहून ती स्तिमित झाली. नंतर तिने विचारले, "निकोलाय असं तुसड्यासारखं काय करत होता?"

"तो बहुधा भेदरला असावा असा माझा अंदाज आहे," पावेल उत्तरला.

"या लोकांची पण कमालच म्हणायची! मेले सरळ आत घुसतात, अन् त्यांना धरून घेऊन जातात!" आपले हात आवळीत ती पुटपुटली.

तिच्या मुलाला त्यांनी धरून नेलं नव्हतं त्यामुळे तिच्या हृदयाची धडधड पुष्कळच कमी झाली होती. परंतु तिच्या डोळ्यांदेखत जो विलक्षण प्रकार घडलेला तिने आताच पाहिला होता त्यामुळे तिच्या मेंदूला बधिरता आली होती. तेच दृश्य तिच्या डोळ्यांसमोर नाचत होते.

"तो पिवळ्या चेहऱ्याचा इसम आम्हाला तुच्छतेने हसत होता, आम्हाला धाबरवून सोडू पहात होता..."

ती स्वतःशी असे म्हणत असताच पावेल एकदम निश्चयी स्वरात म्हणाला, "ठीक आहे, ममी! आपल्याला आता हा पसारा आवरलाच पाहिजे!"

त्याच्या आवाजात कधीकधी अधिकच लाडिकपणा व माया तिला भासत असे तशीच आता भासली व ती त्याच्या अगदी जवळ येऊन त्याच्याकडे न्याहाळून पहात म्हणाली,

"तुझा अपमान झाल्यासारखं तुला वाटतं आहे का?"

"होय. हे सहन करणं खरोखरच कठीण आहे ग! त्यांनी इतरांबरोबर मलाही पकडून नेलं असतं तर बरं झालं असतं."

हे म्हणत असता त्याच्या नेत्रांत अश्रू तरळू लागल्याचे तिला दिसले. ती एक सुस्कारा टाकून त्याला किंचित् बरं वाटावं म्हणून म्हणाली,

"थोडं थांब, तुलाही नेतीलच ते."

"ते नेणार हे मीही ओळखून आहेच."

यावर एक क्षणभर स्तब्ध राहून ती बोलू लागली,

"तू किती निष्ठुर आहेस रे, पावेल! कधी एखाद वेळ तरी माझ्या मनाला बरे वाटेल असं बोलशील तर! मी तुला बरं वाटावं म्हणून मोठ्या जड अंतःकरणाने तसं बोलले तर तू ते खरंच असं सांगून माझी जखम पुनः ओली करतोस!"

पावेलने तिच्याकडे पाहिले व तो तिच्या जवळ आला.

"आई! तुझं सांत्वन कसं करावं हेच मला कळत नाही ग! पण तुला या प्रकारांची संवय करून घ्यावीच लागेल आता!"

तिने एक सुस्कारा टाकला व क्षणभर थांबून कसाबसा स्वतःच्या मनाला बांध घालीत तिने विचारलं,

"पकडून नेलेल्यांचा ते छळ करतात का रे? मरेमरेतो अन् हाडं मोडेपर्यंत मारणं, हे प्रकारही करतात का? बाई ग! मी तर नुसती असल्या प्रकारांची कल्पनाच करू लागले म्हणजे—अयाई ग! किती भयंकर—"

त्यापेक्षाही वाईट म्हणजे ते आत्म्यावर प्रहार करतात! त्यांचे पापी हात त्यांनी आपल्या आत्म्याला घालावे याचंच दुःख त्या शारीरिक वेदनांपेक्षा किती तरी पट जास्त असतं, आई!"

## ११

दुसऱ्या दिवशी बुकिन, सामोइलोव, सोमोव आणि इतर पांच जणांनाही पकडण्यात आल्याची बातमी सर्वत्र पसरली. संध्याकाळी फ्योदोर माझिन पावेलकडे आला. त्याच्या घराचीही झडती घेण्यात आली होती व त्याबद्दल त्याला मोठा अभिमान व धन्यता वाटत होती.

"फ्योदोर, तू घाबरला होतास का रे?" आईने त्याला विचारले.

त्याचा चेहरा गोरामोरा झाला व नाकपुड्या थरथर कापू लागल्या. तो सांगू लागला,

"तो अधिकारी माझ्यावर हात टाकील अशी मला भीती वाटली. तो चांगला गलेलठ्ठ होता. त्याची दाढी काळी होती अन् बोटं केसाळ होती. डोळ्यांवरच्या काळ्या चष्म्यामुळे तर असं वाटत होतं की तो आंधळाच असावा! तो सारखा खेकसत होता न् पाय आपटत होता. 'मी तुला तुरुंगात डांबीन!' असा दमही भरला मला त्याने. आजवर मी कुणाच्याच हातचा मार खाल्लेला नाही. माझ्या आईबापांच्या सुद्धा! मी एकुलता एक मुलगा असल्यामुळे त्यांचा फार लाडका होतो."

एवढं बोलून मध्येच त्याने डोळे मिटले व ओठ घट्ट आवळून धरले. नंतर दोन्ही हातांनी एकदम केस मागे फिरवून व आपले लालबुंद डोळे पावेलवर रोखून तो म्हणाला,

"माझ्या अंगावर हात टाकायची कुणी हिंमत केलीच तर एखादा चाकू खुपसावा तसा मी त्याच्यावर तुटून पडेन अन् दातांनी कडकडून चावा घेईन. मग नंतर त्यांनी माझा जीव घेतला तरी चालेल."



"तू तर असा हाडकुळा दिसतोस! तुला मारामारी करता तरी येईल का?" आई उद्गारली.

"ते काही असलं तरी मी लढल्यावाचून राहाणार नाही हे पक्कं समजून असा!" फ्योदोर श्वास रोखून उत्तरला.

तो गेल्यावर आई पावेलला म्हणाली, "हा इतकं बोलतो, पण याचाच धीर सर्वांच्या आधी खचेल."

यावर पावेल काहीच न बोलता स्तब्ध राहिला.

थोड्याच वेळाने स्वयंपाकघराचे दार लोटून रिबिन आत आला. चेहऱ्यावर मंद स्मित आणीत तो म्हणाला,

"नमस्ते! हा आज मी पुनः आलो बघा. काल मला घेऊन आले होते, अन् आज मी स्वतः होऊनच आलो आहे."

नंतर पावेलशी जोराने हस्तांदोलन करून त्याने आईच्या खांद्यावर हात ठेवला व मागणी केली,

"आपल्याला एक कप चहा पाहिजे बुवा!"

पावेल शांतपणे त्याच्या चेहऱ्याचे निरीक्षण करीत होता. त्याचा रुंद चेहरा, दाट काळी कुळकुळीत दाढी अन् काळेभोर नेत्र अन् त्या नेत्रांची निश्चल नजर, या सर्वात एक प्रकारचा रुबाब होता यात शंका नाही.

आई चहा ठेवायला आत गेली. रिबिन टेबलाजवळ बसला व दोन्ही कोपर टेबलावर ठेवून पावेलकडे पहात बोलू लागला.

"तर मी म्हणत होतो," जणु काही आधीच चालू असलेले संभाषण पुढे चालू ठेवीत असल्याच्या थाटात तो बोलत होता. "मी जरा स्पष्टपणाने सगळं काही सांगून टाकायला आलो आहे. गेले काही दिवस माझी तुमच्यावर नजर आहे. मी पलिकडे, तुमच्या शेजारच्याच घरात राहातो. तुमच्याकडे बऱ्याच जणांचं येणंजाणं आहे, पण ते दारू पीत नाहीत अन् गोंधळगडबडही करीत नाहीत. हे झालं एक. असे नीट वागणारे लोक असले म्हणजे ते लक्ष्यात आल्यावाचून राहायचंच नाही. नाही का? हे लोक असे इतरांपेक्षा निराळे वागतात तेव्हा काहीतरी भानगड असली पाहिजे असं साहाजिकच कुणालाही वाटतं. मी स्वतःसुद्धा कोणाकडे जातयेत नाही व स्वतःतच मग्न असतो म्हणून मी सुद्धा लोकांच्या डोळ्यांत सारखा सलतो."

त्याचं भाषण गंभीर स्वरूपाचं होतं, पण तो अगदी सहज बोलावं तसं बोलत होता. आपली दाढी एका हाताने कुरवाळीत व पावेलच्या चेहऱ्यावर नजर रोखून तो पुढे बोलू लागला,

"लोक तुमच्याविषयी चर्चा करू लागले आहेत. उदाहरणार्थ, माझा घरमालकच घ्या. तो तुम्हाला नास्तिक म्हणतो, कारण तुम्ही चर्चमध्ये जात नाही. तसं पाहिलं तर मी सुद्धा कधी चर्चमध्ये जात नाही! शिवाय ती पत्रकं! ते तुमचंच काम ना?"

"हो." पावेल उत्तरला.

"काय सांगतो आहेस तू पाशा?" पावेलचे उत्तर ऐकून भ्यालेली आई आतूनच ओरडली व स्वयंपाकघराच्या दारातून डोकावीत म्हणाली, "तुझं एकट्याचंच काम नाही ते!"

यावर पावेल हसला व रिबिनलाही हसू आलं.

"ठीक तर!" रिबिन उद्‌गारला.

आपल्या बोलण्याकडे त्यांनी दुर्लक्ष केलेलं पाहून आई हिरमुसली होऊन परत आत गेली.

"त्या पत्रकांची कल्पना खरोखरच चांगली आहे. त्यामुळे लोक जागृत तरी होऊ लागले आहेत. एकूण एकोणीस पत्रकं निघाली, नाही?"

"हो." पावेल उत्तरला.

"ठीक, म्हणजे मला सगळी वाचायला मिळाली तर एकूण. त्यातल्या काही मजकुराचा अर्थ तितकासा स्पष्ट झालेला नाही, काही थोडा भाग नसता तरी चालण्याजोगं होतं. पण ते असो, कारण पुष्कळसं सांगायचं म्हणजे तसली चारदोन वाक्यं जादा पडायचीच."

एवढं बोलून रिबिनने स्मित केलं व त्याचे शुभ्र मोठाले दात चमकले. तो पुढे बोलू लागला.

"अन् मग हे झडतीचं प्रकरण उद्‌भवलं. त्यामुळेच खरा माझ्या मनात संपूर्ण बदल घडून आला. तुम्ही, खोखोल, निकोलाय, सगळ्यांनीच खरोखर –"

तो मध्येच थांबला. त्याला आपलं म्हणणं मांडण्यासाठी योग्य शब्द सुचत नव्हते. त्याने क्षणभर खिडकीतून बाहेर नजर लावली व टेबलावर हाताने ताल धरून तो पुढे म्हणाला,

"तुम्ही खरोखरच फार धीराने काम घेतलंत. ते अधिकारी आले तेव्हा बावरून न जाता 'तुम्ही तुमचं काम करा. आम्ही आपलं कर्तव्य करू' असंच जणु त्यांना सांगण्याच्या वृत्तीने तुम्ही वागलात, हे फारच वाखाणण्याजोगं होतं. तुमचा खोखोल सुद्धा मस्त गडी आहे. कारखान्यात कधीकधी



त्याला बोलताना ऐकलं म्हणजे मी स्वतःशीच म्हणतो, 'हा गडी वाकायचा नाही! फक्त मृत्यूच याच्यावर मात करू शकेल! इतर कोणाला ते शक्य नाही! माणूस खंबीर असावा तर असा!' बरं पण, पावेल, तुमचा मजवर विश्वास आहे ना?"

"होय, आहे." पावेल मानेनेही होकार देत उत्तरला.

"ठीक तर मग. आता माझ्याकडे पहा. माझं वय चाळीस वर्षांचं, म्हणजे तुमच्यापेक्षा दुप्पट आहे, अन् मी तुमच्या वीसपट अनुभव घेतला आहे. तीन वर्षांहून अधिक काळ मी सैन्यात काढला आहे. दोनदा मी लग्न केलं. पैकी पहिली बायको मेली नू दुसरीला मीच सोडलं. मी कॉकेशसमध्येही जाऊन आलो अन् तिथे दुखोबोर्त्सी* पंथाचे लोकही पाहिले. पण या लोकांना काही ते जमत नाही अन् जमायचंही नाही, समजलात!"

त्याचं हे सूत्रबद्ध भाषण आई कान देऊन ऐकत होती अन् हा चांगला प्रौढ माणूस आपल्या मुलाजवळ त्याचं स्वतःचं अंतःकरण उघडं करीत होता याचं तिला फार समाधान वाटत होतं. पण असं असूनही पावेल मात्र त्याच्याशी अगदी थंडपणाने वागत होता म्हणून तिने स्वतःच पाव्हण्याचं आदरातिथ्य करण्याच्या हेतूने विचारलं,

"तुमच्यासाठी मी थोडं फराळाचं आणते हं!"

"नाही नाही, मला काही नको, आई. मी हा जेवूनच इकडे आलो. मग पावेल, जीवन हे असं आहे ते काही ठीक नाही असं तुमचं म्हणणं आहे का?"

पावेल उठला व पाठीमागे हात बांधून येरझारा घालीत उत्तरला,

"नाही, जीवनाचा ओघ योग्य दिशेनेच चालला आहे. आता हे तुमचंच पहा ना? या जीवन-ओघानेच तुम्हाला माझ्याकडे येऊन इतकं मोकळेपणाने बोलण्याची प्रेरणा दिली नाही का? हळूहळू सगळे श्रमजीवी लोक एक होऊ लागले आहेत अन् अगदी सगळ्यांची एकजूट झाल्याचे दृश्य दाखविणारा दिवसही आल्यावाचून राहाणार नाही. आज आपल्याला खडतर नू अन्यायाने भरलेलं जीवन जगावं लागत आहे, पण त्याचबरोबर जीवनाचा कटु अर्थही आपल्याला कळून येऊ लागला आहे व हे जीवनच आपल्याला आपल्या प्रगतीची गती वाढविण्याचा मार्ग दाखवीत आहे."

---

*एक धार्मिक पंथ

"अगदी बरोबर!" रिबिन म्हणाला. "लोकांची चांगली अन्तर्बाह्य शुद्धी होणं आवश्यक आहे. एखाद्याच्या डोक्यात उवा झाल्या अन् तो गलिच्छ असला तर त्याला स्नानगृहात नेऊन चांगली सचैल आंघोळ घालून अन् अंग घासूनपुसून स्वच्छ करता येतं आणि मग त्याला स्वच्छ कपडे घातले म्हणजे तो नीटनेटका दिसू लागतो. पण माणसाचं अंतरंगच घाण असेल तर ते कसं स्वच्छ करायचं? मुख्य गोष्ट आहे ती हीच!"

यावर पावेल आवेशाने बोलू लागला. कारखाना, तिथले बडे अधिकारी नि मालक, यांविषयी, तसंच इतर देशांतले कामगार आपल्या हक्कांसाठी कसे लढत होते याविषयी तो सांगू लागला. तो आपलं म्हणणं मांडत असतांना रिबिन मधूनमधून जणु काय त्याला हुंकार देत. असल्यासारखा टेबलावर हात आपटी व म्हणे, "ठीक! बरोबर! असंच पाहिजे!"

मधूनच एकदा तो हसून शांतपणे म्हणाला,

"तुम्ही अजून फार लहान आहात. लोकांचा फारसा अनुभव नाही तुम्हाला!"

यावर पावेल रिबिनच्या समोर येऊन उभा राहात गंभीरपणे म्हणाला,

"लहान अन् मोठा असा प्रश्न काढण्याचं कारण नाही. कोणाचं म्हणणं बरोबर आहे एवढंच आपण पाहू."

"तर मग देवबिव सब झूट आहे अन् निव्वळ आम्हा लोकांच्या फसवणुकीसाठीच ती कल्पना निघाली आहे असंच ना तुमचं म्हणणं? ठीक, माझ्यासुद्धा मते आपला धर्म कुचकामाचा आहे."

हे ऐकून आईही बोलू लागली. तिची देवाधर्मावर श्रद्धा होती व त्या गोष्टी तिला फार पवित्र वाटत होत्या. त्यामुळे जेव्हाजेव्हा पावेल देव-धर्माविरुद्ध बोले तेव्हातेव्हा त्याच्या नास्तिकपणाच्या उद्‌गारांनी तिला दुःख होई व ती त्याचे लक्ष आपल्याकडे वेधून घेऊन असले आपल्या अंतःकरणाला सुईप्रमाणे बोचणारे शब्द न बोलण्याची मूक याचना करण्याचा प्रयत्न करी. पण त्याचबरोबर त्याच्या या अश्रद्धेच्या मुळाशी कसली तरी अढळ निष्ठा आहे असेही वाटून तिला त्यातल्यात्यात समाधान वाटे व ती स्वतःशीच म्हणे, "याचे विचार मला खरोखरीच कसे नीट आकलन होतील?"

आज पावेल जेव्हा रिबिनशी बोलताना तशीच नास्तिकपणाची भाषा बोलू लागला तेव्हा निदान हा वयस्क माणूस तरी आपल्यासारखाच दुखावला जाईल व पावेलला विरोध करील अशी तिला आशा वाटली. पण तसं



काही न होता रिबिननेच वरीलप्रमाणे पावेलच्या विचारांना पुष्टी देणारे उद्‌गार काढले तेव्हा तिला न राहवून ती म्हणाली,

"तुम्ही त्या देवाविषयी बोलताना आपण काय बोलतो याचा नीट विचार करून बोला बरं का!"

तिने एक दीर्घ श्वास घेऊन आवेगाने पुढे म्हटले,

"तुमच्यापुरतं तुम्हाला काय वाटत असेल ते असो, पण तुम्ही माझ्या म्हातारीचा देव जर हिरावून घेतलात तर मला संकटकाळी कसलाच आधार उरणार नाही त्याची वाट काय?"

हे बोलताना तिचा कंठ दाटून येऊन डोळे अश्रूंनी भरून आले व हातातल्या ताटं विसळताना तिचे हात कापू लागले.

"आम्ही काय म्हणतो त्याचा अर्थ तुझ्या नीट ध्यानात आला नाही, आई," पावेल तिची समजूत घालू लागला.

"माफ करा अं आई आम्हाला!" रिबिनही आपल्या संथ व खोल आवाजात म्हणाला व त्याने किंचित् हसून पावेलकडे पाहिले. तो आईकडे वळून पुढे म्हणाला, "तुमच्या या वयात तुम्हाला जुन्या कल्पना न् श्रद्धा टाकून देणं शक्य नाही हे मी लक्ष्यात ठेवायला पाहिजे होतं."

नंतर पावेल आईला सांगू लागला, "आई, तुझा ज्या दयाळू व प्रेमळ ईश्वरावर विश्वास आहे त्या ईश्वराबद्दल मी म्हणत नव्हतो. तर हे पाद्री लोक आम्हाला भीती दाखविण्यासाठी ज्याचा एखाद्या दंडुक्याप्रमाणे उपयोग करतात आणि ज्याच्या नावाने आपणा सर्वांना मूठभर दुष्ट लोकांच्या सत्तेपुढे मान वाकवायला लावण्याचा प्रयत्न करतात त्या देवाविषयी मी बोलत होतो."

"तेच मी सुद्धा म्हणतो!" रिबिन टेबलावर हात आपटून आवेशाने म्हणाला, "या लोकांनी एक खोटा ईश्वर आपल्यावर लादला आहे! आपल्याला दडपून ठेवण्यासाठी ते मिळेल त्या सर्वच खऱ्याखोट्या गोष्टींचा त्यांना वाटेल तसा उपयोग करीत आले आहेत. असं पहा आई, देवानं प्रथम माणूस निर्माण केला तो स्वतःसारखाच ना? म्हणजे देव हा माणसासारखाच असला पाहिजे. जसा देव तसा माणूस अन् जसा माणूस तसा देव, नाही का? पण आपण माणसं तर खरोखरी देवांसारखे असण्यापेक्षा जनाव-रांशीच आपलं साम्य अधिक आहे. चर्चमध्ये देवाचे एक बुजगावणं बनवून आपल्याला भेडसवण्यासाठी ते पुढं करण्यात येत असतं. आपल्याला आता

हा आपला देव बदलायलाच हवा, आई! त्याला घासून पुसून साफ केला पाहिजे! या पाद्र्यांनी न् सत्ताधाऱ्यांनी त्याच्यावर खोटेपणाचा अन् असत्याचा मुलामा चढवला आहे आणि आपल्या आत्म्यांचा नाश करण्यासाठी त्याचा चेहराही विद्रूप करून टाकला आहे!"

रिबिन अगदी मृदु स्वरात हे सांगत होता तरीसुद्धा त्याचा प्रत्येक शब्द आईला वज्राघाताप्रमाणे वाटत होता. त्याच्या काळ्या दाढीने वेष्टिलेला त्याचा भलामोठा चेहराही स्मशानातल्याप्रमाणे भीषण भासत होता. त्याच्या डोळ्यांतील तीव्र चमकही तिच्या अंतःकरणात थरकाप उत्पन्न करीत होती.

"नको नको! असलं बोलणं माझ्याने ऐकवणार नाही. मी आपली जातेच कशी इथून!" असे म्हणत मान हालवीत ती पुनः स्वयंपाकघरात निघून गेली.

"पाहिलं पावेल? या सर्वांचा केंद्रबिंदु बुद्धी हा नसून अंतःकरण हा आहे असाच याचा अर्थ नाही का?" रिबिन बोलू लागला. "अंतःकरण ही चीज अशी आहे की मानवी आत्म्यात तिचं आपलं वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे व दुसऱ्या कशालाही त्याची जागा भरून काढता येणार नाही."

"माणसाची मुक्तता होईल तर ती फक्त बुद्धीच्या योगानेच!" पावेल दृढतापूर्वक म्हणाला.

"पण माणसांच्या अंगी शक्ती संचारते ती बुद्धीमुळे नव्हे!" रिबिन मोठ्याने म्हणाला. "त्याला शक्ती व प्रेरणा मिळते ती अंतःकरणापासून, मेंदूकडून नव्हे!"

बाहेर हे बोलणं चालू असतानाच आई नेहमीप्रमाणे प्रार्थना न करताच अंथरुणावर पडली. ती फार बेचैन झाली होती. रिबिन हा प्रथम तिला फार हुशार माणूस वाटला होता व त्याची तिच्यावर चांगली छाप पडली होती, पण आता तिचा त्याच्याविषयी फारच प्रतिकूल ग्रह बनला. त्याचं बोलणं ऐकत असतानाच ती स्वतःशी म्हणत होती, "नास्तिक! बंडखोर! असंच आहे तर याचं इथे येण्यावाचून काय अडलं होतं?"

बाहेर रिबिन शांतपणे व आत्मविश्वासाने बोलतच होता,

"हे पवित्र स्थान रिकामं ठेवता कामा नये. मानवी मनात ईश्वराचं जे स्थान आहे ती सर्वात नाजूक जागा आहे. तुम्ही तिथून देव काढून टाकलात तर तिथे ही एवढी भलीमोठी जखम झालेली तुम्हाला आढळेल. त्यासाठी आपल्याला काही तरी नवा धर्म, नवी निष्ठा प्रस्थापित केली



पाहिजे, पावेल! मानवाचा मित्र असलेला असा एखादा नवा देव आपल्याला निर्माण केला पाहिजे."

"मग येशू ख्रिस्त होताच की!" पावेल उद्गारला.

"पण येशू ख्रिस्त दुबळा होता. 'माझ्यापुढचा हा पेला मजपासून जाऊ द्या,' असे त्याने उद्गार काढले. तो सीझरची सत्ता मानीत होता. पण स्वतःच्या लेकरांवर कोणाही माणसाची सत्ता असणं हे देवाला कसं मान्य होईल? ईश्वर म्हणजे सर्वशक्तिमान. तो म्हणजेच सर्व शक्ती! तो आपल्या आत्म्याची विभागणी करून हा वाटा ईश्वराचा, हा भाग मानवाचा, असं कसं करू शकेल? शिवाय येशूख्रिस्ताने व्यापार, विवाहसंस्था वगैरेंनाही विरोध केला नाही. त्याने अंजिराच्या वृक्षालाही नाहकच दोष दिला. त्या झाडाला फळे येईनात हा काय त्या झाडाचा दोष होता? त्याचप्रमाणे माणसाच्या मनातून चांगुलपणा बाहेर पडला नाही तर तो काही त्याच्या आत्म्याचा दोष नव्हे. माझ्या मनात जे काही वाईट असेल ते त्या ठिकाणी कसं आलं? ते काय मीच तिथे ठेवलं का?"

बाहेरच्या खोलीत त्या दोघांचा कडाक्याचा वाद सुरू होता. वादाला चांगलेच तोंड लागले होते. पावेल खोलीत येरझारा घालीत असता त्याच्या पावलांचा आवाज येत होता. तो बोलू लागला म्हणजे त्याच्या आवाजापुढे इतर कसलाच आवाज येत नसे. पण रिबिन आपल्या संथ, खोल आवाजात बोलू लागला म्हणजे मात्र आईला घड्याळाच्या लंबकाचे हेलकावे व बाहेर घराच्या भिंतीवर होणाऱ्या बर्फवृष्टीचा आवाज स्पष्ट ऐकू येई.

रिबिन बोलत होता, "मी आगवाला आहे, तेव्हा मी माझ्या धंद्याच्या भाषेतच सांगतो. ईश्वर हा अग्नीच्या ज्वालेसारखा आहे अन् तो अंतःकरणात वास करतो. असं म्हटलंच आहे की, 'प्रथम शब्द उत्पन्न झाला व तो शब्द ईश्वर होता,' त्याचाच अर्थ असा की शब्द म्हणजे आत्मा."

"नाही, तो शब्द म्हणजे बुद्धी!" पावेल आग्रहपूर्वक म्हणाला.

"ठीक! तर मग ईश्वर अंतःकरणात आहे अन् बुद्धीतही आहे. पण चर्चमध्ये खात्रीने नाही! चर्च म्हणजे ईश्वराचं थडगं आहे."

हे ऐकत असताच आई निद्रावश झाली. नंतर रिबिन केव्हा गेला ते तिला कळलं नाही.

त्यानंतर रिबिन वारंवार तेथे येऊ लागला. तो येई तेव्हा पावेलचे कोणी

कॉमरेड्स तेथे असले तर तो गुपचाप एका कोपऱ्यात बसून त्यांचं बोलणं ऐकत राही. क्वचित् अधूनमधून 'ठीक! बरोबर!' असे उद्गार काढण्यापलिकडे तो त्यांच्या बोलण्यात भाग घेत नसे.

एकदा तो अचानकपणे बसल्या जागेवरूनच जमलेल्या लोकांच्याकडे दृष्टी वळवीत म्हणाला,

"आज जी परिस्थिती प्रत्यक्षात आहे तिच्याविषयी आपण बोललं पाहिजे; पुढे कधीकाळी काय होईल त्याविषयी बोलून काय फायदा? पुढे काय काय होणार आहे कुणास ठाऊक? एकदा लोकांना खरं स्वातंत्र्य प्राप्त झालं म्हणजे मग आपल्या हिताचं काय आहे हे तेच ठरवतील. त्यांनी न मागतासवरता आधीच पुष्कळ गोष्टी त्यांच्या डोक्यात भरवण्यात आल्या आहेत तेवढ्या पुरे आहेत. आता त्यांना स्वतःलाच विचार करू देण्याची वेळ आली आहे. कुणी सांगावं, त्यांना कदाचित् सर्वच जुन्या गोष्टींचा— जुनं जीवन व जुनं ज्ञान, सर्वांचाच त्याग करावासाही वाटेल! कदाचित् हे सर्व जुनं आहे ते चर्चमधील ईश्वराप्रमाणेच त्यांचं दुश्मन आहे हे त्यांचं त्यांनाच दिसून येईल! त्यांच्या हातात पुस्तकं देऊन ती त्यांना वाचू द्या म्हणजे ते स्वतःच त्यांच्या प्रश्नांची उत्तरं शोधून काढतील! बस्! तेवढं केलं की पुरे!"

पावेल अन् रिबिन हे दोघेच असले म्हणजे त्यांचा सारखा वाद सुरू असायचा. पण त्या वादात त्यांचा संयम कधीच सुटत नसे. आई अत्यंत उत्सुकतेने त्यांचं बोलणं ऐकत राही व त्यांचा प्रत्येक शब्द नीट ऐकून घेऊन त्याचा काही बोध होतो का हे समजून घेण्याचा प्रयत्न करी. कधीकधी तिला वाटे, हा रुंद खांद्यांचा न् काळी दाढीवाला माणूस उन् आपला मुलगा हे दोघेही आंधळे बनले असून काळोखात इकडेतिकडे चाचपडत त्यातूनच बाहेर पडण्याचा मार्ग शोधून काढण्यासाठी धडपडत आहेत. तिला आणखी वाटे, या काळोखातील चाचपडण्यात हाती येईल तो जिन्नस ते आपल्या अदृश्य बोटात पकडून ठेवीत आहेत, अन् एका जागेवरून दुसऱ्या जागी जाताजाता त्या वस्तू जमिनीवर पडून त्यांच्याच पायांखाली चिरडल्या जात आहेत! ते कुठल्यातरी वस्तूंवर जाऊन आदळत आहेत, चाचपडून पाहाताहेत व आपली निष्ठा व आशा न सोडता त्या वस्तू भिरकावून देऊन आपला शोध सुरू ठेवीत आहेत.

त्यांच्या कडाक्याच्या वादात ते काही भयंकर शब्द अशा स्पष्टपणे वापरीत की आरंभी ती त्या शब्दप्रयोगांनी घाबरून जाई, पण नंतर तिला सरावाने ते शब्द ऐकणंही अंगवळणी पडलं. तसले शब्द ऐकून घेण्याची व मनातल्या मनात त्यांचा प्रतिकार करण्याची तिला सवय झाली. कधीकधी ते ईश्वराचे अस्तित्व नाकारण्यासाठी जे शब्द उच्चारीत त्याच शब्दांमागे ईश्वरावरचा दृढ विश्वास दडलेला असल्याचं तिला आढळून येई. अशा वेळी ती एक विशिष्ट प्रकारचं, क्षमाशीलतेच्या भावनेनं भरलेलं मंद स्मित करी. या काळात रिबिनबद्दलचा तिचा प्रतिकूल ग्रह अजिबात नाहीसा झाला नाही, पण तरीसुद्धा त्या भावनेची धार मात्र पुष्कळच बोथट झाली.

दर आठवड्याला ती खोखोलसाठी पुस्तकं, धुतलेले कपडे, पोचवायला तुरुंगात जाई. एकदा तिला भेटीची परवानगी मिळाली. त्या भेटीनंतर घरी परतल्यावर ती ममतेच्या स्वरात सांगू लागली,

"त्याच्यात काडीइतकासुद्धा बदल नाही बघा! तिथेसुद्धा तो सर्वांशी मायेने वागतो अन् सगळेजण त्याच्याशी थट्टामस्करी करीत असतात. तिथलं जीवन खडतर आहे, अन् त्याचा त्याला भयंकर त्रास देखील होतोय, पण तो ते दुःख बाहेर अजिबात दिसू देत नाही पहा!"

हे ऐकून रिबिनने नेहमीप्रमाणे 'ठीक! बरोबर!' असा शेरा मारला व मग तो पुढे म्हणाला,

"दुःख हे जणु काय आपल्या कातडीप्रमाणेच आपल्याला चहूबाजूंनी वेष्टून घेत आहे अन् आपण त्याच्या आतच सांपडलेलो आहोत. या आवरणाचीही आपल्याला आता सवय झाली आहे. अर्थात् यात अभिमान बाळगण्याजोगं काहीच नाही. सगळ्यांच्याच डोळ्यांवर कुणी इतरांनी झापड बांधलेली असते अशातला भाग नाही! काहीजण स्वतःच आपले डोळे मिटून घेऊन आंधळे बनतात, त्याला कोय काय करणार? तेव्हा आपण मूर्ख असलो तर तोंडावर बळेच हसू आणून दुःख सहन करणं भागच आहे आपल्याला, नाही?"

## १२

दिवसेंदिवस व्लासोव कुटुंबाचे ते लहानसे जुनाट घर त्या वसाहतीतील लोकांचे अधिकाधिक प्रमाणात लक्ष वेधून घेऊ लागले. लोकांच्या या दृष्टीत काहीसा संशय व नकळत बनलेला प्रतिकूल ग्रह यांचा अंश होताच, पण

त्याचबरोबर एक प्रकारचा विश्वास व कुतूहलही जागृत झाले होते. मधूनच एखादा अनोळखी इसम पावेलकडे येई व भोवताली सावधगिरीने पाहून घेऊन हळूच त्याला विचारी, "असं पहा भाऊ, तुम्ही पुस्तकं वाचता अन् तुम्हाला कायदा समजतो, तेव्हा एवढं जरा समजावून सांगाल तर–"

अन् मग अशी विनंती करणारा तो इसम पोलिस वा कारखान्याचे चालक यांनी केलेल्या अन्यायाची कसली तरी हकीकत सांगे. बाब फार गुंतागुंतीची असेल तर पावेल त्या इसमाला शहरातील आपल्या ओळखीच्या एका वकिलाच्या नावे चिठ्ठी देऊन त्याच्याकडे पाठवी. पण बाब साधीच व स्वतः-च्या आवाक्यातील असेल तेव्हा पावेल स्वतःच ती समजावून देऊन त्यावर उपाय सुचवी.

अशा प्रकारे हळूहळू पावेल हा एक कळकळीचा तरुण कार्यकर्ता म्हणून तेथील लोकांना त्याच्याविषयी अदार वाटू लागला. त्यांना हे आढळून आलं की त्याचं बोलणं अगदी सरळ व साधं पण तितकंच निर्भिडपणाचं असे, तो डोळे व कान नेहमी उघडे ठेवून अत्यंत सूक्ष्म निरीक्षण करीत असे, कुठंही काही विसंगती व विरोध दिसला की तो निश्चयपूर्वक त्याचा खोलवर विचार करून त्याचं कारण शोधून काढी आणि सर्व माणसांना एकत्र आणणारे सूक्ष्म धागे सतत व सर्वत्र शोधून काढण्याचा त्याचा प्रयत्न असे.

नंतर मध्येच एक "दलदलीच्या कोपेक"चं प्रकरण उद्भवलं व त्या प्रकरणामुळे पावेलची प्रतिष्ठा व लोकांना त्याच्याविषयी वाटणारा आदर यात विशेषच वाढ झाली. हे प्रकरण असं घडलं.

तेथील कारखान्याच्या पलिकडे एका बऱ्याच मोठ्या भागात खूप चिखल न् गाळ साचला होता. त्यातच फर व बर्च वृक्षांची गर्दी व त्यांच्या पानांच्या पाचोळ्याचा कचरा यांची भर पडली होती. हा चिखलाचा भाग इतका मोठा होता की कारखान्याच्या बऱ्याच भागाभोवती त्याचा वेढाच पडला होता म्हटलं तरी चालेल. उन्हाळ्यात या घाणीतून दाट पिवळसर असे वाफेसारख्या वायूचे भपकारे बाहेर पडत अन् त्यातून उत्पन्न होणाऱ्या डास-मच्छरांचे थवे साऱ्या वसाहतीला ढगांप्रमाणे आच्छादून टाकीत. व त्यायोगे वस्तीत तापाची साथ पसरत जाई. हे चिखलाचे मैदान कारखान्याच्या मालकीचे होते व त्या सुमारास नवीनच आलेल्या डायरेक्टरने तेथील गाळ काढून टाकण्याचे ठरविले. तो गाळ काढल्याने त्यातून निघणाऱ्या कुजलेल्या अवशेषांचा जळणासाठी उपयोग करता येईल व साफ केलेल्या जमिनीचाही



उपयोग होईल असा या निर्णयामागील हेतु होता. परंतु आपण खरोखरी कामगारांच्या राहाणीची परिस्थिती व आरोग्य सुधारण्याच्याच हेतूने केवळ हे करीत अहोत अशी सबब पुढे करून त्या डायरेक्टर महाशयांनी असे फर्मान काढले की प्रत्येक कामगाराच्या पगारांतून दर रुबलमागे एक कोपेक* या चिखलसफाईच्या खर्चासाठी कापून घेण्यात यावा.

ही नोटिस लागताच कामगार एकदम खवळले. विशेष म्हणजे कारकुनांच्या पगारात ही कपात होणार नव्हती व फक्त आपल्यावरच तो बोजा लादला जाणार होता याची तर कामगारांना फारच चीड आली.

डायरेक्टर मजकुरांच्या नव्या हुकुमाची नोटिस ज्या शनिवारी लागली त्या दिवशी पावेल आजारीपणामुळे कामावर न जाता घरीच होता. त्यामुळे त्याला या कपातीविषयी बातमी मिळालीच नाही. दुसऱ्या दिवशी सिझोव व माखोतिन हे दोघे कामगार त्याच्या घरी आले व त्यांनी त्याला डायरेक्टरच्या नव्या हुकुमाची माहिती दिली. सिझोव हा फाउंड्रीत काम करणारा जुना कामगार होता व माखोतिन हा एक उंचापुरा मजबूत बांध्याचा मेकॅनिक होता.

सिझोव जरा ऐटीत सांगू लागला, "आम्ही जुन्या कामगारांनी एकत्र येऊन या बाबतीत चर्चा केली. त्यात असं ठरलं की त्यांच्या वतीने आम्ही दोघांनी तुमची भेट घ्यावी आणि डास मारण्यासाठी कामगारांकडून सक्तीने पैसे वसूल करण्याचा डायरेक्टरला अधिकार देणारा एखादा कायदा आहे का याबाबत तुमच्याकडून माहिती मिळवावी. तुम्ही जाणते कार्यकर्ते आहात म्हणून तुमचा सल्ला पाहिजे."

नंतर माखोतिन सांगू लागला, "आता हेच पहा, चार वर्षांपूर्वी या हरामखोर लुटारूंनी स्नानगृह बांधण्यासाठी म्हणून आमच्याकडून पैसे वसूल केले, एकूण अडतीसशे रुबल जमले होते. पण त्यांचं काय झालं याचा पत्ताच नाही अन् स्नानगृहाचाही नाही!"

डायरेक्टरने नव्या वसुलीबद्दल काढलेला हुकूम कसा अन्यायाचा आहे व दलदलीचे मैदान साफ करण्यात कंपनी फायदाच कसा उकळणार आहे हे पावेलने त्या दोघांना समजावून दिले व ते दोघे कंपनीवर आग पाखडतच बाहेर पडले.

---

***रुबल व कोपेक**: रशियन नाणी. एका रुबलचे १०० कोपेक होतात.

ते निघून गेल्यावर आई हसत हसत पावेलला म्हणाली, "ही चांगली जुनी वयस्क माणसं सुद्धा तुझा सल्ला विचारू लागली की!"

तिच्या उद्गारांवर काहीच न बोलता पावेल खाली बसून काही लिहू लागला. नंतर अल्पावधीतच तो आईला म्हणाला, "माझं एक काम करशील आई? शहरात जाऊन हा एवढा कागद देऊन यायचा. एवढंच काम आहे, करशील?"

"धोक्याचं आहे का?" आईने विचारले.

"हो. आहे खरं धोक्याचं. आमचं वर्तमानपत्र जिथे छापलं जातं तिथे पाठवतो आहे मी तुला. दलदलीच्या कोपेकचं हे प्रकरण कसंही करून येत्या अंकात यायलाच पाहिजे."

"बरंय. जाते मी."

ही आईवर मुलाने सोपवलेली पहिलीच कामगिरी होती, व त्याने तिच्यावर विश्वास दाखवून तिला जे सांगितलं होतं त्यामुळे तिला हर्ष झाला होता.

बाहेर जाण्याचे कपडे करीत असता ती म्हणाली,

"मला हे सर्व नीट कळलं आहे बघ, पाशा! हा निव्वळ लुटारूपणा आहे, लुटारूपणा! बरं. हे कोणाला द्यायचं म्हणालास? काय नाव त्या माणसाचं? येगोर इवानोविचच ना?"

आईला घरी परतायला चांगल्या तिन्ही सांजा झाल्या. तो शरिराने थकली होती, पण तिचं मन उल्हसित होतं.

"मला सांशा भेटली होती." ती पावेलला सांगत होती. "तिने तुला नमस्कार सांगितला आहे बरं का. अन् हा तुझा येगोर इवानोविच तर अगदीच साधा अन् आनंदी प्राणी आहे. त्याच्या बोलण्याची पद्धतही मजेदारच आहे, नाही?"

"तुझं मत त्या लोकांबद्दल अनुकूल झालं हे पाहून बरं वाटल मला," पावेल मृदु स्वरात म्हणाला.

"ते सगळे अगदी साधेभोळे लोक आहेत, पाशा. अन् लोक उगाच मोठेपणाचा आव आणीत नाहीत तेव्हा मला ते आवडतात. शिवाय त्यांना तुझ्याविषयी सुद्धा कितीतरी आदर वाटतो!"

सोमवारी सुद्धा पावेलचं दुखणं पार गेलं नव्हते त्यामुळे तो घरीच होता. दुपारी जेवणाच्या सुटीत फ्योदोर माझिन धावतच पावेलकडे आला.



तो दमल्यामुळे धापा टाकीत होता, पण त्याच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडत होता.

"चल ऊठ, पावेल!" तो ओरडूनच सांगू लागला. "सगळ्या कारखान्याने बंद पुकारलं आहे. त्या कामगारांनीच मला तुझ्याकडे पाठवलं. सिझोव अन् माखोतिन यांचं म्हणणं पडलं की इतर कुणापेक्षाही तूच कामगारांना सगळं नीट मजावून देऊ शकशील. चल. तिथे काय झालं आहे बघ तरी एकदा!"

पावेल काही न बोलता कपडे घालू लागला.

"बाया सुद्धा बाहेर पडल्या आहेत अन् त्यांच्या आरडाओरडाने असा गोंगाट माजलाय की बस!" माझिन पुढे सांगत होता.

"मी सुद्धा येते तुमच्याबरोबर," आई म्हणाली. "काय प्रकार आहे, पाहू तरी. मी येतेच!"

"बरं. चल तर!" पावेल म्हणाला.

ते रस्त्याने भराभर चालू लागले. आईला तर इतकी उत्कंठा वाटू लागली होती की ती श्वास रोखूनच चालत होती. आज काही तरी फारच महत्त्वाची घटना घडणार असून ती आपल्याला पहायला सापडणार या कल्पनेने ती भारावली होती.

ते तिघेजण कारखान्यापाशी पोचले तेव्हा बाहेर फाटकाशीच स्त्री कामगारांचा एक मोठा जमाव उभा होता व त्या घोळक्यांतल्या बाया सारख्या ओरडत, भांडत होत्या. ते तिघेजण आत आवारात शिरले तो सभोवताली सर्वत्र प्रचंड गर्दी व खळबळ माजलेली त्यांना आढळली. आईने त्या जमावाकडे पाहिले तेव्हा तिला असे दिसले की, सर्वांच्या नजरा एकाच दिशेला, कारखान्यातील फाउंड्रीच्या भिंतीकडे वळलेल्या होत्या. त्या ठिकाणी जुन्या लोखंडाचा एक ढीग होता. त्यावर सिझोव, माखोतिन, व्यालोव आणि आणखी पाचसात प्रमुख कामगार विटाच्या भिंतीला टेकून उभे होते व त्यांच्याकडेच सर्वांचे लक्ष वेधलेले होते.

"हा पहा व्लासोव आला!" कुणीतरी ओरडले.

"कोण, व्लासोव का? त्याला येऊ द्या इकडे!"

"शांत रहा! शांत रहा!" अनेकजण एकदम ओरडले.

जवळूनच कुठून तरी रिबिनचा धीरगंभीर आवाज ऐकू आला.

"आपला लढा एका कोपेकसाठी नाही! आपला लढा न्यायासाठी आहे,

काय समजलात? आपला एक कोपेक आपल्याला फार प्रिय आहे असातला भाग नाही, आपला प्रत्येक कोपेक हा इतरांच्या कोपेकपेक्षा जास्त गोल व सुंदर असतो असंही नाही. मात्र तो अधिक वजनदार असतो, कारण डायरेक्टरच्या रुबलपेक्षाही आमच्या कोपेकमध्ये अधिक मानवी रक्त मिसळलेलं असतं, तो निढळाच्या घामाचा कोपेक असतो! आमच्या कोपेकची किंमत त्यातील धातूची किंमत नाही, ती त्या रक्ताची, न्यायाची किंमत आहे!"

त्याचे हे शब्द जमावाच्या कानी पडले व त्यावर अनेक धन्योद्‌गार निघाले,

"शाबास, रिबिन! अगदी बरोबर बोललास!"

"वाहवा! वा रे आगवाला रिबिन!"

कुणीतरी पुनः ओरडला, "व्लासोव आला बघा!"

या सगळ्या घोषणा, गर्जना व गलबला यांचा आवाज इतका मोठा होत गेला की कारखान्यातील यंत्रांचा खडखडाट, इंजिनच्या वाफेचा फूत्कार, तारांची घरघर हे सगळे आवाज त्या गलबल्यात ऐकू येईनासे झाले. अनेक लोक निरनिराळ्या बाजूंनी धावत येऊन तिथे जमू लागले, हातवारे करू लागले व एकमेकांना चेव आणणाऱ्या शब्दांचे प्रहार करू लागले. फार दिवसांपासून आतल्या आत धुमसणाऱ्या असंतोषाने आता एकदम पेट घेतला होता व तो बाहेर पडू पहात होता. तो असंतोष आता विजयोन्मादाने वाऱ्यावर सैरावैरा पसरत होता, त्याचे पंख मोठमोठे होत दूरवर पसरत होते, लोकांच्या मनावरील त्याची पकड घट्ट होत होती आणि तो सूडाच्या भावनेच्या ज्वाळेच्या रूपाने प्रकट होत असताना लोकांमध्ये वैरभाव पसरवीत होता. जिकडे तिकडे धुळीचे व धुराचे लोट पसरले होते, घामाने डबडबलेले चेहरे भावनोत्कटतेने चमकत होते व त्या काळवंडलेल्या चेहऱ्यांवर डोळे व दात चकाकत होते.

सिझोव व माखोतिन ज्या ढिगाऱ्यावर उभे होते तिथेच पावेलही चढला व त्याने उच्च स्वरात बोलायला आरंभ केला.

"कॉमरेड्‌स!" तो ओरडून म्हणाला.

आईचे लक्ष त्याच्यावर खिळले होते. त्याचा चेहरा फिकट पडला होता त्याचे ओठ थरथरा कापत होते, हे तिच्या ध्यानात आलं. तिला नकळतच ती गर्दीतून घुसून पुढे सरकू लागली.

"ए बाई! धक्के देऊ नकोस!" बाजूचे लोक तिच्यावर खेकसले.



ती पुढे सरकत होती तसे तिलाही धक्के मिळत होते, पण तेवढ्याने तिची गती थांबली नाही. आपल्या खांद्यांनी व कोपरांनी लोकांना बाजूला सारीत ती पुढे जात होती. आपल्या मुलाच्या अगदी जवळ जाऊन उभं राहाण्याच्या अनिवार इच्छेपुढे या धक्काबुक्कीचं तिला काहीच वाटत नव्हतं

पावेलने "कॉमरेड्‌स" हा शब्द उच्चारला तेव्हा त्याच्या दृष्टीने त्या शब्दात फार खोल अर्थ भरलेला होता व तो शब्द उच्चारताना त्याला होणाऱ्या हर्षापायी त्याचा गळा दाटून आला होता. त्याला अशी प्रबळ इच्छा होत होती की समता व न्यायाच्या सुखस्वप्नांनी ज्वलंत बनलेलं आपलं हृदय या लोकांना अर्पण करून टाकावं!

तो पुनः उद्‌गारला, "कॉमरेड्‌स!"

त्या शब्दाच्या प्रत्येक ध्वनीच्या उच्चारातून त्याला नवी शक्ती व नवा दुर्दम्य उत्साह प्राप्त होत होता.

तो पुढे बोलू लागला, "हे सर्व कारखाने, ही चर्चेस, या सर्व इमारती आपणा कामगारांच्या श्रमांनीच बांधल्या जात असतात! निरनिराळ्या साखळ्या तयार करणं, टाकसाळीत पैसे पाडणं, ही कामं तरी कोण करतो? आपणच ना? सर्व जगाला खाऊ घालण्याचं अन् जिवंत ठेवण्याचं, पाळण्यापासून थडग्यापर्यंत जगाचे सर्व व्यवहार चालू ठेवण्याचं कार्य करणारी जिवंत शक्ती म्हणजे आपणच!"

"अगदी बरोबर!" रिबिनने ओरडून साथ दिली.

"पण कुठेही अन् केव्हाही पहा," पावेल पुढे बोलू लागला. "कामाला नेहमी आपणच पुढे असतो अन् त्याचा काही मोबदला मिळण्याबाबत मात्र आपली पाळी सर्वांच्या शेवटी! आपली पर्वा आहे कुणाला? आपल्याला कोणी माणूस म्हणून तरी विचारतो का? नाही! कोणीच नाही!"

"कोणी नाही!" लोकांनी त्याला साद घातली.

पावेलच्या भाषणाचा ओघ जसा पुढे जात चालला तसं त्याचं भाषण अधिक सुबोध, स्पष्ट व संथ होऊ लागलं आणि त्याचं भाषण ऐकण्यात मग्न झालेल्या त्या लोकसमुदायाला एकच एक विराट रूप आल्याचं दृश्य तेथे दिसू लागलं. हजारो मस्तके असलेलं एकच एक शरीर असं स्वरूप त्या समुदायाला प्राप्त झालं. ते हजारो लोक आपल्या सहस्रावधी नेत्रांनी त्याच्या चेहऱ्याकडे पहात होते व त्याच्या मुखातून बाहेर पडणारा प्रत्येक शब्द आपल्या कर्णसंपुटात साठवून ठेवीत होते.

"आपण सगळेजण एकमेकांचे भाईबंद आहोत, कॉमरेड्स आहोत, आपल्या हक्कांसाठी लढण्याच्या एकाच इच्छेने बांधल्या गेलेल्या एकाच कुटुंबांचे घटक व परस्परांचे निकटचे दोस्त आहोत, ही जाणीव जोपर्यंत आपल्या रोमरोमात भिनत नाही तोपर्यंत आपली परिस्थिती सुधारून घेण्याच्या कामी आपल्याला यश येणं शक्य नाही."

"मुद्यावर ये की!" आईच्या जवळच उभा असलेला एकजण घोगऱ्या आवाजात ओरडला.

"गप बैस. मध्ये बोलू नकोस!" दोन निरनिराळ्या दिशांनी त्याला दटावण्या मिळाल्या.

लोकांच्या काळवंडलेल्या चेहऱ्यावर एक प्रकारचा अविश्वास दिसू लागला, पण तरीसुद्धा अनेक लोक विचारपूर्वक नेत्रांनी पावेलच्या चेहऱ्याचे निरीक्षण करीत होते.

"हा सोशालिस्ट दिसतो रे! पण डोकं आहे बरं का!" एकजण म्हणाला.

"पुष्कळच धीटपणाने बोलतो आहे, नाही?" आईच्या बाजूला उभा असलेला एक उंच एकाक्ष कामगार आईचे लक्ष वेधण्यासाठी तिला कोपराने ढोशीत म्हणाला.

"कॉमरेड्स!" पावेल बोलत होता. "अपल्याला कोणी मदत करणार नाही. आपण स्वतःच्या पायांवर उभे राहिलो तरच आपला तरणोपाय आहे हे ओळखण्याची आता वेळ आली आहे. प्रत्येकजण सर्वांसाठी, अन् सर्वजण प्रत्येकासाठी, म्हणजे सगळेजण एकमेकांसाठी – हेच आपलं ब्रीदवाक्य! आपल्या शत्रूला धूळ चारायची असेल तर हेच तत्त्व अचरणात आणण्याचा आपण निर्धार केला पाहिजे."

"हा सांगतो ते पूर्णपणे खरं आहे, मित्र हो!" माखोतिन हवेत हातवारे करीत ओरडला.

"तर आता डायरेक्टर साहेबांना इथेच बोलावू या!" पावेलने सुचवलं.

जणु काय एखादा झंझावाती वाऱ्याचा झोत सुटावा तशी ती कल्पना त्या समुदायात तडकाफडकी पसरली. त्यांच्यात एकच खळबळ माजली व अनेक लोक एकाच वेळी ओरडले, "बरोबर! डायरेक्टर साहेबांना बोलवा!"

"त्याला बोलवायला आपले प्रतिनिधी पाठवा!"

आई आणखी पुढे घुसली व आपल्या मुलाकडे टक लावून पाहू लागली. तिच्या चेहऱ्यावर त्याच्याविषयीचा अभिमान स्पष्ट दिसत होता. तिथे त्या



जुन्या वजनदार कामगार मंडळीत तिचा मुलगा उभा होता व त्याला सर्वजण मान देत होते, त्याचे म्हणणे ऐकून त्याप्रमाणे वागण्याची तयारी दर्शवीत होते. शिवाय तो इतरांप्रमाणे चिडून व शिवीगाळ करून न बोलता शांतपणे बोलत होता यामुळेही तिला समाधान वाटत होतं.

लोक ओरडत होते, शिव्याशाप उच्चारीत होते, त्याचा जणु एखाद्या पत्र्याच्या छपरावर गारांचा वर्षाव व्हावा तसा आवाज येत होता. पावेल उंचावर उभा राहून खाली त्या लोकांवर नजर टाकीत होता व त्याचे मोठाले डोळे कशाचा तरी शोध काढीत असल्यासारखे फिरत होते.

"प्रतिनिधी निवडायचे?"

"मी सिझोवचं नाव सुचवतो!"

"मी व्लासोवचं!"

"रिबिनलाही पाठवा! सडेतोड उत्तरं द्यायला तो पाहिजेच!"

तेवढ्यात जमावात काहीतरी खळबळ माजली.

"अरे! हे तर डायरेक्टर साहेब!"

"हो! ते स्वतःच इकडे येत आहेत पहा!"

आणि मग लोकांनी डायरेक्टर महाशयांना पुढे येण्याला वाट करून दिली. त्यांचा बांधा चांगला उंच होता, चेहरा लांबट होता व त्यावर टोकदार दाढी होती.

"हं, बाजूला व्हा! मला जाऊ द्या!" डायरेक्टर महाशय आपल्या मार्गातून कामगारांना बाजूला हटवण्याच्या उद्देशाने लोकांच्या अंगाला स्पर्श न होईल अशा बेताने हात करीत म्हणाले. पुढे जात असता ते कामगारांवर तीक्ष्ण नजर टाकून त्यांचे चेहरे न्याहाळीत होते. त्यांची लोकांवर अधिकार गाजविण्याची ऐट त्या नजरेत स्पष्ट होत होती.

लोक डोक्यांवरून टोप्या काढून मस्तक वाकवून डायरेक्टर साहेबांना अभिवादन करीत होते, पण साहेब मात्र त्या अभिवादनांचा स्वीकार न करताच जोराने पुढे चालत होते. जिकडे तिकडे शांतता व सामसूम प्रस्थापित झाली होती आणि काही तरी भयंकर चूक करताना सापडलेल्या मुलांच्या चेहऱ्यावर दिसावी तशी पश्चात्तापाची चिन्हे कामगारांच्या चेहऱ्यांवर व्यक्त होत होती. ते आपल्या चेहऱ्यांवर बळेच हसू आणून आपल्या मनातला गोंधळ व भीती लपविण्याचा प्रयत्न करीत होते.

डायरेक्टर साहेब आईच्या जवळून पुढे गेले तेव्हा त्यांनी कडक नजरेने

तिचा चेहरा न्याहाळला व ते लोखंडाच्या ढिगाऱ्यासमोर येऊन उभे राहिले. कोणीतरी त्यांना वर घेण्यासाठी हात पुढे केला पण तिकडे दुर्लक्ष करून ते स्वतःच उडी मारून वर चढले आणि पावेल व सिझोव यांच्यासमोर उभे ठाकले. तेथूनच त्यांनी जोरात विचारले,

"हे सगळे लोक इथे कशाला जमले आहेत? तुम्ही लोकांनी काम का थांबवलंत?"

काही क्षण तिथे स्तब्धता पसरली. शेतात धान्याची कणसं डुलावी तशी जमावातील लोकांची डोकी हालत होती.

सिझोवने हातांतली टोपी हालवली, खांदे उडवले व तो मान खाली करून उभा राहिला.

"माझ्या प्रश्नाचं उत्तर द्या!" डायरेक्टर महाशय खेकसले.

पावेल पुढे सरसावून डायरेक्टरच्या जवळ गेला आणि सिझोव व रिबिन यांच्याकडे अंगुलिनिर्देश करीत मोठ्या आवाजात म्हणाला,

"आमच्या कामगारबंधूंनी आम्हा तिघांना प्रतिनिधी म्हणून निवडलं असून तुम्ही कोपेक कापून घेण्याचा हुकूम काढला आहे, तो मागे घेण्याची तुमच्याकडे मागणी करण्याचा आदेश दिला आहे."

"का?" डायरेक्टरने पावेलकडे न पाहताच विचारले.

"असे पैसे कापून घेणे हे आमच्या मते अन्यायाचं आहे म्हणून!" पावेलने जोरात उत्तर दिले.

"अस्सं! हा चिखल न् गाळ उपसून टाकण्याची माझी योजना कामगारांची स्थिती सुधारण्यासाठी नसून त्यांची पिळणूक करण्यासाठीच काढलेली आहे असं तुम्हाला वाटतं, होय? काय, असंच ना?"

"हो. असंच." पावेल उत्तरला.

"अन् तुलाही असंच वाटतं?" डायरेक्टरने रिबिनकडे वळून विचारले.

"आम्हाला सगळ्यांना तसंच वाटतं!"

"अन् तुला रे?" डायरेक्टरने सिझोवला सवाल केला.

"मला सुद्धा तसंच वाटतं. आमचे कोपेक कापले जाऊ नयेत अशीच आमची सर्वांची इच्छा आहे."

कसंबसं इतकं बोलून सिझोवने जणु आपण काही अपराधच केला आहे अशा प्रकारे मान खाली घातली व बळेच स्मित केले.

डायरेक्टर महाशयांनी समग्र जमावावरून एकदा दृष्टी फिरवली व खांदे



उडवले. नंतर पावेलकडे वळून त्यांनी त्याच्यावर आपली तीक्ष्ण नजर रोखली.

"तू थोडंबहुत शिक्षण घेतलेला चांगला हुशार माणूस दिसतोस. अन् तरी तुला सुद्धा या चिखल उपसण्याच्या योजनेपासून होणारा फायदा दिसू नये म्हणजे आश्चर्यच नाही का?"

सर्वांना ऐकू जाईल अशा मोठ्या आवाजात पावेल उत्तरला, "कारखान्याने हा चिखल स्वतःच्या खर्चाने उपसून काढला तर त्यापासून होणारे फायदे सर्वांना नीट समजतील!"

"कारखाना म्हणजे काय धर्मादाय खातं समजलात की काय तुम्ही?" डायरेक्टर मजकूर चिडून उद्‌गारले व त्यांनी फर्मान सोडले, "तुम्ही सगळे ताबडतोब जाऊन कामाला लागा असा माझा हुकूम आहे, समजलात!"

एवढं बोलून डायरेक्टर महाशय सावधगिरीने त्या ढिगाऱ्यावरून खाली उतरले. असं करतांना त्यांनी कुणाकडेही न पहाताच पाय खाली ठेवले.

डायरेक्टरचा हा हुकूम ऐकताच कामगारांत खळबळ माजली, लोकांचा असंतोष व संताप अधिकच वाढला.

"काय गडबड आहे?" डायरेक्टर साहेबांनी थांबून विचारले.

"सगळीकडे एकदम स्तब्धता पसरली. क्षणा दोन क्षणातच दूरून कोठून तरी त्या स्तब्धतेचा भंग करणारा आवाज आला, "तुम्हीच कामाला लागा न् कारखाना चालवा! जा!"

तुम्ही लोकांनी पंधरा मिनिटांच्या आत पुनः काम सुरू केलं नाही तर मी सर्वांना दंड ठोठावीन, समजलात!" डायरेक्टरने चिडून जोरात सुनावले.

एवढं बोलून तो जसा आला तसाच गर्दीतून वाट काढीत परत जाऊ लागला. पण तो परत जात असता जमावाचा गलका सुरू झाला व तो जसा दूर गेला तसतसा त्या गलक्याचा आवाजही मोठा होत गेला.

"अरे, त्यांना थांबवून त्याच्याशी बोलणं करा की!"

"हा यांचा न्याय! नशीब आमचं!"

नंतर काही लोक पावेलकडे वळून ओरडले,

"अहो प्रोफेसर! आता काय करायचं बोला!"

"अहो विद्वान! मघाशी भाषण तर जोरदार केलं, पण डायरेक्टर-साहेब आल्यावर कुठे गेली होती ती सगळी विद्वत्ता?"

"ए व्लासोव! आता काय करायचं बोल की!"
लोकांचं ओरडणं व गलका वाढू लागला तेव्हा पावेल म्हणाला,
"कॉमरेडस! डायरेक्टर आपला कोपेक – कपातीचा हुकूम रद्द करीपर्यंत आपण कामावर जाऊ नये अशी माझी सूचना आहे."
लोकांचे मतप्रदर्शनाचे आवाज अधिकच जोरात ऐकू येऊ लागले.
"हा आम्हाला काय मूर्ख समजतो की काय?"
"काम बंद ठेवायचं म्हणजे संपच होईल की!"
"निव्वळ एक कोपेकसाठी?"
"पण संप करणं म्हणजे काय चूक आहे की काय?"
"चांगलं. म्हणजे आम्हाला सगळ्यांनाच तो बडतर्फ करील की!"
"पण आपण संप केला, तर त्याला कामाला दुसरे कामगार कुठून मिळणार आहेत थोडेच!"
"अं! त्यात काय? त्याला लागतील तितकी माणसं मिळतील!"
"कोण? संपफोडयेच ना?"

## १३

पावेल खाली उतरला व आईजवळ येऊन उभा राहिला. जमावातल्या लोकात खळबळ माजली होती. प्रत्येकजण आवेशाने बोलत होता. सगळीकडे आरडाओरड सुरू होती.

"या लोकांना संपावर आणणं म्हणजे अशक्य कोटीतलं काम!" रिबिन पावेलकडे येत म्हणाला, "ते लोभी तर आहेतच, पण तितकेच भेकड आहेत. फारच झालं तर तीनशे लोक तुम्हाला साथ देतील. हा नुसता उकिरडा आहे, उकिरडा! एका फावड्याने हा एवढा ढीग उचलणे अशक्य आहे..."

पावेल काहीच बोलला नाही. सगळ्या जमावाचा जणु एक भलामोठा चेहरा त्याच्या पुढे हालत होता. सगळ्यांच्या नजरा त्याच्याचवर खिळल्या होत्या. त्याचं अंतःकरण धडधडत होतं. तापलेल्या जमिनीवर पावसाचे शिंतोडे पडले तर ते जसे अल्पावधीत दिसेनासे होतात तद्वत्‌च आपले सगळे शब्द वाऱ्यावर विरून गेले व त्यांचा मागमूसही उरला नाही, असं त्याला वाटत होतं.

पावेल घरी पोचला तेव्हा त्याचं शरीर गळून गेल्यासारखं झालं होतं व तो खिन्न झाला होता. आई व सिझोव त्याच्यामागून चालत होते, पण रिबिन मात्र त्याच्या बाजूनेच चालत त्याच्या कानाशी सारखं काही तरी पुटपुटत होता.

"तुमचं भाषण असतं चांगलं, पण ते अंतःकरणाला जाऊन भिडत नाही. तेच तर मुख्य आहे! लोकांच्या हृदयाला जाऊन भिडेल असं बोललं पाहिजे. नेमकी तिथेच ठिणगी पडली तरच त्याचा उपयोग! लोकांना नुसतं मुद्देसूदपणे बोलून पटवून देऊन काम भागत नाही. जोडा पायाला बरोबर येत नाही – फार घट्ट, फार अरुंद आहे तो!"

"आता आपण म्हाताऱ्यांनी राम म्हटलेलंच चांगलं, पेलाग्येया!" सिझोव आईला सांगतं होता. "आता हा नव्या पिढीचा जमाना आहे! आपलं आयुष्य किती निराळं होतं, तुमचं नी माझं. सदा खाली मान घालून चालायचं, अन् वरचे लोक सांगतील ते निमूटपणे ऐकायचं! अन् आता? आता सगळं निराळंच! एकतर हे नवे तरुण पिढीचे लोक अधिक शहाणे तरी झाले असले पाहिजेत, किंवा त्यांची भयंकर चूक तरी होत असावी. पण ते निराळे आहेत खास! ही कालची पोरं पहा, पण त्या डायरेक्टरसाहेबांशी कशी जणु काय तो यांच्या बरोबरीचाच, अशा रुबाबाने बोलत होती! ... बरं, मी आता येतो. पुनः भेटेन. पावेल, तू लोकांची बाजू घेऊन लढतोस हे फार चांगलं आहे. परमेश्वर तुम्हाला यश देवो! कदाचित अजूनही मार्ग सांपडेल तुम्हाला. देव तुम्हाला सुखी ठेवो! बराय!"

तो नमस्कार करून निघून गेला.

"जा. मर जा!" रिबिन पुटपुटला. "याच्यासारखे लोक म्हणजे माणूस सुद्धा म्हणवण्याच्या लायकीचे नाहीत! निव्वळ चिक्कण माती न् चुना! कुठे भेगा पडल्या असतील त्या भरून काढण्यापुरताच उपयोग यांचा! तुझं नाव शिष्टमंडळासाठी कोणी सुचवलं ते पाहिलंस का पावेल? तू सोशलिस्ट आहेस न् चळवळ्या आहेस म्हणून ज्यांनी बोभाटा चालवला आहे, तेच लोक नेमके तुझं नाव सुचवायला पुढे आले! बेटे स्वतःशी म्हणत असावेत, याला कामावरून बडतर्फ केलं म्हणजेच चांगली उद्दल घडेल!"

"त्यांच्या दृष्टीने पाहता योग्यच केलं त्यांनी!" पावेल म्हणाला.

"वा! लांडगे सुद्धा एकमेकांना फाडून खातात तेव्हा त्यांच्या दृष्टीने ते योग्यच करतात!"

रिबिनचा चेहरा लालबुंद झाला होता. तो चिडला होता हे उघडच होते.

"नुसत्या शब्दांनी लोक ऐकणार नाहीत. त्यासाठी त्यागच केला पाहिजे. हे शब्द स्वतःच्या रक्ताने भिजवून काढले पाहिजेत..."

सारा दिवस पावेल बेचैन होऊन भटकत होता. त्याच्या चेहऱ्यावर थकवा दिसत होता व तो सारखा खिन्न होता. त्याच्या डोळ्यांची जळजळ होत होती व कशाचा तरी शोध घेत उसल्यासारखी त्याची नजर भिरभिरा फिरत होती.

त्याची ती अस्वस्थता आईच्या नजरेतून सुटली नाही. तिला न राहवून तिने विचारलं, "तुला काय होतंय, पाशा?"

"डोकेदुखीने हैराण झालो आहे ग."

"असं? मग तू स्वस्थ पडून राहा कसा. मी आता जाऊन डॉक्टरला घेऊन येते."

"नको नको, आई, त्याची जरूर नाही!" तो घाईघाईने म्हणाला. नंतर तो दबलेल्या आवाजात म्हणाला, "मी फार लहान न् फार दुबळा आहे ग! लोकांचा माझ्यावर विश्वास बसत नाही. त्यांना माझं म्हणणं पटत नाही, याचाच अर्थ ते कसं पटवून द्यावं हे मला समजलेलं नाही. म्हणून मला स्वतःचीच चीड आली आहे बघ."

ती त्याच्या विचारमग्न चेहऱ्याकडे न्याहाळून पाहात त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न करू लागली. ती अत्यंत प्रेमळ स्वरात त्याला म्हणाली, "थोडा धीर धर बाळ. आज त्यांना समजलं नाही तरी उद्या पटेल त्यांना!"

"होय. पटायलाच हवं त्यांना."

"तुझं म्हणणं बरोबर आहे हे मला सुद्धा पटलं आहे, बाळ."

पावेल तिच्याजवळ जाऊन तिला म्हणाला, "तू कित्ती कित्ती चांगली आहेस, आई!"

एवढंच बोलून तो आईपासून दूर झाला. त्याच्या या शब्दांनी आईला आश्चर्याचा धक्का बसला. त्याचा प्रेमळपणा तिला नवीनच होता. तो अखंड तसाच राहावा अशी तिने मनोमन करुणा भाकली व आपले हात छातीशी घट्ट दाबून ती तेथून निघून गेली.

त्या रात्री तिला गाढ झोप लागली होती, पण पावेल मात्र बिछान्यात वाचत पडला होता. तेवढ्यात गुप्त पोलिस खात्याच्या लोकांची धाड आली. सारं घर, छप्पर, बाग, सगळीकडे झडती घेऊन त्यांनी सर्व सामान अस्ताव्यस्त करून टाकलं. पूर्वीचाच पीतवर्ण अधिकारी यावेळीही बरोबर होता व



त्याची वागणूकही पहिल्या खेपेसारखीच उर्मटपणाची व अपमानकारक होती. उपरोधिक व मर्मभेदक उद्गारांनी त्यांच्या अंतःकरणाला घरं पडतील असं बोलण्यातच त्याला पुरुषार्थ वाटत होता. आई शांतपणे एका कोपऱ्यात बसून होती व पावेलकडे टक लावून पहात होती. तो आपले भाव व्यक्त होऊ न देण्यासाठी झटत होता. पण तो अधिकारी हसू लागला की पावेलचे हात वळवळू लागत. पोलिसांचे थट्टेचे उद्गार ऐकले की आत्मसंयमन करणं त्याला किती कठीण जात होतं हे आईला दिसत होतं. पण पहिल्या झडतीच्या वेळी तिला हे सगळं जितकं जड गेलं व जशी भीती वाटली तशी या वेळी वाटली नाही. करड्या रंगाचे पोषाख घालून रात्रीच्या वेळी धाड घालणाऱ्या या लोकांविषयीचा तिचा द्वेष आता फार वाढला होता व या द्वेषाच्या भावनेत तिचं भय गडप झालं होतं.

"हे लोक आज धरून नेणार मला!" पावेल संधी साधून आईच्या कानात कुजबुजला.

मान खाली वाकवून हळू आवाजात ती पुटपुटली, "ओळखलं आहे मी ते."

त्याने त्या दिवशी कामगारांपुढे केलेल्या भाषणाबद्दल त्याला तुरुंगात जावं लागणार हे तिने ओळखले. पण तो जे काही बोलला ते सर्वांनाच पटलं होतं. तेव्हा ते त्याच्या रक्षणासाठी त्याच्या पाठीशी उभे राहाणार व त्यामुळे त्याची लवकरच सुटका करावी लागणार असाही तिला पक्का विश्वास वाटत होता.

पावेलला जवळ घेऊन मनसोक्त रडून घ्यावं, असं तिला तीव्रतेनं वाटत होतं, पण ते व्हावं कसं? तो अधिकारी तिच्या बाजूलाच उभा राहून डोळे बारीक करून तिच्याकडे पाहात होता. त्याचे ओठ व त्याच्या मिशा थरथरत होत्या व हा आपल्या रडण्याओरडण्याची व विनवण्यांचीच वाट पाहात असावा असं तिला वाटलं. तिने आपली सर्व शक्ती एकवटून पराकाष्ठेचा संयम केला व पावेलचा हात हातात घेऊन प्रेमळपणे दाबला. शक्य तितक्या दबलेल्या आवाजात ती त्याला म्हणाली, "बरं आहे, पाशा! तुला लागणाऱ्या गरजेच्या सगळ्या वस्तू घेतल्यास ना?"

"सगळं काही घेतलं. अन् धीर सोडू नकोस बरं का आई."

"देव तुला सुखी ठेवो बाळ."

पोलिस पावेलला घेऊन गेल्यावर आई एका बाकावर बसली व हळूहळू

हुंदके देऊ लागली. पूर्वी कधीकाळी तिचा पती बसत असे तशीच भिंतीला पाठ टेकून ती बसली होती. आत्यंतिक दुःख व असहायतेची जाणीव यांमुळे ती बधिर झाली होती. ती मान टाकून मुसमुसून रडत होती. त्या हुंदक्यांत ती आपल्या जखमी अंतःकरणाची सर्व व्यथा ओतीत होती. त्याचवेळी बारीक मिशा व आनंदाने चमकणाऱ्या बारीक डोळ्यांचा तो पीतवर्ण चेहराही सारखा तिच्या मनश्चक्षूंपुढे उभा राहून तिला भेडसावीत होता. आईपासून मुलांची ताटातूट करणाऱ्या, तेही केवळ तो न्यायासाठी लढतो म्हणून त्यांना धरून नेणाऱ्या या दुष्ट लोकांची तिला मनस्वी चीड व तिरस्कार वाटत होता व त्याच भावनेने तिचं अंतःकरण व्यापून टाकलं होतं.

बाहेर गारठा होता व खिडकीवर पावसाच्या थेंबांचा आवाज होत होता. करड्या रंगाचा पोषाख, लांबलांब हात, डोळे नसलेले लाल चेहरे, असल्या विलक्षण आकृती आपल्या घराभोवती घिरट्या घालीत पहारा करीत आहेत व त्यांच्या बुटांची खाडखाड दुरून ऐकू येत आहे असा तिला अनेकदा भास झाला.

ती मनाशी म्हणाली, "मला सुद्धा त्यांनी पकडून नेलं असतं तर किती बरं झालं असतं!"

पहाटे कामगारांना कामावर येण्याची सूचना देणारा भोंगा झाला. आज त्या भोंग्याचा आवाज नेहमीपेक्षा हळू, घोगरा अन् अनिश्चित असल्यासारखं आईला वाटलं.

रिबिन दार उघडून आत आला. दाढीच्या केसावर साचलेले पावसाचे थेंब पुसून टाकीत त्याने विचारलं, "पावेलला पकडून नेलं का त्यांनी?"

"हो ना! दुष्ट मेले!" आईनं सुस्कारा टाकून उत्तर दिलं.

"हं. ते आधीच ओळखायला पाहिजे होतं म्हणा!" तो मंदस्मित करून उद्गारला. "माझ्या घराची सुद्धा झडती घेतली त्यांनी. सगळीकडे बोटांनी चाचपून पाहिलं. पुष्कळशा शिव्यांचा भडिमार केला. पण त्यापेक्षा जास्त त्रास मात्र दिला नाही. बरं पण पावेलला ते घेऊन गेलेच तर! म्हणजे डायरेक्टरने नुसतं डोळ्यांनी खुणवावं अन् पोलिसांनी माना डोलवाव्या व त्याने सांगितलेल्या माणसाला पकडून बंद करून टाकावं! एकमेकांना चांगलीच साथ देतात तर! एकाने लोकांना पकडून ठेवावं अन् दुसऱ्याने सगळं लुबाडून घ्यावं! खासा न्याय!"

"तुम्ही लोकांनी पावेलच्या सुटकेसाठी खटपट केली पाहिजे!" आई



उठून जरा जोरातच म्हणाली, "त्याने जे काही केलं, ते सगळ्यांच्याचसाठी होतं!"

"कोणी खटपट करायला पाहिजे म्हणता?"

"सगळ्यांनीच!"

"हं! तुम्हाला असं वाटलं तर! पण ते कधी व्हायचं नाही!"

तो जोराने हसला व तेथून निघून गेला. त्याचे ते निराशापूर्ण उद्गार मात्र तिच्या व्यथित अंतःकरणाला अधिकच व्यथित व दुःखी करून गेले.

"त्या दुष्टांनी त्याला मारहाण केली न् त्याचा छळ केला तर!"

जणु काय पावेलचं शरीर जखमांनी भरून गेलं आहे ही कल्पना वारंवार तिला भेडसावू लागली व त्याच काळजीनं तिचं अंतःकरण व्यापून टाकलं. तिच्या डोळ्यांचीही आग होऊ लागली.

सारा दिवस ती बसून राहिली. तिने चूल पेटवली नाही. जेवण केलं नाही. फार काय चहासुद्धा घेतला नाही. बरीच संध्याकाळ होऊन गेल्यावर तिने कसाबसा पावाचा एक तुकडा घशात ढकलला. रात्री बिछान्यावर अंग टाकल्यावर तिला वाटलं, की तिचं आयुष्य कधी नव्हे इतकं असहाय अन् एकाकी झालं होतं. आता लवकरच काहीतरी भव्य न् महत्त्वाचं घडून येणार आहे अशा आशेवर गेली काही वर्षे जगण्याची तिला संवय झाली होती. तिच्या सभोवताली उत्साही न् गडबड्या लोकांची सारखी काही तरी धामधूम सुरू असायची. आणि त्या नव्या ध्येयनिष्ठ पण संकटमय कार्याची प्रेरक शक्ती असलेल्या तिच्या पुत्राचा गंभीर चेहरा सतत तिच्या डोळ्यांपुढे असायचा. पण आता तो निघून गेल्यावर ते सगळंच जीवन अदृश्य झालं होतं!

## १४

दुसरा दिवस अन् रात्रही कशीबशी पार पडली. वेळ जाता जात नव्हता. तिसरा दिवस तर फारच जड गेला. कोणीतरी येईल असं आईला सारखं वाटत होतं, पण कोणीच आलं नाही. संध्याकाळही येऊन गेली. रात्रीचा काळोख वाढू लागला. थंडगार पावसाचा मारा भिंतीवर होत होता. त्याचा भेसूर आवाज येत होता. कारखान्याच्या भोंग्यात वारा शिरून सूंऽ आवाज करीत होता. जमिनीच्या खाली काहीतरी थरथरत होतं. छपरावरून

पावसाच्या पागोळ्या गळत होत्या. त्यांचा आवाज घड्याळाच्या टकट्या आवाजात मिसळून जात होता. सबंध घरच जणु काय हळूहळू डोलत आहे असं तिला वाटत होतं. दुःखामुळे सर्व वातावरण मृतवत् व निर्जीव भासत होतं.

अचानक खिडकीवर थाप वाजली. पुन्हा तशीच थाप! आईला अशा गोष्टींची सवय होती. त्यामुळे ती घाबरली नाही. उलट तिला तो आवाज ऐकून आनंदच झाला. कसल्यातरी अंधुक आशेचे किरण तिच्या अंतःकरणात डोकावले व ती लगबगीने उठली. खांद्यावरून शाल लपेटून घेऊन तिने दार उघडलं.

सामोइलोव आत आला. त्याच्या मागोमाग दुसरा एकजण आत आला. त्याने मात्र कोटाची कॉलर वर चढवून व टोपी कपाळावर ओढून घेऊन चेहरा झाकण्याचा प्रयत्न केलेला दिसत होता.

"आम्ही आल्यामुळे तुमची झोपमोड तर झाली नाही?" सामोइलोवने नमस्कार चमत्कार काही न करताच प्रश्न केला. आजचं त्याचं वागणं नेहमीपेक्षा निराळं होतं. त्याच्या आवाजातून चिंता व दुःख व्यक्त होत होतं.

"नाही. मी झोपले नव्हतेच," आई म्हणाली व ती उत्सुकतेने त्यांच्याकडे पाहू लागली.

सामोइलोवच्या साथीदाराने टोपी काढून आपला जाडजूड हात हस्तांदोलनासाठी पुढे केला तेव्हा त्याचा श्वास जोराने चालत होता.

"काय आई? ओळखलंत का मला?" जणु काय जुनाच परिचय असल्याप्रमाणे त्याने विचारलं.

"कोण तुम्ही? येगोर इवानोविच?" आई आनंदाने उद्‌गारली.

"अगदी तोच!" मस्तक लववून तो उत्तरला. त्याचे डोके भलेमोठे होते व त्याने चर्चमधील प्रार्थनासंगीतवाल्या गायकासारखे लांब केस राखलेले होते. त्याच्या चेहऱ्यावर स्मित विलसत होते व तो प्रेमळपणाने आईकडे पाहात होता. तो निब्बर चहादाणीसारखा वाटोळा होता, त्याची मान जाडजूड होती व हात आखूड होते. त्याचा चेहरा तुकतुकीत होता, त्याचा श्वासोच्छ्वास जोराने सुरू होता व त्याची छाती भात्यासारखी खाली वर होत होती.



"जरा त्या खोलीत बसा. तंवर मीही कपडे बदलून आलेच," आई म्हणाली.

"तुम्हाला काहीतरी विचारायचं आहे," आईकडे नजर टाकून सामोइलोव अधीरतेने म्हणाला.

येगोर इवानोविच पलिकडच्या खोलीत गेला व तिथून बोलू लागला, "निकोलाय इवानोविच आजच सकाळी तुरुंगातून सुटून आला, आई–"

"अस्स! तो तुरुंगात गेल्याचं ठाऊकच नव्हतं मला!" आई मध्येच म्हणाली.

"दोन महिने न् अकरा दिवस. खोखोल अन् पावेल दोघंही भेटले त्याला. दोघांनीही नमस्कार सांगितलाय तुम्हाला. शिवाय पावेलने सांगितलं आहे की तुम्ही काळजी बिलकुल करू नका. पावेलनं सांगितलं की त्याने जो मार्ग घेतला आहे त्या मार्गाने जाणाऱ्या प्रत्येकाला मधून मधून ही तुरुंगातील विश्रांती घ्यायलाच हवी. आपल्या मायबाप सरकारच्या कृपेने ती विश्रांती चुकविणं शक्य नाही! बरं. पण आता मी म्हणालो त्या कामाचं सांगतो. काल किती लोकांना पकडलं हे ठाऊक आहे का तुम्हाला?"

"म्हणजे? पावेलखेरीज आणखीसुद्धा कुणाला धरून नेलं की काय त्यांनी?" तिने आश्चर्याने विचारले.

"पावेल एकूणपन्नासावा होता!" येगोर इवानोविच मध्येच संथपणे म्हणाला. "अन् कारखान्याचे मालक आणखी दहाबरा लोकांना अटक करवतील असा संभव आहे. त्यापैकी एक हा गृहस्थ असणार!"

"होय. मलाही बहुधा जावं लागणार!" सामोइलोव उदासपणे म्हणाला.

का कुणास ठाऊक पण ते ऐकून आईला थोडं हायसं वाटलं. तिच्या मनात एक असा विचार डोकावून गेला की पावेल निदान एकटा तरी असणार नाही.

आईचे कपडे बदलून होताच ते दोघे बसलेल्या खोलीत ती आली व त्यांच्याकडे प्रसन्न मुद्रेने पाहात तिने स्मित केले. ती म्हणाली,

"इतक्या लोकांना ज्या अर्थी पकडलं आहे त्या अर्थी फार दिवस काही ठेवणार नाहीत, नाही का?"

"अर्थात् नाही!" येगोर म्हणाला. "अन् आपण जर त्यांचा डाव हाणून पडला तर मग त्यांच्या फजितीला पारावार उरणार नाही. म्हणजे असं की हे लोक तुरुंगात गेल्यावर जर आपण कारखान्यात पत्रकं वाटायचं

बंद केलं तर गुप्त पोलिस नक्कीच त्या गोष्टीचा पावेल न् तुरुंगांतल्या इतर कॉमरेड्सच्या विरुद्ध पुरावा म्हणून उपयोग करतील!"

"म्हणजे? हे कसं?" आईनं घाबरून विचारलं.

"अं, अगदी सरळ आहे ते!" येगोर संथपणे सांगू लागला. "कधी कधी हे गुप्त पोलिस सुद्धा डोकं वापरतात. म्हणजे असं पहा की पावेल मोकळा होता तोपर्यंत पत्रकं वाटली जात होती; आता पावेल तुरुंगात डांबला जाताच पत्रकं वाटली जायचं थांबलं! याचाच अर्थ असा की तोच या पत्रकांचा जनक असला पाहिजे, नाही का? अन् मग ते सगळ्यांचा छळ सुरू करतील. या गुप्त पोलिसांचं काम असं असतं की ते नुसतं जिवंत खाऊन टाकतात!"

"हं, आलं ध्यानात," आई खिन्नपणे उद्गारली. "पण आता आपण काय करायला हवं?"

"बहुतेक सगळ्यांनाच तर धरून नेलंय त्यांनी. बदमाष लेकाचे!" सामोइलोव चिडून म्हणाला. "आपल्याला नुसतं चळवळीसाठी म्हणूनच नाही, तर आपल्या कॉमरेड्सच्या बचावासाठी सुद्धा आपलं कार्य चालू ठेवायलाच हवं."

"अन् परिस्थिती अशी आहे की काम करायला कुणी नाही!" येगोर किंचित् हसून म्हणाला. "अगदी उत्तमपैकी असं भरपूर साहित्य, पत्रकं वगैरे तयार आहेत—सगळी माझीच कामगिरी आहे ती. पण ती पत्रकं कारखान्यात वाटली कशी जाणार हाच मुख्य प्रश्न आहे."

"कारण असं की आता बाहेरच्या फाटकावरच त्यांनी प्रत्येकाची झडती घेणं सुरू केलं आहे." सामोइलोवने सांगितलं.

आपल्याकडून कसल्या तरी मदतीची यांना अपेक्षा असावी हे आता आईच्या ध्यानात आलं. तिने घाईघाईनं विचारलं, "मग हे जमावं कसं?"

सामोइलोव दरवाजात उभा राहिला व त्याने विचारलं, "कारखान्यात खाण्याचे जिन्नस विकायला नेणारी ती फेरीवाली कोर्सुनोवा तुमच्या माहितीची आहे ना?"

"बरं मग. तिचं काय?"

"तिला विचारून पहायचं. ती कबूल झाली तर काम होऊन जाईल."

"नाही रे बाबा! तिच्यानं होणं शक्यच नाही ते!" आपला नकार हात जोराने हलवूनही व्यक्त करीत आई म्हणाली, "ती म्हणजे साऱ्या मुलखाची



बडबडी! तिच्याजवळ ती पत्रकं माझ्याकडून—या घरातून—गेली ही बातमी त्यांना लागली म्हणजे—"

आई क्षणभर थांबली व एकदम कसली तरी कल्पना सुचून ती म्हणाली, "तुम्ही मजजवळच द्या ती पत्रकं. मी करीन त्यांची व्यवस्था. काहीतरी मार्ग शोधून काढीन मी. मी कोर्सुनोवाला सांगेन की मला तुझ्या मदतीला घे म्हणून. नाहीतरी मला पोटासाठी काहीतरी केलंच पाहिजे. मीच कारखान्यात फराळाचे पदार्थ नेत जाईन. मी सगळं नीट करीन ते."

तिने दोन्ही हात छातीवर दाबून धरले व आपण सगळं काम अगदी बिनबोभाट पार पाडू अशी त्यांना खात्री दिली. शेवटी ती म्हणाली, "पावेल तुरुंगात असला तरी त्याचे हात तुरुंगाबाहेरही पोंचू शकतात हे समजू दे तरी त्यांना. बघूच दे त्यांना ते!"

तिघेही आता उत्तेजित झाले होते.

"फारच छान, आई! तुमची ही कल्पना फारच झकास आहे बघा! तुम्हाला कल्पना करवणार नाही इतका आनंद झाला आहे आम्हाला!" येगोर उत्साहाने हातावर हात चोळीत म्हणाला.

सामोइलोवही हात चोळीत म्हणाला, "हे काम साधलं म्हणजे मग मी अगदी सहज झोपी जावं तितक्या आनंदाने तुरुंगात जाईन!"

येगोर घोगऱ्या आवाजात म्हणाला, "तुम्ही म्हणजे स्त्रीत्वाचं उत्कृष्ट प्रतीक आहात, आई!"

आईने मंदस्मित केलं. कारखान्यात पत्रकं वाटण्याचं काम चालू राहिलं तर मग पावेलवर त्याची जबाबदारी टाकणं अधिकाऱ्यांना शक्य होणार नाही हे उघड होतं. आपण ही कामगिरी नक्की चांगल्या रीतीने पार पाडू असा तिला आत्मविश्वास वाटत होता व त्यामुळे तिला अत्यंत हर्ष झाला होता.

"तुझी तुरुंगात पावेलशी भेट होईल तेव्हा त्याला सांग की तुझ्या आईसारखी आई मिळायला भाग्य लागतं!" येगोर सामोइलोवला उद्देशून म्हणाला.

"हो. आता लवकरच भेट होईल त्याची!" सामोइलोव हसत हसत म्हणाला.

"जे जे करणं जरूर आहे ते सगळं मी नक्की करीन असं जरूर सांगा त्याला—अगदी जरूर जरूर सांगा बरं का?" आई काकुळतीने म्हणाली.

"पण त्यांनी सामोइलोवला तुरुंगात पाठवलंच नाही तर?" येगोरने विचारलं.

"मग अर्थात्‌च इलाज नाही!" आई उद्‌गारली.

ते दोघेही जोराने हसू लागले. आईलाही आपण काय बोललो हे लक्षात येऊन जरा वरमल्यासारखं झालं व तिनेही बळेच चेहऱ्यावर हसू आणलं.

"आपल्याच काळजीने चूर झालं म्हणजे दुसऱ्यांच्या दुःखाचा विचार राहात नाही!" आई नजर खाली लावून म्हणाली.

"अं, साहाजिकच आहे ते!" येगोर उद्‌गारला. "अन्‌ हे पहा, पावेलबद्दल तुम्ही बिलकुल काळजी करू नका. तो तुरुंगातून प्रकृती सुधारूनच बाहेर येईल बघा. तुरुंगात चांगली विश्रांती मिळते अन्‌ अभ्यास करायलाही वेळ मिळतो. नाहीतरी आमच्यासारख्या लोकांना बाहेर या दोन्ही गोष्टी मिळण्याची मारामारच! मी स्वतः तीनदा तुरुंगात जाऊन आलो अन्‌ तिन्ही वेळा मनाने न्‌ अंतःकरणाने ताजातवाना होऊन आलो! अर्थात्‌ तुरुंगात जाणं म्हणजे काही मोठं सुखाचं आहे असा याचा अर्थ नाही!"

त्यांच्या चेहऱ्याकडे स्निग्धपणे पाहात आईने विचारलं, "तुम्हाला श्वासोच्छ्‌वास करताना त्रास होतो का?"

"त्याला तसेच काही विशेष कारण आहे!" येगोरने उत्तर दिले व तो पुढे म्हणाला, "बरं तर. मग सगळं ठरलं ना आई? उद्या आम्ही तुम्हाला पत्रकं आणून देतो, अन मग पुनः आपल्या यंत्राची चक्रं फिरू लागतील! हजारो वर्षांचा अंधःकार ती भरडून काढतील. भाषण स्वातंत्र्याचा विजय असो! मातृहृदयाचा जयजयकार असो! धन्य मातृहृदय!"

नंतर त्या दोघांनी आईशी हस्तांदोलन करून तिचा निरोप घेतला. जातेवेळी सामोइलोव म्हणाला, "मी माझ्या आईला सुद्धा कधी हे काम करण्याबद्दल म्हणू शकलो नसतो!"

"सगळ्याच आयांना हळूहळू समजू लागेल बरं!" त्याचं सांत्वन करण्याचा उद्देशाने आई म्हणाली.

ते दोघे बाहेर पडल्यावर तिने आतून दार लावून घेतलं व खोलीच्या मध्यभागी खाली बसून ती गुडघे टेकून ईश्वराची प्रार्थना करू लागली. बाहेरच्या पावसाचा आवाज जणु तिच्या प्रार्थनेला साथच देत होता. तिची प्रार्थना पूर्णपणे निःशब्द होती. पावेलमुळे ज्यांच्याशी तिचा परिचय झाला होता त्यांच्याविषयीची काळजी तिचे अंतःकरण व्यापून टाकीत होती.



तिची नजर समोरच्या मूर्तीकडे होती, पण तिच्या मनश्चक्षूंपुढे पावेलच्या कॉमरेड्‌सचेच चेहरे उभे राहात होते. ते सर्वजण परस्परांशी इतके निगडित असूनही कसे निरनिराळे, एकेकटे दिसत होते!

सकाळी लवकर उठून आई कोर्सुनोवाकडे गेली. कोर्सुनोवाने नेहमीप्रमाणेच तोंडाळपणा सुरू केला, पण तिच्या बोलण्यात आईविषयी सहानुभूती मात्र खास होती. आपल्या तेलकट हाताने आईच्या खांद्यावर व पाठीवर थोपटीत ती बोलू लागली, "बाई ग! इतकं मनाला लावून घेऊन कसं चालेल? असा धीर सोडून कसं चालेल? तुझ्या मुलाला त्यांनी धरून नेलं, एवढंच ना! त्यात लाजिरवाणं असं काही थोडंच आहे! पूर्वी ते चोर दरोडेखोरांना तुरुंगात टाकीत, पण आता न्याय मागणाऱ्यांनाच धरून नेतात! कदाचित्‌ पावेल जे बोलायला नको ते बोललाही असेल, पण त्याने जे केलं ते सगळ्यांच्या हितासाठीच केलं, हे सगळेजण जाणून आहेत. तू बिलकुल काळजी करू नकोस. लोक तोंडाने बोलले नाहीत तरी चांगलं काय अन्‌ वाईट काय यातला फरक सगळ्यांनाच कळतो. मी तुला भेटायला येणारच होते, पण वेळच झाला नाही ग! सारा दिवस नुसता हे जिन्नस रांधायचे अन्‌ ते नेऊन विकायचे! पण इतकं करूनही एक पैसा जवळ असेल तर शपथ! येतील त्या पैशाला हजार वाटा फुटतात! जो येतो तो पैसाच मागतो. गुळाच्या ढेपेला मुंगळे लागावे तसे टपूनच बसलेले असतात जसे काही! जिवाचा आटापीटा करून दहा रुबल जमवावे की आलाच कुणीतरी उपटसुंभ ते उपटून न्यायला! हा बायकांचा जन्मच मेला वाईट! देवा! पुनः कधी मला बायकांच्या जन्माला घालू नकोस रे बाबा! एकटं राहावं, तर जगायचंच कशाला? अन्‌ कुणा पुरुषाची सोबत धरावी तर तिकडूनही ते जसा सूड उगवतात!"

तिची बडबड मध्येच थांबवून पेलाग्येया म्हणाली, "मला तुझ्या कामात मदतनीस म्हणून घेशील का असं विचारायला आले होते मी!"

"म्हणजे? ते कशासाठी?" मरियाने विचारलं.

पेलाग्येयाने तिची समजूत घातल्यावर मरिया कबूल झाली.

"वा! एवढंही करणार नाही का मी?" ती म्हणाली. "माझा नवरा मारायला येई तेव्हा तूच मला लपवून ठेवायची ते आठवतं ना तुला? मग मी नको आता तुला मदत करायला? मी नक्कीच तुझं भुकेपासून रक्षण करीन. तुझा पोरगा पकडला गेला तो सर्वांच्या कल्याणासाठीच. तेव्हा

सगळयांनी तुला मदत करायलाच हवी. खरंच तो फार चांगला आहे, सगळेच तसं म्हणतात, अन् सगळयांनाच तो पकडला गेल्याचं वाईट वाटतं. माझ्यावर विश्वास ठेव तू. या धरपकडीनं त्या मेल्या अधिकाऱ्यांचं मुळीच कल्याण होणार नाही बरं! आत्ताच कारखान्यात काय चाललं आहे पहा म्हणावं. त्या मेल्यांना वाटतं, एका माणसाच्या पायावर वार करून पाय मोडला की लगेच तो धावायचा थांबेल म्हणून! पण होतं असं की दहा लोकांवर हल्ला केला तर शंभर माणसं खवळून त्यांच्यावर उलट हल्ला चढवतात!"

या संभाषणातून निष्पन्न झालं ते हे की दुसऱ्या दिवशी कारखान्यात जेवणाच्या सुटीत मरियाने केलेले जिन्नस विकायला पेलाग्येया बसलेली आढळली, अन् मरिया स्वतः बाजारपेठेत जाऊन विक्री करू लागली.

## १५

नवीन फेरीवाली आल्याचं कामगारांच्या ताबडतोब लक्षात आलं.

"काय, धंद्याला सुरवात केली वाटतं? छान!" काहीजण आईला म्हणाले.

काहीजण तिच्याजवळ जाऊन पावेलची लवकरच सुटका होईल असं सांगून तिला धीर देऊ लागले. काहीजण तिच्याशी सहानुभूतीचे चार शब्द बोलले. काहीजण सरळ उघडपणे मालकाला व गुप्त पोलिसांना शिव्या देऊ लागले. ते आपल्याच मनातले बोलतात, हे पाहून आईला बरं वाटलं. काहीजण असेही होते की त्यांना तिच्याकडे पाहून सूडाचा आनंद झाल्यासारखं दिसत होतं. इसाइ गोर्बोव नावाचा टाइमकीपरचं काम करणारा इसम त्यातलाच होता. तो दातओठ खाऊन तिला म्हणाला, "मी गव्हर्नर असतो तर तुझ्या पोराला फासावरच लटकावलं असतं. लोकांची दिशाभूल करण्याबद्दल तेच शासन करायला पाहिजे त्याला!"

आईच्या काळजात चर्र झालं. पण इसाइला काहीच उत्तर न देता तिने त्याच्या बसक्या व डाग असलेल्या चेहऱ्यावर एक दृष्टिक्षेप टाकला व ती उसासा टाकून खाली पाहू लागली.

कारखान्यात सर्वत्र खळबळ माजल्याचं दिसत होतं. कामगारांचे लहानलहान घोळके जमून हळूहळू चर्चा करीत होते. मुकादम लोक व्यग्र



चित्ताने इकडे तिकडे फिरताना दिसत होते. शिव्याशाप आणि उपहासात्मक हास्य ऐकू येत होतं.

तेवढयात दोन पोलिस शिपाई सामोइलोवला पकडून तिच्या समोरून घेऊन गेले. त्याने एक हात पाटलोणीच्या खिशात घातला होता व दुसऱ्या हाताने तो आपल्या पिंगट केसांची झुलपं मागे सारीत होता.

सुमारे शंभर कामगारांचा घोळका त्याच्या मागोमाग चालत होता. ते लोक पोलिसांवर शिव्याशापांचा व उपरोधिक उद्‌गारांचा वर्षाव करीत होते.

"काय, फिरायला निघालास वाटतं, सामोइलोव?" कोणीतरी ओरडलं.

"अरे बाबा, ते आजकाल आपल्याला मोठ्या मानमरातबाने वागवू लागले आहेत! फिरायला चाललो तरी पुढे मागे शिपायांचं संरक्षण मिळतं!" दुसरा एकजण उद्‌गारला.

तिसरा एक उंच, एकाक्ष, कामगार संतापाने ओरडला, "चोरांना पकडून आजकाल खिसे गरम होत नाहीतसं दिसतंय! म्हणूनच प्रामाणिक लोकांना पकडायचं सत्र सुरू केलंय त्यांनी!"

जमावातून एकाचा आवाज आला, "पकडायचंच तर निदान रात्रीच्या वेळी पकडण्याइतका सभ्यपणा सुद्धा नाही लेकांच्या अंगी! म्हणूनच दिवसाढवळ्या निर्लज्जपणे ही कामं करतात बेटे! हरामखोर कुठचे!"

पोलिसांनी भुवया चढवल्या व आपल्याला मिळणाऱ्या शिव्या जणु आपण ऐकल्याच नाहीत असा बहाणा करीत ते भराभर पावलं उचलू लागले.

समोरून तीन कामगार मिळून एक भला मोठा पत्रा घेऊन येत होते. ते सरळ पोलिसांच्या अंगाशी भिडून खेसकले, "दूर व्हा! रस्ता सोडाल की नाही हो महाशय!"

सामोइलोवने आईच्या जवळून जाताना मान हलवून तिला अभिवादन केले. तो हसत हसत पुटपुटला, "आम्ही निघालो, बरं का!"

तिने काही न बोलता मानेनेच त्याच्या नमस्काराचा स्वीकार केला. हे असले उमद्या वृत्तीचे, प्रामाणिक तरुण हसत हसत तुरुंगाची वाट धरतांना पाहून तिला त्यांच्याविषयी कौतुक व आदर वाटत होता. तिचे मातृहृदय त्यांच्याविषयीच्या प्रेमाने व सहानुभूतीच्या भावनेने उचंबळून येत होतं.

कारखान्यातून परतल्यावर उरलेला सारा दिवस ती मरियाकडेच होती व तिच्या तोंडची बडबड ऐकून घेत तिच्या कामात मदत करीत होती.

बऱ्याच उशीरा, अंधार पडल्यावर ती घरी गेली तेव्हा ते रिकामं घर तिला उदास न् भकास वाटू लागलं. बराच वेळ ती उगाच इकडून तिकडे येरझारा घालीत होती, तरी तिच्या चित्ताला स्वस्थता लाभत नव्हती व काय करावं हे तिला सुचत नव्हतं. रात्र झाली तरी येगोरने आणून देतो म्हणून सांगितलेलं साहित्य आणून दिलं नव्हतं. म्हणून ती चिंतातुर झाली होती.

बाहेर जोराने बर्फ पडत होतं. त्यातलं काही बर्फ खिडकीच्या तावदानावर थोडा वेळ चिटकून राहत होतं व मग वितळून जाऊन त्याचे ओघळ खाली वाहू लागत होते. आईच्या मनात पावेलविषयी विचार येत होते...

थोड्या वेळाने अगदी सावधपणे, हळूच दारावर वाजवलेली टिचकी तिला ऐकू आली. आईने जवळजवळ धावतच जाऊन कडी काढली. दार उघडून साशाने आत प्रवेश केला. आईने बरेच दिवसात तिला पाहिलं नव्हतं. म्हणून आज ती अंगाने पुष्कळच भरल्यासारखी तिला दिसली.

"या, अशा आत या!" आईने तिचे स्वागत केलं. कोणीतरी आलं आहे अन् आता रात्रीचा काही वेळ तरी आपल्याला एकटं वाटणार नाही, या विचाराने तिला बरं वाटत होतं. ती साशाला म्हणाली, पुष्कळ दिवसात दिसलाच नाहीत तुम्ही. कुठे बाहेरगांवी गेला होतात?"

"नाही. तुरुंगात गेले होते," साशा स्मित करून म्हणाली. "निकोलाय इवानोविच न् मी बरोबरच पकडले गेलो. तो आठवतो का तुम्हाला?"

"आठवतो तर!" आई उत्तरली, "कालच मला येगोर इवानोविचने त्याची सुटका झाल्याचं सांगितलं. पण तुमच्याबद्दल ठाऊक नव्हतं मला. तुम्ही तुरुंगात गेल्याचं कोणीच बोललं नाही मजजवळ."

"अं. त्यात काहीच बिघडलं नाही. पण आता येगोर इवानोविच इथे येण्यापूर्वीच मला हे कपडे बदलले पाहिजेत." एवढं बोलून साशाने भोवताली सर्वत्र नजर टाकली.

"हो, खरंच. तुम्ही पार भिजून गेल्या आहात की!"

"मी पत्रकं आणली आहेत—"

"होय? मग द्या ती लवकर! द्या, द्या!" आई अधीरपणे जवळजवळ ओरडूनच म्हणाली.

साशाने कोटावरचा पट्टा मोकळा करून स्वतःचं शरीर गदगदा हलवलं. तों झाडाची पानं भराभर गळून पडावी तसे अनेक कागद खाली आले.



ते सगळे कागद उचलून घेत असता आई हसून म्हणाली, "तरीच मी म्हटलं की तुम्ही एवढ्या लठ्ठ कशाने दिसू लागल्या! म्हटलं यांचं लग्न होऊन दिवस बिवस गेले आहेत की काय? अबब! किती ही पत्रकं आणलीत तरी! अन् चालत आला नाही ना?"

"हो, चालतच आले न् काय!" साशा म्हणाली. ती आता पुनः उंच न् किडकिडीत दिसू लागली होती. आईने तिच्याकडे पाहिलं तेव्हा तिच्या ध्यानात आलं की तिचे गाल बसले होते व त्यामुळे तिचे डोळे मोठे दिसत होते. डोळ्याभोवती काळी वर्तुळेही उठलेली दिसत होती.

"सुटून आल्यावर थोडी तरी विश्रांती घ्यायचं सोडून हे कशाला करीत बसलात तुम्ही?" आईने सुस्कारा टाकीत व मस्तक हलवीत विचारलं.

"हे करायलाच हवं!" हे बोलताना साशा कापत होती. "पण पावेलबद्दल सांगा मला. त्याला पकडलं तेव्हा तो घाबरला तर नाही ना?"

हे विचारताना साशा आईकडे न पाहतच बोलत होती. तिने मान खाली घातली होती व कापऱ्या बोटांनी ती केस सारखे करीत होती.

"काही विशेष नाही!" आई म्हणाली. "तो तसा कमकुवतपणा दाखवील अशी भीती बाळगण्याचं कारण नाही."

"तो चांगला सशक्त आहे का?" साशाने मृदु स्वरात विचारलं.

"त्याला आजार कसा तो माहीत नाही," आई म्हणाली. "पण तुम्हाला चांगलंच कापरं भरलं आहे की! थांबा, मी तुम्हाला चहा देते न् काही खायलाही देते."

"फार बरं होईल ते. पण इतक्या रात्रीची तुम्हाला तसदी द्यायचं जिवावर आलं आहे. त्यापेक्षा मीच करते चहा."

"वा! तुम्ही इतक्या दमून गेल्या आहात अन् तरी तुम्हीच करणार वाटतं?" आई प्रेमळ दटावणीच्या सुरात म्हणाली. नंतर ती उठून स्वयंपाकघरात जाऊन चहासाठी शेगडी पेटत घालू लागली. तिच्यापाठोपाठ साशाही उठून आत गेली व बाकावर बसून डोक्याच्या मागे हात ठेवून बोलू लागली.

"तुरुंगवासात माणूस थकतं. मुख्य म्हणजे तिथला निरुद्योगीपणा! ते रिकामपणच फार जिवावर येतं. बाहेर कितीतरी कामं करायची असताना पिंजऱ्यात कोंडलेल्या प्राण्यासारखे दिवस काढायचे, हे फारच कठीण जातं!"

"अन् या सगळ्याचं फळ कोण देणार?" आईने विचारलं नंतर एक

उसासा टाकून तिनेच त्या प्रश्नाचं उत्तर देऊन टाकलं. ती म्हणाली, "परमेश्वरच त्यांचं फळ देईल, पण बहुधा तुमचा त्याच्यावरही विश्वास नसेलच."

"नाही," साशाने मान हलवून उत्तर दिलं.

"पण ते कसं शक्य आहे?" आई आवेशाने बोलली. मग कोळशाचे हात पुसून ती दृढतापूर्वक म्हणाली, "तुमचा कशावर विश्वास आहे, हेच तुम्हाला माहीत नाही. परमेश्वरावर विश्वस नसता तर हे असलं जीवन जगणं तुम्हाला कसं शक्य झालं असतं?"

बाहेर व्हरांड्यात कुणाची तरी पावलं वाजली व कुणी हळू आवाजात पुटपुटल्याचाही आवाज आला. आई दचकून उठली. साशाही लगबगीने उठून हळूच म्हणाली, "थांबा, दार नका उघडू. पोलिस असले तर सांगायचं की तुमची व माझी काहीच ओळख नाही, मी वाट चुकून आत शिरले अन् दारातच मला घेरी आली. मग माझे कपडे तुम्ही बदलले, तेव्हा तुम्हाला हे कागद सापडले. आलं ना लक्षात?"

"वा! असं काय म्हणून सांगू मी?" आई कळवळून म्हणाली.

"जरा थांबा!" साशा दाराला कान लावून म्हणाली. "बाहेर कदाचित् येगोर आला असावा!"

तो येगोरच होता. तो भिजून ओलाचिंब झाला होता व थकल्यामुळे धापा टाकीत होता.

"चहा तयारच आहे वाटतं! छान!" येगोर आत प्रवेश करताच म्हणाला. "अशावेळी चहा पाहिजेच, नाही का आई? अन् तू हजर आहेसच वाटतं, साशा?"

अंगावरचा ओव्हरकोट हळूच काढून ठेवीत असता तो सारखा बोलत होता व त्याच्या जड श्वासोच्छ्वासाचा आवाज खोलीत घुमत होता.

"ही चिमुरडी पोर अधिकाऱ्यांच्या डोळ्यात सलत आहे बघा. तुरुंगातल्या वॉर्डरने एकदा हिचा अपमान केला. तर तो माफी मागेपर्यंत अन्न घेणार नाही असा निर्धार करून तिने अन्नसत्याग्रह सुरू केला. आठ दिवस अन्नाचा कण पोटात गेला नाही. अगदी मृत्यूमुखातूनच ती परत आली म्हणा ना! आहे की नाही कमाल हिची? बरं. पण माझ्या पोटासारखं कुणाचं पोट पाहिलं होतं का कधी?"

तो आपल्या हास्यजनक पोटावर हात दाबून धरून तसाच दुसऱ्या



खोलीत गेला व त्याने दार आतून बंद करून घेतलं. तरीपण त्याचं बोलणं सुरूच होतं.

"तुम्ही खरंच आठ दिवस काही खाल्लं नाही?" आईने आश्चर्याने विचारलं.

"मग काय करणार? त्याला माफी मागायला लावणं तर भाग होतं!" हे बोलत असतानाही साशा थंडीने कापतच होती. तिचा दृढनिश्चयी व कठोर स्वर म्हणजे एक प्रकारचं आव्हानच होतं, असं आईला वाटलं.

"काय पोर आहे बाई!" आई स्वतःशीच म्हणाली. नंतर ती मोठ्याने म्हणाली, "अन् त्या उपासाने तुमचा प्राण गेला असता तर?"

"त्याला काय इलाज?" साशा संथपणे म्हणाली. "पण अखेरीस त्याने माफी मागितलीच! कुणाकडून सुद्धा अपमान काय म्हणून सहन करायचा? ते शक्यच नाही!"

"हूं–खरंच!" आई सावकाश म्हणाली. "सगळे पुरुष तेच करतात. आम्हा स्त्रियांना जन्मभर अवहेलनाच सहन करावी लागते."

"हे पहा, मी माझं ओझं उतरवून ठेवलं, बरं का!" दार उघडून आत येत येगोर म्हणाला. "चहा झाला ना? आता चला, मी जातो घेऊन दुसऱ्या खोलीत!"

त्याने स्वतःच चहादाणी उचलून दुसऱ्या खोलीत नेली व जाता जाता तो बोलत राहिला "माझे बाबा तर रोज चांगला वीस कप चहा पीत असत अन् त्यामुळेच त्यांची प्रकृती निकोप राहिली. वयाच्या ७३व्या वर्षापर्यंत ते मजेत जगले. शेवटपर्यंत त्यांचं वजन चांगलं २८८ पौंड होतं अन् ते वोस्करेझेन्स्क शहरात पाद्रयाच्या हाताखाली काम करीत होते..."

"म्हणजे तुम्ही फादर इवानचे चिरंजीव आहात काय?" आईने एकदम विचारलं.

"हो. तुम्ही माझ्या वडिलांना ओळखत होता की काय?"

"तर! माझं गावसुद्धा वोस्करेझेन्स्कच!"

"अस्सं होय! तुमच्या वडिलांचं नाव काय बरं?"

"सेरेगिन. तुमच्या शेजारलाच राहात होतो आम्ही."

"हां. म्हणजे तुम्ही लंगड्या निलची मुलगी तर. वा! तुमच्या वडिलांना कसा विसरेन मी? त्यांनी कितीदा तरी कान उपटले आहेत की माझे!"

अशी जुनी ओळख निघाल्यावर मग त्या दोघांच्या गोष्टी सुरू झाल्या व जुन्या आठवणी निघू लागल्या. त्यांच्या गप्पांना बहर आलेला पाहून साशा स्मित करीत चहाची तयारी करू लागली. कपबशांचा आवाज ऐकल्यावर आई भानावर येऊन म्हणाली, "माफ करा अं. सगळंच विसरले होते मी. आपल्या गावचं कुणी भेटलं की किती बरं वाटतं!"

"तसं नाही. उलट मी चहा ओतून तुमच्या गप्पांत व्यत्यय आणला, याबद्दल मीच तुमची माफी मागायला हवी. पण आता अकरा वाजून गेले अन् मला पुनः चालत जायचं आहे. म्हणून मी घाई केली!" साशा म्हणाली.

"कुठे चालत जाणार? थेट शहरात?" आईने आश्चर्याने विचारले.

"अर्थात्."

"पण कशाला जायला हवं? अशा काळोखात न् पाण्यापावसात कशाला जाता? शिवाय तुम्ही आधीच दमल्या आहात. इथेच राहा रात्रीच्या. येगोर तिकडे त्या स्वयंपाकाच्या खोलीत झोपतील अन् आपण दोघी इथंच झोपू."

"नाही, मला जायलाच हवं!" साशा उत्तरली.

"होय. खरं आहे ते. तिला गेलंच पाहिजे!" येगोर म्हणाला. "तिला ते लोक ओळखतात, तेव्हा उद्या सकाळी ती इकडे दिसता कामा नये."

"पण यांनी जायचं कसं? एकट्यानंच?"

"अर्थात्. एकट्यानंच!" येगोर किंचित् हसून उद्गारला.

साशाने स्वतःच्या कपात चहा ओतून घेतला व पावाचा तुकडा घेऊन त्यावर मीठ भुरभुरून तिने खाण्याला प्रारंभ केला. खाताखाता ती आईकडे पाहात होती. तेव्हा आईच म्हणाली, "तुम्ही आणि नाताशा हे सगळं कसं करू शकता? माझ्यानं काही झालं नसतं. मी तर भीतीने व्याकूळ झाले असते अशा वेळी!"

"हिलासुद्धा भय वाटतं की. होय की नाही साशा?" येगोरने विचारलं.

"अर्थात् वाटतं!" साशा म्हणाली.

आईने प्रथम तिच्याकडे व नंतर येगोरकडे पाहिलं व मग ती म्हणाली, "तुम्ही लोक किती कडक आहात!"

चहा झाल्यावर साशाने काही न बोलता येगोरशी हस्तांदोलन करून त्याचा निरोप घेतला व ती स्वयंपाकघरात गेली. आई तिच्या पाठोपाठ आत गेली. साशा जाता जाता म्हणाली, "पावेलची भेट झाली तर माझा नमस्कार जरूर सांगा. विसरू नका अं सांगायला."



दरवाजा उघडता उघडता एकदम तिने मागे वळून पाहिलं व ती आईला म्हणाली,

"मुका घेऊ का तुमचा?"

आईने काही न बोलता तिला कुरवाळलं व तिचा मुका घेतला.

"येते मी आता!" साशा म्हणाली व दार उघडून बाहेर पडली.

आई आतल्या खोलीत परत आल्यावर तिने खिडकीतून बाहेर डोकावून पाहिले. बाहेरच्या दाट काळोखात फक्त बर्फ पडण्याचा आवाज ऐकू येत होता.

"ती प्रोझोरोव कुटुंबाची मंडळी आठवतात का तुम्हाला?" येगोरने विचारलं. तो पाय पसरून बसला होता व फुर्र आवाज करून चहा निववण्याचा प्रयत्न करीत होता. त्याचा चेहरा लालभडक व ओलसर दिसत होता व त्यावर समाधानाचं हास्य विलसत होतं.

"आठवतात तर!" त्याच्या प्रश्नाचं उत्तर देत आई पुनः टेबलापाशी येऊन बसली. त्याच्याकडे पाहात ती खिन्नपणे उद्गारली, "आता शहरात कधी न् केव्हा पोचणार ही!"

"अगदी दमून जाईल ती!" येगोर बोलू लागला. "जेलमध्ये तर तिची तब्येत फारच बिघडून गेली. पूर्वी चांगली ताकद होती तिच्या अंगात. तशी मूळची सुखातच वाढलेली आहे ती. अन् आता तर तिच्या फुफ्फुसात क्षयरोगाने प्रवेश केल्याची चिन्हं आहेत!"

"होय? कुणाची मुलगी आहे ती?" आईने काळजीच्या स्वरात विचारलं.

"एका जमीनदाराच्या कुटुंबातली आहे ती. ती सांगते त्यावरून तिचा बाप फारच वाईट माणूस असला पाहिजे. बरं, पण या दोघांना लग्न करायचं होतं हे माहीत होतं का तुम्हाला?"

"कोण दोघं?"

"ही अन् आपला पावेल. पण ते जमणंच कठीण झालंय. तो बाहेर असला की ही तुरुंगात, अन् ही बाहेर असली की तो तुरुंगात!"

"मला काहीच ठाऊक नव्हतं!" आई जरा वेळाने म्हणाली, "पावेल कधीच त्याच्या स्वतःविषयी काही बोलत नाही."

आता तिला साशाबद्दल अधिकच काळजी वाटू लागली. ती येगोरकडे वळून नापसंतीच्या सुरात म्हणाली, "तुम्ही का गेला नाहीत तिला पोचवायला?"

"मला ते करणं शक्य नव्हतं म्हणून. मला इथे या भागातच कितीतरी कामं उरकायची आहेत. अगदी पहाटेच कितीतरी ठिकाणी जाव लागणार आहे मला. त्यातून हा दम्याचा त्रास!"

येगोरने नुकतंच माशाबद्दल जे सांगितलं होतं त्याचेच विचार आईच्या डोक्यात होते व त्याच अनुषंगाने ती उद्गारली, "खरंच किती चांगली पोर आहे, नाही?"

मात्र साशा न् पावेलबद्दलची ही बातमी आपल्या मुलाकडून न समजता या तिऱ्हाइताकडून कळावी याचा तिला राग आला होता. तो तिच्या भृकुटिभंगावरून व ओठ थरथरण्यावरून व्यक्त होत होता.

"चांगली पोरगी म्हणता? आहे खरी!" येगोरने संमतिदर्शक उद्गार काढले. "तिच्याबद्दल तुम्हाला वाईट वाटतंय, पण त्यात अर्थ नाही. आम्हा बंडखोरांबद्दल असं वाईट वाटून घेऊ लागलात न् काळजी करू लागलात तर संपलंच! खरं सांगायचं तर आम्हा कुणालाच सुखाने जगायला सापडत नाही. माझा एक कॉमरेड नुकताच हद्दपारीची मुदत संपवून परत आला. तो निझनी-नोव्गोरोदला येऊन पोचला तेव्हा त्याची बायको न् मुलं स्मोलेन्स्कला त्याची वाट पाहात असल्याचं त्याला समजलं. पण तो स्मोलेन्स्कला पोचला तोंवर त्याच्या बायकामुलांची मॉस्कोच्या तुरुंगात रवानगी झालेली! आता त्याच्या बायकोची सैबेरियात हद्दपार होण्याची पाळी आहे.—मला सुद्धा बायको होती—फार चांगली होती बिचारी, पण पाच वर्षं असं आयुष्य काढल्यावर कायमची निघून गेली ती."

कपातला सर्व चहा एका घोटात संपवून टाकून तो पुन: आपली कहाणी सांगू लागला. आपला तुरुंगवास, हद्दपारी, तुरुंगातली मारहाण, सैबेरियातली उपासमार, नाना प्रकारची संकटं, या सर्वांना आपल्याला कसं तोंड द्यावं लागलं हे त्याने सांगितलं. इतक्या हालअपेष्टा व छळ यांचं वर्णन तो इतक्या शांतपणे व जणु त्यात काही विशेष नाही अशा सरळपणे सांगत असल्याचे पाहून आई आश्चर्याने त्याच्याकडे पाहात त्याची हकीकत ऐकत होती.

बरंच सांगून झाल्यावर तो अचानकपणे म्हणाला, "बरं ते जाऊ द्या. आता आपण कामाच्या गोष्टींचं बोलू."

त्याच्या आवाजात बदल झाला होता व चेहराही एकदम गंभीर दिसू लागला होता. कारखान्यात पत्रकं कशी नेणार याबद्दल तो आईला विचारू



लागला. त्याला बारीक सारीक गोष्टींची सुद्धा खडान् खडा माहिती आहे, हे पाहून आई चकित झाली.

त्या कामाबद्दलचं बोलणं संपल्यावर ती दोघं पुन: गावाच्या चर्चेकडे वळली. तो गंमतीने व विनोदाने बोलत होता, पण आईचे मन विचारमग्न स्थितीत भूतकाळात भ्रमण करीत होते. तिला वाटलं की आपला भूतकाळ म्हणजे एक दलदलीचा प्रदेश असून त्याच्या भोवती फर, बर्च व अस्पेन वृक्षांची गर्दी झाली आहे. बर्च वृक्षांची हळूहळू वाढ होत आहे आणि त्या सडक्या जमिनीत पाच वर्षांचे आयुष्य घालविल्यानंतर ते वृक्ष कोलमडून पडत आहेत व कुजून जात आहेत. असं काल्पनिक दृश्य तिच्या मनश्चक्षूंपुढे उभं राहिलं आणि तिचं अंत:करण दयेच्या भावनेनं भरून आलं. नंतर तिला आपल्यासमोर एका दृढनिश्चयी तरुण मुलीचा चेहरा दिसू लागला. सर्वत्र साचलेल्या बर्फातून ती मुलगी आपला मार्ग काढीत होती. ती एकटीच होती व दमून गेली होती... आणि आईचा मुलगा तुरुंगात होता. कदाचित् तो आता झोपला नसेल, पडल्या पडल्या विचार करीत असेल. पण तो तिच्याविषयी, आपल्या आईविषयी विचार करीत नसावा. तर त्याला आईपेक्षाही अधिक प्रिय वाटणारं असं दुसरं कुणीतरी आहे... फाटलेल्या ढगांप्रमाणे असे दु:खद विचार तिच्या मनात गर्दी करीत होते व तिच्या अंत:करणात अंध:कार पसरवीत होते...

येगोर तिला उद्देशून म्हणाला, "तुम्ही फार दमलेल्या दिसता, आई. आता आपण झोपू या."

आई बरं म्हणून स्वयंपाकघरात गेली. ती अंथरुणावर पडली तेव्हा तिच्या अंत:करणात कटुतेनं घर केलं होतं.

सकाळी न्याहारीचे वेळी येगोर म्हणाला, "समजा, त्यांनी तुम्हाला पकडलं अन् ही भयंकर पत्रकं कुठून मिळाली असं विचारलं तर तुम्ही काय सांगाल?"

"मी म्हणेन, तुमचा त्याच्याशी काय संबंध?"

"पण तेवढ्याने भागणार नाही. त्यांचा त्याच्याशी संबंध आहेच, हे त्यांना ठाऊक आहे. तेव्हा ते तुम्हाला प्रश्न विचारून भंडावून सोडतील यात शंकाच नाही."

"पण मी काहीसुद्धा सांगणार नाही."

"मग ते तुम्हाला तुरुंगात डांबतील."

"डांबलं तर डांबलं! निदान माझी तेवढी योग्यता ठरली तरी परमेश्वराची कृपाच समजेन मी!" आई सुस्कारा टाकून म्हणाली. "नाही तरी माझी कुणाला गरज आहे? कुणालाच नाही. तुरुंगात ते माझा छळ करतीलसं वाटत नाही. असं म्हणतात की—"

"हं! असं बोलू नका!" आईकडे नजर रोखून येगोर म्हणाला. "नाही, ते छळ करणार नाहीत तुमचा. पण चांगल्या लोकांनी स्वतःला जपलं पाहिजे."

"वा! मला चांगलं म्हणायचं काय?" आई मंदस्मित करून उद्गारली.

येगोर काही न बोलता येरझारा घालू लागला. नंतर तो आईच्या जवळ जाऊन म्हणाला, "तुम्हाला हे सर्व किती कठीण न् असह्य होत असेल हे मी जाणतो, आई."

"कठीण तर खरंच. पण ज्यांना त्याचा अर्थ समजतो त्यांना कदाचित् इतकं कठीण वाटत नसावं. पण हळूहळू मला सुद्धा आता चांगले लोक काय करू पहाताहेत हे थोडंसं समजू लागलं आहे."

"होय ना? मग झालं तर. तुम्हाला ते समजू लागलं तर तुमची सर्वांनाच गरज आहे, आई—अगदी प्रत्येकाला!"

आईने त्याच्याकडे पाहून नुसतं स्मित केलं.

दुपारी आईने कारखान्यात जाण्याची तयारी केली. तिने ती पत्रकं इतक्या हुशारीने कपड्याच्या आतून बांधून घेतली की येगोरने सुद्धा तिच्याकडे पाहून समाधान व्यक्त केलं. नंतर तो म्हणाला, "जर्मन लोक दारूची पहिली फेरी झाल्यावर म्हणतात तसंच मलाही म्हणावंसं वाटू लागलंय की 'वा! छान!' एवढी पत्रकं घेऊनही तुमच्यात काही फरक झालेला दिसत नाही! तुम्हाला पाहून कुणीही म्हणेल की ही तीच नेहमीची साधीभोळी, मायाळू, प्रौढ बाई आहे, फक्त जरा अंग भरल्यासारखं वाटतं आहे एवढंच! तुम्ही आता ज्या कामाला प्रारंभ करीत आहात ते फत्ते करण्यात तुम्हाला असंख्य देव आशीर्वाद देवोत एवढंच मागणं!"

अर्ध्या तासात आई कारखान्याच्या फाटकाशी पोचली. तिचा चेहरा शांत व खंबीर दिसत होता. फराळाचे पदार्थ असलेल्या टोपल्यांच्या भाराने ती किंचित् वाकली होती, एवढंच. दोन रखवालदार आत शिरणाऱ्या प्रत्येकाच्या अंगावरून हात फिरवून झडती घेत होते व त्याच्या मोबदल्यात ज्याची झडती घेतली जाई त्याच्याकडून व इतर कामगारांकडून त्यांच्यावर



शिव्याशापांचा वर्षाव होत होता. एका बाजूला एक पोलिस व दुसरा एक इसम उभा होता. तो इसम लंबटंगू असून त्याचा चेहरा लालभडक व डोळे बटबटीत होते. आईने फराळाच्या टोपल्यांची कावड एका खांद्यावरून दुसऱ्या खांद्यावर घेतली व ती हळूच त्या लंबटंगू इसमाकडे पाहू लागली. हा इसम हेर असला पाहिजे हे तिच्या तात्काळ ध्यानात आले.

त्या झडती घेणाऱ्या रखवालदारांना उद्देशून एक कुरळ्या केसांचा उंच कामगार चिडून म्हणाला, "आमचे खिसे न् कपडे तपासण्यापेक्षा आमच्या डोक्यांची झडती घ्या डोक्यांची!"

"तुझ्या डोक्यात नुसत्या उवा भरलेल्या आहेत, उवा!" एक रखवालदार उद्गारला.

"मग आम्हाला सोडा न् उवांचाच शोध करा. जा!" त्या कामगाराने टोमणा दिला.

बाजूला उभ्या असलेल्या त्या हेराने त्या कामगाराकडे भेदक नजर टाकली व तिरस्काराने तो जमिनीवर थुंकला.

"मला जाऊ द्या बाबांनो!" आई रखवालदारांना म्हणाली, "या ओझ्यानं माझी पाठ मोडायची वेळ आली आहे ते तर पहाल!"

"हं, जा! चल हो आत!" एक रखवालदार चिडून उद्गारला. "तुला सुद्धा बडबड करायलाच हवी, नाही का?"

ठराविक जागेवर पोचताच आईने टोपल्या खाली उतरवून ठेवल्या व कपाळावरचा घाम पुसून ती भोवताली पाहू लागली.

वासिली व इवान गुसेव नावाचे दोघे भाऊ मेकॅनिक होते. ते पेलागेयाला पाहून तिच्याकडे आले व त्या दोघातला वडील भाऊ वासिली भुवया चढवून जोरात म्हणाला, "पिरोगी आहे का?"

"उद्या आणीन बाबा!" आई उत्तरली.

हेच खुणेचे शब्द आधी ठरविलेले होते. हेच ते उत्तर मिळताच त्या दोघांचे चेहरे खुलले. इवान तर न राहवून उद्गारला, "किती चांगल्या आहात आई तुम्ही!"

वासिलीने खाली बैठक मारली व तो टोपलीत डोकावून पाहू लागला. त्याच क्षणी पत्रकांचे एक पुडके त्याच्या कोटाच्या आत जाऊन पडले.

"आपण आज घरी जायची गरज नाही, इवान!" वासिली मोठ्याने म्हणाला. "इथेच यांच्याजवळचं फराळाचं घेऊन जेवू आपण."

हे बोलत असतानाच आणखी एक पुडके त्याने बुटांत लपवले. तो पुढे

म्हणाला, "या नव्यानेच विक्रीला येऊ लागल्या आहेत, तेव्हा त्यांना मदत करायलाच हवी!"

"हो केलीच पाहिजे!" इवानने हसून साथ दिली.

आईने सावधगिरीने भोवताली नजर टाकली व ती मोठ्याने ओरडू लागली, "भाजी! गरमागरम शेवया!"

पत्रकांची पुडकी अगदी गुपचाप काढून तिने गुसेव बंधूंच्या स्वाधीन केली. प्रत्येक पुडके काढून देतेवेळी अंधारात काडी उजळावी तसा त्या पोलिस अधिकाऱ्याचा पीतवर्ण चेहरा तिच्या मनश्चक्षूंसमोर उभा राही व ती समाधानाने म्हणे, "हं हे घ्या! हं, हे घ्या! घ्या आणखी! घ्या."

कामगार आपापल्या वाट्याकटोरे घेऊन तिच्याकडे येऊ लागले. कोणी जवळ आलेला दिसला की इवान गुसेव जोरजोराने हसू लागे व आई पत्रकं देण्याचं थांबवून टोपलीतले पदार्थ देऊ लागे.

"तुम्ही खरंच फार हुशारीने काम करता, पेलाग्येया निलोव्ना!" गुसेव बंधूंनी तिच्या चलाखीचं कौतुक केलं.

"बिचारीला पोटासाठी हे करावं लागलं बरं!" बाजूला उभा असलेला एक कामगार उद्गारला. "हरामखोरांनी तिच्या एकुलत्या एका मुलाला पकडून नेलं म्हणून तिच्यावर ही पाळी आली. मला तीन कोपेकच्या शेवया द्या बरं! अन् आई, तुम्ही काही भिऊ नका. तुमचं कसं तरी भागेल."

"तुम्ही एवढी सहानुभूती दाखवता यातच सारं आलं!" आई किंचित् हसून म्हणाली.

"गोड बोलायला काही पैसा लागतो थोडाच!" तो कामगार जाता जाता पुटपुटला.

"गरमागरम भाजी! सूप! खीर!" आई पुनः ओरडू लागली.

पत्रकं वाटण्याच्या आपल्या पहिल्या कामगिरीचा अनुभव पावेलला कशा रीतीने सांगावा याचा ती विचार करीत होती. पण त्याच वेळी त्या अधिकाऱ्याचा गोंधळलेला व संतापलेला पिवळा चेहरा तिच्या डोळ्यांसमोर नाचत होता. त्याची त्रेधा उडाल्यामुळे त्याच्या काळ्या मिशा थरथरत होत्या व त्याच्या मुरडलेल्या ओठातून त्याचे पांढरे दात चमकत होते.

तिचे हृदय हर्षाने नाचत होते. तिने भुवयांची कमान केली होती व ती बाह्यतः विक्रीचे काम चालू ठेवून मनातल्या मनात त्या अधिकाऱ्याला उद्देशून म्हणत होती, "हं घे! आणखी घे!"



## १६

संध्याकाळी घरी परतून चहा घेत असता अचानक बाहेर चिखल उडवणारा घोड्यांच्या टापांचा आवाज तिच्या कानी आला व त्या पाठोपाठ एका परिचित आवाजातील हाकही ऐकू आली. ती एकदम उठली व स्वयंपाक घरातून जाऊन तिने दार उघडले. बाहेर कुणाची तरी पावले वाजली. तिच्या डोळ्यांपुढे अंधार झाल्यासारखे वाटले. तिने पायानेच दारांची फळी लोटली व ती चौकटीचा आधार घेऊन उभी राहिली.

"नमस्ते, नेनको!" परिचित आवाजात कुणी तरी म्हणाले व लांबसडक, निमुळत्या हातांचा स्पर्श तिच्या खांद्याला झाला.

तो आंद्रेइ होता. त्याला पाहून प्रथम तिला निराशेचा व नंतर आनंदाचा धक्का बसला. त्या परस्परविरोधी भावनांची मिळून एक नवीच भावना बनली व तिने तिचे अंतःकरण व्यापून टाकले. त्या भावनेच्या आवेगासरशी तिने आंद्रेइला पोटाशी धरून कुरवाळले. त्याचे हातही कापत होते. आई हळूहळू हुंदके देत अश्रू गाळू लागली.

आंद्रेइ तिच्या केसांवरून मायेने हात फिरवीत तिला म्हणाला, "रडू नकोस, आई. पावेलला सुद्धा लवकरच सोडतील बघ. त्याच्याविरुद्ध काडीइतका सुद्धा पुरावा नाही त्यांच्याजवळ. सगळेजण तोंड बांधल्यासारखे गप्प आहेत. कोणी चकार शब्द सुद्धा सांगत नाही. अगदी उकडलेले मासे असतात तसे गप्प आहेत सगळे!"

त्याचे शब्द व आवाज तिला मधुर संगीतासारखा भासत होता.

आईच्या खांद्यावर हात ठेवून आंद्रेइ तिला आत घेऊन गेला. तिने खारीप्रमाणे चपळतेने अश्रू पुसले व त्याचा प्रत्येक शब्द हृदयात साठवून घेतला.

आंद्रेइ पुढे सांगू लागला, "पावेलने नमस्कार सांगितला आहे बरं का. अन् तो अगदी खुशाल न् मजेत आहे. तुरुंगात फारच गर्दी झाली आहे. शहरातले व या वसाहतीतले मिळून शंभरावर लोक त्यांनी धरून नेले आहेत. अन् एकेका कोठडीत तीन तीन चार चार लोकांना ठेवलं आहे. तुरुंगाचे अधिकारी भले लोक आहेत. या गुप्त पोलिस खात्याने दिलेल्या कामामुळे ते त्रस्त झाले आहेत. ते फार कडकही नाहीत. ते सारखं म्हणतात, 'बाबांनो आमची मान अडकेल असं काही करू नका. अन् शांत

राहा म्हणजे बस!' त्यामुळे सगळं सुरळीत चाललं आहे. आम्हा सगळ्यांच्या भेटी न् गप्पागोष्टी होतात, पुस्तकं वाचायला सापडतात अन् एकत्र जेवताही येतं. तसा तो तुरुंग आहे जुना न् घाणेरडा, पण त्रास मात्र नाही तिथे. इतर कैदीसुद्धा चांगले आहेत अन् आम्हाला पुष्कळ मदत करतात. बुकिन, मी अन् आणखी चौघे अशा सहाजणांची नुकतीच सुटका झाली. पावेलसुद्धा लवकर सुटेल. वेसोव्श्चिकोवचा नंबर मात्र सर्वात शेवटी येईल, कारण तो सर्वांना सारख्या शिव्या देत असतो. त्यामुळे ते लोक त्याच्यावर फार नाराज आहेत. त्याला ते कदाचित् फटके देतील किंवा त्याच्यावर खटला भरतील. पावेल सतत त्याला समजावण्याचा व आळा घालण्याचा प्रयत्न करतो. शिव्यागाळीनं काही ते लोक सुधारणार नाहीत, असं पावेलने त्याला परोपरीने सांगून पाहिलं. पण त्याची आरडाओरड चालूच असते. 'मी या लोकांना जगाच्या पाठीवरून नाहीसे करून टाकीन!' असं सारखं ओरडत असतो तो. पावेलची वागणूक मात्र उत्तम आहे. तो सभ्यपणाने वागूनही खंबीर व भक्कम आहे. त्याची लवकरच सुटका होईल अशी माझी खात्री आहे."

"लवकर!" आई मंद स्मित करून म्हणाली, तिला त्याच्या बोलण्याने पुष्कळच बरं वाटलं होतं. "हो, तो लवकरच सुटून येईल असं मलाही वाटतंय."

"तुलाही वाटतं ना? मग ठीक. बरं. आता आपल्याला आधी चहा पाहिजे बुवा! अन् मग इथे बाहेरची कशी काय खबर आहे ते सांग."

त्याने आईकडे पाहिलं तो तिच्या चेहऱ्यावर मंद स्मित विलसत होतं व ती मूर्तिमंत मार्दव व प्रेमळपणाची प्रतिमा भासत होती. तिच्या डोळ्यांत मात्र प्रेमाच्या स्निग्धतेबरोबरच खिन्नतेच्या छटेचंही मिश्रण होतं.

. काळ्या दाढीच्या जंगलाने झाकल्यामुळे विचित्र भासणारा त्याचा कृश चेहरा न्याहाळून पाहत आई त्याला म्हणाली, "मला तुझ्याबद्दल कितीतरी आपुलकी वाटते रे, आंद्रयूशा!"

आपली खुर्ची मागेपुढे करीत तो म्हणाला, "तुझी थोडी माया जरी माझ्या वाट्याला आली तरी मी स्वतःला धन्य समजेन. मी तुला आवडतो हे मी जाणून आहे. खरोखर सर्वांवरच माया करण्याइतकं तुझं अंतःकरण विशाल आहे."



"ते असेल. पण तू मला विशेष आवडतोस. तुझी आई असती तर असा मुलगा लाभल्याबद्दल सगळ्यांना तिचा हेवा वाटला असता."

खोखोलने जोरजोराने मस्तक हलवलं व दोन्ही हातांनी खसखसा डोकं चोळीत तो हलक्या आवाजात म्हणाला, "मला आई आहे खरी, पण ती कुठे आहे ते मात्र मला ठाऊक नाही."

"मी आज काय केलं ठाऊक आहे का?" आई आंद्रेइला म्हणाली, नंतर त्या दिवशी कारखान्यात पत्रकं नेण्याची कामगिरी आपण कशी बजावली, याचं तिने अत्यंत उत्साहाने वर्णन केलं. उत्साहाच्या भरात ते वर्णन काहीसं अतिशयोक्तिपूर्ण झालं खरं, पण ते अपरिहार्य होतं.

ते ऐकत असता खोखोलने प्रथम आश्चर्यचकित होऊन डोळे विस्फारले, व नंतर तो जोरजोराने हसू लागला. तो आनंदाने ओरडला, "शाबास! ही कामगिरी म्हणजे मस्करी नव्हे! खरोखरच फार मोठी मदत आहे ही! पावेलला हे समजेल तेव्हा त्याला कसं धन्य वाटेल! तुझ्या या कामगिरीने पावेल अन् इतर सगळ्यांचाच फार मोठा फायदा होणार आहे बघ. खरंच, किती मोठं काम झालं हे!"

त्याचं सारं शरीर डोलत होतं. त्याने आनंदाने बोटं मोडली व तो शीळ घालू लागला. त्याला फार हर्ष झाला होता व हा हर्ष तो असा व्यक्त करीत होता की त्या खोलीतलं सर्व वातावरण आनंदमय होऊन जाऊन आईही आपोआपच ह्या वातावरणाने भारून गेली होती.

"आंद्रयूशा! आंद्रयूशा!" ती सद्गदित होऊन म्हणाली. तिचं अंतःकरण आनंदाने व्यापून तो आनंद ओसंडून जात होता. तो सगळा आनंद, सगळा हर्ष सगळे बांध फोडून शब्दांच्या रूपाने बाहेर पडू लागला. "आंद्रयूशा! मी माझ्या स्वतःच्या आयुष्याचा विचार करते तेव्हा असं वाटू लागतं की देवा, काय हे व्यर्थ जिणं? हे असलं जिणं दिलंस तरी कशाला? मी इतके दिवस जगले ते कशासाठी? नुसते काबाडकष्ट करायचे अन् मार खायचा! नवऱ्याखेरीज कुणाकडे पाहिलं नाही न् भीतीशिवाय दुसरा भाव मनाला स्पर्श करून गेला नाही! पावेल लहानाचा मोठा कसा झाला हे सुद्धा मी धड पाहिलं नाही, अन् नवरा जिवंत असेपर्यंत मी पावेलवर प्रेम करीत होते की नाही हेही मला नीट समजलं नाही! माझ्या ध्यानीमनी फक्त एकच विचार, अन् जिवाला एकच घोर असायचा. तो म्हणजे त्या राक्षसाला वेळच्या वेळी भरपूर खाऊपिऊ घालून त्याला संतुष्ट ठेवायचं अन्

शक्य तो त्याची मर्जी बिघडू द्यायची नाही. हे सारं कशासाठी? तर त्यानं संतापून मला मारहाण करू नये म्हणून! निदान एकदा तरी त्याला माझी दया यावी म्हणून! पण इतकं सगळं करूनही कधी मार चुकला न् त्याला दया आली असं काही झाल्याचं मला आठवत नाही. तो मला बडवून काढी तेव्हा बहुधा आपण आपल्या पत्नीला मारतो आहोत असंही त्याला वाटत नसावं, तर जगात ज्याच्याज्याच्यावर म्हणून राग असेल त्या सर्वांवरचा राग तो माझ्यावर काढायचा. पुरी वीस वर्षं अशी काढली मी. लग्न होण्यापूर्वीचं आयुष्य कसं होतं हे सुद्धा मी विसरले. मी ते आठवण्याचा प्रयत्न केला तरी काऽही आठवत नाही. येगोर इवानोविच आला होता, तो माझ्या गावचाच निघाला. त्याने कितीतरी आठवणी काढल्या, पण मी? मला आमचं घर न् तिथली माणसं आठवतात, पण ती माणसं कशी राहात होती, काय बोलत होती, किंवा त्यांचं काय झालं, हे काही केल्या मला आठवत नाही. एकदा, नाही दोनदा गावात आग लागल्याचं तेवढं आठवतं. असं काहीतरी झालं आहे की माझ्या डोक्यातून सगळे विचार मुद्दाम काढून घेतले आहेत, माझ्या आत्म्याला कडीकुलपात बंद करून पक्का बंदोबस्त करण्यात आला आहे व तो आंधळा बहिरा न् बधिर करण्यात आला आहे!"

पाण्यातून बाहेर काढलेला मासा जसा तडफडतो तशी आईची अवस्था झाली होती. ती श्वास घेण्यासाठी थांबली व मग जरा पुढे वाकून व हलक्या आवाजात पुनः सांगू लागली, "माझा नवरा वारला तेव्हा मला वाटलं, माझ्या मुलाचा तरी आधार मिळेल मला. पण पावेल या चळवळीत पडला. हे सगळं सहन करणं फार कठीण होतं. मला त्याची फार काळजी वाटू लागली. त्याला काही बरंवाईट झालं तर माझं काय होणार? त्याच्याशिवाय मी जगणार कशी, या काळजीनं माझं अंतःकरण फाटून गेलं. त्याचं कसं होणार हा एकच घोर माझ्या जिवाला लागून राहिला!"

ती पुनः क्षणभर थांबली व अर्थपूर्ण रीतीने मस्तक हलवीत सांगू लागली, "आमचं बायकांचं प्रेम अगदी शुद्ध प्रेम नसतं बरं! आम्हाला ज्याची गरज असते त्याच्यावरच आम्ही प्रेम करतो. पण तुझं पहा. तसं पाहिलं तर तुला तुझ्या आईची गरज अशी काय आहे? अन् तरी तुझा जीव तिच्यासाठी तडफडतो. अन् हे सगळे तुमचे इतर लोक... तुरुंगात जातात, सैबेरियातली हद्दपारी स्वीकारतात, मरणही पत्करतात... अन् कोवळ्या तरुण्याताठ्या



पोरी भर रात्रीच्या चिखलातून न् पावसापाण्यातून बर्फ तुडवीत चारचार मैल दुरून शहरातून आमच्या घरापर्यंत एकट्या चालत येतात! हे सर्व करण्याची प्रेरणा अन् हिंमत त्यांना मिळते कुठून? त्या कशासाठी करतात हे सगळं? कारण त्यांच्या अंतःकरणात फार मोठं प्रेम, शुद्ध प्रेम आहे म्हणून! पण ही मी पहा — मला असं शुद्ध प्रेम करताच येत नाही! मी फक्त जे काही माझं स्वतःचं आहे, जे अगदी माझ्याजवळ आहे, त्यावरच प्रेम करू शकते!"

"नाही. तसं नाही!" खोखोलने तोंड बाजूला वळवलं व नेहमीच्या सवयीप्रमाणे डोकं, गाल न् डोळे खसखसा चोळून तो बोलू लागला, "आपल्याजवळ जे असेल त्यावर सगळेच प्रेम करतात, पण अंतःकरण विशाल असलं म्हणजे दूरच्या वस्तूही जवळच्या वाटू लागतात. तुझं मन फार मोठं आहे, ते खरं आईचं हृदय आहे, म्हणून तू फार मोठ्या गोष्टी करू शकतेस!"

"देव पावो न् तसं होवो!" ती श्वास घेऊन म्हणाली, "हे असं राहणं चांगलं असंच वाटतं मला. मला तुझी फारफार माया येते, अन् मला तर वाटतं की मी पाशापेक्षाही तुझ्यावर जास्त प्रेम करते. तो कधी मोकळेपणाने माझ्याशी बोलत नाही. आता हेच पहा, त्याला साशाशी लग्न करायचं आहे, पण मी त्याची आई असून सुद्धा तो एका शब्दाने देखील कधी मजजवळ त्याबद्दल बोलला नाही!"

"नाही. ते खरं नाही!" खोखोल मध्येच तिला थांबवून म्हणाला. "मला नक्की ठाऊक आहे की ते खरं नाही. त्याचं तिच्यावर प्रेम आहे, अन् तीही त्याच्यावर प्रेम करते हे खरं आहे, पण ते लग्न कधीच करणार नाहीत. तिची फार इच्छा आहे, पण त्याला लग्न करायचं नाही!"

"अस्सं! आता माझ्या ध्यानात आलं!" ती विचारमग्न होऊन व खोखोलवर नजर रोखून म्हणाली. "असं आहे तर! ध्येयासाठी स्वतःच्या सुखावरही पाणी सोडायचं..."

"पावेलसारखा माणूस विरळा!" खोखोल अत्यंत मृदु स्वरात म्हणाला. "त्याची गोष्ट निराळी. त्याचं अंतःकरण पोलादाचं बनवलेलं आहे."

"अन् सध्या तो तुरुंगात खितपत पडला आहे!" आई विचारमग्न अवस्थेतच पुनः बोलू लागली. "तसं पाहिलं तर भयंकरच आहे ते, पण तरीही फारसं भयंकर नाही. आता काळच निराळा आला आहे, अन् माझं भय न् काळजीही निराळ्या प्रकारची झाली आहे. आता मला प्रत्येकाचीच

काळजी वाटते. अन् माझं अंतःकरणही निराळंच झालं आहे, कारण माझ्या आत्म्याने माझ्या हृदयाचे नेत्र उघडले आहेत. म्हणून त्या अंतःकरणाला आता सर्व दिसतं अन् दुःखही होतं, पण त्याचबरोबर त्याला आनंदही होतो! अजूनही पुष्कळ गोष्टी मला समजत नाहीत. उदाहरणार्थ, तुम्हा लोकांचा देवावर विश्वास नाही, हे मला पटत नाही व त्यामुळे मला तीव्र वेदनाही होतात. पण माझा त्यावर काही इलाजही चालत नाही. तुम्ही सगळे लोक खरोखरच फार चांगले आहात, हेही मला दिसतं. लोकांसाठी, सत्यासाठी, तुम्ही खडतर जीवन पत्करलं आहे, हेही मला ठाऊक आहे. तुमचं सत्य म्हणजे काय हेही मला आता कळू लागलं आहे. जोपर्यंत श्रीमंत लोक आहेत, तोपर्यंत सर्वसामान्य लोकांना काहीही मिळणं शक्य नाही. सुख, आनंद, काही मिळणार नाही, हेच तुमचं सत्य! तुम्हा लोकांचा सहवास लाभल्यामुळे अलिकडे कधीकधी रात्रीच्या वेळी मी माझ्या पूर्वीच्या आयुष्याविषयी विचार करू लागते, तेव्हा मला दिसून येतं की तरुणपणी माझी सर्व शक्ती चिरडून टाकली गेली होती. अन् ते आठवलं की मला दुःख तर होतंच, पण चीडही येते. पण त्या तुलनेने आताचं जीवन कितीतरी चांगलं न् सुखाचं वाटू लागतं. अन् आता हळूहळू मला मी काय अन् कशी आहे याची ओळख पटू लागली आहे."

खोखोल उठला व आवाज न होईल अशा सावधगिरीने खोलीत येरझारा घालू लागला. त्याच्या उंच, कृश, विचारमग्न मूर्तीकडे आई पाहत राहिली.

"किती चांगल्या प्रकारे तुझं म्हणणं मांडलंस तू!" खोखोल अत्यंत मृदु स्वरात म्हणाला, "खरोखरच किती बरोबर! कर्चे येथे एक ज्यू तरुण राहात होता. तो कविता करायचा, अन् एक दिवस त्याने असं लिहिलं की 'ज्या अजाण, निष्पाप जीवांचा अन्यायाने बळी घेतला आहे, ते सत्यामुळे पुनः जिवंत होतील.' त्या कवीला पोलिसांनी ठार केलं, पण तो मुख्य मुद्दा नाही. महत्त्वाचा मुद्दा हा की त्याला सत्याचं आकलन झालं होतं व त्याच सत्याची बीजं जनतेत रोवण्याचा त्याने प्रयत्न केला. तू सुद्धा त्या कवीने म्हटल्याप्रमाणे अन्यायाला बळी पडलेल्यांपैकीच एक आहेस..."

"पण आता मी बोलू लागले आहे" आई म्हणाली. "मी बोलते तेव्हा माझे शब्द ऐकून माझा स्वतःचाच माझ्या कानांवर विश्वास बसत नाही. सबंध जन्मभर माझी एकाच गोष्टीसाठी धडपड असायची — आला दिवस कसा काढायचा. अन् कुणालाही नकळत जगता आलं तर बरं. कारण



तेवढाच छळ कमी होईल, असं मला सारखं वाटत राहायचं. पण आता माझं मन इतरांविषयीच्या विचारांनीच व्यापलेलं असतं. तुमचं ध्येय न् तुमची तत्त्वं मला नीटशी समजत नसतील, पण तुम्हा सर्वांवर आता माझा जीव जडला आहे. तुम्ही सगळे सुखी व्हावे अशी मला सारखी तळमळ लागून राहिली आहे. तुझ्याविषयी तर मला फारच वाटतं रे, आंद्र्यूशा!"

तो तिच्या संन्निध आला व त्याने तिचा हात हातात घेऊन घट्ट दाबला. तो म्हणाला, "आई, तुझा कसा उतराई होऊ मी!" एवढंच बोलून तो तिच्यापासून दूर झाला. आईही त्या भावनांच्या आवेगाने दमून गेली होती व शांतपणे कपबशा विसळीत होती. तिच्या अंतःकरणात दाटलेल्या नव्या आनंदाचा ती विचार करीत होती.

खोखोल खोलीत येरझारा घालीत होता. तो मध्येच एकदम म्हणाला, "तू वेसोवृश्चिकोववरही कां माया करीत नाहीस, आई? त्याचा दारुड्या बाप तुरुंगात पडला आहे. निकोलायला कधीकधी खिडकीच्या गजांतून तो दिसला की तो त्याच्यावर शिव्यांचा वर्षाव करू लागतो. हे करणं चांगलं नव्हे. तसा निकोलाय स्वभावानं चांगला न् दयाळूसुद्धा आहे. तो उंदरा-मांजरांवर, कुत्र्यांवर अन् इतर प्राण्यांवरही प्रेम करतो. पण माणसं म्हटली की त्याला चीड येते! पहा, परिस्थितीने गांजलेल्या माणसाची काय स्थिती होते ती!"

"हं. बिचाऱ्याची आई गेली... बाप चोर न् दारुड्या..." आई विचारमग्न होत पुटपुटली.

आंद्रेइ झोपायला जायला निघाला तेव्हा आईने त्याला नकळत त्याच्यावरून क्रॉसची खूण करून त्याला शुभाशीर्वाद दिला. व नंतर अर्ध्या तासाने तिने मृदु स्वरात विचारलं, "झोप लागली का, आंद्र्यूशा?"

"नाही, कां बरं?"

"नाही. काही नाही, झोप आता!"

"हो. नेनको, झोपतोच. तू खरंच किती किती चांगली आहेस ग!" तो कृतज्ञतापूर्ण अंतःकरणाने उद्गारला.

## १७

दुसऱ्या दिवशी आई कारखान्याच्या फाटकापाशी आली तेव्हा पहारेकऱ्यांनी तिला अडवून डोक्यावरच्या टोपल्या उतरवण्यास फर्मावले व तिची कसून झडती घेतली.

ते पहारेकरी तिचे कपडे चाचपून पाहत असता तिने तक्रार केली, "सगळ्या अन्नाच्या गारगोट्या होऊन जातील अशानं!"

"गप्प बैस!" एक पहारेकरी तिच्यावर खेकसला. दुसरा तिला थोडेसे ढकलून म्हणाला, "ही पत्रकं ते लोक कुंपणावरून आत फेकत असले पाहिजेत, मी नक्कीच सांगतो!"

आई कारखान्याच्या आवारात जाऊन पोचली. म्हाताऱ्या सिझोवने प्रथम तिला पाहिले व तिच्याजवळ येऊन भोवताली नजर फिरवीत हळूच तो तिला म्हणाला, "ऐकलं का, आई?"

"काय?"

"त्या पत्रकांबद्दल. ती पत्रकं पुन्हा जिकडे तिकडे वाटली गेली आहेत. ब्रेडवर मीठ शिंपडावं तसा त्या पत्रकांचा सगळीकडे शिरकाव झाला आहे. अन् हे लोक आपले तुमच्या झडत्या घेताहेत न् धरपकड करताहेत! माझा भाचा माझीन, त्याला पकडून तुरुंगात डांबलं. पण काय फायदा झाला? तुमच्या मुलालाही त्यांनी धरून नेलं, पण पत्रकं वाटणारे ते नव्हते हे आता स्पष्टच झालं आहे."

सिझोव दाढी कुरवाळीत व तिच्याकडे टक लावून पाहत म्हणाला, "तुम्ही माझ्या घरी का येत नाही अधूनमधून? तुम्हाला अगदी एकटंएकटं वाटत असेल, नाही?"

आईने त्याचे आभार मानले व ती आपल्या जवळच्या फराळाच्या पदार्थांची विक्री करण्यासाठी गिऱ्हाइकांना बोलावू लागली. कारखान्यात आज काहीतरी निराळीच गडबड असल्याचे तिच्या ध्यानात आले. प्रत्येकजण कसल्या तरी धांदलीत असल्याचे दिसत होते. कामगार मधूनमधून गटागटाने उभे राहत, पुन: त्यांची पांगापांग होई व ते एका खात्याकडून दुसऱ्या खात्याकडे धाव घेत. त्या धुरकटलेल्या वातावरणातही कसला तरी उत्साह, कसले तरी चैतन्य निर्माण झाले होते. लोकांमध्ये नवीन हिंमत



निर्माण झाली होती. मधूनमधून काही कुत्सितपणाचे व काही उत्तेजनपर उद्गार ऐकू येत होते. म्हातारे कामगार हळूच कुणी पाहत नाही असे पाहून स्मित करीत होते. अधिकारी मंडळी चिंतातुर चेहऱ्याने हिंडत होती. पोलिसांची धावपळ सुरू होती. त्यांना पाहून कामगार इकडेतिकडे पांगत किंवा आपले संभाषण थांबवीत. आणि पोलिसांच्या संतप्त व त्रस्त चेहऱ्यांकडे ते टक लावून पाहत.

कामगारांचे चेहरे नुकतेच धुतल्यागत टवटवीत भासत होते. त्यांच्यापैकी गुसेव बंधू हिंडताना आईच्या नजरेस पडले. थोरला गुसेव चांगला उंच होता व त्याचा धाकटा भाऊ हसत हसत त्याच्या मागे चालत होता.

सुतारखात्याचा फोरमन वाविलोव व टाइमकीपर इसाइ हळूहळू चालत आईच्या समोरून गेले. ठेंगण्या बांध्याच्या वाविलोवचा राकट चेहरा पाहण्यासाठी इसाइ मान ताठ करून चालत होता व आपल्या विरळ दाढीला झटके देऊन वाविलोवशी बोलत होता.

इसाइ वाविलोवला म्हणत होता, "या लोकांनी चांगलीच थट्टा आरंभलीय. यांना आपली सगळीच गंमत वाटते! आपल्या डायरेक्टर साहेबांनी म्हटल्याप्रमाणे खरोखरच हा फार गंभीर प्रश्न असून त्यामुळे राज्यसत्तेला धोका निर्माण होणार आहे. ते काही नाही. नुसतं वरवर छाटण्यानं काम होणार नाही. त्यांची पाळंमुळंच खणून काढायला पाहिजेत—"

वाविलोव पाठीमागे हात बांधून बोटांत बोटे घट्ट अडकवून चालत होता. तो मोठ्याने म्हणाला, "हरामखोर कुठले! त्यांना म्हणावं, तुम्हाला वाटेल ते छापत बसा! पण माझ्याविरुद्ध ब्र काढाल तर याद राखून ठेवा!"

वासिली गुसेव आईजवळ येऊन तिला म्हणाला, "आज पुन: तुमच्याजवळचं फराळाचं घेणार आहे मी. तुमचे जिन्नस खरोखरच चविष्ट असतात." नंतर डोळे मिचकावीत हळू आवाजात तो म्हणाला, "आपलं काम चोख पार पडत आहे. तुम्ही फार चांगली कामगिरी बजावता आहात, आई!"

तिने त्याच्याकडे प्रेमपूर्ण नजर टाकून मान डोलावली. गुसेव हा त्या वस्तीतला सर्वात मोठा खट्याळ इसम समजला जात असे. तो आपल्याशी इतक्या अदबीने वागतो, हे पाहून तिला फार बरं वाटले. कारखान्यात सर्वत्र धांदल उडालेली पाहूनही तिला अभिमान वाटला. ती स्वत:शीच उद्गारली, "मी हे काम केलं नसतं तर—"

तीन साधे कामगार तिच्यापासून थोड्याच अंतरावर येऊन थांबले.

त्यांच्यापैकी एकजण निराशेच्या सुरात म्हणत होता, "काय करावं? एकसुद्धा पत्रक माझ्या हाती लागलं नाही!"

"त्यात काय लिहिलं आहे, ते ऐकायला मी सुद्धा उत्सुक आहे," दुसरा म्हणाला. "मला स्वत:ला काही वाचता येत नाही, पण घाव अगदी वर्मी बसला असावा, असं दिसतंय."

"चला. आपण बॉयलर रूममध्ये जाऊ या." तिसरा कामगार आसपास नजर टाकीत त्यांना म्हणाला.

गुसेवने अर्थपूर्ण नजरेने आईकडे पाहिले व डोळे मिचकावीत तो उद्गारला, "पाहिलं, कसा परिणाम होतो आहे ते!"

आई घरी परत आली तेव्हा तिचे अंत:करण आनंदाने व अभिमानाने उचंबळून आले होते.

"पुष्कळ लोकांना वाचता येत नाही म्हणून बिचाऱ्यांना वाइट वाटतंय." ती आंद्रेइला सांगू लागली. "मलासुद्धा लहानपणी वाचायला येत होतं, पण आता मी ते सारं पार विसरून गेले आहे."

"मग पुन: शिकावं की!" खोखोलने सुचवले.

"आता या वयात लोकांना हसायला चांगलाच विषय मिळेल!"

यावर आंद्रेइने काही उत्तर न देता फळीवरून एक पुस्तक काढलं व मुखपृष्ठावरील एका अक्षरावर बोट ठेवीत विचारलं, "हे कोणतं अक्षर आहे?"

"र." आई हसत उत्तरली.

"अन् हे दुसरं?"

"अ."

आईला आपण वाचू लागल्याचं लक्षात येऊन लाजल्यासारखं झालं. आंद्रेइ हळूच आपल्याकडे पाहत मिस्किलपणे हसत असल्यासारखे तिला वाटले व ती त्याची नजर टाळून दुसरीकडे पाहू लागली. पण तो अत्यंत मृदु आवाजात शांतपणे बोलत होता व त्याचा चेहरा गंभीर दिसत होता.

"तू खरंच का मला वाचायला शिकवायच्या विचारात आहेस, आंद्र्यूशा?" तिने बळेच चेहऱ्यावर हसू आणीत विचारले.

"हो. खरंच! काय हरकत आहे?" तो उत्तरला. "तुला एके काळी वाचायला येत होतं तेव्हा आता पुन: शिकणं कठीण जाणार नाही. म्हणतात ना, निदान प्रयत्न तर करून पाहावा."



"पण नुसतं मूर्तीकडे डोळे लावून पाहत राहण्याने काही कोणी साधू बनत नाही, अशी दुसरी म्हणसुद्धा आहे की!"

"अं! म्हणीचं काय?" खोखोल मान हलवीत उद्गारला, "म्हणींना काय तोटा गेलाय? 'जेवढं ज्ञान कमी तेवढी झोप अधिक गाढ!' अशीही एक म्हण आहेच की! पण हा विचार झाला फक्त पोटाच्या दृष्टीने. अशा म्हणी म्हणून मनाला लगाम घालायला सोपं जातं एवढंच! बरं. पण हे अक्षर कोणतं?"

"ल." आईने सांगितलं.

"ठीक! अन् हे?"

डोळे ताणून ती अक्षरे पाहण्यात व स्मरणशक्तीच्या कप्प्यात पडून राहिलेल्या अक्षरज्ञानाची आठवण करण्यात ती काही काळ गढून गेली. पण लवकरच ती दमून गेली. तिचे डोळे प्रथम अतिश्रमामुळे व नंतर दु:खमुळे पाण्याने भरून आले.

"आता या वयात वाचायला शिकायचं!" आई हुंदके देत उद्गारली. "चाळीस वर्षांचं वय झालं अन् आता श्री – ग – णे – शा काढत बसायचं!"

"रडू नकोस, आई." खोखोल आईची समजूत काढू लागला. "तुझं आयुष्य हे असं गेलं ही तुझ्या का हातची गोष्ट होती? पण ते व्यर्थ गेलं ही जाणीव तुला आहे हेच काय कमी झालं? हजारो लोक अगदी पशूसारखं जीवन जगतात अन् आपण यापेक्षा अधिक चांगलं जीवन जगू शकतो हे ध्यानात घेण्याऐवजी ते त्या खातेऱ्यातल्या आयुष्यातच समाधान मानतात. दिवसभर राबायचं अन् पोटाची खळगी भरायची. जे आज तेच उद्या! सारा जन्म असाच निघून जातो – काम करायचं, आणि खायचं. या आयुष्य-क्रमात अभिमान बाळगण्यासारखं आहे तरी काय? त्यातच अधूनमधून मुलं होतात व काही दिवस त्यांचं कौतुक होतं. पण त्यांना भरपूर खायला लागू लागलं म्हणजे त्यांच्यावर शिव्याशापांचा वर्षाव सुरू होतो. त्यांच्यावर खेकसणं सुरू होतं. 'लवकर मोठे होऊन कमवायला लागा, पोरट्यांनो!' पोरांनी घरगुती जनावरासारखं राबावं असं वाटतं, पण ती पोरंही आपल्या पोटासाठी कमवायच्या मागे लागतात अन् मग त्यांचाही तसाच आयुष्यक्रम सुरू होतो. या असल्या आयुष्यापेक्षा निराळं जीवन जगणारे काही थोडे लोक असतात व मानवी मनाची मुक्तता करण्याच्या कामी ते स्वत:ला वाहून घेतात. अशाच लोकांना माणसं म्हटलं पाहिजे. तू सुद्धा आता आपल्या शक्तीनुसार हेच करीत आहेस."

"मी? मला काय करता येईल?" आईने निराशेच्या सुरात विचारले.

"तसं म्हणू नकोस आई. पावसाचा प्रत्येक थेंब बियांना जीवन देत असतो, तसंच आपलंही असतं. अन् एकदा का तुला खडाखड वाचता येऊ लागलं की—"

आंद्रेइ ते वाक्य अर्ध्यावरच थांबून उठला व हसत हसत येरझारा घालीत पुन्हा बोलू लागला.

"तुला वाचायला शिकलं हे पाहिजेच! पावेल आता लवकरच सुटून येईल, अन मग—खरंच!"

"नाही रे आंद्रयूशा!" आई म्हणाली. "तरुण वयात सगळं सोपं वाटतं. पण एकदा कां वय वाढलं म्हणजे मग मागे अनेक काळज्या लागतात, शरीर खंगू लागतं, अन् बुद्धी तर अगदीच काम देत नाही!"

## १८

त्या दिवशी संध्याकाळी खोखोल बाहेर गेल्यावर आईने दिवा लावला व ती मोज्याचे विणकाम काढून बसली. पण थोडयाच वेळात विणकाम बाजूला ठेवून ती उठली, थोडा वेळ तिने अस्वस्थपणे खोलीतच येरझारा घातल्या, मग ती स्वयंपाकघरात जाऊन आली. दाराला तिने कडी घातली व ती परत येऊन बसली. तेव्हा तिचे डोळे चकाकत होते. नंतर तिने खिडकीचे पडदे ओढून घेतले व फळीवरून एक पुस्तक काढून ती वाचण्याचा यत्न करू लागली. तिने एवढा पक्का बंदोबस्त करून टाकला होता तरी पुस्तकावर नजर टाकण्यापूर्वी पुनः एकदा भोवताली पाहून घेतल्याखेरीज तिला राहवले नाही. मग ती पुस्तकातलं एकेक अक्षर लावीत वाचण्याची खटपट करू लागली. बाहेर कसलाही खुट्ट आवाज झाला तरी ती दचकून उठे, पुस्तक हातांनी झाकून टाकून कान टवकारून ऐकू लागे. मग पुनः पुस्तक उघडून डोळयांची उघडझाप करीत ती वाचू लागे.

"लखोटयाचा ल, बदकाचा ब,—"

अन् हे चालू असताच दारावर थाप ऐकू आली. आई एकदम उठली. तिने लगबगीने पुस्तक मिटून फळीवर ठेवून दिले व बिचकलेल्या स्वरातच विचारले, "कोण आहे?"

"मी रिबिन!" असं म्हणत दाढी कुरवाळीत रिबिन आत आला.



"पूर्वी कधी तुम्ही असं 'कोण आहे' म्हणून विचारीत नव्हता! अन् घरी एकटयाच? मला वाटलं होतं खोखोल घरीच असेल. आज पाहिला मी त्याला. तुरुंगाच्या वारीने स्वारीत काही बदल झालेला दिसून येत नाही."

खाली बसून आईकडे पाहत तो पुढे म्हणाला,

"मला तुमच्याशी थोडं बोलायचं आहे."

त्याने आईकडे अर्थपूर्ण नजर टाकली. ती पाहून तिचं मन कसल्यातरी भीतीने भरून गेलं.

"पैशाशिवाय काहीच काम होत नाही." रिबिन घोघऱ्या आवाजात म्हणाला. "जन्माला यायचं तरी पैसा, अन् मरायचं तरी पैसा! पुस्तक अन् पत्रकांना सुद्धा पैसा लागतोच. या पुस्तकांना लागणारा पैसा कुठून येतो, माहीत आहे?"

"नाही बाई. मला कसं ठाऊक असणार ते?" आई हळूच उत्तरली. कुठे काहीतरी बिनसलं आहे असा असा संशय आला.

"मला सुद्धा त्याची कल्पना नाही." रिबिन सांगू लागला. "अन् दुसरा प्रश्न हा की ही पुस्तकं लिहितं तरी कोण?"

"पुस्तकं वाचून विद्वान झालेले लोक..."

"म्हणजेच श्रीमंत लोक!" रिबिन म्हणाला व हे म्हणत असताना दाढीने झाकलेला त्याचा चेहरा लाल होऊ लागला. "म्हणजे हे सुशिक्षित बडे लोकच ही पुस्तकं लिहून त्यांचा प्रसार करतात. पण या पुस्तकांत तर त्यांच्याविरुद्धच लिहिलेलं असतं. आता तुम्ही थोडासा विचार करा अन् मला हे सांगा की सामान्य लोकांना स्वतःच्याच विरुद्ध चिथावण्यासाठी हे बडे लोक आपला पैसा खर्च करतात, याचं काय कारण असावं बरं?"

आई घाबरल्यासारखी होऊन आ वासून पाहतच राहिली व डोळे मोठे करून ती म्हणाली, "तुम्हीच सांगा बरं काय ते!"

"बरोबर!" रिबिन एखाद्या अस्वलाप्रमाणे गुरगुरला. "माझ्या मनात प्रथम हा विचार आला तेव्हा मी सुद्धा असाच थक्क होऊन भेदरल्यागत झालो."

"मग तुम्हाला त्याचं काही कारण सापडलं कां अखेर?"

"फसवणूक! दुसरे काही नाही! मला तरी वाटतं, त्यात आपल्याला

कारवण्याचा काही तरी डाव असला पाहिजे. मला पुरावा असा देता येणार नाही, पण यात नक्की काही लबाडी असावी अशी माझी खात्री आहे. हे तुमचे बडे लोक फार कावेबाज असतात. मी सत्य शोधून काढण्याच्या मागे आहे, आणि आता खरं काय ते मला कळून चुकलं आहे. म्हणूनच मी आता या बड्या लोकांच्या बरोबर जाणार नाही. त्यांना सोईस्कर वाटेल तेव्हा ते खुशाल मला खाली पाडून माझ्याच अंगाचा पुलासारखा उपयोग करून पुढे जातील —"

त्याच्या शब्दांनी आईच्या अंतःकरणाची पकड घेतली व ती व्याकुळ होत म्हणाली, "देवा! येशू! हे आहे तरी काय? मग माझ्या पाशाला हे सारं कळत का नाही? त्या सगळ्याच लोकांना..."

हे बोलत असता येगोर, निकोलाय इवानोविच, साशा यांचे गंभीर व निष्पाप चेहरे एकामागून एक तिच्या मनश्चक्षूंसमोर उभे राहिले. तिच्या नाडीचे ठोके जलद पडू लागले. ती अस्वस्थ होऊन मान जोरजोराने हलवीत उद्गारली, "छे, छे! तसं असणं शक्यच नाही. माझा यावर विश्वास बसत नाही. ते सगळे इमानदार अन् निष्ठावान लोक आहेत."

"कोणाविषयी बोलता आहात तुम्ही?" रिबिनने विचारपूर्वक प्रश्न केला.

"त्या सर्वांच्याविषयी. अगदी एकूण एक! मी चांगलं ओळखते त्यांना."

"तुम्ही नीट पाहिलं नाही, आई." हे बोलता बोलता रिबिनने मान खाली केली. "आणखी दूरवर नजर टाका. आपल्याबरोबर काम करणाऱ्यांना हे काही ठाऊक नसेल. ते निष्ठावान लोक आहेत, हे चांगलंच आहे. पण त्यांच्या मागे राहून सूत्रं हलविणारे दुसरे लोक असतील, अन् हे सूत्रधार फक्त स्वतःचा स्वार्थ साधू पाहत असावेत. मनुष्य स्वतःच्याच विरुद्ध उलटतो तो उगाच नव्हे!"

अन् इतकं बोलून तो एखाद्या शेतकऱ्याला साजेशा दृढविश्वासाने उद्गारला, "या बड्या लोकांच्याकडून आपलं कध्धी भलं होणार नाही, मी नक्की सांगून ठेवतो."

"मग तुम्ही काय करायचं ठरवलं आहे?" आईने पुनः संशयाच्या भोवऱ्यात सापडून विचारलं.

"मी?" रिबिनने आईकडे पाहिले व जरा थांबून तो पुढे म्हणाला, "आपण या बड्या लोकांपासून चार हात दूर राहिलं पाहिजे, हेच माझं म्हणणं!"



त्याच्या चेहऱ्यावर पुनः औदासिन्य दिसू लागलं. थोडा वेळ स्तब्ध राहून तो पुनः बोलू लागला.

"या आपल्या कॉमरेड्सच्या जोडीने काम करावं असं माझ्या मनात होतं. मी ते काम चांगलं करू शकतो. लोकांना काय सांगावं व आपलं म्हणणं कसं पटवून द्यावं हे मला चांगलं साधतं. पण आता मी इथून निघून जात आहे. माझा विश्वास उडाला आहे. तेव्हा मला गेलंच पाहिजे."

त्याने मान खाली केली व तो विचारात गढून गेला. काही वेळाने पुनः त्याचं बोलणं सुरू झालं.

"मी एकटाच खेड्यापाड्यात जाईन अन् तिथल्या लोकात जागृती करीन. लोकांनी आपल्या चळवळीची सूत्रं स्वतःच्या हाती घेतली पाहिजेत. एकदा त्यांच्यामध्ये जाणीव निर्माण झाली की मग तेच मार्ग शोधून काढतील. त्यांच्यामध्ये ही जाणीव निर्माण होण्याला त्यांना मदत करणं एवढंच माझं काम. त्यांनी स्वतःच्या पायांवर उभं राहण्यातच त्यांचं कल्याण आहे. त्यांची स्वतःची बुद्धी चालवण्याला त्यांना शिकलं पाहिजे."

आईला त्याची कीव आली व त्याच्याबद्दल काळजी वाटू लागली. त्याच्याविषयी तिच्या मनात एक प्रकारची अढी बसली होती ती जाऊन त्याच्याविषयीची ममता तिच्या मनात निर्माण झाली.

"तुम्हाला ते पकडून नेतील तर?" आईने मृदु स्वरात विचारलं.

रिबिनने आईकडे पाहिलं व तो म्हणाला,

"पकडतील कदाचित्. पण नंतर सोडतीलच. अन् मग मी पुनः माझ्या कार्याला आरंभ करीन!"

"शेतकरी स्वतःच तुम्हाला पकडून तुरुंगात डांबतील."

"सजा भोगून मुदत संपल्यावर मी बाहेर येऊन पुनः कामाला लागेन! शेतकऱ्यांविषयी म्हणाल तर ते फार तर एकदा, दोनदा, तीनदा मला आडवे येतील, पण मग त्यांचं त्यांनाच कळून येईल की मला विरोध करण्यापेक्षा मी काय म्हणतो ते ऐकून घेणंच त्यांच्या हिताचं आहे. मी त्यांना सांगेन, 'माझ्यावर विश्वास ठेवू नका हवा तर, पण माझं म्हणणं ऐकून तर घ्याल!' अन् त्यांनी ते ऐकलं म्हणजे नक्कीच त्यांना ते पटल्यावाचून राहणार नाही!"

एकेक शब्द सावकाशपणे उच्चारित रिबिन बोलत होता. तो पुढे म्हणाला,

"अलिकडे मी पुष्कळ विचार केला आहे अन् चारदोन गोष्टी शिकलो आहे."

"पण या मार्गाने तुमचं मरण ओढवल्यावाचून राहाणार नाही, मिखाइलो इवानोविच!" आई व्यथित अंतःकरणाने म्हणाली.

रिबिनने आपले काळेभोर डोळे तिच्यावर रोखले व तो तिच्या म्हणण्याचा अर्थ तिच्या चेहऱ्यावर शोधू लागला. त्याचं धिप्पाड शरीर पुढे वाकलेलं होतं, त्याचे हात खुर्चीवर टेकलेले होते व त्याचा चेहरा भोवतालच्या काळ्याभोर दाढीच्या आच्छादनामुळे फिकट भासत होता. आईकडे पाहत तो म्हणाला,

"येशू ख्रिस्ताने काय सांगितलं ते आठवतं आहे ना? बी पुरलं तरी ते मरत नसतं, तर पुनः अंकूर फुटून त्याचा पुनर्जन्म होत असतो. शिवाय मृत्यु मला इतक्या लवकर गाठू शकणार नाही. मी सुद्धा त्याला चकविण्यात काही कमी कावेबाज नाही."

बसल्या जागी थोडी चुळबुळ करून तो सावकाशपणे उठला व म्हणाला, "मी गुत्त्यात जाऊन लोकांजवळ थोडा बसणार आहे. खोखोल काही आता लवकर येईलसं दिसत नाही. तो पुनः पूर्वीप्रमाणे कामाला लागलेला दिसतोय. खरं ना?"

"होय. तेच!" आई हसत उत्तरली.

"ठीक. त्याला मी येऊन गेल्याचं सांगा."

नंतर ते दोघे सावकाशपणे बागेतून चालू लागले. ते एकमेकांकडे न पाहताच बोलत होते.

"बरं आहे, येतो मी."

"बराय. तुम्ही कारखान्यातलं काम कधी सोडणार?"

"ते आधीच केलंय मी."

"अन् निघणार कधी?"

"उद्या पहाटे. बरं येतो."

जड पावलांनी व भारावलेल्या अंतःकरणाने रिबिन दारातून बाहेर पडला. एक मिनिटभर दाराशी उभी राहून आई त्याच्या पावलांचा आवाज ऐकत होती. त्याचबरोबर स्वतःच्या शंकाकुल हृदयाचे स्पंदनही तिला स्पष्ट ऐकू येत होते. मग ती शांतपणे आत आली व तिने खिडकीचा पडदा बाजूला केला. तेव्हा बाहेर अंधाराचे साम्राज्य पसरल्याचे तिला दिसून आले.



"असल्या काळोखातच माझं जीवन चाललं आहे," ती स्वतःशीच म्हणाली.

तिच्या मनात रिबिनचे विचार येत होते व त्या धिप्पाड, रुबाबदार शेतकऱ्याविषयी हळहळ वाटत होती.

आंद्रेइ घरी आला तेव्हा तो मोठ्या खुषीत होता. आईने त्याला रिबिनबद्दल सांगितलं तेव्हा तो म्हणाला,

"त्याला खेड्यापाड्यांतून हिंडून लोकांमध्ये जागृती करावयाची आहे व त्यांना न्याय मिळाला पाहिजे अशी चळवळ करायची आहे ना? करू देत तर! त्याला आमच्याबरोबर राहणं कठीण वाटतं. त्याच्या डोक्यात शेत-कऱ्यांविषयीच्या विचारांनी गर्दी केली आहे. आमच्या विचारांना तिथे जागा नाही."

"तो बड्या लोकांविषयी म्हणत होता. तो म्हणत होता त्यात थोडं तरी तथ्य असावं असं वाटतं मला. ते तुम्हाला फसवणार नाहीत अशी खबरदारी घ्यायला नको का?" आई सावधगिरीने म्हणाली.

"तूही त्या काळजीत पडलीस तर?" खोखोल हसत हसत उद्गारला. "अग पैसा पाहिजे पैसा! आपल्याजवळ पैसा असता तर...! अजून तरी दुसऱ्याच्या पैशावरच आमची कामं चालली आहेत. निकोलाय इवानोविचचंच उदाहरण घे. त्याला महिन्याला ७५ रुबल मिळतात. त्यातले ५० तो आम्हाला देतो. इतरांचंही तसंच आहे. कधी कधी विद्यापीठातले विद्यार्थी पोटाला चिमटा घेऊन एकेक कोपेक वर्गणी करून आम्हाला मदत पाठवितात. सुशिक्षितांमध्ये सुद्धा निरनिराळ्या प्रकारचे लोक असतात. काहीजण सोडून जातात, काहीजण फसवतात, पण त्यांच्यांतले सर्वात चांगले असतील ते शेवटपर्यंत आपल्याबरोबर राहतील."

एवढे बोलून खोखोलने टाळी वाजली व आत्मविश्वासाने तो पुढे बोलू लागला.

"आपला अंतिम विजय अजून फार फार दूर आहे. पण तरीसुद्धा आम्ही येत्या मे-दिनाला एक लहानसा उत्सव करणार आहोत. फारच सुरेख समारंभ होईल तो."

रिबिनच्या उद्गारांनी आईच्या मनात निर्माण झालेल्या शंकाकुशंका खोखोलच्या उत्साहपूर्ण शब्दांनी नाहीशा झाल्या. खोखोल खोलीत येरझारा घालीत केसांतून बोटे फिरवीत, जमिनीकडे दृष्टी लावून बोलत होता.

"कधीकधी मनात अशा काही भावना उचंबळून येतात की स्वतःचा स्वतःलाच तो ताण सहन होत नाही. कुठेही जा, सगळे लोक आपले कॉमरेड्सच, असं वाटू लागतं. सगळयांच्या अंतःकरणात एकाच विचाराची व ध्येयाची ज्योत तेवत आहे, सगळेच चांगले आहेत, दयाळू आहेत व आनंदी आहेत, असं वाटू लागतं. एकमेकांशी न बोलताच परस्परांची ओळख पटते. सगळयांच्या अंतःकरणात आपापल्या गीताचे सूर निघत असतात व त्या सगळ्या सुरांचं मिळून एकच सुरेल संगीत बनत असतं. अनेक प्रवाह एकाच नदीला येऊन मिळावे, तसं ही सगळी गीतं एकत्र येतात अन् मग तो नदीचा प्रवाह रुंद होत होत स्वच्छंदपणे वाहत जातो व त्याचाच पुढे सुखी नवजीवनाचा विशाल सागर बनतो."

खोखोलच्या विचारप्रवाहात व भाषणात खंड पडेल या भीतीने आई बसल्या जागची हलली सुद्धा नाही. ती नेहमीच इतरांपेक्षा त्याचं बोलणं अधिक लक्षपूर्वक ऐकत असे. त्याचं बोलणं इतरांपेक्षा सोपं अन् साधं असे अन् म्हणूनच ते अंतःकरणाला जाऊन भिडणारं असायचं. पावेल कधी भविष्यकाळाविषयीच्या कल्पना पुढे मांडीत नसे. पण खोखोलचा जीव अंशतः तरी भविष्यकाळातच वावरत असायचा. पृथ्वीवरच्या सर्व लोकांच्या मुक्ततेचा महान् दिवस कधी तरी येणार आहे हे त्याच्या भाषणातून नेहमी सूचित होत असे. आणि आईच्या दृष्टीने जीवनाला व तिच्या सहकाऱ्यांच्या कार्याला विशिष्ट प्रकारचा अर्थ प्राप्त होत असे तो खोखोलच्या दृष्टीला दिसणाऱ्या उज्ज्वल भविष्यकालीन स्वप्नामुळेच.

आईच्या मनात हे विचारचक्र सुरू असताच खोखोल मान हलवीत पुढे बोलू लागला,

"अन् मग अचानक आपण भानावर येऊन सभोवार पाहू लागलो म्हणजे असं दिसू लागतं की वास्तवात सगळीकडे कसं थंड अन् शांत आहे, सगळीकडे मनस्वी घाण साचली आहे, कुणाच्याच अंगात अतिश्रमामुळे त्राण उरलेलं नाही व प्रत्येकजण चिडलेला अन् संतप्त झालेला आहे..."

खोखोल आता व्याकुळ अन् व्यथित होऊन बोलत होता, "लोकांवर विश्वास ठेवून चालण्यासरखं नाही, असं म्हटलं तर ते बोचतं, हे खरं आहे. पण त्याला इलाज नाही. लोकांना भिऊन वागलं पाहिजे. नव्हे, त्यांचा द्वेषसुद्धा करायला शिकलं पाहिजे. प्रत्येक माणसाच्या दोन बाजू असतात. संपूर्ण माणसावर प्रेम करता आलं तर चांगलंच, पण ते कसं शक्य आहे?



एखाद्या माणसाने आपल्यावर क्रूर श्वापदाप्रमाणे तुटून पडावं, आपल्यातला मानवी आत्माही दृष्टीआड करून आपल्यावर प्रहार करून आपल्याला मनुष्य म्हणून जगणंही अशक्य करून टाकावं, असं झालं तर त्याला क्षमा करणं कसं शक्य आहे? नाही! अशा अत्याचाराची क्षमा करणं शक्य नाही! अन् हा फक्त कुणाचा एकट्याचा प्रश्न नाही. एकटा माणूस स्वतःचा अपमान, स्वतःवर झालेले अत्याचार सहन करू शकेल, पण आपल्याला हे सगळं चालतं, सगळं खपतं, असं त्यानं त्या अत्याचार करणाऱ्यांना वाटू देता कामा नये. असलेच अत्याचार इतरांवर करण्यात त्यांना त्यायोगे उत्तेजन मिळेल. म्हणूनच असे अत्याचार निमूटपणे सहन करता कामा नये."

त्याच्या नेत्रांत एक प्रकारचं निर्धाराचं तेज चमकू लागलं होतं. त्याने खाली वाकवलेली मान सुद्धा ताठरपणा व्यक्त करीत होती व तो अधिकच खंबीरपणे बोलत होता,

"एखाद्या अन्यायाने माझं स्वतःचं नुकसान होणारं नसलं तरी मला कोणत्याच अन्यायाची क्षमा करण्याचा अधिकार नाही. मी काही या भूतलावरचा एकटाच प्राणी नाही. आज एखाद्याने मजवर अन्याय केला अन् मी त्याचा प्रतिकार केला नाही, किंवा ती बाब अगदी क्षुद्र असेल तर मी हसूनसुद्धा उडवून लावीन, पण त्याचा परिणाम काय होईल? माझ्यावर आपल्या सामर्थ्याचा प्रयोग करून त्याची भीड चेपल्यामुळे तो उद्या दुसऱ्यालाही दडपून टाकण्याला धजणार नाही कशावरून? सगळे लोक सारखेच आहेत, असं समजून चालणार नाही. चांगला थंड डोक्याने विचार करून तुम्हाला आपल्यापैकी कोण अन् परका कोण, मित्र कोण अन् शत्रू कोण, हे हेरलं पाहिजे. हा विचार फार सुखाचा नाही, खरं ना? पण ते कटु असलं तरी सत्य आहे."

का कोण जाणे यावेळी आईच्या मनश्चक्षूंपुढे प्रथम साशाचे व नंतर पोलिस अधिकाऱ्याचे चित्र उभे राहिले. सुस्कारा टाकून ती खोखोलला म्हणाली,

"कणीक नीट चाळून घेतली नाही तर भाकर चांगली कशी होणार?"

"सगळी मख्खी आहे ती तिथेच!" खोखोल म्हणाला.

"होय ना!" आई म्हणाली. तिला अचानक आपल्या मृत पतीचे स्मरण झाले. एखाद्या खडकावर शेवाळं उगवावं तसा त्याचा उग्र व ओबडधोबड चेहरा तिला आठवला. नंतर लगेच तिच्या मनात दुसरा विचार

आला. खोखोलचं नाताशाशी अन् पावेलचं साशाशी लग्न झालं तर कसं होईल.

"अन् हे असं का?" खोखोल मोठ्या आवेशाने आपला मुद्दा विशद करीत होता. "त्याचं कारण आपल्या चेहऱ्यावरील नाकडोळयांइतकं स्पष्ट आहे. त्याचं कारण असं आहे की सगळी माणसं सारख्या दर्जाची नसतात. आपण सर्वांना एका पातळीवर आणून बसवू या! मानवी बुद्धीची कल्पकता व हातापायांचे श्रम यांच्यातून जे जे निर्माण झालं असेल ते सर्व आपण सारखं वाटून टाकलं पाहिजे! माणसाने माणसाला भीती व द्वेष यांचं गुलाम बनवलं आहे आणि लोभ व मूर्खपणा यांच्या शृंखलात अडकवून टाकलं आहे. ती गुलामगिरी अन् त्या शृंखला यांचा आपण अंत केला पाहिजे!"

यानंतर त्या दोघांमध्ये अशा प्रकारचं संभाषण वारंवार होऊ लागलं.

खोखोलला कारखान्यात पुन: काम मिळालं. तो पगाराची सर्व रक्कम आईच्या स्वाधीन करू लागला व ती सुद्धा पावेलकडून पैसे घेई त्याप्रमाणे त्याचेही पैसे बिनतक्रार घेऊ लागली.

कधीकधी आंद्रेइ मिस्किलपणे तिला म्हणे, "थोडंसं वाचन करणार का नेनको?"

यावर ती हसत हसत पण निर्धारपूर्वक नकार देई. त्याच्या नेत्रांतलं ते मिस्किल हास्य तिला बोचत असं. ती स्वत:शीच म्हणे, "याला जर ही सगळी थट्टाच वाटते तर हा विचारतो तरी कशाला?"

पण असं होतं तरी ती वारंवार त्याला कुठल्या ना कुठल्या कठीण शब्दांचा अर्थ विचारी. मात्र असं विचारतांना जणु काय त्यात विशेष काही नाही असं दाखवी व दुसऱ्याच बाजूला पाहत राही. तिने त्याला न कळत आपला अभ्यास सुरू ठेवला होता, हे त्याने ताडलं. मात्र ती त्याविषयी बोलायचं टाळते, हे पाहून त्याने तिला वाचून दाखवायला म्हणण्याचंही बंद केलं.

अन् मग एक दिवस ती त्याला म्हणाली,

"आंद्र्यूशा, माझ्या डोळयांना आता दिवसेंदिवस कमी दिसू लागलं आहे, तेव्हा आता मला चष्मा लावायला हवा."

"हात्तिच्या, त्यात काय?" खोखोल म्हणाला. "येत्या रविवारी आपण शहरात एका डॉक्टरकडे जाऊ अन् तुझ्यासाठी चष्मा घेऊन टाकू."



## १९

पावेलची भेट घेण्यासाठी आई तीन वेळा तुरुंगात जाऊन आली. पण लालबुंद गालांचा, मोठ्या नाकाचा व पांढऱ्या केसांचा एक म्हातारा पहारेकऱ्यांचा मुकादम होता, त्याने प्रत्येक खेपेला तिला नकार देऊन परतवून लावले. मात्र त्याची भाषा व स्वर सौम्य होता. दरवेळी तो सांगे, "तुम्हाला अजून आठवडाभर तरी जमणं शक्य नाही."

तो चांगला गोलमटोर न् गलेलठ्ठ होता. त्याला पाहून तिला वाटे, एखादं पिकलेलं फळ बरेच दिवस बाजूला पडून असावं तसा दिसतोय हा! तो सदा एका पिवळया दातकोरण्याने दात कोरीत असायचा. त्याच्या हिरवट डोळयांत त्याच्या स्नेहार्द्र वृत्तीचं प्रतिबिंब दिसायचं अन् त्याच्या आवाजातही सभ्यपणा व सहृदयता व्यक्त होत असे.

"तो फार सभ्यपणाने वागतो अन् सदा हसतमुख असतो," आईने खोखोलला सांगितलं.

"वा! ते काय विचारावं? ते सगळेच वागायला फार चांगले असतात. सभ्य अन् हसतमुखही असतात." खोखोल व्यंगपूर्ण स्वरात बोलत होता. "त्यांना सांगितलं की अमुक माणूस हुशार न् प्रामाणिक आहे. पण त्याच्यापासून काहीसा धोका आहे म्हणून त्याला फासावर लटकवाल तर बरं होईल, तर ते हसत हसत त्याला फाशी देऊन मोकळे होतील! अन् नंतर सुद्धा त्यांच्या चेहऱ्यावरचं स्मित कायमच राहील!"

"पण आपल्या घरी झडतीला आलेला तो इसम निराळा होता." आई म्हणाली. "तो दुष्ट होता, हे त्याला पाहिल्याबरोबरच चटकन् ध्यानात येत असे."

"ती मुळी माणसं नसतातच. लोकांच्या डोक्यात हाणायचे हातोडेच ते! आपल्यासारख्या लोकांवर हुकुमत गाजवायला सोपं जावं म्हणून आधी आपल्याला नरम आणण्यासाठी वापरण्यात येणारी यंत्रच असतात हे लोक. त्यांना स्वत:लाच वरिष्ठांच्या हुकुमाचे ताबेदार बनविण्यासाठी आधी चांगलं ठाकठीक केलेलं असतं. वरून हुकूम आला म्हणजे हूं की चूं न करता व अगदी विचार न करता तो अंमलात आणायचा, एवढंच त्यांचं काम!"

पण अखेरीस एकदाची आईला पावेलची भेट घेण्याची परवानगी मिळाली. रविवारी ती तुरुंगात गेली व कचेरीतील एका कोपऱ्यात अंग चोरून

बसली. ती खोली फारच लहान, बसकी व कोंदट होती. तुरुंगातील कैद्यांच्या भेटीसाठी अनेक जण तेथे तिष्ठत बसलेले होते. त्यांपैकी बहुतेकांची ही तेथे येण्याची पहिलीच वेळ नसावी, कारण ते परस्परांना ओळखत होते व कोळयाच्या जाळयाप्रमाणे संभाषणाचे जाळे विणीत वेळ काढीत होते.

"तुम्ही ऐकलंय का?" मांडीवर एक प्रवासी बॅग घेऊन बसलेली एक गोबऱ्या चेहऱ्याची लठ्ठ बाई म्हणत होती, "आज सकाळी चर्चमध्ये प्रार्थनेच्या वेळी पाद्रीसाहेबांनी गाणाऱ्या मुलांपैकी एकाचा कानच उपटला म्हणे!"

"ही गाणारी पोरं सगळीच मवाली अन् उडाणटप्पू असतात!" लष्करी अधिकाऱ्यांचा गणवेश घातलेल्या एका सेवानिवृत्त प्रौढ गृहस्थाने आपली पुस्ती जोडली.

बुटके पाय, लांब हात, हनुवटी पुढे आलेली, डोक्याला टक्कल, असा अवतार असलेल्या एका इसमाने त्या कचेरीत येरझारा घालण्याचे काम चालू ठेवले होते. तो आपल्या किरटया आवाजात आवेशाने बोलत होता, "काय ही विलक्षण महागाई! मग लोक बिथरतील नाहीतर काय? अगदी मामुली मांस सुद्धा रत्तलला चौदा कोपेक अन् ब्रेड अडीच कोपेकच्या खाली मिळत नाही..."

मधूनच कैद्यांना त्या खोलीत आणण्यात येई. करडया रंगाचा पोषाख न जाड चामडयाचे बूट या वेषात ते सगळे सारखेच दिसत. अंधुक उजेड असलेल्या त्या खोलीत प्रवेश केल्यावर त्यांच्यापैकी काहीजण डोळे मिचकावीत. एका कैद्याच्या पायात बेडयाही अडकवलेल्या होत्या.

तुरुंगातील वातावरण कसं विलक्षण शांत होतं आणि सगळया गोष्टी अगदी सुरळीतपणे पार पडत होत्या. त्या सगळया लोकांना त्या जीवनाची संवय झाल्यासारखं व त्यामुळे त्यांना त्याचं काही वाटेनासं झाल्यासारखं दिसत होतं. काहीजण निमूटपणे आपली शिक्षा भोगीत होते, तर काहीजण आळसटलेल्या वृत्तीने पहारा देत होते. दुसरे काहीजण केवळ कर्तव्य म्हणून कैद्यांच्या भेटीस आलेले दिसत होते.

आईचं अंतःकरण मात्र अधीर झालं होतं. आपल्या भोवतालच्या वातावरणाचं ती आश्चर्यपूर्ण नजरेने निरीक्षण करीत होती व त्यात भरलेलं औदासिन्य व कंटाळवाणा भोळसटपणा पाहून ती स्तिमित होत होती.

आईच्या शेजारी एक म्हातारी बसली होती. तिचा चेहरा सुरकुतलेला होता. पण डोळयांत मात्र तरुणपणाचे तेज होते. तिथे चाललेली सगळी



बडबड ऐकून घेण्यासाठी ती आपली हाडकुळी मान वारंवार फिरवी व डोळयांत एक प्रकारची विचित्र चमक आणून सगळयांकडे पाहत राही.

"तुम्ही कोणाच्या भेटीला आलात, बाई?" आईने कुतूहलाने तिला विचारले.

"माझ्या मुलाच्या. तो कॉलेजात शिकणारा विद्यार्थी आहे." ती बाई मोठयाने म्हणाली. मग तिने आईला विचारले,

"अन् तुम्ही कोणाच्या भेटीला आलात?"

"माझाही मुलगाच आहे इथे. कामगार आहे तो."

"नाव काय त्याचं?"

"व्लासोव."

"ऐकल्यासारखं वाटत नाही. किती दिवस झाले त्याला तुरुंगात येऊन?"

"सात आठवडे होतील आता."

"इतकेच! माझ्या मुलाला इथं आल्याला तर आता दहा महिने होतील." एक प्रकारच्या अभिमानाने ती म्हातारी म्हणाली.

"होय, होय!" टक्कलवाल्या इसमाची वटवट सुरू होती. "कुणालाच आता धीर धरवेनासा झाला आहे. सगळेच चिडले आहेत, सगळेच आरडाओरड करीत आहेत अन् महागाई आपली भरमसाट वाढतेच आहे! माणसंच काय ती स्वस्त झाली आहेत! त्याविरुद्ध मात्र कोणीच काही करीत नाही!"

"बरोबर आहे तुमचं म्हणणं." सेवानिवृत्त अधिकारी महाशय बोलले. "सगळा कसा अगदी कहर झाला आहे. कुणीतरी जोराने या सगळयांना दरडावून गप्प बसवलं पाहिजे. आज कशाची गरज असेल तर अशी जरब बसवू शकणाऱ्या माणसाची —"

सगळेच जण संभाषणात सामील झाले अन् वादविवाद चांगलाच रंगात आला. प्रत्येकाला आपलं म्हणणं पुढे मांडायची घाई होत होती. पण सगळे बोलत होते मात्र हळू आवाजात. त्यांची मतं आईला आवडली नाहीत. ती तिच्या घरी चालणाऱ्या वादविवादाला सरावलेली होती. त्यावेळी ते लोक बोलत, ते कसं स्पष्ट, सरळ अन् मोठया आवाजात बोलत असत. त्यापेक्षा हे इथलं बोलणं अगदी निराळं होत अन् मतंही निराळी होती!

हे चालू असतानाच अचानक एका लाल दाढीवाल्या लठ्ठ जेलरने तिच्या नावाचा पुकारा केला. तिच्याकडे आपादमस्तक न्याहाळून पाहून तो लंगडत लंगडत चालू लागला व आईला म्हणाला, "हं चला. अशा माझ्यामागे या."

आई त्याच्यामागून चालत असता त्याला लवकर चालायला लावण्यासाठी एक धक्का द्यावा, असा विचार सुद्धा तिच्या मनात डोकावून गेला.

आत एका लहानशा खोलीत पावेल उभा होता. त्याच्या तोंडावर स्मित विलसत होतं; त्याने तिला पाहताच हात पुढे केला. तो लगेच हातात घेऊन आईने प्रेमाने घट्ट दाबला. प्रथम ती हळूच हसली, पण लगेच ते हसू मावळून तिचा कंठ दाटून आला व त्या आवेगाने तिचे डोळे मिटले गेले. तिला काय बोलावं तेच समजेना व कंठातून शब्दच फुटेना. ती नुसतं 'कसं काय', 'कसं काय', एवढंच बोलू शकली.

तिचा हात हातात धरून पावेल म्हणाला, "शांत हो, आई!"

"मी शांतच तर आहे रे!"

"ती तुझी आईच आहे, हे खरं आहे," जेलरमहाशय एक उसासा टाकून सांगू लागले. "पण तरीसुद्धा तुम्ही एकमेकांपासून दूर उभे राहाल तर बरं होईल." एवढं बोलून जेलरने मोठ्याने जांभई दिली.

पावेलने आईच्या प्रकृतीची चौकशी करून घरातील परिस्थितीविषयी विचारपूस केली. आज त्याच्याकडून दुसऱ्या काही विशेष प्रश्नांची ती अपेक्षा करीत होती व त्यासाठी ती शोधक नजरेने त्याच्या डोळ्यात काही कुतूहल दिसत आहे का, म्हणून पाहत होती. पण तसं काहीच तिला आढळलं नाही. तो नेहमीप्रमाणेच शांत व गंभीर होता. फक्त त्याचा चेहरा नेहमीपेक्षा जरा जास्त फिकट दिसत होता व त्याचे डोळे मोठाले भासत होते.

"साशाने आठवण केली होती म्हणून तुला सांगायला सांगितलं आहे."

आईचे हे शब्द ऐकून पावेलने स्मित केले. त्याच्या पापण्या थरथरल्या व त्याचा चेहरा मृदु व सौम्य दिसू लागला. आईच्या अंतःकरणाला कसल्या तरी वेदना झाल्या.

"तुला लवकर सोडून देतील का रे?" आईने काहीशा उद्वेगाने व चिरडीला येऊन विचारले. "अन् तुला मुळात तुरुंगात डांबलंच कशासाठी? ती पत्रकं तर कारखान्यात पुनः वाटली जात आहेत."

पावेलचे डोळे चमकू लागले. "खरंच?" त्याने उत्सुकतेने विचारले.

जेलरमहाशयांनी अर्धवट झोपेत असल्यासारख्या आवाजात बजावलं "असल्या गोष्टी बोलायला मनाई आहे. तुम्हाला घरच्या गोष्टीच काय बोलायच्या असतील त्या बोला!"



"आम्ही बोलत होतो ती घरगुती बाबच नव्हे का?" आईने जरा चिडून विचारले.

"ते मी सांगू शकणार नाही; पण त्याबाबत बोलण्याला मनाई आहे, एवढंच सांगून ठेवतो." जेलरच्या या उत्तरात पूर्ण बेफिकिरीचा सूर होता.

"बरं तर आई, तू घरचीच हकीगत सांग पाहू मला." पावेल म्हणाला. "तू काय करतेस आजकाल?"

"मी ते सगळे जिन्नस कारखान्यात घेऊन जाते," डोळ्यांत मिस्किल-पणाची चमक आणून आई सांगू लागली. क्षणभर थांबून ती हसून म्हणाली, "कोबीचं सूप, आमटी, वगैरे जे पदार्थ मरिया तयार करते, ते घेऊन मी जाते."

याचा अर्थ काय समजायचा तो पावेल बरोबर समजला. त्याने केसांवरून हात फिरविला आणि ओठांवरचं हसू दाबण्याचा प्रयत्न केल्यामुळे त्याची मुखाकृती काही विचित्र दिसू लागली. तो मृदु आवाजात म्हणाला, "तुला वेळ घालवायला काही तरी काम मिळालं, हे बरं झालं. आता तुला एकटे-पणा जाणवणार नाही."

पूर्वी कधीही तिच्या अनुभवाला न आलेलं मार्दव आज त्याच्या आवाजात होतं.

"ती पत्रकं वाटली गेली तेव्हा त्यांनी माझी सुद्धा झडती घेतली!" आईने थोड्या अभिमानाने व प्रौढी मिरविण्याच्या स्वरात सांगितलं.

"पुन: तोच विषय!" यावेळी जेलरसाहेब जरा चिडले होते. "त्याबद्दल बोलण्याला मनाई आहे. हे कळू नये म्हणून या लोकांना सरकार तुरुंगात डांबतं. अन् तरीसुद्धा तुम्ही लोक नेमकं तेच बोलता! काय बोलण्याला मनाई आहे हे सुद्धा समजू नये तुम्हाला?"

"जाऊ दे, आई." पावेल म्हणाला. "आपले हे मात्वेइ इवानोविच फार चांगले आहेत. त्यांना राग येईल असं काहीच आपण करता कामा नये. त्यांचे आमचे संबंध फार चांगले आहेत. आज तुझ्या या भेटीचे वेळी ते ड्यूटीवर आहेत हे सुदैवच म्हणायचं. नाहीतर नेहमी असिस्टंट सुपरिंटेंडंट हजर असतात."

"चला आटपा. भेटीची वेळ संपली." जेलरने घड्याळात पाहून फर्मावले.

"बरं आई, तू भेटून गेलीस फार बरं वाटलं. तू अगदी काळजी करू

नकोस. आता फार दिवस राहावं लागणार नाही मला इथे." एवढं बोलून पावेल आईला बिलगला. तिने त्याला मायेने पोटाशी धरले व त्याचा मुका घेतला. तिचं अंतःकरण इतकं भरून आलं होतं की तिच्या डोळयांतून आनंदाश्रू वाहू लागले.

"चला आत!" जेलर म्हणाला. आई त्याच्यामागून व्हरांड्यातून जात असता तो हळूच तिला ऐकू जाईल अशा आवाजात पुटपुटला, "रडू नका बाई. त्याला लवकरच सोडतील. सर्वांनाच सोडून देतील. नाहीतरी इथे फारच गर्दी झाली आहे आता."

तिने घरी येतांच खोखोलला घडलेली सर्व हकीकत सांगितली. ते सांगताना ती फार खुषीत होती व तिच्या पापण्या थरथरत होत्या.

"मी अगदी खुबीने त्याला सांगितलं. अन् त्यानेही कसं अगदी बरोबर ओळखलं! हो! त्याला समजलं असलंच पाहिजे मुळी!" ती उसासा टाकून उद्गारली. "नाहीतर तो प्रेमळपणाने वागलाच नसता. एरवी कधीच तो इतका प्रेमळपणा दाखवीत नाही!"

"आता मात्र तुझी खरोखर कमाल आहे, आई!" खोखोल हसत म्हणाला. "लोकांना कुणाला काही, कुणाला काही हवं असतं. आईच्या अंतःकरणाला मात्र कशाची भूक असेल तर प्रेमाची!"

"पण तिथल्या त्या दुसऱ्या लोकांची मात्र मला खरंच कमाल वाटते बाई! तू त्यांना पाहायला तिथे असायला हवा होतास, आंद्रयूशा!" आई आवेशाने म्हणाली. "त्यांना त्याचं काहीच वाटेनासं झालं आहे! त्यांची मुलं तुरुंगात डांबली आहेत; अन् तरी ते लोक असं वागत होते की जणु विशेष काही झालंच नाही! आपले मजेत येतात काय, बसतात काय, अन् गप्पा मारीत वेळ काढतात काय! चांगले शिकले सवरलेले लोक जर असं करू लागले तर मग आम्ही अडाणी माणसांनी कसं वागावं रे?"

"अं! चालायचंच!" खोखोल आपल्या नेहमीच्या पद्धतीने जरा वाकड्यात शिरून म्हणाला. "कायद्याचा बडगा आपल्या डोक्यावर बसतो, तितक्या जोराने त्यांच्या डोक्यावर बसत नाही. अन् दुसरं म्हणजे कायदा जास्त करून त्यांच्याच उपयोगाचा असतो. म्हणूनच कधी चुकून कायद्याचा प्रहार एकाद वेळ त्यांच्यावरच आला तर ते तोंड वेडंवाकडं करतात. पण ते सुद्धा फारसं नाही. स्वतःची काठी स्वतःच्याच डोक्यात बसली तर ती दुसऱ्याच्या काठीइतकी जाचक वाटत नाही, खरं ना?"



## २०

एक दिवस आई टेबलाशी बसून मोजा विणत होती व खोखोल तिला प्राचीन रोम शहरातील गुलामांच्या बंडाची हकीकत वाचून दाखवीत होता. इतक्यात कुणीतरी जोरात दरवाजा ठोठावला. खोखोलने दार उघडले. कसले तरी पुडके बगलेत मारलेला वेसोव्श्चिकोव आत आला. त्याची टोपी खूप मागे सारलेली होती व पाय थेट गुडघ्यापर्यंत चिखलाने भरलेले होते.

"इथून जाताना आत दिवा दिसला म्हणून सहज म्हटलं भेटून जावं! हा आताच तुरुंगातून सुटून आलो आहे बघा." तो जरा विचित्र आवाजात म्हणाला. आईचा हात धरून जोराने हलवीत त्याने सांगितले, "पावेलने नमस्कार सांगितला आहे बरं का."

तो जरा अस्वस्थ होत खुर्चीवर बसला व काहीशा उदास पण संशयास्पद नजरेने खोली न्याहाळू लागला.

आईचं मत त्याच्याविषयी चांगलं नव्हतं. अगदी बारीक केस कापलेलं त्याचं चौकोनी डोकं अन् त्याचे बारीक डोळे पाहून तिला त्याचं भयच वाटे. पण आज मात्र त्याच्या येण्याने तिला आनंद झाला व त्याच्याशी बोलताना तिच्या चेहऱ्यावर स्मित झळकू लागलं.

"किती वाळलास रे बाबा! आंद्रयूशा, आपण चहा तरी देऊ या याला."

"हे मी शेगडी पेटवून आधणच ठेवतोय." खोखोलने स्वयंपाकघरातून सांगितले.

"बरं. पण पावेल कसा आहे? तुझ्याबरोबर आणखी कोणाची सुटका झाली का?"

निकोलायने मान खाली घातली. मग तो सांगू लागला, "पावेल अजून वाट पाहतो आहे. मला एकट्यालाच सोडलं त्यांनी." एवढं बोलून त्याने डोळे वर करून आईकडे पाहिलं व तो सावकाशपणे, दातओठ खात बोलू लागला, "मी त्यांना बजावलं की आता मला सोडलं नाहीत तर मी कुणाचा तरी जीव घेईन. अन् माझाही जीव देईन! म्हणून त्यांनी मला सोडलं."

आई ते ऐकून थक्क झाली व घाबरून म्हणाली, "अस्सं!" तिच्या

नकळत तिची नजर त्याच्याकडे वळली व त्याचे बारके भेदक नेत्र तिच्या नजरेला भिडले.

"आपला फ्योदोर माझिन कसा आहे रे?" खोखोलने स्वयंपाकघरातूनच ओरडून विचारले. "अजून कविता करतो का तो?"

"हो तर. मला तर त्यातलं काही गम्य नाही बुवा." निकोलाय मान हलवीत बोलला. "तो स्वतःला काय बुलबुल समजतो की काय कोण जाणे! पिंजऱ्यात टाकला की लागलाच गायला! पण मला मात्र एकच गोष्ट समजते. ती म्हणजे मला घरी जाण्याची मुळीच इच्छा नाही बघा."

"घरी आहेच काय जावंसं वाटण्याजोगं?" आई स्वतःशीच बोलल्यागत म्हणाली. "ना घरात कोणी माणूस, ना चुलीत विस्तू! सगळाच थंडा कारभार!"

यावर निकोलाय काही बोलला नाही. तो नुसताच डोळ्याच्या कोपऱ्यातून तिच्याकडे पाहत राहिला. बऱ्याच वेळानंतर त्याने खिशातून सिगारेटची पेटी काढून एक सिगारेट शिलगावली व कुत्र्याप्रमाणे गुरगुरण्याचा आवाज करीत एक आवंढा गिळला. वर जात जात नाहीशा होणाऱ्या धुराकडे पाहत तो बोलू लागला, "हो, थंडा कारभारच तर काय! थंडीने गारठून मरून पडलेली झुरळं, उंदीर हेच असणार घरी, दुसरं काय? पावेलच्या आई, आजची रात्र मी इथेच झोपलो तर चालेल का?" आईकडे न पाहता घोगऱ्या आवाजात त्याने विचारले.

"हात्तिच्या! त्यात विचारायचं काय? झोप की!" आई चटकन् उत्तरली पण त्याच्या सान्निध्यात ती बेचैन होती.

"आजकालच्या दिवसात मुलांना स्वतःच्या आईबापांची सुद्धा लाज वाटते."

"काय म्हटलं?" आईने चमकून विचारलं.

त्याने आईकडे नजर टाकली व मग डोळे मिटून घेतले. त्यायोगे देवीचे वण असलेला त्याचा चेहरा एखाद्या अंध माणसाच्या चेहऱ्यासारखा भासू लागला.

"नाही. मी म्हटलं की आजकालच्या दिवसात मुलांना आईबापांची लाज वाटते." तो उसासा टाकून म्हणाला. "पावेलला मात्र तुमची लाज वाटत नाही हो. पण मला माझ्या बापाची लाज वाटते. मी त्याच्या घरात पुनः पाय ठेवीन तर शपथ. आता मला बाप नाही न् घर नाही. मी



पोलिसांच्या हातात नसतो तर सैबेरियात निघून गेलो असतो. हद्पार होऊन तिथे असलेल्या लोकांची मी सुटका करून त्यांना पळून जायला मदत केली असती –"

त्याच्या अंतःकरणात दुःख दाटून आलं होतं, हे तिच्या मातृहृदयाने जाणलं. पण तरीसुद्धा तिला त्याची कीव वाटली नाही. मात्र आपण काहीच बोललो नाही तर त्याला राग येईल असं वाटून ती म्हणाली, "तसं वाटत असेल तर जावं हेच चांगलं."

तितक्यात आंद्रेइ स्वयंपाकघरातून बाहेर आला. तो हसत हसत निकोलायला म्हणाला, "काय म्हणतो आहेस रे बाबा?"

"मी काहीतरी खायला आणते अं." असे म्हणत आई उठली.

निकोलायने थोडा वेळ खोखोलकडे टक लावून पाहिले व तो अचानकपणे म्हणाला, "मला वाटतं काही लोकांना जिवे मारणंच प्राप्त आहे."

"आं! ते काय म्हणून?" खोखोलने विचारले.

"त्यांचा काटा दूर व्हावा म्हणून."

खोखोलचं शरीर उंच व कृश होतं; तो खोलीच्या मधोमध उभे राहून आपल्या टाचांवर झुलत होता व निकोलायकडे तुच्छतेच्या वृत्तीने पाहत होता. निकोलाय थंडपणे खुर्चीत बसून धुराचे लोट काढीत होता व त्याच्याभोवती धुराचं वलय दिसत होतं. त्याच्या चेहऱ्यावर लाल डाग दिसत होते. तो आवेशाने म्हणाला,

"त्या बदमाश इसाइ गोर्बोवचा अजून मी कपाळमोक्ष केल्याशिवाय राहणार नाही! ते न करीन तर नाव बदलून देईन!"

"का रे बाबा?"

"लेकाचा साऱ्या मुलखाचा चहाडखोर अन् हेर आहे! त्यानेच माझ्या बापाला बिघडवून त्याला हेरगिरी करायला लावली!" निकोलायने हे उद्‌गार काढून आंद्रेइकडे पाहिलं तेव्हा त्याच्या नजरेत चीड व राग भरला होता.

"असं आहे काय?" खोखोलने आश्चर्य व्यक्त केले. "पण त्या गुन्ह्याचं खापर तुझ्या माथी फोडण्याइतका मूर्खपणा कुणी करणार आहे थोडाच?"

"हुशार न् मूर्ख सगळेच सारखे!" निकोलाय निश्चयपूर्ण स्वरात म्हणाला. "तुझं अन् पावेलचं घे. तुम्ही दोघंही हुशार आहात. पण तुम्हाला फ्योदोर माझिन किंवा सामोइलोवविषयी जे वाटतं, किंवा परस्परांविषयी जे वाटतं,

तेच माझ्याविषयी वाटतं कां? उगाच खोटं बोलू नकोस. अन् खोटं सांगितलं तरी माझा त्यावर विश्वास बसणार नाही. तुम्ही सगळेच मला टाळता व एका बाजूला ढकलता."

"तुझं चित्त ठिकाणावर नाही, निकोलाय!" खोखोल त्याच्या शेजारी बसून प्रेमळपणाने म्हणाला. निकोलाय पुढे बोलू लागला,

"मला वेदना होत आहेत हे खरं आहे. पण तुझंही अंतःकरण वेदनांनी विदीर्ण होत आहे. पण तुला तुझं स्वतःचं दुःख माझ्या दुःखापेक्षा श्रेष्ठ प्रतीचं वाटतं इतकंच काय ते. आपण सगळेच एकमेकांना बदमाष समजून वागतो इतकंच मला म्हणायचं आहे. काय, खरं आहे ना मी म्हणतो ते? बोल ना आता!"

त्याने आपली भेदक नजर आंद्रेइच्या चेहऱ्यावर रोखली व ओठ विलग करून तो खोखोलच्या बोलण्याची वाट पाहू लागला. लाल डाग असलेला त्याचा चेहरा निश्चल होता, पण त्याचे जाड ओठ मात्र थरथरत होते.

निकोलायच्या संतप्त डोळ्यांकडे पाहून खोखोल निराशापूर्ण स्मित करीत उत्तरला, "मला काहीच म्हणायचं नाही. एखाद्याच्या अंतःकरणाला झालेल्या जखमांतून रक्ताचा स्राव होत असताना त्याच्याशी वाद घालण्यानं त्याला अधिकच वेदना होतात, एवढंच मी जाणतो दोस्त!"

"तू अन् मी–आपल्याला चर्चा करणं जमणारच नाही. का कोण जाणे, पण तसं आहे खरं." जमिनीकडे नजर लावून निकोलाय पुटपुटला.

"मला वाटतं आपल्यापैकी प्रत्येकजण आपापल्या परीने बिकट परि-स्थितीतून गेलेला आहे." खोखोल म्हणाला. "प्रत्येकालाच अशा संकटकाळी मनाचा कोंडमारा सहन करावा लागला आहे–"

"तू मला काही सांगण्याची जरूर नाही." निकोलाय संथपणे म्हणाला. "माझा आत्मा तडफडतो आहे तो माझा मीच जाणे!"

"मी तुला काही सांगू इच्छीतही नाही. पण हीही अवस्था निघून जाईल एवढं मी जाणतो. निदान काही प्रमाणात तरी ती संपून जाईल."

खोखोलने मंद स्मित केलं व निकोलायच्या पाठीवर थाप मारून तो पुढे बोलू लागला,

"लहान मुलांना कांजण्या होतात तसलाच हा रोग आहे. आपल्याला सर्वांनाच केव्हा ना केव्हा त्याची बाधा झाल्यावाचून राहात नाही. ज्यांचं मन दणकट असतं त्यांना कमी त्रास होतो, पण दुबळ्या मनाच्या लोकांना



भारी जाणवतं ते. आणि ही बाधा अशा वेळी होते की जेव्हा आपण कोण आहोत हे समजून घेण्याचा आपण प्रयत्न करीत असतो; पण त्यावेळी एकंदर जीवन म्हणजे काय अन् त्यात आपलं स्थान काय हे आपणास धड समजलेलं नसतं. आपल्याला असं वाटू लागतं की आपणच काय ते फार श्रेष्ठ, पण तरीसुद्धा जगात कुणीच आपली कदर करीत नाही, व सगळेच जणु काय आपले लचके तोडायला टपून बसले आहेत! पण काही काळ गेला म्हणजे हे कळू लागतं की इतरांची अंतःकरणं सुद्धा काही वाईट नाहीत व हे समजू लागलं की मग त्या रोगाला उतार पडू लागतो. मग सर्व घंटांच्या गजरात जिचा आवाज ऐकूही येणार नाही अशी आपली लहानशी घंटा घेऊन मनोऱ्यात चढल्याबद्दल स्वतःला स्वतःचीच लाज वाटू लागते. आपण एकट्यानेच आपली घंटा वाजवली, तर तिचा आवाज मोठ्या घंटांच्या आवाजात बुडून जातो. हे खरं असलं तरी सर्व घंटा मिळून जो निनाद होता, तो वाढविण्यात आपल्या घंटेच्या आवाजाचीही मदत होत आहे, याची आपणांस जाणीव होते. काय, मी काय म्हणतो ते समजलं का?"

"कदाचित् समजलं असेलही, पण माझा–माझा कशावरही विश्वास बसत नाही." जोरजोराने मान हलवीत निकोलाय म्हणाला.

खोखोल मोठ्याने हसला व पाय आपटून येरझारा घालीत म्हणाला,

"एकेकाळी माझासुद्धा विश्वास बसत नव्हता. समजलास! मठ्ठ कुठला!"

"कां? मठ्ठ काय म्हणून?" निकोलाय खोखोलकडे पाहत एकाएकी हसू लागला.

"कारण तू तसा दिसतोस म्हणून."

निकोलाय खोखो करून हसला व आ वासून पाहू लागला.

खोखोल चकित होऊन त्याच्यासमोर येऊन थांबला व त्याने विचारले, "काय रे? असा हसतोस काय म्हणून?"

"नाही, माझ्या मनात सहज असा विचार आला की तुझ्या भावना दुखवण्याचा प्रयत्न करणं म्हणजे मूर्खपणाच ठरेल!"

"पण माझ्या भावना दुखावण्याचा प्रश्नच कुठे आला?" खांदे उडवीत खोखोल म्हणाला.

"ते मला माहीत नाही," निकोलाय मोकळेपणाने हसून म्हणाला. "पण तुला कुणी दुखवलंच तर त्याचं त्यालाच ते मागाहून खात राहील, एवढंच मला म्हणायचं होतं."

"अस्सं होय?" खोखोल हसून उद्गारला.

इतक्यात आतून आईची हाक आली. "आंद्र्यूशा!"

आंद्रेइ स्वयंपाक घरात गेला.

खोलीत एकटाच राहिल्यावर निकोलायने सभोवार नजर टाकली. नंतर त्याने एक पाय लांब केला. त्या पायातल्या जाड चामड्याच्या बुटाचं निरीक्षण केलं, आणि हातानं आपली पिंढरी चाचपून पाहिली. नंतर एक हात समोर धरून त्याने आपल्या जाडजूड तळहाताचं व तांबूस रंगाचे केस असलेल्या थोटक्या बोटांचं निरीक्षण केलं. मग जरा त्रासिकपणे हात झटकून टाकून तो उठला.

आंद्रेइ चहाची किटली घेऊन आला तेव्हा निकोलाय आरशासमोर उभा होता. आंद्रेइला पाहून तो म्हणाला, "आज कितीतरी दिवसांनी मी हे माझं थोबाड आरशात पाहत आहे!" मग केविलवाणं स्मित करीत तो म्हणाला, "खरंच, काय पण हे रूप माझं?"

"हं. पण तुला त्याची पर्वा करण्याचं कारणच काय?" आंद्रेइ त्याच्याकडे कुतूहलपूर्ण नजरेने पाहत म्हणाला.

"साशा म्हणते, माणसाच्या चेहऱ्यात त्याचं अंतरंग प्रतिबिंबित होत असतं."

"छट! तिचं स्वतःचंच नाक मासे पकडण्याच्या गळाच्या आकड्यासारखं अन् गालाची हाडं सुरीच्या पातीसारखी आहेत. पण तरी तिचं अंतःकरण एखाद्या तारकेप्रमाणे आहे!" खोखोल म्हणाला.

निकोलायने त्याच्याकडे पाहून स्मित केलं.

त्या दोघांनी चहापानाला आरंभ केला. निकोलायने एक मोठासा बटाटा घेतला, पावाच्या तुकड्यावर मीठ भुरभुरले व तो सावकाशपणे, एखाद्या बैलानं रवंथ करावी तसा ते तुकडे चघळू लागला.

तोंडात घास भरलेला असतानाच निकोलायने विचारले, "इथे बाहेरची काय हकीकत?"

कारखान्यात प्रचाराचे काम कसे जोरात सुरू होते, त्याचे आंद्रेइने मोठ्या उत्साहाने वर्णन केले, पण ते ऐकून निकोलाय पुनः चिंताक्रांतच झालेला दिसला. तो म्हणाला,

"इतकं हळूहळू काम करून कसं चालेल? आपल्या कामाचा वेग वाढवला पाहिजे."



आईने त्याच्याकडे पाहिलं व तिच्या मनात त्याच्याविषयी प्रतिकूल भावना निर्माण झाली.

"जीवन म्हणजे काही एखादा घोडा नव्हे, की तो हळू चालला तर चाबकाने फटकारे मारून त्याला पळायला लावावं!" आंद्रेइ म्हणाला.

"अं हं! पण याला तर काही गतीच नाही!" निकोलाय जोरात मान हलवून म्हणाला, "इतकं धीमेपणानं गाडं चाललं तर माझ्याने धीर धरवणार नाही. मी करू तरी काय?"

त्याने अगदी अगतिक व असहाय असल्यागत हालचाल करून तो उत्तराच्या अपेक्षेने खोखोलकडे पाहू लागला.

"असं कसं बरं? आपल्या सर्वांनाच अभ्यास करायला पाहिजे अन् आपण एकमेकांना शिकवायलाही हवं. सध्या हेच करायचं!" आंद्रेइ मान खाली घालून उत्तरला.

"पण मग प्रत्यक्ष लढ्याला केव्हा सुरवात होणार?" निकोलायने विचारलं.

"प्रत्यक्ष लढ्याला प्रारंभ केव्हा होईल ते मला सांगता येणार नाही. परंतु त्यापूर्वी अनेकदा ते आपल्यावर हल्ले करून आपल्याला जेरीस आणतील हे मात्र मी नक्की सांगतो."

किंचित् थांबून व हसून खोखोल पुढे म्हणाला, "म्हणून मला तरी असं वाटतं की आपण आपले हात सुसज्ज करण्यापूर्वी आपलं ज्ञान वाढवायला पाहिजे."

निकोलाय काही न बोलता खाण्याचे जिन्नस संपवू लागला. आई मधूनमधून त्याला नकळत त्याच्याकडे पाहत होती. त्याच्या धिप्पाड, जाडजूड शरीराला साजेसे काही भाव त्याच्या रुंद चेहऱ्यावर दिसतात का हे तिला शोधून काढायचं होतं. मधूनच एखाद वेळ त्याची भेदक नजर तिच्या नजरेला भिडे व मग तिच्या भुवया जोरजोराने उडू लागत.

आंद्रेइ अत्यंत अस्वस्थ झालेला होता. तो मधूनच हसून बोलू लागे व पुनः मध्येच बोलणं थांबवून शीळ घालू लागे. त्याच्या बेचैनीचं कारण आपल्याला समजलं आहे असं आईला वाटत होतं.

निकोलाय खाण्यात दंग होता. खोखोलने काही विचारलं की तो नाखुषीने तुटक उत्तर देई व पुनः विचारात गढून जाई.

या प्रकारामुळे आपण बसलो आहोत ती खोली संकुचित होते आहे

असं आंद्रेइ व आई दोघांनाही वाटू लागलं व ते दोघेही अस्वस्थ होऊन पाळीपाळीने निकोलायकडे दृष्टिक्षेप करीत होते.

अखेर निकोलाय खाणं संपवून उठला व म्हणाला, "मी झोपतो आता. तुरुंगात माझं अगदी डोकं फिरायची वेळ आली होती बसून बसून. अन् मग अचानक त्यांनी मला सोडून दिलं, म्हणून मी निघून आलो. मी फारच दमलो आहे."

एवढं बोलून तो तडक स्वयंपाकघराच्या खोलीत शिरला. थोडा वेळ त्याच्या पावलांचा आवाज ऐकू येत होता. नंतर तोही बंद होऊन सर्व स्तब्ध झाले.

आई अगदी हळू आवाजात आंद्रेइला म्हणाली, "त्याच्या मनात भयंकरच विचार आहेत!"

खोखोल मान हलवीत तिला म्हणाला, "त्याला आवरणं फार कठीण आहे. पण ही अवस्था फार काळ टिकणार नाही. एके काळी मी स्वतः सुद्धा असाच तडफडत होतो. अंतःकरणात ज्योत प्रज्वलित होण्यापूर्वी बराच वेळ धूर निघतो. बरं, तू झोप आता, नेनको, मी थोडा वेळ वाचत बसणार आहे."

कोपऱ्यात कापडाच्या पडद्याआड तिचं आंथरूण होतं. त्या पडद्याआडून बराच वेळपर्यंत तिचे उसासे व प्रार्थनेचे अस्पष्ट उच्चार आंद्रेइला ऐकू येत होते. तो स्वतः भराभर पुस्तकाची पानं उलटीत होता. त्याच्या हातांनी तो सारखा कपाळ चोळी किंवा आपल्या लांब बोटांनी मिशांना पीळ भरी. त्याच्या पायांचीही चुळबूळ सारखी सुरू होती. त्या शांत वातावरणात घड्याळाची टिक्‌टिक् व झाडांच्या पानांत सळसळणारा वाऱ्याचा आवाज ऐकू येत होता.

बऱ्याच वेळानंतर आईच्या मृदु आवाजात उच्चारलेले शब्द त्याच्या कानांत शिरले. आई म्हणत होती,

"देवा, जगात ही इतकी असंख्य माणसं, पण ही सगळीच कशी रे दुःखीकष्टी? मग सुखी आहेत तरी कोण न् कुठे?"

"सुखी लोकसुद्धा या जगात आहेत, नेनको!" आंद्रेइ उत्तरला. "अन् लवकरच अशा सुखी लोकांची संख्या वाढलेली दिसेल. अगदी खूप, खूप!"

## २१

दिवसामागून दिवस जात होते. रोज काही ना काही नवं घडत होतं. अन् सरावामुळे आईला आता त्या घटनांचं भय वाटेनासं झालं होतं. त्यांच्या घरी आता पूर्वीपेक्षाही अधिक प्रमाणात लोकांची वर्दळ सुरू झाली.



अनेक अनोळखी लोक संध्याकाळच्या वेळी येत, अगदी हळू आवाजात आंद्रेइशी गंभीरपणे चर्चा करीत, आणि नंतर कोटाच्या कॉलरी उंच करून व डोळ्यांवर टोप्या ओढून घेऊन आवाज न करता बाहेरच्या काळोखात नाहीसे होत. त्यांच्यापैकी प्रत्येकजण कसल्यातरी उत्साहाने भरलेला होता हे तिला समजत होतं. त्यांना सर्वांना बहुधा वाटत असावं की आपण मुक्त कंठाने गाऊ या, हसू या. पण त्यांना हे करायला वेळच नव्हता. सगळेचजण कसल्या तरी घाईगडबडीत होते. काहीजण गंभीरपणे व व्यंगपूर्ण बोलत, तर काहीजण तारुण्याला साजेशा उत्साहाने व मोकळेपणाने वागत. इतर काहीजण मात्र शांत व विचारमग्न असायचे. त्या सर्वांमध्ये एक प्रकारचा आत्मविश्वास व चिकाटी होती. प्रत्येकाचं काही व्यक्तिमत्व असलं तरी त्या सर्वांचे चेहरे मिळून एकच चेहरा होत असल्याचा भास होई. अन् तो चेहरा एमॉसला चाललेल्या येशू ख्रिस्ताच्या चेहऱ्यासारखा, शांत अन् गंभीर, करारी व निश्चयी, अन् नेत्रांत प्रेमळपणा व कठोरपणाचं मिश्रण असलेला, असा असल्याचं तिला राहून राहून वाटायचं.

या सर्व लोकांची संख्या मोजून आई मनाशी हिशेब करी की हे सर्व लोक पावेलच्या भोवती गराडा घालून उभे राहिले तर शत्रूला त्याचं नख सुद्धा दृष्टीस पडणार नाही!

एक दिवस एक चुणचुणीत, कुरळ्या केसांची मुलगी शहरातून आंद्रेइला देण्यासाठी एक पुडकं घेऊन आली. ती परत जायला निघाली तेव्हा तिचे डोळे आनंदाने चमकत होते. निघतेवेळी ती आईला म्हणाली,

"बरंय कॉमरेड! मी येते आता."

"ये बरं बाळ!" आईने तोंडावर आलेलं स्मित फारसं दिसू न देता तिला निरोप दिला.

ती मुलगी दारातून बाहेर पडल्यावर आई खिडकीतून तिच्या या कॉमरेडकडे पाहू लागली. वसंतऋतूतील फुलाप्रमाणे प्रफुल्लित व फुलपाखराप्रमाणे बागडणाऱ्या वृत्तीची ती मुलगी लगबगीने पावलं टाकीत जात होती. "कॉमरेड!" ती दूर जाऊन दिसेनाशी झाल्यावर आई उद्‌गारली, "चिमुरडी पोर, पण किती चलाख! पोरी! देवानं तुला एक खराखुरा कॉमरेड जन्माच्या सोबतीला द्यावा एवढंच माझं मागणं!"

या शहरातून येणाऱ्या लोकांमध्ये एक प्रकारचा अल्लडपणा दिसून येई व तो पाहून आईचं अंतःकरण प्रेमभराने स्मित करी. पण त्यांची श्रद्धा

अन् निष्ठा अत्यंत दृढ आहे हेही दिवसेंदिवस तिला प्रतीत होऊ लागल्यामुळे तिला आश्चर्य व आनंद वाटून त्यांच्याविषयी तिच्या मनात आदरही निर्माण झाला. आपली बाजू न्यायाची असल्यामुळे एक दिवस आपला विजय होणारच अशी जी उज्वल भविष्यकाळाची स्वप्नं ते पाहत, त्यामुळे तिचं अंतःकरण भरून येई, पण त्याचबरोबर का कोण जाणे, त्यांचं बोलणं ऐकताना तिच्या अंतःकरणात दुःखाचे कढही येत. ते लोक अगदी साधे व सरळ होते व त्यांच्या वागण्यात स्वार्थ व स्वतःचं हित यांविषयीची यत्किंचित्ही पर्वा दिसून येत नव्हती. या त्यांच्या निःस्वार्थीपणाचं तिला फार कौतुक वाटे.

ते जीवनाविषयीचं जे काही विवेचन करीत, त्यातल्या पुष्कळ गोष्टींचा अर्थ तिला आता समजू लागला होता. मानवी दुःखाचं मूळ कशात आहे हे यांनी शोधून काढलं आहे, अशी तिची भावना झाली होती व त्यांची बहुतेक मतं तिला आता पटू लागली होती. पण तरीसुद्धा तिला वाटे की सबंध जीवनात परिवर्तन घडवून आणणं अन् त्यांनी जी ज्योत पेटवली होती तिच्याभोवती सर्व श्रमजीवि लोकांना एकत्र आणणं हे ध्येय साध्य होणं शक्य नाही. प्रत्येकजण स्वतःच्या पोटाची खळगी भरण्याच्या मागे लागला आहे, उद्यापर्यंत सुद्धा थांबायला कुणी तयार नाही, मग हे व्हावं कसं?

या दुर्गम व खडतर मार्गाने जाण्याची फारच थोड्या लोकांनी तयारी दाखविली असती. हा मार्ग आक्रमिल्यानंतर शेवटी मानवी बंधुत्वाचं जे राज्य येणार आहे, त्याच्या भव्यतेची कल्पना फारच थोडे लोक करू शकले असते. म्हणूनच, थकव्यामुळे सुकून गेलेल्या या लोकांच्या चेहऱ्यांवर दाढी-मिशा आल्या असल्या आणि ते प्रौढांसारखे दिसत असले तरी आईला ते लहान मुलांप्रमाणे वाटत होते. आपली मान हलवून ती स्वतःशीच म्हणत असे, "गरीब बिचारे!"

पण ते सर्वजण प्रामाणिक, गंभीर आणि बुद्धिसंगत जीवन व्यतीत करीत होते. लोकांच्या हितासाठी झटावं हाच त्यांच्या बोलण्याचा विषय होता आणि आपल्याला मिळालेलं ज्ञान इतरांना शिकविण्यासाठी ते किंचित् सुद्धा कुचराई करीत नव्हते. अशा रीतीने जगण्याचा मार्ग संकटमय असला तरी त्यात आनंद भरला आहे, हे तिला उमजलं आणि एक उसासा टाकून तिने स्वतःच्या पूर्वायुष्याच्या अंधःकारमय व संकुचित मार्गाकडे पाहिलं.



या नव्या प्रकारच्या जीवनक्रमात आपल्यालाही काहीतरी महत्वाचं स्थान आहे व आपणही काहीतरी करू शकू, याचीही तिला हळूहळू तीव्रतेने जाणीव होऊ लागली. पूर्वी तिला आपली गरज आहे असं कधीच वाटलं नव्हतं. पण आता अनेक लोकांना आपली गरज आहे, आपलाही काहीतरी उपयोग आहे, असं तिला दिसून येऊ लागलं. या नव्या जाणिवेनं तिच्या जीवनात एक निराळाच आनंद, एक नवचैतन्य निर्माण केलं. व त्यामुळे तिला स्वतःचा अभिमान वाटू लागला.

कारखान्यात नियमितपणे पत्रकं पोचवण्याचं काम ती कर्तव्य मानून पार पाडीत होती. ती नेहमीच दिसू लागल्यामुळे गुप्त हेरांनाही तिला पाहणं सरावाचं होऊन ते तिच्याकडे लक्ष देईनासे झाले. पुष्कळदा त्यांनी तिची झडती घेतली, पण ही झडती होई ती नेमकी पत्रकं वाटली गेल्याच्या दुसऱ्या दिवशी! तिच्याजवळ पत्रकं नसतील त्या दिवशी ती मुद्दाम रखवालदारांना संशय येईल असं वागे. मग ते तिला अडवून तिची झडती घेत. ती त्यांच्याशी पुष्कळ वाद घाली व अपमान झाल्याचीही बतावणी करी. शेवटी त्यांची फजिती झाली म्हणजे मग आपल्या चातुर्याचा अभिमान वाटून ती आत जाई. रखवालदारांची अशी फजिती करण्याच्या या खेळात तिला एक प्रकारची मौज व करमणूकच वाटू लागली.

वेसोव्श्चिकोवला पुनः कारखान्यात काम मिळालं नाही. तो एका लाकडाच्या दुकानात नोकरीला राहिला. लाकडाचे ओंडके, फळ्या, सर्पण वाहून नेण्याचे काम त्याच्याकडे होते. अगदी हाडकुळ्या, काळ्या घोड्यांच्या गाडीत हे ओझे वाहून नेताना तो रोज आईच्या दृष्टीस पडे. त्या घोड्यांना एवढे ओझे सहन न झाल्यामुळे त्यांचे पाय कापत व ते अडखळत अडखळत पावले टाकीत तेव्हा त्यांच्या डोळ्यांत प्राण आल्यासारखा वाटे. त्यांच्यामागे गाडीत एखादा लांब ओलसर ओंडका अगर फळ्यांचा ढीग असायचा व त्यांचा खाडखाड आवाज सुरू असायचा. गाडीच्या बाजूने घोड्यांचा लगाम हातात धरून निकोलाय चालायचा. मळके व फाटलेले कपडे, भलेमोठे बूट, टोपी मागे सारलेली, जणु काय जमिनीतून उखडून काढलेल्या झाडाच्या बुंध्यासारखा विलक्षण असा त्याचा अवतार असायचा. तोही त्याच्या घोड्यांसारखाच मस्तक हलवीत चाले व त्याची नजर जमिनीवर खिळलेली असे. त्याचे घोडे अनेकदा समोरून येणाऱ्या गाड्यांशी व माणसांशी टक्कर देत व मग लोक निकोलायवर शिव्याशापांचा भडिमार करीत. पण तो कधीच

त्यांना उत्तर देत नसे की मान वर उचलून पाहत नसे. फक्त कर्कश शीळ घालून तो घोड्यांना उद्देशून पुटपुटायचा, "हूं! नीट चाला बरं आता!"

परदेशी वृत्तपत्राचा ताजा अंक किंवा एखादे पत्रक वाचून दाखविण्यासाठी आंद्रेइ जेव्हा जेव्हा आपल्या कॉमरेड्सना एकत्र बोलावी, तेव्हा निकोलाय तेथे येऊन कोपऱ्यातली जागा घेई व तास दोन तास निमूटपणे जे कानावर पडेल ते ऐकत राही. वाचन संपल्यावर त्या तरुण मंडळीत कडाक्याचे वाद चालत, पण निकोलाय कधीही त्यात भाग घेत नसे. मात्र सर्वजण निघून जाईपर्यंत तो बसून राही व मग आंद्रेइ एकटा राहिला म्हणजे तो त्याच्याशी चर्चा करी.

"पण या सगळ्या परिस्थितीला जबाबदार कोण?" तो विचारी.

"ही वस्तु माझ्या मालकीची आहे, असं जो कोणी माणूस प्रथम म्हणाला असेल तोच खरा दोषी! पण त्या बिचाऱ्याला मरून आज हजारो वर्षे झाली, तेव्हा त्याच्यावर रागावण्यातही आता काही अर्थ नाही!" खोखोल विनोदाने उत्तर देई; पण हे म्हणत असताना त्याच्या नेत्रांतील असमाधानाची छटा स्तष्ट झाल्यावाचून राहत नसे.

"पण श्रीमंत लोकांचं काय? आणि त्यांना हातभार लावणारे लोक?"

अशा वेळी खोखोल आपल्या केसांशी चाळा करी व मिशांना पीळ देई. त्याला जीवनाविषयीचं जे ज्ञान होतं ते निकोलायला समजावून सांगण्यासाठी अगदी साधे व सोपे शब्द हुडकून काढण्याचा तो प्रयत्न करी. त्याच्या मते सर्वच लोक दोषी असत, पण या उत्तरानेही निकोलायचं समाधान होत नसे. आपले ओठ घट्ट दाबून व नकारार्थी मान हलवून तो पुटपुटे. "छे! हे काही पटत नाही बुवा!" आणि मग तो अशाच असमाधानी व असंतुष्ट मनःस्थितीत तेथून निघून जाई.

एकदा तो म्हणाला, "छे! काही विशिष्ट लोकच दोषी आहेत अन् हे लोक इथेच आहेत. सगळं जीवनच शेतासारखं नांगरून काढून ही बांडगुळं मुळीच दयामाया न दाखवता उखडून फेकली पाहिजेत!"

यावर आईला काहीतरी आठवण होऊन ती म्हणाली, "टाइमकीपर इसाइ तुमच्या विषयी असंच म्हणत असल्याचं आठवतं मला."

"इसाइ?" निकोलायने जरा थांबून विचारलं.



"हो. तोच फार भयंकर माणूस आहे तो. सर्वांवर पाळत ठेवून असतो व सारखे प्रश्न विचारीत असतो. अलीकडे त्याच्या इकडेही फेऱ्या सुरू झाल्या आहेत अन् कधी कधी तर तो या खिडकीतून आत सुद्धा डोकावतो."

"या खिडकीतून आत डोकावतो?" निकोलायने विचारले.

आई बिछान्यावर पडून होती, त्यामुळे तिला निकोलायचा चेहरा दिसला नाही. पण त्यावर खोखोलनेच घाईघाईने जे उत्तर दिले त्यावरून तिला आपली असं बोलण्यात चूक झाल्याचं कळून आलं. खोखोल म्हणाला,

"त्याला इतकं रिकामपण असेल अन् उद्योग नसेल तर डोकावी ना बापडा!"

"छे! तसं मुळीच नाही!" निकोलाय म्हणाला. "आपण ज्यांना दोषी ठरवतो त्यांतलाच एक आहे तो."

"दोषी? कशाबद्दल दोषी? मूर्खपणाबद्दल?" खोखलने लगेच उलट प्रश्न केला.

वेसोव्श्रिकोव काहीच उत्तर न देता निघून गेला.

खोखोल उठून सावकाशपणे खोलीत येरझारा घालू लागला. त्याच्या लांब, कोळयाच्या पायासारख्या पायांचा सरसरल्यासारखा आवाज होत होता. आईला त्रास होऊ नये म्हणून आजही त्याने नेहमीप्रमाणेच बूट काढून ठेवले होते. पण तिला झोप लागलेलीच नव्हती.

निकोलाय निघून गेल्यावर ती चिंताग्रस्त होऊन म्हणाली, "मला या माणसाची फार भीती वाटते बघ!"

"हूं—खरं आहे." खोखोल उत्तरला. "त्याने काही तरी नक्की ठरविल्यासारखं दिसतंय. त्याच्यासमोर इसाइचं नाव पुनः काढता कामा नये इसाइ खरोखरच गुप्त हेराचं काम करतो."

"त्यात नवल नाहीच. तो ज्याला बापासारखा मानतो असा त्याचा धर्मपिता पोलिसात होताच." आई म्हणाली.

खोखोल अस्वस्थ झाला होता. तो म्हणाला, "एक दिवस तो या निकोलायच्या हातचा खरपूस मार खाईल खास! आपल्यावर राज्य करणाऱ्या बड्या लोकांनी सामान्य लोकांच्या अंतःकरणात कशा भावना निर्माण केल्या आहेत पहा! एकदा निकोलायसारख्या माणसांना तीव्रतेने जाणीव झाली व त्यांच्या सहनशीलतेची मर्यादा संपली म्हणजे किती भयंकर प्रसंग

ओढवेल! सारं आकाशपाताळ एक होऊन जगभर नुसत्या रक्ताच्या नद्या वाहू लागतील!"

"बापरे! काय अनर्थ होईल असं झालं तर!"

"त्याला काय इलाज? माशा पोटात घातल्या तर ओकारी व्हायचीच!" मिनिटभर स्तब्ध राहून आंद्रेइ बोलू लागला. "पण बडचा लोकांनी अत्याचार करून सामान्य लोकांना अश्रू ढाळावयास लावले आहेत, व या अश्रूंचा एवढा मोठा समुद्र झाला आहे की बडचा लोकांच्या रक्ताचा प्रत्येक थेंब या समुद्रात लुप्त होऊन जाईल."

त्याने किंचित् हसल्यासारखं केलं व तो संथपणे म्हणाला, "हे सगळं मनाला बेचैन करून सोडणारं चित्र असलं तरी ते खरं आहे, यात शंकाच नाही."

## २२

रविवारचा दिवस होता. आई बाजारात गेली होती. ती परत आली व दार उघडून उंबरठ्यापाशी उभी राहिली, तो कसल्या तरी अवर्णनीय आनंदाने भारून जाऊन ती उभ्या जागीच खिळल्यासारखी झाली. आतल्या खोलीतून पावेलचा खणखणीत आवाज तिच्या कानी आला होता.

"ती आलीच बघ!" खोखोल ओरडला.

पावेलने वळून तिच्याकडे पाहिले. त्याच्या चेहऱ्यावर प्रसन्नतेचे भाव उमटले. आईच्या दृष्टीने त्याची प्रसन्नता फार आशादायी होती.

"आलास एकदाचा परत?" तिच्या तोंडातून कसेबसे एवढेच उद्गार बाहेर पडले व ती खाली बसली. त्याच्या आकस्मिक आगमनामुळे ती भारावून गेली होती.

पावेलचा चेहरा फिकट पडलेला होता. त्याचे ओठ कापत होते व नेत्रात अश्रू चमकत होते. क्षणभर तो काहीच न बोलता स्तब्ध राहिला. आईही काही न बोलता त्याच्याकडे टक लावून पाहत होती.

खोखोल त्या दोघांना तशाच अवस्थेत सोडून बारीक शीळ घालीत बाहेर निघून गेला.

"आई, तू किती चांगली आहेस ग!" आईचा हात आपल्या कापणाऱ्या बोटांनी दाबून पावेल उद्गारला. "तू खरंच फार मोठी कामगिरी बजावलीस, आई!"



त्याच्या चेहऱ्यावरील प्रसन्नतेचे भाव व त्याच्या आवाजातील मार्दव पाहून आई फारच हर्षित झाली. तिनं त्याचे मस्तक कुरवाळलं व आपल्या अंतःकरणातली खळबळ शांत करण्याचा ती प्रयत्न करू लागली.

"वा रे वा! मी असं केलं तरी काय मोठंसं?"

"आमच्या महान् कार्यात तुझी फारच मोलाची मदत झाली आहे, आई. अशा महत्त्वाच्या कार्यात आपली आईसुद्धा आपली सहकारी आहे, असं म्हणता येण्याइतकं सद्भाग्य फार थोडचा लोकांच्या नशिबी असतं, आई!"

ती स्तब्ध राहून त्याचा शब्द न् शब्द अंतःकरणात साठवून घेत होती. आपल्या या सद्गुणी, प्रेमळ पुत्राचे कौतुक तिच्या अंतरंगात मावत नव्हते.

"तुला हे सगळं किती जड जात होतं, हे मला कळत होतं, आई. तुला त्यातलं पुष्कळसं पटत नसेल याचीही मला कल्पना होती. मला वाटायचं, हिला आपलं करणं कधीच मानवणार नाही, आपले विचार कधीच पटायचे नाहीत, अन् मग मला वाटे, तू जन्मभर निमूटपणे दुःख सहन केलंस तशीच यापुढेही करीत राहणार. हा विचार मला नेहमीच अस्वस्थ करून सोडी."

"आंद्रयूशाने मला बऱ्याच गोष्टी समजून घेण्याला मोठीच मदत केली."

"हो. त्याने पुष्कळ सांगितलं मला तुझ्याबद्दल." पावेल हसत म्हणाला.

"येगोरची सुद्धा पुष्कळ मदत झाली. तो तर माझ्या गावचाच आहे. अन् आंद्रयूशा तर मला वाचायला सुद्धा शिकवायचं म्हणत होता!"

"पण तुला त्याची लाज वाटली अन् तू स्वतःच गुपचूप वाचायला शिकू लागलीस, खरं ना?"

"तर मग त्याने ते ओळखलं तर!" ती उद्गारली. आनंदातिशयाने अस्वस्थ होऊन ती म्हणाली, "त्याला आत बोलवलं पाहिजे. आपल्याला मोकळेपणाने बोलण्याला संकोच वाटू नये म्हणून मुद्दामच तो बाहेर गेला. आईचं सुख नशिबी नाही बिचाऱ्याच्या!"

"आंद्रेइ!" दार उघडून पावेलने हाक मारली. "कुठे आहेस रे तू?"

"हा इकडे. थोडी लाकडं फोडून ठेवत होतो."

"ते राहू दे. तू आत ये पाहू!"

तरी सुद्धा आंद्रेइ एकदम आत आला नाही. आणि नंतर सुद्धा तो स्वयंपाकघरात आला तेव्हा तो घरकामाबद्दलच बोलू लागला.

"मला निकोलायकडे जाऊन त्याला लाकडं आणायला सांगितलंच पाहिजे. घरातलं सर्पण जवळजवळ संपलंच आहे. अन् आपल्या या लाडक्या पावेलला तर नीट पहा, नेनको! या बंडखोरांना शिक्षा करण्याऐवजी त्यांची खाण्यापिण्याची चंगळ केलेली दिसतेय अधिकाऱ्यांनी!"

आईला हसू आलं. तिच्या अंतःकरणात अजूनही हर्षाला भरती आलेली होती व तिचे हृदय आनंदाने नाचत होते. परंतु ती समजूतदार असल्यामुळे तिचे एक मन सांगत होते, पावेल पुनः नेहमीसारखा शांत व गंभीर झालेलाच चांगला! आजचा हा क्षण अवर्णनीय आनंदाचा होता व तिला वाटत होतं, आपल्या आयुष्यातला हा पहिला आनंद या क्षणाइतक्याच उत्कटतेनं व आवेगानं आपल्या अंतःकरणात साठवून ठेवता आला तर किती बरं होईल! त्या आनंदाचा भर ओसरेल की काय अशी तिला भीती वाटत होती. त्यामुळे अवचित एखादा दुर्मिळ पक्षी सापडला म्हणजे शिकारी त्याला जसा जपून ठेवण्याचा प्रयत्न करतो, तसा ती तो आनंदाचा क्षण जतन करून ठेवण्याचा प्रयत्न करीत होती.

"चल, तुला जेवायचं असेल नाही, पाशा? तू काही खाल्लं नसेलच." तिने उठता उठता विचारले.

"नाही ना! कालच मला जेलरने सांगितलं की आज माझी सुटका करण्याचा हुकूम आला आहे. तेव्हापासून मला खाणंपिणं सुचलंच नाही."

पावेल पुढं सांगू लागला. "बाहेर आल्यावर अगदी प्रथम मला भेटला तो सिझोव. मला पाहताच तो रस्ता ओलांडून माझ्याकडे आला. मी त्याला सांगितलं, बाबा रे, आता जरा सावधगिरीने वाग! आता मला भेटण्यात न् माझ्याशी बोलण्यात धोका आहे. माझ्यावर पोलिसांची नजर असणार! पण तो म्हणाला की मला त्याची पर्वा नाही. अन् मग त्याने त्याच्या पुतण्याविषयी विचारलं. फ्योदोर तुरुंगात चांगलं वागतो की नाही असं त्यानं विचारलं. त्यावर मी म्हणालो, 'तुरुंगात चांगलं कसं वागायचं?' तसा तो म्हणाला, 'तो आपल्या कॉमरेड्सविषयी भलतंसलतं बोलत नाही न् चहाड्या करीत नाही ना?' तसं काही नाही व फ्योदोर फार चांगला, इमानदार व हुशार आहे असं मी सांगितलं तेव्हा सिझोव आपली दाढी कुरवाळीत मोठ्या अभिमानाने म्हणाला, 'आमचे सिझोव घराणं आहेच तसं! त्यात कुणी दगाबाज निघणंच शक्य नाही!'"

"तो म्हातारा आहेच तसा डोकेबाज!" खोखोल म्हणाला, "मी



त्याच्याशी पुष्कळदा बोललो आहे. उमदा गडी आहे तो. त्याच्या फ्योदोरलाही लवकर सोडणार आहेत का?"

"होय. तोच नव्हे तर सगळेच जण लवकर सुटावेत असं वाटतं खरं. म्हातारा इसाइ म्हणतो त्याखेरीज दुसरा पुरावाच नाही त्यांच्याविरुद्ध. अन् इसाइ सांगणार त्यात तरी विशेष असं काय असणार?"

आई इकडून तिकडे फिरत असताना सुद्धा तिची नजर पावेलवरून निघत नव्हती. आंद्रेइ पाठीशी हात बांधून खिडकीत उभा होता व पावेलचं बोलणं लक्षपूर्वक ऐकत होता. पावेल खोलीत येरझारा घालीत होता. तुरुंगवासात त्याने दाढी वाढू दिली होती. त्या काळ्याभोर कुरळ्या केसांची लहानलहान वर्तुळे तयार झाली होती. त्यामुळे त्याच्या चेहऱ्याचा मूळचा कठोरपणा बराच कमी झाल्यासारखा भासत होता.

ताटं मांडून होताच आई म्हणाली, "हं बसा. आता जेवून घ्या पाहू."

जेवण चालू असताना आंद्रेइने पावेलला रिबिनबद्दल सांगितलं.

"मी घरी असतो तर त्याला जाऊ दिलं नसतं." आंद्रेइने सांगितलेली हकीकत ऐकून व्यथित अंतःकरणाने पावेल म्हणाला. "त्याला बरोबर न्यायला तरी काय होतं? मनाचं असमाधान, राग अन विचारांचा गोंधळ, हेच ना?"

"अरे बाबा, चाळीशी उलटली न् सारा जन्म आतल्या आत जळण्यात गेला असला म्हणजे विचारात परिवर्तन होणं कठीण काम!" खोखोल हसून उद्‌गारला.

अन् मग नेहमीप्रमाणे अशी काही चर्चा सुरू झाली की आईला त्यातलं काही पचनी पडेना. मग जेवण संपलं तरी ते एकमेकांवर जोरदार शाब्दिक हल्ले चढवीतच होते. मधूनमधून त्यांची भाषा सोपी व सरळ असायची.

"आपल्याला सारखं पुढेच गेलं पाहिजे, एक पाऊल सुद्धा मागे घेता कामा नये!" पावेल निश्चयी स्वरात उद्‌गारला.

"म्हणजे लाखो-करोडो लोकांना वाटेल, आपण त्यांचे दुष्मनंच आहोत म्हणून!"

त्यांचा कडाक्याचा वाद ऐकल्यावर आईच्या एवढं ध्यानात येऊन चुकलं की पावेलच्या दृष्टीने शेतकऱ्यांचा काडीइतकाही उपयोग नव्हता, व उलट खोखोल मात्र शेतकऱ्यांची बाजू घेत होता आणि शेतकऱ्यांनासुद्धा योग्य मार्ग दाखविणं आवश्यक आहे असं त्याचं मत होतं. तिला आंद्रेइचंच मत

अधिक कळत होतं व पटतही होतं. तरीसुद्धा तो पावेलला उद्देशून काही बोलला की पावेलला राग तर आला नाही ना अशा शंकेने व्याकुळ होऊन ती पावेलचं उत्तर ऐकण्याला आतुर होई. पण ते दोघेही मुळीच न रागावता व न चिडता कडाक्याचा वाद करीत होते.

"तू म्हणतोस ते खरं का रे, पावेल? ती मधूनच विचारी.

"होय. खरं आहे, आई!" पावेल हसून उत्तर देई.

"अहो महाशय!" अखेर खोखोलच जरा मिस्किलपणे म्हणाला. "तुला यथेच्छ जेवण मिळालंय, पण तू मात्र नीट चावून खाल्लेलं दिसत नाही. म्हणूनच घशात काहीतरी अडकलेलं दिसतंय! एखादा घोट घे म्हणजे बरं होईल."

"भारीच विलक्षण दिसतोस रे तू!"

"तर तर!" खोखोल उद्गारला.

आईने मृदु हास्य करून मान हलवली.

## २३

वसंत ऋतूच्या आगमनाबरोबर बर्फ वितळून जाऊन रस्त्यावरचा चिखल व घाण पुन: उघडी पडली होती. रोज तो चिखल अधिकाधिक डोळ्यांत भरण्याइतका वाढत होता, व ती सगळी वसाहत ओंगळ व घाण दिसत होती. दिवसाच्या वेळी छपरावरून पाण्याच्या पागोळ्या गळत व घरांच्या भिंतीवरून घाम गळल्यासारखं पाणी झिरपत राही. पण रात्रीच्या वेळी बर्फाचे लहान तुकडे चमकताना दिसत. दिवसा सूर्यनारायण अधिक वेळपर्यंत आकाशात रेंगाळत राहू लागला. तसेच गावाबाहेर दलदलीकडे वाहत जाणाऱ्या ओहोळांच्या पाण्याची खळखळही अधिकाधिक स्पष्टपणे कानावर पडू लागली.

मे–दिन साजरा करण्याची तयारीही जोरात सुरू झाली होती.

मे–दिनाचे महत्त्व समजावून सांगणाऱ्या मजकुराची पत्रके कारखान्यात व गावात सर्वत्र वाटण्यात आली होती. आजवरच्या प्रचाराचा ज्यांच्यावर परिणाम झाला नव्हता असे तरुण लोकही म्हणू लागले, "आपल्याला सुद्धा तयारीला लागलंच पाहिजे, बरं का!"



वेसोव्श्चिकोव मिस्किलपणे हसत म्हणाला, "बस झालं हे लपून छपून काम! आता उघडपणेच काम केलं पाहिजे!"

फ्योदोर माझिनच्या अंगात उत्साह संचारला होता. चंडोल पक्षी पिंजऱ्यात कोंडल्यामुळे सुकून जावा तसा तो खंगून गेला होता व त्याच्या बोलण्याचालण्यातही एक प्रकारचा कंप उत्पन्न झाला होता. याकोव सोमोव नावाचा एक अकाली गंभीर बनलेला पण अत्यंत अबोल असा एक पोरसवदा तरुण नेहमी त्याच्याबरोबर असे. याकोवला आता गावात काम मिळालं होतं.

सामोइलोव (त्याचे पिंगट केस तुरुंगवासाच्या काळात अधिकच लालसर झाले होते), तसेच वासिली गुसेव, बुकिन, द्रागुनोव व इतर काहीजण यांचा असा आग्रह पडला की यंदा मिरवणूक काढायची ती सशस्त्रच! पावेल, खोखोल, सोमोव वगैरेंचा या सूचनेला विरोध होता.

त्यांचा या विषयावर वाद चालू असतानाच येगोर आला. तो नेहमी-प्रमाणेच थकलेला व घामाघूम होऊन धापा टाकीत होता. त्याने हा वादाचा मुद्दाच थट्टेवारी उडवून लावला. तो म्हणाला,

"सध्याची समाजरचनाच आमूलाग्र बदलून टाकण्यासाठी आपण जे कार्य चालवलं आहेत ते फारच थोर व महान आहे यांत संशय नाही. परंतु हे उच्च ध्येय गांठण्याच्याच दृष्टीने मला नवीन बुटाचा जोड खरेदी करणं किती जरूरीचं आहे पहा! माझे बर्फाचे बूट आता दुरुस्तीच्या पलिकडे गेले आहेत. त्यामुळे माझे पाय रोज चांगलेच ओले होतात. अन् मला तर गड्यांनो, जुन्या समाजपद्धतीचा जाहीरपणे व स्पष्ट शब्दांत धिक्कार करीपर्यंत धरतीमातेच्या उदरात जाऊन राहण्याची बिलकूल इच्छा नाही! म्हणूनच कॉमरेड सामोइलोवने केलेली सशस्त्र निदर्शनाची सूचना मला मान्य नाही. उलट त्याऐवजी माझी अशी सूचना आहे की मला ताबडतोब एक नवीन बुटांचा जोड घेऊन देण्यात यावा. कारण कुठल्याही नामी दंगलीपेक्षा या उपायाने समाजवादाचा विजय जवळ येण्याला अधिक मदत होणार आहे!"

अशाच प्रकारच्या मजेदार शब्दांत तो इतर देशांतील जनतेच्या लढ्यांची माहिती कामगारांना सांगत असे. त्याची असली भाषणं आई नेहमी कान देऊन ऐकत राही. त्या भाषणांवरून तिची एक विचित्र कल्पना झाली होती. जनतेला लुबाडणाऱ्या दुष्ट लोकांचं एक विशिष्ट प्रकारचं कल्पनाचित्र तिने तयार केलं होतं. हे दुष्ट लोक म्हणजे हटकून चांगले लठ्ठंभारती, लाल

तोंडाचे व बुटके असले पाहिजेत व ते स्वभावाने लोभी, नीच व लुच्चे असले पाहिजेत, आणि या लोकांना स्वतःला झारच्या जुलुमाची झळ पोचली म्हणजे ते सामान्य लोकांना झारविरुद्ध उठाव करण्याला चिथावणी देतात व झारचा काटा निघाला की लबाडीने स्वतःच सर्व सत्ता बळकावून लोकांना मात्र पुनः पूर्वीप्रमाणेच घाण्याच्या बैलाप्रमाणे पिळून काढू लागतात व लोकांनी प्रतिकार केलाच तर शेकडो, हजारो लोकांची कत्तल करण्याला सुद्धा मागेपुढे पाहत नाहीत, असं तिने मनाशी तयार केलेलं चित्र होतं.

एक दिवस आईने मोठ्ठा धीर करून येगोरच्या भाषणांवरून तिने रंगविलेलं हे चित्र येगोरलाच वर्णन करून सांगितलं व संकोचाने विचारलं, "माझी ही कल्पना बरोबर आहे ना, येगोर इवानोविच?"

यावर येगोर पोट धरधरून हसत सुटला. त्याच्या डोळयांतही मिस्किल हास्य चमकू लागले व जरा वेळाने हसू आवरून तो म्हणाला, "अगदी बरोबर! अगदी असेच असतात हे लोक, आई! इतिहासाचा खरा अर्थ अचूक हेरला आहे तुम्ही! कल्पनेच्या भरारीमुळे या चित्रात कुठे उगीच थोडा भडकपणा आला असेल, एवढंच. बाकी सगळं काही अगदी जिथल्या तिथे, ठीक बसलं आहे. तुमच्या कल्पनाचित्रातले हे बुटके, लठ्ठंभारती लोकच महादुष्ट असतात व लोकांचं शोषण करून ऐतखाऊपणे स्वतःची चैन चालवीत असतात. फ्रेंच लोकांनी अशा लोकांना 'बूर्ज्वा' असं नाव दिलं ते अगदी योग्य आहे. अजाण व अडाणी गोरगरिबांना लुबाडून स्वतःची तुंबडी भरून घेणाऱ्या या लोकांना हा शब्द अगदी यथार्थपणे लागू आहे, कारण 'बूर' म्हणजे ज्याला रीतभात नाही, कसं वागावं हे कळत नाही असा माणूस. अन् एका अर्थाने हे दुष्ट लोक असेच असतात–"

"म्हणजे? श्रीमंत माणसं असं करतात की काय?" आईने विचारलं.

"होय! श्रीमंत असतात हेच त्यांचं दुर्दैव! लहान मुलांच्या अन्नात थोडं तांबं मिसळत राहिलं पर त्यांची हाडं मजबूत होत नाहीत व एकंदरीने त्यांची वाढ खुंटते. पण जेव्हा एखाद्या माणसाला सोन्याचं विष दिलं जातं तेव्हा त्याच्या आत्म्याचीच वाढ खुंटते आणि तो आत्मा पाच कोपेक देऊन मुलं रबरी चेंडू विकत घेतात ना, तसा लहान, घाणेरडा अन् निर्जीव बनतो."

मग एकदा येगोरबद्दल बोलणं निघालं असता पावेल म्हणाला, "आंद्रेइ, ज्यांच्या अंतःकरणाला सर्वात जास्त वेदना होत असतात असेच लोक बहुधा इतके थट्टेखोर बनतात, समजलास!"



जरा वेळ स्तब्ध राहून मग डोळे मिचकावीत खोखोल उत्तरला, "तुझं हे निदान बरोबर असेल तर मग रशियातल्या सगळ्या लोकांनीच इतकं थट्टेखोर होऊन जिकडेतिकडे हास्यच हास्य ऐकू यायला पाहिजे, नाही?"

नंतर एक दिवस नाताशा आली. ती सुद्धा दुसऱ्या शहरातल्या तुरुंगाची हवा खाऊन आली होती. पण त्यामुळे तिच्यात काही बदल झालेला मात्र दिसत नव्हता. ती तिथे होती तोंवर खोखोल नेहमीपेक्षा जास्तच खुलला होता व सारखा प्रत्येकाची थट्टा करून सर्वांना हसवून सोडीत होता, ही गोष्ट आईच्या नजरेतून सुटली नाही. पण नाताशा निघून जाताच खोखोल पुनः कुठल्यातरी शोकगीताची शीळ घालीत अस्वस्थपणे खोलीत येरझारा घालू लागला.

साशा मधूनमधून येऊन डोकावून जाई. पण ती सदा घाईत असे व सदाच त्रस्त आणि संतप्त! अन् कशामुळे कोण जाणे पण तिचा हा तुटकपणा व तऱ्हेवाईकपणा वाढतच गेला.

एकदा पावेल साशाला पोचवायला अंगणात गेला व बाहेर जाताना दार लावण्याला तो विसरल्यामुळे त्यांचं घाईघाईत झालेलं संभाषण आईच्या कानी आलं.

"तू स्वतः झेंडा घेऊन पुढे जाणार?" साशाने विचारलं.

"होय, मीच."

"हे पक्कं झालं का?"

"हो तर. तो हक्कच आहे माझा."

"म्हणजे पुनः तुरुंगात जायच तर?"

पावेल काहीच बोलला नाही.

"असं केलं तर–" साशाने बोलणं थांबवलं.

"कसं करायचं?"

"हे काम दुसऱ्या कोणाकडे दिलं तर नाही चालणार?"

"ते शक्य नाही" पावेलने निर्धारपूर्वक उत्तर दिले.

"पहा एकदा विचार करून. कारण असंही तुझं इथे लोकांवर मोठं वजन आहे. तू अन् आंद्रेइ तुम्ही दोघेही कामगारांचे सर्वात आवडते पुढारी

आहात. तुम्ही इथंच असला तर कितीतरी मोठी कामगिरी पार पाडू शकता. पण स्वतः झेंडा धरून निघालास तर नक्कीच तुला हद्दपारीची शिक्षा होईल, अन् तीही दीर्घ मुदतीची!"

साशाच्या आवाजात भय व चिंता या स्वतःच्या परिचित भावना प्रतिबिंबित झाल्याचं आईने ओळखलं. बर्फाच्या थंडगार पाण्याच्या थेंबाप्रमाणे तिचे शब्द कानावर पडून आईचं अंतःकरण गारठून गेलं.

"मी एकदा माझा विचार पक्का केला आहे. तो आता बदलणं शक्य नाही." पावेलने पुनः सांगितलं.

"माझ्या म्हणण्याकरता सुद्धा?"

पावेल एकदम कठोरपणे उत्तरला, "तुला असं म्हणण्याचं काहीएक कारण नाही. तुला अधिकारच काय असं म्हणण्याचा?"

"मी माणूस आहे अन् माझं मन माणसाचंच आहे म्हणून!" साशा अगदी मृदु आवाजात उद्गारली.

"वा! म्हणे माणूस म्हणून!" पावेलचा आवाज एकदम मृदु झाला होता, इतकंच नव्हे तर आतल्या आत ओढल्यासारखाही वाटत होता. "माणूस! अन् तेही मला अत्यंत प्रिय असलेलं माणूस! पण म्हणूनच–म्हणूनच तर तू असं काही म्हणता कामा नये!"

"बरं, येते मी."

साशा निघून गेली. पावेलही तिच्यामागोमाग बागेत गेला. तिच्या पावलांचा पटपट आवाज आला त्यावरून ती मुद्दामच जलद निघून गेली हे आईने ओळखलं.

आईच्या पोटात पुनः भीतीचा गोळा उठला. त्यांचं बोलणं कशाविषयी होतं हे नीटसं तिला समजलं नाही, पण आपल्याला कुठल्या तरी नव्या संकटाला तोंड द्यावं लागणार एवढं तिने ओळखलं.

'याचा काय करण्याचा बेत असावा बरं?' आई स्वतःशीच विचार करू लागली.

पावेल आत परत आला तेव्हा आंद्रेइही त्याच्याबरोबर होता.

"या इसाइचा बंदोबस्त कसा करायचा?" खोखोल मान हलवीत म्हणत होता.

"तू हे असलं काम सोडून दे असा स्पष्ट इशारा द्यावा त्याला!" पावेल उत्तरला. हे बोलत असताना त्याच्या कपाळावर आठ्या दिसत होत्या.



"पावेल, तुझा बेत तरी काय आहे?" आईने भीतभीत खालच्या मानेने विचारलं.

"केव्हा? आता?"

"नाही रे! मे–दिनाला?"

"अस्सं?" पावेल खालच्या सुरात बोलू लागला. "काही नाही: मी मिरवणुकीच्या अग्रभागी झेंडा घेऊन चालणार आहे. त्याबद्दल कदाचित् तुरुंगात जावं लागेल!"

आईच्या डोळ्यांची आग होऊ लागली व तिच्या तोंडाला कोरड पडली. पावेलने तिचे हात हातांत घेतले व ते थोपटीत तिची समजूत घालण्याच्या दृष्टीने तो म्हणाला,

"मला हे करायलाच हवं. जरा समजून घेण्याचा प्रयत्न कर आई!"

"पण मी कुठे काही म्हणाले?" तिने हळूच मान वर करून त्याच्याकडे पाहिलं. पण त्याच्या नेत्रांतील दृढनिश्चयाची चमक पाहताच तिची नजर पुनः खाली वळली.

पावेलने सुस्कारा टाकून तिचा हात सोडून दिला.

"तू असं दुःख करीत बसण्याऐवजी तुला आनंद व्हायला पाहिजे, आई!" पावेल कठोरपणे म्हणाला. "आपल्या पुत्रांना हसतमुखाने निरोप देऊन प्रत्यक्ष मृत्युमुखात पाठवणाऱ्या वीरमाता केव्हा निपजणार आहेत कुणास ठाऊक!"

"हुं!" खोखोल स्वतःशीच बोलल्यासारख उद्गारला. "हे आले मोठे लाटसाहेब नाक फेंदारून!"

"पण मी म्हणाले तरी काय?" आई पुनः म्हणू लागली. "मी तुझ्या मार्गात आड येणार नाही. पण माझ्या आईच्या अंतःकरणाला हे सगळं कठीण वाटतं, एवढंच!"

पावेल तिच्यातून दूर सरकून अधिकच तीव्रतेने उद्गारला, "माणसाला आपल्या कर्तव्यापासून परावृत्त करू पाहणारं हे असलं प्रेम काय कामाचं?"

त्याच्या या शब्दांनी आईच्या काळजाला घरं पडली. त्याने आपल्या दुःखावर डागण्या देणारंच आणखी काही बोलू नये म्हणून ती घाईघाईने म्हणाली, "नको, असं बोलू नकोस बेटा! मला कळत आहे की तुला हे करायलाच हवं–तुझ्या कॉमरेड्ससाठी–"

"नाही. त्यांच्यासाठी नव्हे, माझ्याचसाठी!"

तो हे बोलत होता तोंच आंद्रेइ दारात येऊन उभा राहिला. त्याची उंची दारापेक्षा जास्त असल्यामुळे तो चमत्कारिकपणे गुडघे वाकवून उभा होता. त्याचा एक खांदा चौकटीला टेकला होता व डोकं व दुसरा खांदा पुढे वाकला होता. आपले बटबटीत डोळे पावेलवर रोखून तो म्हणाला, "अहो राजेश्री! हे नाही केलंत तरी चालण्याजोगं नाही कां?"

हे बोलत असताना तो एखाद्या खडकाच्या फटीत बसलेल्या सरड्यासारखा दिसत होता.

आई अगदी रडण्याच्या बेतात होती. पण पावेलला आपले अश्रू दिसू नयेत म्हणून ती एकदम "अगबाई, विसरलेच की!" असं पुटपुटत बाहेर निसटली. बाहेर जाताच मात्र ती तडक एका कोपऱ्यात जाऊन बसली व तेथे आपल्या इतक्या वेळपर्यंत रोखून धरलेल्या अश्रूंना वाट करून देऊन ती हुंदके देऊ लागली. ते अश्रू इतके कढत होते की जणु काय त्या अश्रूंबरोबर रक्तच बाहेर येत होतं!

तिथे बाहेर बसल्याबसल्याच अर्धवट उघड्या दारातून आत हलक्या आवाजात चाललेला वाद तिला ऐकू येत होता.

"वा रे वा! आईला दुःख देण्यात तुला आनंद होतो वाटतं?" खोखोल विचारीत होता.

"तुला असं म्हणण्याचा काही एक अधिकार नाही." पावेल चिडून म्हणाला.

"अशा वेळी मी गप्प बसलो अन् तुला मूर्खासारखं वागू दिलं तर मग चांगलाच मित्र ठरेन की मी! तू असं कां बोललास? त्याचा परिणाम काय झाला हे दिसत नाही तुला?"

"वा! म्हणून काय झालं? काय वाटेल ते झालं तरी कोणतंही उत्तर देतांना खंबीर राहायलाच हवं!"

"आईशी बोलताना सुद्धा?"

"प्रत्येकाशीच बोलताना! आपल्या मार्गात अडथळे आणणारं, आपले पाय मागे ओढणारं, असं प्रेम काय उपयोगाचं?"

"वा रे वा बहादूर! आधी नाक साफ करून ये! साशाला सांग त्या गोष्टी! तीच ऐकून घेईल—"

"तिला सांगितलं आहे मी आधीच."

"मुळीच सांगितलं नाहीस! तिच्याशी बोलताना तू मेणाहून मऊ झाला



होतास! मी तुझं बोलणं ऐकलं नाही तरी हे नक्की सांगू शकतो. पण आईपुढे मात्र तू मोठा शौर्याचा उसना आव आणलास. पण असल्या या बढाईची अन् दिमाखाची काडीइतकी सुद्धा किंमत नाही, समजलास!"

बाहेरून आई हे ऐकत होती. आता खोखोल पावेलला आणखी काहीतरी मर्मभेदक बोलेल या भीतीने तिने घाईघाईने डोळे पुसले व ती दार उघडून आत स्वयंपाकघरात आली.

"ब-ब-ब-ब काय भयंकर थंडी ही!" आई मोठ्या आवाजात म्हणाली. आवाजात भय व दुःख यांच्या मिश्रणामुळे कंप आला होता. ती पुढे म्हणाली, "हे वसंतऋतूचे दिवस आहेत असं कुणी म्हणेल तरी!"

बाहेरच्या खोलीत कडाक्याचा वाद सुरू होता त्यापेक्षाही मोठा आवाज करण्यासाठी तिने उगीचच सामानाची खडबड सुरू केली. आपला आवाज आणखी चढवून ती बोलू लागली, "सगळंच काही बदलत चाललं आहे! लोक अधिक कडक नि तापट होत चालले आहेत न् हवा मात्र थंड होत चालली आहे! पूर्वी कशी या दिवसांत चांगली ऊब वाटायची अन् आकाशही कसं निरभ्र न् साफ—"

बाहेरच्या खोलीतला वाद एकदम थांबला. आई स्वयंपाकघराच्या मधोमध उभी राहून ऐकू लागली.

"ऐकलंस?" खोखोल मृदु स्वरात म्हणाला. "अजून तरी काही धडा शीक! तुझ्यापेक्षा तीच अधिक धीराची न् शूर आहे!"

"चहा घेणार ना रे?" आईने कापऱ्या आवाजात विचारले. पण आपल्याला कापरे भरले ते थंडीमुळेच असं भासविण्यासाठी ती पुढे म्हणाली, "मी तर कशी गारठून गेल्ये आहे अगदी!"

हळू हळू पावले टाकीत पावेल तिच्याजवळ आला व अपराधीपणाची जाणीव व्यक्त करणारे केविलवाणे स्मित करीत तिला म्हणाला, "मला क्षमा कर, आई. मी लहान आहे अजून, अन् मूर्खही आहे बघ!"

"नको बेटा! माझी काळजी करू नकोस!" ती कळवळून म्हणाली व तिने त्याचे मस्तक छातीशी धरून कुरवाळले.

"काही सुद्धा बोलू नकोस तू! तुझं आयुष्य तुझं स्वतःचं आहे अन् तू तुला योग्य वाटेल तसं कर! देव तुझा पाठीराखा आहे. पण माझ्या हृदयाला पीळ पाडू नकोस! आईची माया वेडी असते रे! तुम्हा सर्वांच्याच-साठी माझा जीव तिळतिळ तुटतो. तुम्ही सगळेच चांगले आहात व सगळेच मला आवडता. मी तुमच्यावर मायेचं पांघरूण घातलं नाही तर कोण घालील? तुम्ही निघून जाल, अन् मग इतरही लोक तुमच्या पाठोपाठ

येतील. तुम्ही सगळेच आपल्या सर्वस्वाचा त्याग करून निघून जाल–नाही रे, पाशा?"

तिच्या अंतःकरणात विलक्षण खळबळ माजली होती. अत्यंत तीव्र असा दुःखाचा आवेग, व त्याचबरोबर एक प्रकारचा आनंद, अशा काही अवर्णनीय भावनांनी ती भारावून गेली होती. हे सगळं व्यक्त करण्यासाठी योग्य शब्द तिला सांपडत नव्हते, व म्हणूनच जणु काय ती हे अव्यक्त दुःख नेत्रांद्वारे व्यक्त करीत आपल्या मुलाकडे टक लावून पाहत होती.

"तुझं म्हणणं बरोबर आहे, आई. मला क्षमा कर. मला आता सारं काही दिसतं आहे. मी कधी विसरणार नाही, अगदी शपथपूर्वक सांगतो की मी कधी विसरणार नाही!"

पावेलच्या चेहऱ्यावर स्मिताची रेखा होती. तो आईपासून दूर झाला तेव्हा त्याला आनंद झाला होता, पण त्याचबरोबर एक प्रकारची लाजही वाटत होती.

बाहेरच्या खोलीच्या दारापाशी जाऊन आई कळकळीने आंद्रेइला म्हणाली, "आंद्र्यूशा! त्याच्या अंगावर असा ओरडू नकोस, बाबा! तू मोठा ना रे त्याच्यापेक्षा?"

"उं–हुं! नुसताच ओरडणार नाही तर चांगला वठणीवर आणीन त्याला! सोडणार नाही!" आंद्रेइ तिच्याकडे न पाहता उभ्या जागीच उद्गारला.

आई त्याच्याजवळ गेली व हात पुढे करून म्हणाली, "कित्ती चांगला आहेस रे तू!"

त्याने एक गिरकी घेतली व तो तडक तिच्या अंगावरून स्वयंपाकघरात निघून गेला. त्याचे हात पाठीमागे बांधलेले होते व त्याची मान बैलासारखी खाली वळलेली होती. तो आत गेल्यावर भयंकर उतरोधिकपणे बोलू लागला, "पावेल, तू इथून चालता हो पाहू! नाहीतर मी तुला कडकडून चावेन बघ!"

नंतर तो आईकडे वळून म्हणाला, "ही नुसती थट्टा आहे बरं का आई! नाहीतर तू आपलं खरंच समजशील! हं, चला! मी शेगडी पेटवून चहा ठेवतो आता. वा! काय कोळसे आहेत हे! नुसते ओलेचिंब!"

मग तो एकदम बोलायचा थांबला. आई आत आली तेव्हा तो खाली बसून कोळशांवर फुंकर घालीत होता. आई आत आल्यावर तिच्याकडे न



पाहताच तो बोलू लागला, "भिऊ नको, आई. मी त्याला हातसुद्धा लावणार नाही. अगदी उकडलेल्या गाजरासारखा मऊ अंतःकरणाचा माणूस आहे मी! अन् पावेल मला खरोखरच फार आवडतो! हं, तुम्ही ऐकू नका बरं का हे शूरवीर! पण त्याचं ते जाकीट मला बिलकुल आवडत नाही पहा! त्यानं एक नवं जाकीट घेतलं आहे अन् ते फार सुंदर आहे असं वाटतंय त्याला. म्हणूनच आपलं पोट पुढे काढून तो फिरतो आहे व प्रत्येकाला सांगत सुटला आहे की, 'पहा, किती सुंदर जाकीट आहे माझं!' जाकीट चांगलं आहे. पण मी म्हणतो, ते एवढं मिरवीत सुटण्याची काय गरज? आधीच लोकांना टाळता टाळता कोण पंचाईत होते, त्यात याची ही हौस!"

"अहो महाशय! किती वेळ चालू ठेवणार ही बडबड?" पावेल मृदु स्मित करून म्हणाला. "एकदा दाखवलास की आपला तडाखा! आता पुरे की!"

खोखोल शेगडीच्या दोन्ही बाजूला पाय पसरून बसला होता. त्याने बसल्याबसल्याच डोळे वर करून पावेलकडे पाहिले. आई दारातच उभी राहून त्याच्या मस्तकाच्या मागल्या भागाकडे पाहत उभी होती. तिच्या नजरेत प्रेमळपणा भरलेला होता.

खोखोलने वळून पाहिलं व हात बांधून त्या मायलेकरांकडे पाहत तो उद्गारला,

"तुम्ही दोघंही बरेच दिसता की!"

हे बोलता बोलता त्याने डोळे मिचकावले.

पावेलने वाकून त्याचा हात घट्ट धरला.

"हं! ओढू नकोस! मी पडेन की!" खोखोल म्हणाला.

"अरे असे लाजता काय? भेटा की कडकडून?"

"होय? भेटू या?" पावेलने खोखोलला विचारलं.

"अस्सं? बरं. भेटू या की" खोखोल उत्तरला.

पावेल व खोखोल उठले व त्यांनी एकमेकांना घट्ट आलिंगन दिले. त्यांची शरीरे दोन होती, पण स्नेहरज्जूंनी त्यांची अंतःकरणं एकरूप झाली होती. आईच्या नेत्रांतून खळखळ अश्रुधारा वाहू लागल्या, पण यावेळचे अश्रू आनंदाचे होते हे उघडच होते. ते अश्रू पुसून टाकता टाकता ती थोडी शरमून म्हणाली, "आम्हा बायकांना रडण्यातच सुख वाटतं. आनंदाच्या प्रसंगी आम्ही रडतो अन् दुःखाच्या वेळीसुद्धा तेच!"

खोखोलने हळूच पावेलला बाजूला केले व तोही डोळे पुसू लागला. तो म्हणाला, "हं, पिलाशी इतका खेळ झाला ते पुरे झालं! आता त्याचं मांस भाजून खायचंय! अन् काय रे बाबा हे कोळसे तुझे! मला इतक्या जोराने फुंकर मारावी लागते अन् मग सारा कोळसा डोळ्यांत जातो!"

"असल्या अश्रूंबद्दल लाज वाटण्याचं काहीच कारण नाही!" पावेल खिडकीपाशी बसत म्हणाला.

आई त्याच्याजवळ जाऊन त्याच्या शेजारीच बसली. तिला नवा धीर, नवी हिंमत प्राप्त झाली होती व त्यायोगे तिचं अंतःकरण दुःखाने व्याकुळ झालेलं असताही तिला एक प्रकारचं समाधान वाटत होतं. तिच्या अंतःकरणातील खळबळ शांत झाली होती.

"तू उठू नकोस, नेनको! मी नेऊन ठेवतो हे चहाचं!" खोखोल उठून खोलीतून बाहेर जाता जाता म्हणाला. "तुझं अंतःकरण इतकं पिळवटून निघालं आहे की जरा वेळ तू अगदी स्वस्थ राहायलाच हवंस."

तो बाहेर गेल्यावर त्याचा खणखणीत आवाज पुनः ऐकू आला. "याला म्हणतात खरं जीवन! खरा प्रेमाचा ओलावा कसा असतो याचा हा नमुनाच म्हटला पाहिजे!"

"खरंच!" पावेल आईकडे नजर टाकीत म्हणाला.

"पण त्यामुळेच सगळं कसं पार बदलून गेलं आहे! आपल्या दुःखाची त्न्हा वेगळी अन् आनंदही निराळाच!" आई म्हणाली.

"हे असंच व्हायला पाहिजे बरं!" खोखोल बोलू लागला. "एक नवीन अंतःकरण जन्माला येत आहे, नेनको! एक नवं अंतःकरण जीवन धारण करीत आहे. माणूस पुढे जाण्यासाठी धडपडत आहे आणि सर्व जगावर ज्ञानाचा प्रकाश सोडीत आहे. चालता चालता तो हाक देत आहे, 'सर्व देशांतील लोक हो! एका कुटुंबात एकत्र या!' आणि या आवाहनाला साद देऊन सगळे सुदृढ अंतःकरणाचे लोक एकत्र येत आहेत व त्या सगळ्यांची हृदयं मिळून एक प्रचंड हृदय निर्माण होत आहे! अन हे हृदय चांदीच्या घंटेप्रमाणं मजबूत व खणखणीत आवाजाचं आहे!"

आईने आपल्या ओठांचा थरकाप दिसू न देण्यासाठी ते घट्ट आवळून धरले व अश्रू थोपवून धरण्यासाठी डोळे घट्ट मिटून घेतले.

पावेल काही तरी बोलण्याच्या उद्देशाने पुढे सरसावला पण आईने त्याला आपल्या बाजूला घेऊन ती त्याच्या कानात म्हणाली, "बोलू दे त्याला. मध्येच आडवू नकोस."



खोखोल दरवाजात येऊन उभा राहिला व पुनः बोलू लागला, "अजून लोकांना पुष्कळ दुःख सहन करावं लागणार आहे, पुष्कळ रक्तही सांडावं लागणार आहे. पण माझ्या अंतःकरणाला व माझ्या बुद्धीला जो अमूल्य ठेवा सापडला आहे त्याची किंमत म्हणून मला कितीही हालअपेष्टा व छळ सहन करावा लागला व माझं स्वतःचं कितीही रक्त सांडावं लागलं तरी मला त्याची पर्वा नाही. एखादा तेजस्वी तारा व त्याचे सर्व प्रकाशकिरण जितके शक्तिशाली असतात तितकीच अलोट माझी शक्ती आहे. आता मी काहीही सहन करू शकतो, कशालाही तोंड देऊ शकतो, कारण मला असा काही आनंदाचा ठेवा सापडला आहे की तो कोणालाही कधीच मजपासून हिरावून घेता येणार नाही. आणि हा आनंदाचा ठेवा हेच माझं धन, तीच माझी संपत्ती!"

त्या दिवशी मध्यरात्र उलटून गेली तरी ते चहापानाचं साहित्य समोर ठेवून मन मोकळं करून जीवन, लोकांची परिस्थिती व भवितव्य यांविषयी ते बोलत बसले होते.

त्या बोलण्यातली एखादी कल्पना नीट आकलन झाली म्हणजे आईला आपल्या पूर्वायुष्यातल्या एखाद्या दुःखद अनुभवाची आठवण होऊन ती सुस्कारा टाकी व त्या अनुभवाच्या आधारे ती कल्पना तिला अधिकच पटू लागे.

ज्या जिव्हाळ्याने त्यांचं हे बोलणं चाललं होतं, त्यायोगे तिच्या मनातील शंकाकुशंका दूर पळून गेल्या व तिला फार पूर्वी एक दिवस तिच्या वडिलांनी काढलेले उद्गार आठवले. ते तिला कठोरपणे म्हणाले होते: "इतकं काही तोंड वेडंवाकडं करायला नको. एक मूर्ख झाला आहे तुझ्याशी लग्न करायला तयार, तर 'हो' म्हणून मोकळी हो कशी! लग्न होणं, पोराबाळांचं लेंढार मागे लागणं अन् त्यांचा छळ सोसावा लागणं, हे कुठल्याच बाईला सुटलं आहे का? तू तरी इतरांपेक्षा. निराळी आहेस थोडीच!"

त्यानंतर अंधःकारमय, निर्जन माळरानातून आडवळणे घेत जाणारा मार्ग तिने पाहिला होता. या मार्गावर निराशेचेच साम्राज्य होते. आणि या मार्गाने जाण्याखेरीज गत्यंतरच नाही हे स्पष्ट दिसत असल्यामुळे तिला एक प्रकारचे अगतिकपणाचे समाधान वाटले होते.

आजसुद्धा अगदी तसंच तिला वाटत होतं. पण काहीतरी नवं संकट

आपल्यावर ओढवणार असं राहून राहून वाटू लागल्यामुळे ती कुणातरी अज्ञात व्यक्तीला उद्देशून तुच्छतापूर्वक म्हणत होती, "घे. आणखी घे!"

अशा प्रकारे स्वतःचं समाधान करून घेतल्याने तिच्या दुःखाची तीव्रता कमी झाली व तिच्या हृदयाची धडधडही कमी झाली.

ही सर्व अंतरीची खळबळ सुरू असतानाच तिला सारखा आशेचा एक अंधुक किरण दिसत होता व वाटत होतं, "काही झालं तरी ते माझं सर्वस्व हिरावून नेणार नाहीत, काही थोडी तरी आशेला जागा ठेवतीलच!"

## २४

एक दिवस सकाळी पावेल व आंद्रेइ नुकतेच कामावर निघून गेले होते, तोंच कोर्सुनोवाने खिडकीवर टक्टक् केलं.

"इसाइचा खून झाला!" तिने ओरडून सांगितलं. "आपण जाऊन पाहू या!"

ते ऐकून आई भयभीत झाली. खून कोणी केला असावा याबद्दल चटकन् एक शंका तिच्या मनात डोकावून गेली.

अंगावर शाल घेऊन निघण्याची तयारी करता करता तिने विचारलं, "कुणी बरं केला असेल हा खून?"

"वा! ज्याने कुणी केला असेल तो इसाइच्या जवळ बसला असेल असं वाटलं की काय तुला? तो तर केव्हाच त्याचं डोकं फोडून पसार झाला!"

त्या दोघी जायला निघाल्या तशी कोर्सुनोवा म्हणाली, "आता पुन: खुनी इसमाचा तपास लावण्यासाठी झडत्यांचं सत्र सुरू होणार. तुझी माणसं काल रात्री घरीच होती एवढं तरी बरं झालं. मी पाहिलेलं आहे ते. मी काल रात्री घरी आले तेव्हा बारा वाजून गेले होते. जाताना तुझ्या खिड-कीतून पाहिलं तर तुम्ही सगळीजणं टेबलाभोवती बसला होता."

"देवा, देवा! मरिया, काय बोलतेस तरी! आमच्या घरच्या माण-सांवर कसा कोणी संशय घेईल, बाई?" आई भिऊन उद्गारली.

"असं कसं? इसाइचा खून करणारच कोण? तुमच्या लोकांशीच संबंध असलेल्या एखाद्या माणसाने केला असणार हे उघडच आहे. तुमच्या लोकांवर इसाइ पाळत ठेवीत असे हे सर्वांनाच ठाऊक आहे." कोर्सुनोवा अगदी खात्री असल्याप्रमाणे बोलली.



आई एकदम थांबली. तिच्याने श्वासोच्छ्वास करवेना. तिने छाती हाताने घट्ट दाबून धरली.

"अग, काय झालं एकदम?" मरिया तिचं समाधान करू लागली. "तू घाबरतेस कशाला? त्याच्या करणीचं फळ त्याने भोगलं! हं, चल लवकर. नाहीतर उचलून नेतील त्याला."

वेसोव्श्चिकोवनेच हा खून केला असला पाहिजे असा आईला दाट संशय आला होता व त्यामुळे तिचे पायच उचलत नव्हते. ती स्वतःशीच म्हणत होती, "छे! हे भलतंच करून बसला तो!"

कारखान्यापासून जवळच एक घर आगीने जळून गेलेलं होतं. तिथे लोकांची गर्दी झालेली दिसत होती. गांधीलमाशांचा थवा यावा तसे लोक तिथे घोंगावत होते. जळकी लाकडं तुडवीत न् राख उडवीत लोक जात येत होते. त्या घोळक्यात बऱ्याच बायका अन् त्याहीपेक्षा जास्त मुलंच दिसत होती. काही दुकानदार, हॉटेलांतले नोकर, न् शिवाय काही पोलिस व गुप्त पोलिस खात्याचा अधिकारी पेतलित हाही तिथं होता. करड्या रंगाची दाढी हालवीत व छातीवर अनेक बिल्ले लटकावून तो रुबाब दाखवीत उभा होता.

इसाइचा देह एका जळक्या ओंडक्याला टेकून ठेवलेला होता. अर्धवट बसत्या केलेल्या शरीराचा वरचा भाग, विशेषतः उघडं मस्तक उजव्या खांद्यावर कलंडलं होतं. त्याचा उजवा हात पाटलोणीच्या खिशात होता व डाव्या हाताची बोटं खाली मातीत रुतून बसलेली होती.

आईने त्याच्या चेहऱ्याकडे पाहिलं. एक निष्प्राण डोळा समोर पसरलेल्या पायांजवळ पडलेल्या टोपीकडे पहात असल्याचा भास होत होता; त्याचं तोंड आश्चर्याने 'आ' वासल्याप्रमाणे अर्धवट उघडं होतं व त्याची पिंगट दाढी तिरपी झाली होती. वर मस्तकाकडे निमुळतं होत गेलेलं त्याचं कृश शरीर व बारीक चेहरा अधिकच कृश व बारीक दिसत होता.

ते दृश्य पाहून आईने क्रूसाची खूण केली व एक सुस्कारा टाकला. इसाइ जिवंत असताना तिला त्याचा तिटकारा वाटे, पण आता तिला त्याची कीव येत होती.

"रक्त आलेलं दिसत नाही," कुणी तरी बदललेल्या आवाजात म्हणाला, "नुसत्या बुक्कीनंच मारलेलं दिसतंय."

"बरं झालं. त्याने स्वतःच स्वतःचा खड्डा खणला होता. त्यात

बरोबर तोच सापडला! हलकट लेकाचा!" कुणी तरी सूडाचा आनंद व्यक्त केला.

गुप्त पोलिस अधिकारी महाशय एकदम बायांना बाजूला सारून पुढे सरसावले व त्यांनी दरडावून विचारलं, "कोणाची जीभ सैल सुटली आहे तिकडे?"

त्याला वाट करून देण्यासाठी लोक बाजूला झाले. काही जणांनी तिथून लगबगीने काढता पाय घेतला. एकाने जाता जाता विकट हास्य केले.

आई घरी गेली. जाताना ती स्वतःशीच उद्गारली, "याच्या मृत्यूने कुणालाच हळहळ वाटलेली दिसत नाही!"

तिच्या मनःश्चक्षूंपुढे निकोलायची ठेंगणी ठुसकी मूर्ति उभी राहिली. त्याचं अगदी निर्विकार, कठोर नजरेनं तिच्याकडे पाहाणं, उजवा हात जणु काय नुकताच जायबंदी झाल्याप्रमाणे हालवणं, सगळं तिला स्पष्ट डोळ्यांसमोर दिसू लागलं.

पावेल व आंद्रेइ घरी येताच तिने त्यांना विचारलं, "त्या खुनाबद्दल कुणाला पकडलं का रे?"

"अजून तरी ऐकलं नाही." खोखोलने उत्तर दिले.

तरीसुद्धा त्या दोघांचेही चेहरे उतरलेले दिसत होते हे तिच्या नजरेतून सुटलं नाही. तिने हळूच विचारलं, "निकोलायचं नाव तर घेत नाही ना रे कुणी?"

"नाही," पावेल कठोर नजरेनं तिच्याकडे पहात निर्धारपूर्वक म्हणाला. "अन् त्याच्यावर कुणाचा संशय आहे असंही मला वाटत नाही. तो इथे नाहीच मुळी. काल दुपारीच तो जो नदीवर गेला तो अजून परत आलेला नाही. मी चौकशी केली त्याची."

"देव पावला, बाई!" आईने सुटकेचा निःश्वास टाकला व ती पुन्हा उद्गारली, "खरंच, देवाची कृपा म्हटली पाहिजे!"

खोखोलने तिच्याकडे पाहिलं व लगेच मान खाली घातली.

"तो बिचारा तिकडे पडला आहे व या प्रकाराचा अर्थच जणू काय आपल्याला कळत नाही, अशी त्याची नजर आहे." आई स्वतःशीच म्हणाली. "अन् त्याबद्दल कुणालाच वाईट वाटत नाही! कुणी एक शब्दानंही त्याला बरं म्हणायला तयार नाही! जणु काय तो कुणी नाहीच!



काही तरी निर्जीव वस्तु कापून फेकून द्यावी तसा पडला आहे देह त्याचा!"

जेवण चालू असता मध्येच चमचा खाली टाकून पावेल जोरात म्हणाला, "छे! हे फारचं झालं!"

"काय फार झालं?" खोखोलने विचारलं.

आपण काही प्राण्यांना मारून त्यांचं मांस खायला घेतो, हे मारणंच मुळात आधी वाईट. हिंस्र पशूंना मारावं लागतं त्याचं कारण त्यांच्यापासून आपल्याला धोका असतो म्हणून. एखादा माणूसच पशूसारखा वागून इतरांच्या जिवावर उठला तर त्याला मारणंही योग्य ठरेल–मी स्वतःसुद्धा ते करीन. पण असल्या इसमाचा जीव घ्यायची काय गरज? त्याच्यावर कुणाला हात टाकवलाच कसा?"

खोखोलने खांदे उडवले व तो बोलू लागला, "हा सुद्धा एखाद्या हिंस्र पशूसारखा भयंकर होता. अन् डास नुसता रक्ताचा एखादा थेंब घेतो तरी आपण त्याला मारून टाकतो की!"

"ते खरं रे! त्याबद्दल माझं काही म्हणणं नाही. पण माझं म्हणणं एवढंच की हा प्रकार अगदी शिसारी आणणारा वाटतो."

"त्याला नाइलाज आहे!" आंद्रेइ पुन्हा खांदे उडवीत उद्गारला.

"तू स्वतः असल्या माणसाला ठार करू शकशील?" बराच वेळ थांबून पावेलने विचारले.

खोखोलने आपले मोठे डोळे पावेलवर रोखले, व नंतर हळूच आईकडे नजर टाकली व मग तो दृढतापूर्वक म्हणाला, "कॉमरेड्ससाठी व आपल्या ध्येयासाठी काय वाटेल ते करण्याची माझी तयारी आहे. तशीच वेळ आली तर मी पोटच्या पोराचा प्राण घेण्याला सुद्धा मागेपुढे पहाणार नाही!"

"आंद्र्यूशा! काय हे?" आई उद्गारली.

"त्याला नाइलाज आहे, आई." खोखोलने स्मित केले व तो पुढे म्हणाला, "जीवन हे असं आहे."

"बरोबर!" पावेलनेही त्याला साथ दिली. "जीवन हे असं आहे खरंच."

एकदम काहीतरी स्फूर्ती आल्याप्रमाणे खोखोल ताडकन् उठला,

"आपला तरी काय इलाज?" तो हातवारे करीत जोरात बोलू लागला. "आपल्याला सर्वांवर प्रेम करणं शक्य होईल असा काळ आणता यावा

म्हणूनच आज आपल्याला काही लोकांचा द्वेष करणं भाग पडत आहे. जे लोक प्रगतीच्या मार्गात आडवे येतात किंवा जे कोणी स्वतःच्या फायद्यासाठी व स्वतःचा मानमरातब वाढवून घेण्यासाठी पैसे खाऊन दुसऱ्याला पकडून देतात, अशांचा काटा काढणं प्राप्तच आहे. प्रामाणिक लोकांच्या मार्गात अडथळे आणणारा व त्यांना दगाफटका करण्याची संधी हुडकणारा कुणी विश्वासघातकी जुडास* असेल तर त्याचा काटा न काढणं हाच विश्वासघात ठरेल. तुझ्या मते मला तसा हक्क नाही होय? पण आपले हे बडे लोक—त्यांना मात्र आपलं लष्कर अन् मारेकरी ठेवण्याचा, कुंटिणखाने न् तुरुंग चालविण्याचा, लोकांना हद्दपार करण्याचा अन् येनकेनप्रकारेण आपली चैन अन् आराम चालू राहावा यासाठी अनेक प्रकारे लोकांचा अनन्वित छळ करण्याचा अधिकार आहे वाटतं? अन् मग अशा परिस्थितीत एकाद वेळ त्यांच्या हातातला दंडुका मला माझ्या हाती घेणं भाग पडलं तर तो माझाच दोष म्हणायचा का? अशा वेळी मला तो दंडुका हाती घ्यावा लागला तर मला त्याबद्दल किंचित्‌सुद्धा वाईट वाटणार नाही. ते जर आपल्या शेकडो लोकांना जिवे मारतात तर मलाही अर्थात्‌च हात उचलण्याचा अधिकार आहे, आणि अशा वेळी ज्याचं मस्तक माझ्या तावडीत सापडेल व ज्याचं अस्तित्व माझ्या कार्याच्या दृष्टीनं अधिक हानिकारक वाटेल, त्याच्यावरच मी प्रहार करीन हे स्वाभाविकच आहे. जीवन हे असं आहे. पण मला स्वतःला असं जीवन पसंत नाही, ते तसं असावं अशीही माझी इच्छा नाही. कारण असं त्यांचं रक्त सांडून काहीही फायदा नाही हे मला ठाऊक आहे; त्या रक्तापासून काहीही निष्पत्ती होणार नाही. धरतीला भरपूर पावसाच्या पाण्याचं सिंचन व्हावं तसं विपुल प्रमाणात आपलं रक्त सांडलं तर त्यातून सत्य उदयाला येईल. पण त्यांचं रक्त निव्वळ सुकून जातं. हे सर्व मी जाणतो. तरीसुद्धा मी ते पाप स्वतःच्या शिरावर घेण्याला तयार आहे—कुणाचा प्राण घेणं जरूर आहे असं दिसलं तर मी ते काम पार पाडीन. पण एवढं जरूर लक्षात ठेवा, मी माझ्यापुरतंच हे बोलत आहे. माझं पाप माझ्याबरोबरच मरून जाईल. मी तो कलंक माझ्यामागे शिल्लक राहू देणार नाही. तो कलंक फक्त माझ्यावरच राहील—इतर कुणाला—अगदी कुणाला सुद्धा त्याची झळ लागणार नाही."

*जुडास : येशू ख्रिस्ताचा द्रव्यलोभाने विश्वासघात करणारा शिष्य—अनु.



बोलणं चालू असतानाच तो जोरजोराने येरझारा घालीत होता. चालता चालताच जणु काय काही तरी तो टाकीत असल्यासारखे व कशापासून तरी स्वतःची मुक्तता करून घेत असल्याप्रमाणे त्याचे हावभाव सुरू होते. त्याला आतल्या आत काही तरी भयंकर दुखापत होऊन त्या वेदना असह्य होत असाव्यात हे आईने ओळखलं व ती दुःखाने व भयाने व्याकुळ झाली. खुनासंबंधीच्या भयंकर विचारांना तिने आता रजा दिली होती. वेसोव्श्चिकोवने जर तो खून केला नसेल तर पावेलच्या इतर मित्रांपैकी कुणीच ते कृत्य करणं शक्य नव्हतं.

पावेल स्वतः मान खाली घालून खोखोलचं बोलणं ऐकत होता.

"कधी कधी आपल्याला पुढे जाण्यासाठी म्हणून स्वतःच्या मनाविरुद्ध वागणेही भाग पडते. आपण आपल्या कार्यासाठी सर्वस्वाचा त्याग करण्याला तयार असले पाहिजे. आपलं अंतःकरण आपण त्या ध्येयाला अर्पण केले पाहिजे. ध्येयासाठी प्राण देणे हे फारसे कठीण नाही. पण त्याहीपेक्षा काहीतरी अधिक, प्राणापेक्षाही मौल्यवान असं काही तरी दिलं पाहिजे. ज्या सत्यासाठी आपण झगडत आहोत, जे सत्य आपणाला जगातील सर्वात मौल्यवान चीज वाटते त्या सत्याची बाजू त्यायोगेच अधिक भक्कम होईल."

बोलता बोलता तो खोलीच्या मधोमध येऊन थांबला. त्याचा चेहरा फिकट दिसू लागला होता, डोळे अर्धवट मिटलेले होते व एक हात काही तरी गंभीर प्रतिज्ञा करीत असल्याप्रमाणे अर्धवट वर उचललेला होता.

"एक काळ असा येईल की सर्व माणसे स्वतःच्या सौंदर्याने प्रभावित होतील, प्रत्येकजण इतरांना ताऱ्याप्रमाणे भासेल. जगातील सर्व माणसे पूर्णपणे स्वतंत्र होतील व त्या स्वातंत्र्यामुळे त्यांचा दर्जा थोर होईल. सर्वजण खुल्या दिलाने वागतील व कोणालाही कुणाविषयी द्वेष व मत्सर वाटणार नाही. मग हे सर्व जीवन मानवाच्या सेवेसाठी व्यतीत होईल व मानवही अत्यंत उन्नत व प्रगत होईल, कारण स्वतंत्र व मुक्त मानवाला अशक्यप्राय असं काहीच राहणार नाही. मगच लोक सत्य व स्वतंत्रतेच्या वातावरणात खऱ्याखुऱ्या अर्थाने सौंदर्याचा आस्वाद घेण्यासाठी जगू लागतील. आणि ज्यांच्या अंतःकरणात अखिल विश्वाला स्थान आहे, जे खऱ्याखुऱ्या अर्थाने मुक्त आहेत, तेच लोक श्रेष्ठ व थोर गणले जातील व त्यांच्यातच खऱ्या सौंदर्याचा आविष्कार झाला आहे हे स्पष्ट होईल. असं हे नवजीवन जगण्याचं भाग्य ज्यांना लाभेल ते खरोखरच धन्य होत!"

खोखोल एक मिनिटभर स्तब्ध राहिला व अत्यंत निष्ठेने उद्गारला, "ते नवजीवन निर्माण व्हावं यासाठी काहीही करण्याची माझी तयारी आहे!"

खोखोलचे हे उद्गार म्हणजे जणु त्याच्या आत्म्याचाच आवाज होता!

त्याचं बोलणं संपलं नाही तोंच त्याच्या चेहऱ्यावर एक विलक्षण लहर चमकून गेली, त्याच्या नेत्रांतून अश्रूंचे ओघळ वाहू लागले.

पावेलचा चेहरा पांढरा फिकट पडला होता. तो मस्तक उंचावून खोखोलकडे पाहू लागला. आईला अचानक काही तरी भयंकर शंकेने घेरलं व तीही खोखोलकडे टक लावून पाहू लागली.

"तुला काय म्हणायचं आहे, आंद्रेइ?" पावेलने मृदु स्वरात विचारलं.

खोखोलने मानेला एक झटका दिला, तो ताठ उभा राहिला व सरळ आईकडे पाहून म्हणाला,

"मी ते सर्व पाहिलेलं आहे. मला सर्व काही ठाऊक आहे."

आई एकदम उठली व त्याच्याजवळ जाऊन तिने त्याचे हात घट्ट धरले. त्याने आपला उजवा हात सोडवून घेण्याचा प्रयत्न केला, पण तिने तो सोडला नाही. ती हळूच पुटपुटली, "चूप, बेटा! काऽही बोलू नकोस!"

"थांब, आई!" खोखोल घोगऱ्या आवाजात हळूच म्हणाला. "ते कसं झालं ते सगळं सांगतो मी."

आईचे नेत्र पाण्याने भरले होते. त्या अश्रूपटलातून त्याच्यावर नजर रोखून ती पुन: पुटपुटली, "नको, नको, आंद्र्यूशा! काही, काही सुद्धा बोलू नकोस तू!"

पावेल हळूहळू पावले टाकीत त्यांच्याजवळ येऊन पोचला. त्याचा चेहरा अजूनही फिकट दिसत होता व त्याचेही डोळे पाणावलेले होते. किंचित् हसण्याचा प्रयत्न करून तो म्हणाला, "ते कृत्य तुझ्याच हातून झालं असावं अशी शंका आईला आली आहे!"

"मला काही शंका नाही न् भीती नाही! मी कधीच तसली शंका खरी मानणार नाही! प्रत्यक्ष माझ्या डोळ्यांनी पाहिलं तरी माझा त्यावर विश्वास बसणार नाही!"

"थांब!" खोखोल आपले हात सोडवून घेण्याचा प्रयत्न करीत व मस्तक हालवीत उद्गारला. "मी ते केलं नाही खरं, पण ते न होऊ देणं मात्र मला शक्य होतं. तेवढं मी केलं नाही हेही खरं."

"हं! आंद्रेइ! पुरे!" पावेल म्हणाला.



पावेलने आंद्रेइचा हात स्वत:च्या एका हाताने धरला व दुसरा त्याच्या खांद्यावर ठेवला. खोखोलचे सर्वांग थरथरा कापत होते, ते कापरे थांबविण्याचाच पावेलचा प्रयत्न होता.

खोखोल बोलू लागला तेव्हा त्याचा आवाज पिचल्यासारखा भासत होता. तो म्हणाला, "तसं काही घडून यावं अशी माझी बिलकुल इच्छा नव्हती हे तू जाणतोसच, पावेल. जे घडलं ते असं झालं: तू मला अन् द्रागुनोवला कोपऱ्यावर सोडून निघून गेलास. त्यानंतर लगेच इसाइ तेथे येऊन आमच्यावर टेहळणी करीत व तुच्छतेने पाहात उभा राहिला. द्रागुनोव त्याला पाहून म्हणाला, 'ह्याला पाहिलंस? सारी रात्र माझा पाठलाग चालवला आहे यानं अन् म्हणूनच मी आता चांगली कणीक तिंबणार आहे याची!' नंतर द्रागुनोव निघून गेला तेव्हा मला वाटलं तो घरीच गेला असावा. तो गेल्यावर इसाइ मजजवळ आला—" आंद्रेइने दीर्घ श्वास घेऊन वाक्य पूर्ण केले, "अन् त्याने माझा आजपर्यंत कधी कोणी केला नसेल इतका भयंकर अपमान केला. हलकट कुत्रा लेकाचा!"

आईने काही न बोलता त्याला टेबलापाशी नेऊन खुर्चीवर बसवले. ती स्वत: त्याच्या अगदी जवळ बसली. पावेल उभे राहून दाढीचे केस कुरतडत होता.

खोखोल पुढे सांगू लागला, "तो मला सांगू लागला की आपली सगळ्यांची नावं त्यांना ठाऊक आहेत अन् मे—दिनाच्या आधीच त्यांच्या यादीत असलेल्या सर्वांना पकडून नेणार आहेत. मी काहीच बोललो नाही. वरकरणी मी हंसल्यासारखं दाखवलं पण आतल्या आत माझा भयंकर संताप झाला होता. पण तो लेकाचा पुढे म्हणतो कसं की म्हणे तू फार हुशार आहेस रे, पण या भलत्या भानगडीत पडायला नको होतंस! तू जर हा मार्ग सोडून देशील—"

खोखोल मध्येच थांबला व त्याने डाव्या हाताने चेहरा पुसल्यासारखं केले. त्याच्या डोळ्यांत एक प्रकारची कोरडी चमक होती.

"समजलो मी!" पावेल म्हणाला.

"म्हणे मी पोलिसांना मदत केली तर त्यात माझा फायदा आहे!"

खोखोल मूठ वळवून दातओठ खात बोलू लागला,

"पोलिसांना मदत करू काय? बदमाश साला! यापेक्षा त्याने माझ्या मुस्कटात मारली असती तरी मी ती सहन केली असती! अन् त्याच्याही

दृष्टीने ते बरं झालं असतं! पण त्याने अशा प्रकारे माझ्या अंतःकरणावर थुंकायला नको होतं. माझ्या आत्म्याचा हा अपमान सहन करणं माझ्या शक्तीबाहेरचं होतं."

आंद्रेइने एक झटका देऊन पावेलच्या हातातून स्वतःचा हात काढून घेतला व तो पुनः कसली तरी शिसारी आल्यासारखा पण हळू आवाजात सांगू लागला, "मी त्याच्या तोंडावर एक ठोसा लगावला व सरळ चालू लागलो. मी थोडा पुढे गेल्यावर द्रागुनोवचा आवाज माझ्या कानांत शिरला. तो म्हणत होता, 'सापडलास एकदाचा!' बहुधा तो कोपऱ्यावरच लपून माझ्या जाण्याची वाटच पहात असावा! मी मागे वळून पाहिलं नाही, पण एक ठोसा लगावला गेल्याचा आवाज आल्यासारखं मला वाटलं. जणु काय एखाद्या बेडकावर पाय पडावा तसा मी झटकन् पाय उचलून पुढे चालू लागलो. मग मी कारखान्यात जाऊन पोचलो तों लोक येऊन ओरडत सांगू लागले की, इसाइचा खून झाला म्हणून! माझा त्यावर विश्वासच बसेना, पण माझा हातच असा काही विलक्षण दुखू लागला की मला काम करणंही कठीण झालं. खरं म्हणजे हात दुखू लागला असंही म्हणणं बरोबर नाही. तो हात जणु काही जागेवर नाहीच असं मला वाटू लागलं."

आपल्या हाताकडे एक नजर टाकून तो पुढे म्हणाला, "हा कलंक आता सारं आयुष्यभर माझा पिच्छा पुरवणार! तो धुवून निघणं शक्य नाही!"

"पण तुझं अंतःकरण तर निर्मळ आहे ना!" आईने मृदु आवाजात त्याचं सांत्वन केलं.

"मी स्वतःला अपराधी समजतो अशातला भाग नाही. तसं काहीच नाही—" खोखोल दृढतापूर्वक म्हणाला. "पण मला त्यामुळे उद्विग्न झाल्यासारखं वाटतं खास. मी या भानगडीत न पडतो तर बरं झालं असतं."

"तुझं काहीच समजत नाही मला!" पावेल खांदे उडवीत उद्गारला. "तू तर काही त्याचा प्राण घेतला नाहीसच! पण मी म्हणतो, समजा घेतलाही असता—"

"असं पहा मित्रा, कुणीतरी खून करीत आहे हे माहीत असूनही आपण जर त्याला पायबंद घातला नाही—"

"मला तुझं खरंच काही समजत नाही," पावेल पुनः आग्रहाने सांगू लागला, "म्हणजे खरोखरच—नव्हे, मी ते समजतो रे, पण मला ते कळूनही वळत नाही—"



त्यांचं बोलणं चालू असतानाच कारखान्याचा भोंगा झाला. तो कर्कश हुकुमवजा भोंगा खोखोलने ऐकला व तो खुर्चीवर रेलून बसत म्हणाला,

"आपण तर बुवा आता कामावर जात नाही."

"माझं सुद्धा तेच ठरलं!" पावेलने साथ दिली.

"मी तर हा आंघोळीला निघालो!" असं म्हणून आंद्रेइनं मंदस्मित केलं व तो कपडे घेऊ लागला. तो आंघोळीला गेला तेव्हा त्याचा चेहरा उदास भासत होता.

आई त्याच्याकडे सहानुभूतिपूर्ण नजरेने पहात होती. तो गेल्यावर ती मुलाला उद्देशून बोलू लागली,

"तू काय वाटेल ते म्हण, पावेल. कुणालाही ठार मारणं हे पाप आहे हे मलाही कबूल आहे, पण या बाबतीत मी तरी कुणालाच दोष देणार नाही. इसाइबद्दल मला वाईट वाटतं, कारण तसा तो अगदी क्षुद्र प्राणी होता. आज मी त्याला पाहिलं तेव्हा मला हे आठवलं की त्यानेच तुला फासावर चढविण्याची धमकी दिली होती; पण तरीसुद्धा मला त्याचा तिरस्कार करावासा वाटला नाही, किंवा तो मेला याचा आनंदही झाला नाही. मला फक्त त्याची कीव करावीशी वाटली, पण आता त्याची कीव सुद्धा करावीशी वाटत नाही!"

एवढं बोलून ती स्तब्ध राहिली. ती क्षणभर विचारमग्न होती व मग आश्चर्य व्यक्त करीत व मंदस्मित करीत तिने विचारलं, "वा! पाशा! तू ऐकलंस तरी का मी काय बोलतेय ते?"

पावेलचं बहुधा खरोखरच तिच्या बोलण्याकडे लक्ष नव्हतं. डोळे जमिनीवर खिळवून येरझारा घालीत उदासपणे तो म्हणाला, "जग हे असं आहे, आई! लोक कसे एकमेकांच्या जिवावर उठतात, पहा. अन् अशाच परिस्थितीत आपण इच्छा नसताना सुद्धा कुणावर तरी हात टाकून बसतो. अन् ते सुद्धा कुणावर? तर आपल्याचसारख्या परिस्थितीतल्या एका गरीब प्राण्यावर! अन् या प्रकारणात तर ज्याचा बळी गेला त्या बिचाऱ्याची अवस्था फारच केविलवाणी होती, कारण त्याला अक्कलच नव्हती. पोलिस, गुप्त पोलिस, त्यांचे हेर, हे सगळे लोक म्हणजे आपले शत्रू खरे, पण ती सुद्धा आपल्यासारखीच माणसं असतात अन् त्यांची सुद्धा आपल्याप्रमाणेच पिळणूक व अवहेलना होत असते. आपली सगळ्यांची अवस्था सारखीच! वस्तुतः आपण सगळे एकच आहोत. पण या बड्या लोकांनी आपल्याला

एकमेकांचं शत्रू बनवलं आहे, त्यांनीच परस्परांविषयी भीती अन् भलभलत्या कल्पना आपल्या डोक्यात भरवून दिल्या आहेत, आपले हातपाय जखडून टाकले आहेत व अशा प्रकारे आपली सर्वांचीच पिळणूक व रक्तशोषण चालवलं आहे, आपल्याला परस्परांविरुद्ध लढायला न् झगडायला लावलं आहे. त्यांनी माणसांचं बंदुकीत, दंडुक्यात अन् दगडात रूपांतर करून टाकलं आहे अन् तिकडेच बोट दाखवून ते दिमाखाने सांगत आहेत : "याचंच नाव राज्यसत्ता!"

पावेल आईच्या जवळ जाऊन पुढे म्हणाला, "हे सर्व जे काही चाललं आहे ते भयंकर आहे, आई! हजारो-लाखो लोकांचा हा दुष्ट संहार-त्याहीपेक्षा भयंकर म्हणजे मानवी आत्म्याची हत्या-यापेक्षा अधिक भीषण गुन्हा कोणता असू शकेल? तुझ्या ध्यानात आलं ना? हे लोक आत्म्याचे मारेकरी आहेत! ते आणि आपण यांच्यातला फरक लक्षात आला ना? आपण एखाद्याला मारलं तरी आपल्यालाच नंतर त्याची शरम वाटते, अन् आपली आपल्यालाच चीड येते. पण हे लोक अगदी थंडपणे व निर्दयपणे हजारो लोकांचे प्राण घेतात तेव्हा त्यांना त्याची यत्किंचित्सुद्धा खंत वाटत नाही, उलट त्यात आनंद वाटतो. अन् अशा प्रकारे हजारो लोकांना चिरडून टाकून त्यांची कत्तल ते करतात ती कशासाठी? तर त्यांचा पैसा, त्यांची संपत्ती अन् आपल्याला गुलामगिरीत डांबण्याची त्यांची सत्ता अबाधित राहावी म्हणून! पहा, विचार करण्यासारखी गोष्ट आहे-की, हे लोक हजारो लोकांची कत्तल करतात अन् त्यांच्या आत्म्यांचा नाश करू पाहातात ते सुद्धा स्वतःचा जीव बचावण्यासाठी म्हणून नव्हे, तर त्यांच्या संपत्तीचं, मालमत्तेचं रक्षण करण्यासाठी! माणसाच्या अन्तरंगातील मौलिक वस्तूचं रक्षण करण्यासाठी नव्हे तर बाहेरच्या संपत्तीसाठी!"

बोलता बोलता त्याने आईचे हात हातांत घेतले व घट्ट दाबून तो म्हणाला, "ही सर्व त्यांची कृत्यं किती नीच व दुष्टपणाची आहेत हे तुला समजलं म्हणजे आम्ही ज्या महान् ध्येयासाठी लढत आहोत ते तुला दिसून येईल व आमच्या कार्याची महानता व थोरवी तुला पटेल."

आईचं अंतःकरण भरून आलं होतं. तिच्या अंतःकरणात जी ज्योत तेवत होती ती आपल्या मुलाच्या अंतःकरणातील अग्नीमध्ये विलीन होऊन जावी व त्यातून एक महान् ज्वाला पेटावी असं तिला तीव्रतेनं वाटू लागलं. अशाच मनाच्या अवस्थेत ती उठून कसं तरी अडखळत पुटपुटली. "धीर धर, पाशा, धीर धर. योग्य वेळी मलाही ते सर्व समजू लागेल!"



## २५

बाहेर कुणाची तरी पावलं जोरात वाजलेली ऐकू आली. आई व पावेल आश्चर्याने एकमेकांकडे पाहू लागली.

हळू दार उघडले गेले व रिबिन आत आला.

"हा मी आलो आहे बरं का!" रिबिन मस्तक वर करून हसत हसत उद्गारला. "कसा अगदी ठरवल्यासारखा आलो नाही? इथे, तिथे, चहूकडे, कुठेही पहा आमची स्वारी आहेच!"

पायांत गवताचे स्लीपर, मळकी टोपी व अंगावर डांबराने माखलेला ओव्हरकोट, असा रिबिनचा अवतार होता. कंबरपट्ट्यात दोन काळे हातमोजे खुपसून ठेवलेले होते.

"काय, तुमच्या तब्येती ठीक आहेत ना? अन् तुला तुरुंगातून सोडलं वाटतं त्यांनी, पावेल? बरंच झालं म्हणायचं. अन् तुमचं कसं काय चाललं आहे, पावेलच्या आई?"

बोलून झाल्यावर रिबिनने मोकळं हास्य केलं तेव्हा त्याचे दात चकाकले. त्याची दाढी बरीच वाढलेली होती व त्याच्या आवाजातही पुष्कळ मार्दव आलं होतं.

त्याला पाहून आईला बरं वाटलं. तिने जवळ जाऊन त्याच्याशी हस्तांदोलन केलं. त्याच्या भल्या मोठ्या हातावरही काळे डाग दिसत होते. त्याच्याजवळ जाताच डांबराचा वास तिच्या नाकात शिरला. ती म्हणाली,

"आलात! खरंच तुम्ही आलात हे बरंच झालं!"

"अगदी अस्सल खेड्यातला शेतकरी दिसतो खरा!" रिबिनकडे न्याहाळून पाहाता पाहाता स्मित करीत पावेल म्हणाला.

"खरं आहे. मी पुनः खेड्यातला होत चाललो आहे खरा!" अंगावरचा ओव्हरकोट काढून ठेवीत रिबिन म्हणाला. "तुम्ही शहरातले बनत चालले आहात अन् मी नेमका उलट दिशेने चाललो आहे!"

त्याने ओव्हरकोटाच्या आत भडक रंगाचा कोट घातला होता. तो काढता काढता रिबिन खोलीतल्या वस्तूंचं निरीक्षण करीत फिरू लागला.

"अरे, इथे तर पुस्तकांखेरीज काहीच नवं दिसत नाही. बरं, काही नवी खबरबात तर कळू देत."

तो खुर्चीवर बसला. दोन्ही पाय दूरवर पसरून गुडघ्यावर हात ठेवून

आपल्या काळ्याभोर डोळ्यांनी पावेलकडे पहात तो उत्तराची वाट पाहू लागला.

"बरं चाललं आहे की. हळूहळू प्रगती होत आहे!"

"म्हणजे जमीन नांगरली आहे, आता फक्त कापणीची वाट पाहायची अन् दारूची भट्टी लावून वरीसभर झोपून काढायचं, असंच ना? काय, ठीक आहे ना मी म्हणतो ते!" रिबिन जोराने हसू लागला.

"पण तुमचं कसं काय चाललं आहे ते तर सांगाल?" रिबिनच्या समोरच खुर्ची घेत पावेलने विचारलं.

"झकास! मी आजकाल येगिलदेयेवो नावाच्या गावात राहातो. ऐकलंय कधी या गावाचं नाव? छोटंसंच पण टुमदार गाव आहे. वर्षांतून दोनदा जत्रा भरते तिथे. दोन हजारांवर लोकवस्ती असेल, सगळेच बिचारे गरीब लोक. कुणाचीच स्वतःची अशी जमीन नाही. मग काय, खंडाने करतात! पण ती जमीनही हलकीच. मी स्वतः सुद्धा तिथल्या एका सावकाराकडे कामाला असतो. तसल्या पिळणूक करणाऱ्यांचा तोटा नाही तिथे. प्रेताभोवती गिधाडं जमावी तसेच तेही चहूकडे भरले आहेत. कोळसा पाडायचं अन् डांबर बनवायचं काम करतो मी. इथल्यापेक्षा दुप्पट काम करूनही इथल्या पगाराचा चौथा हिस्सा मजुरी पडत नाही हातात. त्याच्याकडे आम्ही सातजण कामाला आहोत. माझ्याखेरीज सगळे त्या गावचेच आहेत. चांगले लोक आहेत, अन् सगळ्यांना लिहावाचायला पण येतं. त्यांच्यातला एकजण येफीम म्हणून आहे. तो तर इतका संतापी आहे की त्याला कसं आवरावं हेच मला कळत नाही."

"पण तुम्ही काम कसं करता? त्यांच्याशी चर्चा वगैरे करता का?" पावेलने उत्सुकतेने विचारलं.

"माझी जीभ काही टाळूला चिकटलेली नाही, समजलात! तुमची सगळी पत्रकं बरोबर नेली होती मी – चौतीस होती. पण मी बहुधा बायबलचाच उपयोग करतो. बायबलमधून पुष्कळच सांगता येतं. चांगलं भलं मोठं पुस्तक अन् शिवाय सगळ्यांनाच मान्य असलेलं! पवित्र धर्माचा अन् धर्मगुरूंचा आशीर्वाद असलेलाच ग्रंथ तो! त्यामुळे कुणालाच त्याला विरोध करता येत नाही, नाही का?"

एवढं बोलून रिबिन हसला व त्याने पावेलकडे पाहून डोळे मिचकावले.



तो पुढे बोलू लागला, "पण ते राहू देत. मी आज आलो आहे ते पुस्तकं मागायला अन् मी एकटाच नाही. येफीमला पण बरोबर आणलाय मी. आमच्या मालकाने आम्हाला डांबर देऊन इथं पाठवलं तेव्हा थोडा आणखी प्रवास करून तुम्हाला भेटावं म्हणून इकडे आलो. येफीम इथे येण्यापूर्वीच मला पुस्तकं द्या कशी! त्याला शक्य तितकं कळू न दिलेलंच बरं."

आई रिबिनकडे निरखून पहात होती. तिला वाटत होतं, याचा नुसता वेषच बदलला आहे असं नाही, तर त्याची वागण्याची तऱ्हाही निराळी झाली आहे. त्याच्या नजरेत जास्त चलाखी दिसत होती, व पूर्वीसारखा स्पष्ट व मोकळा स्वभाव नेत्रांतून व्यक्त होत नव्हता.

"आई, तू जरा जाऊन पुस्तकं आणतेस का?" पावेल म्हणाला. "कोणती पुस्तकं द्यायची ते त्या लोकांना ठाऊक आहे. खेड्यांतल्या लोकांकडे पाठवायची आहेत एवढं सांगितलंस म्हणजे पुरे."

"बरं तर. चहा झाला की निघालेच."

"वा! तुम्हीही या भानगडीत पडू लागलात वाटतं?" रिबिन म्हणाला. "आमच्या तिकडे खूप लोकांना पुस्तकं हवी असत. तिथल्या मास्तरने त्यांच्यात ही वाचनाची आवड उत्पन्न केली आहे. तो पाद्र्याचा पोरगा आहे, अन् तरीही चांगला माणूस आहे म्हणतात. जवळच आठदहा मैलावरच्या गावी दुसरी एक मास्तरीणही आहे. ते दोघेही जर्थात्‌च सरकारने बंदी घातलेली पुस्तकं लोकांना वाचायला देत नाहीत. नोकरी जाण्याचं भय वाटतं त्यांना. पण मला मात्र तीच, साधारण जहालच पुस्तकं पाहिजेत. मी त्या पुस्तकांचा प्रसार करीन, अन् ती पोलिसांच्या हाती लागली तरी सुद्धा पर्वा नाही, कारण त्यांना त्या बिचाऱ्या दोन शिक्षकांचाच संशय येईल. मी अजिबात निसटून जाईन अन् लपून राहीन."

आपण कशी चतुराईची कल्पना पुढे मांडली, अशा विचाराने स्वतःच्या डोकेबाजपणावर खूष होऊन रिबिनने दात विचकटले.

'अस्सं!' आई स्वतःशीच म्हणाली. 'हा दिसतो अस्वलासारखा, पण आहे मात्र कावेबाज कोल्हा!'

"बेकायदेशीर वाङ्मयाचा प्रसार केल्याचा जर त्या शिक्षकांवर संशय आला तर त्यांना तुरुंगात डांबतील का?" पावेलने विचारलं.

"अर्थात्‌च!" रिबिन निर्विकारपणे उत्तरला. "कां बरं? त्याचं काय?"

"पण गुन्हा तर तुमच्या हातून घडणार! मग तुरुंगात जावंच लागलं तर तुम्ही जायला नको का?"

"आता मात्र कमाल झाली!" रिबिन जोराने हसून व स्वतःच्या मांडीवर थाप मारून म्हणाला. "अरे बाबा, माझा कुणाला संशय येईलच कसा! माझ्या सारख्या खेडवळ शेतकऱ्याचा या असल्या गोष्टीशी कोण संबंध जोडील? पुस्तकाबिस्तकांची भानगड म्हटली की सुशिक्षित लोकांवरच संशय जाणार! तेव्हा कुणी जाब विचारलाच तर तो त्या लोकांना."

आईला वाटलं, रिबिनच्या म्हणण्याचा खरा अर्थच पावेलच्या ध्यानात आला नसावा. तिने पावेलकडे पाहिलं. तो त्याच्या डोळ्यांवरून रागावल्यासारखा दिसत होता.

"म्हणजे, रिबिन काम स्वतःच करणार, पण त्याबद्दल शिक्षा झाली तर दुसऱ्याला व्हावी अशी कल्पना आहे," आई भीतभीतच पावेलला समजावू लागली.

"हो, असंच!" रिबिन दाढी कुरवाळीत म्हणाला "सध्या तरी असंच करायचं."

"असं पहा, आई," पावेल शुष्कपणे म्हणाला, "आमच्यापैकी एखाद्यानं, समजा आंद्रेइनं, काही केलं अन् तो माझ्याआड लपू लागला अन् मला तुरुंगात जावं लागलं तर तुला ते चालेल का?"

आई एकदम चपापून आश्चर्याने पावेलकडे पाहू लागली.

"आपल्याच कॉमरेडला अशा तऱ्हेने कुणी फसवणं कसं शक्य आहे?" आई मान हालवीत उद्गारली.

"हं – असं म्हणतोस होय?" रिबिन जोरात म्हणाला. "तुझ्या म्हणण्याचा अर्थ आला माझ्या ध्यानात." हे पावेलला उद्देशून बोलत असताच त्याने आईकडे पाहून डोळे मिचकावले व तिला म्हणाला, "ही फार नाजूक बाब आहे, आई."

नंतर पुनः पावेलकडे वळून तो म्हणाला, "तुझं मन अगदी लहान पोरासारखं भाबडं आहे, दोस्त! असल्या गुप्त कामात खऱ्याखोट्याची पर्वा करून चालत नसतं. तूच पहा. पहिलं असं की ज्याच्याजवळ पुस्तक सांपडेल त्यालाच तुरुंगात जावं लागेल, त्या मास्तरांना नव्हे. हे झालं एक. दुसरं असं की हे शिक्षक जरी सरकारमान्य पुस्तकांतूनच शिकवत असले तरी ज्या गोष्टी बेकायदेशीर पुस्तकांत असतात तोच त्यांच्याही शिकवण्याचा आशय



असतो, फक्त शब्द काय ते निराळे – जरा सौम्य अन सत्याचा अंश कमी असलेले. थोडक्यात म्हणजे त्यांचा अन् माझा उद्देश एकच आहे, फक्त मार्ग भिन्न आहेत एवढंच. ते आडरस्त्याने जातात तर मी सरळ राजमार्गाने जातो एवढंच काय ते. सरकारच्याच दृष्टीने पाहायचं तर आम्ही दोघंही सारखेच दोषी आहोत, नाही का? तिसरं असं की, मला त्या मास्तरांची काहीही पर्वा नाही. पायदळाची कधी तरी घोडदळाशी दोस्ती जमेल का? हां, मी एखाद्या शेतकऱ्याशी असं कधी वागणार नाही, पण त्यांचं मला काय सोयरसुतक? एकजण चक्क पाद्रयाचा पोरगा, अन् ती दुसरी – तिचा बाप तर बडा जमीनदार आहे. ती दोघं लोकांमध्ये प्रचारच कां करतात हेच मुळी माझ्यासारख्या शेतकऱ्याला कळत नाही. मला काय साधायचं आहे हे मी जाणतो; पण त्यांचा उद्देश काय असावा याचा मला पत्ता लागत नाही. हजारो वर्षांपासून हे बडे लोक शेतकऱ्यांची चामडी लोळवणं हेच आपलं कर्तव्य समजून ते करीत आले आहेत, अन् आताच या सुशिक्षितांना काय जाग आली कोण जाणे, पण ते आपल्याच हातांनी शेतकऱ्यांच्या डोळ्यांवरची झापडं काढून टाकू पहात आहेत! मी काही चमत्कारांवर व कल्पित कथांवर विश्वास ठेवणारा माणूस नाही, पण हे त्यांचं कृत्य म्हणजे अद्भुत व सुरस गोष्टींइतकंच चमत्कारपूर्ण आहे यात शंका नाही. माझा या सुशिक्षित न् बड्या लोकांवर बिलकूल विश्वास नाही. हिवाळ्याच्या दिवसांत कधी कधी शेतातून जाताजाता अचानक दूरवर रस्त्यावरून काही तरी चमकून जाताना दिसतं. तो लांडगा आहे की कोल्हा, की एखादं कुत्रंच आहे हे काही ओळखता येत नाही इतकं अंतर मध्ये असतं. तसंच आहे हे."

आईने पावेलकडे पाहिलं. त्याची नजर खाली जमिनीवर खिळलेली होती.

रिबिन आपल्या दाढीतून बोटे फिरवीत मोठ्या समाधानाने पावेलकडे पाहू लागला व म्हणाला, "अशा परिस्थितीत सभ्यपणा न् शिष्टाचार यांची चर्चा करीत बसायला वेळ नसतो, समजलास! जीवन फार खडतर आहे बाबा आणि कुत्र्यांचा घोळका म्हणजे निरुपद्रवी मेंढयांचा कळप नव्हे! प्रत्येक कुत्र्याची भुंकण्याची निराळीच तऱ्हा असते."

"पण श्रीमंतांपैकी सुद्धा काही लोक सामान्य लोकांच्या हितासाठी लढून आजन्म तुरुंगवास पत्करतात व वेळ आली तर मृत्यूचाही सामना करतात

हे खरं नाही का?" हे बोलताना आईच्या मनश्चक्षूसमोर तिच्या परिचयाचे काही चेहरे उभे होते.

"अशा अपवादात्मक लोकांची गोष्ट निराळी!" रिबिन उत्तरला. "काही शेतकरी श्रीमंत होऊन बडे लोक बनतात व काही बड्या लोकांनाही गरीबी येऊन सामान्य शेतकरी बनावं लागतं, तो भाग निराळा. पावेल, तूच मला सांगितलं होतंस ना की माणसाचे विचार हे त्याच्या परिस्थितीवर व राहाणीवर अवलंबून असतात म्हणून! जग हे असंच आहे. कामगाराने एखादी गोष्ट 'हो' म्हटली की मालक नाही म्हणायचा अन् कामगाराने 'नाही' म्हटलं की मालकाचा होकार यायचा, हे ठरलेलंच आहे. तो त्यांचा स्वभावधर्मच आहे. कामगार न् मालक यांच्यात जसं हे विळ्या-भोपळ्याइतकं सख्य असतं, तसंच शेतकरी न् जमीनदार यांचं आहे. शेत-कऱ्याला पोटभर भाकरी मिळू लागली की जमीनदारांच्या पोटात गोळा उठलाच म्हणून समजा. अर्थात् प्रत्येक जातीत न् जमातीत काही डोमकावळे असायचेच. त्याप्रमाणे शेतकऱ्यांतही काही वाईट लोक असतील, मी नाही म्हणत नाही..."

रिबिन उठून उभा राहिला. तो दात चावीत असल्यासारखी त्याची दाढी हालत होती. तो जरा खालच्या व कमी आवेशपूर्ण आवाजात पुनः बोलू लागला, "पाच वर्षेपर्यंत मी इथे शहरात निरनिराळ्या कारखान्यांतून काम केलं. एका कारखान्यातून दुसऱ्यात, न् दुसऱ्यातून तिसऱ्यात, असं सारखं सुरू होतं. अन् या कामात मला खेडं कसं असतं याचासुद्धा अजिबात विसर पडला. मग पुनः मी खेड्यात गेलो तेव्हा मला कळून आलं की शहरात राहिल्यावर खेड्यातल्यासारखं जीवन कंठणं अशक्य आहे. अगदी शक्यच नाही ते, समजलास! तिथे लोकांवर काय भयंकर अन्याय न् जुलूम चालला आहे याची इथे राहून कल्पनासुद्धा नसते आपल्याला. तिथे भूक न् उपासमार म्हणजे अगदी सावलीसारखा माणसांचा पाठलाग करीत असते. लोकांची अगदी अन्नान्नदशा झाली आहे. मूठभर दाण्याला लोक महाग झाले आहेत. ही भूक लोकांचा आत्मा सुद्धा गिळून टाकते! अन् माणसांचं मनुष्यपणच नाहीसं करून टाकते! तिथे लोक जगत नाहीत तर अठराविश्वे दारिद्र्यात कुजत असतात. अन् भुकेनं बेजार झालेले हे लोक कुठे काही जास्तकमी उचलत तर नाहीत ना, म्हणून सरकारचे अधिकारी त्यांच्यावर टपून बसून गिधाडांसारखे तुटून पडतात. एखाद्या शेतकऱ्याजवळ काही



सापडलं की यांनी ते हिसकावून घेतलंच! शिवाय वर त्या बिचाऱ्याला मारहाण होते ती निराळीच!"

रिबिनने सभोवार पाहिलं व टेबलावर वाकून पावेलकडे पहात त्याने परत बोलण्याला प्रारंभ केला, "त्या खातेऱ्यात पुनः मी जाऊन पडलो तेव्हा मला खरोखरच त्याची किळस आली, अन् सुरवातीला तर मला वाटलं की मला इथे राहाणंच शक्य नाही. पण मग मी ठरवलं की, काही नाही, तिथे राहायचंच. आपल्याला लोकांना भाकरी मिळवून देता आली नाही तर निदान कालवण तर खरं! अन म्हणून मी तिथे राहायचं ठरवून काम करीत आहे. पण त्या लोकांवर होणाऱ्या अन्यायाची चीड माझ्या मनात सारखं घर करून आहे. माझ्या काळजात सुरी खुपसल्यागत ते शल्य मला आजही सतत बोचत आहे."

रिबिन उठला व हळूहळू पावले टाकीत तो पावेलच्या जवळ गेला व त्याने पावेलच्या खांद्यावर हात ठेवला. रिबिनच्या कपाळावर धर्मबिंदु उभे होते व त्याचा हात कापत होता. तो पुनः बोलू लागला,

"मला तुझ्या मदतीची गरज आहे. मला पुस्तकं दे, पण ती पुस्तकं अशी असली पाहिजेत की ती वाचल्यावर वाचणाऱ्याची झोप उडाली पाहिजे. त्यांना सारख्या डसत राहातील अशा इंगळ्या त्यांच्या मेंदूत घुसवायच्या आहेत आम्हाला. तुमचे जे लेखक लोक शहरातल्या कामगारांसाठी लिहितात त्यांना म्हणावं खेड्यांतल्या लोकांसाठी लिहीत जा. म्हणावं, अशा जळ-जळीत भाषेत लिहा की ते लिहिलेलं वाचून अंतरंगात आग भडकली पाहिजे व लोकांना ध्येयासाठी प्राणसुद्धा वेचण्याची प्रेरणा मिळाली पाहिजे."

आपला हात वर करून व प्रत्येक शब्दावर जोर देऊन तो म्हणाला: "मृत्यूवर मृत्यूच मात करू शकेल! म्हणजे असं की जनतेत जागृती करण्या-साठी स्वतः मरण स्वीकारलं पाहिजे! जगातल्या करोडो लोकांमध्ये जागृती न् चैतन्य निर्माण करण्यासाठी आपणासारख्या हजारो लोकांनी स्वतःच्या प्राणांचं बलिदान करायला हवं, समजलं! अशा प्रकारे लोकांना पुनः जिवंत करण्यासाठी मरणं कठीण नाही! जनतेला उठाव करण्यास सज्ज करणे हेच खरं कार्य!"

आईने चहा आणला व ती डोळ्याच्या कोपऱ्यातून रिबिनकडे पाहू लागली. त्याचं बोलणं ऐकून तिचा जीव दडपून गेला होता. त्याच्या बोलण्याचालण्यात असं काही तरी होतं की त्यामुळे तिला आपल्या मृत पतीची आठवण झाली.

तो देखील सदा असेच दातओठ खायचा अन् अस्तन्या सारून असायचा. असलाच उतावीळपणा अन् असलाच राग न् संताप! फरक इतकाच की तो संतापला न् चिडला तरी त्याची बडबड नसायची, व रिबिन आपल्या मनात येईल ते भडभड बोलून टाकी. मात्र यामुळे रिबिन काहीसा कमी भयंकर भासे, एवढं खरं.

रिबिनच्या बोलण्यावर पावेल संमतिदर्शक मान हालवून म्हणाला: "खेड्यांतल्या लोकांसाठी वर्तमानपत्र काढायला पाहिजे हे म्हणणं बरोबर आहे. तुम्ही लोक माहिती पुरवा म्हणजे आम्ही ते करू शकू."

आईने पावेलकडे पाहून स्मित केलं व मान हालवली. नंतर ती कपडे नीटनेटके करून घराबाहेर पडली.

"ठीक आहे," रिबिन जोरात उद्गारला. "आम्ही जरूर तुम्हाला माहिती पुरवू. मात्र तुम्ही इतक्या सोप्या भाषेत लिहीत चला की, गरीब गाईसारख्या मुक्या जनावरांना सुद्धा ते समजलं पाहिजे!"

तेवढ्यात स्वयंपाकघराचा दरवाजा उघडून कोणीतरी आत आलं. रिबिन तिकडे नजर टाकून म्हणाला, "येफीम आहे तो. हं, येफीम, इकडे ये. हाच तो पावेल. याच्याबद्दल तुला सांगितलंच आहे मी."

येफीम पावेलच्या समोर येऊन उभा राहिला. तो चांगला उंच होता, त्याचे केस मऊ होते, जबडा रुंद होता, पण तरी तो होता कोवळा पोरगेलासाच. त्याने अंगात तोकडा ओव्हरकोट घातला होता व टोपी काढून हातात घेतली होती. तो खालच्या नजरेने पावेलकडे पहात होता. त्याचा एकंदर रुबाब एखाद्या तगड्या माणसाचा होता.

त्याने पावेलशी हस्तांदोलन करून घोगऱ्या आवजात म्हटले, "तुमच्या भेटीने फार आनंद झाला मला."

नंतर पावेलच्या हातातून हात सोडवून घेऊन त्याने उलट्या वळवलेल्या केसांतून हात फिरवला व खोलीत चौफेर नजर टाकली. पुस्तकांवर नजर जाताच तो सरळ तिकडे वळला.

रिबिन डोळे मिचकावून पावेलला म्हणाला: "बरोबर शोधून काढली बघ त्यानं."

येफीमने एकदा माग वळून पाहिलं व मग तो पुस्तकं चाळण्यात मग्न होऊन गेला.

"वा! खूपच पुस्तकं आहेत की!" तो उद्गारला. "पण तुम्हाला ही



सगळी वाचायला वेळही सांपडत नसेल, नाही? खेड्यांत राहिलं तर वाचायला भरपूर वेळ मिळतो."

"पण इच्छा कुठे असते?" पावेलने विचारलं.

"वा, असते तर!" येफीम हनुवटीवर हात ठेवून उत्तरला. "तिथे सुद्धा लोक आता डोळ्यांचा उपयोग करू लागले आहेत! हं, पण हे काय? भूगर्भशास्त्र? हे कोणतं शास्त्र असतं?"

पावेलने ते समजावून सांगितल्यावर येफीम ते पुस्तक जागच्या जागी ठेवीत म्हणाला, "आपल्या कामाचं नाही हे."

"पृथ्वी कुठून आली याच्याशी शेतकऱ्यांना कर्तव्य नाही!" रिबिन मोठ्याने हसून बोलू लागला. "त्या जमिनीची वाटणी कशी झाली हेच त्यांच्या दृष्टीने महत्वाचं आहे. आपल्या डोळ्यांदेखत जमीनदारांनी ती कशी बळकावली हे त्यांना जाणून घ्यायला हवं आहे. पृथ्वी स्थिर असो की फिरत असो, त्यामुळे शेतकऱ्याच्या जीवनात काय बदल होणार? तुम्हाला हवी तर तुम्ही पृथ्वी लटकवून ठेवा नाहीतर खिळ्याने ठोकून टाका! शेतकऱ्याच्या दृष्टीने ती जमीन त्याला खाऊ घालते तेच महत्वाचं आहे."

येफीमने दुसरं पुस्तक काढून त्यावरचं नाव वाचलं.

"'गुलामगिरीचा इतिहास' हे आमच्याबद्दल असेल, नाही?"

"नाही, त्यात नाही," पावेल जवळ जाऊन म्हणाला व दुसरं एक पुस्तक काढून येफीमच्या हाती देत त्याने सांगितलं, "पण या पुस्तकात रशियातील भूदासपद्धतीसंबंधी एक प्रकरण दिलेलं आहे."

येफीमने ते पुस्तक चाळून बाजूला ठेवून देत म्हटलं, "फार प्राचीन काळचा इतिहास दिसतो आहे हा."

"तुमची स्वतःची काही जमीन आहे का?" पावेलने विचारलं.

"आहे तर. आम्हा तिघां भावांची मिळून दहासाडेदहा एकर जमीन आहे. पण नुसती रेताड! त्या मातीने भांडी घासली तर स्वच्छ निघतील, पण पिकाच्या दृष्टीने कुचकामाची!"

अर्धा मिनिट स्तब्ध राहून तो सांगू लागला. "पण मी आता आमच्या शेतीचं काम करीत नाही. नाही तरी उपयोग काय? पोटाला मिळत नाही ते नाहीच. नुसतं जखडून घ्यायचं स्वतःला! गेली चार वर्षं शेतावर मजुरी करून पोट भरतो, पण आता हिवाळ्यात लष्करात भरती होणार आहे. मिखाइलो काका म्हणतात, सैन्यात जाऊ नको, कारण म्हणे आजकाल

लोकांना मारण्यासाठी सैन्य पाठवतात. पण माझा तर विचार सैन्यात दाखल होण्याचाच आहे. स्तेपान राझिन अन् पुगाचेव यांच्या काळात सुद्धा सैन्यातले शिपाई लोकांना ठार करीत असतच की! उलट आता ते बंद पाडण्यासाठीच लष्करात दाखल व्हायला हवं! तुम्हाला नाही वाटत असं?"

शेवटचा प्रश्न येफीमने पावेलकडे रोखून पहात विचारला

"हो, आता त्याची जरूर आहे खरी," पावेलने स्मित करीत म्हटले. "पण ते काम सोपं नाही. शिपायांना काय सांगायचं व ते कसं सांगायचं हेही माहीत असायला पाहिजे."

"ते येत नसलं तर शिकू आम्ही!" येफीम म्हणाला.

"पण अधिकाऱ्यांना समजलं तर ते गोळी घालून ठार करतील!" पावेल येफीमकडे रोखून पहात उद्गारला.

"अर्थात्च! अधिकाऱ्यांकडून काय दयेची अपेक्षा थोडीच करायची!' येफीमने शांतपणे उत्तर दिलं व तो पुनः पुस्तकं चाळू लागला.

रिबिन येफीमला म्हणाला, "तुझा चहा पिऊन घे, येफीम. आपल्याला लवकरच गेलं पाहिजे."

"ठीक आहे," येफीम म्हणाला व त्याने पावेलला विचारलं, "क्रांती म्हणजे बंड असतं का हो?"

तेवढ्यात आंद्रेइ आत आला. तो नुकताच स्नान करून आल्यामुळे त्याचा चेहरा लालबुंद दिसत होता. पण त्याची चर्या म्लान वाटत होती. त्याने काही न बोलता येफीमशी हस्तांदोलन केलं व रिबिनच्या शेजारी बसून त्याला आपादमस्तक न्याहाळलं व मग तो खाकरला.

रिबिनने त्याच्या मांडीवर थाप मारीत विचारलं, "तू फारसा खुषीत दिसत नाहीस. काही विशेष?"

"नाही, तसं विशेष असं काहीच नाही." खोखोल म्हणाला.

येफीमने आंद्रेइकडे पहात प्रश्न केला. "हे सुद्धा कामगारच आहेत का हो?"

"हो, कां पण?" खोखोलने विचारलं.

रिबिनने आंद्रेइला समजावलं, "त्याचं कारण असं की त्याने कारखान्यातला कामगार पूर्वी कधी पाहिलेला नाही. ते इतरांपेक्षा निराळे असतात असं त्याचं म्हणणं आहे."

"म्हणजे? आम्ही लोक निराळे कसे बुवा?" पावेलने विचारलं.



आंद्रेइला निरखून पहात येफीमने उत्तर दिले, "तुमची हाडं अणकुचीदार आहेत. शेतकऱ्यांची हाडं अशी नसतात, ती गोल असतात."

"शिवाय शेतकरी जमिनीवर उभा रहातो तो अगदी मजबूत पाय रोवून!" रिबिन म्हणाला. "ती जमीन त्याची नसली तरी सुद्धा त्याला त्या जमिनीचा मोठा आधार वाटतो. पण कारखान्यातला कामगार म्हणजे उडतं पाखरूच! त्याला ना घर ना दार! आज इथे तर उद्या कुठे तरी दुसरीकडेच! त्याला एका ठिकाणी ठेवून घेण्याला स्त्रीचा पाश सुद्धा असमर्थ ठरतो. जरा कुठे बिनसलं की तो तिला सोडून दुसरीकडे काही जास्त सुख मिळतं का म्हणून शोधायला निघालाच समजा! पण शेतकऱ्याचं तसं नसतं. आपले पाश न तोडता परिस्थिती सुधारण्याची त्याची इच्छा असते. पण ही तुझी आई आलीच पहा."

येफीम पावेलजवळ आला व त्याने विचारले, "तुमच्या पुस्तकांपैकी एक मला वाचायला द्याल का?"

"अवश्य!" पावेल उत्तरला.

त्या पोराचा चेहरा एकदम खुलला व तो घाईने सांगू लागला: "वाचून झाल्यावर मी ते परत करीन. आमचे लोक नेहमीच डांबराच्या व्यापारानिमित्त येथे येतात त्यांच्याबरोबर पाठवून देईन."

एवढ्या वेळात रिबिनने ओव्हरकोट चढवून पट्टाबिट्टा बांधून तो तयार झाला होता. येफीमला उद्देशून म्हणाला, "चला जाऊ या. बराच वेळ झाला की."

येफीमने वाचायला घेतलेले पुस्तक दाखवीत मोठ्या खुषीने सांगितलं, "हे पहा माझ्या बुद्धीला झकासपैकी खाद्य मिळालं आहे."

ते दोघे निघून गेल्यावर पावेलने आंद्रेइला विचारलं, "तुझं काय मत आहे त्यांच्याबद्दल?"

"हूं... हूं..." खोखोल अडखळत म्हणाला, "ते आले ते जणु काय गडगडणाऱ्या ढगांसारखेच!

आई म्हणाली, "मिखाइलोबद्दल म्हणतोस! तो तर पक्का खेडवळ शेतकरी बनला आहे. जणु काही कारखान्यात कधी गेलाच नाही! अन् दिसतोही भयंकर!"

आंद्रेइ खिडकीशी बसून उग्र चेहऱ्याने चहाच्या पेल्याकडे पहात होता. त्याला उद्देशून पावेल म्हणाला,

"ते दोघे आले तेव्हा तू असायलाच हवा होतास इथं! तू नेहमी म्हणत असतोस ना, लोकांच्या अंतःकरणाचा ठाव घ्यायला हवा म्हणून. मग तू इथे असतास तर तुला त्या दोघांच्या अंतःकरणांची ओळख पटली असती. रिबिनचं बोलणं ऐकून तर मी थक्कच झालो. मी त्याच्याशी वादसुद्धा घालू शकलो नाही. त्याचा मुळी माणसावर विश्वासच नाही अन् तो माणसांना काही किंमत द्यायलाही तयार नाही! आई म्हणाली ते बरोबर होतं. तो भयंकर माणूस आहे हेच खरं."

"मी ओळखलं ते," आंद्रेइ खिन्नपणे उद्गारला. "राज्यकर्त्यांनी लोकांच्या मनात विष कालवून ठेवलं आहे. जनता उठाव करील तेव्हा ती सगळ्या गोष्टी उध्वस्त करून टाकील. लोकांना निव्वळ जमीन पाहिजे, ती तशी नसेल तर ते वरचं सर्व उध्वस्त करून निव्वळ जमीन ताब्यात घेतील. सगळं, सगळं, मोडून तोडून टाकतील!"

आंद्रेइ अगदी सावकाश बोलत होता व त्याचं मन दुसऱ्याच कसल्या-तरी विचारात गुंग होतं. आईने त्याच्या खांद्याला हलकेच स्पर्श केला व ती म्हणाली, "जरा शांत हो, आंद्र्यूशा."

"जरा थांब, नेनको!" तो अत्यंत मृदु स्वरात म्हणाला. पण लगेच खवळून जाऊन टेबलावर मूठ आपटीत तो जोराने म्हणाला, "होय, मी म्हणतो ते सत्य आहे, पावेल! शेतकरी एकदा दंड थोपटून उभा राहिला म्हणजे मग तो सारं काही उध्वस्त करून निव्वळ जमीन तेवढी स्वतःच्या उपयोगासाठी मोकळी करून घेईल. सारं काही जाळपोळ करून उध्वस्त करून टाकील व जणु काही प्लेगची साथ येऊन जावी तसं सगळीकडे उजाड होऊन जाईल! आपल्याला ज्या ज्या गोष्टीमुळे जुलुम सहन करावा लागला त्यांचं नाव सुद्धा शिल्लक ठेवणार नाही तो."

"म्हणजे मग त्याचा आपल्या मार्गात अडथळा होऊन बसेल!" पावेल शांतपणे उद्गारला.

"त्याचा तसा अडथळा बनू न देणं आपल्यावर अवलंबून आहे. त्याला लगाम घालून ठेवण्याचं काम आपल्यालाच केलं पाहिजे. इतर कोणाहीपेक्षा आपण कामगार त्याला जवळचे आहोत. आपण नीट सांभाळलं तर शेतकरी आपल्यावर विश्वास ठेवून आपल्या मागोमाग येईल."

"आपण शेतकऱ्यांसाठी वर्तमानपत्र काढावं असं रिबिनने सुचवलं आहे."

"अगदी बरोबर. करायला हवं ते."



"मग मी त्याच्याशी वाद घालायलाच हवा होता, नाही?" पावेलने मंदस्मित करीत म्हटलं.

"वादच घालायचा तर अजूनही वेळ येईल की!" केसांतून बोटं फिरवीत आंद्रेइ बोलू लागला. "तू आपलं स्वतःचंच तुणतुणं वाजवीत बैस. आणि ज्याचे पाय जमिनीत भक्कम रोवलेले नाहीत ते तुझ्या इशाऱ्याप्रमाणे नाचत राहातील. आपल्या पायाखालच्या जमिनीचा स्पर्शही आपल्याला कळत नाही असं रिबिन म्हणाला ते बरोबर होतं. अन् त्या जमिनीवर भक्कम उभं राहायला नकोच, कारण तीच धरती आपल्याला हादरून सोडायची आहे. एकदा ती हादरली म्हणजे लोकही हादरतील व पाशातून मुक्त होतील व पुनः हादरा दिला म्हणजे ते खऱ्या अर्थाने मुक्त होतील."

"तुला तर सारं काही अगदी सरळ न् सोपंच वाटतं की!" आई हसत हसत उद्गारली.

"आहेच की सोपं ते! जीवनाइतकंच सरळ न् सोपं आहे."

आईला असं उत्तर दिल्यावर थोडा वेळ थांबून खोखोल म्हणाला, "मी जरा बाहेर मैदानात फिरून येतो."

"आंघोळ झाल्यावर बाहेर फिरायला जाणार? बाहेर गार वारा सुटला आहे, तो बाधेल की!" आईने त्याच्या बेतात मोडता घातला.

"मला थोडं मोकळ्या हवेत फिरून यायलाच हवं."

"पण कां म्हणून पडसं ओढवून घेतोस?" पावेलने स्नेहार्द्र स्वरात त्याला विनवलं. "त्यापेक्षा तू जरा झोप घे म्हणजे बरं वाटेल."

"नको. मी जातोच बाहेर!"

आंद्रेइने कपडे चढवले व तो आणखी एक शब्दही न बोलता बाहेर पडला.

"फारच कष्टी झाला आहे रे तो मनातनं!" असं म्हणून आईने उसासा टाकला.

"ते घडल्यापासून तुला त्याच्याबद्दल अधिकच माया वाटू लागलेली दिसतेय. अन् ते बरंच आहे म्हणा." पावेल म्हणाला.

"खरंच! हे असं होतंय हे माझ्या ध्यानी आलंच नाही. पण माझा त्याच्यावर जीव जडलाय हे खरं आहे."

"तू आहेसच मायाळू आई!" पावेलच्या स्वरात फारच मार्दव होतं.

"तुला न् तुझ्या मित्रांना माझा थोडा तरी उपयोग व्हावा असं मला फार फार वाटतं रे. पण काय करावं हेच मला उमजत नाही!"

"तेही शिकशील तू हळूहळू, आई."

"त्याहीपेक्षा काळजी करणं कसं सोडून द्यावं एवढं मला शिकता आलं तर फार बरं होईल." आईने मंदस्मित करीत म्हटलं.

"हा विषय आता पुरे, आई. पण आई, एक मात्र फार वाटतं, तुझं फार फार ऋण आहे ग माझ्यावर!"

आईच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले, पण ते पोराच्या दृष्टीस पडू नयेत म्हणून ती स्वयंपाकघरात निघून गेली.

खोखोल रात्री फार उशीरा परत आला व घरी आला तो सरळ अंथरूणावर जाऊन पडला.

"चांगला सहासात मैल चाललो असेन आज मी!" तो पडल्यापडल्याच पावेलला म्हणाला.

"त्यामुळे हलकं वाटलं ना पण तुला?" पावेलने विचारलं.

"तो विषय सोड आता. झोपू या आपण."

यानंतर खोखोल एक शब्दही न बोलता पडून राहिला.

थोड्या वेळाने वेसोव्श्चिकोव पावेलच्या घरी आला. त्याच्या अंगावर नेहमीप्रमाणेच घाणेरडे फाटके कपडे होते व तो स्वतःही नेहमीप्रमाणेच असंतुष्ट दिसत होता.

"इसाइचा खून कोणी केला ते काही कळलं का?" त्याने अस्वस्थपणे येरझारा घालीत पावेलला विचारलं.

"नाही." पावेल तुटकपणे म्हणाला.

"ज्याने कोणी हे काम केलं त्याने फार हुशारीने न् हिंमतीने काम केलं असलं पाहिजे यात शंकाच नाही. इसाइचा काटा काढण्याचा माझा स्वतःचाच इरादा होता. पण माझ्या आधीच कुणीतरी काम उरकलं! खरं म्हणजे त्या कामाला मीच लायक होतो."

"असं काही तरीच काय बोलतोस, निकोलाय?" पावेल स्नेहपूर्ण स्वरात म्हणाला.

"नको रे बाबा! कशाला भलतंच बोलतोस?" आईच्या बोलण्यात ममता ओसंडत होती. "तुझं अंतःकरण शेळीसारखं मऊ आहे अन् उगाच वाघासारखा डरकाळ्या कशाला फोडतोस?"



आज निकोलाय आल्यामुळे आईला बरं वाटलं होतं. त्याचा देवीचे वण असलेला चेहरा सुद्धा आज तिला अधिक आकर्षक भासत होता.

निकोलाय खांदे उडवून म्हणाला, "मी असल्याच कामाला योग्य आहे. आपल्याला कोणतं तरी काम पार पाडता येईल का, हा नेहमीच मला प्रश्न पडतो. खरंच माझा काहीच उपयोग नाही. कार्य करायचं म्हणजे सारखं लोकांशी बोलायला पाहिजे, अन् तेच तर मला येत नाही. काय काय घडत असतं, लोकांवर जुलुम कसा होतो, हे सगळं मला दिसतं, पण ते शब्दांनी व्यक्त करता येत नाही. मुक्या जनावरासारखी स्थिती आहे माझी!"

नंतर तो पावेलच्या जवळ गेला व खाली नजर वळवून टेबलावर बोटांनी आकृती काढीत उभा राहिला व अगदी एखाद्या अर्भकाप्रमाणे मुसमुसत नेहमीपेक्षा अगदी निराळ्या व्यथित् स्वरात तो बोलू लागला,

"दोस्त, मला काहीतरी अवघड काम दे. मला यापुढे हे असंच राहणं शक्य नाही. तुम्ही सगळे तुमच्या कामात गढून गेलेले आहात व त्या कार्याचा जोर वाढत आहे हेही मला दिसतं; मी मात्र त्यात कुठेच नाही! नुसतं लाकडाचे ओंडके न् फळ्या वाहात राहायचं! मग जगायचं तरी कशासाठी? मला खरंच काहीतरी अवघड काम द्या."

पावेलने त्याचा हात धरून त्याला जवळ ओढून घेतलं व म्हटले, "जरूर देऊ तुला काम आम्ही."

खोखोल पडद्यामागे होता. तिथूनच त्याचा आवाज आला:

"मी तुला कंपोझिंगचं काम शिकवीन. तुला आवडेल ते काम?"

निकोलाय त्याच्याजवळ जाऊन म्हणाला, "तू शिकवलंस तर मी जरूर शिकेन. अन्–अन् त्याबद्दल माझी सुरी तुला भेट म्हणून देईन."

"चुलीत घाल तुझी सुरी!" खोखोल जोरजोराने हसत उद्गारला.

"नाही रे, फार चांगली सुरी आहे ती." निकोलाय भाबडेपणाने त्याला पटवून देऊ लागला.

मग पावेलही हसू लागला.

निकोलाय येरझारा घालता घालता मध्यभागी थांबून म्हणाला, "मला– मला हसताय तुम्ही?"

"अर्थात् तुलाच!" खोखोल अंथरूणातून उडी मारून उठत म्हणाला. "बरं. आता आपण बाहेर फिरून येऊ या का? बाहेर चांदणं कसं सुरेख पडलं आहे. जाऊ या का?"

"बरं, चला." पावेल म्हणाला.

"मी पण येतो तुमच्याबरोबर." निकोलाय म्हणाला. "हा खोखोल हसला की ते ऐकत राहाणं आवडतं मला."

"अन् मला तू भेटी देण्याची आश्वासनं देतोस ती ऐकायला आवडतं, समजलास!" खोखोल मिस्किलपणे हसत उद्गारला व कपडे घालण्यासाठी आत गेला.

"गरम कपडे तरी घाल बाबा!" आईने त्याला विनवलं.

ते तिघेजण बाहेर पडल्यावर आई थोडा वेळपर्यंत खिडकीतून त्यांच्याकडे पहात होती. मग ती आत देवाच्या मूर्तीजवळ जाऊन पुटपुटली: "देवा! त्या सर्वांवर तुझं कृपाछत्र राहू दे! तूच त्यांचा पाठीराखा आहेस!"

## २६

त्यानंतर दिवस इतके भराभर जाऊ लागले की मे-दिन जवळ येत होता त्याबद्दल विचार करायला आईला दिवसा सवडच होत नसे. पण दिवसभराच्या धांदलीत जीव दमून गेल्यावर रात्री झोपताना मात्र तिला हुरहुर वाटे व ती स्वतःशीच म्हणे, "एकदाचा तो दिवस लवकर येऊन जाईल तरच बरं!"

सकाळी गिरणीचा भोंगा होताच पावेल अन् आंद्रेइ लगबगीने कशीतरी न्याहरी आटोपून बाहेर पडत तेव्हा जाते वेळी ते दहावीस लहानमोठी कामं तिच्यावर सोपवून जात. सारा दिवस पिंजऱ्यात अडकून पडलेल्या खारीसारखी तिची धावपळ सुरू असायची. जेवण करायचं, पोस्टर्ससाठी चिकी अन् शाई करायची, असं तर चालू असायचंच, पण मधूनमधून कोणी अपरिचित लोक कुठूनतरी एकदम प्रकट होत व पावेलला देण्यासाठी म्हणून काही चिठ्ठ्याचपाट्या तिच्या हाती देऊन, आले तसेच अचानकपणे अदृश्य होत. त्या चिठ्ठ्या घेऊन येणाऱ्यांच्या चेहऱ्यावर जो एक प्रकारचा गुप्त कामगिरी पार पाडीत असल्याबद्दलचा अभिमान व कृतार्थतेचा भाव व्यक्त होई त्यामुळे आईच्याही चित्तवृत्ती थरारून येत.

मे-दिनाच्या कार्यक्रमात भाग घेण्याची कामगारांना हाक देणारी पत्रके रोज रात्री निरनिराळ्या ठिकाणी लावली जात होती. गावात अनेक ठिकाणच्या भिंतींवर, कारखान्याच्या कुंपणावर, फार काय पोलिसचौकीवर



सुद्धा ही पत्रके लावली जात. कारखान्यात तर रोजच असल्या पत्रकांचा पाऊस पडत होता. रोज सकाळी पोलिसशिपाई कामगारांच्या वस्तीतून हिंडून ती पत्रके खरडून काढून फाडून टाकीत व ती फाडताना तोंडाने शिव्याशापांचा वर्षाव करीत. पण दुपारी जेवणाच्या सुटीत पुनः कुठून तरी तसलीच पत्रके उडून येऊन कामगारांच्या पायाशी पडत. शहरातून मुद्दाम आलेले गुप्त हेर कोपऱ्याकोपऱ्यावर उभे राहून कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या व आत जाणाऱ्या कामगारांचे खुषीने उजळलेले चेहरे न्याहाळून पहात असत. पण काहीच सुगावा लागेना. पोलिसांची ही असहायता पाहून होणारा आनंद कामगारांच्या चेहऱ्यांवर व्यक्त होई. फार काय, म्हातारे कामगारसुद्धा गालातल्या गालात हसून म्हणत: "पहा तर खरं ते काय करताहेत ते!"

कामगारांचे घोळके ठिकठिकाणी जमून त्या पत्रकांची चर्चा करू लागले. सगळीकडे एक प्रकारचं नवं चैतन्य निर्माण झालं होतं. वसंतऋतूच्या आगमनापेक्षाही या नव्या वातावरणाने लोकांना भारून टाकलं होतं. यात काही तरी नवीन आहे ही भावनाच कामारांत खळबळ माजविण्याला पुरेशी होती.

हा प्रकार ज्यांना पसंत नव्हता असेही काहीजण अर्थात् होतेच. ते दातओठ खाऊन बंडखोरांवर शिव्याशापांचा वर्षाव करीत. पण बऱ्याच जणांना त्यात आशेचे किरण दिसत व त्याचबरोबर कसली तरी अनाकलनीय भीतीही त्यांना चिंताग्रस्त करी. काही अगदी थोडे जण मात्र असे होते की हे सर्व चैतन्य, ही सगळी खळबळ निर्माण करण्याचे श्रेय आपल्याला आहे या जाणिवेने त्यांना अभिमान व हर्ष वाटत होता. पण अर्थात्च या गुप्त कार्यकर्त्यांची संख्या अगदीच मर्यादित होती.

पावेल अन् आंद्रेइ यांना तर अर्थातच झोपसुद्धा घेण्याला सवड नव्हती. पहाटेच्या वेळी ते घरी येत तेव्हा त्यांचे चेहरे थकून गेलेले असत व आवाजही बसलेला असायचा. रात्रीबेरात्री जंगलात कुठेतरी त्यांच्या सभा चालायच्या हे आईला माहीत होतं. कामगारांच्या त्या वसाहती भोवती रात्रीच्या वेळी घोडेस्वारांची गस्त सुरू होती, सर्वत्र गुप्त हेरांचे जाळे पसरलेले होते, कामगारांना पकडून त्यांच्या झडत्या घेण्याचे प्रकार होत होते व अधूनमधून काहींची धरपकडही होत होती, हे सर्व आईला ठाऊक होतं. त्यामुळे आपला मुलगा व आंद्रेइ यांना सुद्धा कोणत्याही क्षणी अटक होऊ शकेल असा संभव होता हेही तिला कळत होतं. फार काय, तिला वाटे, त्यांना अटक झाली तर तेच त्यांच्या दृष्टीने बरं!

टाइमकीपर इसाइच्या खुनानंतर दोन दिवस पोलिसांनी त्या खुनाची कसून चौकशी केली, दहाबारा लोकांना बोलावून त्यांच्या जबान्याही घेतल्या, पण मग का कुणास ठाऊक, अचानकपणे ती चौकशी बंद पडली.

मरिया कोर्सुनोवाचं सगळ्यांशीच संधान असे, त्यामुळे तिचे पोलिसांशीही चांगले संबंध होते. तिने एक दिवस बोलता बोलता आईला सांगितलं,

"या खुनाच्या प्रकरणात खुनी इसमाचा शोध लागणंच मुळी शक्य नाही! त्या दिवशी सकाळी कमीत कमी शंभर लोकांनी तरी इसाइला पाहिलं असेल अन् त्यांतल्या नव्वद लोकांना त्याचा काटा निघाला तर बरं असंच वाटत असेल. कारण गेली सात वर्षे लोकांना सतावणं हाच त्याचा धंदा होता, मग शोध लागावाच कसा?"

ती हे जे आपलं मत म्हणून सांगत होती ते खर म्हणजे पोलिसांचंच मत असणार हेही उघड होतं.

इकडे खोखोलमध्ये मात्र खूपच फरक झाला होता. त्याचा चेहरा सुकून जाऊन गाल खप्पड दिसू लागले होते, डोळ्यांभोवतीच्या भागावर सूज येऊन त्याचे बटबटीत डोळे अर्धवट मिटल्यागत दिसू लागले होते, व नाकपुड्यांपासून जिवणीपर्यंत सुरकुत्या उमटल्या होत्या. नेहमीच्या, दैनंदिन जीवनाच्या गोष्टींविषयी तो फारसा बोलेनासा झाला. मधूनच तो कसल्यातरी विलक्षण कल्पनांनी भारावल्यासारखा होऊन बोलू लागे; अशा वेळी स्वातंत्र्य व न्याय यांचा विजय झालेला असेल अशा उज्ज्वल भविष्यकाळाविषयी तो आपल्या श्रोत्यांच्याही चित्तवृत्ति थरारून सोडी.

थोड्या दिवसांनी इसाइच्या खुनाच्या प्रकरणाची चर्चा कमी होत होत तो विषय अजिबातच मागे पडला तेव्हा एक दिवस आंद्रेइ विकट हास्य करून म्हणाला,

"या लोकांना सामान्य जनतेच्या जीवनाचं काडीइतकंही मोल वाटत नाही. फार काय आपल्याविरुद्ध ते ज्यांचा उपयोग करून घेतात त्या स्वतःच्या हस्तकांनासुद्धा ते कवडीमोल लेखतात! असले हस्तक प्राणाला मुकले तरी सुद्धा त्यांना त्याचं काही वाटत नाही! त्यांना फक्त एकच गोष्ट प्रिय असते, ती म्हणजे पैसा!"

"या गोष्टी पुरे, आंद्रेइ!" पावेलने त्याला दटावले.

"सगळा इमला कुजलेला होता तो नुसत्या एका स्पर्शाने कोसळला, इतकंच!" आई म्हणाली.



"खरं आहे ते, पण तसं म्हटल्याने मनाला काही फारसं समाधान लाभत नाही!" आंद्रेइ मलूलपणे उत्तरला.

असले उद्गार वारंवार त्याच्या तोंडून बाहेर पडत आणि तो हे असं बोले तेव्हा त्यातून जो सर्वसामान्य निष्कर्ष निघे तो अत्यंत कटु पण मार्मिक असे.

सगळेजण ज्या दिवसाची वाट पहात होते तो मे-दिन अखेरीस उगवला.

कारखान्याचा भोंगा नेहमीप्रमाणेच कामगारांना कामावर येण्याची सूचना देऊ लागला. आईचा रात्रभर डोळ्याला डोळा नव्हताच. भोंग्याचा आवाज कानी येताच ती चटकन् उठली व तिने आदल्या रात्रीच शेगडी तयार करून ठेवली होती ती पेटत घातली. नेहमीप्रमाणे पावेल अन् आंद्रेइ झोपले होते त्या खोलीचं दार ठोठावण्यासाठी ती दाराजवळ गेली, पण एकदम तिने विचार बदलला व ती खिडकीशी जाऊन बसली. दाढ दुखत असल्याप्रमाणे तिने गालावर हात दाबून धरला व ती बाहेर पाहू लागली.

बाहेर निळसर आकाशात पांढऱ्या व शेंदरी रंगाच्या ढगांचा एक पुंजका वेगाने चालला होता. कारखान्यातल्या सूंऽऽ करणाऱ्या वाफेने पक्षांचा तांडा एकदम घाबरून दूर पळावा तसं त्या ढगांचं भ्रमण भासत होतं. आई स्वप्नाळू नजरेने त्या ढगांचं निरीक्षण करीत होती. रात्रभर झोप न आल्यामुळे तिचं डोकं जड झालं होतं व डोळ्यांची आग होत होती. पण तिच्या अंतःकरणात मात्र एका विलक्षण शांततेने घर केलं होतं. तिच्या हृदयाचं स्पंदन अगदी व्यवस्थित सुरू होतं व तिच्या मनातले विचारही अगदी साधे होते. ती स्वतःशीच म्हणत होती:

"मी उगाच इतक्या लवकर शेगडी पेटवली. आता निष्कारण सगळं पाणी उकळून त्याची वाफ होईल... दोघंही पार दमलेले आहेत. आजच्या दिवस तरी त्यांना आणखी थोडा वेळ झोपू देत..."

प्रभातकालच्या सूर्याचे किरण खिडकीतून आत शिरले तसा आईने एक हात पुढे करून त्या कोवळ्या उन्हाच्या सुखद स्पर्शाचा अनुभव घेतला. ते करीत असताना तिचा चेहरा प्रफुल्लित झाला होता व ती विचारमग्न झाल्यासारखी दिसत होती. काही वेळाने ती उठली व तिने आधणाचं पाणी काढून ठेवलं. मग ती तोंड धुवून प्रार्थना करू लागली. तिने हाताने क्रूसाची खूण केली व तोंडाने ती प्रार्थनेचे शब्द पुटपुटू लागली. प्रार्थना करीत असताना तिचा चेहरा उजळून निघत होता व तिच्या उजव्या नेत्रावरील भुवई थरथरत होती.

नंतर दुसरा भोंगा झाला. तो तिला पहिल्या भोंग्याइतका जोराचा व उन्मत्त भासला नाही. यावेळी भोंग्याच्या कर्कश आवाजात किंचितसा कंप होता व तो नेहमीपेक्षा जास्त वेळ वाजत राहिला असंही तिला वाटलं.

पावेल अन् आंद्रेइ झोपले होते त्या खोलीतून खोखोलचा गंभीर आवाज स्पष्ट ऐकू आला.

"पावेल, ऐकलास ना भोंगा?"

जमिनीवर कुणाची तरी पावलं वाजली व त्या दोघांपैकी एकाने जोराने जांभई दिल्याचाही आवाज आला.

"चहा झाला आहे बरं का!" आई मोठ्याने म्हणाली.

"आम्हीही उठलोच की!" पावेल खुषीने ओरडला.

"सूर्य वर येऊ लागला बरं का!" खोखोल म्हणाला. "अन् आकाशात ढगही जमले आहेत. आज तर ढग हवेतच, नाही?"

खोखोल स्वयंपाकघरात आला तेव्हा त्याचा चेहरा अर्धवट झोपेमुळे मरगळलेलाच होता, पण तरीसुद्धा स्वारी मोठ्या खुषीत दिसत होती.

"काय नेनको! झोप चांगली लागली की नाही?" त्याने आईला विचारलं.

आई त्याच्याजवळ गेली व हळू आवाजात त्याला म्हणाली, "आजच्या मिरवणुकीत तू पाशाच्या जवळ सारखं राहायचं बरं का, आंद्र्यूशा!"

"होय, राहीन तर!" खोखोलही कुजबुजण्याच्या स्वरात उत्तरला. "आम्ही एकत्र आहोत तोंपर्यंत अगदी बरोबरच राहू अशी खात्री असू दे आई!"

"कसल्या कानगोष्टी चालल्या आहेत रे तुम्हा दोघांच्या?" पावेलने विचारलं.

"काही विशेष नाही, पाशा!" आई म्हणाली.

पण खोखोल मात्र तोंड धुण्याला जाता जाता मिस्किलपणे म्हणाला. "नाही, आईचं म्हणणं असं की मी आज नीट स्वच्छ तोंड धुवायला हवं म्हणजे पोरी पाहातील तरी!"

"उठ जाग ओ भूके बंदी..." पावेल हलक्या आवाजात गुणगुणू लागला.

दिवस वर आला तसतसे ढग नाहीसे होऊन हवा निवळली व आकाश स्वच्छ झालं. आई चहाचे कप भरताना स्वतःशीच विचार करीत होती की



हे सारं किती विचित्र! हे आता चांगले हसताहेत व थट्टामस्करी करताहेत, पण आजच्या दिवसात काय काय घडणार आहे कुणास ठाऊक! तरीसुद्धा तिच्या चित्ताची शांती ढळली नव्हती व ती स्वतःही आनंदाने वावरत होती:

त्यांनी न्याहारी करण्यातही मुद्दामच पुष्कळ वेळ काढला व वेळ लवकर जावा म्हणून बोलणं सारखं सुरू ठेवलं. पावेल नेहमीप्रमाणेच अगदी हळूहळू व काळजीपूर्वक चहातली साखर ढवळत होता व त्याला पावाचा कडक भाग आवडत असे तो काढून त्यावर मीठ भुरभुरतानाही अगदी सावकाशपणे सर्व क्रिया करीत होता. खोखोलही अस्वस्थपणे मेजाखाली पाय हालवीत बसला होता व सूर्यप्रकाशाच्या किरणांचा एक कवडसा चहाच्या पेल्यावरून परावर्तित होऊन भिंतीवर व छतावर हेलकावे घेत होता ते प्रकाशाचं नृत्य पाहाण्यात गुंग होता.

मग खोखोलच बोलू लागला, "मी सुमारे दहा वर्षाचा होतो तेव्हा एक दिवस मला वाटलं की आपण आरशात सूर्याला सहज पकडू शकू. म्हणून मी सूर्यप्रकाशावर नेम धरून आरसा जोरात आपटला. माझा हात तर कापलाच, पण वर चांगला खरपूस मारही खावा लागला. नंतर मी बाहेर बागेत गेलो तिथे एका डबक्यात सूर्याचं प्रतिबिंब दिसलं तेव्हा मी जोरात त्यावर उडी मारली. मग काँय, सगळे कपडे चिखलात भरले अन् पुनः दुसऱ्यांदा मार खावा लागला. मला सूर्याचा भयंकर राग आला व मी त्याला जीभ काढून वेडावून त्याच्यावर सूड उगवून घेतला. मी त्याला साफ सांगितलं, 'हे लाल तोंडाच्या राक्षसा! मला मुळीच लागलं नाही! हो, नाहीच लागलं, समजलास!' त्याला असं बजावल्यावर मग कुठे मला बरं वाटलं!"

"तू त्याला लाल तोंडाचा राक्षस कां म्हटलंस?" पावेलने हसून विचारलं.

"आमच्या घराच्या समोर एक भला मोठा जाडजूड अंगाचा लोहार रहात होता. त्याचा चेहरा लालबुंद होता व त्याची दाढीसुद्धा पिंगट रंगाचीच होती. तो चांगला आनंदी न् दयाळू प्राणी होता अन् त्याच्यात व सूर्यात पुष्कळच साम्य आहे असं मला नेहमी वाटायचं."

आता मात्र आईला राहवेना. ती अधीरतेने म्हणाली, "आज तुम्ही मिरवणूक कशी काढणार त्याबद्दल बोला की!"

"त्याचं असं आहे की एकदा जे काही ठरलं आहे त्याबद्दल पुन: चर्चा करायची म्हणजे निष्कारण घोटाळा मात्र व्हायचा!" खोखोल संथपणे म्हणाला. "यदाकदाचित् जर आम्हाला सर्वानाच अटक झाली तर निकोलाय इवानोविच इथे येऊन काय करायचं ते सांगेल."

"ठीक आहे तर!" आई सुस्कारा टाकून म्हणाली.

"आपण फिरायला गेलो तर?" पावेलने कसल्या तरी धुंदीत असल्या-प्रमाणे आंद्रेइला म्हटलं.

"सध्या घरीच थांबू या आपण," आंद्रेइ म्हणाला. "कशाला बिचाऱ्या पोलिसांना आत्तापासून आशा लावून ठेवायची? तुला ते चांगला ओळखतात की."

इतक्यात फ्योदोर माझीन धावत पळतच आत आला. त्याचा चेहरा उजळून निघाला होता व गाल लालबुंद झाले होते.

"तिकडे सुरवात झाली बरं का!" तो उत्साहाने सांगू लागला. "सगळीकडे खळबळ माजली आहे. लोक निर्धाराने बाहेर रस्त्यावर येताहेत. वेसोव्श्चिकोव, वास्या गुसेव अन् सामोइलोव फाटकाशी उभे राहून भाषणं करताहेत. आलेले पुष्कळसे कामगार परत फिरले आहेत. चला आता, निघायची वेळ झाली. दहा वाजले की!"

"हा मी निघालोच!" पावेल निश्चयी स्वरात म्हणाला.

"हो, तुम्हाला दिसेलच! जेवणाच्या सुटीनंतर एकूण एक कामगार बाहेर पडतील पहा!" एवढं बोलता बोलता फ्योदोर आला तसाच धावत पळत तिथून निघून गेला.

"खुल्या हवेत जळणाऱ्या मेणबत्तीसारखं वागणं आहे याचं, नाही?" आई म्हणाली. नंतर ती उठून कपडे बदलण्यासाठी स्वयंपाकघरात गेली.

"आता कुठली तयारी, आई?" खोखोलने विचारलं.

"जिकडे तुम्ही तिकडे मी!" आईने उत्तर दिलं.

आंद्रेइने मिशीचं टोक कुरतडून अर्थपूर्ण नजरेने पावेलकडे पाहिलं. पावेलने केसातून बोटं फिरवली व तो आईजवळ जाऊन तिला म्हणाला,

"आई, मी तुला एका शब्दाने सुद्धा अडवणार नाही. अन् तू सुद्धा मला अडवायचं नाही. कबूल?"

"कबूल, बाबा, कबूल!" असं म्हणत ती पुटपुटली, "देव तुमचं रक्षण करो!"



## २७

ते बाहेर पडले तेव्हा सगळीकडे खळबळ माजली होती. लोकांच्या जमावांतून लोक आपापसांत बोलत होते त्या आवाजाचं एक विचित्र मिश्रण हवेत मिसळून कानांत शिरत होतं. घरांच्या फाटकांपाशी व खिडक्यांतून पाहाणाऱ्या असंख्य लोकांच्या नजरा आपल्या मुलावर व आंद्रेइवरच केंद्रित झालेल्या आईने पाहिल्या तेव्हा तिला आपल्या डोळ्यांसमोर हिरव्याकरड्या रंगाचं धुकं तरंगल्यासारखं भासू लागलं.

सगळे लोक पावेल व आंद्रेइला अभिवादन करीत होते. अन् त्यांच्या साध्या नमस्कारचमत्काराच्या शब्दांतही आज विशेष अर्थ व्यक्त होत होता. लोक अगदी हलक्या आवाजात आपापसांत कुजबुजत होते. त्यातले काही उद्गार तिच्या कानावर पडत होते,

"ते पाहिलेत का? ते पुढारी आहेत!"

"कोण पुढारी आहेत कुणाला माहीत!"

"नाही, मी वाईट अर्थाने बोललो नव्हतो रे!"

एका आवारातून कुणीतरी तुच्छतेने ओरडून म्हटलं,

"पोलिसांनी त्यांना पकडलं की आटोपलं सारं प्रकरण!"

"उं! एकदा पकडलं होतं की त्यांना!"

एका ठिकाणी एक बाई खिडकीतून आक्रोश करीत खाली रस्त्यावर उभ्या असलेल्या कुणाला तरी उद्देशून विनवीत होती. "आपण काय करतो आहोत याचा जरा विचार तरी केलात का? अहो! आपल्या बायकापोरांची जबाबदारी तुमच्यावर आहे हे तरी पहा!"

मग ते लंगड्या झोसिमोवच्या घरापाशी आले. त्याचे पाय यंत्रात सापडून कापले गेल्यामुळे त्याला कारखान्याकडून पेन्शन मिळत होती. खिडकीतून पावेलला पाहाताच तो ओरडला: "ए हरामखोरा! तुझी मुंडी मुरगळतील तेव्हा कळेल! तुझ्या कृत्यांबद्दल चांगलाच धडा शिकवतील तुला ते. समजलास!"

त्याचे हे उद्गार ऐकून आईच्या काळजात चर्र झालं व ती जागच्या जागी खिळून उभी राहिली. तिच्या सर्वांगातून संतापाची लहर निघाली. तिने वर पाहून त्या लंगड्याच्या चेहऱ्यावर नजर टाकली तसा तो शिव्याशाप

उच्चारीत आत निघून गेला. आई झपाट्याने चालू लागली व तिने भराभर पाय उचलीत पावेलला गाठलं व आपण आता मागे पडता कामा नये अशा विचाराने ती त्याच्या पाठोपाठ चालू लागली.

पावेल व आंद्रेइला जणु काय कोणत्याच उद्गारांची पर्वा नव्हती व ते कोणाच्याच बोलण्याकडे लक्ष न देता पुढे जात होते. ते शांतपणे व सावकाश चालत होते. मध्ये त्यांना मिरोनोवने मात्र थांबवलं. मिरोनोव हा एक प्रौढ व विनयशील कामगार होता. तो अतिशय सज्जन व प्रामाणिक असल्यामुळे सर्वांना त्याच्याविषयी आदर वाटे.

त्याच्याशी बोलण्याला थांबल्यावर पावेलने त्याला विचारलं, "दानिलो इवानोविच, तुम्ही सुद्धा आज कामावर न जाण्याचंच ठरवलंत तर?"

"माझ्या बायकोचे दिवस भरले आहेत! अन् शिवाय या अशा दिवशी जरा बेचैनच होतो जीव. म्हणून नाही गेलो झालं!" मिरोनोवने त्या आपल्या कॉमरेड्सना उत्तर दिलं व मग त्यांच्यावर नजर स्थिरावून अगदी हळू आवाजात त्याने विचारलं, "तुम्हा लोकांचा आज आपल्या डायरेक्टरला सतावण्याचा बेत आहे म्हणे! खिडक्यांच्या काचाबिचा फोडणार आहात असं ऐकतो! खरं आहे का ते?"

"आम्ही काही दारू पिऊन झिंगलो नाही अजून!" पावेल उद्गारला.

"रस्त्यांतून झेंडे घेऊन मिरवणूक काढायची व जाता जाता गाणी गायची एवढाच आमचा बेत आहे," खोखोलने सांगितलं. "आमची गाणी ऐका तर खरं. त्यात आमच्या चळवळीची तत्त्वं ग्रंथित केलेली आहेत."

"मला तुमच्या चळवळीचं तत्त्वज्ञान ठाऊक आहे," मिरोनोव विचारमग्न होत म्हणाला. "मी तुमची वर्तमानपत्रं वाचत असतो."

मग एकदम आईकडे लक्ष जाऊन तो ओरडला, "अरेच्या! तुम्हीसुद्धा या बंडांत सामील झालातसं दिसतंय!"

हे बोलताना त्याचे पाणीदार डोळे हसत होते.

"मरायच्या पूर्वी एकदा तरी न्यायाची बाजू घेऊन बाहेर पडायला हवंच, नाही का?" आई म्हणाली.

"अस्सं!" मिरोनोव उद्गारला. "म्हणजे ती गुप्त पत्रकं तुम्हीच कारखान्यात नेऊन पोचवीत होता हा त्यांचा अंदाज बरोबर होता म्हणायचा तर!"

"कोण म्हणालं तसं?" पावेलने विचारलं.



"अं—अं! जाऊ द्या! त्यांचा अंदाज होता खरा. बरं, येतो मी. नमस्कार. स्वतःला सांभाळा बरं का."

आईच्या चेहऱ्यावर मंदस्मित विलसत होतं. तिच्याबद्दल लोक असं बोलतात हे ऐकून तिला आनंद झाला होता.

"तुलासुद्धा तुरुंगात जावं लागणार, आई!" पावेल हसून उद्गारला.

सूर्य आकाशात वरवर चढत होता तसतसं ऊन कडक होत होतं. आकाशातील ढगांची गती मंदावत होती व त्यांच्या छाया विरळ होत होत्या. रस्त्यांवरून व घरांच्या छपरांवरून सावकाशपणे त्या छाया सरकत होत्या व त्यायोगे जणु काय ती सारी वस्ती धुऊन निघत होती, घरांवरील धूळ व घाण धुऊन निघत होती व लोकांचे चेहरेही प्रफुल्लित व उत्कंठित होत होते. सगळीकडे उत्साह संचारला होता. लोकांचा आवाज अधिक मोठा होत होता. तो कोलाहल हळूहळू इतका वाढला की दुरून ऐक येणारी यंत्राची घरघरही ऐकू येईनाशी झाली.

थोड्या वेळाने पुन: लोकांच्या खिडक्यांतून व आवारांतून निघणारे उद्गार आईच्या कानांत शिरू लागले. त्यातले काही उद्गार दुष्ट व भयावह होते, तर काही विचारपूर्वक काढलेले, उत्साह वाढविणारेही होते. पण आता आईसुद्धा त्या दिवशीच्या विविधरंगी जीवनाशी समरस झाली होती. कोणी उलटं बोललं तर त्याचं म्हणणं खोडून काढावं, आपले विचार पटवून देण्याचा यत्न करावा, आपली कृतज्ञतेची भावना व्यक्त करावी, हे सगळं ती उत्साहाने करू लागली.

एका लहानशा बोळाच्या तोंडाशी सुमारे शंभर एक लोकांचा एक घोळका उभा होता. त्या घोळक्यातून वेसोव्श्चिकोवचा आवाज तिच्या कानी पडला.

"चरकात ऊस पिळून काढावा तसं ते आम्हाला पिळून काढून आमचं रक्तशोषण करताहेत!" तो आपल्या रांगड्या भाषेत लोकांना सांगत होता व लोक ते बोलणं ऐकून घेत होते.

"खरं आहे! असंच करतात ते!" अनेकजण एकदम ओरडले.

"हा पोरगा बिचारा आपल्याकडून होईल तितक्या कसोशीने प्रयत्न करतो आहे बरं का!" खोखोल म्हणाला. "मला वाटतं, मी जातो त्याच्या मदतीला!"

पावेल त्याला अडविणार होता, पण त्यापूर्वीच तो त्वरा करून चपळाईने गर्दीत घुसला व दिसेनासा झाला.

क्षणार्धातच त्या गर्दीतून त्याचा खणखणीत आवाज ऐकू येऊ लागला,

"कॉमरेड्स! आपल्याला नेहमी असं सांगण्यात येतं की ज्यू, जर्मन, इंग्रज, तातार हे सगळे निरनिराळ्या राष्ट्रांचे व जमातींचे लोक आहेत. पण माझा त्यावर विश्वास नाही. जगात फक्त दोनच जाती आहेत. एक जात श्रीमंतांची अन् दुसरी गरिबांची. त्या जाती कधीसुद्धा एक होणार नाहीत. श्रीमंत लोकांचे वेष भिन्न असतील, त्यांच्या भाषा भिन्न असतील, पण कुठलेही श्रीमंत लोक पहा, मग ते फ्रेंच, जर्मन, इंग्रज कोणीही असोत, ते सगळे कामकरी लोकांची सारखीच पिळणूक व गांजणूक करतात. त्या सर्वांची ही सारखीच वागणूक पाहिली म्हणजे कळतं की आपणा कामगारांच्या दृष्टीने ते सगळे सारखेच दुष्ट व क्रूर आहेत."

लोकांच्या समुदायातल्या काहीजणांना हसू आवरेना.

खोखोल पुढे बोलू लागला, "उलटपक्षी सगळीकडचे कामगार पहा, म्हणजे असं दिसतं की फ्रेंच कामगार, तातार कामगार, तुर्की कामगार, सगळीकडच्या कामगारांची परिस्थिती आम्हा रशियन कामगारांसारखीच हलाखीची आहे. आपल्याला सगळ्यांनाच हे कष्टाचं व दुःखाने भरलेलं खडतर जीवन जगावं लागतं!"

त्या गल्लीत लोकांची गर्दी वाढत होती. मागे उभे उसलेले लोक टाचा उंचावून व माना वर करून पहात होते. मात्र कोणीही काही बोलत नव्हते. सगळेजण स्तब्ध व शांतपणे ऐकून घेत होते.

आंद्रेइचा आवाज चढला होता,

"त्या इतर देशांतल्या लोकांना हे साधं सत्य अगोदरच कळून चुकलं आहे, आणि म्हणूनच आजच्या या मे-दिनाच्या दिवशी..."

इतक्यात कोणीतरी ओरडला, "पोलिस! पोलिस आले!"

घोड्यांवर स्वार झालेले चार शिपाई त्या गल्लीत घुसले, व हातातले चाबूक लोकांच्या अंगावर सडकावीत किंचाळले, "चला, निघा इथून!"

लोकांनी भुवया चढवल्या व अत्यंत अनिच्छेने व रागाने ते बाजूला हटू लागले. काहीजण कुंपणांच्या भिंतींवर चढले.

"यांना वाटतं, आपण फार शूर वीर आहोत! पण आहेत मात्र शेंदाड शिपाई! डुकरं आहेत नुसती, डुकरं!" एकजण जोरात ओरडला.

खोखोल मात्र रस्त्याच्या मध्यभागी उभा होता तिथेच उभा राहिला.



दोन घोडे माना हलवीत त्याच्या दिशेने जातांना दिसू लागले. तो जरा बाजूला सरकला. तेवढ्यात आईने त्याचा हात पकडला व त्याला ओढून नेतानेता ती त्याला म्हणाली, "तु पावेलच्या जवळ राहण्याचं कबूल केलं होतंस ना? अन् तरीसुद्धा एकट्यानेच इथं येऊन स्वतःवर संकट ओढवून घेतलंस!"

"चुकलं खरं बुवा! माफी मागतो, मग तर झालं!" खोखोल हसत हसत आईला म्हणाला.

आता एकाएकी पार गळून गेल्यासारखं व आपलं डोकं गरगरा फिरत असल्यासारखं आईला वाटू लागलं. तिच्या अंतःकरणात हर्ष व खेद यांचं विचित्र मिश्रण झालं होतं. दुपारच्या जेवणाच्या सुटीचा भोंगा केव्हा एकदाचा होतोय असं आता तिला झालं होतं.

मग ते चौकातल्या चर्चपाशी येऊन पोचले तेव्हा चर्चच्या आवारात सुमारे पाचशे लोकांचा जमाव जमलेला होता. त्यात बहुतेक तरुण लोक व मुलंच होती व त्यांचा गोंगाट सुरू होता. गर्दी सारखी मागेपुढे होत होती. लोक सारखे माना उंचावून दूरवर पहात होते. ते कशाची तरी उत्कंठेने वाट पहात असावेत. सगळीकडे खळबळीचं वातावरण होतं. काय करावं हे पुष्कळांना कळत नव्हतं त्यामुळे ते अस्वस्थ होते, पण काही थोडे लोक मात्र शौर्याचा आव आणीत होते. काही बायका मोठ्या आर्जवाने पुरुषांची विनवणी करीत होत्या व ते पुरुष कानावून जाऊन त्यांच्यापासून दूर जात होते. मधूनमधून हळू आवाजात उच्चारलेले शिव्याशापही कानावर येत होते. त्या जमावाचा नूर काही निराळाच होता. एक प्रकारची विरोध व प्रतिकाराची भावना डोके वर काढू पहात होती.

"मितेन्का!" एक बाई कापऱ्या आवाजात म्हणत होती, "स्वतःच्या जिवाचीसुद्धा तुला पर्वा नाही का रे?"

"माझ्या भानगडीत पडू नकोस!" तिला उत्तर मिळालं.

मग सिझोवचा आवाज ऐकू आला. तो अगदी शांतपणे व निर्धारपूर्ण आवाजात बोलत होता,

"आपण आपल्या या तरुण लोकांना सोडून जाता कामा नये. त्यांना आपल्यापेक्षा जास्त कळतं, अन् त्यांची हिंमतही आपल्यापेक्षा जास्त आहे. चिखल उपसण्याच्या कोपेकच्या कराचा अन्याय झाला तेव्हा त्याचा प्रतिकार करायला कोण पुढे झालं? ही पोरंच त्यावेळी पुढे झाली, नाही का? मग

ते आपण विसरणार का? त्यांनीच त्यासाठी तुरुंगवास भोगला अन् फायदा आपला सर्वांचा झाला!"

तेवढ्यात कारखान्याचा भोंगा झाला. त्या कर्कश आवाजात लोकांचे आवाज विरून गेले. लोक एकदम दचकले. बसलेले होते ते उठून उभे राहिले. क्षणभर सारेच जण स्तब्ध झाले व सावध झाल्यासारखे दिसू लागले. काहींचे चेहरे खर्रकन् उतरले देखील.

"कॉमरेड्स!" पावेलचा धीरगंभीर व खणखणीत आवाज आला.

आईची कानशिलं तापली व तिच्या डोळ्यांत कढत अश्रू उभे राहिले. तिला एकदम कुठून तरी प्रचंड शक्ती मिळाल्यासारखी झाली व एका सपाट्यात ती पावेलच्या बाजूला जाऊन उभी राहिली. लोहचुंबकाभोवती पोलादाचे कण वेगाने आकर्षिले जावे तसे लोक त्याच्याभोवती गोळा झालेलेच होते.

आईने पावेलच्या चेहऱ्याकडे नजर रोखली तेव्हा फक्त त्याचे तेजस्वी नेत्रच काय ते तिच्या नजरेस पडले.

"कॉमरेड्स! आम्ही असं ठरवलं आहे की आपण काय आहोत याची आजच्या या दिवशी जाहीर घोषणा करून आपला झेंडा फडकवला पाहिजे! आपला झेंडा सत्याचा व स्वातंत्र्याचा झेंडा आहे!"

मग एक लांब पांढरीशुभ्र काठी वर हवेत उभी झाली. क्षणार्धात ती खाली वाकली, गर्दीला दुभंगून क्षणभर दिसेनाशी झाली व मग पुन: लगेच वर झाली व कामगारवर्गाचा लाल झेंडा तिच्या वरच्या टोकावर एकाद्या प्रचंड लाल पक्षाप्रमाणे आकाशात डौलाने फडकताना दिसू लागला.

पावेलने एक हात वर केला. झेंड्याची काठी जरा हेलकावे खाऊ लागलेली पाहाताच एकदम दहाबारा हात पुढे झाले व त्यांनी ती सावरून धरून स्थिर केली. पुढे झालेल्या त्या हातांत एक हात आईचाही होता.

"कामगारवर्गाचा विजय असो!" पावेल ओरडला. शेकडो लोकांनी त्या घोषणेला साथ दिली.

"कॉमरेड्स! आता म्हणा, सोशल डेमोक्रॅटिक पार्टीचा विजय असो! ती आपली पार्टी आहे! आपल्याला नवे तत्त्वज्ञान व स्फूर्ती देणाऱ्या त्या पार्टीचा जयघोष करा!"

लोकांच्या घोषणांनी वातावरण भरून गेलं. जमावातले लोक उत्तेजित झाले होते. त्या झेंड्याचं महत्त्व ज्यांना आकलन झालेलं होतं असे लोक



झेंड्याच्याजवळ जाण्याचा प्रयत्न करीत होते. माझिन, सामोइलोव, गुसेव बंधू, हे पावेलच्या जवळ जाऊन पोचले. निकोलायही मान खाली वाकवून गर्दीतून वाट काढून पुढे जात होता. आणि कित्येक अनोळखी पाणीदार डोळ्यांचे तरुण कामगार आईला ढकलून पुढे जाण्याचा प्रयत्न करीत होते.

"जगातील कामगारांचा विजय असो!" पावेलने घोषणा दिली.

सहस्र कंठांतून त्याच्या त्या जयघोषाला साथ मिळाली. त्या जयघोषातून त्यांचा अवर्णनीय हर्ष व सामर्थ्याची जाणीव व्यक्त होत होती.

आईने एका बाजूला निकोलायचा व दुसऱ्या बाजूला दुसऱ्याच कुणाचा तरी हात धरला. तिचं अंतःकरण भरून आलं होतं व नेत्र अश्रूंनी भरले होते, पण ती रडत नव्हती. तिचे पाय कापत होते. ती थरथरत्या ओठांनी पुटपुटली: "बाळांनो!"

निकोलायच्या देवीच्या वणांनी भरलेल्या मुखावर हास्य विलसू लागलं. त्याने झेंड्याकडे पहात तो धरण्यासाठी हात पुढे केला. आईचा शब्द ऐकून त्याने एकदम मोठ्या भक्तिभावाने तिला घट्ट धरून गदगदा हलवलं व तो जोरजोराने हसू लागला.

"कॉमरेड्स!" हा धीरगंभीर आवाज खोखोलचा होता. जमावातल्या लोकांच्या गलक्यातही ऐकू जाईल इतक्या मोठ्या आवाजात तो बोलू लागला,

"दोस्त हो! आता आपण आपल्या नव्या देवाच्या नावाने हे धर्मयुद्ध पुकारलं आहे. आपल्याला नवा प्रकाश दाखवणारा, नवं ज्ञान देणारा हा नवा देव म्हणजे सत्य आणि न्याय! आपलं ध्येय अजून पुष्कळ दूर आहे, पण त्यासाठी शिरावर काटेरी मुकुट चढविण्याची वेळ मात्र आता फार दूर नाही. अखेर सत्याचाच विजय होणार यावर ज्या कुणाचा विश्वास नसेल, या सत्यासाठी प्राणार्पण करण्याचं धैर्य ज्यांच्या अंगी नसेल, स्वतःच्या सामर्थ्यावर ज्यांचा विश्वास नसेल व हालअपेष्टा सोसण्याची ज्यांची तयारी नसेल, त्यांनी खुशाल बाजूला रहावं. अखेर आमचा विजय निश्चित आहे असा ज्यांचा विश्वास असेल त्यांनीच आमच्या बरोबर यावं. ज्यांना आमचं ध्येय दिसू शकत नाही त्यांनी आमच्या मोर्चात सामील न झालेलंच बरं, कारण अशा विश्वासाच्या अभावी ते निष्कारण दुःखी होतील. चला, मिरवणुकीसाठी तयार व्हा, कॉमरेड्स! रांगेने उभे रहा! स्वतंत्र जनतेचा हा स्वातंत्र्यदिन चिरायु होवो! मे-दिन चिरायु होवो!"

गर्दी वाढत होती. पावेलने झेंडा उंच धरला होता. सूर्यप्रकाशाने न्हाऊन निघून वाऱ्याबरोबर डौलाने फडकणारा तो झेंडा सर्वांमध्ये नवा उत्साह, नवे चैतन्य निर्माण करीत होता.

फ्योदोर माझिनने खड्या सुरात गीताला प्रारंभ केला:

**ये सौ बरस के बंधन...**

शेकडो कंठांतून खुल्या दिलाने फ्योदोरला साथ देण्यासाठी निघालेले शब्द वातावरणात घुमू लागले:

**हम् आज करेंगे भंग ...**

आई फ्योदोर माझिनच्या पाठोपाठ चालत होती. तिच्या चेहऱ्यावर मंदस्मिताची रेखा होती व तिचे डोळे माझिनच्या डोक्यावरून दिसणाऱ्या पुढे चाललेल्या तिच्या मुलाकडे व त्याच्या हातातील झेंड्याकडे लागलेले होते. तिच्या भोवताली सर्वत्र निरनिराळ्या रंगांच्या डोळ्यांचे व उत्साही चेहऱ्यांचे लोक तिला दिसत होते. पावेल व आंद्रेइ मिरवणुकीच्या अग्रभागी चालत होते. त्या दोघांच्याही कंठांतून निघणारे गीताचे शब्द तिला स्पष्ट ऐकू येत होते. आंद्रेइच्या मधुर सुरात आपला खणखणीत आवाज मिळवून पावेल म्हणत होता:

**उठ जाग ओ भूखे बंदी!**
**अब खेंचो लाल तलवार!**

लोक झेंड्याच्या दिशेने धावत येत होते. धावता धावता ते ओरडत होते, घोषणा करीत होते. पण शेकडो कंठांतून निघणाऱ्या गीताच्या आवाजात त्यांचं ओरडणं पार लोपून जात होतं. लोक ते गीत घरी सुद्धा गात, पण हलक्या आवाजात. आता, या क्षणी, रस्त्यावर ते गीत गाताना त्यांनी मनावरची सगळी दडपणं पार झुगारून दिली होती व ते मुक्तकंठाने तेच गीत गात होते. लोकांचा दुर्दम्य आत्मविश्वास व धैर्य यांची या क्षणी प्रचीती येत होती. उज्ज्वल भवितव्याकडे नेणाऱ्या मार्गाने जाण्याचे आवाहन त्या गीतात असले तरी तो मार्ग किती खडतर आहे याचीही स्पष्ट कल्पना



त्यात दिलेली होती. जे जे म्हणून जीर्ण व निरुपयोगी झालेले असेल, रूढी व परंपरांना चिकटून राहाणाऱ्या भावनांचा जो काही पगडा मनावर शिल्लक असेल, त्याला फाटा देऊन नवजीवनाची ज्योत प्रज्वलित करण्याची व ती तेवत ठेवण्याची स्फूर्ती देण्याचं प्रचंड सामर्थ्य त्या गीतात होतं. त्याचबरोबर नव्याची भीती कुणाला वाटत असेल तर ती भीतीही समूळ नष्ट करण्याची शक्ती त्यात होती.

आईच्या बाजूलाच एक आनंदाने प्रफुल्लित असूनही भयचकित झालेला चेहरा पुढे डोकावला व कापऱ्या आवाजात उच्चारलेले शब्द तिला ऐकू आले:

"मित्या! कुठे निघालास तू?"

"जाऊ द्या त्याला!" आई चालता चालताच म्हणाली, "काही काळजी करू नका त्याची. सुरवातीला मी सुद्धा घाबरले होते. माझा मुलगा आघाडीवर आहे. तो–त्याने झेंडा धरला आहे तोच!"

"कुठे निघालात, ए मूर्खांनो!" कोणीतरी ओरडलं. "सोजिर उभे आहेत की तिकडे!"

मित्याच्या आईने आपल्या हाडकुळ्या हाताने आईला घट्ट धरलं. आईने पाहिलं तर ती बाई उंच न् किडकिडीत होती.

ती घाबरलेल्या आवाजात म्हणाली: "पहा तर खरं! सगळेच गाणं म्हणताहेत! माझा मित्या सुद्धा!"

आईने तिला धीर दिला, "घाबरू नको बाई. हे कार्य फार पवित्र आहे. थोडा विचार करून पहा–लोकांनी मरायची तयारी दाखवली नसती व आत्मबलिदान केलं नसतं तर येशू ख्रिस्त तरी झाला असता का?"

आई हे बोलली ते तिला ऐनवेळी सुचलेलं होतं. पण ती कल्पना मनात डोकावताच तिच्यातलं सरळ पण स्पष्ट सत्य तिच्या अंतःकरणाला जाऊन भिडलं होतं. तिने आपला हात घट्ट धरून ठेवणाऱ्या बाईकडे पाहिलं व ती पुनः स्मित करून तिला समजावून सांगू लागली.

"खरंच आहे ते. काही लोकांनी येशू ख्रिस्तासाठी प्राण दिले नसते तर ख्रिस्तही झाला नसता!"

इतक्यात म्हातारा सिझोव तिच्याजवळ आला. डोक्यावरची टोपी हातात घेऊन गीताला ताल दिला जाईल अशा रीतीने ती हवेत उडवीत तो आईला म्हणाला:

"आज अगदी उघडउघड मिरवणूक काढायचं ठरवलं या पोरांनी! अन् गाणंही म्हणताहेत! गाणं तरी काय!"

**जरूरत जवानो की है जार को**
**तू भरती करा अपने लाल को**

मग एकदम भावनाविवश होऊन म्हातारा उद्गारला:

"कशाचंच भय राहिलेलं नाही आता त्यांना. माझा पोरगा जिवंत असता तर तोही त्या मिरवणुकीत सामील झाला असता!"

आईची छाती धडधडत होती, त्यामुळे तिची गती कमी होऊन ती मागे पडली होती. लोक तिला बाजूला सारून पुढे जात होते. ती भिंतीशी ढकलली गेली व जमाव तिला बाजूला ढकलीत पुढे गेला. तो प्रचंड जमाव पाहून ती हर्षित झाली.

गाणं सुरूच होतं:

**उठ जाग ओ भूखे बंदी!..**

जणु काय भलेमोठे शिंग फुंकले जावे तसा खणखणीत सूर वातावरणात घुमत होता. सहस्र कंठांतून बाहेर पडणारे ते गीत लोकांना जागृत करीत होते, त्यांच्या ठायी नवी जाणीव निर्माण करीत होते. काहींच्या अंतःकरणात त्यायोगे लढ्यासाठी तयार होण्याची प्रेरणा निर्माण होत होती, काहींना त्या गीतात वर्णिलेलं पुढे कधीतरी येणारं हे नवीन, सुखी जीवन कसं असेल हे जाणून घेण्याविषयी तीव्र जिज्ञासा व उत्कंठा वाटत होती. पिढ्यान्‌पिढ्या अंतःकरणात धुमसत असलेल्या सुप्त ज्वालामुखीचा त्या गीताच्या रूपाने स्फोट होत होता, त्यांच्या अस्फुट आशाआकांक्षांना त्या गीतातील शब्दांच्या द्वारे वाचा फुटत होती. ते गीत गात असताना सर्वांची नजर वाऱ्यावर डोलणाऱ्या लाल झेंड्यावर खिळलेली होती.

"हा पहा, चालले!" कोणीतरी हर्षाने ओरडला. "शाबास पठ्ठ्यांनो!"

हे शब्द उच्चारणाऱ्याच्या अंतःकरणात असा काही विलक्षण उन्माद संचारला होता की त्या भावना शब्दांनी व्यक्त करणे त्याच्या शक्तीबाहेरचे होते, त्यामुळे त्याने एक अर्वाच्य शिवी हासडून आपल्या भावना व्यक्त करण्याचा प्रयत्न केला.



पण हे होत असतानाच गुलामी वृत्ती अंगात भिनलेल्या कुणाच्यातरी लाचार अंतःकरणात तीव्र असूया, मत्सर, चीड यांचाही प्रादुर्भाव झाल्यावाचून राहिला नाही. एखाद्या काळ्याभोर दुष्ट सर्पावर सूर्यप्रकाशाचे किरण पडून तो सळसळत निघून जाताना दृष्टीस पडावा तसेच कुणाचे तरी दुष्ट प्रवृत्तीतून निर्माण झालेले उद्गार बाहेर पडले,

"पाखंडी लेकाचे!"

हे उद्गार काढणारा इसम एका खिडकीत उभा होता व तिथूनच तो दातओठ खाऊन मुठी वळवीत होता.

दुसऱ्या एकाने कापऱ्या, संतप्त सुरात त्याला साथ दिली:

"राजद्रोही कुठले! आमच्या श्रीमंत सरकारविरुद्ध, प्रत्यक्ष झार बादशहाविरुद्ध, बंड पुकारतात काय?"

शेकडो स्त्री-पुरुष मिरवणुकीत पुढे चालले होते. त्यांचे चेहरे व्यग्र झालेले आईने पाहिले. ज्वालामुखीचा स्फोट झाल्यावर तप्त लोहरसाचे पाट वाहावे तसा त्या जमावाचा लोंढा पुढेपुढे चालला होता. समुदायाच्या मुखातून बाहेर पडणाऱ्या स्फूर्तिदायक गीताची प्रेरक शक्ती त्या सर्वांना सारखी पुढे ओढून नेत होती. त्या गीताचे सामर्थ्य असं काही अद्‌भुत होते की त्याच्या सुरांनी जणु काय चमत्कार व्हावा तसा रस्ता मोकळा होऊन मिरवणुकीला वाट मिळत होती.

आईपासून पुष्कळच दूर, अग्रभागी फडकणाऱ्या झेंड्याकडे तिने पाहिले तेव्हा तिला आपला मुलगा दिसत नव्हता तरी त्याची धीरगंभीर मूर्ती मनोमन तिला दिसू लागली. त्याच्या उंचावलेल्या भुवया व त्याखाली ध्येयावरील अपार निष्ठेच्या तेजाने चमकणारे नेत्र तिच्या मनःश्चक्षूंच्या साहाय्याने ती स्पष्टपणे पाहू शकत होती.

आई आता पुष्कळच मागे पडून मिरवणुकीच्या शेवटी चालत होती. आता ती ज्यांच्या बरोबर चालत होती ते लोक अगदी संथ व धीमेपणाने पावले टाकीत होते. बघ्या लोकांच्या थंड वृत्तीने त्यांची पावले अगदी सावकाश पडत होती. या सर्व प्रकरणाचा शेवट काय होणार हे जणु काय आपल्याला आधीच ठाऊक आहे अशा बेफिकिरीने ते त्या प्रकाराकडे बघत होते.

कुठल्याही प्रकारच्या भावनेशी संबंध नसलेल्या थंड, व्यवहारी पद्धतीने व आपल्या हमखास खात्री असल्यासारख्या सुरात ते निर्विकारपणे बोलत होते:

"शाळेजवळ एक अन् कारखान्याजवळ दुसरी अशा सैनिकांच्या दोन तुकड्या सज्ज आहेत."

"गव्हर्नरसाहेब स्वतः आले आहेत."

"खरंच?"

"मी माझ्या डोळ्यांनी पाहिलं की. आत्ताच आले."

"म्हणजे आपली भीती वाटू लागली म्हणायची त्यांना! हो, नाहीतर इतके सैनिक जय्यत तयार कशाला ठेवले असते? शिवाय गव्हर्नर स्वतः जातीने येतो म्हणजे काय!"

हे शब्द उच्चारणाऱ्याला एक प्रकारचं समाधान वाटत असल्याचं स्पष्ट दिसत होतं.

"तसे चांगले लोक दिसतात बिचारे!" आई स्वतःशीच उद्गारली.

पण तिच्या कानावर पडणारे शब्द भावनाशून्य व थंड प्रवृत्तीचे द्योतक होते. या लोकांपासून दूर जाण्यासाठी म्हणून ती भरभर पाय उचलू लागली. अन् ते लोकही असे काही सावकाश व रेंगाळत चालले होते की त्यांना मागे टाकून पुढे जाणं कठीण नव्हतं.

अचानक मिरवणुकीचा पुढचा भाग कशावर तरी टक्कर झाल्यासारखा आदळला व मागचे लोक रेटारेटी करीत मागे हटू लागले. अनेक लोक भिऊन ओरडू लागले व गोंधळ माजण्याची लक्षणे दिसू लागली. गीताची ऐकतानताही भंग पावली व मधूनच अडखळत शब्द ऐकू येऊ लागले. मधूनच पुनः मोठ्याने व जलद लयीत गाणे ऐकू आले, पण पुनः त्याची लाट ओसरली. एकेक करीत अनेक लोकांनी गाणे बंद केले. काही थोडेजण पुनः पूर्वीप्रमाणे जोरात गाणे सुरू करण्याचा प्रयत्न करीत होते, पण आता प्रत्येकाचा सूर भिन्न होता, तरीसुद्धा शब्द तेच होते :

**उठ जाग ओ भूखे बंदी!**
**अब खेंचो लाल तलवार!**

पण आता त्या गीताचे सामुदायिकत्व भंग पावले होते, सर्वांना एकत्र सांधणाऱ्या अभेद्य एकसुराच्या शक्तीचा सांधा निखळला होता. गाणाऱ्यांच्या सुरातही संकटाची भीती व्यक्त होत होती.



मिरवणुकीचा पुढचा भाग आईच्या दृष्टीच्या टप्प्याच्या बाहेर होता, त्यामुळे पुढे काय घडत होतं ते तिला दिसत नव्हतं. म्हणून तिने पुनः गर्दीतून रेटारेटी करून पुढे जाण्याचा प्रयत्न सुरू केला. ती पुढे सरकत होती. तसे अनेकांचे धक्के तिला लागत होते. ते लोक मागे फिरत होते. काहींच्या चेहऱ्यावर संताप होता, काहींच्या माना खाली वळलेल्या होत्या, काही अस्वस्थ होऊन चेहऱ्यावर बळेच हसू आणीत होते, व इतर काही जण खोट्या बेफिकिरीचा आव आणून शीळ घालीत होते. ती पुढे जाताजाता त्यांच्या चेहऱ्यांवरचे भाव न्याहाळत होती. तिच्या स्वतःच्या नजरेत कुतूहल व आर्जव यांचं मिश्रण होतं...

"कॉमरेड्स!" एकदम पावेलचा आवाज ऐकू येऊ लागला. "हे सैनिक सुद्धा आपल्यासारखेच सामान्य लोक आहेत. ते आपल्यावर हात उचलणार नाहीत! कां म्हणून हात उचलतील ते? जे सत्य सर्वांना कळायला हवं, त्याचा आपण घोष करतो म्हणून? तो सत्याचा घोष त्यांच्या कानी सुद्धा पडायलाच हवा! त्यांना स्वतःला अजून त्याची जाणीव नाही, पण लवकरच एक दिवस असा येईल की ते सुद्धा लूटमार व रक्तपाताच्या झेंड्याखाली उभे राहण्याचं व आपल्याला विरोध करण्याचं सोडून देऊन आपल्या स्वातंत्र्याच्या निशाणाखाली येतील व आपल्या खांद्याला खांदा लावून स्वातंत्र्यासाठी लढतील! आणि त्यांना या सत्याची जाणीव शक्य तितक्या लवकर व्हावी म्हणूनच आपण सतत आपला मोर्चा नेटाने पुढे नेला पाहिजे. चला! कॉमरेड्स! आगे कदम! चलो!"

पावेलच्या शब्दांत दृढनिश्चयाचा जोर होता. त्याची वाणी स्पष्ट व खणखणीत होती. पण तरीसुद्धा जमाव पांगतच राहिला. एकेक करीत कित्येक जण मिरवणुकीतून बाहेर पडत राहिले व बाजूच्या घरांपाशी जाऊन भिंतींचा व कुंपणाचा आश्रय घेऊ लागले. एखादी पाचर असावी तसा आकार आता त्या मिरवणुकीला आला होता. पावेल अजूनही अग्रभागी होता व कामगारवर्गाचा लाल झेंडा त्याच्या माथ्यावर तेजाने तळपत फडकत होता. किंवा असेही म्हटले तरी चालेल की ती मिरवणूक पंख पसरून उड्डाणाच्या तयारीत असलेल्या एखाद्या पक्ष्यासारखी दिसत होती व पावेल त्या पक्ष्याच्या चोचीप्रमाणे भासत होता.

## २८

रस्त्याच्या टोकाला एक भिंतीसारखी भासणारी माणसांची रांग आईला दिसली. त्या करडया रंगाच्या भिंतवजा रांगेतील लोक म्हणजे जणु बिनचेहऱ्याची माणसे होती. दिसायला सगळी सारखी! चौकात येण्याचा रस्ता त्यांनी रोखून धरला होता व प्रत्येकाच्या खांद्यावरची संगीन लखलखत होती. त्या स्तब्ध व तटस्थ भिंतीकडून जणु काही बर्फासारखा थंडगार वारा येत असून तो कामगारांच्या दिशेने वाहत आहे असं आईला वाटले व तिच्या काळजात चर्रं झाले.

आई गर्दीतून पुढे घुसू लागली. मध्यभागी तिला ज्यांच्याविषयी काळजी वाटत होती असे काहीजण काही अपरिचितांच्या समवेत झेंडा घेऊन उभे होते तिथे जाण्यासाठी तिची धडपड होती. गर्दीत तिचा एका उंच, एकाक्ष माणसाला धक्का लागला. तिच्याकडे पाहाण्यासाठी त्याला मान वळवून आपला चांगला डोळा तिच्याकडे करावा लागला व त्याने विचारले, "तुम्ही कोण, बाई?"

"पावेल व्लासोवची आई आहे मी!" आईने उत्तर दिले. हे बोलताना आपले पाय व ओठ कापत आहेत याची तिला जाणीव होती.

"अस्सं!" तो इसम उद्‌गारला.

"कॉमरेड्‌स!" पावेल ओरडत होता. "आता आयुष्यभर आपल्याला पुढेच गेलं पाहिजे. दुसरा कोणताही मार्ग आपल्याला घेणे शक्य नाही! चला!"

लोक शांत झाले व आता काय होणार या उत्कंठेने पाहू लागले. निशाण वर झाले, क्षणभर फडफडले व मग जमावाच्या डोक्यावर उंच जाऊन सैनिकांच्या भिंतीच्या दिशेने पुढे सरसावू लागले.

आईने ते दृश्य पाहाताच तिला कंप सुटला व तिने आपले डोळे घट्ट मिटून घेतले. पावेल, आंद्रेइ, सामोइलोव व माझिन हे चौघे जमावातून बाहेर पडून पुढे चालले होते.

फ्योदोर माझिनचा खणखणीत आवाज वातावरणात घुमत होता:

**बलिदान तुम्हारा उच्च महान...**

आणि लोकांकडून दबलेल्या आवाजात साथ मिळाली—

**युद्ध अनोखा दे दो जान...**



आघाडीला चाललेले चौघेजण त्या संगीताच्या तालावर पावले टाकीत पुढे जात होते.

फ्योदोरच्या आवाजात निर्धार व्यक्त होत होता व तो निर्भयपणे गात होता—

**जो कुछ था सर्वस्व लुटाया...**

त्याच्या सहकाऱ्यांनी साथ दिली—

**आजादी के लिए चुकाया...**

बाजूला एकजण दिमाखाने व तुच्छतापूर्वक उद्‌गारला,

"शोकगीत गाताहेत जणु! कुत्तेकी अवलाद!"

"हं, मारा त्याला!" एकजण चिडलेल्या सुरात ओरडला.

आईने छातीशी हात घट्ट धरून भोवताली नजर फिरविली. तो सबंध रस्ता भरून टाकणाऱ्या गर्दीतले लोक आता पुढे सरसावत नव्हते. आघाडीवर झेंडा घेऊन चाललेल्या चौघांकडे पाहात गर्दीतले लोक मागे पडत होते. काही शेपन्नास लोक पुढे चालत होते, पण प्रत्येक पावलागणिक त्यातला कोणी ना कोणी मागे पडे. जणु काय जमिनीवर पाय भाजून चटका बसावा अशा तऱ्हेने लोक काढता पाय घेत होते. फ्योदोर मात्र जणु भविष्यवाणी वर्तवीत असल्याप्रमाणे गात होता—

**मरण-दिवस हिंसा का होगा...**

आणि त्याच्या सहकाऱ्यांकडून जोरदार साथ मिळत होती—

**मनुज नींदसे जागा होगा...**

पण गाण्याच्या ओळीबरोबरच काहींची कुजबुजही ऐकू येत होती,

"ते आता बंदुका रोखण्याचा हुकूम देण्याच्या अगदी तयारीत आहेत बरं का!"

आणि खरोखरच तेवढ्यात हुकूम सुटला, "शिपाई, हुश्शार!"

एका झटक्यात खांद्यांवरच्या संगिनी खाली आल्या व समोरून येणाऱ्या निशाणाला भिडणारी संगिनींची टोके लखलखली.

"आगे कदम!"

"आले रे आले!" आईच्या शेजारचा एकाक्ष इसम ओरडला व दोन्ही हात खिशात खुपसून तो झटक्याने बाजूला झाला.

आई डोळ्याचे पातेही न लवू देता समोर पाहात होती. शिपायांची रांग सबंध रस्ता आडवून पुढे येऊ लागली. त्यांच्या चालण्यात उन्मत्तपणा व निर्दयता भरली होती व संगिनींची रुपेरी चकाकी त्या भीषणतेत भर घालीत होती. आई भराभर पावले टाकीत पावेलच्या जवळ जाऊ लागली. आंद्रेइ पावेलचे रक्षण करण्यासाठी त्याला पाठीशी घालून स्वतः पुढे उभा होता.

"तू आपल्या जागी परत जा!" पावेलने त्याला हुकूम सोडला.

आंद्रेइने मान मागे झोकून दिलेली होती व हात मागे बांधून तो गात उभा होता. पावेलने त्याला बाजूला ढकलले व पुनः ओरडला, "मागे सर! तुला इथे पुढे येण्याचा अधिकार नाही! झेंडा पुढेच असला पाहिजे!"

"पळा सगळेजण!" सैनिकांचा एक बुटका अधिकारी तलवार परजीत आपल्या किरट्या आवाजात ओरडला. गुडघे न वाकवता, पाय उंच करून तो चालत होता व जमिनीवर पाय आपटीत होता. लख्ख पॉलिश केलेल्या त्याच्या बुटाची चकाकी आईच्या नजरेतून सुटली नाही.

जाड करड्या रंगाच्या मिशा असलेला एक उंच बांध्याचा इसम त्या अधिकाऱ्याच्या बाजूलाच पण किंचित् मागे चालत होता. त्याचे केस अगदी बारीक कापलेले होते. त्याने एक ओव्हरकोट घातला होता. व त्या कोटाला लाल रंगाची किनार होती. त्याच्या पाटलोणीच्या बाजूला पिवळ्या रंगाची पट्टी होती. तोही आंद्रेइप्रमाणेच दोन्ही हात मागे बांधून चालत होता. त्याच्या दाट केसाळ भुवया वर चढलेल्या होत्या व त्याची नजर पावेलवर रोखलेली होती.

समोरचे दृश्य पाहणे आईला कठीण जात होते. तिला वाटत होते, आता जोराने आक्रोश करून आपल्या भावनांना वाट करून द्यावी. प्रत्येक श्वासाबरोबर आपल्याला रडू कोसळते की काय अशी तिची तिलाच भीती वाटत होती. आतल्या आत दाबून टाकावे लागणारे दुःखाचे कढ तिला व्याकुळ करीत होते. आपल्या छातीवर दगड ठेवावा तसं ती ते दुःख



दाबून टाकून आर्त नजरेने समोर पाहात होती. लोक तिला बाजूला रेटून सैरावैरा पळत होते, त्या रेटारेटीत ती स्वतःला नकळत इकडे तिकडे सरकत होती. समोरची लाट जोराने आघात करण्याच्या तयारीने पुढे सरसावत होती, तसतशी जमावाला झपाट्याने ओहोटी लागत असल्याचीही तिला जाणीव होत होती.

झेंडा घेऊन चालणारी मिरवणुकीच्या पुढची रांग व समोरून अभेद्य भिंतीसारखी चालत येणारी टोळधाड यांच्यातील अंतर कमीकमी होत होते. आता तिला त्या बिनचेहेऱ्याच्या भिंतीचा विलक्षण चेहेरा दिसू लागला. किती भयंकर चेहेरा होता तो! अगदी घाण, मळकट पिवळ्या रंगाची एकच एक रांग व मधून मधून खोबणीसारखे जडवलेले डोळे रस्ताभर पसरले होते! त्या रांगेच्या पुढे मोर्चावाल्यांच्या दिशेने रोखलेली पोलादाची टोके! अजून ती टोके त्यांच्या शरीरांना भिडली नव्हती, पण तरीसुद्धा एक एक जण पळ काढत होता व जमावाची पांगापांग होत होती.

आपल्या मागे धावत जाणाऱ्या लोकांच्या पावलांचे आवाज आईच्या कानांत शिरत होते व त्याच्याबरोबर लोकांची आरडाओरडही ऐकू येत होती,

"धावा! पळा!"

"व्लासोव! तूही पळ बाबा!"

"पावेल, मागे हो!"

"पावेल, झेंडा सोड तू!" वेसोव्श्चिकोव अचानकपणे म्हणाला. "मजजवळ दे तो. मी लपवून ठेवतो."

एवढे म्हणून त्याने झेंड्याची काठी धरली. झेंड्याला हेलकावा बसला.

"सोड झेंडा!" पावेल ओरडला.

निखाऱ्यावर हात भाजावा तसा निकोलायने हात मागे घेतला. गाणे बंद पडले. लोक तिथेच थबकले व त्यांनी पावेलच्या भोवती आपल्या शरीरांचा कोट उभा केला, पण तरी तो पुढे चालत राहिला. एकाएकी सर्वत्र शांतता पसरली. जणु काही एखाद्या अदृश्य ढगात सगळेजण लपेटले जावे त्याप्रमाणे त्या स्तब्धतेने ते वातावरण वेढून टाकले.

झेंड्याला गराडा घातलेल्यांची संख्या जेमतेम अठरावीस असेल, पण ते निधड्या छातीने उभे राहिले.

आईच्या अन्तरंगात वादळ उठले होते. ती स्वतःला नकळत झेंडा

घेतलेल्या तुकडीकडे ओढली जात होती. त्या लोकांना काहीतरी सांगायलं हवं असंही तिला वाटत होतं.

"हं, लेफ्टनंट, काढून घ्या तो झेंडा त्यांच्या हातून." उंच म्हाताऱ्या अधिकाऱ्याने झेंड्याकडे बोट दाखवून हुकूम सोडला.

बुटका अधिकारी धावत आला व त्याने पावेलच्या हातातून झेंडा हिसकावला. तो हिसकावताना तो ओरडला, "मुकाट्याने सोड कसा!"

"हं, हात काढ तुझे! खबरदार!" पावेलने जोरात पण गंभीरपणे त्याला बजावले.

झेंडा हवेत हेलकावे खाऊ लागला. क्षणभर दोन्ही बाजूंना हेलकावे खाल्लयावर झेंडा पुनः स्थिर झाला. बुटका अधिकारी उडी मारून मागे झाला व मटकन् खाली आडवा पडला. निकोलाय मूठ वळवून आईच्या बाजूने धावत पुढे झाला.

"पकडा त्यांना!" म्हातारा अधिकारी जमिनीवर पाय आपटून ओरडला.

पुष्कळसे शिपाई पुढे धावले. एकाने बंदुकीचा दस्ता फिरवीत पुढे मार्ग काढला. झेंड्याने पुनः हेलकावे खाल्ले न नंतर तो खाली पडून शिपायांच्या गर्दीत दिसेनासा झाला.

"अयाई ग!" कोणीतरी जोरात ओरडले.

श्वापदाला गोळी लागून तो किंचाळावा तशी आईने किंकाळी फोडली. त्या किंकाळीला उत्तर म्हणून शिपायांच्या घोळक्याच्या मधून पावेलचा स्पष्ट आवाज ऐकू आला,

"आई! येतो ग!"

"तो अजून जिवंत आहे तर! अन् त्याने माझी आठवण केली!" त्या भयंकर क्षणीही या विचारांनी तिच्या चित्तवृत्ती थरारल्या.

"नेनको! येतो मी!" आंद्रेइचा आवाज आला.

ती टाचा उंचावून त्यांना पाहाण्याचा प्रयत्न करू लागली. शिपायांच्या डोक्यांच्या वर आंद्रेइचे डोके व चेहरा तिच्या नजरेस पडला. तो स्मित करून तिला अभिवादन करीत होता.

"आहा! लाडक्या पोरांनो! ... आंद्रयूशा! पाशा!" ती ओरडली.

"अच्छा, कॉमरेड्स! नमस्कार!" त्यांनी शिपायांच्या घोळक्यातून दोस्तांचा निरोप घेतला.



असंख्य आवाजांचा मिळून एक बनलेल्या आवाजाने त्यांना साद दिली. खिडक्यांमधून, कुठून तरी वरून, अगदी छपरातूनच तो आवाज येत होता!

## २९

कोणीतरी आईच्या छातीत जोराचा ठासा लगावला. तिच्या डोळ्यांपुढे अंधेरी आली व समोर उभ्या असलेल्या एका बुटक्या अधिकाऱ्याचा संतप्त लाल चेहरा तिच्या दृष्टीस पडला.

"ए बाई, चल! चालती हो पाहू इथून!" तो खेकसला. तिने त्याच्यावर नजर फिरवून त्याला आपादमस्तक न्याहाळले. त्याच्या पायाशी झेंड्याच्या काठीचे दोन तुकडे पडलेले तिला दिसले. त्यापैकी एका तुकड्याच्या टोकाला अजूनही लाल कपडा बांधलेला होता. तिने वाकून तो उचलून घेतला. अधिकाऱ्याने तिच्या हातातून तो हिसकावला व तिला बाजूला ढकललं.

"जा इथून! मी सांगतो ते ऐक!" तो पुनः ओरडला व त्याने जमिनीवर पाय आपटले.

पलिकडे पोलिसांच्या कोंडीच्या आतून गाण्याचा आवाज आला:

**उठ जाग ओ भूखे बंदो! ...**

आईला सर्व जग गरगरा फिरत असल्यासारखं वाटलं. तिला घेरी आल्यासारखं होत होतं. टेलिग्राफच्या तारांभोवती ऐकू येतो तसा सूंऽऽ आवाज ऐकू येत होता, साऱ्या वातावरणात तो आवाज घुमत होता.

"बंद करा ते गाणे!" अधिकारी खेकसला. "सार्जंट मेजर क्राइनोव..."

आई कशीबशी धडपडत उठली व अधिकाऱ्याने फेकून दिलेली तुटकी झेंड्याची काठी तिने पुनः हस्तगत केली,

"त्या हरामखोरांची तोंडं बंद कर पाहू!"

गाण्यानेही धडपड केली, कापत कापत गती घेतली, पण लगेच सुराची मालिका तुटली व गीत बंद पडलं.

कुणीतरी आईच्या खांद्यावर हात ठेवला, तिचं तोंड वळवलं व तिला एक धक्का दिला.

"चल, निघ इथून! जा!" तो ओरडला.

"चला, रस्ता मोकळा करा!" अधिकाऱ्याने फर्मान सोडले.

थोड्याच अंतरावर लोकांची गर्दी पुनः जमल्याचे आईच्या दृष्टीस पडले. ते लोक ओरडत होते, शिव्याशाप देत होते, शीळ घालीत होते व तसं करीत करीतच रस्त्यातून माघार घेऊन घरांच्या आवारात अदृश्य होत होते.

"ए महामाये! ऊठ! जा इथून!" एक सैनिक थेट आईच्या कानाशी ओरडला व त्याने तिला रस्त्याच्या बाजूला लोटले.

आई झेंड्याच्या मोडक्या काठीचाच आधार घेऊन चालू लागली. तिच्या अंगात मुळीच त्राण उरलं नव्हतं. एका हाताने काठी टेकीत व दुसऱ्या हाताने बाजूच्या भिंतींचा व कुंपणांचा आधार घेत ती कशीबशी पुढे जात होती. लोक तिच्यापासून कुठे तरी दूर जात होते व सैनिक मात्र तिच्या बाजूने चालत चालत "हटो! दूर हटो! चलो!" असं सारखं ओरडत होते.

तिने त्या सैनिकांना जाऊ दिले व मग थांबून चहूबाजूंना नजर फिरवली. रस्त्याच्या टोकाला आणखी बरेचसे सैनिक चौकात शिरण्याचा मार्ग रोखून उभे असलेले तिला दिसले. चौकात कोणीही नव्हतं. डगलेवाले शिपाई लोकांच्या जमावाला मागे रेटण्याचा प्रयत्न करीत होते.

आईला आता परत फिरावंसं वाटत होतं. पण तिला नकळत तिचे पाय तिला पुढे नेत होते. अखेर ती एका अरुंद गल्लीच्या तोंडाशी येऊन पोचली. गल्लीत कोणीही दिसलं नाही. ती गल्लीत वळली.

आत शिरल्यावर ती थबकून उभी राहिली. एक दीर्घ सुस्कारा टाकून तिने कान टवकारले. समोरून कुठून तरी जमावाच्या गोंगाटाचा अस्पष्ट आवाज ऐकू येत होता.

काठीवर सबंध शरीराचा भार टाकून ती पुनः पुढे जायला निघाली. तिचं सर्वांग घामाने डबडबलं होतं, भुवया थरथरत होत्या, ओठ कापत होते, व तिच्या मनात विचारांचं काहूर माजलं होतं ते तिच्या हातवाऱ्यांनी व्यक्त होत होतं. आगीच्या लोळातून ठिणग्या उडत राहाव्या तसे शब्द तिच्या मनात येऊन जात होते व त्या असंबद्ध शब्दांच्या ठिणग्या तिच्या अंतरंगात पेट घेत घेत अखेर त्यांचे रूपांतर आगीच्या डोंबात होऊ पहात होते आणि



अंतरंगात उसळ्या मारणाऱ्या विचारांना शब्दांच्या रूपाने वाट करून देण्याची तिची इच्छा अनावर होत होती.

ती गल्ली मध्येच डावीकडे वळण घेत होती, त्या ठिकाणी येऊन पोचल्यावर आईला जवळच लोकांचा एक मोठा जमाव उभा असलेला दिसला.

"संगिनींचा सरळ सामना करणं म्हणजे काही सामान्य गोष्ट नव्हे, अन् तितकं धैर्य काही कोणी उगाच दाखवीत नाही." कोणी तरी मोठ्या आवाजात जोराने म्हटलं.

"असं दृश्य आजवर नव्हतं बुवा पाहिलं! संगिनींची टोकं त्यांच्या छात्यांशी भिडू पहात होती अन् तरीसुद्धा ते जागचे हालले नाहीत! अगदी पर्वतासारखे निश्चल उभे! तिळमात्रसुद्धा घाबरले नव्हते ते बहाद्दर! खरंच कमाल म्हटली पाहिजे त्यांची."

"पावेल व्लासोवच्या बहादुरीची शर्थ झाली!"

"अन् तो खोखोल तरी काय!"

"त्याचे हात पाठीशी बांधलेले व पठ्ठा सारखा हसतमुख! त्याच्या निर्भयपणाचीही तारीफच म्हटली पाहिजे!"

तितक्यात आई तिथे येऊन पोचली व त्या जमावात घुसली. लोकांनीही तिला आदराने वाट करून दिली.

"दोस्त हो!" ती त्यांना उद्देशून बोलू लागली.

इतक्यात कुणीतरी जोरात हसला. त्याला न राहवून तो उद्गारला: "ते पाहिलंत? तो झेंडा तिच्याजवळ, तिच्या हातातच आहे!"

"चूप!" दुसऱ्या कुणीतरी त्याला दटावलं.

आई हात पुढे करून बोलू लागली:

"माझं एवढं ऐकून घ्या! देवाची शपथ आहे तुम्हाला! तुम्ही सगळे सज्जन, चांगले लोक आहात. काय झालं आहे ते डोळे उघडून पहा. भिऊ नका. आपलीच मुलं, आपल्याच रक्तामांसाचे गोळे असलेली पोरं, सर्वांना न्याय मिळावा म्हणून लढायला पुढे सरसावली आहेत. तुम्हा सर्वांना सुखाचे दिवस पाहायला मिळावे, तुमच्या पोराबाळांना अन् पुढच्या पिढ्यांना सुखासमाधानाने जगता यावं म्हणून त्यांनी हे सत्याचं निशाण हाती घेऊन सुळावर सुद्धा चढण्याची तयारी केली आहे. आजच्या गुलामीच्या जीवनाऐवजी सत्य अन् न्याय यांवर आधारलेलं नवजीवन निर्माण

करण्यासाठीच त्यांची धडपड आहे. सर्व जगात माणुसकीचं, भलेपणाचं राज्य व्हावं, सर्वांना सुखाने जगता यावं हेच त्यांचं ध्येय आहे."

तिचं हृदय विदीर्ण झालं होतं व तिचा घसा कोरडा पडला होता. तिच्या अंतरंगात खोल कुठेतरी नवे नवे शब्द उसळून वर येत होते. सर्वांभूती अमृतमय प्रेमाचा वर्षाव करणारे मधुर शब्द अंतःकरणातून उसळया मारून तिच्या जिभेवर येऊन टपकत होते व कुठल्याही प्रतिकाराला न जुमानता जिव्हेवर थुईथुई नाचून तिला अस्खलित व स्फूर्तिदायक वाणीने लोकांच्या काळजाचा ठाव घेण्यास प्रवृत्त करीत होते.

लोक शांतपणे आपलं बोलणं ऐकताहेत व त्यावर विचार करीत आहेत हे पाहून तिला धीर आला. आपला मुलगा व आंद्रेइ ज्या मार्गाने गेले होते, त्यांच्या ज्या अनेक सहकाऱ्यांना या लोकांनी खुशाल सैनिकांच्या हाती पडू दिलं होतं, त्यांच्याच मार्गाने जाण्याची या सर्वांना कळकळीने हाक द्यावी अशी तिला अनावर इच्छा झाली. तिने आपले भाषण लक्षपूर्वक ऐकून घेणाऱ्या लोकांवर एक नजर टाकली व ती आर्जवी स्वरात पण आग्रहपूर्वक सांगू लागली :

"आपलीच लेकरं आपल्या सुखासाठी, सबंध जगाच्या सुखासाठी, येशू ख्रिस्ताच्या सत्याचा जय व्हावा यासाठी लढण्याला बाहेर पडली आहेत. वाईट लोकांनी, दुष्ट, फसव्या व लोभी लोकांनी आपल्याला ज्या ज्या बंधनांनी जखडून टाकलं आहे, ज्या ज्या मार्गांनी आपली तोंडं दाबून धरली आहेत व ज्या ज्या साधनांनी आपल्याला दडपलं आहे त्या सर्व बंधनांविरुद्ध लढण्यासाठीच आपली मुलं पुढे सरसावली आहेत. लोक हो, या तरुण पोरांनी बंड पुकारलं आहे ते आपल्यासाठी – साऱ्या जगातल्या लोकांसाठी – सर्वच देशांतल्या श्रमजीवी लोकांसाठी! आपण त्यांना वाऱ्यावर सोडून देऊन, त्यांच्याकडे पाठ फिरवून चालणार नाही! त्यांना एकाकी सोडू नका! तुम्ही स्वतःच विचार करा! आपल्या मुलांच्या न्यायप्रियतेवर विश्वास ठेवा! सत्याचा जयघोष करून त्यासाठीच ते छळ सोसताहेत, त्यांच्यावर विश्वास ठेवा!"

तिचा आवाज एकदम थांबला. तिला घेरी आली व ती बेशुद्ध होऊन खाली कोसळणार तोच कुणीतरी तिला सावरलं.

"ती म्हणते आहे ते संपूर्ण सत्य आहे. ईश्वराच्या घरचा न्याय व



सत्यच तिच्या मुखातून बाहेर पडत आहे! ऐका, लोकहो, ऐका!" एकजण उत्तेजित होऊन ओरडला.

"बघा तरी ती स्वतःला किती त्रास करून घेत आहे ती!" दुसरा एकजण सहानुभूतीने म्हणाला.

"वा रे वा! म्हणे स्वतःला त्रास करून घेत आहे! अरे मूर्खांनो! ती आपल्याला शिकवण्यासाठी धडपडत आहे, समजलात!" तिसरा एकजण उद्गारला.

"देवाच्या लेकरांनो!" एका स्त्रीचा कापरा पण उच्च स्वर ऐकू आला. "माझा मित्या अगदी अश्राप आहे, निष्पाप अंतःकरणाचं लेकरू आहे ते! त्याने कोणतं असं वाईट काम केलं आहे? त्याचा ज्यांच्यावर जीव आहे त्या मित्रांच्या मागोमाग तो गेला हाच काय तो त्याचा अपराध! ही बाई म्हणते ते खरं आहे. आपण आपल्या पोरांना असं वाऱ्यावर सोडून देता कामा नये. त्यांनी काय असे वाईट केलं आहे म्हणून आपण त्यांना सोडून जाणार?"

हे शब्द ऐकताना आईचं शरीर थरथरा कापत होतं व तिच्या नेत्रांतून घळघळा अश्रू वाहू लागले होते.

"पावेलच्या आई! तुम्ही घराकडे जा आता!" म्हातारा सिझोव सांगू लागला. "जा, आई, जा! आजच्या दिवसात फार ताण पडला आहे तुम्हाला!"

म्हाताऱ्याचा चेहरा फिकट दिसत होता व त्याची दाढी हालत होती.

तो एकदम ताठ उभा राहिला व सर्वांकडे तीक्ष्ण नजर फिरवून बोलू लागला :

"माझा स्वतःचा पोरगा मात्वेइ कारखान्यात अपघाताने मेला हे तुम्हाला सर्वांना ठाऊकच आहे. पण तो हयात असता तर मी स्वतः होऊन त्याला या पोरांच्या न् त्यांच्या सहकाऱ्यांच्या मागोमाग जायला सांगितलं असतं. मी स्वतःच त्याला सांगितलं असतं की मात्वेइ, तू याच मार्गाने जा. हाच खरा मार्ग आहे, प्रामाणिकपणाचा मार्ग आहे."

त्याच्या बोलण्याचा सर्वांवर प्रभाव पडत होता. तो मध्येच थांबून स्तब्ध राहिला. त्याचे श्रोतेही स्तब्धच होते. काहीतरी नवं, विशाल व भव्य असं त्यांच्यासमोर दिसू लागलं होतं व त्याचं त्यांना आता भय वाटेनासं झालं होतं.

सिझोवने मूठ वळवून पुनः बोलणं सुरू केलं :

"माझं म्हाताऱ्याचं ऐकून घ्या. तुम्ही सगळेजण मला ओळखता. उणीपुरी चांगली त्रेपन्न वर्षं माझ्या वयाला झाली आणि त्यापैकी सतत एकूणचाळीस वर्षांचा काळ मी या ठिकाणी काम करीत आहे. आज त्यांनी पुनः माझ्या भाच्याला धरून नेलं आहे. तो फार चांगला, हुशार छोकरा आहे. तो पावेलच्या बाजूनेच, अग्रभागी निशाणाच्या बाजूने चालत होता..."

त्याने हात हलवला, पण त्या हालचालीबरोबर त्याची शक्ती क्षीण झाल्यासारखी भासली. त्याने आईचा हात धरून म्हटलं :

"ही म्हणते ते अगदी खरं आहे. आपली पोरं प्रामाणिकपणे, सरळ, चांगलं जीवन जगता यावं म्हणून लढताहेत व आपण मात्र खरोखरच त्यांना वाऱ्यावर सोडून दिल्यागत वागत आहोत! बरं चला, पावेलच्या आई, जाऊ या आता."

आईचे डोळे लाल झाले होते. तशाच अश्रुपूर्ण नयनांनी सर्वांकडे नजर टाकून ती म्हणाली :

"लोक हो! हे सारं जीवन आपल्या मुलांसाठीच आहे! ही सारी धरती त्यांचीच आहे!"

"चला, पावेलच्या आई, चला बरं! ही काठी घ्या तुमची!" झेंड्याची मोडकी काठी आईच्या हाती देत सिझोव म्हणाला.

सगळे लोक खिन्न वदनाने पण आदरपूर्वक आईकडे पहात होते. तिच्याविषयी सहानुभूतीचे शब्द कुजबुजले जात होते. सिझोवने काही न बोलता लोकांना बाजूला करून तिला वाट मोकळी करून दिली व लोकही निःशब्दपणे बाजूला होत गेले. कोणत्यातरी अज्ञात शक्तीने आकर्षिल्याप्रमाणे ते थेट तिच्यामागोमाग चालत गेले. चालता चालताही अगदी हलक्या आवाजात लोक तिच्याविषयीच आपापसात बोलत होते.

तिच्या घराच्या फाटकापाशी येऊन पोचल्यावर आईने मागे वळून पाहिलं व काठीवर टेकून तिने सर्वांना अभिवादन केलं. तिने अत्यंत लीनतेने त्या सर्वांचे आभार मानले. तिच्या स्वरात मार्दव व कृतज्ञतेचे भाव स्पष्ट प्रतीत होत होते.

आणि मग त्याच दिवशी अचानक तिच्या अंतःकरणाच्या गाभ्यातून उत्स्फूर्तपणे वर आलेली कल्पना पुनः तिला आठवली व ती म्हणाली,

"येशू ख्रिस्ताचं नाव अमर झालं ते सुद्धा त्याच्यासाठी प्राणार्पण



करणारे लोक होते म्हणूनच ना! त्यांनी आपले जीव त्याच्यावरून ओवाळून टाकले नसते तर आपल्याला येशू ख्रिस्ताचाही लाभ झाला नसता."

जमावातील लोकांच्या नजरा तिच्यावर खिळल्या होत्या.

तिने पुनः एकदा लोकांना अभिवादन केलं व मग घरात प्रवेश केला. सिझोवही मान खाली करून तिच्या पाठोपाठ आत गेला.

अल्पकाळपर्यंत लोक तिथेच फाटकापाशी बोलत उभे राहिले व मग ते सावकाशपणे तेथून निघून गेले.

## भाग दुसरा

### १

शरीर व मनाच्या मरगळलेल्या अवस्थेतच आईने उरलेला सारा दिवस घालवला. जुन्या आठवणींचा अंधुक चित्रपट तिच्या मनःचक्षूंपुढून सरकत होता. तो बुटका अधिकारी, पावेलची धीरगंभीर मुद्रा व आंद्रेइचे हंसरे डोळे तिच्या नजरेसमोरून हालत नव्हते.

तिने काही वेळ खोलीत येरझारा घातल्या, मग खिडकीत बसून ती बाहेर रस्त्याकडे पाहू लागली. थोड्याच वेळात ती पुनः तिथून उठून भुवया चढवून येरझारा घालू लागली. जणू काही कशाचा तरी शोध घेत असल्यासारखी नजर टाकीत ती भोवताली पहात होती. मनाची अस्वस्थता घालवण्यासाठी ती गटगटा पुष्कळसं पाणी प्याली, पण तिच्या अंतःकरणाची व्यथा दूर झाली नाही. तिच्या लेखी आजच्या दिवसाची दोन तुकड्यांत विभागणी झाली होती. पहिला अर्धा दिवस अत्यंत अर्थपूर्ण होता तर उरलेला अर्धा भाग अर्थहीन, निष्प्राण झाला होता. या उत्तरार्धाने तिच्यासमोर एक पोकळी निर्माण केली होती व तिला एकच प्रश्न भेडसावूनं सोडीत होता: "आता मी काय करू?"

कोर्सुनोवा तिला भेटायला आली. तिने पुष्कळसे हातवारे केले, ओरडागागा केला, आक्रोश केला, हातपाय आपटले, पुष्कळसा संताप व्यक्त केला, अन् शिवाय वर आईला काही आश्वासनं दिली व काही सूचनाही केल्या. पण आईवर कशाचाच परिणाम झाला नाही.

"खरंच, किती छान झालं नाही! सगळे लोक बंड करून उठले आहेत! सगळा कारखाना त्यात सामील झाला आहे! कारखान्यातले सगळे लोक!"

"हो, आहे खरं!" एवढंच आई शांतपणे म्हणाली. कोर्सुनोवाच्या



म्हणण्यावर होकार देण्यासाठी तिने मान डोलावली खरी, पण तिची नजर मात्र भूतकाळात स्थिरावली होती. पावेल व आंद्रेइ यांच्याबरोबर जे जे म्हणून अदृश्य झालं होतं त्यावर तिची नजर खिळली होती. तिच्या कंठातून आता आवाज निघणं अशक्य झालं होतं. अंतःकरण साकळून जाऊन सुकून गेलं होतं, तिचे ओठ, तोंड सर्व शुष्क झालं होतं, त्यातला सारा ओलावा नाहीसा झाला होता. तिचे हात थरथरत होते व तिच्या पाठीतून चमका निघत होत्या.

संध्याकाळी पोलिस तिच्या घरी येऊन थडकले. आश्चर्य किंवा भीती यांपैकी कशाचेच भाव चेहऱ्यावर न दर्शविता ती त्यांच्या समोर आली. पोलिसांच्या स्वाऱ्या फार खुशीत होत्या. पिवळ्या रंगाचा अधिकारी दात विचकून तिला म्हणाला:

"कसं काय? ठीक आहे ना? मला वाटतं आपली ही तिसरी भेट, नाही?"

आईने आपली कोरडी जीभ ओठांवरून फिरवली.

तो अधिकारी सारखा बोलत होता. आईला काही उपदेश करण्याचा त्याचा प्रयत्न होता. त्याला स्वतःला ती बडबड करण्यात आनंद वाटत होता हे उघड होतं. पण त्याच्या बडबडीचा आईला राग आला नाही. त्याचे शब्द तिच्या मेंदूपर्यंत पोचतच नसावे. पण त्याच्या एका वाक्याला मात्र उत्तर दिल्यावाचून तिला राहवले नाही.

तो अधिकारी म्हणाला, "बाई, तुम्ही आपल्या मुलाच्या अंतःकरणात ईश्वर व झारबादशहाविषयी श्रद्धा निर्माण केली नाही, हा तुमचाच दोष नाही का?"

आई दरवाजापाशी उभी होती तिथूनच संथपणे उत्तरली, "आपली मुलंच आपला न्याय करतील. ते अशा खडतर मार्गाने जात असता आपण त्यांना साथ दिली नाही याबद्दल ते योग्य न्याय देतील."

"काय म्हणालात?" अधिकारी ओरडला. "पुनः म्हणा पाहू ते!"

"नाही, मी म्हटलं आपली मुलंच आपला न्याय करतील!" आई उसासा टाकून म्हणाली.

तो चिडून काहीतरी पुटपुटला, पण त्याचे शब्द आईला कळले नाहीत.

घराची झडती सुरू झाली तेव्हा साक्षीदार म्हणून कोर्सुनोवाला बोलावून आणण्यात आलं. ती आईच्या शेजारीच उभी होती, ती आईकडे पहात

मात्र नव्हती. अधिकाऱ्याने तिला बरेच प्रश्न विचारले, त्या सर्व प्रश्नांना तिचं एकच ठराविक उत्तर होतं,

"मला काहीच माहीत नाही, हुजूर! मी आपली एक गरीब बाई आहे. आपला धंदा करून कसं तरी पोट भरते एवढंच. मला मेलीला कशाचं काही समजतसुद्धा नाही!"

तिने पहिल्यांदा वरीलप्रमाणे उत्तर दिलं तेव्हा तो अधिकारी आपल्या आकडेबाज मिशांना पीळ भरीत तिच्यावर खेकसून म्हणाला,

"बस, बस, पुरे झालं! चूप बैस तू!"

तिने यावर अदबीने लवून त्याची आज्ञा मान्य केली, पण त्याची पाठ वळताच टिंगल करण्यासाठी तिने आपलं नाक खाजविलं. "हे त्याच्यासाठी बरं का!" ती आईच्या कानात कुजबुजली.

मग तिला पेलाग्येयाची झडती घेण्याची आज्ञा झाली तेव्हा ती भयचकित होऊन म्हणाली:

"पण मला तसलं काम येत नाही, हुजूर!"

त्या अधिकाऱ्याने पाय आपटले व तिला दरडावून आपली आज्ञा अंमलात आणण्यास फर्मावलं.

मरियाने नजर जमिनीकडे वळवून आईला म्हटलं,

"बरं बाई! तुला झडतीला तयार व्हायलाच हवं!"

मग तिने आईच्या कपड्यांची झडती घेण्यासाठी तिच्या अंगावरून हात फिरवले तेव्हा तिचा चेहरा लाल झाला व ती पुटपुटली: "कुत्तरडे मेले!"

"काय, काय म्हटलंस?" त्या अधिकाऱ्याने त्या दोघी कोपऱ्यात होत्या तिकडे वळून ओरडून विचारलं.

"नाही, आमच्या बायकांच्या गोष्टी, हुजूर!" मरियाने भीत भीत उत्तर दिलं.

झडती संपल्यावर अधिकाऱ्याने एक कागद पुढे करून आईला त्यावर सही करण्यास फर्मावलं. आईला तसल्या प्रकारचा अनुभव नव्हता. तिनं मोठ्या अक्षरात लिहून टाकलं: "पेलाग्येया व्लासोवा, एका कामगाराची विधवा."

"हे काय लिहिलं भलतंच! असं लिहायला कुणी सांगितलं होतं?" अधिकारी महाशय दात विचकत ओरडले. मग विकट हास्य करून तो उद्गारला "रानटी लेकाचे!"



पोलिस निघून गेले. आई खिडकीपाशी जाऊन उभी राहिली. छातीवर हात बांधून ती बाहेर टक लावून पहात होती. तिच्या भुवया चढलेल्या होत्या, पापण्या स्थिर होत्या व डोळे उघडे असूनही तिला काही दिसत नव्हतं. तिने ओठ घट्ट दाबून धरले होते व जबडाही असा ताणला होता की लवकरच आतून कळ आल्यासारखं तिला वाटू लागलं.

दिव्यातलं तेल संपून गेलं तशी वात कोरडी पडून तडतडू लागली. आईने फुंकर घालून दिवा मालवला व ती तशीच अंधारातच उभी राहिली. तिचं अंतःकरण इतकं व्यथित झालं होतं की तिला मोकळा श्वासोच्छ्वास करणंही अवघड झालं होतं. तशाच अवस्थेत उभे राहून तिचे डोळे व पाय दुखू लागले तरी ती हालली नाही.

मरिया खिडकीपाशी येऊन धुंद आवाजात बोलल्याचं आईला ऐकू आलं. ती म्हणत होती,

"पेलाग्येया, झोपलीस का ग? अरेरे, गरीब बिचारी! जा झोप जा!"

आई कपडेही न बदलता तशीच अंथरुणावर जाऊन पडली. थोड्याच वेळात तळ्यातल्या पाण्याने वेढून घ्यावं तसं निद्रेने तिला आपल्या कुशीत लपेटून घेतलं.

आईला स्वप्नात दिसलं की दलदलीच्या पलीकडे एक पिवळसर रंगाचा वालुकामय डोंगर आहे व ती त्याच्या जवळून शहराच्या वाटेनेच चालली आहे. एका कड्याची वाळू कामगार काढीत आहेत, त्याच कड्यावर पावेल उभा आहे व आंद्रेइच्या मधुर, शांत आवाजात तो गात आहे:

**उठ जाग ओ भूखे बंदी!..**

आई कपाळावर हात ठेवून पावेलकडे पहात पहात डोंगराच्या पलीकडे गेली. निरभ्र निळ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर त्याची आकृती स्पष्ट व रेखीव दिसत होती. ती गर्भवती असल्यामुळे तिला पावेलजवळ जाण्याची लाज वाटत होती, व तिच्या कडेवर दुसरं मूल होतं. ती पुढे चालत राहिली. मग तिला एक मैदान लागलं. तिथे पुष्कळशी मुलं चेंडू खेळत होती. त्यांचा चेंडू लाल रंगाचा होता. तिच्या कडेवरचं मूल चेंडूसाठी हात पुढे करून रडू लागलं. त्याचं रडणं थांबवण्यासाठी ती त्याला अंगावर पाजू लागली व ती मागे वळली. पहाते तो काय! त्या टेकडीवर आता

संगीनधारी सैनिक उभे आहेत. व त्यांच्या संगिनी तिच्यावरच रोखलेल्या आहेत. तिने तात्काळ पाय उचलून त्या मैदानाच्या मध्यभागी असलेल्या चर्चच्या दिशेने पळायला आरंभ केला. ते चर्च पांढरं शुभ्र दिसत होतं व त्याचं शिखर थेट गगनाला जाऊन भिडलेलं होतं. ते चर्च पांढऱ्या शुभ्र ढगांचंच बनल्यासारखं दिसत होतं. त्याच्या आवारात कुणाचा तरी अंत्यविधी सुरू होता. शवपेटी खूप मोठी, काळ्याभोर रंगाची, पक्की बंद केलेली होती. पांढरी वस्त्रं घातलेला पाद्री व त्याचा सहकारी चर्चमधून चालता चालता गंभीर सुरात गात होते :

**पुनरुज्जीवन होइ येशूचे**
**गाउ गान त्या प्रभुरायाचे...**

पाद्रयाच्या सहकाऱ्याच्या हातात धूपपात्र होतं, ते फिरवीतच त्याने समोरून येणाऱ्या पेलाग्येयाला लवून अभिवादन केलं व तिच्याकडे पाहून स्मित केलं. त्याचे केस चमकदार व पिंगट रंगाचे होते व त्याच्या आनंदी चेहऱ्याचं सामोइलोवच्या चेहऱ्याशी साम्य होतं. चर्चच्या घुमटातील छिद्रातून सूर्यप्रकाशाचे तेजस्वी किरण खाली येत होते. व्यासपीठाच्या दोन्ही बाजूच्या सज्जांतून प्रार्थना पथकातील लोकांच्या कंठांतून सुस्वर गीत बाहेर पडत होतं :

**पुनरुज्जीवन होइ येशूचे**
**गाउ गान त्या प्रभुरायाचे...**

"पकडा या सगळयांना!"

तो पाद्री चर्चच्या मध्यभागी येताच एकदम ओरडला. त्याची पांढरी वस्त्रे नाहीशी झाली व त्याच्या ओठांवर करडया रंगाच्या मिशांचे आकडे दिसू लागले. सगळेजण सैरावैरा धावू लागले. पाद्रयाचा सहकारी सुद्धा हातचं धूपपात्र टाकून देऊन खोखोलप्रमाणे डोकं हातात धरून पळत सुटला, आईने आपल्या कडेवरचं मूल त्या पळणाऱ्या लोकांच्या पायाशी टाकलं. पण लोक त्याला टाळून बाजूने धावत गेले व जाता जाता त्या अर्भकाच्या नग्न शरीराकडे त्यांनी भयचकित नजरा टाकल्या. आईने त्या लोकांपुढे गुडघ्यावर बसून त्यांची करुणा भाकली,



"या मुलाला टाकून जाऊ नका! त्याला बरोबर घेऊन जा हो!"

इतक्यात तिला मघाचंच प्रार्थनागीत गाइलेलं ऐकू आलं. तिनं वर नजर करून पाहिलं तो खोखोल तिच्या समोर उभा होता. हात मागे बांधून सुहास्य वदनाने तो तेच गीत गात होता :

**पुनरुज्जीवन होइ येशूचे**
**गाउ गान त्या प्रभुरायाचे...**

तिने खाली वाकून त्या अर्भकाला उचललं व लाकडी फळयांनी भरलेल्या एका गाडीवर त्याला अलगद ठेवून दिलं. निकोलाय गाडीच्या बाजूने हळूहळू चालत होता व हसत होता. तो म्हणाला, "काहीतरी महत्त्वाची कामगिरी माझ्यावर सोपवली तर अखेर!"

रस्त्यावर सगळीकडे घाण पसरली होती. लोक घरांच्या खिडक्यांतून डोकावून बाहेर पहात ओरडत होते, शिट्ट्या वाजवीत होते व हात हालवीत होते. आकाश निरभ्र होतं, आकाशात सूर्य तळपत होता व कडाक्याचं ऊन पडलं होतं, सावलीचं कुठे नाव नव्हतं.

"आई, गाण्याला सुरुवात कर!" खोखोल ओरडला.

"जीवन हे असंच आहे, आई!" तो पुढे म्हणाला.

मग त्याने स्वतः गाण्याला सुरुवात केली. त्याचा आवाज सर्वांच्यापेक्षा उंच होता.

तो पुढे निघाला व आई त्याच्या मागोमाग चालू लागली. अचानक ती अडखळली व एका खोल खड्डयात पडली. तो खड्डा इतका खोल होता की त्याला तळ बहुधा नसावाच. ती खाली खाली जात असता ती पोकळी चहू बाजूंनी आकसू लागली...

आईला एकदम जाग आली. तिचं सर्वांग घामाने डबडबलं होतं व त्याचा गारवा तिला बोचत होता. कोणाचा तरी दणकट, राकट हात आपलं हृदय पिळून काढीत असल्यासारखं तिला वाटत होतं.

कारखान्याचा कर्कश भोंगा कामगारांना कामावर येण्याची आज्ञा देत होता. आईच्या लक्षात आलं, हा दुसरा भोंगा होता.

तिने भोवताली नजर टाकली. पुस्तकं जिकडेतिकडे फेकलेली होती,

सगळ्या जिनसांची उलथापालथ झाली होती, जमिनीवर चिखलाने भरलेल्या बुटांचे ठसे उमटलेले होते.

आई उठली व अंग धुण्याच्या वा प्रार्थनेच्या भानगडीत न पडता तिने खोलीची आवराआवर सुरू केली. स्वयंपाकघरात बावटयाचं दांडकं पडलेलं होतं, त्याला बांधलेलं निशाण तसंच कायम असलेलं तिला दिसलं. तिने ते उचललं व चुलीच्या बाजूला ठेवण्याचा विचार केला, पण तेवढ्यात विचार बदलला. तिने एक सुस्कारा सोडून निशाणाचा लाल कपडा सोडला व काळजीपूर्वक त्याची घडी घालून खिशात ठेवून दिली. मग त्या दांडक्याचे मोडून दोन तुकडे केले व ते चुलीत टाकून दिले. नंतर तिने थंड पाण्याने खिडक्या व फरशीची जमीन स्वच्छ पुसून काढली, चहाचं आधण चढवलं व कपडे बदलले.

मग ती स्वयंपाकघराच्या खिडकीशी बसली तेव्हा तिला पुन: मघाचाच प्रश्न भेडसावू लागला:

"आता मी करू तरी काय?"

तेवढ्यात तिला आठवलं, आज सकाळच्या प्रार्थनेचा कार्यक्रम तसाच राहून गेला. ती जाऊन देवासमोर उभी राहिली. पण थोडा वेळ उभं राहिल्यावर ती पुन: खाली बसली. आज तिचं हृदय पार रिकामं होतं.

सगळीकडे विलक्षण स्तब्धता पसरली होती. काल रस्त्यांतून सर्व शक्ती एकवटून ओरडणारे सगळेच्या सगळे लोक जणू काय आज स्वत:ला घरात कोंडून घेऊन त्या विलक्षण घटनांवर विचार करीत होते!

अचानक आईला तिच्या तरुणपणची एक घटना आठवली. झाउसाइलोव कुटुंबाच्या वाड्याभोवतालच्या जुनाट बागेत एक तळं होतं. त्यात पुष्कळ पाणी साचलेलं होतं व चिखल असल्यामुळे खूप कमळं उगवलेली होती. हिवाळ्यात एक दिवस ती सहज त्या तळ्याच्या बाजूला गेली तेव्हा तिला तळ्याच्या मधोमध एक नाव उभी असलेली दिसली. तळ्याचं काळंभोर पाणी शांत होतं व ती नाव त्या पाण्यात चिकटवून ठेवल्यासारखी उभी होती. बाजूला सुकलेल्या पानांचा खच पडलेला होता. आत ना कोणी माणूस ना वल्हे, अशा एकाकी अवस्थेत पडलेल्या व वाळलेल्या पानांनी घेरलेल्या त्या नावेचं दृश्य कसली तरी अज्ञात दु:खाची कहाणी सांगत होतं. पेलाग्येया व्यथित व उदास अंत:करणाने बराच वेळ काठावर उभी राहून नावेकडे पहात राहिली. तिला राहून राहून हा प्रश्न पडला होता की ही नाव या



अशा अवस्थेत कोणी व कां नेऊन सोडली असावी? त्या दिवशी संध्याकाळी तिला अशी माहिती मिळाली की त्या मळ्यातल्या एका नोकराच्या बायकोने त्या नावेतून तळ्याच्या मध्यभागी जाऊन तळ्याच्या पाण्यात जीव दिला होता. ती बाई दिसायला ठेंगणी ठुसकी होती, तिचे केस काळेभोर व विपुल होते व ती तुरुतुरू चलायची, असं तिचं वर्णनही पेलाग्येयला ऐकायला मिळालं होतं.

ती आठवण होताच आईने कपाळावरून हात फिरवला. पुन: कालच्या आठवणींनी तिच्या मनात गर्दी करून सोडली. त्याच आठवणींनी भारावून जाऊन ती बराच वेळ तशीच बसून राहिली. तिची नजर समोरच्या पेल्यातील थंड चहावर खिळलेली होती, व तिच्या अन्त:करणात तिला सारखं वाटत होतं की, आपल्या सगळ्या प्रश्नांची उत्तरं देऊ शकेल अशा कुणातरी शहाण्या, साध्या माणसाची भेट होऊन त्याच्याशी बोलायला मिळालं तर किती बरं होईल!

जणू तिच्या या आंतरिक इच्छेची पूर्तता करण्यासाठीच की काय, त्या दिवशी दुपारी तिचं जेवण झाल्यावर निकोलाय इवानोविच तिच्या भेटीला आला. पण तो आलेला पाहून तिला बरं वाटण्याऐवजी भीतीच वाटली व त्याच्या नमस्काराचाही स्वीकार न करता ती एकदम त्याला म्हणाली:

"कशाला आला तुम्ही? अगदी मूर्खपणा आहे इथे येणं म्हणजे! तुम्ही इथे आल्याचं त्यांनी पाहिलं तर तुम्हाला सुद्धा धरून नेतील की ते!"

निकोलायने आईचा हात धरून घट्ट दाबला व चष्मा नीट करून तिच्या जवळ सरकून तो तिला म्हणाला:

"पावेल, आंद्रेइ व मी अशा आम्हा तिघांचं आपसात ठरलं होतं की त्या दोघांना अटक झाली तर त्याच्या दुसऱ्याच दिवशी मी तुम्हाला शहरात राहायला घेऊन जायचं."

त्याने एका झटक्यात तिला हे सांगून टाकलं. त्याच्या आवाजात मार्दव व जिव्हाळा होता.

त्याने विचारलं:

"तुमच्या घराची झडती घेण्यात आली का?"

"हो! अगदी सगळं उलटं पालटं करून पाहिलं मेल्यांनी! काही लाज, शरम, काही सुद्धा ठेवली नाही!" आई संतापाने उद्गारली.

"लाज? त्यांना कशाची आली आहे लाज आणि शरम?" निकोलाय खांदे उडवीत उद्गारला.

मग आईने शहरात जाऊन राहाणं का आवश्यक होतं हे तो तिला समजावून सांगू लागला.

त्याचं ते स्नेहार्द्र, आत्मीयतेने परिपूर्ण असं बोलणं ती उत्सुकतेने ऐकत असता तिच्या चेहऱ्यावर मंद स्मित विलसलं होतं. त्याचं सगळंच म्हणणं तिला समजत होतं अशातला भाग नाही, पण त्याच्या बोलण्यामुळे तिच्या अन्तःकरणात त्याच्याबद्दल जो विश्वास व जिव्हाळा निर्माण होऊ लागला होता त्याच्या जाणिवेने तिचं तिलाच आश्चर्य वाटत होतं.

त्याचं बोलणं ऐकून ती उत्तरली, "पाशाचं मत जर हेच असेल तर मला कबूल आहे, पण मी आल्याने तुमची गैरसोय होणार..."

"त्याची तुम्हाला काळजी नको!" निकोलाय तिचं वाक्य अर्धंच तोडून उद्गारला. "नाहीतरी मी एकटाच राहातो. मधून मधून माझी बहीण माझ्याकडे राहायला येते एवढंच."

"पण मी माझ्या पालनपोषणाचा भार तुमच्यावर टाकणार नाही!" आई म्हणाली.

"तुमची इच्छाच असेल तर तुमच्यासाठी काम पाहाता येईल." तो उत्तरला.

आईच्या लेखी काम म्हणजे तिचा मुलगा, आंद्रेइ व त्यांचे सहकारी यांच्या कार्याशी निगडित असंच काम असायला हवं होतं. ती निकोलायच्या जवळ जाऊन त्याच्या डोळ्यांकडे पहात म्हणाली,

"खरंच मिळवून द्याल काम तुम्ही?"

"माझ्या घरात असं फारसं काम नसतं, कारण मी पडलो सडाफटिंग, ब्रह्मचारी..."

"अं हं! मी घरकामाचं म्हणत नव्हते!" आई हळूच म्हणाली.

एवढं बोलून तिने एक सुस्कारा टाकला. तिच्या म्हणण्याचा आशय त्याच्या ध्यानी आला नाही याचा तिला मनातल्या मनात थोडा राग आला होता.

निकोलाय आपल्या जाड भिंगाच्या चष्म्यातून डोळे किलकिले करून विचारमग्न होत तिला म्हणाला:

"मागे ज्या शेतकऱ्यांनी त्यांच्यासाठी एक खास वर्तमानपत्र काढण्याची मागणी केली होती त्यांचा पत्ता जर तुम्ही पावेलकडून मिळवू शकलात–"

"माझ्या माहितीचे आहेत ते लोक!" ती एकदम हर्षभरित होऊन



जोरात म्हणाली. "मी त्यांचा शोध काढीन अन् तुम्ही सांगाल ते करीन! बेकायदेशीर वाङ्मयाचा मी प्रसार करीत आहे असा कोणाला कधी संशयही येणार नाही! हो, मी कारखान्यात गुप्त पत्रकं नेतच होते की नाही?"

आईला एकदम असं वाटू लागलं की देशात सगळीकडे भटकावं, खेड्यापाड्यांतून, जंगलांतून सारखं हिंडत राहावं, पाठीवर एक झोळी न् हातात काठी, बस!

"खरंच हे काम करू द्या मला!" ती काकुळतीने म्हणाली. "मी कुठं वाटेल तिथं जाईन! तुम्ही पहाच मी जाते की नाही ते! सगळ्या प्रांतात मी अगदी एकटी खुशाल जाईन! ऊन, वारा, थंडी, काही असू द्या, अगदी मरेपर्यंत मी हे यात्रेकरूसारखं भटकंतीचं काम करीन! मला ते कामसुद्धा चालेल!"

घरदार नसलेल्या एखाद्या भिकाऱ्याप्रमाणे गावोगावी जाऊन झोपड्यांच्या दारात उभं राहायचं व प्रभू येशूच्या नावाने भिक्षा मागायची, असं आपलं स्वतःचं चित्र मनश्चक्षूंसमोर दिसू लगताच तिला उदासवाणं वाटू लागलं.

निकोलायने तिचा हात धरून तो थोपटला तेव्हा त्याच्या हाताची ऊब तिला जाणवली. त्याने घड्याळाकडे नजर टाकली व तो तिला म्हणाला:

"बराय, त्याबद्दल नंतर बोलू आपण."

आई पुन्हा जोरात बोलू लागली:

"आमच्या काळजाचे तुकडे असलेली आमची मुलंबाळं जर स्वतःच्या सुखाचा यत्किंचित विचार न करता बंदिवासात अडकवून घेण्याला तयार होतात, तर माझ्यासारखीचं, एका मातेचं कर्तव्य काय ठरतं?"

निकोलायचा चेहरा फिकट दिसू लागला. तिच्याकडे प्रेमाने पाहात तो संथपणे उद्गारला:

"आजपर्यंत कुणालाच असं बोलताना मी ऐकलेलं नाही!"

"काय सांगू तरी मी?" आई व्यथित हृदयाने मान हालवीत व हाताने आपलं दुःख प्रदर्शित करण्याचा निष्फळ प्रयत्न करीत म्हणाली. "माझ्या अन्तःकरणातलं हे आईचं हृदय कसं तडफडत आहे ते शब्दांनी वर्णन करून सांगणं कठीण आहे–"

तिचं अन्तःकरण वेगाने उचंबळून आलं व तो आवेग असह्य होऊन ती तडफेने उठून उभी राहिली व संतापाने बोलू लागली:

"माझ्या अन्तःकरणाची ती व्यथा शब्दांनी वर्णन करता आली तर मग

अनेकांच्या डोळयांतून टिपं येतील! अगदी नीच, निर्लज्ज, कठोर हृदयाच्या लोकांच्या अन्तःकरणाला सुद्धा पाझर फुटेल!"

हे बोलणं ऐकताच निकोलाय उठला व त्याने पुनः घड्याळात पाहिलं. त्याने आईला विचारलं,

"मग ठरलं ना? तुम्ही शहरात माझ्याकडे येऊन राहाणार ना?"

आईने मानेनेच होकार दिला.

"मग कधी? अगदी शक्य तितक्या लवकर यायचं, बरं का! तुम्ही येईपर्यंत माझी काळजी दूर व्हायची नाही."

निकोलाय एका बाजूला मस्तक वाकवून उभा होता. स्मितवदन पण बुजरा चेहरा, किलकिली नजर, अशी साध्या काळ्या कोटातली त्याची मूर्ती पाहून आईला वाटलं, याचं बहिरंग अन् अंतरंग यात किती तफावत आहे!

"तुमच्याजवळ थोडेतरी पैसे आहेत की नाही?" त्याने नजर खाली वळवून विचारलं.

"नाही."

त्याने चटकन् खिशातून पाकीट काढलं व त्यातून पैसे काढून तिच्यापुढे केले.

"घ्या हे! घ्या की!" त्याने तिला विनवलं.

आईच्या चेहऱ्यावर स्मिताची रेखा उमटल्यावाचून राहिली नाही.

ती मान हालवून म्हणाली, "तुमचं सारं काही निराळंच दिसतं! पैशाची सुद्धा तुम्हाला किंमत वाटत नाहीसं दिसतंय. कितीतरी जण पैशासाठी आपला आत्मासुद्धा विकतात, पण तुम्हाला पैशाचं मोल मुळीच वाटत नाही! लोकांना मदत करता यावी म्हणूनच तुम्ही पैसा जवळ बाळगता, नाही?"

निकोलाय हसला.

"पैसा म्हणजे नसती कटकट असते. घ्यायचाही त्रास, अन् देऊन टाकायचा तरी त्रासच!"

एवढं बोलून त्याने तिचा हात घट्ट दाबून हस्तांदोलन केलं. जाता जाता तो पुनः म्हणाला:

"शक्य तितक्या लवकर यायचं, बरं का!" मग तो अगदी शांतपणे तिथून निघून गेला.



आईने त्याला दारापर्यंत पोचवून निरोप दिला तेव्हा ती मनाशी म्हणत होती:

"किती दया आहे याच्या अन्तःकरणात! पण तो माझी कीव करीत नाही."

त्याच्या या अशा वागणुकीमुळे ती नाराज झाली होती की तिला फक्त आश्चर्य वाटत होतं, हे मात्र तिचं तिलाच सांगता येत नव्हतं.

## २

निकोलाय तिच्या भेटीला येऊन गेल्यानंतर चौथ्या दिवशी आई त्याच्या घरी राहायला गेली. तिच्या दोन पेट्या लादलेल्या गाडीत बसून ती जायला निघाल्यावर गाडी त्या वस्तीतून बाहेर पडून शेतांच्या बाजूने शहराकडे चालू लागली व तिने मागे वळून त्या वस्तीकडे नजर टाकली तेव्हा तिच्या भावना उचंबळून आल्या. याच वस्तीत तिने आपल्या आयुष्यातील अत्यंत अंधःकारमय व दुःखपूर्ण असा काळ घालवला होता, व याच वस्तीत तिच्या जीवनाचं नवं प्रकरणही सुरू झालं होतं. या नव्या जीवनातील नवा आनंद व नवी दुःखे अनुभवता अनुभवता तिचे दिवस फार झपाट्याने निघून गेले होते. ही वस्ती आपण आता कायमची सोडून जात असल्याची तिला अचानक जाणीव झाली.

कारखान्याची भलीमोठी धुराडी थेट आकाशात घुसली होती, कारखाना म्हणजे काजळाने माखलेल्या भूभागाच्या पार्श्वभूमीवर पसरलेल्या एखाद्या भल्या मोठ्या लाल रंगाच्या कोळ्यासारखा दिसत होता. त्याच्या सभोवताली कामगारांच्या एकमजली खुराडेवजा चाळी पसरल्या होत्या. दलदलीच्या भागाच्या काठावरच वसलेली ही खुजी, मळकट घरं आपापल्या लहान लहान खिडक्यांतून परस्परांकडे केविलवाण्या दृष्टीने पहात होती. त्या सर्व वस्तीत चर्चचा वरचा भाग उठून दिसत होता. चर्चच्या इमारतीचा रंगही कारखान्यासारखाच लाल होता, पण त्याच्या मनोऱ्याचं वरचं टोक मात्र धुराड्यांच्यापेक्षा कमी उंच होतं.

आईने एक दीर्घ उसासा टाकला व गळा दाटल्यासारखं वाटल्यामुळे पोलक्याची वरची गुंडी काढून गळा मोकळा केला.

"हं· हॅंः हॅंः चल!" गाडीवानाने लगाम खेचून घोड्याला फर्मावलं. त्याच्या शरीराला वाक आल्यामुळे त्याचं वय ओळखणं कठीणच होतं. त्याच्या डोक्यावरचे व चेहऱ्यावरचे केस विरळ झाले होते. तो गाडीच्या बाजूने लगाम धरून चालताना सारखा डुलत होता व उजव्या बाजूला वळणं व डाव्या बाजूला वळणं यांत त्याच्या लेखी काहीच फरक नसावा असं दिसत होतं.

"झ्याः झ्याः" तो पुनः ओरडला. त्याच्या आवाजातही कसलंच चैतन्य नव्हतं. त्याच्या पायांतले बूट चिखलाने भरलेले होते व तो चालत असताना त्याचे पाय हवेत उडविल्यासारखे दिसत होते.

आईने चौफेर नजर फिरवली तेव्हा तिला भासलं की ही शेतंही आपल्या अन्तःकरणाप्रमाणेच पार रिकामी व शून्यवत आहेत.

गाडी चालली होती त्या रस्त्यावर दाट वाळू होती. उन्हाने तापलेल्या त्या वाळूतून रखडत जाताना घोड्याचं मस्तक संथपणे डुलत होतं. त्याच्या चालीने वाळूचा खसखस आवाज होत होता, जीर्ण गाडीच्या चौकटीची करकर सुरू होती व हे आवाज व धुळीचे लोट गाडीचा पाठलाग करीत होते...

निकोलाय इवानोविचचं घर शहराच्या अगदी एका टोकाला होतं. एका जुनाट दोन मजली घरात एका बाजूला बांधून काढलेल्या हिरव्या रंगाच्या तीन खोल्यांच्या गाळ्यात त्याचं बिऱ्हाड होतं. समोरच्या जागेत लहानशी बाग लावलेली होती. त्या बागेतल्या लिलॅक, ॲकेशिया वगैरे झाडांच्या फांद्या व पॉप्लर वृक्षांची शुभ्र चंदेरी पाने तिन्ही खोल्यांच्या खिडक्यांतून आत डोकावताना दिसत होती. खोल्यांच्या आतली व्यवस्था अत्यंत टापटिपीची होती. फरशीवर नक्षी काढलेली होती, त्यावर सावल्या हलू लागल्या म्हणजे ती नक्षीही हालल्यासारखी भासे. भिंतींजवळ जिकडे तिकडे पुस्तकांनी भरलेली कपाटं होती, व भिंतींच्या वरच्या भागाला गंभीर चेहऱ्याच्या लोकांच्या तसबिरी लावलेल्या होत्या.

आई घरात आल्यावर निकोलाय तिला एका लहान खोलीत घेऊन गेला. खोलीच्या एका खिडकीतून बाग व दुसऱ्या खिडकीतून आवार दिसत होतं. आवारात गवत वाढलेलं होतं. या खोलीतही पुस्तकांनी भरलेली कपाटं होती. निकोलायने ती खोली दाखवून आईला विचारलं:

"ही खोली सोईची वाटते कां तुम्हाला?"



"मला आपलं स्वयंपाकघरात राहू द्या," आई म्हणाली. "ती खोलीसुद्धा चांगली स्वच्छ व छान आहे."

तिच्या या शब्दांची त्याला भीती वाटल्यासारखं दिसलं. त्याने तिला स्वैंपाकाच्या खोलीत रहाण्याच्या बेतापासून परावृत्त करण्याचा धांदरटपणे बराच प्रयत्न केला व तिने त्याचं म्हणणं मान्य केलं तेव्हा त्याचा चेहरा एकदम उजळला.

त्या तिन्ही खोल्यांचं वातावरण काही निराळंच होतं. तिथे चांगली शुद्ध हवा सतत खेळत असल्यामुळे मन प्रसन्न होई खरं, पण त्या ठिकाणी मोठ्याने बोलण्याला मात्र एकदम मन घेत नसे. कारण तिथे सर्व स्तब्ध व शांत असे व विशेष म्हणजे भिंतीवरील तसबिरींतले गंभीर चेहऱ्याचे पुरुष अशा एकाग्रतेने पहात असल्यासारखे दिसत की आपल्या बोलण्याने त्यांच्या एकाग्रतेचा भंग तर होणार नाही ना अशीच कुणालाही शंका येत असे.

खिडक्यांच्या चौकटीत ठेवलेल्या फुलझाडांच्या कुंड्यांतल्या मातीला हात लावून पाहत आई म्हणाली:

"झाडांना पाणी द्यायला हवंय, नाही?"

"हो, खरंच की?" निकोलायने गुन्हा कबूल केला. "मला फुलझाडांची आवड आहे खरी, पण त्यांच्याकडे लक्ष द्यायला फुरसतच होत नाही."

आईच्या नजरेने एक गोष्ट पटकन् टिपून घेतली. ती अशी की या चांगल्या सुरेख घरात सुद्धा निकोलाय अंग चोरून, संकोचाने वागत होता; जणू हे घर स्वतःचं नसून परक्याचं आहे असाच त्याच्या वृत्तीवरून भास होई. खोलीतल्या निरनिराळ्या जिनसांच्या अगदी जवळ तोंड नेऊन चष्मा वर करीत तो त्या जिनसांकडे निरखून पहात राही. कधी कधी तो एखादा जिन्नस तोंडाच्या इतक्या जवळ घेई की तो नेत्रांनीच त्याचा स्पर्श अनुभवत असल्यासारखं भासे. एकंदरीने त्याची वागणूक अशा प्रकारची असे की जणू तोही आईप्रमाणे नव्यानेच या घरात आला होता व तिच्याप्रमाणेच त्यालाही तिथली प्रत्येक गोष्ट नवी व अपरिचित होती. त्याच्या या वागणुकीमुळे एक मात्र झालं. आईला तिथं वावरताना वाटणारा संकोच नाहीसा होऊन ती मोकळेपणाने वावरू लागली. घरात आल्यावर तिने त्याच्याबरोबर हिंडून कुठं काय आहे ते नीट पाहून घेतलं व त्याच्या दिनचर्येचीही माहिती काढून घेतली. निकोलाय तिच्या प्रश्नांची उत्तरं देत होता तीही संकोचानेच. एखाद्या माणसाला आपण करतो ते बरोबर नाही याची जाणीव असूनही

काय करावं ते न कळल्यामुळे त्याची जशी केविलवाणी स्थिती व्हावी, तशा अपराधी वृत्तीने तो बोलत होता.

आईने फुलझाडांच्या कुंड्यांत पाणी घातलं, पियानोवर अस्ताव्यस्त पडलेले संगीताचे कागद नीट लावून ठेवले. चहादाणीकडे तिचं लक्ष गेलं तेव्हा ती उद्गारली,

"ही पॉलिश करून चकचकीत करायला हवी!"

निकोलायने त्या पितळेच्या चहादाणीवरून हात फिरवला व अगदी जवळ तोंड नेऊन तो तिची पहाणी करू लागला. ते पाहून आईला हसू आलं.

रात्री अंथरुणावर पडल्या पडल्या आई दिवसभरातल्या घटनांचा विचार करू लागली. तिने डोकं वर करून भोवतालच्या नव्या वातावरणावर नजर टाकली. तिला प्रथम ते खरंच वाटेना. उभ्या आयुष्यात आज प्रथमच ती परक्याच्या घरी झोपत होती, पण असं असूनही तिचं मन अस्वस्थ झालेलं नव्हतं. तिला निकोलायबद्दल जिव्हाळा वाटू लागला व त्याला सुखी करण्याचा प्रयत्न करावा व त्याच्या एकाकी जीवनात मायेची ऊब नव्हती ती उणीव भरून काढावी असं तिला तीव्रतेने वाटू लागलं. त्याचा काहीसा वेंधळा स्वभाव, त्याची संकोची वृत्ती, त्याची मजेदार असमर्थता, सामान्य माणसापेक्षा अगदी निराळी अशी त्याची वागणूक, व त्याच्या डोळ्यांतील शहाणपणाचा पण बालसुलभ भाबडा भाव, या सगळ्या गोष्टींमुळे तिला त्याच्याविषयी एकदम आपुलकी वाटू लागली.

मग तिच्या मनात आपल्या मुलासंबंधीचे विचार घोळू लागले. पुन: एकदा मे-दिनाच्या घटनांचा चित्रपट तिच्या अंतश्चक्षूंसमोर सरकू लागला. त्या घटनांना आता नवाच अर्थ प्राप्त झाला होता. त्या दिवसाचं जसं एक खास वैशिष्ट्य होतं, तसंच त्या दिवशी झालेल्या दु:खाचंही खास वैशिष्ट्य होतं. मानेवर जोराचा प्रहार बसला म्हणजे मस्तक जमिनीला टेकतं, तसं या दु:खामुळे होत नव्हतं. ते सतत हृदयात घुसून वारंवार टोचणी देत होतं. त्यामुळे हळूहळू संताप जागृत होत होता आणि वाकलेली पाठ ताठ होत होती.

"आपली मुलं धडाडीने जीवनाच्या संग्रामात उडी घेत आहेत," ती स्वत:शीच म्हणाली.

तिचे असे विचार चालू असतानाच शहरातील रात्रीच्या हालचालींचे अपरिचित आवाज उघड्या खिडकीतून आत येऊन तिच्या कानांत शिरत



होते. त्याचबरोबर बागेतल्या पानांची सळसळही त्या आवाजात मिसळत होती. दुरून आल्यामुळे क्षीण होत होत आत शिरलेले ते आवाज खोलीत आल्यावर हळूच नाहीसे होऊन जात होते.

सकाळी उठताच आईने चहादाणीला पॉलिश केलं, चहाचं पाणी उकळलं, बिलकुल आवाज न होऊ देता मेजावर चहाची तयारी केली व मग ती निकोलायच्या उठण्याची वाट पहात स्वैंपाकघरातच बसून राहिली. बऱ्याच वेळाने निकोलाय उठून आला व त्याने दार उघडलं. तो दारात येऊन उभा राहिला तो खोकत खोकत. त्याने आपला चष्मा काढून एका हातात धरला होता व दुसऱ्या हाताने शर्टची कॉलर धरून ठेवलेली होती. त्याच्या अभिवादनाचा स्वीकार केल्यावर आई उठली व चहादाणी घेऊन ती दुसऱ्या खोलीत गेली. आत निकोलाय तोंड धूत होता, त्याने जमिनीवर पाणी सांडल्याचा व साबण व दातांचा ब्रश खाली पडल्याचा आवाज तिला ऐकू आला. आपल्या वेंधळेपणाबद्दल त्याने स्वत:ला दोष दिला ते शब्दही तिच्या कानी आले.

न्याहारीच्या वेळी त्याने तिला सांगितलं:

"मी म्युनिसिपल बोर्डात नोकरीला असतो. माझं काम फार मनस्ताप देणारं आहे. शेतकऱ्यांचा कसा दिवसेंदिवस सत्यानाश होतो हे रोज पहातो मी.."

पुन: एखाद्या अपराध्याप्रमाणं केविलवाणं स्मित करीत तो पुढे बोलू लागला:

"शेतकऱ्यांना पोटभर अन्न न मिळाल्यामुळे त्यांचं मरण जवळ येत आहे. त्यांची मुलं जन्माला येतात तीच अशक्त व दुबळी असतात त्यामुळे हिवाळ्यात माशा पटापट मरून जातात तशी ती अर्भकंही मृत्युमुखी पडत आहेत. आम्ही हे सर्व उघड्या डोळ्यांनी पाहतो, त्याची कारणंही जाणतो, फार काय हे सर्व प्रकार पाहात राहाण्यासाठीच आम्हाला पगार मिळतो असं म्हटलं तरी चालेल. पण बस, एवढंच, याच्यापुढे काही करता येत नाही आम्हाला!"

"तुम्ही शिकत असता वाटतं?" आईने विचारलं.

"नाही, मी शिक्षक आहे. माझे वडील व्यात्का येथे एका कारखान्याचे मॅनेजर आहेत. मी खेड्यांत शेतकऱ्यांतून वाङ्मयाचा प्रसार करीत असे, त्यासाठी मला तुरुंगवास भोगावा लागला. शिक्षेची मुदत पुरी झाल्यावर मी एका पुस्तकाच्या दुकानात विक्रेत्याचं काम करू लागलो, पण माझ्याच

निष्काळजीपणामुळे मी पुनः पकडला गेलो व मग मला हद्दपार करून आर्खांगेल्स्क येथे माझी रवानगी करण्यात आली. तिथे सुद्धा अधिकाऱ्यांची मजवर खपा मर्जी झाली व त्यांनी मला जहाजात बसवून श्वेतसमुद्राच्या किनाऱ्यावरील एका खेडेगावी पाठवलं. तिथे मी पाच वर्षेपर्यंत स्थानबद्ध होतो."

सूर्यकिरणांनी प्रकाशित झालेल्या त्या खोलीतल्या प्रसन्न वातावरणात त्याच्या बोलण्याचा प्रवाह शांतपणे वहात होता.

आईने आजवर ओकांच्या तोंडून अशाच हकीकती ऐकल्या होत्या, पण स्वतःविषयीची असली माहिती सांगणारे सर्वच जण जणू हे असं व्हायचंच अशा वृत्तीने, अगदी शांत चित्ताने हे सगळं कसं सांगू शकतात याचा तिला कधीच उलगडा झाला नव्हता.

मग निकोलायने आईला सांगितलं,

"आज माझी बहीण येणार आहे."

"लग्न झालेलं असेल ना तिचं?"

"विधवा आहे ती. तिच्या नवऱ्याला सैबेरियात हद्दपार करण्यात आलं होतं. पण तिथून त्याने पळ काढला. अखेर दोन वर्षांमागे तो यूरोपमध्ये क्षयाने वारला."

"ती बहीण तुमची थोरली की धाकटी?"

"माझ्यापेक्षा सहा वर्षांनी वडील आहे ती. तिचे माझ्यावर फार फार उपकार आहेत. तुम्ही तिचं पियानो वाजवणं ऐका न् मग सांगा मला. तो तिचाच पियानो आहे. इथल्या बऱ्याचशा वस्तु तिच्याच आहेत. पुस्तकं मात्र माझी!"

"त्या राहतात कुठं?"

"सगळीकडे—" निकोलायने हसून उत्तर दिलं. "जिथे कुठं शूर व धीराच्या व्यक्तीची गरज असेल तिथे ती जाऊन थडकलीच म्हणून समजा!"

"त्या सुद्धा—हेच कार्य करतात वाटतं?"

"हो तर!" तो उत्तरला.

थोड्या वेळाने तो कामावर निघून गेला. आई त्या 'कार्याचा' व त्या कार्याला सतत वाहून घेणाऱ्या लोकांचा विचार करू लागली. मग तिला वाटू लागलं, रात्रीच्या काळोखात पर्वत सुद्धा खुजा वाटतो. तशीच मी सुद्धा या सर्वांच्या तुलनेने किती खुजी, किती लहान!

दुपारच्या वेळी घंटी वाजल्यावर आईने दार उघडलं तेव्हा काळा पोषाख



घातलेली एक उंच, देखणी स्त्री बाहेर उभी होती. आईला पहाताच तिने हातातली पिवळी पिशवी खाली ठेवून आईशी हस्तांदोलन केलं.

''तुम्ही पावेलच्या आई ना?" त्या स्त्रीने विचारलं.

"हो," आई उत्तरली. पण त्या स्त्रीचे उंची कपडे पाहून तिला अस्वस्थ वाटू लागलं.

त्या स्त्रीने आत प्रवेश केला व आरशासमोर उभे राहून हॅट काढता काढता ती म्हणाली,

"तुम्ही कशा दिसत असाल याबद्दल मी कल्पनेनं जे चित्र रेखाटलं होतं तशाच हुबेहूब आहात हं तुम्ही. तुम्ही इथं राहायला येणार असल्याचं माझ्या भावाने पत्र लिहून कळवलं होतं मला. अन् पावेलशी फार दिवसांपासून माझी मैत्री आहे बरं का. त्यानेही तुमच्याविषयी सांगितलं होतं मला."

तिचा आवाज घोगरा होता व तिचं बोलणं संथपणाचं होतं. पण बाकीच्या तिच्या हालचाली चपळतापूर्ण व दणकट होत्या. तिच्या भुऱ्या रंगाच्या डोळ्यांत यौवनाची चमक होती, पण तिच्या कानशिलांवर सूक्ष्म रेषा होत्या व नाजुक कानांच्या वरच्या बाजूला रुपेरी केस चमकत होते.

"मला भूक लागली आहे. एक कप कॉफी मिळू शकेल ना?" ती म्हणाली.

"हो, आत्ता करतेच!" आई म्हणाली. तिने कॉफीचं सामान काढण्यासाठी कपाटाकडे जाता जाता विचारलं, "पावेल माझ्याबद्दल तुमच्याजवळ बोलला होता म्हणता?"

"हो, पुष्कळदा!"

त्या स्त्रीने एक चामड्याची सिगारेटची डबी काढून एक सिगारेट पेटवली व खोलीत येरझारा घालीत आईला विचारलं, "त्याचं काय होईल याची तुम्हाला फार काळजी वाटते का?"

कॉफीचं आधण ठेवलं होतं त्या स्टोवच्या निळ्या ज्योतीकडे पहात आईने स्मित केलं. त्या स्त्रीच्या सान्निध्यात तिला जो संकोच वाटत होता तो या मुलाबद्दलच्या बोलण्याच्या आनंदात पार नाहीसा झाला.

आई स्वतःशीच म्हणाली, 'तर त्याने माझ्याबद्दल हिला सांगितलं म्हणायचं! खरंच किती चांगला मुलगा आहे पाशा!' मग तिथे संथपणे त्या स्त्रीच्या प्रश्नाचं उत्तर दिलं:

"हो, मला काळजी वाटते हे खरं आहे. मला जडच जातं हे. पण हे काही काळ अगोदर घडलं असतं तर मग मला फारच कठीण गेलं असतं. आता निदान मला एवढी तरी जाणीव आहे की तो काही एकटा नाही."

त्या स्त्रीच्या चेहऱ्याकडे पहात आईने तिला विचारलं :

"तुमचं नाव काय?"

"सोफिया," उत्तर आलं.

आईने तिचं सूक्ष्म अवलोकन केलं. ही स्त्री खरोखर विलक्षण होती. फारच धीराची बाई! अन् लगबग तरी किती!

"सगळ्यात महत्त्वाची गोष्ट अशी की त्या सर्वांची शक्य तितक्या लवकर सुटका व्हायला हवी!" सोफिया दृढ आत्मविश्वासाने बोलत होती. "त्यांचा खटला लवकर सुरू झाला म्हणजे बरं. त्यांना एकदा हद्दपार केलं की लगेच पावेलला तेथून निसटता येईल अशी आम्ही व्यवस्था करू. त्याची इथे फार गरज आहे."

आईला काय म्हणावं ते कळेना. ती सोफियाकडे नुसती पहात राहिली. सोफिया सिगारेट विझवण्यासाठी काही दिसतंय का हे शोधत होती. अखेर तिने एका कुंडीतल्या मातीतच सिगारेट विझवली.

"अशाने फुलं खराब होतात!" आईच्या तोंडून शब्द निघून गेले.

"माफ करा अं!" सोफिया म्हणाली. "निकोलाय सुद्धा नेहमी तेच सांगतो मला."

तिने विझविलेल्या सिगारेटचा तुकडा खिडकीतून बाहेर फेकून दिला.

आईलाच लाजल्यासारखं होऊन तिने क्षमायाचनेचा एक दृष्टिक्षेप सोफियाकडे टाकला व ती म्हणाली :

"माफ करा अं. माझ्या तोंडातून निघून गेले ते शब्द! तुम्ही काय करावं हे मी सांगायला नको होतं."

"का नाही? मी किती वेंधळी आहे!" सोफिया खांदे उडवून म्हणाली. "बरं पण कॉफी झाली असेल ना? छान! पण हे काय? एकच कप? तुम्ही नाही घेणार कॉफी?"

तिने एकदम आईचे खांदे धरून तिला जवळ ओढलं व तिच्या नजरेला नजर भिडवून ती म्हणाली,

"तुम्हाला संकोचल्यासारखं वाटतं का?"

आई हसून म्हणाली,



"मी तुम्हाला सिगारेटबद्दल बोलून गेले, त्यामुळे मला साहाजिकच लाज वाटली. पण हे पहा," आई स्वतःला वाटणारं आश्चर्य लपविण्याचा यत्न न करता म्हणाली, "मी कालच इथे आले, पण एवढ्यातच मला हे घर स्वतःच्या घरासारखं वाटू लागलंय! मला कशाची भीती वाटत नाही, काही नाही! त्यामुळेच मी आपली जे मनात येतं ते बोलून जाते..."

"मग ते चांगलं की! असंच वाटायला हवं!" सोफिया उद्गारली.

"माझं डोकं गरगरा फिरल्यासारखं होतं अन् मग मला काहीच भान राहात नाही," आई स्पष्टीकरण देऊ लागली. "एक काळ असा होता की माझा कोणाशीही अगदी दाट परिचय होऊन चांगली पक्की ओळख पटल्याशिवाय मी कधी स्वतःचं अंतःकरण उघडं करून दाखवायची नाही, पण आता नेहमीच मी मोकळेपणाने बोलत राहाते! अन् पूर्वी कधी स्वप्नात सुद्धा जे बोलण्याचा मला धीर झाला नसता ते आता मी आपली खुशाल बोलून टाकते!"

सोफियाने दुसरी सिगारेट काढून पेटवली व आईच्या चेहऱ्यावर आपले तेजस्वी नेत्र रोखून ती पाहू लागली.

आईनेच तिला विचारलं :

"तुम्ही म्हणालात की तुम्ही त्याच्या निसटून येण्याची व्यवस्था कराल. पण मग त्याची राहाण्याची काय सोय? पळून आलेल्या कैद्याला उघडपणे कसं राहाता येईल?"

बराच वेळपासून आईला ही शंका भेडसावीत होती ती तिने विचारून टाकली.

"ते काही कठीण नाही," कपात आणखी कॉफी ओतून घेत सोफिया म्हणाली. "असे अनेक पळून आलेले लोक राहाताहेत तसाच तोही राहील. आत्ताच अशा एका माणसाला भेटून त्याची राहायची जागा मी दाखवून आले. त्या माणसाचीही फार आवश्यकता आहे. त्याला पाच वर्षांची हद्दपारीची शिक्षा झाली होती, पण त्याने फक्त साडेतीन महिनेच तिकडे काढले."

आईने थोडा वेळ तिच्याकडे पाहिलं व स्मित केलं. मग मान हालवून ती म्हणाली, "त्या मे-दिनाने माझ्यात काही तरी मोठाच बदल घडवून आणलायसं दिसतं. मला काहीच कळेनासं झालंय. असं वाटतं की मी एकाच वेळी दोन निरनिराळ्या रस्त्यांवरून चालले आहे. कधी कधी सगळ्या

गोष्टींचं आकलन होऊ लागल्यासारखं वाटतं; पण मग एकदम सगळीकडे धुकं पसरल्यासारखं अंधुक अंधुक दिसू लागतं. तुमचंच पहा, एवढया मोठ्या घरच्या तुम्ही, पण या कार्यात पडला आहात... माझ्या पावेलला तुम्ही ओळखता, त्याची प्रशंसा करता... मी खरोखरच आभारी आहे तुमची त्याबद्दल."

"अं हं! आभार मानायला हवेत ते तुमचे!" सोफिया हसून उत्तरली.

"मी? मी काय केलं असं? त्याला हे सगळं मी शिकवलेलं नाही!" आई उसासा टाकून म्हणाली.

सोफियाने काही न बोलता एका बशीत सिगारेट विझवली व आपल्या डोक्याला असे जोराचे झटके दिले की तिचे विपुल सोनेरी केस मोकळे सुटून तिच्या कमरेपर्यंत लोंबू लागले.

"मला आता हे सगळे भारी कपडे बदललेच पाहिजेत!" असं बोलून सोफिया उठली व बाहेरच्या खोलीत निघून गेली.

## ३

तिसऱ्या प्रहरी निकोलाय कामावरून घरी परत आला. ते सर्वजण भोजनाला बसल्यावर सोफियाने हसत हसत त्या दिवशी बजावलेल्या कामगिरीचा अनुभव सांगितला. हद्दपारीतून पळून आलेल्या माणसाची आपली भेट कशी झाली व आपण त्याला त्याच्या लपून राहण्याच्या जागी कसं पोचवलं, आपल्याला गुप्त हेरांच्या पाठलागाची सारखी भीती कशी वाटत होती व त्यामुळे प्रत्येकाकडेच आपण संशयाने कसं पाहिलं व तो पळून आलेला माणूस कसा हास्यास्पद वागत होता, हे सर्व तिने गंमतीने वर्णन केलं. आईला तर तिच्या या सांगण्यात आत्मप्रौढीचाही वास आला. एखाद्या कामगाराने एखादी कठीण कामगिरी यशस्वी रीतीने पार पाडल्याची हकीकत स्वतः सांगावी, तसंच सोफिया सांगत असल्यासारखं आईला वाटलं.

यावेळी सोफियाने उन्हाळ्याला योग्य असा भुऱ्या रंगाचा पेहेराव केला होता. गुडघ्यापर्यंतच्या झग्याऐवजी तिने पायघोळ झगा घातला होता. त्या पोषाखात ती अधिकच उंच भासत होती, तिचे डोळे अधिकच काळेभोर दिसत होते व तिच्या हालचालीतही एक प्रकारची स्थिरता व सौम्यता आली होती.

जेवणानंतर निकोलाय तिला म्हणाला:



"आणखी एक कामगिरी तुझी वाटच पहातेय, सोफिया. शेतकऱ्यांसाठी एक वर्तमानपत्र काढायचं आम्ही कबूल केलं होतं हे मी तुला मागेच सांगितलं आहे. पण या सगळ्या धरपकडीमुळे ज्या माणसाच्या मार्फत त्याचं वाटप करायचं, त्याच्याशी आपला संबंध तुटला. त्या माणसाचा शोध करण्यात आपल्याला आता फक्त यांचीच मदत होऊ शकेल."

हे बोलताना त्याने आईकडे अंगुलिनिर्देश केला व मग तो बहिणीला म्हणाला,

"तेव्हा तुला आता यांच्याबरोबर प्रवासाला जाऊन ते काम करायला हवं. अन् ते सुद्धा शक्य तितक्या लवकर."

"ठीक आहे," सोफिया सिगारेटचा झुरका घेत म्हणाली. ती आईकडे वळून म्हणाली, "आपण जाऊ या ना?"

"जाऊ की."

"फार दूर जावं लागणार आहे का?"

"असेल तीस कोस."

"ठीक. आता मी थोडा संगीताचा आस्वाद घेईन म्हणते. मी थोडा वेळ पियानो वाजवला तर तुम्हाला त्रास होणार नाही ना, निलोव्ना?"

"माझी काळजी करू नका तुम्ही. जणू मी इथे नाहीच असं समजून चाला तुम्ही."

इतकं बोलून आई कोचाच्या एका कोपऱ्यात अंग चोरून बसली.

ते बहीणभाऊ आईकडे लक्ष न दिल्यासारखं करीत होते, पण तरीसुद्धा ते मोठ्या चातुर्याने मधून मधून तिला आपल्या संभाषणात सामील करून घेत होते.

"हे ऐक अं, निकोलाय," सोफिया म्हणाली. "हे ग्रीगचं संगीत आहे. आजच हे कागद बरोबर आणलेत मी. अन् खिडक्या बंद कर पाहू!"

सोफियाने ते कागद उघडून समोर ठेवले व ती आपल्या डाव्या हाताने हलकेच मंद स्वर काढू लागली. क्षणार्धातच पियानोतून संगीताच्या लहरी निघू लागल्या. प्रथम एक तीव्र सूर बाहेर पडला व त्यापाठोपाठ एक उसाशासारखा हलका सूर त्यात मिसळला. तिच्या उजव्या हाताची बोटंही सफाईने पियानोवर फिरू लागली आणि भयभीत झालेल्या पक्ष्यांप्रमाणे ते स्वर इकडून तिकडे धावपळ करीत एकमेकांशी टक्कर घेत विलक्षण परिणामकारक अशा संगीताचे सूर निर्माण करू लागले.

"सुरुवातीला त्या संगीताचा आईवर काहीच परिणाम दिसून आला नाही. हे संगीत म्हणजे तिच्या दृष्टीने ध्वनीचा एक कोलाहल होता. सुरांच्या गुंतागुंतीच्या रचनेतील माधुर्याचं रसग्रहण करणं तिच्या श्रवणेंद्रियांच्या सामर्थ्याच्या पलिकडचं होतं. एखादं स्वप्न पाहात असावं अशा नजरेने ती कोचाच्या दुसऱ्या कोपऱ्यात बसलेल्या निकोलायकडे पहात होती. तो पालथी मांडी घालून बसलेला होता व सोफियाच्या रेखीव आकृतीवर त्याची नजर खिळलेली होती. सूर्याच्या किरणांनी सोफियाचं मस्तक व खांदे प्रकाशमान केले होते व तेथून ती पियानोच्या पट्टयांवर सफाईने फिरणाऱ्या तिच्या बोटांवर पडली होती. संगीताचा आवाज मोठा होत होत सारी खोली संगीतमय होऊन गेली व आईच्या नकळत त्या संगीताने तिच्या अन्तःकरणाचा ठाव घेतला.

अन् मग कां कुणास ठाऊक तिच्या अन्तरंगात दडून बसलेल्या स्मृतींच्या खोल गर्तेतून अत्यंत दुःखद आठवण वर उफाळून आली व आजवर विस्मृतीत गडप झालेल्या त्या प्रसंगाचं चित्र स्पष्टपणे तिच्या मनःचक्षूंसमोर दिसू लागलं.

एक दिवस रात्री पुष्कळच उशीरा तिचा नवरा दारूच्या नशेत तर्र होऊन घरी परत आला. घरी येताच त्याने तिला अंथरुणातून खेचून खाली जमिनीवर आपटलं व तिच्या पेकाटात लाथ मारली.

"चल, चालती हो! रांडे! जा! कंटाळलो तुला मी! जा, नीघ इथून!" तो खेकसला.

त्याच्या लाथाबुक्क्यांपासून बचाव करण्यासाठी म्हणून तिने आपल्या दोन वर्षांच्या मुलाला उचलून ढालीप्रमाणे समोर धरलं व ती गुडघे टेकून बसली. ते मूल बिचारं घाबरून आक्रोश करू लागलं होतं व त्याचं उघडं-नागडं शरीर तिच्या हातून सुटण्यासाठी धडपडत होतं.

"जा! नीघ! चालती हो!" तिचा नवरा पुनः गरजला.

पेलाग्येया पटकन् उभी राहिली. लगबगीने स्वयंपाकघरात जाऊन एक जाकिट तिने खांद्यावर टाकलं, मुलाला एका शालीत गुंडाळून घेतलं व चुपचाप, एका अक्षरानेही तक्रार न करता व आरडाओरड न करता, रात्रीच्या पोषाखात, अनवाणी पायांनी ती बाहेर पडली. ते मे महिन्याचे दिवस होते व रात्रीचा गारठा बराच होता. रस्त्यावरची धूळ तिच्या पायांना चिकटून बोटांत अडकून राहात होती. तिच्या कडेवरचं मूल रडत होतं व



हातपाय झटकीत होतं. तिने त्या लेकराला जाकिटाच्या आत आपल्या शरीराशी बिलगून घेतलं व ती रस्त्यावरून लगबगीने जात होती. मुलाला गप्प करण्यासाठी म्हणून ती तोंडाने म्हणत होती :

"ओ ऽऽऽ ओ ऽऽ ओ ऽऽ"

तितक्यात पहाट होण्याची चिन्हं दिसू लागली. आपल्या अंगावर धड कपडेही नाहीत अशा अवस्थेत कुणाच्या दृष्टीस पडू नये या उद्देशाने ती दलदलीच्या किनाऱ्याशी ॲस्पन वृक्षाखाली बसून राहिली. बराच वेळपर्यंत ती तिथेच बसून होती. ती डोळे उघडे ठेवून काळोखात नजर लावून बसली होती. झोपेने पेंगुळलेल्या मुलाला शांत करण्यासाठी ती तोंडाने 'ओ ऽऽ' करीत होती, त्या आवाजाने तिच्या अन्तःकरणातल्या जखमेवरही किंचित् फुंकर घातल्यासारखं तिला वाटत होतं.

अचानक एक काळा पक्षी फडफड करीत उडत गेला. त्या फडफडण्याच्या आवाजाने ती एकदम खडबडून जागी झाली व ताडकन् उठून उभी राहिली. तिचं सर्वांग थंडीने कापत होतं, तरी ती तशीच घराकडे निघाली. घरी गेल्यावर तीच मारहाण, तसंच अपमानास्पद जिणं हे दिसत असूनही तिला दुसरी गतीच नव्हती...

आईचं मन अशा प्रकारे गतायुष्यातील त्या स्मृतींत मग्न असताच पियानोवरील सुरावटीचे अखेरचे सूर वाजले व थंडगार निःश्वासाप्रमाणे ते संगीत वातावरणात विलीन होऊन बंद पडले.

सोफियाने भावाकडे वळून त्याला विचारलं,

"तुला आवडलं?"

"फारच सुरेख होतं!" झोपेतून जागा झाल्याप्रमाणे तो उद्‌गारला व पुनः म्हणाला "खरंच, फारच सुरेख!"

पूर्वायुष्यातील स्मृतींचे पडसाद अजूनही आईच्या हृदयात रेंगाळत होते, पण जाणिवेच्या पातळीच्या एका कडेला एक नवाच विचार तिच्या मनात घर करीत होता :

"या जगात सुखासमाधानाने, प्रेमाने जगणारे लोक आहेत तर! आपल्या त्या अंधःकारमय जगातल्या लोकांप्रमाणे हे लोक आपापसांत भांडणं, शिव्यागाळी करीत नाहीत, दारू पिऊन धुंद होत नाहीत, भाकरीच्या प्रत्येक तुकड्यासाठी भांडत नाहीत..."

सोफियाने एक सिगारेट शिलगवली. ती सारखी झुरके घेऊन धूर काढीत होती.

"हे गीत कोस्त्याला फार आवडायचं," ती म्हणाली. तिने एक मोठा झुरका घेतला व पुनः पियानोवर बोटं फिरवून एका मंद, शोकपूर्ण सुरावटीचे सूर काढले.

"त्याला वाजवून दाखवायला किती आवडायचं मला! तोही किती संवेदनाक्षम होता! प्रत्येक गोष्टीला त्याच्याकडून साद मिळायचीच! त्याचं हृदय भावनांच्या आवेगाने भरून यायचं!"

"आपल्या पतीची आठवण करताना दिसतेय!" आई स्वतःशीच म्हणाली. "पण तिच्या चेहऱ्यावरचं स्मित कायम आहे..."

"किती सुखात ठेवलं त्याने मला!" सोफिया पुनः बोलू लागली. मग अत्यंत भावुकतेने, मृदु स्वरात ती उद्‌गारली, "जगावं कसं हे त्याला पूर्ण उमगलं होतं!"

"खरंच आहे ते," निकोलायने दाढी खाजवीत संमतिदर्शक उद्‌गार काढले. तो पुढे म्हणाला, "त्याचा आत्माच संगीतमय होता!"

सोफियाने नुकतीच पेटवलेली सिगारेट फेकून दिली व ती आईकडे वळून म्हणाली,

"माझ्या या गोंगाटाचा तुम्हाला त्रास तर होत नाही ना?"

आईला आपली कटुता लपवता आली नाही. ती म्हणाली,

"माझ्याकडे लक्षच देऊ नका तुम्ही. मला संगीतात मुळीच गम्य नाही. मी आपली इथं बसून ऐकते आहे एवढंच. पण माझं मन माझ्या स्वतःच्या निराळ्याच विचारांत गुंतलेलं आहे."

"पण तुम्हाला संगीताचा आस्वाद घेता यावा अशी माझी इच्छा आहे. कुठल्याही स्त्रीला संगीत समजायलाच हवं, विशेषतः ती दुःखी न् उदास असेल तेव्हा तर हवंच हवं."

सोफियाने पियानोच्या पट्ट्यांवर इतका तीव्र आघात केला की, कुणीतरी एखादी भयंकर बातमी ऐकून किंकाळी फोडावी तसे सूर त्या वाद्यातून बाहेर पडले. असा कर्णकटु व हृदयद्रावक आक्रोश सुरू करून त्यापाठोपाठ लगेच त्या वाद्याने त्या किंकाळीला साद घालणारे हलके सूरही काढले. मग पुनः एक जोराचा आवाज निघाला व त्यात सारे सूर मिसळून गेले. कसला तरी भयंकर प्रकार घडला असल्यासारखं वातावरण निर्माण झालं,



पण त्याचा परिणाम दयाभाव उत्पन्न करण्यात न होता चीड निर्माण करण्यात होत होता. एवढं होतं न होतं तोच एक सुरेख, आल्हादकारक सुरावट बाहेर पडली व त्यामुळे सर्व वातावरण शांत व प्रसन्न होऊन गेलं.

त्या बहीणभावंडांना धन्यवाद देण्याची आईला तीव्र इच्छा झाली. त्या संगीताने ती धुंद झाली होती. आपण या दोघांच्या उपयोगी पडू शकू या विश्वासाचं निदर्शक स्मित तिच्या चेहऱ्यावर उमटलं.

तिने भोवताली नजर टाकली. आपल्याला काय करणं शक्य होईल? मग तिच्या डोक्यात काहीतरी विचार आला. ती हळूच उठून स्वयंपाकघरात गेली व तिने चहाचं आधण ठेवलं.

पण त्या दोघांच्या उपयोगी पडण्यासाठी काहीतरी करण्याची तिची इच्छा होती, ती नुसता चहा करून देण्याने पूर्ण झाली नाही. चहादाणीतून चहा ओतीत असताना ती हसत म्हणाली,

"त्या अंधःकारमय जीवनातले लोक आम्ही. आम्हाला सारं काही समजतं, पण बोलून दाखवणं फार कठीण जातं, अन् आम्हाला लाज वाटते, कारण की सगळं कळतं पण ते शब्दांत मांडता येत नाही. मग पुष्कळदा या शरमेमुळे आम्हाला आमच्या विचारांचाच तिटकारा येतो. जीवन चहूबाजूंनी आम्हाला ढुसण्या देत राहातं, आम्हाला विश्रांतीची गरज भासते, पण आमच्या विचारांच्या दडपणामुळे ते सुखही लाभत नाही."

निकोलाय आपला चष्मा पुशीत पुशीत हे ऐकत होता, तर सोफिया आपले मोठाले डोळे विस्फारून आईकडे पहात होती. हातातल्या जळत्या सिगारेटचंही तिला भान नव्हतं. ती अजून पियानोजवळच बसलेली होती. ती भावाकडे अर्धवट वळलेली होती व मधून तिची बोटंही अगदी सहजपणे पियानोवरून फिरत मंद स्वर काढीत होती. आई आपल्या भावना ज्या शब्दांनी व्यक्त करीत होती, त्या साध्या, सरळ, थेट अन्तःकरणापासून निघालेल्या शब्दांत ते संगीत सार्थपणे मिसळून जात होतं.

आई पुढे म्हणाली :

"आज आता मी माझ्या स्वतःविषयी व सगळ्याच लोकांविषयी बोलू शकते याचं कारण म्हणजे मला आता पुष्कळ समजू लागलं आहे. मी तुलना पण करू शकते. पूर्वी, आमच्या जीवनाची कशाशी तुलना करायला दुसरं असं जीवन पाहिलेलंच नव्हतं मी. आम्ही राहात होतो त्या जगात सगळे सारखंच जिणं जगतात. पण आता दुसरे लोक कसे जगतात हे पाहिलं

म्हणजे माझ्या त्या पूर्वीच्या जिण्याची आठवण होते, अन् मग ते फारच कटू वाटतं–"

आईने आपला आवाज जरा हळू केला व ती पुनः बोलू लागली :

"मला ते सर्व नीट सांगता येत नसेल, अन् तुम्हाला ह्यात काही नवीन नसल्यामुळे हे सगळं बोलण्यात अर्थ नाही असंही वाटत असेल–"

तिचा गळा दाटून आला होता पण त्या दोघा बहीणभावांकडे पहाताना तिचे नेत्र चमकत होते.

ती म्हणाली, "मला माझं अन्तःकरण तुमच्यापुढे खुलं करायचं आहे. तुमच्याविषयी मला काय वाटतं, तुम्ही सुखी व्हावं असं मला किती परोपरीने वाटतं, हे तुम्हाला कळायलाच हवं असं वाटूनच मी बोलते आहे."

"आम्ही जाणतो ते," निकोलाय म्हणाला. त्याच्या स्वरात कमालीचं मार्दव होतं.

आपलं अन्तःकरण खुलं करण्याची तिची इच्छा अजूनही तृप्त झाली नव्हती. ती सारखी बोलत होती. तिला जे जे नवीन व फार महत्त्वाचं वाटलं ते सर्व ती बोलून दाखवीत होती. आपलं दुःखपूर्ण आयुष्य, आपण निमूटपणे भोगलेला छळ, हालअपेष्टा, या सर्वांचं तिने वर्णन केलं. त्या बोलण्यात कुठलीही कटुता वा चीड नव्हती, पण एक प्रकारचं कारुण्य मात्र तिच्या ओठांच्या हालचालीतून व्यक्त होत होतं. हालअपेष्टांनी भरलेल्या तिच्या पूर्वीच्या जीवनाचा चित्रपटच जणू ती त्यांच्यासमोर दाखवीत होती. आपल्या पतीकडून वारंवार अगदी क्षुल्लक कारणासाठी सुद्धा कसा मार खावा लागे हेही तिने सांगून टाकलं व तो छळ बंद करण्याला आपण असमर्थ कसं ठरत होतो याबद्दल आता तिचं तिलाच वाटणारं आश्चर्यही तिच्या बोलण्यातून व्यक्त झालं.

निकोलाय व सोफिया दोघेही अगदी लक्षपूर्वक तिची कहाणी ऐकत होती. जिला निव्वळ जनावराप्रमाणे लेखण्यात आलं व जिने स्वतःही तसल्या वागवणुकीपुढे निमूटपणे मान वाकवली, अशा त्या स्त्रीच्या जीवनकथेचा सखोल अर्थ ध्यानी येऊन त्या दोघांना दिङ्मूढ झाल्यासारखं वाटलं. तिची ही कहाणी म्हणजे या पृथ्वीतलावरील बहुसंख्य लोकांच्या जीवनाची कहाणी होती. तिचं जीवन हे अगदी सामान्य जीवन जगणाऱ्या सामान्य लोकांचंच प्रतीक होतं व तिच्या मुखाने जणू काय जगातील ही सर्व दलित जनताच आपलं दुःख बोलून दाखवीत होती.

निकोलायने आपल्या हाताचे कोपरं मेजावर ठेवून तळव्यांवर हनुवटी



टेकवली होती व आपले डोळे बारीक करून चष्म्यांच्या भिंगांतून तो तिच्याकडे पहात होता. सोफिया खुर्चीवरच रेलून बसली होती व मधूनमधून अंगावर शहारे आल्यासारखे करून मान हालवीत होती. तिचा चेहरा बारीक व फिकट झाल्यासारखा भासत होता व तिचं धूम्रपानही अजिबात बंद होतं.

पेलाग्येया बोलायची थांबल्यावर सोफिया आपली नजर जमिनीवर खिळवून संथपणे बोलू लागली :

"एके काळी मी स्वतःला फार मोठी अभागिनी समजत होते. आपली शुद्ध जाऊन काहीतरी भयंकर स्वप्न पहावं तशी माझी अवस्था झाली होती. मी हद्दपार होऊन एका लहानशा गावी राहात होते तेव्हाची गोष्ट आहे ती. मला काही उद्योग नव्हता व स्वतःखेरीज दुसरा विचाराचा विषयही नव्हता. वेळ घालवण्यासाठी म्हणून मी माझ्यावर आलेल्या दुःखद प्रसंगांची मनात उजळणी करू लागलं. माझं ज्याच्यावर प्रेम होतं त्या जन्मदात्या पित्याशी माझं भांडण झालं होतं. मला शाळेतून काढून टाकून एक वाईट मुलगी म्हणून माझं उदाहरण विद्यार्थ्यांपुढे ठेवण्यात आलं होतं. नंतर मला तुरुंगात डांबण्यात आलं, एका निकटच्या मित्राने माझा विश्वासघात केला, माझ्या पतीला अटक करण्यात आली, मला पुनः तुरुंगात डांबून हद्दपार करण्यात आलं. नंतर माझे पती मरण पावले. ते सगळे प्रसंग आठवून मला वाटे की जगात सर्वांत दुःखी कुणी असेल तर मीच. पण आता तुमच्या दुःखाची जी कहाणी तुम्ही सांगितली ती ऐकून असं वाटतं की माझ्या साऱ्या दुःखाची व हालअपेष्टांची बेरीज करून तिची दसपट केली तरी ती तुमच्या दुःखाने भरलेल्या जीवनाच्या फार तर एका महिन्यातल्या दुःखाची बरोबरी करू शकेल. तुमचं जीवन म्हणजे नित्याच्या हालअपेष्टांनी व छळाने भरलेलं होतं, अन् तेही वर्षानुवर्षं चाललेलं! खरंच, इतका छळ न् इतकं दुःख सहन करायची शक्ती तरी कुठून येते माणसांना?"

"त्या जीवनाची सवयच होऊन जाते, दुसरं काय!" आई उसासा टाकून उद्‌गारली.

"मी पुष्कळदा अशी प्रौढी मारतो की जीवन म्हणजे काय हे मला चांगलं माहीत झालं आहे," निकोलाय विचारमग्न होऊन बोलू लागला. "पण आता तुम्ही वर्णन केलेत तसले स्वतःचे अनुभव कोणी सांगितले म्हणजे ते पुस्तकातल्या वर्णनांपेक्षा, माझ्या स्वतःच्या अर्धवट अशा कल्पनाचित्रापेक्षा, फार फार भयंकर दिसू लागतात. अन् दिसायला अगदी क्षुल्लक,

किरकोळ भासणाऱ्या गोष्टीच इतक्या भयंकर असतात–अशा क्षुल्लक, किरकोळ भासणाऱ्या क्षणांचीच वर्षं होत जातात!"

त्याचं हे बोलणं बराच वेळ चाललं होतं. आईने वर्णन केलेल्या अंधःकारमय जीवनाची सांगोपांग चर्चा होत होती. आईच्या पूर्वायुष्यातल्या पुसट झालेल्या अनेक स्मृती बाहेर पडत होत्या. तरुणपणाच्या जीवनात रोज तिच्या वाटयाला येणाऱ्या हालअपेष्टा व अपमानाच्या आठवणी ती एकामागून एक सांगत होती.

अखेर तीच म्हणाली, "पण मी आपली माझीच कहाणी सांगत बसलेय! आता पुष्कळ रात्र झालीय, सांगेन म्हटलं तरी सगळं सांगून केव्हाच पुरं व्हायचं नाही! तुमची झोपायची वेळ पण होऊन गेली."

त्या बहीणभावांनी मग काही न बोलता तिचा निरोप घेतला. निकोलायने नेहमीपेक्षा अधिकच लवून तिला अभिवादन केलं व हस्तांदोलन करतानाही प्रेमाने तिचा हात दाबला. सोफिया तिच्याबरोबर उठून तिला तिच्या खोलीपर्यंत पोचवून आली. तिथून जाताना सोफिया म्हणाली,

"आता विश्रांती घ्यायला हवी तुम्ही."

तिच्या आवाजातून तिचा प्रेमळ भाव व सहानुभूती व्यक्त होत होती व तिची स्नेहपूर्ण नजर आईच्या चेहऱ्यावर खिळलेली होती.

"तुमच्या या सद्‌भावनेबद्दल धन्यवाद!" आई उद्‌गारली.

## ४

यानंतर थोडे दिवस गेले. एक दिवस आई व सोफिया दोघीजणी गरीब खेडवळ बायांचे पोषाख करून निकोलायसमोर येऊन उभ्या राहिल्या. त्यांनी जुने सुती कपडे व जाकिटं घातलेली होती, पाठीवर पिशव्या घेतल्या होत्या व हातात काठ्या होत्या. या पोषाखात सोफिया थोडी ठेंगणी भासत होती व तिचा फिकट चेहराही नेहमीपेक्षा अधिक गंभीर दिसत होता.

त्या दोघी निकोलायचा निरोप घेऊन जायला निघाल्या तेव्हा त्याने प्रेमाने सोफियाचा हात दाबून तिला निरोप दिला. त्या बहीणभावांचे संबंध आईच्या दृष्टीने फारच वाखाणण्याजोगे होते. ती दोघे एकमेकांशी फार प्रेमाने संभाषण करताना वा एकमेकांना कुरवाळताना दिसत नसत, पण परस्परांची ती सतत काळजी वाहात. आई पूर्वी राहात होती तिथला प्रकार



याच्या उलट होता. तिथे लोक एकमेकांवर प्रेमाच्या लडिवाळ शब्दांचा व चुंबनांचा वर्षाव करीत, पण प्रत्यक्षात मात्र ते परस्परांचा द्वेष करीत व वेळीप्रसंगी एकमेकांवर चवताळलेल्या कुत्र्यांप्रमाणे तुटून पडायलाही ते कमी करीत नसत.

त्या दोघी बाहेर पडल्या तेव्हा काहीही न बोलता शहराचे रस्ते पार करून बाहेर शेतांत पोचल्या व मग दोन्ही बाजूला बर्च वृक्षांच्या रांगा असलेल्या खडबडीत, वेडयावाकडया वाटेने बरोबर चालू लागल्या.

"तुम्ही दमून जाल, नाही?" आईने सोफियाला विचारलं.

"मी पायी पुष्कळ प्रवास केलेला आहे. मला सवय आहे चालायची."

मग सोफिया मोठ्या खुषीत येऊन बोलू लागली. जणू काय लहानपणच्या खोड्या व दंगामस्तीच्या गोष्टी सांगाव्या तशी ती आपल्या क्रांतिकारक चळवळीतल्या कार्याच्या हकीकती सांगू लागली. अनेकदा ती खोटी नावं धारण करून व बनावट पासपोर्ट घेऊन हिंडली वावरली होती. अनेकदा बेमालूम वेषांतर करून तिने गुप्त हेरांच्या हातावर तुरी दिल्या होत्या, गुप्त वाङ्मयाचे गठ्ठे गावोगावी पोचवले होते, हद्दपार झालेल्या कॉमरेड्सच्या निसटून जाण्याची व्यवस्था करून त्यांच्याबरोबर जाऊन त्यांना परदेशात नेऊन पोचविण्याचीही कामगिरी पार पाडलेली होती. एकदा तर तिच्या राहात्या घरातच गुप्त छापखाना होता. पोलिसांनी अचानक छापा घालून तो पकडला तेव्हा ती मोलकरणीचा वेष करून पोलिसांच्या अंगावरून फाटकातून बाहेर पडून निसटली. त्या दिवशी कडाक्याची थंडी पडलेली होती व तिच्या अंगावर अगदी साधे सुती कपडे व डोक्यावर एक सुतीच रुमाल होता, पण तरीसुद्धा ती जणू काय केरोसीन आणायला निघाल्याचा आव आणून हातात तेलाचा डबा घेऊन सबंध शहराचे रस्ते ओलांडून निघून गेली!

सोफियाने दुसऱ्या एका अशाच प्रसंगाची हकीकत सांगितली. ती एका दुसऱ्या गावी काही मित्रांच्या भेटीसाठी गेली होती. त्या लोकांच्या घरापाशी जाऊन पायऱ्या चढून ती वर गेली तो त्या घराची झडती सुरू असल्याचं तिला आढळलं. ती इतकी वर पोचली होती की आता परत फिरणंही शक्य नव्हतं. म्हणून तिने खालच्या मजल्यावरील बिऱ्हाडाची घंटी वाजवली व सरळ आपल्या सामानासहित त्या घरात घुसून त्या अनोळखी कुटुंबाची पाहुणी म्हणून राहाण्याचा निर्धार जाहीर केला. आपण का आत शिरलो हे सरळ स्पष्टपणे सांगून टाकून ती त्या लोकांना म्हणाली:

"तुम्हाला पाहिजे तर तुम्ही खुशाल मला पोलिसांच्या हवाली करा, पण तुम्ही तसं करणं शक्य नाही असा माझा विश्वास आहे."

त्या कुटुंबातले लोक इतके भयभीत झाले की रात्री कोणत्याही क्षणी दारावर थाप पडेल या कल्पनेने त्यांनी सारी रात्र जागून काढली. पण तसं काही घडलं नाही व त्या लोकांनी तिला पोलिसांच्या स्वाधीन करण्याचा विचारही मनात आणला नाही. उलट सकाळी त्यांनी हसत हसत त्या विलक्षण अनुभवाची तिच्याशी चर्चा केली व तिला प्रेमाने निरोप दिला.

आणखी एकदा तिने जोगिणीचा वेष करून आगगाडीतून प्रवास करताना तिचा पाठलाग करणाऱ्या गुप्त हेराच्या डब्यात बसून त्याच्याशी गप्पागोष्टीही केल्या. त्या इसमाने आपण सोफिया नावाच्या बाईचा तिला नकळत पाठलाग करीत असल्याची बढाईही मारली. त्याने तिला सांगितलं की ती बाई दुसऱ्या वर्गाच्या डब्यातून प्रवास करीत आहे. प्रत्येक स्टेशनवर खाली उतरून तो सगळ्या डब्यातून डोकावून येई व मग सांगे, "काही दिसली नाही कुठं. बहुधा झोपली असावी. थकली असेल बिचारी! या लोकांचं जीवनही आमच्यापेक्षा काही कमी खडतर नसतं!"

सोफिया आपले हे अनुभव सांगत असता आई सारखी हसत होती व सोफियाकडे कौतुकाने पहात होती. सोफियाची अंगकाठी उंच अन् किडकिडीत होती. तिच्या पायांनाही चांगला डौलदार आकार होता. तिची चाल अगदी चपळ व जलद होती. तिच्या बोलण्याचालण्यात एक प्रकारची धडाडी व आत्मविश्वास व्यक्त होई. तिचं किंचित् घोगऱ्या आवाजातलं बोलणं सुद्धा उत्साहपूर्ण व निर्धारयुक्त होतं. तिच्या सर्वच वागणुकीतून तारुण्यसुलभ उत्साह ओसंडत होता व प्रत्येक गोष्टीकडे आनंदी वृत्तीने पाहून सर्वत्र आनंद शोधून काढण्याची तिची धडपड होती.

मध्येच एकदा झाडाकडे बोट दाखवून ती म्हणाली, "वा! काय सुंदर देवदाराचं झाड आहे हे!"

आई चालणं थांबवून ते झाड पाहू लागली. तिला त्यात काही विशेष आढळलं नाही. देवदाराच्या इतर झाडांसारखंच झाड होतं ते. तरीसुद्धा सोफियाच्या कानावरील रुपेरी केसांची बट वाऱ्याने उडत होती तिकडे पहात आई हसत उद्‌गारली:

"खरंच सुंदर आहे झाड!"

मध्येच एकदा सोफिया उत्साहाने ओरडली,



"अरे, हा तर गाणारा पक्षी!"

असं म्हणत ती आपल्या सगळ्या शरीराचे कान करून त्या अदृश्य पक्ष्यांचं संगीत ऐकू लागली व तिचे घारे डोळे उत्साहाने चमकू लागले.

मधूनच ती चपळाईने एखादं रानटी फूल तोडून घेई व तोंडाने गीताचे स्वर गुणगुणत त्या फुलाच्या थरथरत्या पाकळ्यांना प्रेमाने कुरवाळत राही.

अशा प्रकारांमुळे आईचा त्या घाऱ्या डोळ्यांच्या स्त्रीवर लोभ जडला व तिला तिच्या बरोबरीने प्रवास करण्यात, तिच्याजवळ राहून जलद चालीने चालण्यात आनंद वाटू लागला.

मात्र कधी कधी सोफिया अत्यंत चिडून बोलायची, तेव्हा आईला खेद होई व ती चिंताग्रस्त होऊन स्वतःशी म्हणे,

"रिबिनला हे आवडायचं नाही!"

पण आईच्या मनात असा विचार येई न येई तोच सोफिया पुनः उत्साहाने व साधेपणाने बोलू लागे. मग आई हसून तिच्याकडे पहात म्हणायची,

"खरंच, किती तरुण आहात अजून तुम्ही!"

"वा! चांगलं बत्तीस वय झालंय् की माझं!" सोफिया उद्‌गारली.

आई हसून म्हणाली, "वयाचं नाही म्हणत मी. तुमच्या दिसण्यावरून तर तुमचं वय याहीपेक्षा जास्त म्हणाल तर कबूल करीन मी. पण मी तुमचं बोलणं ऐकत राहाते व तुमच्या डोळ्यांत पहाते तेव्हा मला नेहमी आश्चर्य वाटतं. कारण तुम्ही एखाद्या नव्या तरुण्या मुलीसारख्या भासता! तुम्हाला इतकं खडतर जीवन जगावं लागतं, संकटांना तोंड द्यावं लागतं, तरीसुद्धा तुमच्या मनाची टवटवी व उत्साह कायम राहतो!"

"कष्ट व खडतर आयुष्याचं म्हणाल तर मला त्याची जाणीवच नसते, अन् मला वाटतं की माझ्या इतकं चांगलं अन् मजेशीर आयुष्य कुणाच्याच वाट्याला येत नसेल. बरं, पण तुम्हाला पेलाग्येया न म्हणता निलोव्नाच म्हणत जाईन मी; चालेल ना? पेलाग्येया हे कसंसंच वाटतं कानाला."

"तुम्हाला काय हवं ते म्हणा," आई विचारमग्न होत म्हणाली. "अगदी वाटेल त्या नावानं हाक मारा. मी आपली तुमच्याकडे पहात व तुमचं बोलणं ऐकत असते अन् इकडे माझं विचारचक्र सुरूच असतं. तुम्हाला मानवी अन्तःकरणाचा ठाव लागला आहे हे पाहून मला फार बरं वाटतं. आपल्या अन्तःकरणातली खळबळ अगदी मोकळेपणाने लोक तुम्हाला

सांगून टाकतात, अगदी आपणहून तुमच्यापुढे अन्तःकरण खुलं करून दाखवायलाही त्यांना हरकत वाटत नाही–अन् मग तुम्हा सर्व मंडळीविषयी मी विचार करू लागते तेव्हा माझी खात्री पटू लागते की जगातल्या सर्व दुष्ट शक्तींचा बीमोड करण्यात तुम्हाला नक्की यश येईल. हो, अगदी नक्कीच!"

"हो, नक्कीच यशस्वी होऊ आम्ही: कारण आम्ही श्रमजीवी जनतेशी एकरूप झालो आहोत!" सोफिया निर्धाराने उद्‌गारली. "जनतेत प्रचंड शक्ती सुप्तावस्थेत वास करीत आहे. ती जनता कसलंही प्रचंड कार्य करू शकेल! लोकांना त्यांच्या पात्रतेची व योग्यतेची जाणीव फक्त आपण करून द्यायला पाहिजे, म्हणजे मग ते स्वतःची प्रगती करून घेऊ शकतील..."

सोफियाच्या या बोलण्याने आईच्या अन्तःकरणात उलटसुलट भावनांचा संघर्ष माजला. कां कुणास ठाऊक पण तिला सोफियाची कीव आली व सोफिया दुसऱ्या साध्या शब्दांत बोलेल तर बर, असंही तिला वाटलं.

"तुम्ही हा एवढा खटाटोप करता याचं फळ न् इनाम तरी कोण न् कधी देणार आहे तुम्हाला?" आईने व्याकुळ स्वरात पण संथपणे विचारलं.

"आमचं बक्षीस आधीच मिळालेलं आहे की आम्हाला!"

सोफियाच्या या बोलण्यात तिचा जोरदार अभिमान स्पष्टपणे व्यक्त होत होता. ती पुढे बोलू लागली:

"आम्हाला जे योग्य व इष्ट वाटतं त्याच जीवनाचा आम्ही अंगिकार केला आहे. आमच्या सर्व आंतरिक शक्तींचा उपयोग करून आम्ही जगतो– मग यापेक्षा अधिक ती कोणती अपेक्षा असणार जीवनात आमची?"

आईने एकदा तिच्याकडे पाहून खाली नजर वळवली. ती पुनः एकदा स्वतःशी उद्‌गारली:

"रिबिनला आवडणार नाही हे!"

त्या दोघी झपाझप चालत होत्या, पण त्या चालीत कशाची घाई नव्हती. त्या मोकळ्या हवेचा आस्वाद घेत चालताना आईला तर जणू आपण यात्रेलाच निघालो आहोत असं वाटत होतं. लहानपणी कुठल्यातरी एका दूरच्या मठात मूर्तीने चमत्कार केल्याच्या बातम्या उठून तिथे मोठीच जत्रा लोटली होती, त्यावेळी आईही आपल्या गावाहून निघून चालत तिथवर गेली होती. त्या प्रसंगाची यावेळी आईला आठवण झाली व ती आठवण तिला सुखावह वाटली.

सोफिया चालता चालता मधून आपल्या गोड गळ्याने आकाशाच्या



वर्णनाचं नाहीतर प्रेमाचं गाणं म्हणू लागे, किंवा कधी कधी ती शेतं, जंगलं, बोल्गा नदी, असल्या विषयांवरच्या कविता गाऊ लागे. तिची ती गाणी वा कविता ऐकून आईला बरं वाटे, तिच्या चेहऱ्यावर मंदस्मित विलसू लागे व स्वतःला नकळत त्या संगीताच्या तालासुराशी एकरूप होऊन ती मान डोलावू लागे.

अशा प्रकारे सोफियाच्या सहवासात प्रवास करताना तिला मोठं समाधान लाभलं व वसंतऋतूतल्या एखाद्या प्रसन्न सायंकाळी बागेतल्या कोपऱ्यात विचारमग्न अवस्थेत बसण्यात जसं सुख वाटावं तशा सुखात तिचा प्रवासाचा काळ निघून गेला.

## ५

तिसऱ्या दिवशी त्या दोघी इच्छित स्थळी येऊन पोचल्या. शेतात काम करीत असलेल्या एका शेतकऱ्याजवळ आईने डांबराचा कारखाना कुठं आहे याची चौकशी केली. थोड्याच वेळात जंगलातल्या एका उताराच्या रस्त्याने त्या चालू लागल्या. रस्त्याच्या दोन्ही बाजूला जंगल होतं व झाडांच्या मुळ्या रस्त्यावर पायऱ्यासारख्या पसरल्या होत्या. तो रस्ता उतरून खाली आल्यावर त्यांना एक वर्तुळाकार मैदान दिसलं. त्या ठिकाणी सगळीकडे कोळसा, लाकडं पडली होती व डांबरही पडलेलं होतं.

"आपण येऊन पोचलो अखेर!" आई चहूबाजूला पाहात अस्वस्थपणे म्हणाली.

खांब व झाडांच्या फांद्या यांचं एक खोपटं बनवलेलं होतं, त्याच्यासमोर लाकडाच्या ओंडक्यांवर फळ्या टाकून तयार केलेलं एक मेज होतं. सर्वांग डांबराने माखलेलं, शर्टचा गळा उघडा, अशा अवतारात रिबिन त्या मेजावर भोजन करीत होता. येफिम व आणखी दोन तरुण पोरंही त्याच्याबरोबर भोजन करीत बसली होती. दोघी स्त्रिया समोरून येत असल्याचं प्रथम रिबिनच्याच दृष्टीस पडलं. डोळ्यांवर ऊन येत होतं म्हणून एक हात डोळ्यांवर धरून तो एक शब्दही न बोलता त्या बायांकडे पहात राहिला.

"नमस्कार, मिखाइलो भाऊ!" आई दुरूनच ओरडली.

रिबिन उठला व संथपणे त्यांच्याकडे जाऊ लागला. आईला ओळखल्यावर तो थबकला. त्याने तिच्याकडे पाहून स्मित केलं व एका हाताने दाढी कुरवाळली.

"आम्ही यात्रेला निघालो आहोत," आई त्याच्या जवळ जाऊन सांगू लागली. "म्हणून म्हटलं जाता जाता वाटेत तुम्हाला भेटून जावं. ही माझी मैत्रीण आहे–अन्ना नाव आहे तिचं."

आपल्याला हे ऐन वेळी कसं सुचलं याचा तिचा तिलाच अभिमान वाटून तिने डोळ्याच्या एका कोपऱ्यातून सोफियाकडे पाहिलं, पण तिचा चेहरा गंभीर व निर्विकार होता.

"नमस्कार!" आईशी हस्तांदोलन करीत रिबिन म्हणाला. त्याच्या चेहऱ्यावर एक मिस्किल स्मित होतं. तो आईकडे वळून म्हणाला,

"काही खोटं सांगू नका. तुम्ही शहरात नाहीत आता. इथं खोटं बोलण्याची गरजच नाही. सगळे आपलेच लोक आहेत."

येफिम मेजापाशी बसल्या जागेवरूनच या दोन 'यात्रेकरू' बायांचं निरीक्षण करीत होता. तो बसल्याबसल्याच आपल्या सोबत्यांच्या कानांत काहीतरी कुजबुजला. त्या दोघी जवळ आल्या तसा तोही उठला व त्याने त्यांना लवून अभिवादन केलं. त्याचे दोघे सोबती मात्र पाहुण्यांना पाहिलंच नाही असे स्वस्थ बसून राहिले.

रिबिन आईच्या खांद्यावर थोपटीत बोलू लागला:

"आम्ही संन्याशांसारखे राहातो इथं. कोणी कधी येत नाही आमच्याकडे. आमचा मालक परगावी गेला आहे अन् त्याची बायको दवाखान्यात आहे. त्यामुळे सध्या इथं सगळी व्यवस्था मीच पहातो. बरं पण बसा तर. शिवाय तुम्हाला खायलाही हवंच असेल काही. येफिम, दूध घेऊन ये बरं."

येफिम उठून आत खोपटात शिरला. पाहुण्या बायांनी पाठीवरच्या पिशव्या काढून ठेवल्या. येफिमच्या दोन सोबत्यांपैकी एका उंच व किडकिडीत तरुणाने उठून त्यांना सामान उतरवण्यात मदत केली, पण दुसरा केसाळ व बुटका तरुण मात्र टेबलावर कोपर टेकून तसाच बसून राहिला. तो हाताच्या बोटांनी डोकं खाजवीत, तोंडाने गीत गुणगुणत, त्या पाहुण्यांचं निरीक्षण करीत होता.

तिथल्या डांबराचा व सडक्या पानांचा उग्र दर्प नाकात शिरून त्या दोघींना कसंसंच होत होतं.

"याचं नाव याकोव," रिबिनने त्या उंच इसमाकडे बोट दाखवून त्याची ओळख करून दिली. "तो दुसरा आहे त्याचं नाव इग्नात. बरं, पण तुमचा मुलगा बरा आहे ना?"



"तो तुरुंगात आहे आता," आईने उसासा टाकून सांगितलं.

"पुन:?" रिबिनने आश्चर्याने विचारलं. "त्याला तुरुंग आवडतोसं दिसतंय!"

इग्नातने गुणगुणणं थांबवलं. याकोवने आईच्या हातातली काठी घेतली.

"बसा ना!" याकोव आईला म्हणाला.

"तुम्हीसुद्धा उभ्या कां? बसा की?" रिबिन सोफियाकडे वळून म्हणाला. ती काही न बोलता एका ओंडक्यावर बसली व रिबिनकडे न्याहाळून पाहू लागली.

"त्याला कधी पकडलं त्यांनी?" रिबिनने आईच्या समोर बसत मानेला हिसका देऊन विचारलं. "तुमच्या नशिबातच सुख नाही, निलोव्ना."

"चालायचंच!" आई म्हणाली.

"सवय होत चालली होय?"

"नाही, सवयीचं नाही, पण मला एवढं दिसतंय की त्याला काही इलाजच नाही, मग काय करायचं?"

"अस्सं! बरं. काय झालं ते तर सांगा!"

येफिमने एका भांड्यात दूध आणलं, मेजावरचा एक पेला घेऊन पाण्याने विसळून टाकला व त्यात दूध भरून तो सोफियापुढे केला. हे करीत असता त्याचे कान आई सांगत असलेल्या हकीकतीकडे लागलेले होते व भांड्यांचा आवाज न होऊ देण्याची तो खबरदारी घेत होता. आईने थोडक्यात सगळी हकीकत सांगितली, व तिचं बोलणं झाल्यावर थोडा वेळ कुणीच काही न बोलता वा परस्परांकडे न पाहाता सर्वजण स्तब्ध होते. इग्नात टेबलावर नखांनी रेघोट्या ओढीत होता. येफिम रिबिनच्या खांद्यावर कोपर ठेवून उभा होता. याकोव एका झाडाला टेकून हात बांधून व मान खाली वाकवून उभा होता. सोफिया आपल्या पापण्यांच्या खालून हळूच त्या शेतकऱ्यांचं निरीक्षण करीत होती.

"हूं..." रिबिन संथपणे व निर्विकारपणे म्हणाला. "म्हणजे असं आहे तर–अगदी उघड कार्यक्रम, अं?"

"आपण जर उघडपणे अशी मिरवणूक काढली तर शेतकरी ठारच मारतील आपल्याला!" येफिम खिन्नपणे हसून उद्गारला.

"हो, नक्कीच जीव घेतील ते आपला!" इग्नात मान हालवून

म्हणाला. "आपण तर बुवा कारखान्यात काम करायला जाणार! तिथंच काम केलेलं चांगलं!"

"पावेलवर खटला भरला जाणार असल्याचं तुम्ही म्हणालात, नाही का?" रिबिन म्हणाला. "त्याला किती शिक्षा होईल याचा काही अंदाज? काही कानावर आलं आहे तुमच्या?"

"सक्तमजुरीची सजा नाही तर सैबेरियात हद्दपारी!" आईने शांतपणे उत्तर दिलं.

तिन्ही तरुण पोरांनी एकदमच तिच्याकडे पाहिलं.

"पावेलने त्यात भाग घेतला तेव्हा या परिणामाची त्याला कल्पना होती?" रिबिनने नजर खाली लावून विचारलं.

"अर्थात् होती!" सोफियाने मोठ्या आवाजात सांगितलं.

सगळेजण जणू काय या विचाराने थिजून गेल्याप्रमाणे स्तब्ध झाले.

"हूं..." रिबिनने पुनः मोठ्या गंभीरपणाचा आव आणून बोलण्याला प्रारंभ केला. "हो, त्याला कल्पना असेल यात संशयच नाही. तो पूर्ण विचार केल्याशिवाय काही करणारच नाही, तो आहेच तसा गंभीर व विचारशील. काय, समजलात का रे? आपल्या छातीत संगिनी घुसण्याची किंवा सैबेरियात हद्दपार होण्याची संपूर्ण शक्यता असल्याची त्याला पूर्ण कल्पना होती, पण तरीसुद्धा तो आपल्या निश्चयापासून ढळला नाही. प्रत्यक्ष स्वतःची आई वाटेत आडवी आली तर तिच्या अंगावर पाय देऊन तो पुढे जाईल. खरं ना मी म्हणतो ते, निलोव्ना?"

"हो, तो नक्कीच तसं करील!" आई म्हणाली. पण हे बोलताना ती व्यथित झाल्याचं स्पष्ट दिसत होतं. तिने एक उसासा टाकून भोवताली दृष्टिक्षेप टाकला. सोफियाने काही न बोलता आईच्या हातावर थोपटून तिचं सांत्वन करण्याचा प्रयत्न केला व त्याच वेळी कपाळावर आठ्यांचं जाळं विणून रिबिनकडे तीक्ष्ण रोखून पाहिलं.

"माणूस असावा तर असा!" रिबिन आपल्या काळ्याभोर नेत्रांनी सर्वांकडे पहात म्हणाला. मग ते सहाही जण स्तब्ध झाले. हवेत तरंगणारे सूर्यप्रकाशाचे किरण सोनेरी पट्ट्यांसारखे दिसत होते. अचानक दुरून कुठून तरी कावळ्याची काव काव ऐकू आली. आईच्या अन्तःकरणात मे-दिनाच्या आठवणी दाटून आल्या व पावेल व आंद्रेइच्या भेटीची तिला तीव्रतेने इच्छा झाली. तिने सभोवताली नजर टाकली तो जिकडे तेकडे डांबराची रिकामी



पिंपं पसरलेली होती, व झाडांचे उघडेबोडके खुंटही दिसत होते. पलिकडे ओक व बर्च वृक्षांची गर्दी झालेली होती व त्यांच्या गडद छाया दूरवर पसरल्या होत्या.

याकोव झाडापाशी उभा होता तिथून एका बाजूला झाला व अचानक त्या शांततेचा भंग करीत त्याने मोठ्याने विचारलं:

"आम्हाला, मला आणि येफिमला, सक्तीने लष्करात भरती करण्यात आलं तर आम्हाला या अशा लोकांच्या विरुद्ध पाठवणार की काय?"

"नाहीतर कोणाविरुद्ध लढावं लागणार असं वाटलं तुला?" रिबिन म्हणाला. "अरे बाबा, आपल्या हाताने आपलाच गळा दाबायला लावतात ते आपल्याला. हीच तर खरी युक्ती असते त्यांची!"

"तरीसुद्धा मी लष्करात भरती होणारच!" येफिम निर्धारपूर्वक म्हणाला.

"जा की लेका! कोण नको म्हणतोय?" इग्नात जोरात म्हणाला, व नंतर थोडं हसून तो पुढे बोलू लागला,

"अगदी जरूर अंमलात आण तुझा निर्धार! पण एक कर अं. मला गोळी घालशील तेव्हा सरळ माझ्या डोक्याचा नेम धर, नुसता जायबंदी न् लंगडालुळा करू नकोस मला! करायचं तर सरळ ठारच कर!"

"हो! तू पूर्वीही एकदा बोलला होतास ते!" येफिम कडवटपणे म्हणाला.

"जरा थांबा, दोस्त हो," रिबिन हात वर करून म्हणाला, व आईकडे अंगुलिनिर्देश करून पुढे बोलू लागला, "ही पहा इथं एक बाई आहे की जी आपल्या मुलाला मुकली आहे—"

"असं कशाला बोलता तुम्ही?" आई व्यथित अन्तःकरणाने म्हणाली.

"नाही, बोलायलाच पाहिजे ते!" रिबिन गंभीरपणे उद्गारला. "कारण तुमचे केस पांढरे झाले आहेत ते व्यर्थ जाता कामा नये. तर काय रे, या बाईंच्या मुलाला पकडल्यामुळे ती खलास झाली आहे असं वाटलं का तुम्हाला? निलोव्ना, तुम्ही पत्रकं आणली आहेत ना?"

आईने त्याच्याकडे एक दृष्टिक्षेप टाकला व मग जरा थांबून तिने उत्तर दिलं,

"हो..."

"पाहिलंत?" रिबिन मेजावर मूठ आपटून म्हणाला. "मी तुम्हाला

पहाताक्षणीच ओळखलं होतं. नाहीतर तुम्ही इथं आलाच असता कशाला? पाहिलंत? त्यांनी मुलाला अटक करून नेली तर त्याच्या आईने त्याची जागा भरून काढली!"

त्याने जोराने मेजावर हात आपटले व तोंडाने एक अर्वाच्य शिवी हासडली.

आईने भयभीत होऊन त्याच्याकडे पाहिलं. त्याचा चेहरा एकदम फिका दिसू लागला होता, त्याची दाढी अस्ताव्यस्त झाली होती, व त्याची गालफडं वर आल्यासारखी दिसत होती, आणि डोळे जणू काही कित्येक दिवस तो झोपला नसावा असे तारवटलेले दिसू लागून निळसर पांढऱ्या बुब्बुळांच्या आतील तांबडया रक्तवाहिन्यांच्या रेषा दिसू लागल्या होत्या. त्याचं नाक बहिरी ससाण्यासारखं अणकुचीदार भासत होतं. शर्टच्या, एकेकाळी तांबडया असलेल्या पण आता डांबराने माखलेल्या गळपट्टीच्या आतून त्याच्या गळ्याची हाडं व केसाळ छातीही दिसत होती. त्याचं एकंदर स्वरूपच आता भयंकर उग्र व संतप्त दिसत होतं. त्याच्या लाल नेत्रांतून आग बाहेर पडत असल्याचा भास होत होता व त्यामुळे त्याचा काळवंडलेला चेहरा उजळला होता.

सोफियाचा चेहरा उतरला होता व ती स्तब्ध बसून या शेतकऱ्यांच्या चेहऱ्यांचं निरीक्षण करीत होती. इग्नात आपुली मान हालवीत कपाळाला आठ्या घालून बसला होता. याकोव खोपटापाशी जाऊन रागाने खांबाची साल उकरीत होता. येफिम आईच्या मागे मेजाच्या बाजूने येरझारा घालीत होता.

रिबिनच पुन: बोलू लागला:

"थोड्याच दिवसांपूर्वी आमच्या या जिल्ह्याच्या प्रमुख अधिकाऱ्याने मला बोलावून घेतलं अन् विचारलं, 'काय रे ए, तू त्या पाद्र्याला काय सांगितलंस?' अन् वर मला 'बदमाष' म्हणून शिवी हासडली. मी त्याला उलट म्हणलो, 'बदमाष? मी निढळाच्या घामाची कमाई करून पोट भरतो, अन् मी कुणालाही त्रास देत नाही, मग मी बदमाष कसा?' तो अधिकारी गुरगुरतच माझ्या अंगावर धावून आला अन् त्याने माझ्या तोंडावर ठोसे लगावले, त्यामुळे माझे दात सुद्धा पडले अन् वर तीन दिवसपर्यंत त्यांनी मला तुरुंगात डाबून ठेवलं. 'तुम्ही लोक गरीब रयतेशी असं वागता काय?' मी मनातल्या मनात त्याला उद्देशून म्हणालो. 'ठीक आहे, असं असेल तर तुम्हीही याद राखून ठेवा, बच्चंजी! मी नाही तर दुसरा कुणी तरी, तुला



नाही तर तुझ्या पोरांना चांगलाच हात दाखवून याचा बदला घेईल! तुम्ही आपल्या लोखंडी पंजांनी लोकांच्या छातीवरून नांगर फिरवला आहे. अन् तिथं द्वेषाचं बी पेरलं आहे. तेव्हा राक्षसांनो, दयेची अपेक्षाच करू नका!'"

हे बोलताना रिबिनचा चेहरा संतापाने लाल झाला होता व त्याचा आवाजही असा काही चढला होता की आईला तर त्याची भीतीच वाटली.

"अन् मी त्या पाद्र्याजवळ असं बोललो तरी काय होतो?" रिबिन जरा शांत होऊन पुढे सांगू लागला, "तो पाद्री एकदा नेहमीप्रमाणे गावातून फेरी मारून शेतकऱ्यांशी बोलत बसला होता. सामान्य लोक म्हणजे कळपातल्या मेंढ्यांप्रमाणे असतात व त्यांना मेंढपाळाची गरज असते, असं तो सांगत होता. मी सहज थट्टेने म्हणालो की एकदा का त्यांनी कोल्ह्याला प्राण्यांचा मुख्य बनवलं की पिसं खूप उडत राहातील पण पक्षी काही फार राहायचे नाहीत! मग तो माझ्याकडे वळून बोलू लागला अन् उपदेश करू लागला की लोकांनी पुष्कळ दु:ख सहन करायला शिकलं पाहिजे अन् ईश्वर त्यांची परीक्षा पहातो त्या कसोटीला उतरण्याची शक्ती दे म्हणून सतत देवाची प्रार्थना केली पाहिजे. त्यावर मी म्हणालो की लोक तर बिचारे नेहमी प्रार्थना करीतच असतात, पण ईश्वरालाच फार कामामुळे बहुधा लोकांची विनवणी ऐकण्याला वेळ मिळत नसावा! बरं का, तर त्याने मला विचारलं की तू प्रार्थना तरी कोणती करतोस? मी उत्तर दिलं, इतर सगळे लोक करतात तसलीच प्रार्थना मीही जन्मभर करीत आलो आहे, की 'हे दयाळू परमेश्वरा, दगड खाऊन बड्या लोकांच्या सेवेत लाकडाची ओंडकी कशी ओढावी हे मला शिकव!' पण त्या पाद्र्याने मला पुरं बोलूच दिलं नाही —"

अन् मग एकदम त्याने सोफियाकडे वळून तिला विचारलं, "तुम्ही श्रीमंत कुटुंबातल्या आहात ना?"

"कां? श्रीमंत कुटुंबातली कशावरून?" सोफियाने आश्चर्यचकित होऊन विचारलं.

"कां?" रिबिन जोरात उद्गारला. "कारण तुमचा जन्म श्रीमंत कुटुंबातलाच असला पाहिजे असा माझा तर्क आहे. अर्थात् जन्म हा काही कुणाच्या हातचा नसतो, ते नशिबावर अवलंबून असतं. हं! तुम्ही डोक्याला शेतकऱ्यासारखा रुमाल बांधला म्हणजे श्रीमंतांची पापं लपवता येतील असं तुम्हाला वाटत असेल तर ते चूक आहे. एखादा पाद्री अगदी गोणपाट अंगावर चढवून आला तरी आम्ही त्याला ओळखल्यावाचून राहाणार नाही.

या मेजावर काही तरी सांडलं होतं त्यात तुमचा कोपर गेला तेव्हा लगेच तुम्हाला किळस येऊन तुम्ही वाईट चेहरा केलात! शिवाय तुमच्या पाठीचा कणा सुद्धा कामकरी स्त्रियांपेक्षा कितीतरी सरळ आहे!"

त्याच्या या रांगड्या भाषेतल्या हेटाळणीमुळे सोफियाला राग आला असेल या भीतीने आई मध्येच म्हणाली,

"ती माझी मैत्रीण आहे, मिखाइलो इवानोविच! अन् फार फार चांगली आहे ती. आपल्यासाठी कार्य करण्यात तिचे केस पांढरे झाले आहेत. तुम्ही असं कठोर बोलायला नको होतं तिला!"

रिबिनने दीर्घ उसासा टाकला.

"कां? मी काही वेडंवाकडं बोललो का?" तो म्हणाला.

"तुम्हाला मला काही सांगायचं होतं वाटतं, नाही?" सोफिया शुष्कपणे म्हणाली.

"मला ना? हो, खरंच! थोड्याच दिवसांपूर्वी इथं एक नवा माणूस आला आहे. याकोवचा चुलतभाऊ आहे तो. त्याला क्षय झालाय. त्याला बोलावून घेऊ का मी?"

"जरूर बोलवा," सोफिया म्हणाली.

रिबिनने डोळे बारीक करून एक मिनिटभर तिच्याकडे न्याहाळून पाहिलं. मग तो येफिमला म्हणाला,

"जा रे, त्याला संध्याकाळी इकडे बोलावलं आहे म्हणून सांग."

येफिमने डोक्यावर टोपी ठेवली व कुणाकडे न पहाता व न बोलता तो जंगलात अदृश्य झाला. त्याच्याकडे पहात मान हालवून रिबिन म्हणाला,

"फार कठीण परिस्थिती आहे बिचाऱ्याची. तो अन् याकोव दोघांनाही लवकर लष्करात भरती व्हावं लागणार आहे. याकोव मात्र स्पष्ट सांगतो की हे काम आपल्याच्याने होणार नाही. तसं पाहिलं तर येफिमलाही जमायचं नाही ते, पण तरी त्याला जायची इच्छा आहे. लष्करातल्या सैनिकांत आपण जागृती करू शकू अशी आशा आहे त्याला. पण माझं म्हणणं असं की भिंतीवर डोकं आपटून का कुठे भिंत पडणार आहे? कोणाच्या खांद्यावर बंदूक दिली की तो सरळ इतरांच्या बरोबर पावलं टाकायला लागतो. पण तरीसुद्धा येफिम मात्र बेचैन आहे अन् हा इग्नात सारखा त्याला छेडत असतो खरं म्हणजे काही अर्थ नाही त्यात."

"मी म्हणतो, अर्थ आहे!" इग्नात रिबिनकडे न पहाता उद्विग्नपणे



म्हणाला. "त्यांचं सगळं शिक्षण होईपर्यंत तोही इतरांच्यासारखाच होऊन जाईल."

"मला नाही तसं वाटत," रिबिन विचारमग्न होत उद्गारला. "तरीसुद्धा त्याने न जाणंच बरं. हा रशिया एवढा मोठा देश आहे. तो नाही भरती व्हायला गेला तर ते त्याला कुठं म्हणून शोधतील? तो सहज बनावट पासपोर्ट घेऊन खेडोपाडी फिरत राहिला पर काय पत्ता लागणार आहे त्यांना?"

"मी स्वतः तर तेच करणार आहे," इग्नात एक काठी पायावर आपटीत म्हणाला. "एकदा त्यांच्याविरुद्ध लढायचं ठरवलं म्हणजे सारखं त्याच मार्गाने जायला हवं."

ते बोलणं इथंच थांबलं. मधमाशा अन् गांधीलमाशांची भलीमोठी फौज एकदम तिथे येऊन घिरट्या घालू लागली व त्यांच्या गुणगुणण्याने सारं वातावरण भरून गेलं. पक्ष्यांचा किलबिलाट सुरू झाला व दूर शेतातून गाण्याच्या लकेरीही ऐकू आल्या.

थोड्या वेळाने रिबिन म्हणाला, "चला, आता कामाला लागायला हवं. अन् तुम्हा दोघींना विश्रांतीचीही गरज असेल. आत खोपटात काही तक्तपोस आहेत. काही पालापाचोळा घेऊन ये बरं याकोव. अन् आई, ती पत्रकं काढून द्या बरं."

आई व सोफिया आपली गाठोडी सोडू लागल्या.

त्या गाठोड्यांवर वाकून पहात आनंदित होऊन रिबिन उद्गारला: "अरे वा! पुष्कळच मोठा गठ्ठा आणलेला दिसतोय की!"

नंतर त्याने सोफियाला विचारलं, "हे काम तुम्ही बऱ्याच दिवसांपासून करता आहातसं दिसतंय! नाही, ...अं–काय बरं तुमचं नाव म्हणालात?"

"अन्ना इवानोव्ना." ती म्हणाली. "बारा वर्षांपासून आहे मी चळवळीत. पण कां विचारलं तुम्ही?"

"तसं काही खास कारण नाही. बरं, पण तुरुंगात गेला होता तुम्ही?"

"हो."

"पाहिलंत?" आई जरा दटावणीच्या सुरात म्हणाली. "अन् तुम्ही तिच्याशी असं उद्धटपणाने वागलात..."

"अं, माझं काही मनावर घेऊ नका झालं!" असं म्हणून त्याने दात विचकले व पुस्तकांच्या गठ्ठ्यातलं एक पुस्तक उचलून तो पुनः बोलू लागला,

"जसं डांबर अन् पाणी एकमेकांत मिसळत नाहीत, तसंच श्रीमंत लोक अन् शेतकरी कधी एकमेकांत मिसळून जायचे नाहीत."

"पण मी श्रीमंत स्त्री नाहीच!" सोफिया मंदस्मित करीत म्हणाली. "मी फक्त एक मनुष्य प्राणी आहे!"

"असेल, तेही शक्य आहे!" रिबिन उत्तरला. "कुत्रे सुद्धा पूर्वी कधीकाळी लांडगे होते म्हणतात! बरं, मी हे सगळं साहित्य लपवून ठेवून येतो."

इग्नात व याकोव आपले हात पुढे करून त्याच्यापुढे उभे राहिले.

"आम्हाला पाहू द्या की!" इग्नात म्हणाला.

"सगळी पुस्तकं तीच आहेत?" रिबिनने सोफियाला विचारलं.

"नाही, काही वर्तमानपत्रं सुद्धा आहेत की."

"मग ठीक."

रिबिन व त्याचे दोन सहकारी असे तिघेही आत खोपटात शिरले.

आत जाणाऱ्या रिबिनकडे न्याहाळून पहात आई सोफियाला म्हणाली, "हा शेतकरी फारच उत्तेजित झाला आहे."

"हो ना," सोफिया म्हणाली. "याच्या चेहऱ्यासारखा चेहरा पाहिला नव्हता अजून मी. अगदी एखाद्या आत्मबलिदान करणाऱ्या हुतात्म्यासारखा भासतो तो. चला आपण आत जाऊ या, ते काय करतात हे पहायचं आहे मला."

"त्याची कठोर न् कटू भाषा मनावर घ्यायची नाही बरं कां!" आई सोफियाला म्हणाली.

सोफिया हसली व म्हणाली,

"तुम्ही किती चांगल्या आहात हो!"

त्या दोघी दारात पोचल्या तेव्हा इग्नातने डोकं वर करून त्यांच्याकडे एक दृष्टिक्षेप टाकला व तो आपल्या कुरळ्या केसांतून बोटं फिरवीत समोर गुडघ्यांवर पसरून ठेवलेल्या वर्तमानपत्रावरून नजर फिरवू लागला. रिबिन बाजूलाच उभा राहून छपराच्या फटीतून येणाऱ्या सूर्यप्रकाशाच्या कवडशाच्या उजेडात वर्तमानपत्र धरून वाचत होता व वाचताना त्याचे ओठ हालत होते. एका तक्तपोसावर पत्रकांचा गठ्ठा ठेवला होता व याकोव गुडघे टेकून त्या गठ्ठ्यासमोर बसला होता.

आई आत शिरून एका कोपऱ्यात जाऊन खाली बसली. सोफिया तिच्या



पाठीशी उभी राहून तिच्या खांद्यावर हात ठेवून त्या तिघांचं निरीक्षण करू लागली.

"या आपल्या किसानी खेडवळपणाला नावं ठेवताहेत बरं का ते लोक, मिखाइलोकाका," याकोव मागे वळून न पाहाता हळूच रिबिनला म्हणाला.

रिबिनने त्याच्याकडे पाहिलं व हसून म्हटलं,

"त्याचं कारण त्यांची आपल्यावर माया आहे म्हणून, समजलास!"

इग्नातने जोरात श्वास घेऊन डोकं वर केलं व तो बोलू लागला:

"इथं लिहिलं आहे की, 'शेतकरी आता माणसासारखा दिसतच नाही! अर्थात् नाहीच दिसायचा!' त्याला अपमान झाल्यासारखं वाटत होतं हे त्या वेळी त्याच्या चेहऱ्यावरच्या छटेवरून स्पष्ट होत. "असं काय? थोडा वेळ माझी जागा घेऊन असं जगून पहा म्हणजे लेका तू कसा दिसतोस ते आम्ही पण पाहून घेऊ!"

"मी आता पडावं म्हणते," आई सोफियाला म्हणाली. "मी दमले आहे अन् या वासाने डोकं फिरू लागलंय माझं. तुम्हालाही पडायचं नाही का?"

"नाही, मला विश्रांतीची गरज नाही."

आई तक्तपोसावर आडवी झाली व लगेच पेंगू लागली. सोफिया तिच्याजवळच बसून त्या तिघांकडे पहात होती व अधूनमधून मधमाशा वा गांधीलमाशा आईच्या अंगावर येत त्यांना हाकून लावण्याचं काम करीत होती. आई अर्धवट मिटलेल्या नेत्रांतून तिच्याकडे पहात होती व ती आपली एवढी काळजी घेते हे पाहून आईचं अन्तःकरण भरून आलं होतं.

रिबिन तिथं आला व त्याने सोफियाला हळूच विचारलं, "झोप लागली वाटतं यांना?"

"होय."

तो क्षणभर आईच्या चेहऱ्याचं निरीक्षण करीत उभा राहिला व मग उसासा टाकून म्हणाला:

"आपल्या मुलाच्या मागोमाग या खडतर मार्गाने जाणारी मला वाटतं ही पहिलीच आई असेल, नाही?"

"त्यांची झोपमोड व्हायची आपल्या बोलण्याने; आपण बाहेरच जाऊ या." सोफियाने सुचवलं.

"आता कामावर जायला हवं पुन:! तुमच्याशी बोलायचंय पुष्कळ, पण त्यासाठी संध्याकाळपर्यंत थांबणंच भाग आहे. चला रे, पोरांनो! चला!"

ते तिघेजण बाहेर पडले. सोफिया तिथं आतच बसून राहिली.

"या दोघांची गट्टी जमली हे बरीक चांगलं झालं!" आई मनातल्या मनात म्हणाली.

आणि मग त्या जंगलाचा व डांबराचा उग्र दर्प नाकात शिरत असूनही तिला लवकरच गाढ झोप लागली.

## ६

डांबराच्या भट्टीचं काम करणारे ते कामगार परत आले तेव्हा त्या दिवसाचं काम संपल्याच्या खुषीत होते. त्यांच्या आवाजाने आईला जाग आली व ती जांभया देत बाहेर आली. त्या लोकांकडे स्नेहपूर्ण नजर टाकीत हसत हसत ती म्हणाली,

"तुम्ही काम करीत होता अन् मी मात्र राणीसारखं झोपून राहिले होते!"

"तुम्हाला माफ आहे ते," रिबिन म्हणाला. दिवसभराच्या श्रमाने दमूनभागून आल्यामुळे त्याचा जोर पुष्कळच कमी होऊन तो आता शांत झाला होता.

तो इग्नातकडे वळून म्हणाला, "काय इग्नात? काही चहाबिहा मिळेल की नाही?"

"आम्ही घरच्या कामाच्या पाळ्या लावल्या आहेत," तो आई व सोफियाकडे वळून म्हणाला. "आज खाण्यापिण्याची व्यवस्था करण्याची इग्नातची पाळी आहे."

"आज कुणी बदलीला तयार असेल तर मी पाळी बदलायला आनंदाने तयार आहे!" सर्पणासाठी काटक्या गोळा करता करता इग्नात म्हणाला.

"पाहुण्यांजवळ बसण्याची इच्छा काही तुला एकट्यालाच आहे असं नाही," येफिम सोफियाच्या शेजारी बसत म्हणाला.

"मी तुला मदत करीन, इग्नात," याकोव म्हणाला. आत खोपटात जाऊन तो पाव घेऊन आला व त्याने त्याचे तुकडे कापून मेजावर ठेवले.

"ऐकलंत!" येफिम उद्‌गारला. "कोणीतरी खोकतंय—"

रिबिनने कान टवकारून तो आवाज ऐकला व होकारार्थी मान हालवली.

"तोच येतोय बरं का," तो सोफियाला समजावून सांगू लागला.



"जिवंत प्रतीकच आहे तो. मला जर शक्य झालं असतं तर मी त्याला गावोगाव घेऊन जाऊन बाजारात उभं केलं असतं; म्हणजे त्याचं म्हणणं तरी लोकांच्या कानी गेलं असतं. तो सारखा तीच ती कर्मकहाणी सांगत असतो, पण तरीसुद्धा प्रत्येकाला माहीत व्हायलाच हवी ती."

सभोवताली वाढत्या संधिप्रकाशात सर्वत्र शांतता पसरली होती. त्या बोलणाऱ्यांच्या आवाजातही मार्दव येत होतं. सोफिया व आई दोघी त्या लोकांकडे पहात होत्या. ते सर्व थकून आल्यामुळे संथपणे व गळून गेल्यासारखे हालचाल करीत होते. तेही त्या दोघींकडे पहात होतेच.

तेवढ्यात समोरच्या झाडीतून एक उंच पण काठीवर भार टाकून वाकत चालणारा माणूस बाहेर आला.

"हा मी आलोय!" एवढेच शब्द बोलून होतात न होतात तोंच त्याला खोकल्याची उबळ आली. त्याला श्वास घेताना दम लागत होता तो आवाज-ही त्यांना स्पष्ट ऐकू येत होता.

त्याने एक जीर्ण झालेला पायघोळ कोट अंगावर घातलेला होता. डोक्यावर एक फाटकी जुनी गोल हॅट कशीतरी ठेवलेली होती, तीतून तप-किरी रंगाचे तुरळक राठ केस बाहेर डोकावत होते. सगळी हाडं वर आलेल्या त्याच्या चेहऱ्याचा बराचसा भाग पिंगट रंगाच्या दाढीने झाकाळला होता. त्याचे ओठ कायमचे अलग झाल्यासारखे दिसत होते व त्याचे खोल गेलेले डोळे तारवटलेले होते.

रिबिनने त्याची त्या दोघींशी ओळख करून दिल्यावर त्याने सोफियाला विचारलं,

"तुम्ही पुस्तकं आणली आहेत म्हणून ऐकलं मी. खरं का ते?"

"हो, खरं आहे," ती उत्तरली.

"धन्यवाद—सर्वांच्याच वतीने आभार मानतो मी तुमचे. त्यांना अजून सत्याचं आकलन होत नाही; परंतु मला ते आकलन झालेलं असल्यामुळे त्यांच्या वतीने मीच तुमचे आभार मानतो."

त्याचा श्वास धापा टाकल्यासारखा जलद चालत होता. व त्याच्या हाडकुळ्या हातांची बोटं कोटाच्या गुंड्या लावण्याच्या प्रयत्नात छातीशी चाचपडत होती.

"इतक्या उशीरा इथं रानात उघड्यावरची हवा तुम्हाला मानवायची

नाही ; या झाडांमुळे ही हवा दमट झाली आहे तिचा त्रास होईल तुम्हाला." सोफिया म्हणाली.

"मला आता काहीच मानवायचं नाही!" तो श्वास रोखून उद्‌गारला. "फक्त एकच गोष्ट मानवेल—ती म्हणजे मृत्यु!"

त्याच्या आवाजात असं काही कारुण्य होतं की तो ऐकून कुणालाही दया यावी. त्याची सगळी आकृतीच अशी भासत होती की ती पाहून कमालीची कीव तर वाटावी, पण ही कीव करणं व्यर्थ आहे याची जाणीव होऊन थोडासा उद्वेगही उत्पन्न व्हावा.

तो एका पिंपावर बसला व त्याने जणू काय गुडघे मोडणार तर नाहीत अशा भीतीने ते मुडपून घेतले. कपाळ घामाने डबडबलं होतं ते त्याने पुसून काढलं. त्याचे कोरडे व शुष्क केस कपाळावर निर्जीवपणे विखुरलेले होते.

चुलीतला जाळ भडकला तेव्हा त्या ज्वाळांच्या प्रकाशात सभोवतालच्या सर्व वस्तू थरथर कापताना व हालताना दिसत होत्या. वृक्षांच्या सावल्या जंगलाच्या दिशेने पळत होत्या व ज्वाळांच्या प्रकाशात इग्नातचा गुबगुबीत चेहरा उजळून निघाला होता. अल्पावधीत जाळ विझून गेला व वातावरण धुराच्या वासाने भरून गेलं. हळूहळू चहूबाजूला पुन: अंधःकार व शांततेचं साम्राज्य पसरलं. जणू सर्व वस्तुमात्र त्या क्षयरोग्याचं बोलणं ऐकण्यास उत्कंठित झाली होती.

"मी अजूनही गरीब लोकांच्या कामी पडू शकतो—माझ्यावर जो घोर अन्याय झाला आहे त्याचं जिवंत प्रतीक म्हणून!" तो सांगू लागला, "माझ्याकडे नीट पाहून घ्या. माझं वय अवघं अठ्ठावीस वर्षांचं आहे, पण मी मृत्युपंथाला लागलो आहे! दहा वर्षांपूर्वी मी अगदी सहज पाचशे पौंड वजन उचलत होतो. माझ्यासारखा तगडा प्राणी सहज वयाच्या सत्तर वर्षांपर्यंत तरी जगेल अशी माझी खात्री होती. पण त्यानंतर मला फक्त दहाच वर्षे आयुष्य लाभलं—कारण आता सारं संपल्यासारखंच आहे! माझ्या मालकांनी मला पार लुबाडलं—माझ्या आयुष्याची चाळीस वर्षं लुबाडली त्यांनी—चाळीस वर्षं!"

"बस! हेच त्याचं पालुपद असतं!" रिबिन घोगऱ्या आवाजात कुजबुजला.

चुलीतला जाळ पुन: जोराने भडकला व त्या ज्वाळा पूर्वीपेक्षाही अधिक जोरात वर जाऊ लागल्या. झाडांच्या सावल्याही पुन: जंगलाच्या दिशेने



धावू लागल्या व पुन: आगीकडे परत येऊन चुलीच्या भोवती फेर धरून मूक नृत्य करू लागल्या. ओलसर लाकडांची फुसफुस व किरकिर सुरूच होती. हवा साधारण गरमच होती ; त्या वाऱ्याच्या झुळुकीबरोबर झाडांच्या पानांची कुजबुजवजा सळसळही सुरू होती. आगीच्या लालपिवळ्या जिभा एकमेकींशी लडिवाळपणे क्रीडा करीत होत्या. त्या परस्परांत मिसळून उंच गेल्या की त्यांतून ठिणग्या खाली पडत होत्या. मधूनच एखादं जळतं पान हवेत तरंगत होतं. आकाशातल्या चांदण्या त्या ठिणग्यांकडे पाहून स्मित करीत त्यांना वर येण्यास खुणावत होत्या...

"हे माझं पालुपद नाही." तो क्षयरोगी बोलू लागला. "हे हजारो लोकांचं पालुपद आहे, पण ते हे पालुपद आळवतात तेव्हा त्यांना ही जाणीव नसते की त्यांचं दुर्दैवी जीवन इतरांना उदाहरण ठरू शकेल! कितीतरी लोक अतिश्रमामुळे रक्ताचं पाणी करून झिजून उपासमारीमुळे मृत्युमुखी पडत असतील..."

त्याला खोकल्याची जोराची उबळ आली व तो खूपच खाली वाकून खोकू लागला.

याकोवने मेजावर घोडीच्या दुधाची एक पातेली व कांद्याच्या फोडी आणून ठेवल्या. तो त्या क्षयरोग्याला म्हणाला,

"सवेली, चलं इकडे ये. मी दूध आणलं आहे तुझ्यासाठी."

सवेलीने 'नको' म्हणून मान हालवली, पण याकोव त्याला हात धरून मेजापाशी घेऊन गेला.

"तुम्ही याला इथं आणलंच कशाला?" सोफिया रिबिनकडे वळून दटावणीच्या स्वरात म्हणाली. "कोणत्याही क्षणी पटकन् मरून जाईल बिचारा!"

"माहीत आहे मला ते," रिबिन म्हणाला. "तरी पण त्याला शक्य आहे तंवर बोलून घेऊ दे! नाहीतरी त्याचं आयुष्य सत्कारणी न लागताच फुकट गेलं आहे. आता तरी निदान काही चांगल्या कार्यासाठी आणखी थोडा त्रास सहन करावा लागला तर हरकत नाही. तेव्हा तुम्ही काही चिंता करू नका!"

"तुम्हाला त्यात मौज वाटतेसं दिसतंय!" सोफिया उद्‌गारली.

रिबिनने तिच्याकडे रोखून पाहिलं व तो चिडखोरपणे म्हणाला:

"अशा प्रकारात मौज वाटते ती तुम्हा श्रीमंतांना! येशू ख्रिस्त सुळावर

म्हणतो त्यात गमत वाटते ती तुम्हा लोकांना! पण आम्ही तर उलट या माणसाच्या उदाहरणापासून धडा घेऊ इच्छितो व तुम्हीही धडा घ्यायला हवा असं आमचं म्हणणं आहे!"

आईच्या चेहऱ्यावर व्यग्रतेची व चिंतेची छटा दिसू लागली व ती मध्येच म्हणाली,

"हे पुरे आता!"

आता टेबलापाशी येऊन बसलेला सवेलीच पुन्हा बोलू लागला:

"या बड्या लोकांना गरीबांवर असह्य कामाचा बोजा लादून त्यांचा जीव घेण्यात काहीच कसं वाटत नाही? मी नेफेदोवच्या कारखान्यात काम करीत होतो. तिथल्या मालकाने एका नटीला तोंड धुण्यासाठी सोन्याचं भांडं भेट म्हणून दिलं! माझी सर्व शक्ती व माझं आयुष्य हिरावून घेऊन त्याने तो पैसा त्या सोन्यात घातला! माझं आयुष्य त्यासाठी खर्ची पडलं! आपल्या रखेलीला खूष करण्यासाठी त्या मालकाने माझं रक्त शोषून घेतलं! माझ्या रक्ताच्या मोबदल्यात त्याने ते सोन्याचं भांडं मिळवून आपल्या प्रियेला नजराणा म्हणून दिलं!"

"अन् म्हणे मनुष्य म्हणजे ईश्वराची प्रतिकृती!" येफिम उपरोधिकपणे उद्गारला. "अन् हे लोक त्या मानवाची काय अवस्था करतात पहा!"

"खरंच सवेली, तू प्रत्येकाला आपली कहाणी सांगच!" रिबिन मेजावर हात आपटून म्हणाला.

"हो ना, गप्प बसू नकोस!" याकोवने साथ दिली.

इग्नात हसला. आईच्या हे लक्षात आलं की ते तिघे तरुण शेतकरी अतृप्त आत्म्याप्रमाणे उत्कंठित होऊन सवेलीची कहाणी ऐकत होते, व रिबिन बोलू लागला की त्याच्याकडे टक लावून पहात होते. सवेलीच्या कहाणीने त्यांना त्याच्याविषयी सहानुभूती वाटण्याऐवजी हेटाळणीचेच भाव त्यांच्या चेहऱ्यावर व्यक्त होत होते.

"हा म्हणतो ते खरं असेल?" आईने सोफियाकडे वळून हळूच तिला विचारलं.

"हो, खरं आहे ते," सोफिया मोठ्याने म्हणाली. "ही वस्तू भेटीदाखल दिल्याचा उल्लेख मॉस्कोच्या वर्तमानपत्रातही आला होता."

"पण त्या गुन्हेगाराला मात्र शिक्षा झाली नाही!" रिबिन घोगऱ्या आवाजात म्हणाला. "त्याला शिक्षा व्हायलाच हवी! त्याला जनतेसमोर



उभं करून त्याच्या देहाचे तुकडे तुकडे केले पाहिजेत व त्याचं कुजकंनासकं मांस कुत्र्यांपुढे टाकलं पाहिजे! एकदा जनता खवळली व तिने उठाव केला म्हणजे या सगळ्या लोकांना असलीच योग्य सजा मिळेल! आजपर्यंत लोकांनी सहन केलेल्या अन्यायाचं परिमार्जन करण्यासाठी या बदमाषांच्या रक्ताचे पाट वाहातील! अन् हे रक्त तरी कोणाचं आहे? लोकांच्या अंगातून शोषून घेतलेलंच रक्त नाही का ते? मग लोकांना त्या रक्ताचं काय वाटेल ते करण्याचा अधिकार आहेच!"

"मला थंडी वाजतेय!" क्षयरोगी म्हणाला.

याकोवने त्याला हात देऊन उठवलं व आगीपाशी नेऊन बसवलं.

चुलीतली लाकडं आता चांगली पेटली होती व सभोवताली अंधुक छायांचं नृत्य सुरू होतं, जणू काय आगीचा उत्साह पाहून त्यांनाही उन्माद चढला होता.

सवेली एका लाकडाच्या ओंडक्यावर बसला व आपले शुष्क, हाडकुळे हात आगीजवळ नेऊन शेकू लागला. आगीच्या प्रकाशात ते हात पारदर्शक भासत होते.

"यांनी जे सांगितलं, त्यामुळे परिस्थितीचं खरंखुरं चित्र पुस्तकांपेक्षाही अधिक स्पष्टपणे समोर उभं राहातं," रिबिन सवेलीच्या बोलण्याला उद्देशून म्हणाला. तो पुढे सांगू लागला,

"एखाद्या यंत्राच्या अपघातात सापडून जेव्हा एखादा कामगार मरून जातो किंवा त्याचा हात तुटतो, तेव्हा ते लोक त्या कामगाराचाच दोष आहे असं म्हणून मोकळे होतात. पण ते जेव्हा कामगाराचं सगळं रक्त शोषून घेऊन त्याला कुचकामाचा बनवून हाकलून देतात, तेव्हा त्याची जबाबदारी मात्र ते स्वीकारीत नाहीत. सरळ सरळ एखाद्याचा खून झाला तर ते मी समजू शकतो, पण एखाद्याचा छळ करून त्याचा जीव घेण्यात त्यांना काय गंमत वाटते हे मात्र मला समजत नाही. लोकांना ते का छळतात? आपणा सर्वांचा छळ ते कशासाठी करतात? तर त्यांना त्यात मौज वाटते म्हणून, त्यांच्या स्वतःच्या सुखासाठी, या पृथ्वीवरची अनेक सुखं स्वतःला उपभोगता यावीत म्हणून, मानवी रक्ताची किंमत देऊन त्या मोबदल्यात काय वाटेल ते विकत घेता यावं, —नटी, रेसचे घोडे, चांदीचे काटे चमचे, सोन्याच्या थाळ्या, आपल्या मुलांसाठी भारी किंमतीची खेळणी, —सगळी सुखं, सगळं ऐश्वर्य भोगायला मिळावं म्हणून! मालक

सांगतो, खूप काम करा म्हणजे मी तुमच्या श्रमांवर गब्बर होईन अन् माझ्या रखेलीला सोन्याचं बेडपॅन घेऊन देईन!"

आई हे ऐकत व सर्वांकडे पहात होती तसा त्या रात्रीच्या काळोखात पावेल व त्याच्या सहकाऱ्यांनी स्वीकारलेला मार्ग प्रकाशाने उजळून निघून चकाकत असल्यासारखा तिला भासला.

जेवण आटोपल्यावर सगळेच उठून शेकोटीजवळ जाऊन बसले. त्या आगीच्या ज्वाळा आधाशीपणे लाकडे स्वाहा करीत होत्या. त्या लोकांच्या पाठीमागे गडद काळोखाचा पडदा उभा होता, त्यामुळे पाठीमागचं जंगल व वरचं आकाशही अंधारात गडप झालं होतं. सवेली आपले मोठाले डोळे वटारून आगीच्या ज्वाळांकडे टक लावून पहात बसला होता. तो सारखा खोकत होता व थंडीमुळे थरथरा कापत होता. त्याचं उर्वरित आयुष्य जणू आजारीपणामुळे खंगलेल्या त्याच्या देहातून मुक्त होण्यासाठी धडपडत होतं. ज्वाळांचा प्रकाश त्याच्या चेहऱ्यावर पडूनही त्याची निर्जीव कातडी निस्तेजच दिसत होती. फक्त त्याच्या नेत्रांतच काय ती अंधुकशी, मालवत चाललेल्या ज्योतीसारखी चमक दिसत होती.

"सवेली, तू आत झोपडीत जाऊन पड बाबा!" याकोव त्याच्या अंगावर वाकून म्हणाला.

"काय म्हणून?" सवेली मोठ्या कष्टाने बोलला. "मी इथंच थांबेन, नाहीतरी मला आता लोकांच्या संगतीत फार काळ घालवायला मिळणार नाहीच!"

त्याने सभोवताली नजर टाकली व किंचित् थांबून केविलवाणं स्मित करीत तो पुनः बोलू लागला, "तुमच्या सहवासात मला बरं वाटतं. मी तुमच्याकडे पहातो तेव्हा बड्या लोकांच्या स्वार्थापायी जे लुबाडले गेले आहेत व प्राणास मुकले आहेत त्यांच्या छळाचा तुम्ही बदला घ्याल अशी आशा मला वाटू लागते."

त्याला कोणीच उत्तर दिलं नाही; मग अल्पावधीत त्याचं डोकं निर्जीवपणे त्याच्या छातीवर पडून त्याला बसल्याबसल्याच झोप लागली.

"हा अस्थिपंजर प्राणी नेहमीच असा इथं येऊन बसतो व सदा हेच बोलत असतो!" रिबिन त्याच्याकडे पहात सहानुभूतीने म्हणाला. "त्याच्या आत्म्याला याच गोष्टीने भारून टाकलं आहे. त्याला दुसरं काही दिसतच नाही, ती दृश्यं जणू काय त्याच्या डोळ्यांवर चिकटवूनच ठेवली आहेत!"



"दुसरं पहावं तरी काय त्याने?" आई विचारमग्न होत म्हणाली. "हजारो लोक जर अतिकष्टापायी दिवसेंदिवस मृत्युमुखी पडत आहेत, व मालकांना वाटेल त्या चैनबाजीवर पैसे उडवता यावे यासाठी जर त्यांना राबविण्याचा प्रकार सुरू आहे तर दुसरं पहायचं तरी काय?"

"त्याचं बोलणं ऐकण्याचा कंटाळा येऊ लागतो!" इग्नात म्हणाला. "त्याची कहाणी एकदा ऐकली तरी ती कोणी विसरणं शक्य नाही, पण तो आपला तेच पालुपद आळवत बसतो."

"पण त्या एकाच पालुपदात सारं जीवन सामावलेलं आहे," रिबिन गंभीरपणे म्हणाला. "ते नीट समजून घ्यायला हवं. मी त्याची हकीकत दहाबारा वेळा ऐकली आहे, पण तरीसुद्धा माझ्या मनातल्या सर्व शंका नाहीशा झालेल्या नाहीत. असे काही फार चांगले क्षण असतात की त्यावेळी वाटतं, लोकांपैकी कोणीच अगदी वाईट व मूर्ख नसावेत; अशा वेळी श्रीमंत-गरीब सगळेच आपल्याला जवळचे वाटू लागतात व असं वाटतं की श्रीमंत लोक सुद्धा वाट चुकले आहेत, एवढंच! मग लोकांना म्हणावंसं वाटू लागतं की, बाबांनो, तुम्ही सगळेच माझे बांधव आहात! तुम्ही सगळे जरा नीट विचार करा, प्रामाणिकपणे आत्मपरीक्षण करा, म्हणजे तुम्ही सगळेच चांगले होऊ शकाल!"

सवेली जरा हालला, त्याने डोळे उघडले व मग तो जमिनीवर आडवा झाला. याकोव गुपचाप उठला व आत झोपडीत जाऊन एक ओव्हरकोट घेऊन लगेच बाहेर परत आला व तो त्याने सवेलीच्या अंगाभोवती नीट गुंडाळून त्याला झोपवलं. नंतर तो स्वतः सोफियाच्या शेजारी येऊन बसला.

अग्निज्वाळांच्या सतेज रक्तवर्णाने भोवतालच्या काळ्या आकृती उजळून निघत होत्या आणि त्या लोकांच्या संभाषणाचा आवाज ज्वाळांच्या तड-तडण्यात मिसळून जाऊन विलक्षण गंभीर वातावरण निर्माण झालं होतं.

मग सोफियाने त्यांना सर्व जगातली जनता जगण्याच्या हक्कासाठी कशी लढत आहे याची माहिती सांगितली. फार पूर्वी जर्मन शेतकऱ्यांनी कसा उठाव केला, आयर्लंडची जनता कोणत्या हालअपेष्टांना तोंड देत आहे, फ्रान्सच्या कामगारवर्गाने स्वातंत्र्यासाठी वारंवार कसे लढे केले, वगैरेचं तिने वर्णन केलं...

त्या जंगलावर निशेचा मखमली पेहेराव चढलेला होता, त्याच्या मध्यभागी असलेल्या या लहानशा मैदानाभोवती झाडांची भिंत उभी होती,

ज्वाळांच्या प्रकाशाने उजळून निघालेल्या आकाशाचा घुमट वर दिसत होता, आणि त्या मैदानात बसलेल्या माणसांच्या भोवती काळ्याकुट्ट छाया थैमान घालीत होत्या—अशा या विलक्षण वातावरणात काही घटनांची कहाणी सांगितली जात होती, आणि या घटना अशा होत्या की त्यांनी दुष्टपणाची कृत्ये करणाऱ्या ढेरपोट्या बड्या लोकांच्या जगाला हादरा दिला होता. सत्यासाठी आणि स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या शूर वीरांची नावे उच्चारली जात होती, आणि या लढ्यापायी थकून गेलेल्या व रक्ताने माखलेल्या देशोदेशींच्या जनतेची दृश्ये एकामागून एक श्रोत्यांच्या मनश्चक्षूसमोरून सरकत होती.

सोफिया हळू व घोगऱ्या आवाजात ही सगळी कहाणी सांगत होती. जणू काही भूतकाळाच्या उदरातून बाहेर पडत असलेल्या या कहाणीमुळे श्रोत्यांच्या अन्तःकरणात नव्या आशा व नवा आत्मविश्वास निर्माण होत होता. म्हणूनच दुसऱ्या देशातील आपल्या बांधवांच्या कर्तृत्वाची ही कथा ते अत्यंत उत्सुकतेने ऐकत होते. सोफियाच्या फिकट, बारीक चेहऱ्याकडे टक लावून पहात असता त्यांना या गोष्टीची स्पष्ट कल्पना येत होती की जगातील सर्व देशांच्या लोकांचं पवित्र ध्येय व कर्तव्य एकच आहे, ते म्हणजे स्वातंत्र्यासाठी अविरत लढणं! इतिहासाच्या गडद व रक्तरंजित पडद्याने वर्तमानकाळापासून अलग पाडलेल्या भूतकाळातील निरनिराळ्या जमातींच्या व वंशांच्या लोकांच्या आशाआकांक्षासुद्धा आजच्या त्यांच्या आशाआकांक्षापेक्षा निराळ्या नव्हत्या, याचीही त्यांना या कहाणीमुळे जाणीव झाली. ही कहाणी ऐकता ऐकता त्यांची मनं व अन्तःकरणं साऱ्या जगाशी जोडली गेली व जागोजागी त्यांना आपल्यासारखे दोस्त व सहकारी दिसू लागले. ते सुद्धा पृथ्वीवर न्यायाची प्रतिष्ठापना करण्यासाठी एकजुटीने सज्ज झालेले होते व सुखी, समृद्ध जीवनासाठी लढताना अनन्वित छळ सोसून व रक्त सांडून ते आपल्या या निर्धारावर शिक्कामोर्तब करीत होते.

या नव्या जाणिवेतून त्या श्रोत्यांच्या अन्तःकरणात समग्र जगातील सर्व लोकांशी आपण आत्मिकदृष्टचा निगडित झाल्याची जाणीवही उत्पन्न झाली. ही जाणीव अशी काही विलक्षण होती की त्या सर्वांच्या मनोमन ऐक्यातून जणू काय जगाला एक नवा आत्माच प्राप्त झाला—तो आत्माही असा की प्रत्येक गोष्टीचं रहस्य समजून घेण्याच्या, प्रत्येक गोष्टीचा अर्थ लावण्याच्या उत्कट इच्छेने त्याची सारखी धडपड व तडफड सुरू होती.

ही सर्व कहाणी सांगून झाल्यावर सोफिया निर्धाराने उद्गारली:



"लवकरच एक दिवस असा येईल की त्या दिवशी सर्व देशांचे कामगार खवळून उठतील व आव्हानपूर्वक घोषणा करतील की, बस्स! आम्ही आता यापुढे असलं हीनदीन आयुष्य जगणार नाही! एकदा का सगळे कामगार अशा प्रकारे लढण्याला सज्ज झाले की मग आपला स्वार्थ व लोभ हीच ज्यांची एकमेव शक्ती आहे अशांची सत्ता कोलमडून पडेल, त्यांच्या पायाखालची धरणी हादरून सरकत जाईल व मग त्यांना कशाचाच आधार राहाणार नाही!"

"खरं आहे," रिबिन मस्तक हालवीत उद्गारला. "आपण अंग चोरून न वागता आपलं सर्वस्व जर अर्पण केलं तर आपल्याला अशक्य असं काहीच नाही."

आई मोठ्या कुतूहलाने हे संभाषण ऐकत होती व तिच्या चेहऱ्यावर आनंदाश्चर्य व्यक्त करणारं स्मित विलसलं होतं. सोफियाच्या स्वभावात जो एक प्रकारचा तुटकपणा, एक प्रकारचा ताठरपणा, एक प्रकारची साहसबाजीची वृत्ती आहे असं भासत होतं, ते सर्व त्या कहाणीच्या संथ प्रवाहात अदृश्य झालं होतं. रात्रीची ती शांतता, अग्नीच्या ज्वाळांची मौज, सोफियाचा चेहरा, हे सर्व पाहून आईला फार प्रसन्न वाटत होतं. विशेषतः ते शेतकरी अत्यंत उत्कटतेने व लक्षपूर्वक सोफियाचं बोलणं ऐकत असल्याचं पाहून तिला फार समाधान वाटत होतं. ते यत्किंचित्‌ही हालचाल न करता बसलेले होते व सर्व जगाशी आपले संबंध जोडणारा हा दुवा तुटता कामा नये अशा काळजीने त्या कहाणीचा आस्वाद घेत होते. मधूनमधून त्यांच्यापैकी कुणीतरी अत्यंत सावधगिरीने व हळूच शेकोटीत लाकडं ठेवून देई व त्या जळत्या लाकडातून बाहेर पडणाऱ्या विस्तवाच्या ठिणग्या व धूर यांची बाधा त्या दोघींना पोचू नये म्हणून हात हालवून ठिणग्या व धूर दूर पळवून लावी.

एकदा याकोव मधूनच उठला व म्हणाला,

"जरा एक मिनिट थांबा अं."

तो पळतच झोपडीत गेला व काही पांघरुणं घेऊन लगेच परत आला. तो व इग्नात दोघांनी काही न बोलता ती वस्त्रं त्या दोघींच्या खांद्यावर व गुडघ्यांवर टाकली. मग सोफिया पुनः बोलू लागली. अंतिम विजयाचा दिन आला म्हणजे नवं जीवन कसं निर्माण होईल याचं स्फूर्तिदायक चित्र तिने रेखाटलं. त्यायोगे तिच्या श्रोत्यांना आपल्या सामर्थ्याविषयी विश्वास वाटू लागला आणि जगात इतरत्रही काही मूठभर धनिकांच्या मूर्खपणाच्या

लहरी व चैन चालू ठेवण्यासाठी ज्यांना व्यर्थ राबावं लागत होतं अशा आपल्यासारख्याच श्रमजीवी लोकांशी आपलं बंधुत्वाचं नातं असल्याची जाणीव त्यांच्या ठायी निर्माण झाली.

सोफियाच्या या बोलण्याने आईच्या चित्तवृत्ती उचंबळून आल्या नाहीत, पण त्या बोलण्यामुळे जी बंधुत्वाची भावना जागृत केली तीमुळे तिचंही अन्तःकरण भरून आलं व रोजच्या कष्टमय जीवनाच्या गुलामीत खितपत पडलेल्या लोकांच्या अन्तःकरणात प्रेम, सत्य व प्रामाणिक विचारसरणी निर्माण करण्यासाठी धडपडणाऱ्या, त्यासाठी स्वतःचे प्राणही संकटांत घालणाऱ्या कार्यकर्त्यांविषयी तिला अत्यंत कृतज्ञता वाटू लागली. त्यांच्याविषयी विचार करता करता तिने डोळे मिटून घेतले व ती स्वतःशीच उद्‌गारली. "ईश्वर त्यांचं भलं करो!"

पहाटेच्या सुमारास सोफियाने आपलं बोलणं संपवलं तेव्हा ती अतिशय दमून गेली होती. बोलणं संपवून तिने सस्मित वदनाने आपल्या श्रोत्यांच्या विचारमग्न व उजळलेल्या चेहऱ्यांकडे नजर टाकली.

"आता निघायला हवं आपल्याला!" आई म्हणाली.

"हो, निघायचंच!" सोफिया म्हणाली.

"तुम्हाला जायलाच हवं हे फार वाईट!" रिबिन म्हणाला. त्याच्या आवाजात कमालीचं मार्दव आलं होतं. "तुमचं बोलणं ऐकत राहावंसं वाटतं. लोकांना त्यांच्या बंधुभावाची व ऐक्याची जाणीव करून देणं हे फार मोठं काम आहे. जे आपल्याला हवं आहे, तेच लाखो लोकांनाही पाहिजे आहे, हे माहीत झाल्याने अन्तःकरणात दयाभाव निर्माण होतो—आणि दयाळूपणा ही फार प्रचंड शक्ती आहे!"

"हो तर! तुम्ही दया दाखवा की ज्याला दया दाखवाल तोच मागून तुमच्या पेकाटात लाथ घालायचा!" येफिम हसत हसत उद्‌गारला. तो उठत पुढे म्हणाला, "मिखाइलो काका, आता या दोघींना कोणी पहाण्यापूर्वी त्या निघालेल्याच चांगलं! आपण पत्रकं वाटायला लागलो की ती कोणी आणली याचा तपास सुरू होईलच. अन् मग कुणी तरी म्हणायचा, त्या यावेळा निघालेल्या बाया आलेल्या होत्या त्यांनी तर आणली नसतील?"

"तुम्ही फार त्रास घेतलात आई!" रिबिन मध्येच म्हणाला. "तुमच्याकडे पाहिलं की मला सारखी पावेलची आठवण येते. तुम्ही खरोखरच किती महान कार्य करताहात!"



आता रिबिन बऱ्याच खुषीत येऊन व शांतपणे बोलत होता. हवेत चांगलाच गारवा होता, पण तो अंगावर कोटबीट न घालताच उभा होता; त्याच्या शर्टची बटनं अजूनही उघडीच होती व त्यातून त्याची छाती दिसत होती. त्याचं ते पिळदार शरीर पाहून आईला कौतुक वाटल्यावाचून राहिलं नाही.

"तुम्ही अंगावर काहीतरी घ्यायला पाहिजे," आई प्रेमळपणे म्हणाली. "इथं चांगलीच थंडी आहे की."

"पण माझ्या अंतरंगात भरपूर उष्णता आहे!" तो उत्तरला.

ती तरुण पोरं शेकोटीपाशीच उभी राहून आपापसात हळूहळू बोलत होती व ओव्हरकोट पांघरलेला सवेली त्यांच्या पायाशीच झोपलेला होता. आकाशही आता अंधुक उजळलं होतं, सावल्या नाहीशा झाल्या होत्या व वृक्षांची पानंही सूर्यनारायणाच्या आगमनाच्या आशेने हालचाल करू लागली होती.

"बरंय मग, तुम्ही निघणारच तर आता! अच्छा, नमस्कार!" रिबिन हस्तांदोलनासाठी सोफियाच्या पुढे हात करीत म्हणाला. "हो, पण शहरात कसं न् कुठं भेटायचं तुम्हाला?"

"तुम्ही मला येऊन भेटा म्हणजे झालं." आईने सूचना दिली.

बाजूला उभे असलेले तिघे तरुण मग हळूहळू सोफियाच्या समोर आले व त्यांनी बऱ्याच संकोचाने तिच्याशी हस्तांदोलन केलं. त्या तिघांच्याही अंतर्यामी सुप्त आनंद साठला होता व तिच्याविषयी त्यांना स्नेह व आदर वाटू लागला होता, पण त्याचबरोबर त्या भावनेच्या नाविन्यामुळे त्यांना संकोचल्यासारखं वाटत होतं हे स्पष्ट होतं. ते जरा गोंधळून जाऊन पाय हालवीत चुळबूळ करीत उभे होते व झोपेच्या अभावी तारवटलेल्या डोळ्यांनी तिच्याकडे पहात स्मित करीत होते.

"तुम्ही निघण्यापूर्वी थोडं दूध घ्याल ना?" याकोवने विचारलं.

"दूध आहे का पण शिल्लक?" येफिमने विचारलं.

"ऊं हुं!" इग्नात अस्वस्थ होऊन केसांवर हात फिरवीत म्हणाला. "माझ्या हातून सांडलं सगळं!" ते तिघेही हसले.

ते बोलत होते दुधाविषयी, पण आईने ओळखलं की ते नुसतं निमित्त होतं. खरोखरी पाहाता त्या तिघांनाही ती व सोफिया या दोघींविषयी वाटणाऱ्या सद्‌भावना व्यक्त करायच्या होत्या. सोफियाच्याही ते ध्यानात

आलं व तीही जरा गोंधळली. तिलाही संकोचाने फारसं बोलवेना व ती फक्त "बरं आहे, कॉमरेड्स" असं म्हणून आणि त्यांचे आभार मानून मोकळी झाली.

तिच्या त्या शब्दांमुळेही त्या तिघांना फार आनंद झाला व ते परस्परांकडे पाहून हसले.

तेवढ्यात सवेलीला खोकल्याची उबळ आली. चुलीतला विस्तवही पार विझून जाऊन त्याची राख झाली होती.

"बरंय, नमस्कार!" त्या शेतकऱ्यांनी त्या दोघींना निरोप दिला. हे बोलताना त्यांचे गळे दाटून आले होते याची त्या दोघींनाही जाणीव झाली.

मग त्या दोघी निघाल्या व त्या अंधुक प्रकाशात जंगलातल्या वाटेने चालू लागल्या.

आई सोफियाच्या मागे चालत होती ती सोफियाला म्हणाली, "किती विलक्षण होतं नाही सारं? अगदी एखादं स्वप्न पहावं तसं वाटलं मला! लोकांना सत्य जाणून घ्यायला हवं आहे, खरोखरच त्यांना सत्य जाणून घेण्याची उत्सुकता आहे! नाताळ किंवा ईस्टरच्या सणाच्या दिवशी चर्चमध्ये कसं असतं? पाद्रीसाहेब येण्यापूर्वी सर्वत्र काळोखाचं न् शांततेचं साम्राज्य असतं, मग हळूहळू लोक जमायला सुरवात होते, मूर्तीपुढे एक मेणबत्ती, दुसरीकडे आणखी मेणबत्त्या पेटतात व हळूहळू सगळ्या काळोखाची हकालपट्टी होऊन ते देवाचं घर प्रकाशाने उजळून निघतं!"

"खरंच! अगदी बरोबर!" सोफिया हर्षाने उद्‌गारली. "एवढंच की या आपल्या कहाणीत देवाचं घर म्हणजेच सारं जग आहे!"

"सारं जग!" आई विचारमग्न होत मानेने होकार देत उद्‌गारली. "खरंच तसं झालं तर किती छान होईल! अन् तुम्ही इतकं सुरेख बोललात — खरंच फारच सुंदर! आधी तर तुम्ही त्यांना आवडणार नाही अशीच मला भीती वाटत होती!"

सोफिया क्षणभर थांबली व मग शांतपणे, गंभीरपणे म्हणाली, "या लोकांच्या सहवासाने आपल्या अंगी सुद्धा साधेपणा आल्यावाचून राहात नाही!"

रस्त्याने चालता चालता त्या दोघींच्या त्याच लोकांविषयी गोष्टी सुरू होत्या. रिबिन, तो क्षयरोगी, त्या दोघींचं म्हणणं लक्षपूर्वक ऐकून घेणारी ती मुलं, संकोचामुळे ती बोलली नाहीत तरी लहानसहान कामं करून



कृतज्ञता व्यक्त करण्यातील त्यांची तत्परता, यांविषयी त्या बोलत होत्या. थोड्याच वेळात जंगलातून बाहेर पडून त्या शेतांपाशी येऊन पोचल्या. तोपर्यंत सूर्य उगवून त्यांच्या भेटीला सामोरा येत होता. अजून प्रत्यक्ष सूर्यदर्शन झालं नव्हतं, परंतु त्याच्या तांबूस किरणांचा पिसारा आकाशात डौलाने पसरला होता व गवतावरील दवबिंदूंवरून ते कोवळे किरण परावर्तित होऊन त्यातून दिसणारे इंद्रधनुष्याचे रंग नेत्रांना अत्यंत आल्हादकारक भासत होते. पक्षीही आपली निद्रा संपवून आपल्या मधुर किलबिलाटाने प्रभात-काळच्या उत्साहात भर घालीत होते. चांगले गलेलठ्ठ कावळे काव काव करीत पंख फडफडवीत जोरात उडत होते. मधूनच ओरिओल पक्षी शीळ घालीत होता. बऱ्याच दूरचा प्रदेश दिसत होता व डोंगरांवरून रात्रीच्या काळोखाचा बुरखा काढून टाकून धरतीमाता सूर्यनारायणाचं स्वागत करीत होती.

"पुष्कळदा असं होतं की एखादा माणूस सारखी बडबड करतो तरी त्याचं म्हणणं ध्यानात येत नाही, अन् मग अचानक तो असे काही तरी साधेच शब्द उच्चारतो की एकदम त्याचा आशय सूर्यप्रकाशासारखा स्पष्ट होतो!" आई विचारमग्न होत म्हणाली. "त्या आजारी माणसाच्या बाबतीत तसंच झालं. कारखान्यात व इतरत्र कामगारांना कसं वेठीला धरतात याबद्दल मी पुष्कळ ऐकलेलं आहे, मला स्वतःलाही पुष्कळ माहिती आहे, पण त्याची आपल्याला इतकी सवय झालेली असते की त्याचं काही वाटेनासं होतं! पण त्याने सांगितलं ते फारच भयंकर होतं. फारच लाजिरवाणं जीवन आहे हे! प्रभु येशू, खरंच का रे असं होत असेल? मालकांना स्वतःचे वाटेल ते चोचले पुरवता यावेत, एवढ्यासाठी अनेकांना आपलं सबंध आयुष्य खर्ची घालावं लागतं हे खरं असेल? त्यात न्यायाचा लवलेश तरी आहे का?"

आईचे विचार त्या क्षयरोग्याच्या कहाणीवरच स्थिरावले होते व त्यामुळे तिला माहीत असलेल्या पण ह्या वेळेपर्यंत विसरून गेलेल्या तसल्याच प्रकारच्या अनेक हकीकती तिला आठवल्या व तिचं मन उद्विग्नतेने भरून गेलं.

"या बड्या लोकांना आधाशीपणाचा जणू रोगच जडलेला असतो अन् सर्वच आपल्या घशात घालण्याची त्यांची धडपड असते. माझ्या माहितीचा एक खेड्यातला अधिकारी होता. त्याचा घोडा खेड्यातून जाऊ लागला की सर्व शेतकऱ्यांनी त्याला लवून प्रणाम केलाच पाहिजे असा त्याचा हुकूम होता

व ती आज्ञा जो पालन करणार नाही त्याला धरून तुरुंगात डांबण्याचा त्याचा प्रघात होता. तो हे कां व कशासाठी करायचा? खरंच या प्रश्नाचं उत्तर देणं कठीण आहे..."

सोफियाने सुंदर व प्रफुल्लित प्रभातकाळाइतकंच सुंदर व प्रसन्न गीत गायला प्रारंभ केला...

७

आईचा जीवनप्रवाह आता विलक्षण संथपणे चालला होता. कधीकधी या शांतपणाचं तिचं तिलाच आश्चर्य वाटे. तिचा मुलगा तुरुंगात होता व त्याला काही तरी भयंकर सजा होणार हेही ती जाणून होती, तरीसुद्धा जेव्हा जेव्हा ती पावेलचा विचार करू लागे तेव्हा प्रत्येक वेळी आंद्रेइ, फ्योदोर वगैरेंच्या आठवणी तिच्या मनात गर्दी करून सोडत. पावेलच्या आठवणींबरोबरच त्याच्याबरोबर शिक्षा भोगणाऱ्या इतरांचीही तिला हटकून आठवण येई व पावेलविषयी विचार करताना तिला न कळतच तिचे विचार चारी दिशांना पसरत. प्रकाशाचे बारीक किरण अंधःकाराला बाजूला सारून फैलावत जातात तसेच तिचे पावेलसंबंधीचे विचार सर्व घटनांवर प्रकाश टाकण्यासाठी व सर्वांचं मिळून एकच चित्र तयार करण्यासाठी प्रत्येक वस्तूला स्पर्श करीत असत. त्यामुळे एक चांगला परिणाम असा झाला की फक्त आपल्या पुत्राची काळजी वाहाणं व त्याला भेटण्याची उत्कंठा बाळगणं यातच तिचं मन गुंतून राहिलं नाही.

लवकरच सोफिया निघून गेली, पण पाचच दिवसांनी ती अत्यंत उल्हसित वृत्तीने परत आली. पण यावेळी ती काही तासच तिथं राहून जी अदृश्य झाली ती मग दोन आठवड्यांनी परतली. ती जणू काय जीवनाच्या एका भल्या मोठ्या वर्तुळातून फिरत होती व त्या फिरण्यात ती वारंवार आपल्या भावाकडे येई व त्याच्या घरात धैर्य आणि संगीत यांनी भारलेलं वातावरण निर्माण करून फिरून नाहीशी होई!

हळूहळू आईला संगीताची गोडी लागली. संगीत ऐकताना आता तिला वाटे की त्या उबदार लहरी आपल्या छातीवर आदळून अन्तःकरणाचा ठाव घेत हृदयाचे ठोके अधिक तालबद्ध व लयबद्ध करून टाकीत आहेत, आणि तेथे विलक्षण शक्तिशाली अशा विचारांना जन्म देत आहेत. धरतीच्या उदरात बीज पडून त्याला भरपूर पाणी मिळालं की ते जसं योग्य वेळी



फोफावून बाहेर पडतं तद्वतच हे विचारही संगीताच्या प्रभावाने बहरून येत आहेत, असा तिला भास होई.

सोफिया वागायला मात्र इतकी अव्यवस्थित होती की हे सहन करणं आईला कठीण होऊ लागलं. ती राहायला आली की साऱ्या घरभर तिचे कपडे, सिगारेटचे तुकडे, राख, यांचा पसारा पडायचा. सोफिया वेळोवेळी अत्यंत आवेशपूर्ण भाषणं करी ती तर आईला फारच विचित्र वाटत. या बाबतीत निकोलायचं अगदी सोफियाच्या उलट होतं. तो अत्यंत शांतपणे, आत्मविश्वासाने बोलायचा, व त्याच्या बोलण्यात गांभीर्य असूनही मार्दव असायचं. एखादा माणूस किशोरावस्थेत असतानाच स्वतःला प्रौढ समजतो व इतर लोकांना चित्रविचित्र खेळण्यासारखं लेखतो – सोफियाची वागणूक अशाच प्रकारची असल्याचं आईला वाटे. श्रमाची प्रतिष्ठा व पावित्र्य यांवर बोलताना सोफिया पुष्कळ भाष्य करी, पण प्रत्यक्षात मात्र ती स्वतःच्या अव्यवस्थितपणामुळे आईवर कामाचा बोजा वाढवीत राही. तोंडाने ती स्वातंत्र्याचं गुणगान गाई, पण तिची वागणूक मात्र इतकी असहिष्णुतेची होती व ती इतका वितंडवाद घालीत राही की प्रत्यक्षात त्याचा परिणाम इतरांना दडपून टाकण्यातच होत असे. तिच्या बोलण्याचालण्यातही इतकी विसंगती व परस्परविरोध भरलेला असे की आई तिच्याशी बोलताना अत्यंत सावधगिरीनेच बोलायची, व त्यामुळे निकोलायविषयी आईला जशी जिव्हाळ्याची व आपुलकीची भावना सातत्याने वाटत होती तशी सोफिया-बद्दल वाटत नव्हती.

निकोलायचं नित्याचं जीवन ठराविक साच्याचं असलं तरी तो इतरां-विषयी काळजी वाहात राही. सकाळी आठला तो चहा घेतेवेळी वर्तमानपत्र वाचून त्यातल्या बातम्या आईला सांगे. जीवन हे कसं यंत्रासारखं माणसांना भरडून काढून त्यांचं पैशात रूपांतर करीत राहातं हे त्या बातम्या ऐकताना आईला कळून येऊ लागलं. निकोलायचं निरीक्षण केल्यावर तिला आढळून आलं की त्याचं आंद्रेइशी पुष्कळ साम्य आहे. आंद्रेइप्रमाणेच तोही कुठल्याही प्रकारचा द्वेष व राग मनात न धरता जगातील सर्व अन्यायाबद्दल लोकांना दोष देई, परंतु एक फरक असा होता की पुढे जे नवीन जीवन निर्माण होणार आहे, त्यावरची निकोलायची श्रद्धा आंद्रेइइतकी दृढ नव्हती व त्याच्यापुढचं नवजीवनाचं चित्रही तितकंसं स्पष्ट व आकर्षक नव्हत तो नेहमी एखाद्या न्यायनिष्ठुर न्यायाधीशासारखा बोले, व अत्यंत भयंकर

गोष्टींची चर्चा करताना सुद्धा त्याच्या चेहऱ्यावर खेद व दुःखाची भावना व्यक्त करणारं शांत स्मित दिसलं तरी त्याच्या नेत्रात मात्र करडेपणाचीच छटा दिसत असे. ते पाहून आई हे समजून चुकली की हा कधी कुणाला क्षमा करणार नाही, नव्हे याच्याने क्षमा करवणारच नाही. आणि असं कठोर बनणं त्याचं त्यालाच फार जड जात होतं हे माहीत असल्यामुळे आईला त्याची कीव येई.

नऊ वाजता निकोलाय कामावर निघून जाई. तो गेल्यावर आई घराची साफसफाई व आवराआवर उरकून भोजनाच्या व्यवस्थेला लागे. मग आंघोळ, धुणं वगैरे करून स्वच्छ कपडे परिधान करून ती स्वतःच्या खोलीत पुस्तकांतली चित्रं पहात बसे. तिला आता वाचता येऊ लागलं होतं, पण त्यात तिला इतके कष्ट होत की ती लवकरच कंटाळून जाई व मग निरनिराळ्या शब्दांतील संबंधही तिला आकलन होईनासे होत. पण चित्रं पहाण्यात मात्र तिला अगदी लहान मुलासारखा आनंद होई. त्या चित्रांतून तिला एक नवं व विलक्षण जग दिसू लागे, व ते मात्र अगदी खरंखुरं, तिला आकलन होण्याजोगं वाटल्यामुळे त्यात ती रंगून जाई. तिच्या मनश्चक्षूंसमोर मोठमोठी शहरं, सुंदर इमारती, यंत्रं, जहाजं, स्मारकं, मानवी हातांनी निर्माण केलेली अगणित संपत्ती, व विविध प्रकारचे निसर्गनिर्मित चमत्कार, यांची दृश्यं उभी राहात व त्या सर्वांचं वैचित्र्य पाहून ती स्तिमित होऊन जाई. तिच्या जाणिवेचं जग सारखं विशाल होत होतं, जीवनाचे विविध चमत्कार एकामागून एक तिला दिसू लागले होते, व जीवन हे इतकं विशाल, इतकं संपन्न व समृद्ध आहे, त्याचं सौंदर्य अपार आहे, ही जाणीव होऊन तिचा भुकेला आत्मा व चित्तवृत्ती थरारून जात होत्या. विशेषकरून प्राण्यांचा परिचय करून देणारं सचित्र पुस्तक तिला फार आवडे. वस्तुतः त्या पुस्तकाची भाषा रशियन नसून परकी होती, तरीसुद्धा पृथ्वीवरील संपत्ती, सौंदर्य व पृथ्वीचा अजस्र व्याप, याची तिला त्या पुस्तकावरून चांगली कल्पना आली.

"हे जग किती मोठं आहे, नाही?" आई एकदा निकोलायला म्हणाली.

लहान कीटक-किटाणूंच्या, विशेषतः फुलपाखरांच्या चित्रांनी तिला फारच आकर्षित करून घेतलं. आश्चर्याने स्तिमित होऊन तिने त्या चित्रांचं सूक्ष्म निरीक्षण केलं.

"किती सुरेख आहेत ही, नाही?" ती निकोलायजवळ म्हणाली.



"या जगात किती सौंदर्य भरलेलं आहे! अन् आपलं तिकडे लक्षच नसतं! सगळं आपल्या आजूबाजूने उडत असतं तरी आपण ते पहात नाही! लोकांची सारखी धावपळ सुरू असते, काही माहिती नाही, काही पहाणं नाही, काही नाही! लोकांना ते पहायला वेळ नाही न् इच्छाही नाही! या पृथ्वीची संपत्ती किती विपुल आहे व किती विलक्षण, चमत्कृतिपूर्ण प्राणी इथं वास्तव्य करतात. हे ज्ञान झालं तर किती मोठ्या आनंदाचा आपल्याला लाभ होईल! अन् प्रत्येक वस्तू प्रत्येकासाठी आहे, प्रत्येक वस्तू सर्वांसाठी आहे–खरं ना हे?"

"हो, खरं आहे तर!" निकोलायने उत्तर दिलं व मग त्याने तिला आणखी एक सचित्र पुस्तक आणून दिलं.

संध्याकाळच्या वेळी बरेच लोक निकोलायच्या भेटीला येत. त्यात निरनिराळ्या प्रकारचे लोक असत. अलेक्सेई वासिल्येविच हा दिसायला चांगला देखणा होता व त्याचा फिकट चेहरा, काळी दाढी, त्याचा मितभाषी स्वभाव, यामुळे त्याची एकदम चांगली छाप पडे. या उलट रोमन पेत्रोविच याचा वाटोळा चेहरा पुटकुळ्यांनी भरलेला होता, व त्याची सारखी कशा ना कशाबद्दल कुरकुर चालायची. इवान दानिलोविच हा बुटका, किडकिडीत होता, त्याला टोकदार दाढी होती व तो नेहमी उंच सुरात बोलत असे. त्याची बडबडही सारखी सुरू असायची. येगोर नेहमी स्वतःला किंवा आपल्या सहकाऱ्यांना हसत असायचा, व दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या आपल्या आजाराविषयी चेष्टेने बोलत राहायचा. याखेरीज दूरदूरच्या गावांहून येणारे इतर लोकही होतेच. निकोलाय त्या लोकांशी तासन् तास बोलत बसायचा. त्या संभाषणाचा विषय एकच–जगातले कामकरी लोक हाच–असायचा. ते जोरजोराने वाद घालीत, हातवारे करीत व चहाचे पेलेच्या पेले रिकामे करीत. कधी कधी त्यांचं बोलणं सुरू असतानाच निकोलाय जाहीर पत्रकं लिहून काढी व मग ती त्या कॉमरेड्सना वाचून दाखवी. ते लोक उत्सुकतेने तो मजकूर उतरून घेत व मग मूळ मसुद्याचे फाडून टाकलेले तुकडे आई काळजीपूर्वक गोळा करून जाळून टाकी.

जगातल्या कामकरी लोकांचं जीवन व भवितव्य, त्यांच्यात सत्याचा प्रसार लवकरात लवकर व यशस्वीरीत्या करण्याचे व त्यांची एकजूट उभारण्याचे मार्ग, यांसारख्या विषयांवर ते ज्या उत्साहाने बोलत तो पाहून आईला अचंबा वाटे व त्या लोकांना चहा ओतून देतेवेळी ती त्यांच्याकडे

कौतुकाने पहात राही. पुष्कळदा वादाच्या भरात ते लोक भयंकर संतापून परस्परांवर आरोप-प्रत्यारोपही करीत, पण तरीसुद्धा त्यांची चर्चा सुरूच राहायची.

आईला वाटे की कामगारांचं जीवन या लोकांपेक्षा आपल्याला अधिक चांगलं ठाऊक आहे. तिला असंही वाटे की या लोकांनी अंगिकारलेलं कार्य किती प्रचंड आहे याची सुद्धा त्यांच्यापेक्षा आपल्यालाच अधिक स्पष्ट जाणीव आहे. त्यामुळे लहान मुलं जेव्हा संसाराचा खरा अर्थ व खरी जबाबदारी न समजता नवराबायकोचा खेळ खेळतात तेव्हा एखादं वडीलधारं माणूस ज्या प्रकारे खिन्नतेने त्यांच्याकडे पाहात राहातं तशा वृत्तीने ती निकोलायकडे येणाऱ्या त्या लोकांच्या चर्चेकडे पहात असे. स्वतःला न कळत ती त्या लोकांच्या संभाषणाची पावेल व आंद्रेइच्या बोलण्याशी तुलना करी व त्यात फरक आहे हे तिला जाणवे. पण सुरवातीला हा फरक काय आहे हे तिला उमगत नसे. कधी कधी तिला असंही वाटे की इथले हे लोक कामगार वस्तीतल्या लोकांपेक्षा ओरडतातच फार जास्त! पण मग त्यावर स्वतःचं समाधान करून घेण्यासाठी ती स्वतःशी म्हणे, "यांचं ज्ञान जास्त आहे, म्हणून ते जास्त ओरडतात, दुसरं काय!"

पण पुष्कळदा तिला वाटे की हे उत्तर काही खरं नाही. हे लोक मुद्दामच एकमेकांना उत्तेजित करून स्वतःच्या उत्साहाचा देखावा करीत असावेत, प्रत्येक जण स्वतःला या कार्याविषयी अधिक तळमळ आहे असं इतरांना सिद्ध करून दाखविण्याच्या हेतूनेच मुद्दाम असं बोलत असावा. त्यांच्यापैकीच काहींना याचा राग येई व मग आपण जास्त तळमळीने कार्य करतो हे सिद्ध करण्यासाठी ते उपरोधिकपणे व अट्टाहासाने बोलू लागत. प्रत्येक जण इतरांवर मात करण्यासाठी अधिकाधिक उंच भराऱ्या मारी, व हे पाहून आई अधिकच अस्वस्थ व खिन्न होई.

ती पुष्कळदा त्यांच्याकडे व्याकुळ नजरेने टक लावून पहात राही व स्वतःशीच म्हणे, "पाशा न् त्याचे कॉमरेड्स यांना मात्र हे लोक पार विसरलेले दिसतात!"

त्यांचा सगळाच वादविवाद तिला समजत नसला तरी ती लक्षपूर्वक ते बोलणं ऐकून घेई. पण त्या सर्व शब्दांच्या मागील भावनांचा ती ठाव घेण्याचा प्रयत्न करी तेव्हा तिला हे स्पष्टपणे ध्यानात येई की तिथं, कामगार-वस्तीत चांगुलपणाची चर्चा होई तेव्हा चांगुलपणा काहीतरी संपूर्ण, अशी



कल्पना गृहीत धरलेली असायची, तर उलट हे लोक तिचे तुकडे करीत; तिथं, कामगार वस्तीत लोकांच्या भावना तीव्र व सखोल असत, उलट इथं त्यांची बारीक छाननी होऊन त्यांचे वेगळाले तुकडे पाडले जात! इथले हे लोक जुन्याचा विध्वंस करण्याबद्दलच जास्त बोलायचे, उलट तिकडे, कामगारवस्तीतल्या संभाषणात नवीन जीवनाची स्वप्नंच प्रामुख्याने चर्चिली जात, आणि याच कारणामुळे पावेल व आंद्रेइचं बोलणं तिला अधिक स्पष्ट, अधिक आकलनीय व अधिक प्रिय वाटे.

आईने हेही पाहून ठेवलं होतं की एखादा कामगार भेटीला आला म्हणजे निकोलाय नेहमीपेक्षा जास्तच मोकळेपणाने व सहजपणे वागण्याचा प्रयत्न करी. त्याच्या चेहऱ्यावर साखरेसारखा गोडवा दिसायचा व तो नेहमीपेक्षा निराळ्या प्रकारे, मुद्दामच गावढळ भाषा वापरून बोलू लागायचा.

'या साध्या कामगाराला समजावं म्हणूनच हा असं बोलत असावा,' असं म्हणून आई स्वतःची समजूत घालण्याचा प्रयत्न करी. पण हे समाधान फार वेळ टिकत नसे. तिच्या हेही ध्यानात येई की तो कामगार सुद्धा निकोलायशी बोलताना अस्वस्थ असे व तो आईशी — कामगार वर्गातल्याच एका बाईशी — बोलताना जसं मोकळेपणाने वागे तसं निकोलायशी बोलताना वागत नसे. एकदा एक तरुण कामगार आलेला असता निकोलाय खोलीतून बाहेर गेल्याची संधी साधून तिने त्याला विचारलं:

"तू घाबरलेला दिसतोस, ते कां म्हणून? शाळेतल्या मास्तरपुढं विद्यार्थ्याने धडे म्हणून दाखवताना बिचकत बिचकत बोलावं तसा तू का बोलतोस?"

तो कामगार तोंडावर हसू आणीत म्हणाला,

"कवचधारी जलचर प्राणी सुद्धा पाण्यातून बाहेर पडला की थोडा घाबरतोच... अन् किती झालं तरी हे काही आपल्यापैकी नव्हेतच! नाही का?"

एखादवेळी साशाही तिथं येई. ती आली तर फार वेळ थांबत नसे; न हसता कामापुरतं बोलायची व जातेवेळी आईला विचारायची:

"पावेलची काही खबरबात? तो ठीक आहे ना?"

"हो, ठीक आहे की! देवाच्या कृपेने आनंदात आहे तो."

"त्याला माझा नमस्कार सांगा बरं का," एवढं बोलून साशा निघून जाई.

एकदा आईने साशाजवळ बोलताना तक्रारवजा भाषेत विचारलं की पावेलला तुरुंगात ठेवून इतके दिवस झाले तरी खटला का सुरू करीत नाहीत?

साशाच्या कपाळावर आठ्यांचं जाळं पसरलं पण ती काही बोलली नाही. तिच्या बोटांची मात्र चाळवाचाळव सुरू होती.

आईला सारखं वाटत होतं की हिला म्हणावं, 'तुझं त्याच्यावर प्रेम आहे हे मी जाणते बरं, पोरी!' पण आईला ते बोलण्याचा धीर झाला नाही. साशाचा गंभीर चेहरा, तिने घट्ट दाबून धरलेले ओठ व तिच्या शब्दातला व्यवहारी रुक्षपणा, हे पाहून कसलेही प्रेमळपणाचे शब्द बोलणं शक्यच नव्हतं. साशाने काही न बोलता हस्तांदोलनासाठी हात पुढे केला तो निमूटपणे दाबून आईने एक उसासा टाकला व ती स्वतःशीच उद्‌गारली:

'खरंच पोरी, किती दुःखी आहेस तू!'

एक दिवस नाताशा तिथं आली. आईला तिथं पाहून तिला फारच आनंद झाला. आईच्या कपाळाचं तिने चुंबन घेतलं व लगेच ती अचानकपणे म्हणाली,

"माझी आई वारली हो बिचारी!"

एवढं बोलून तिने आपलं तोंड फिरवलं व चटकन् डोळ्यांवर हात फिरवून मग ती पुढे बोलू लागली:

"पहा ना! पुरी पन्नास वर्षांची सुद्धा नव्हती झाली! अजून पुष्कळ दिवस जगू शकली असती ती. पण एका अर्थी पहाता तिला जे जिणं जगावं लागत होतं त्यापेक्षा मृत्युच बरा असंही वाटल्यावाचून राहात नाही. ती अगदीच एकाकी जगली, कोणी तिच्यावर प्रेम केलं नाही, कुणालाच तिची गरज नव्हती, व माझ्या वडिलांच्या आरडाओरडण्याने ती सारखी भीतिग्रस्त असायची. याला काय जगणं म्हणायचं? इतर लोक जगतात ते पुढे कधी ना कधी तरी बरे दिवस येतील या आशेवर, पण माझ्या आईला बिचारीला सतत नव्या अपमानाखेरीज कशाचीच आशा नव्हती!"

"नाताशा, हे अगदी खरं आहे," आई विचारमग्न होत म्हणाली. "लोक कशाच्या ना कशाच्या आशेवर जगत असतात, पण पुढेही चांगले दिवस दिसण्याची आशा नसेल तर ते जिणं किती भयंकर!"

मग नाताशाच्या हातावर मायेने थोपटून आई म्हणाली,

"आता तुम्ही अगदी एकटयाच राहिलात तर मग?"



"हो. अगदी एकटी!" नाताशाने सहजपणे उत्तर दिलं.

"ठीक आहे," थोडं थांबून आई म्हणाली. "चांगले लोक फार दिवसपर्यंत एकटे राहात नसतात. कोणी ना कोणी त्यांना साथ द्यायला पुढे येतंच!"

## ८

एका कापडाच्या गिरणीतल्या शाळेत नाताशाला शिक्षकिणीची नोकरी मिळाली व आई तिला गुप्त पत्रकं, पुस्तकं, वर्तमानपत्रं यांचा पुरवठा करू लागली.

हेच आईचं काम होऊन बसलं. महिन्यातून कित्येकदा ती कधी गोसावीण तर कधी लेस व हातविणीचा कपडा विकणारी फेरीवाली, कधी सुखवस्तू शहरवासी स्त्री तर कधी यात्रेला निघालेली धर्मभोळी बाई, असे निरनिराळे वेष धारण करून खांद्यावर झोळी किंवा हातात सूटकेस घेऊन भोवतालच्या प्रदेशात हिंडायला निघे. आगगाडीत व बोटीत प्रवास करताना वा खाणावळीत, कुठेही असो ती शांत, साधीभोळी बाई बनून वागायची. ती स्वतः होऊन इतरांशी बोले व असल्या मनमिळाऊपणाच्या वागणुकीमुळे आणि पुष्कळसं जग पाहून आलेल्या व्यक्तीच्या अंगी येणारा आत्मविश्वास तिच्या अंगी सहज दिसून येत असल्यामुळे ती निर्भयपणे इतरांचं लक्ष स्वतःकडे वेधून घेई.

लोकांशी बोलत राहून त्यांच्या हकीकती, तक्रारी व दुःखं ऐकून घ्यायला व त्यांच्या अडीअडचणी समजून घ्यायला तिला फार आवडे. कुणीही माणूस अत्यंत असंतुष्ट आहे व खडतर नशिबाला दोष देऊन सुद्धा तो काही प्रश्नांची स्पष्ट उत्तरं शोधीत आहे असं दिसलं म्हणजे तिला फार आनंद होई. दैनंदिन जीवनात दोन वेळच्या भाकरीसाठी माणसाला किती जिवापाड धडपड करावी लागते याचा चित्रपटच तिच्या डोळ्यांपुढे उभा राही. जिथं पहावं तिथं उघड उघड लोकांच्या डोळ्यात धूळ फेकून त्यांना फसविण्याचे, त्यांचं रक्त शोषून घेऊन स्वतःचं उखळ पांढरं करून घेण्याचे प्रयत्न अगदी निर्लज्जपणे सुरू आहेत हे तिला प्रत्यही आढळून येत होतं. पृथ्वीच्या पाठीवर सर्व वस्तूंचा सुकाळ आहे, सुबत्ता आहे, पण असं असूनसुद्धा सामान्य जनतेच्या नशिबी मात्र अपार दारिद्र्य, उपासमार हेच होतं. शहरातल्या चर्चमध्ये देवाला ज्यांचा काडीचाही उपयोग नाही अशा सोन्याचांदीच्या संपत्तीच्या राशीच्या राशी भरलेल्या होत्या, तर बाहेर दाराशी थंडीने कुडकुडत तांब्या-

च्या पैशासाठी हात पसरून याचना करणाऱ्या भिकाऱ्यांच्या रांगा लागलेल्या होत्या. आईने हे सर्व पूर्वीसुद्धा पाहिलेलं होतं, त्यात नवीन असं काहीच नव्हतं. एका बाजूला संपत्तीने भरलेली चर्चेस व पाद्री लोकांचे भरजरी पोषाख, व दुसऱ्या बाजूला गरिबांच्या झोपड्या व लाज राखायलाही असमर्थ ठरणारे चिंध्या झालेले त्यांचे कपडे, ही सर्व दृश्ये तिला परिचित होती. पण पूर्वी हे सर्व असंच असतं, असं मानून ती त्याची खंत करीत नसे, पण आता हे पाहिलं म्हणजे तिला चीड येई. तिला वाटे, हा गरिबांवर फार अन्याय आहे, असह्य जुलुम आहे, खरोखरी गरीब लोक या धर्ममंदिरांना जवळचे वाटायला पाहिजेत व त्यांनाच धर्माची श्रीमंतांपेक्षा जास्त गरज आहे. पण याची कुणालाच पर्वा नाही!

तिने येशू ख्रिस्ताची जी चित्रं पाहिली होती व त्याच्याविषयी ज्या कथा ऐकलेल्या होत्या, त्यावरून तिला हे ठाऊक होतं की येशूची राहाणी अगदी साधी होती व तो गरिबांचा साहाय्यकर्ता होता. पण आता ती चर्चमध्ये पाही तो त्याच्या मूर्तीवर भरजरी रेशमी वस्त्रं चढवलेली असायची व त्याच्याकडे आसरा घेण्यासाठी धावत येणाऱ्या दीनदुबळयांना पाहून होणारी त्या भारी रेशमी वस्त्रांची सळसळ म्हणजे एक प्रकारचा त्यांचा उपहासच असायचा! अशा वेळी आईला एकदम रिबिनचे उद्गार आठवत. तो म्हणायचा,

"या बड्या लोकांनी ईश्वराच्या बाबतीत सुद्धा आमची फसवणूक केली आहे!"

या निरीक्षणाचा परिणाम असा झाला की प्रत्यक्ष प्रार्थना करण्यापेक्षा येशू ख्रिस्ताचं चिंतन व परिचयाच्या या नव्या लोकांविषयी विचार करण्यात आई अधिक वेळ घालवू लागली. तिला हे दिसून आलं की काही लोक कधीही ख्रिस्ताचं नाव घेत नसत, त्याच्याविषयी त्यांना माहितीही नसावी असं निदान तिला तरी वाटे, परंतु प्रत्यक्षात मात्र ते ख्रिस्ताच्या शिकवणुकीप्रमाणे व त्याच्याचसारखं आचरण करीत, ही धरती हे गरिबांचं राज्य आहे व तिची संपत्ती सर्वांना वाटून दिली पाहिजे, ही ख्रिस्ताची शिकवण आत्मसात् केल्याप्रमाणे हे लोक वागत.

आई जसजसा या गोष्टींचा अधिकाधिक विचार करू लागली तसतसे तिचे विचार परिपक्व होऊ लागले व डोळयांना दिसलेल्या आणि कानांनी ऐकलेल्या प्रत्येक घटनेचा अर्थ लावण्याचा ती प्रयत्न करू लागली. तिच्या



विचारांचं विश्व व्यापक होऊन त्यांना एखाद्या प्रार्थनेसारखं तेजोमय स्वरूप प्राप्त झालं व त्या स्निग्ध ज्योतीने समग्र अंधःकारमय जग, समग्र जीवन, अखिल विश्वाचे सगळे लोक प्रकाशमय झाल्याप्रमाणे भासू लागले. पूर्वीही आईची येशू ख्रिस्तावर भक्ती व श्रद्धा होती, पण पूर्वी त्या श्रद्धेत आशा व भीती, आनंद व दुःख यांचं एक प्रकारचं अस्पष्ट असं मिश्रण होतं, परंतु आता तोच प्रभू येशू तिला अधिक प्रिय झाला होता. तिच्या दृष्टीने तो येशू आता पार निराळाच झाला होता, तो अधिक श्रेष्ठ होऊनही अधिक निकट आला होता, अधिक आनंदी व अधिक तेजस्वी भासू लागला होता. तिला असं वाटू लागलं की ज्या लोकांनी विनयशीलपणे येशूचं—मनुष्यमात्राच्या या मित्राचं—नाव न उच्चारताच त्याच्या नावाने अगदी उदारपणे आपलं रक्त सांडलं, त्या रक्तात न्हाऊनच येशू या पृथ्वीवर पुन्हा अवतीर्ण झाला आहे.

आई जेव्हा प्रवासाहून परत घरी येई तेव्हा ती रस्त्यात जे काही पाहिलं व ऐकलं असेल त्यामुळे उत्तेजित झालेली असे व आपले कर्तव्य पार पाडल्याच्या आनंदाने तिचं हृदय भरलेलं असे.

एकदा सध्याकाळच्या वेळी निकोलायशी बोलताना ती म्हणाली:

"असं हिंडत राहून जग पहाणं खरंच फार चांगलं असतं. त्यामुळे जग कसं चालतं हे समजून येतं. सामान्य लोक बिचारे सारखे बाजूला ढकलले जात असतात, त्या धक्क्यांनी ते दूर लोटले जाऊन जीवनाच्या अगदी किनाऱ्यावर कसेबसे उभे असतात व तिथे भयाण काळोखात उभे राहून असं कां व्हावं, म्हणून ते स्वतःलाच विचारत असतात. का म्हणून ते असे दूर लोटले जावेत? इतक्या अन्नाच्या राशी पैदा होत असताना त्यांची उपासमार का व्हावी? इतकं ज्ञान जगात असताना ते अज्ञानी का राहावेत? आणि अशा वेळी तो ईश्वर कुठं असतो? जो ईश्वर गरीबश्रीमंतांचा भेद न करता सर्वांनाच आपली प्रिय लेकरं समजतो तो या आपल्या लेकरांचे हाल का पहात राहातो? लोक आपल्या आयुष्याचा विचार करतात तेव्हा ते संतापून जातात व या अन्यायाचा प्रतिकार केला नाही तर त्याखाली आपण चिरडले जाऊन नष्ट होऊ असे विचार त्यांच्या अन्तःकरणात थैमान घालू लागतात."

हळूहळू तिला तीव्रतेने असं वाटू लागलं की आपणच लोकांवर होणाऱ्या या अन्यायाबद्दल, जुलुमाबद्दल त्यांच्याशी बोललं पाहिजे; कधीकधी तर तिची ही इच्छा इतकी अनावर होई की ती दाबून टाकणं तिला फार जड जाई.

आई घरी पुस्तकांतली चित्रं पाहात बसलेली असायची तेव्हा निकोलाय तिथं आला तर तो हसून तिला जगातील काही आश्चर्यकारक गोष्टींची माहिती सांगे. मानवाच्या महत्त्वाकांक्षा व धाडशी प्रयत्नांच्या हकीकती ऐकून सहजच तिला फार अचंबा वाटे व ती साशंक होऊन विचारी:

"खरंच, हे शक्य तरी आहे का?"

निकोलायचा मानवी प्रयत्नांवर व मानवाच्या उज्ज्वल भवितव्यावर दुर्दम्य विश्वास होता, त्यामुळे आईने असा संशय व्यक्त केला म्हणजे तो आपल्या चष्म्यातून प्रेमळ दृष्टीने तिच्याकडे पाही व भविष्यकाळाविषयीच्या आणखी कल्पना व माहिती तिला सांगू लागे. तो म्हणायचा:

"मानवाची इच्छाशक्ती अमर्याद व त्याचं सामर्थ्यही अचाट आहे. परंतु जगाची आत्मिक उन्नती मात्र फारच मंदगतीने होत आहे, कारण आज कुणालाही स्वतंत्रपणे वागायचं असेल तर त्याला ज्ञानाऐवजी पैशाचा संचय करावा लागतो. पण लोकांनी स्वार्थी व लोभी वृत्ती सोडून दिली व सक्तीने दुसऱ्याचे श्रम लुबाडणं बंद झालं म्हणजे..."

या शब्दांचा अर्थ आईला नीट समजत असे अशातला भाग नाही, पण त्या शब्दांना प्रेरणा देणारी अढळ निष्ठा काय आहे याची मात्र तिला हळूहळू जाणीव झाली:

"पण अशा बंधमुक्त व स्वतंत्र लोकांची संख्या जगात फार थोडी आहे हीच खरी अडचण आहे," निकोलाय म्हणाला.

आईला हे समजणं कठीण गेलं नाही. स्वार्थ, लोभ, द्वेष, यांपासून मुक्त झालेले लोक तिने पाहिले होते व अशा लोकांची संख्या वाढत गेली तर जीवन इतकं अंधःकारमय व भयंकर न राहाता अधिक सोपं, सरळ, अधिक तेजस्वी व अधिक भव्य होईल, असा तिचा विश्वास होता.

"लोकांना दुष्ट व्हायला भाग पाडलं जातं," निकोलाय खिन्नपणे उद्गारला.

आईला खोखोलचे तसलेच शब्द आठवले व तिने संमतिदर्शक मान हालवली.

## ९

निकोलाय सर्वच बाबींप्रमाणे कामावरून घरा परत येण्याच्या बाबतीतही अत्यंत वक्तशीर होता. पण एक दिवस त्याला घरी यायला उशीर झाला.



"आज आपला एक कॉमरेड तुरुंगातून निसटल्याची बातमी आहे, निलोव्ना. कोण बरं असेल तो? तेवढं मात्र मला समजू शकलं नाही." तो घरी परत येताच अंगावरचा कोटसुद्धा न काढता अस्वस्थपणे हातांवर हात चोळीत आईला म्हणाला.

आई एकदम उत्तेजित झाली.

"तो पावेल असेल का?" ती खाली बसत पुटपुटली.

"शक्य आहे," निकोलाय खांदे उडवीत म्हणाला, "पण त्याला लपून राहायला मदत कशी करता येईल? त्याला शोधायचंच कसं? मी बराच वेळपर्यंत तो दिसेल या आशेने रस्त्यातून भटकलो. तशी आशा करणं हे अर्थात्च मूर्खपणाचं होतं, पण आपल्याला काही तरी केलंच पाहिजे. मी पुनः बाहेर जाऊन पहातो."

"मी सुद्धा जातेच!" आई जोरात म्हणाली.

"तुम्ही येगोरकडे जाऊन त्याला काही माहिती असली तर पहा!" निकोलायने घाईने बाहेर जाता जाता आईला सल्ला दिला.

आईने डोक्यावर रुमाल टाकला व त्याच्या पाठोपाठच ती बाहेर पडून रस्त्यावर आली. तिचं अन्तःकरण आशेने भरलेलं होतं. तिच्या नेत्रांपुढे लाल ठिपके नाचत होते व तिच्या छातीत अशी धबधड होत होती की ती जवळ जवळ धावतच होती. मान खाली घालून भोवताली कशाकडेही लक्ष न देता एका विशिष्ट ठिकाणी तो भेटेल अशा दृढ आशेने ती झपाझप चालत होती.

"तो तिथं भेटला तर!" या विचाराने तिच्या पायांना अधिक वेग मिळत होता.

त्यावेळी चांगलाच उकाडा असल्यामुळे ती लवकरच दमून जाऊन धापा टाकू लागली. येगोरच्या घरापर्यंत जाऊन पोचेपर्यंत ती इतकी दमली की तिला जिना सुद्धा चढवेना. ती तिथंच थांबली व तिने मागे वळून पाहिलं तो एकदम तिच्या तोंडून एक बारीक चीत्कार बाहेर पडला व तिने डोळे मिटून घेतले. त्या घराच्या फाटकाशीच एक माणूस खिशात हात घालून उभा होता व तो निकोलाय वेसोव्श्चिकोवच असावा असा तिला भास झाला.

पण तिने पुनः वळून पाहिलं तो तिथं कुणीच नव्हतं.

"मला भासच झाला तो!" ती स्वतःशी म्हणाली व जिना चढू लागली. तरी तिचे कान बाहेर लागलेले होतेच. तिला कुणाची तरी चाहूल

आली. ती वर दारापाशी उभी राहिली व तिने खाली वाकून पाहिलं. पुन: तिला तो देवीचे वण असलेला चेहरा दिसला; यावेळी तो नक्कीच तिथं उभा होता व तिच्याकडे पाहून स्मित करीत होता.

"निकोलाय! निकोलाय!" ती मोठ्याने म्हणाली व भराभर पायऱ्या उतरून त्याला भेटायला ख़ाली येऊ लागली. पण तिचं अन्त:करण मात्र निराशेने व्यापलं होतं.

"अं हं, तुम्ही वर जा परत!" तो हळूच हाताने खुणवीत तिला म्हणाला.

ती पुन: भराभर जिना चढून वर गेली व येगोरच्या खोलीचं दार उघडून आत शिरली. येगोर समोरच पलंगावर पडलेला होता.

"निकोलाय – तो पळून आला आहे. तुरुंगातून –" तिने कसाबसा श्वास घेत अडखळत सांगून टाकलं.

"कोणता निकोलाय?" येगोरने एकदम उशीवरून डोकं उंच करीत घोगऱ्या आवाजात विचारलं. "कारण निकोलाय दोन आहेत."

"वेसोव्श्चिकोव. तो इथंच येतोय!"

"अस्सं? ठीक!"

तेवढ्यात निकोलाय स्वत:च खोलीत येऊन थडकला. त्याने आत प्रवेश करताच दार लावून घेतलं. मग डोक्यावरची टोपी काढून केस मागे वळवीत तो उभा राहिला व दात विचकून त्या दोघांकडे पाहू लागला.

"आलास? शाबास!" येगोर कोपर टेकून अर्धवट उठून बसत व मान हालवीत निकोलायला म्हणाला.

निकोलाय स्मित करीत आईजवळ आला व त्याने तिच्याशी हस्तांदोलन केलं. मग तो तिला उद्देशून बोलू लागला:

"तुमची भेट झाली नसती तर मी बहुधा तुरुंगातच परत गेलो असतो. या शहराच्या भागात माझी कुणाशीच ओळख नाही अन् आपल्या वस्तीत परत गेलो तर ताबडतोबच ते मला पकडतील! म्हणून मी आपला रस्त्यावर भटकत होतो व कुठून हा पळून येण्याचा मूर्खपणा केला असा स्वत:लाच दोष देत होतो. अचानक मला तुम्ही भराभर चाललेल्या दिसलात व मी तुमच्या मागोमाग निघून आलो."

"तुम्ही निसटलात कसे?" आईने विचारलं.

तो पलंगाच्या एका कोपऱ्यावर अंग चोरून संकोचाने बसला व खांदे उडवून बोलू लागला:



"निव्वळ योगायोग! मी नेहमीप्रमाणे आवारात हवा खात फिरत होतो तेवढ्यात गुन्हेगार कैद्यांनी एका पहारेकऱ्याला बडवून काढायला सुरुवात केली. या पहारेकऱ्याला मागे चोरी केल्याबद्दल पोलिसमधून बडतर्फ करण्यात आलं होतं. आता तो सर्वांवर पहारा करून हेरगिरी करतो, वसावसा ओरडतो अन् सर्व कैद्यांना छळत असतो. म्हणून त्यांनी आज त्याला धरून झोडपलं. त्यामुळे सगळीकडे गोंधळ माजला, इतर पहारेकरी शिट्ट्या वाजवीत धावपळ करू लागले. या गोंधळात मला सहज दिसलं की फाटक सताड उघडं आहे न् पलिकडचं मैदान अन् गावही दिसत आहे. मी आपला स्वत:ला न कळत, स्वप्नात चालावं तसा हळूहळू चालू लागलो, अन् बरंच अंतर चालून गेल्यावर मग मी भानावर आलो व विचार करायला लागलो की मी निघालो खरा, पण जाणार कुठं? अन् मग मी मागे वळून पाहिलं तो फाटक बंद झालेलं होतं!"

"हूं!" येगोर म्हणाला. "मग तू परत का नाही गेलास? चांगलं जायचं, सभ्यपणाने दार ठोठवायचं अन् त्यांना परत आत घेण्याची विनंती करायची! म्हणायचं, 'महाशय, मला क्षमा करा! माझ्या हातून थोडीशी चूक झाली!'"

"हो!" निकोलाय हसून उद्‌गारला. "माझा परत जाण्याचा विचार मूर्खपणाचा होता खरा, पण तिथल्या कॉमरेड्सना तसंच सोडून देऊन, कुणाला काही न सांगता सवरता निघून जाणंही मला योग्य वाटेना. तरी मी पुढे चालत होतोच. पुढे मेलेल्या मुलाला स्मशानात घेऊन चाललेली एक प्रेतयात्रा दिसली तसा मी त्या मंडळीत सामील झालो व मान खाली घालून कुणाकडे न पहाता शवपेटीच्या मागे चालू लागलो. काही वेळ स्मशानभूमीत हवा खात बसल्यावर एक विचार माझ्या डोक्यात आला –"

"एकच?" येगोरने विचारलं व मग उसासा टाकीत तो पुढे म्हणाला, "अरेरे! त्या एकाच विचाराने तुझ्या मेंदूत गर्दी करून सगळी जागा अडवून टाकली असेल, नाही?"

वेसोव्श्चिकोव मोकळेपणाने हसला व मान हालवीत म्हणाला,

"अं हं! अरे बाबा, माझं डोकं आता पूर्वीसारखं पोकळ न् रिकामं राहिलेलं नाही बरं का. पण येगोर, तू अजूनही आजारीच आहेस!"

"प्रत्येकाला जे साधतं ते तो करतो!" येगोरला खोकल्याची उबळ आली त्यामुळे तो खोकतच म्हणाला. "पण तू तुझी हकीकत पुढे सांग पाहू."

"मग मी तिथून निघून वस्तुसंग्रहालयात गेलो. तिथं वस्तु पहात हिंडत असता मी स्वतःशी विचार करीत होतो की आता जायचं कुठं? मला अगदी वेड्यासारखं झालं होतं. अन् भूकही अगदी एखाद्या अस्वलासारखी वखवखून लागली होती. मग मी तिथून बाहेर पडलो व अत्यंत निराश होऊन रस्त्यावर भटकू लागलो. पोलिस सगळ्या येणाऱ्या–जाणाऱ्यांकडे निरखून पहात होते. मला वाटू लागलं की माझ्यासारखा मठ्ठ माणूस केव्हाच पकडला जाईल अन् आपल्याला लवकरच कोर्टात न्यायाधीशापुढे जाब द्यावा लागेल. पण तितक्यात अचानक पेलाग्येया निलोव्ना घाईघाईने माझ्याचकडे येताना दिसल्या. मग मी त्यांच्याकडे चालू लागलो अन् इथं आलो. बस्स इतकंच!"

"मी मात्र तुम्हाला पाहिलं नव्हतं बरं का!" आई ओशाळून म्हणाली. मग ती निकोलायकडे निरखून पाहू लागली तो तिला असं दिसून आलं की तो आता बराच खंगलेला आहे.

"तिथल्या कॉमरेड्सना मात्र काळजी वाटत असेल!" निकोलाय डोकं खाजवीत म्हणाला.

"अन् बिचारे अधिकारी! त्यांची नाही दया येत तुला? तेही तर बिचारे चिंतातुर असतील!" येगोर म्हणाला. त्याने तोंड उघडलं व दातांनी हवा चावावी तशी त्याच्या ओठांची हालचाल होऊ लागली. मग तो पुनः बोलू लागला, "ही चेष्टा राहू दे आता. प्रथम तुला कुठं तरी लपवून ठेवण्याची व्यवस्था करायला हवी. ते करणं मोठं खुषीचं असलं तरी सोपं नाही खास. अशा वेळी मी चांगला हिंडूफिरू शकतो तर!" त्याला तेवढ्यात दम लागला व तो छातीवर हात टाकून हळूहळू छाती चोळू लागला. त्याच्या त्या क्रियेतही जोर कसा तो नव्हताच.

"तुझा आजार फारच जास्त झालाय, येगोर!" निकोलाय खाली मान घालून म्हणाला.

आईनेही एक उसासा टाकला व तीनच माणसं असूनही गर्दी झाल्यासारखं भासणाऱ्या त्या लहानशा खोलीत तिने सभोवताली नजर टाकली.

"तो माझा प्रश्न आहे," येगोर म्हणाला. "आई, तुम्ही आता निष्कारण कशाचा आव न आणता सरळ पावेलबद्दल विचारा बरं याला." वेसोव्श्चिकोवने स्मित केलं व तो म्हणाला,

"पावेल मजेत आहे. त्याची प्रकृतीही चांगली आहे. तिथं आम्हा सर्वांच्या पुढाऱ्याचं काम त्यांच्याचकडे आहे. अधिकाऱ्यांशी बोलणीचालणी करायचं व एकंदरीने सगळी जबाबदारी सांभाळायचं तोच पाहातो. त्याच्याबद्दल सर्वांनाच फार आदर वाटतो."

वेसोव्श्चिकोवचं हे बोलणं ऐकत असता आई मान डोलावत होती व डोळ्याच्या एका कोपऱ्यातून येगोरच्या फिकट पांढुरक्या चेहऱ्याकडे पाहात होती. येगोरचा चेहरा कमालीचा सपाट, स्थिर व निर्विकार दिसत होता. पण त्याचे डोळे मात्र आनंदाने व उत्साहाने चमकत होते.

"मला काही खायला मिळेल का? मला कमालीची भूक लागली आहे," निकोलाय मध्येच म्हणाला.

"तिथं कपाटात वरच्या बाजूला थोडा पाव आहे, आई," येगोर म्हणाला. "मग बाहेर जाऊन तिथं दुसऱ्या खोलीचं दार वाजवा. एक बाई दार उघडील. तिला म्हणावं मिळेल तेवढं अन्न घेऊन मी बोलावलं आहे."

"इतकं कशाला?" निकोलाय म्हणाला.

"अं... काही विशेष नाही, फारसं नसेलच ते."

आईने बाहेर जाऊन दरवाजावर टकटक केलं व येगोरबद्दल विचार करीत दार उघडण्याची वाट पाहात ती उभी राहिली. तिला वाटत होतं, येगोर आता लवकरच मरणार–

"कोण आहे ते?" दाराच्या आतून आवाज आला.

"मी. येगोर इवानोविचकडून आलेय!" आईने शांतपणे उत्तर दिलं. "त्यांनी तुम्हाला त्यांच्या खोलीत बोलावलंय."

"बरं आलेच!" त्या बाईने दार न उघडता आतूनच सांगितलं. आईने क्षणभर वाट पाहून पुनः दार ठोठावलं. मग झटकन् दार उघडलं गेलं व एक चष्मा लावलेली उंच बाई बाहेर आली व आपल्या बाह्यांना पडलेले सळ नीट करीत तिने थंडपणे विचारलं,

"काय पाहिजे तुम्हाला?"

"येगोर इवानोविचनी पाठवलंय मला."

"बरं या तर. पण मला वाटतं मी तुम्हाला ओळखते. खरं ना?" ती बाई म्हणाली. या वेळी तिच्या आवाजात मार्दव होतं. ती पुढे म्हणाली, "तुमचं कसं चाललंय? ठीक आहे ना? इथं काळोख आहे, नाही?"

आईने तिच्याकडे पाहिलं तेव्हा तिच्या ध्यानात आलं की निकोलायच्या घरीच काही वेळा ती आलेली तिने पाहिली होती.

"हे सगळे लोक आपलेच आहेत तर!" आई स्वतःशीच उद्‌गारली.

ती बाई आईला पुढे घालून स्वतः तिच्या पाठोपाठ चालू लागली.

"येगोरला त्रास होतोय का?" तिने विचारलं.

"हो ना, तो अगदी पडून आहे. तुम्हाला काही तरी खायचं घेऊन यायला सांगा म्हणून सांगितलं होतं त्याने."

"त्याची काही जरूर नाही."

त्या दोघी येगोरच्या खोलीत शिरल्या तसा त्यांना येगोरचा जोराने श्वास चालत असल्याचा आवाज ऐकू आला.

"मी माझ्या पूर्वजांकडे चाललो बरं, दोस्त... अरेच्या, लुद्‌मिला वासिल्येवना! हे पहा हा माझा दोस्त आहे ना, याने तुरुंगातून तिथल्या अधिकाऱ्यांना न विचारताच सुट्टी घेतली आहे! प्रथम याला काहीतरी खायला द्यायचं अन् मग त्याला कुठं तरी दडवून ठेवायचं, बरं का!"

त्या बाईने मान हालवली व येगोरकडे एक करडी नजर टाकून म्हटलं,

"हे लोक आल्याबरोबरच मला सांगायचं नाही का? अन् हे औषधाचे दोन डोस तसेच घ्यायचे राहिलेत! शर्थ झाली आता मात्र! अन् तुम्ही माझ्याबरोबर चला पाहू कॉमरेड! येगोरला इस्पितळात न्यायला आता इतक्यात येतील की ते लोक!"

"तर मग माझी इस्पितळात रवानगी करायचं ठरवलंच वाटतं?"

"होय, मी तिथं राहाणार आहे तुझ्याजवळ."

"तू सुद्धा? अरे देवा!"

"हं, हा बाष्कळपणा पुरे झाला आता!"

त्या बाईने बोलता बोलताच येगोरचं ब्लँकेट त्याच्या अंगावर छातीपर्यंत ओढून घेतलं, निकोलायकडे निरखून पाहून घेतलं व औषधाच्या बाटल्यात किती औषध शिल्लक होतं तेही पाहून घेतलं, ती अत्यंत शांत व लयबद्ध आवाजात बोलत होती व तिच्या हालचालीही मोठ्या मोहक होत्या. तिचा चेहरा फिकट होता व तिच्या दाट भुवया थेट नाकाच्या टोकापर्यंत येऊन भिडल्या होत्या. आईला तिचा चेहरा आवडला नाही व तिला वाटलं, ही बाई फारच तापट असावी. त्या बाईच्या डोळ्यात हसू नाही की चमक नाही, सदा गंभीर! ती बोलायची ते सुद्धा अधिकारवाणीने!

"आम्ही जरा जातो अं इथून," त्या बाईने आईला सांगितलं. "पण मी लगेच परत येते. तंवर हे एक चमचा औषध येगोरला देऊन टाका. अन् त्याला बिलकुल बोलू द्यायचं नाही, बरं का."



मग ती निकोलायला घेऊन तिथून निघून गेली.

"विलक्षण बाई आहे ही," येगोर उसासा टाकून म्हणाला. "खरोखरच कमालीची विलक्षण बाई आहे ही. तुम्हालाही तिच्याबरोबर काम करण्याची व्यवस्था केलीच पाहिजे, आई. बिचारी काम करून करून पार दमून जाते..."

"अं हं, बिलकुल बोलायचं नाही! हे औषध घ्या पाहू!" आई प्रेमळपणे म्हणाली.

येगोरने औषध पिऊन टाकलं व मग एक डोळा मिटून घेतला.

"मी येवीतेवी मरणार तर आहेच, मग तोंड बंद ठेवलं तरी काय उपयोग?"

हे बोलत असताना येगोर एका उघड्या डोळ्याने आईकडे पहात होता व त्याच्या ओठांच्या पाकळ्या विलग होऊन त्यातून हसू बाहेर फुटत होतं. आईचं मस्तक खाली झालं व ती व्यथित होऊन तिचे डोळे पाणावले.

"त्यात विशेष काही नाही, आई! हे तर चालायचंच! जीवनाचा आनंद लुटायचा तर मृत्यूला तोंड द्यायलाच हवं!"

आईने त्याच्या कपाळावर हात ठेवीत म्हटलं,

"थोडं नाही बोललं तर नाही का चालायचं?"

त्याने डोळे मिटून घेतले. जणू काय आपल्या छातीची धडधड ऐकण्याचा तो प्रयत्न करीत होता.

"गप्प राहाण्यात काही सुद्धा अर्थ नाही, आई!" तो हटवादीपणे म्हणाला, "गप्प राहून तरी मला काय फायदा होणार? काही थोडे क्षण जास्त जगण्याचा अनुभव घेता येईल एवढंच! अन् त्याऐवजी तुमच्यासारख्या चांगल्या स्त्रीशी थोडं बोलण्याचं सुख मिळतंय ते मात्र मी गमावून बसेन! त्या दुसऱ्या जगातले लोक इथल्या लोकांइतके चांगले असणं शक्य नाही अशी माझी तरी पक्की खात्री आहे."

"हे पहा, तुम्ही असं बोलणं चालू ठेवलं तर मला मात्र निष्कारण त्या शेजारीण बाईची बोलणी खावी लागतील!" आई व्यग्रचित्ताने म्हणाली.

"ती नुसती बाई नाही, तर एक क्रांतिकारक कॉमरेड आहे. फार कर्तबगार आहे ती बरं! ती तुम्हाला दम भरेल यात काहीच संशय नाही. सर्वांनाच दमदाटी करीत असते ती."

येगोरला बोलताना कष्ट होत होते तरी तो आपल्या शेजारणीच्या

आयुष्याची कहाणी आईला सांगू लागला. त्याच्या डोळ्यांत मिस्किलपणाची चमक होती व तो आपली थट्टा करीत असल्याचं आईने ओळखलं.

"बिचाऱ्याचं मरण अगदी जवळ आलंय" आईने त्याच्या फिकट, ओलसर चेहऱ्याकडे पाहून स्वतःशीच म्हटलं.

लुद्‌मिला तिथं आली, तिने काळजीपूर्वक दार बंद करून घेतलं व मग ती आईला म्हणाली,

"तुमचा तो माणूस आहे त्याला पोषाख बदलून शक्य तितक्या लवकर माझ्या खोलीतून जायला हवं. तुम्ही लगेच जाऊन त्याला घालायला काही कपडे घेऊन या. सोफिया इथं नाही हे फारच वाईट झालं. लोकांना लपवून ठेवण्याच्या कामात ती फार तरबेज आहे."

"ती उद्या यायची आहे," आई जाण्याच्या तयारीने अंगावर शाल घेता घेता म्हणाली.

आईकडे कोणतीही कामगिरी सोपविण्यात आली की ते काम झटपट व उत्तम तऱ्हेने पार पाडण्याच्या विचारात ती इतकी गुंगून जाई की तिचं दुसऱ्या कोणत्याच गोष्टीकडे लक्ष राहात नसे.

"त्याला कशा प्रकारचे कपडे पाहिजेत?" आईने तत्परतेने विचारलं

"कसलेही चालतील. नाहीतरी रात्रीच जाईल तो."

"हं – रात्री तर फारच जास्त धोका! रस्त्यांवर लोकांची फारशी रहदारी नसते अन् पोलिसही जास्त जागरूक असतात. शिवाय तो काही फारसा चलाख नाही हे पाहिलंतच तुम्ही!"

येगोर हसला, पण हसतानाही त्याचा घसा वाजत होता.

"मी तुमच्या भेटीला इस्पितळात आलं तर चालेल ना?" आईने त्याला विचारलं.

त्याने मानेनेच होकार भरला, तेवढ्यात त्याला खोकल्याची उबळ आली.

"तुम्ही न् मी पाळीपाळीने याच्याजवळ बसू या का?" लुद्‌मिला आपल्या काळ्याभोर डोळ्यांनी आईकडे पहात म्हणाली. "हो ना? मग चांगलं झालं. पण आता तुम्ही अगदी लवकर जा कशा."

तिने प्रेमळपणे पण अधिकाराने आईला हात धरून दरवाजापर्यंत नेऊन निरोप दिला.

"मी तुम्हाला असं बाहेर काढलं म्हणून रागावू नका बर का,"



लुद्‌मिला बाहेर आल्यावर आईला म्हणाली. "पण त्याला अगदी बोलू द्यायचं नाही. तो वाचेल अशी अजूनही आशा आहे."

तिने आईचा हात दुखेपर्यंत दाबला व दमून गेल्याप्रमाणे डोळे मिटून घेतले. तिच्या स्पष्ट बोलण्यामुळे आईलाच जरा संकोचल्यासारखं झालं व ती हळूच म्हणाली:

"काय, म्हणताय तरी काय तुम्ही?"

"तुम्ही जाताना कोणी हेर पाळतीवर नाही अशी काळजी घ्या अं!" लुद्‌मिला अगदी हलक्या आवाजात म्हणाली व तिने दोन्ही हात कानशिलांवर नेऊन खसखसा चोळले. तिचे ओठही थरथरले व तिच्या चेहऱ्यावरील करडेपणाचा भावही काहीसा मावळला.

"त्यांना चांगली ओळखते मी!" आई काहीशा अभिमानानेच उत्तरली.

आई फाटकातून बाहेर पडली तशी एक क्षणभर उभी राहून तिने अंगावरची शाल नीट केली व तेवढ्यात चहूबाजूला नजर टाकून पाहून घेतलं. भर गर्दीत सुद्धा साध्या पोषाखातले गुप्त पोलिस ती अचूक ओळखून काढी. मुद्दाम बेपर्वाई दाखविण्याची त्या लोकांची ढब, त्यांच्या हालचालीतील कृत्रिम सहजता, भिरभिर फिरणाऱ्या नजरेतील लबाडी झाकण्यासाठी चेहऱ्यावर मुद्दाम आणलेला दमून व कंटाळून गेल्याचा आविर्भाव, हे सर्व हेरून त्यावरून गुप्त हेर ओळखण्याची तिला चांगलीच संवय झाली होती.

असला काही प्रकार इथं दिसत नाही हे नीट पाहून घेतल्यावर ती भराभर रस्ता आलांडून निघाली व समोर एक गाडी दिसली तिला हटकून तिने गाडीवाल्याला गाडी बाजाराकडे घेण्यास सांगितलं. बाजारात तिने निकोलायसाठी एक कोट खरेदी केला तेव्हा तिने मुद्दामच किंमतीसाठी बरीच घासाघीस केली व आपल्याला नेहमीच नवे कपडे घ्यायला भाग पाडणाऱ्या दारुड्या (अर्थात् काल्पनिक – अनु.) नवऱ्याच्या नावाने बऱ्याच शिव्या मोजल्या. तिच्या त्या युक्तीचा दुकानदारावर काहीच परिणाम झाला नाही, परंतु ती मात्र स्वतःवरच फार खूष झाली, कारण निकोलायला वेष बदलायला कपडे लागणारच अशा विचाराने पोलिस अधिकारी नक्कीच काही हेर बाजारात पाठविल्यावाचून राहाणार नाहीत असा गाडीतून येतानाच तिने मनाशी अंदाज बांधला होता. अशाच प्रकारे खबरदारीने वागून ती येगोरच्या घरी परत गेली अन् मग तिला निकोलायला शहरच्या वेशीपर्यंत नेऊन सोडण्याची जबाबदारीही पार पाडावी लागली. ती दोघे जायला निघाली

तेव्हा वेगवेगळी रस्त्याच्या दोन बाजूंनी चालत होती. निकोलाय मान खाली घालून रखडत चालला होता, त्याच्या लांब तपकिरी रंगाच्या कोटाची खालची बाजू त्याच्या पायात अडकून त्याच्या चालण्यात अडथळा निर्माण होत होता व वर त्याचो हॅट कपाळावरून थेट नाकापर्यंत खाली येऊन घट्ट बसलेली होती. एका ओसाड गल्लीत येऊन पोचल्यावर तिथं साशा त्यांना येऊन भेटली व मग मानेनेच वेसोव्श्चिकोवचा निरोप घेऊन आई घराकडे परतली. परत येतेवेळी ती व्यथित अन्तःकरणाने स्वतःशीच म्हणत होती.

"पण पावेल मात्र अजून तुरुंगातच... अन् आंद्रेइ सुद्धा..."

## १०

आई घरी येऊन पोचली तो निकोलाय फारच अस्वस्थ झालेला तिला दिसला. तो एकदम तिला म्हणाला,

"येगोरची तब्येत फारच बिघडली आहे! फारच बिकट अवस्था आहे त्याची! त्याला इस्पितळात पोचवलं आहे, लुद्‌मिला आत्ताच इथं येऊन तुम्हाला यायला सांगून गेली..."

"कुठं? इस्पितळात?"

निकोलायने अस्वस्थपणे चष्मा नीट केल्यासारखं करून आईला तिचं जाकीट घालायला मदत केली.

"हं, हा पुडा घेऊन जा बरोबर," तो कापऱ्या आवाजात म्हणाला व आपल्या उबदार, कोरड्या हातांनी त्याने तिची बोटं दाबून हस्तांदोलन केलं.

"वेसोव्श्चिकोवची व्यवस्था नीट झाली ना?" त्याने विचारलं.

"हो, सगळं ठीक झालं."

"बराय. मी येगोरला पाहायला येईनच."

आई आधीच दमून गेली होती, त्यातच निकोलायने जी घाई केली त्यामुळे तिचं मन आगामी संकटाच्या आशंकेने भरून गेलं.

बहुधा तो मरणाच्या दारातच असावा, हा विचार काही केल्या तिच्या मनातून जाईना.

इस्पितळातल्या लहानशा खोलीत येगोरला पांढऱ्या शुभ्र उशांचा आधार देऊन बसवलेलं होतं व तो जोरजोराने हसत होता. भरपूर उजेड व खेळती



हवा असलेल्या त्या खोलीत प्रवेश करून येगोरला तसा बसलेला पाहाताच आईला हायसं वाटलं. तो डॉक्टरला काही सांगत होता ते ऐकण्यासाठी ती दारातच थबकली.

"आजाऱ्यांना औषधपाणी करणं म्हणजे तात्पुरत्या सुधारणांसारखंच असतं, नाही?" येगोर म्हणत होता.

"हं, येगोर! आता थट्टामस्करी पुरे बरं का!" डॉक्टर व्यथित आवाजात उद्‌गारला.

"पण मी क्रांतिकारक आहे, त्यामुळे सुधारणावादाचा मला तिटकारा आहे!"

डॉक्टरने हळूच येगोरचा हात पुनः खाली ठेवला व तो उभा राहिला. विचारमग्न अवस्थेत आपली दाढी कुरवाळीत असता आपल्या रोग्याच्या चेहऱ्यावरचा पांढुरकेपणा पाहून तो चिंताग्रस्त झाला होता.

डॉक्टर आईच्या परिचयाचा होता. तो निकोलायच्या अत्यंत निकटच्या मित्रांपैकी असून इवान दानिलोविच हे त्याचं नाव होतं. आई येगोरजवळ जाऊन पोचताच त्याने जीभ बाहेर काढून तिचं स्वागत केलं. डॉक्टरने मागे वळून पाहिलं व तिला पाहाताच तो म्हणाला,

"ओ हो, निलोव्ना, तुम्ही? बरं झालं अं! पण हे तुमच्या हातात काय आहे?"

"पुस्तकं असतील, नाही?" येगोर मध्येच बोलला.

"पण याने बिलकुल वाचता कामा नये!" डॉक्टरने सांगितलं.

"मला अजिबात मूर्ख बनवून सोडायचा विचार दिसतोय या डॉक्टरसाहेबांचा!" येगोरने तक्रार केली.

त्याला श्वास घेताना बराच दम लागत होता व छातीच्या आतून बुद्‌बुद् व सूंऽ आवाज ऐकू येत होता. त्याच्या चेहऱ्यावर घामाचे टपोरे थेंब जमले होते व कपाळावरचा घाम पुसण्यासाठी हात वर उचलणं सुद्धा त्याला फार कष्टप्रद होत होतं. त्याचे फिकट गाल सुद्धा इतके चैतन्यहीन झाले होते की त्यामुळे त्याचा चेहरा म्हणजे एकाद्या निर्जीव मुखवट्यासारखा भासत होता. पण डोळ्यांभोवतालची जागा सुजल्यामुळे डोळे अधिकच खोल गेल्यासारखे भासत असले तरी त्याची नजर साफ होती व त्याच्या डोळ्यांत आत्मविश्वासाचं तेज चमकत होतं.

"ए धन्वंतरी! मी अगदी दमून गेलोय. आता तरी पडू का जरा?"

"अं हं, पडायचं नाही!" डॉक्टरसाहेब तुटकपणे उत्तरले.

"बरंय तर, तू बाहेर पडताक्षणीच पडेन मी!"

"त्याला आडवं होऊ द्यायचं नाही बरं का, निलोव्ना! त्याला उशांचाच आधार देऊन बसतं ठेवा. अन् त्याला बोलूही द्यायचं नाही, बोलण्याचाही त्रास होईल फार."

आईने मानेने होकार दिला व मग डॉक्टर भराभर पावलं टाकीत बाहेर पडला. येगोरने आपलं डोकं मागे टेकवलं व डोळे मिटून घेऊन तो स्वस्थ पडून राहिला. फक्त त्याच्या बोटांची चाळवाचाळव तेवढी सुरू होती. त्या लहानशा खोलीच्या पांढऱ्या भिंती थंडगार व उदासवाण्या भासत होत्या. मोठाल्या खिडक्यांमधून लिंबाच्या झाडांचे कमानदार शेंडे दिसत होते, व त्या झाडांच्या दाट काळसर हिरव्या, मातकट पानांत मधूनमधून पिवळ्या रंगाचे ठिपके दिसत होते त्यावरून हिवाळ्याच्या आगमनाची सूचना मिळत होती.

"मृत्यू हळूहळू व अनिच्छेने मला घ्यायला येत आहे!" येगोर डोळे न उघडताच म्हणाला. "मला नेताना मृत्यूलाही वाईट वाटत असावंसं दिसतं, मी इतका भला माणूस होतो ना, म्हणून असावं!"

"येगोर, बोलायचं नाही, सांगितलंय ना?" आई प्रेमळपणाने त्याचे हात थोपटीत म्हणाली.

"हो ना—बोलणं बंद होणारच आहे माझं—लवकरच—"

त्याला मधूनमधून दम लागत होता, थांबावं लागत होतं तरी मोठ्या कष्टानेच त्याने बोलणं चालूच ठेवलं.

"तुम्ही इथं आहात हे फारच चांगलं झालं—तुमच्याकडे पाहून फार बरं वाटतं—मला कधी कधी आश्चर्य वाटतं—तुमचं काय होणार—इतरांप्रमाणेच तुम्हालाही तुरुंगवास व तसला सगळा छळ सोसावा लागणार ही कल्पनाच फार दुःसह आहे—तुम्हाला तुरुंगात जायची भीती वाटते का हो?"

"नाही," आईने एका शब्दात उत्तर दिलं.

"अर्थात् नाहीच वाटणार! पण तरीसुद्धा... तुरुंग ही चीजच फार भयंकर व क्रूर आहे... माझी ही स्थिती झाली ती तुरुंगातच... खरं सांगायचं तर—मला मरायची इच्छा आहे अशातला मुळीच भाग नाही—"



आईला वाटलं, याला सांगावं, तू वाचण्याची अजूनही शक्यता आहे की! पण त्याच्या चेहऱ्याकडे पाहाताच तिने तसं म्हणण्याचा विचार सोडून दिला.

"मी अजूनही काम करू शकतो—माझ्याच्याने काम होणार नसेल तर जगण्यात काहीच अर्थ नाही—"

आईने सुस्कारा टाकला. आंद्रेइ नेहमी म्हणायचा, 'खरं आहे, पण समाधानकारक नाही!' ते त्याचे शब्द यावेळी आईला आठवले. आजचा सारा दिवस धावपळीत गेल्यामुळे ती थकली होती व उपाशीही होती. येगोरच्या त्या बडबडीमुळे सारी खोली भरून जाऊन ते शब्द रेंगाळत भिंतीवरही चढत असल्याचं भासत होतं. खिडकीतून दिसणारे लिंबाच्या झाडांचे शेंडे अगदी खाली आलेल्या ढगांसारखे, काळेभोर व उदासवाणे भासत होते. रात्रीच्या काळोखाच्या आगमनाची सूचना देणाऱ्या सूर्यास्ताच्या वेळच्या संधिप्रकाशात सर्व वातावरण कसं विलक्षण शांत, गंभीर झालं होतं.

"माझा जीव घाबरतोय!" येगोर म्हणाला. त्याने डोळे मिटून घेतले व तो शांत पडून राहिला.

"झोपून जा, म्हणजे बरं वाटेल," आईने सुचवलं.

त्याचा श्वास जोराने चालत होता तो ऐकत व सभोवताली पाहात ती काही वेळ स्तब्ध बसून होती. दुःखाने वेढलेल्या त्या अवस्थेत काही वेळ गेल्यावर तिचाही डोळा लागला.

दरवाजापाशी कसलातरी आवाज आला, त्यायोगे तिला जाग आली. तिने पाहिलं तर येगोरचे डोळे सताड उघडे होते.

"माझा डोळा लागून गेला बरं का, माफ करा!" ती येगोरला म्हणाली.

"वा! माफी मागायची ती मी की तुम्ही?" तो उद्गारला.

बाहेर काळोख पडत चालल्याचं खिडकीतून दिसत होतं. खोलीत् गारवा आला होता व सगळीकडे काळ्या छाया पसरत होत्या. रोग्याचा चेहराही काळवंडलेला दिसत होता.

आईला कुणातरी स्त्रीच्या वस्त्रांची सळसळ ऐकू आली व त्या पाठोपाठच लुद्मिलाचा आवाज आला.

"तुम्ही काय अंधारातच बसून कुजबुजता की काय? अन् दिव्याचं बटन कुठं आहे?"

एकदम ती खोली प्रकाशाने उजळून निघाली व लुद्‌मिलाची उंच आकृती खोलीच्या मधोमध उभी असलेली आईच्या दृष्टीस पडली.

येगोरच्या सर्वांगातून एक चमक निघाली. त्याने हात उचलून छातीकडे नेला.

"काय झालं?" असं म्हणत लुद्‌मिला धावतच त्याच्याजवळ गेली.

त्याची नजर आईवर स्थिरावली होती, पण आता त्याचे डोळे खूपच मोठे व विलक्षण तेजस्वी दिसू लागले होते.

त्याने तोंड उघडून आ वासला, मग मस्तक उंच करून हात लांब केला. आईने तो हात धरून ठेवून त्याच्या चेहऱ्याकडे पाहिलं. तिला श्वास घेण्याचाही धीर होईना. त्याने एक झटका आल्यासारखं करून एकदम मान टाकली व तो मोठ्याने म्हणाला.

"आता नाही सहन होत! संपलं माझं आयुष्य!"

त्याच्या शरीराला किंचित् कंप सुटला व त्याचं मस्तक खांद्यावर पडून लटकू लागलं. त्याच्या बिछान्यावर पडणाऱ्या दिव्याच्या प्रकाशाचं निर्जीव प्रतिबिंब त्याच्या उघड्या डोळ्यांत पडलेलं दिसू लागलं.

"अरे रे! बिचारा–" आई कुजबुजली.

लुद्‌मिला हळू पावलं टाकीत खिडकीपाशी जाऊन बाहेर पाहू लागली.

"मावळली याची प्राणज्योत!" ती अचानक दचकल्यासारखं करून ओरडली. अन् कुणी तरी मस्तकावर जोराचा प्रहार करावा तसा भयंकर धक्का बसून ती खिडकीच्या कट्ट्यावर कोपर रोवून वाकून उभी राहिली. मग ती हुंदके देत गुडघे वाकवून खाली बसली व तिने तळहातांनी चेहरा झाकून घेतला.

आईने येगोरचे जड झालेले हात छातीवर एकमेकांवर ठेवलं, त्याचं मस्तक उशीर नीट ठेवलं व मग स्वतःच्या नेत्रांतले अश्रू पुसून ती लुद्‌मिलाजवळ गेली व खाली वाकून तिच्या केसांवरून मायेने हात फिरवू लागली. लुद्‌मिलाने हळूहळू डोकं वर उचलून जड नजरेने आईकडे पाहिलं व ती उठून उभी राहिली.

"आम्ही हद्दपारीच्या काळात एकत्र राहिलो होतो," ती हलक्या पण कापऱ्या आवाजात सांगू लागली. "आम्ही बरोबरच गेलो व बरोबरच शिक्षा भोगली... कधीकधी तर फारच असह्य व्हायचं ते. पुष्कळांचा त्या काळात धीर खचला..."



तिला पुनः जोराचे हुंदके येऊ लागले, पण प्रयासाने ते दाबून टाकून ती आईच्या जवळ सरकली. तिच्या उदास व दुःखी चेहऱ्यावर असा काही कोमल भाव पसरला होता की त्यामुळे ती वयाने होती त्यापेक्षा अधिकच तरुण भासू लागली.

"पण याचा उत्साह दुर्दमनीय होता," ती हलक्या आवाजातच पण जरा जलद बोलू लागली. तिचे हुंदके सुरू होते, पण आता तिने अश्रू आवरले होते. "तो नेहमी हसतखेळत असायचा, थट्टाविनोद करीत राहायचा, व कमकुवत मनाच्या लोकांना धीर वाटावा म्हणून स्वतःचं दुःख लपवून ठेवायचा. तो फार सज्जन, ममताळू अन् विचारी माणूस होता. तिथं दूर सैबेरियात रिकामणामुळे पुष्कळ लोक बिघडतात व त्यांच्यातल्या अनिष्ट प्रवृत्ती उसळून वर येतात. पण याविरुद्ध कसं लढावं यात तो फारच तरबेज होता. त्याचं स्वतःचं वैयक्तिक जीवन दुःखाने भरलेलं होतं, पण त्याबद्दलचा चकार शब्द त्याच्या तोंडून कधी बाहेर पडला असेल तर शपथ! अगदी कध्धीसुद्धा नाही! माझी त्याची जिवाभावाची मैत्री होती. माझ्यावर तर त्याचे फारच उपकार आहेत. त्याच्या प्रखर बुद्धीचा व ज्ञानाचा त्याने मला भरपूर फायदा दिला, पण तो मात्र एकटा न् एकाकी असूनही त्याने अगदी मायेच्या ओलाव्याची किंवा सेवेची यत्किंचित्सुद्धा कधी अपेक्षा केली नाही..."

ती येगोरच्या बिछान्यापाशी गेली व त्याच्या हाताचे चुंबन घेण्यासाठी खाली वाकली.

"कॉमरेड! माझ्या प्रिय मित्रा! मी तुझी आभारी आहे. खरोखरच अन्तःकरणापासून आभारी आहे–" ती दुःखपूर्ण स्वरात पण शांतपणे म्हणाली. "तुला अखेरचा प्रणाम असो. तू जसा अविरत व अढळ श्रद्धेने कार्य करीत राहिलास तशीच मीही करीत राहीन! प्रणाम!"

तिचा देह हुंदक्यांमुळे हादरत होता. अखेर तिने येगोरच्या पायांवर डोकं टेकलं. आईही शांतपणे अश्रू ढाळीत होती. आपण रडता कामा नये असा आईचा प्रयत्न होता. लुद्‌मिलाचं शक्य तो सांत्वन करावं, तिच्या शोकात सहभागी होण्यासाठी मायेचे शब्द बोलावे, असं आईला वाटत होतं. अश्रूंनी भरलेल्या नेत्रांतून ती येगोरच्या खोल गेलेल्या चेहऱ्याकडे, अर्धवट उघड्या राहिलेल्या डोळ्यांकडे पाहात होती. त्याचा चेहरा जणू काय त्याला गुंगीच

आली असावी असा भासत होता व निळसर ओठांवर स्मिताची रेषा उमटली होती. सगळं कसं धुंद, शांत व दु:खपूर्ण पण तेजस्वी भासत होतं...

इवान दानिलोविच भराभर पावलं टाकीत खोलीत आला. खोलीच्या मधोमध येताच तो एकदम थांबला व खिशात हात घालून उभा राहिला.

"केव्हा झालं हे?" त्याने मोठ्यानेच पण दु:खपूर्ण स्वरात विचारलं.

त्याच्या प्रश्नाचं कोणीच उत्तर दिलं नाही. त्याने कपाळाचा घाम पुसला व थोडं थांबून तो येगोरच्या बिछान्याकडे गेला व त्याचा हात दाबून तो बाजूला झाला.

"यात अनपेक्षित असं काहीच नव्हतं. त्याच्या हृदयाची जी स्थिती होती ती पाहाता सहा महिन्यांपूर्वीच हे व्हायला हवं होतं... निदान सहा महिन्यापूर्वी."

तो मुद्दामच जास्त मोठ्याने, शांत असल्याचं भासवून बोलत होता. पण फार वेळपर्यंत त्याला ते साधलं नाही. त्याचा कंठ दाटून आला व तो भिंतीशी टेकून गच्च डोळे मिटून उभा राहिला. मग तो मृताच्या शेजारी उभ्या असलेल्या त्या दोघींकडे पाहात अस्वस्थपणे दाढीशी चाळा करू लागला.

"आणखी एकजण निघून गेला," तो शांतपणे म्हणाला.

लुद्‌मिला उठून खिडकी उघडण्यासाठी गेली. थोड्या वेळाने ते सर्वच परस्परांच्या जवळ येऊन बाहेरच्या हिवाळी रात्रीच्या काळोखाकडे टक लावून पाहात स्तब्ध उभे राहिले. बाहेर काळ्या छायांसारख्या दिसणाऱ्या वृक्षांच्या शेंड्यांच्या वर अनंत आकाशाच्या पोकळीत तारका चकाकताना त्यांना दिसत होत्या.

लुद्‌मिलाने काही न बोलता आईचा हात हातात घेतला व तिच्या खांद्यावर मान टाकली. डॉक्टर आपल्या चष्म्याच्या काचा पुसत, मान खाली घालून उभा होता. रात्रीच्या शांत वातावरणात शहरातील मंदावत चाललेले आवाज ऐकू येत होते. थंडगार वाऱ्याची झुळूक त्यांच्या तोंडाला स्पर्श करून केस उडवीत होती. लुद्‌मिलाच्या गालावर एक अश्रूचा थेंब ओघळला व तिचं अंग शहारलं. बाहेर व्हरांड्यातून दबलेले हुंदके, भीतियुक्त आवाज, कुजबुज, पावलांची चाहूल, असे अनेक आवाज त्यांच्या कानी पडत होते. पण तिघेही मुळीच हालचाल न करता खिडकीपाशी स्तब्ध उभे होते.



आपली कदाचित अडचण होत असेल अशी शंका येऊन आईने हळूच लुद्‌मिलाच्या अंगावरचा हात काढून घेतला व ती दारापाशी गेली व तिथूनच तिने येगोरला लवून अभिवादन केलं.

"निघालात?" डॉक्टरने मागे न वळताच विचारलं.

"हो."

बाहेर पडल्यावर ती लुद्‌मिलाचा विचार करू लागली. तिने आपले हुंदके कसे दाबले हे आठवून ती स्वत:शीच उद्‌गारली.

"बिचारीला नीट रडावं कसं हे सुद्धा ठाऊक नाही!"

मग येगोरचे मृत्यूपूर्वीचे शब्द आठवून तिने सुस्कारा टाकला. ती रस्त्यावरून चालत असता त्याचे चमकणारे डोळे, त्याची आनंदी वृत्ती, त्याने सांगितलेल्या गंमतीदार गोष्टी यांच्या आठवणी तिच्या मनात गर्दी करून सोडत होत्या.

"चांगल्या माणसाला जगणं कठीण असतं, मरणं मात्र सोपं! मी कशी मरणार आहे कुणास ठाऊक!" आई स्वत:शी म्हणाली.

त्या पांढऱ्या व झगझगीत प्रकाशाच्या खोलीत लुद्‌मिला व डॉक्टर खिडकीपाशी उभे होते व येगोरचे मृत नेत्र त्यांच्याकडे लागलेले होते, ते दृश्य आईच्या मनश्चक्षूंपुढे उभं राहिलं. अचानक साऱ्या मानवजातीविषयी करुणेच्या भावनेने तिचं अन्त:करण भरून आलं. दीर्घ उसासा टाकून तिने झपाझप पावलं उचलण्यास सुरुवात केली. कसल्यातरी अस्पष्ट जाणिवेने तिचे पाय भराभर पडू लागले व आतून कसली तरी उदासवाणी पण धीर देणारी शक्ती तिला प्रेरणा देत होती. तिला साद देऊन ती उद्‌गारली,

"मला लवकर गेलंच पाहिजे!"

## ११

दुसऱ्या दिवशी आईचा संध्याकाळपर्यंतचा सगळा वेळ अंत्यविधीची तयारी करण्यातच निघून गेला. सायंकाळी ती, सोफिया व निकोलाय तिघेजण चहा पीत बसले असता अचानक साशा तिथं आली. ती आज फारच उत्साही दिसत होती व बडबडही पुष्कळ करीत होती. तिचे गाल लाल झाले होते, तिच्या डोळ्यांतून आनंद ओसंडत होता व कसल्यातरी आनंदाच्या आशेने ती भरलेली दिसत होती. ती आली तेव्हा त्या तिघांचं येगोरविषयी बोलणं सुरू होतं व वातावरण गंभीर व उदासवाणं होतं. पण साशा आली ती अशा

काही उन्मादात की तिथलं वातावरण ध्यानी न घेता ती उत्साहाने बडबड करीत सुटली. त्यामुळे त्या तिघांना राग तर आलाच, पण अंधारात एकदम आग भडकलेली पाहून डोळे दिपावे तसे ते तिच्या झंझावातासारख्या आगमनाने चकित झाले.

निकोलायने विचारमग्न होत मेजावर बोटांनी टकटक केलं व तो म्हणाला,

"साशा, नेहमीपेक्षा निराळंच आहे आजचं तुझं वागणं?"

"होय? शक्य आहे!" साशा आनंदाने किंचित् हसून उत्तरली.

आईने तिच्याकडे एक रागाचा कटाक्ष टाकून आपली नापसंती व्यक्त केली.

"आम्ही आता येगोर इवानोविचसंबंधी बोलत होतो," सोफियाने अप्रत्यक्षपणे प्रसंगाचं गांभीर्य सूचित केलं.

"खरंच किती चांगला माणूस होता नाही तो!" साशा बोलू लागली. "त्याच्या चेहऱ्यावरचं स्मित कधीच मावळलेलं मला दिसलं नाही. सारखी थट्टामस्करी सुरूच असायची त्याची. अन् कामाची पद्धत तरी किती विलक्षण! तो क्रांतीचा कलाकार होता, क्रांतिकारक विचारसरणी आत्मसात् केलेला एक थोर ज्ञाता होता. जनतेवर होणारे अत्याचार, अन्याय, फसवणूक याचं वर्णन करताना तो साक्षात् जिवंत चित्रं समोर उभी करायचा ती सुद्धा किती सफाईने अन् प्रभावीपणे काढलेली असायची!"

ती शांतपणे बोलत होती, विचारमग्नतेच्या सूचक स्मिताची रेखा तिच्या चेहऱ्यावर उमटली होती, परंतु तरीसुद्धा तिला कसलातरी मोठा आनंद झाला होता, तो त्यातूनही व्यक्त झाल्याशिवाय राहिला नाही. त्या तिघांना ते कळत होतं, पण तिच्या त्या अवर्णनीय आनंदाचं कारण मात्र त्यांना समजेना.

त्या तिघांची आपले दुःख विसरून साशाच्या उल्हसित वृत्तीत सहभागी होण्याची तयारी नव्हती व म्हणूनच ते तिच्या वागणुकीबद्दल नापसंती व्यक्त करून अहेतुकपणे स्वतःच्या दुःखमग्नतेचं समर्थन करीत होते.

"आणि आता तो येगोर मरण पावला आहे!" सोफिया अगदी मोजक्या शब्दांत, साशाकडे रोखून पाहात म्हणाली.

साशाने त्या तिघांकडे एक प्रश्नसूचक कटाक्ष टाकला व कपाळावर आठ्या चढवल्या. तिने मस्तक खाली वाकवलं व ती शांतपणे बसून केसातले



आकडे नीट करू लागली. अल्पकाळ ती विचित्र शांतता तशीच राहिल्यानंतर ती एकदम वर पाहून बोलू लागली:

"तो मरण पावला म्हणजे काय? 'मरण पावला' याचा अर्थ काय? 'मरणं' म्हणजे तरी काय? मला येगोरविषयी वाटणारा आदर मेला, की एक कॉमरेड या नात्याने त्याच्याविषयी वाटणारं प्रेम मेलं, की त्याच्या विचारांचं मला झालेलं आकलन व ज्ञान मेलं? त्याच्याविषयी माझ्या अन्तःकरणात असलेल्या भावना मरून गेल्या, की तो एक अत्यंत प्रामाणिक, लढाऊ पुरुष होता ही मला पटलेली त्याची ओळख नाहीशी झाली? काय झालं तरी काय? माझ्या दृष्टीने तरी हा परिचय, हे ज्ञान, ही आत्मीयता, यांपैकी काहीही कधीच मरणार नाही. अन् मला असं ताटतं की कोणाही माणसाबद्दल 'तो मरून गेला' असं पटकन् बोलून टाकण्यात आपण फारच घाई करीत असतो. त्याचे ओठ निर्जीव व मृत झाले असतील, पण त्याचे शब्द मात्र हयात व्यक्तींच्या अन्तःकरणात जिवंत आहेत!"

हे बोलता बोलता ती बरीच उत्तेजित होऊन टेबलापाशी बसली व टेबलावर कोपर ठेवून बऱ्याचशा शांतपणे व विचारपूर्वक, त्या तिघांकडे हसऱ्या नजरेने पाहात, पुनः बोलू लागली:

"कॉमरेड्स, माझं म्हणणं कदाचित् तुम्हाला खुळेपणाचं वाटेल, पण माझा असा विश्वास आहे की ज्या लोकांनी मला या जीवनाचा आनंद उपभोगीत जगण्याची किमया शिकवली आहे ते प्रामाणिक लोक खरोखरच अमर आहेत. त्यांनीच मला ही जाणीव करून दिली की या गुंतागुंतीच्या जीवनात विलक्षण जादू भरलेली आहे व त्याची विविध अंगं अत्यंत चमत्कृतिपूर्ण आहेत, आणि माझ्या प्राणाइतकीच प्रिय असलेली तत्त्वंही त्या लोकांच्या प्रेरणेनेच माझ्या रोमरोमात भिनली आहेत. मला वाटतं आपण आपल्या भावनांच्या बाबतीत फारच हात राखून वागत असतो. आपण आपल्याच विचारात इतके गर्क होऊन जातो की आपल्या व्यक्तित्वाची वाढही त्यामुळे खुंटते. आपण भावनांना वाव देण्याऐवजी चिकित्साच फार करतो!"

"काही तरी गोड, सुरेखसं घडलं आहे वाटतं?" सोफियाने स्मित करीत विचारलं.

"हो," साशा म्हणाली. "फारच सुरेख गोष्ट घडली आहे. मी सारी रात्र वेसोव्श्चिकोवबरोबर बोलत होते. मला तो पूर्वी मुळीच आवडत

नसे. तो फारच असंस्कृत व अडाणी आहे असं मला वाटायचं—नव्हे, होताच तसा तो. प्रत्येकाविषयी त्याच्या मनात उगाचच राग, द्वेष भरलेला असायचा. सर्व घडामोडींचं, जगाचं केंद्र आपणच आहोत असं समजून तो अत्यंत उर्मटपणे व चिडखोरपणे 'मी, मी, मी!' करीत असायचा. फारच संकुचित मनोवृत्ती होती त्याची."

साशा जराशी थांबली व त्यांच्याकडे पाहू लागली. तिच्या डोळ्यांत कशाची तरी चमक होती.

'पण आता तो म्हणतो, 'कॉमरेड्स!'" ती पुढे बोलू लागली. "अन् तो ते कसं म्हणतो ते ऐकण्यासारखं असतं. त्याच्या आवाजात मार्दव भरलेलं असतं न् लाजरेपणाही असतो, त्या मार्दवाचं वर्णन करणंही कठीण आहे. आता तो अगदी सरळ व निगर्वी झाला आहे. त्याला काम करण्याचीही प्रामाणिक तळमळ लागली आहे. त्याला स्वतःची ओळख पटली आहे, आपल्या अंगच्या गुणदोषांची जाणीव झाली आहे. पण सगळ्यात महत्त्वाची गोष्ट अशी की बंधुभावाची, आपण सगळे कॉमरेड्स असल्याची खरीखुरी जाणीव त्याच्या ठायी निर्माण झाली आहे."

साशाचं हे बोलणं ऐकताना तिच्यासारखी गंभीर प्रकृतीची मुलगी आनंदी व मृदू असू शकते हे पाहून आईला फार बरं वाटलं. पण त्याचबरोबर आईच्या अन्तःकरणात खोल कुठं तरी असूयेची भावना जागृत झाली होती व तिला वाटत होतं, 'पण पावेलचं काय?'

साशा बोलत होती, "तो आता फक्त आपल्या कॉमरेड्सचाच विचार करतो. अन् तो सारखा मला काय पटवण्याचा प्रयत्न करीत होता ठाऊक आहे? त्याचं म्हणणं एकच. आपण त्या सर्वांना निसटून यायला मदत केली पाहिजे. ते अगदी सोपं आहे असं तो म्हणतो."

सोफियाने वर पाहिलं व ती उत्सुकतेने म्हणाली, "खरंच, फार चांगली कल्पना आहे, नाही साशा? तुला काय वाटतं त्याबद्दल?"

आईचे हात थरथरू लागले व तिच्या हातातला पेलाही हादरला.

साशाच्या भुवया वक्र झाल्या व ती आपल्या मनातली खळबळ लपवण्याचा प्रयत्न करू लागली. मग एक क्षणभर थांबून आनंदी वृत्तीने स्मित करीत तिने उत्तर दिलं,

"तो म्हणतो ते खरं असेल तर आपण प्रयत्न करायलाच हवा. आपलं कर्तव्यच आहे ते."



एवढं बोलून होताच ती लज्जेनं लाल झाली व काही न बोलता स्तब्ध बसून राहिली.

'अग लबाडे!' आई मनात म्हणाली व तिच्या चेहऱ्यावर स्मित विलसू लागलं. सोफियानेही स्मित केलं. निकोलायही साशाकडे पाहून हसला.

साशाने वर पाहिलं व त्या सर्वांकडे एक करडी नजर टाकली. तिचा चेहरा फिका पडला होता, तिचे नेत्र चमकत होते व ती बोलू लागली तेव्हा तिच्या आवाजात शुष्कपणा व राग व्यक्त होत होता.

"तुम्ही का हसलात ते समजले मी!" ती म्हणाली, "असं करायला हवं असं वाटण्यात माझा काही व्यक्तिगत सुखाचा हेतू असावा असं तुम्हाला वाटतंय!"

"अस्सं!" असा तुटकपणे उद्‌गार काढून सोफिया उठली व साशाजवळ गेली. सोफियाच्या या उद्‌गाराने साशाचं मन दुखावलं गेलं हे पाहून आईला वाटलं, सोफियाने असं करायला नको होतं. तिने एक उसासा टाकून रागाने सोफियाकडे पाहिलं.

साशा आवेशानं म्हणाली, "तसं असेल तर मला त्या गोष्टीशी मुळीच कर्तव्य नाही! तुम्हाला त्यात माझा स्वार्थ दिसत असेल तर मी मुळीच त्या भानगडीत पडणार नाही!"

"जाऊ दे, साशा!" निकोलायने सांत्वनपर उद्‌गार काढले.

आई उठून साशाजवळ गेली व तिने तिच्या केसांवरून हात फिरवला. साशाने आईचा हात घट्ट धरून आपला लाजेने लाल झालेला चेहरा वर करून आईकडे पाहिलं. आईला काय बोलावं हे कळेना. ती नुसतीच हसली व तिने एक उसासा टाकला. सोफिया जवळच्याच खुर्चीवर बसली व तिने साशाच्या गळ्यात हात टाकला.

"अगदीच विचित्र पोरगी आहेस तू!" ती साशाकडे टक लावून पहात स्मितवदनाने म्हणाली.

"कदाचित् माझाच मूर्खपणा असेल तो!" साशा ओशाळून म्हणाली.

"तुला असं वाटलंच कसं, साशा?" सोफियाने विचारलं.

मग निकोलाय मध्ये पडून एकदम म्हणाला,

"त्यांना निसटून येणं शक्य असेल तर आपण त्याची व्यवस्था करायलाच हवी. पण त्यापूर्वी तुरुंगातल्या आपल्या कॉमरेड्सचं काय म्हणणं आहे हे समजून घेतलं पाहिजे."

साशा काही न बोलता मान खाली घालून बसून राहिली.

सोफियाने सिगारेट शिलगवली व आपल्या भावाकडे एक नजर टाकीत तिने काडी विझवून ती एका कोपऱ्यात भिरकवून दिली.

"त्यांचा नक्कीच विरोध असणार नाही," आई म्हणाली. "पण मला तरी वाटतं ते जमणं शक्य नाही."

आईला मनातून वाटत होतं, ते शक्य आहे असं त्या तिघांनी म्हणावं, पण ते तसं काहीच बोलले नाहीत.

"मला वेसोव्श्चिकोवची भेट घ्यायला हवी," सोफिया म्हणाली.

"मग कुठं न् केव्हा ते उद्या सांगेन मी," साशा म्हणाली.

सोफिया उठून खोलीत येरझारा घालू लागली व तिने विचारलं, "त्याचा पुढचा काय विचार आहे?"

"आपल्या नव्या छापखान्यात त्याला जुळाऱ्याचं काम द्यायचं आहे. तोपर्यंत तो त्या जंगलखात्यातल्या माणसाकडे राहील," साशाने तुटकपणे उत्तर दिलं. ती रागावल्यासारखी दिसत होती व तिचा चेहरा पुनः गंभीर झाला होता.

आई पेले विसळण्याचं काम करीत होती, तिथं तिजजवळ जाऊन निकोलाय तिला म्हणाला,

"परवा तुम्ही पावेलला भेटायला जाल तेव्हा त्याला एक चिठ्ठी द्यायलाच हवी. कारण आपल्याला –"

"हो, हो!" आई मध्येच घाईघाईने म्हणाली. "मी जरूर देईन त्याला. त्याची काळजी नको."

"बरं मी जाते आता," साशा म्हणाली व लगेच त्या तिघांशी हस्तांदोलन करून ती अगदी ताठ, गंभीरपणे पावलं टाकीत बाहेर पडली.

ती निघून गेल्यावर सोफिया आईजवळ गेली व तिचे खांदे धरून तिला जोरजोराने हालवीत म्हणाली,

"अशी सून मिळाली तर आवडेल ना तुम्हाला?"

"खरंच, अगदी एकच दिवस जरी त्या दोघांना जोडीने पहायला मिळालं तरी किती आनंद होईल मला!" आईने कसेबसे उद्‌गार काढले व मोठ्या प्रयासाने तिने आपलं रडं आवरलं.

"हं! थोडंसं सुख मिळालं तर त्यात काही बिघडायचं नाही," निकोलाय म्हणाला. "पण पंचाईत अशी असते की थोडक्याने कुणाचंच



समाधान होत नाही. अन् पुष्कळ मिळालं की मग त्याची काही किंमत वाटेनाशी होते."

सोफिया उठून पियानोपाशी गेली व तिने करुणरसाचे स्वर काढायला सुरवात केली.

## १२

दुसऱ्या दिवशी सकाळी तीस चाळीस लोक इस्पितळाच्या फाटकाशी उभे होते व आपल्या सहकाऱ्याची शवपेटिका बाहेर येण्याची वाट पहात होते. त्यांच्या घोळक्यातून गुप्त हेरही हिंडत होतेच. त्या लोकांचे उद्‌गार, त्यांचे चेहरे, त्यांच्या बोलण्याचालण्याच्या पद्धती, या गोष्टींची ते हेर मनातल्या मनात नोंद करून ठेवीत होते. कमरेला पिस्तुलं लटकावलेल्या पोलिसांचा एक गटही रस्त्याच्या पलिकडेच सज्ज होता. गुप्त हेरांची धिटाई व पोलिसांच्या चेहऱ्यावरचं हेटाळणीपूर्ण स्मित यामुळे तिथं जमलेले लोक चिडले होते. काही जण थट्टामस्करी करून आपला राग लपविण्याचा यत्न करीत होते, तर काही लोक पोलिसांकडून होणाऱ्या अपमानाची दृश्ये डोळ्यांनी पहायला नको म्हणून जमिनीवर नजर खिळवून उभे होते. काही लोक मात्र असेही होते की त्यांना आपल्या भावना दडपून टाकणं शक्य नव्हतं, त्यामुळे फक्त तोंडच्या शब्दांखेरीज कोणतेच शस्त्र जवळ नसलेल्या लोकांना सुद्धा घाबरणाऱ्या अधिकाऱ्यांबद्दल कुत्सित उद्‌गार काढून ते आपला राग व्यक्त करीत होते. वर निरभ्र आकाशात सूर्य तळपत होता व वाऱ्याने लोकांच्या पायांजवळ आणून टाकलेला पालापाचोळा रस्त्यावरील दगडांवर पसरलेला होता. त्या पिवळ्या पानांवर सूर्याची किरणं चकाकत होती.

आई जमावाच्या मध्यभागी उभी होती. ती भोवताली उभ्या असलेल्या लोकांच्या परिचित चेहऱ्यांकडे पाहून स्वतःशीच म्हणत होती: "लोक काही फारसे जमलेले नाहीत, आणि कामगार तर जवळजवळ कोणीच दिसत नाहीत."

इतक्यात फाटक उघडलं गेलं व काही लोक खांद्यावर शवपेटी घेऊन बाहेर आले. या पेटीच्या वर पुष्पगुच्छ लाल फितींनी बांधलेले होते. शवपेटी दिसताच बाहेर उभ्या असलेल्या लोकांनी आपल्या टोप्या काढून हातांत घेतल्या तेव्हा काळ्या रंगाच्या पक्ष्यांचा कळप एकदम उडून जावा असा भास झाला. लालबुंद चेहऱ्यावर काळ्याभोर मिशांचा झुपका असलेला

एक उंच पोलिस अधिकारी चपळाईने जमावात घुसला व त्याच्या पाठोपाठ बरेचसे शिपाईही खाड्खाड् बूट वाजवीत बेमुर्वतखोरपणे लोकांना धक्के देऊन बाजूला सारीत पुढे निघाले.

"त्या फिती काढून टाका!" त्या अधिकाऱ्याने करड्या आवाजात फर्मान सोडलं.

बरेचसे स्त्रीपुरुष त्याच्याभोवती गोळा झाले व उत्तेजित होऊन जोरजोराने बोलत हातवारे करू लागले. त्या लोकांचे संतप्त चेहरे व थरथरणारे ओठ आईला दिसत होते. एका बाईच्या डोळ्यांतून तर अश्रुधारा वाहू लागल्या होत्या.

"असल्या जुलुमाचा धिक्कार असो!" कुणीतरी नवतरणा पोरगा ओरडला व त्यापाठोपाठच जोरात वाद व बाचाबाचीचं बोलणं ऐकू येऊ लागलं.

आई फार दुःखित झाली व शेजारी उभ्या असलेल्या अगदी गरिबाऊ कपडे घातलेल्या माणसाला उत्तेजित स्वरात म्हणाली,

"माणसाचा अंत्यविधी सुद्धा आपल्या मनाप्रमाणे करू देत नाहीत म्हणजे जुलुमाची शर्थ झाली!"

जमाव प्रक्षुब्ध होत चालला होता. लोकांच्या डोक्यांच्या वर शवपेटीचं झाकण दिसत होतं. त्यावरच्या लांब फितीची टोकं वाऱ्याने उडून लोकांच्या मस्तकांना व चेहऱ्यांना स्पर्श करीत होती व त्या रेशमी फितींची सळसळ ऐकू येत होती.

आईला वाटू लागलं, आता नक्की इथं चकमक उडणार, म्हणून ती सारखी दोन्ही बाजूंना उभ्या असलेल्या लोकांकडे वळून पुटपुटत होती:

"त्यांच्या दुष्टपणाची खरोखरच कमाल आहे! पण ते ऐकतच नसतील तर काढून घ्या म्हणावं फिती! आपण यावेळी माघार घेतलेली चांगली!"

कोणीतरी त्या गोंगाटातही स्पष्ट ऐकू येईल अशा खणखणीत आवाजात ओरडून म्हटलं,

"आमच्या कॉमरेडची प्रेतयात्रा काढून त्याला अखेरचं अभिवादन करण्याचा आमचा हक्क आहे! या कॉमरेडचा तुम्हीच छळ करून त्याचे प्राण घेतले!"

तितक्यात कुणीतरी उंच स्वरात गाऊ लागलं,

**प्राणाहुति ही अपूर्व ठरली...**



"ए! काढा त्या फिती! कापून रे त्या, याकोव्लेव!"

एका तलवारीचं पातं तळपलं. आता एकदम लोक चिडून ओरडणार व भांडण जुंपणार अशा भीतीने आईने डोळे गच्च मिटून घेतले. पण लोक नुसते संतप्त लांडग्यांप्रमाणे गुरगुरले. तेवढाच संताप व्यक्त करून ते शांतपणे खाली माना घालून पुढे चालू लागले. त्यांच्या चालण्याचा खसखस आवाजच काय तो त्या वातावरणात ऐकू येत होता.

शवपेटिकेच्या झाकणावरील चुरगळलेले पुष्पगुच्छ व तुटलेल्या फिती एवढ्याच काय त्या लोकांच्या डोक्यांवरून दिसत होत्या. त्यांच्या बाजूने घोड्यांवर स्वार झालेले शिपाई दिसत होते. आई रस्त्याच्या बाजूने चालत होती व प्रेतयात्रेत सामील होत गेलेल्या लोकांची संख्या वाढून सबंध रस्ता भरून गेल्यामुळे तिला शवपेटिका दिसेनाशी झाली होती. घोड्यांवरील शिपाई सर्वांच्या मागून चालले होते व पायी चालणारे शिपाई तलवारींच्या मुठीवर हात ठेवून दोन्ही बाजूंनी चालत होते. गर्दीतल्या लोकांचे चेहरे न्याहाळणाऱ्या अनेक गुप्त हेरांचे परिचित चेहरेही आईला दिसत होते.

दोघेजण मिळून गात होते:

**प्रणाम, कॉमरेड, प्रणाम!**

"काही नको ते गाणं!" कुणीतरी ओरडलं. "अगदी शांतपणे चला बरं, लोकहो!"

लोकांवर एकदम छाप पडावी असाच तो आवाज होता. त्यामुळे ती आज्ञा होताच एकदम ते शोकपूर्ण गीत बंद पडलं व लोक हलक्या आवाजात काहीतरी कुजबुजू लागले. गाणं बंद पडल्यामुळे रस्त्यावरच्या दगडांवर पावलांचा खट् खट् होणारा आवाज जोराने ऐकू येऊ लागला. तो आवाज लोकांच्या डोक्यांवरून वर जात जात निरभ्र आकाशात जाऊन दूरवरच्या वादळाचा इशारा देणाऱ्या पहिल्या धडधडाटाप्रमाणे वाऱ्याला कापून जाऊ लागला. तितक्यात त्या वाऱ्यालाही जोर चढला व त्यामुळे गारवा तर झोंबू लागलाच, पण रस्त्यावर साचलेली धूळ व केरकचरा लोकांच्या केसांवर, अंगाखांद्यावर, कपड्यांवर उडू लागला व त्यांच्या पावलांभोवती गिरक्या खाऊ लागला, इतकेच नव्हे तर डोळ्यांतही कचरा जाऊन त्यांना डोळे चोळीतच चालावं लागलं.

ही प्रेतयात्रा विलक्षणच होती. सर्वजण अगदी गंभीर व शांतपणे चालत होते. बरोबर पाद्री नव्हते व प्रार्थनागीतेंही म्हटली जात नव्हती. लोकांचे चेहरे विचारमग्न दिसत होते व कपाळावर आठ्यांचं जाळं होतं. ही अशी प्रेतयात्रा पाहून आईचं अन्त:करण भीतीने दडपल्यागत झालं. तिच्या मनात गंभीर विचार तरळू लागले व ती स्वत:शीच उद्‌गारली :

"या लोकांत सत्यासाठी लढणारे फारच थोडे!"

ती मान खाली घालून चालत होती व तिला वाटत होतं, आता स्मशानभूमीत पुरलं जाणार ते येगोरचं शरीर नव्हे तर तिच्या अगदी जवळचं, जिव्हाळ्याचं, तिला फार आवश्यक असं वाटणारं काहीतरी... तिला अगदी एकेकटं व कसंसंच वाटून ती बेचैन झाली होती. येगोरच्या प्रेतयात्रेत सामील झालेल्या इतर लोकांविषयीच्या अगदी निराळ्या, भीतिदायक अशा काहीतरी अस्पष्ट भावनेनं तिच्या अन्त:करणात घर केलं. ती स्वत:शीच म्हणाली,

"येगोरचा देवावर विश्वास नव्हता, अन् या इतर लोकांचाही नाही."

पण याबाबतीत जास्त विचार करणं तिला बरं वाटलं नाही व जणू काय आपल्या आत्म्यावरचं काहीतरी भयंकर ओझं दूर करण्यासाठी तिने एक लांब सुस्कारा टाकला. ती स्वत:शीच म्हणत होती :

"देवा रे! प्रभू येशू! असं तर होणार नाही—या लोकांप्रमाणेच मीसुद्धा—"

ते सर्वजण स्मशानभूमीत पोचले. काही वेळ थडग्यांच्या मधून अरुंद बोळातून चालून गेल्यावर ते एका मोकळ्या जागी येऊन पोचले. तिथंही पांढरा क्रूस लावलेली थोडीशी थडगी होतीच. मध्येच एका ठिकाणी येगोरच्या देहासाठी थडग्याचा खड्डा खणून ठेवलेला होता. सगळेजण शांतपणे त्या खड्ड्याच्या भोवताली उभे राहिले. थडग्यांनी भरलेल्या त्या भूमीवर उभ्या असलेल्या जिवंत माणसांची ती निस्तब्ध शांतता आईला फारच भयसूचक वाटून पळभर तिच्या हृदयाची धडधडही बंद पडली, त्यावेळी वारा मात्र सोसाट्याचा सुटला होता व घोंऽऽ आवाज करीत थडग्यांवरील क्रूसांमधून शीळ घालीत तो शवपेटीवरील चुरगळलेल्या फुलांवर येऊन आपटत होता.

सर्वजण तेथे येऊन पोचताच सगळे पोलिस शिपाई ओळीने उभे राहून आपल्या मुख्याकडे पाहू लागले. एक उंच बांध्याचा, फिकट चेहऱ्याचा तरुण



इसम थडग्याजवळ जाऊन उभा राहिला. त्याच्या भुवया काळ्याभोर होत्या व केस लांब होते.

तो तेथे जाताच पोलिस अधिकारी दरडावणीच्या स्वरात ओरडला, "लोक हो!"

"कॉमरेड्स!" तो तरुण माणूस खणखणीत आवाजात बोलू लागला. "थोडं थांबा!" पोलिस अधिकारी ओरडला. "हे पहा, मी साफ सांगतो की कोणाला भाषणं करायला मी परवानगी देणार नाही!"

"मी फक्त दोन शब्दच बोलणार आहे!" तो तरुण शांतपणे म्हणाला व पुढे बोलू लागला, "तर मित्र हो! आपला मित्र व गुरु याला हे अखेरचं अभिवादन करताना आपण अशी प्रतिज्ञा करू या की त्याने दिलेली शिकवण आपण कधीही विसरणार नाही, आणि आपल्या या मायभूमीत जे जे काही वाईट आहे त्याला कारणीभूत असलेल्या सत्तेचा, त्या दुष्ट, जुलमी सत्तेचा, त्या एकतंत्री राज्यसत्तेचा, अंत करण्यासाठी व तिला थडग्यात गाडून टाकण्यासाठी आपल्यापैकी प्रत्येक जण अविरत झटत राहील!"

"पकडा त्याला!" तो अधिकारी किंचाळला, पण त्याचा आवाज सहज बुडवून टाकतील अशा जोरदार घोषणा अनेक कंठांतून बाहेर पडल्या :

"जुलमी सत्तेचा नायनाट करा!"

पोलिस शिपाई गर्दीतून वाट काढीत त्या वक्त्याच्या रोखाने जायला निघाले, पण तोपर्यंत त्याच्या मित्रांनी त्याच्या रक्षणासाठी त्याच्याभोवती कडं उभारलं होतं.

"स्वातंत्र्य चिरायु होवो!" वक्ता हात उंच उडवीत ओरडला.

त्या गर्दीत आई बाजूला ढकलली गेली. तिने घाबरून जाऊन एका थडग्यावरील क्रूसचा आधार घेतला व आता आपल्यालाही तडाखा बसणार या भीतीने ती डोळे गच्च मिटून घेऊन उभी राहिली. त्याक्षणी एकदम इतका गोंधळ व कोलाहल माजला की तिच्या कानठळ्या बसल्यासारख्या झाल्या. आपल्या पायाखालची धरतीच दुभंग होते आहे असं वाटून तिला धड श्वासोच्छ्वास घेणंही कठीण वाटू लागलं. पोलिसांच्या शिट्यांचे आवाज, हुकूम सोडणारे कर्कश आवाज, भेदरलेल्या बायांच्या किंकाळ्यांचे आवाज, कुंपणाचे खांब मोडल्याचे आवाज, कोरड्या जमिनीवर दाणदाण आपटल्या जाणाऱ्या बुटांचे आवाज, असा एकच हलकल्लोळ माजला. हा प्रकार इतका

वेळ असाच चालला होता की डोळे गच्च मिटून तिथं उभं राहाणं हीही आईला शिक्षाच वाटू लागली.

तिने डोळे किलकिले करून वर पाहिलं व ती हात पुढे करून ओरडत पुढे धावू लागली. थोड्याच अंतरावर थडग्यांच्या मधल्या अरुंद जागेत पोलिस त्या भाषण करणाऱ्या तरुण माणसाला वेढून घेऊन त्याच्या रक्षणासाठी पुढे सरसावणाऱ्या लोकांना मागे रेटीत होते. म्यानातून बाहेर पडलेल्या तलवारींची थंडगार व शुभ्र पाती लोकांच्या माथ्यांवर तळपून खाली जातांना दिसत होती. वेताच्या छड्या व कुंपणाचे तुटके खांबही शस्त्रांसारखे उपयोगात आणले जात होते. लोक आरडाओरडा करीत त्या फिकट चेहऱ्याच्या तरुणाभोवती फिरत होते. इतक्यात त्या खवळलेल्या समुदायाला उद्देशून तो तरुण आवेशाने म्हणाला,

"कॉमरेड्स! उगीच आपली शक्ती का वाया दवडता?"

त्याच्या शब्दांचा चांगला प्रभाव पडून त्याच्या मित्रांनी हातातल्या काठ्या टाकून देऊन पळायला सुरुवात केली. आई मात्र कुठल्या तरी अज्ञात शक्तीने लोटल्याप्रमाणे पुढे जात राहिली. थोडे पुढे जाताच तिला दिसलं की निकोलाय संतापलेल्या जनसमुदायाला मागे लोटीत आहे व त्याची हॅट मागे सरकलेली आहे.

"तुम्हाला वेड लागलं की काय?" तो दटावणीच्या स्वरात ओरडत होता. "शांत व्हा पाहू!"

त्याच्या एका हातातून रक्त वाहात असावं असं आईला वाटलं. ती एकदम त्याच्याकडे पळत निघाली व त्याला ओरडून म्हणाली :

"निकोलाय इवानोविच! इथून निघून जा बाबा!"

"कुठं निघालात? ते मारतील की!" कुणी तरी आईलाच हटकलं. कुणाचा तरी हात तिच्या खांद्यावर पडला म्हणून आई पाहू लागली तो सोफिया तिच्या बाजूलाच उभी होती. तिच्या डोक्यावर हॅट नव्हती, तिचे सर्व केस विस्कटलेले होते व तिने एका मुलाचा हात धरलेला होता. तो पोरगा अगदीच कोवळ्या वयाचा होता व त्याच्या तोंडावरून रक्ताचा ओघळ वाहात होता. ते रक्त तो हाताने पुशीत होता.

"मला जाऊ द्या... मला काही फार लागलेलं नाही..." तो पुटपुटत होता व ते बोलताना त्याचे ओठ थरथरत होते.

"याला सांभाळा. त्याला आपल्या घरी घेऊन चला अन् त्याच्या



तोंडावरून बांधायला हा घ्या हातरुमाल!" सोफिया घाईघाईने म्हणाली व त्या मुलाचा हात आईच्या हातात देऊन ती क्षणार्धात अदृश्य झाली.

"तुम्ही झटपट जा इथून, नाहीतर ते पकडतील!" तिने जाताजाता मागे वळून आईला इशारा दिलाच.

लोक त्या स्मशानभूमीत सैरावैरा धावत होते. पोलिस शिपाई त्यांचा पाठलाग करीत थडग्यांच्या मधून पळत होते. पळता पळता त्यांचे पाय त्यांच्याच पायघोळ ओव्हरकोटात अडकून त्यांना पळताना अडथळा येत होता. पण तोंडाने शिव्यांची लाखोळी वाहात व हातातल्या तलवारी परजीत ते धावत होतेच. तो मुलगा एखाद्या लांडग्याप्रमाणे त्या शिपायांकडे पाहात होता.

"चल, पाय उचल लवकर!" आई त्या पोराला म्हणाली.

"उं! माझी काळजी नका करू तुम्ही. काही दुखत नाही हे!" तो पोरगा हातरुमालाने रक्त पुशीत होता, पण हे बोलून तो बाजूला थुंकला ती थुंकी रक्ताने भरलेली होती. "त्याने मला तलवारीच्या मुठीचा रट्टा दिला! पण मीही काही सोडलं नाही त्याला! काठीचा असा तडाखा हाणला की तो बोंबलायलाच लागला! तुम्ही थांबाच जरा!" इतकं बोलून त्याने आपल्या रक्ताने माखलेल्या हाताची मूठ हवेत फिरवली. "अजून जे व्हायचंय त्या मानाने हे काहीच नाही! ए लेकांनो! एकदा आम्ही सारे कामगार खवळून उठलो की मग लढाईसुद्धा न करता तुमचा नायनाट करू, समजलात!"

"चल लवकर!" आई लगबगीने त्या स्मशानभूमीच्या लहानशा फाटकाकडे जात त्या मुलाला म्हणाली. तिची अशी कल्पना होती की कुंपणाच्या पलिकडे पोलिस शिपाई लपून बसलेले असणार व आपण बाहेर पडताच ते आपल्यावर तुटून पडणार. पण तिने फाटकाशी पोचल्यावर बाहेर नजर टाकली तो तिला दिसलं की हिवाळ्यात संध्याकाळच्या वेळी धूसर संधिप्रकाश असतो तसाच प्रकाश सर्वत्र पसरला होता, पण ते मैदान पूर्णपणे रिकामं व शांत होतं.

"थांब, तुझी जखम बांधते अं आता!" आई म्हणाली.

"काही नको, मला नाही लाज वाटत त्याची!" तो मुलगा म्हणाला,

"धर्मयुद्ध झालं आमचं. त्याने मला एक ठोसा दिला तर मीही त्याला एक दिला!"

आईने झटपट ती जखम बांधून टाकली. त्या मुलाचं रक्त पाहून तिला त्याच्याविषयी करुणा आली व त्याच्या उष्ण व चिकट रक्ताच्या स्पर्शाने तिच्या अंगावर शहारे आले. तिने काही न बोलता लगबगीने त्याला घेऊन मैदान ओलांडलं.

"तुम्ही मला कुठं नेताहात, कॉमरेड?" त्याने तोंडावरची पट्टी दूर करून विचारलं. "मी एकटा जाऊ शकतो की आता."

तो ऐटीत असं बोलला तरी आईला त्याच्या हाताचं थरथरणं जाणवत होतं व त्याचे पाय कापत असल्याचंही दिसत होतं. तो सारखा बोलत होता व उत्तराची वाट न पाहाता प्रश्नांची सरबत्ती त्याने सुरू ठेवली होती. त्याचा आवाज मात्र अधिकाधिक क्षीण होत होता.

"तुमचं नाव काय? मी लोहार आहे अन् माझं नाव इवान. येगोर इवानोविचच्या अभ्यासमंडळात आम्ही तिघेजण होतो—म्हणजे तिघे लोहार—असे एकूण अकरा जण होतो. आम्हाला तो फार फार आवडत होता—देव त्याच्या आत्म्याला शांती देवो! देवावर विश्वास नाही, पण—"

एका रस्त्यात आईने एक घोडागाडी बोलावली. इवानला आत बसवल्यावर तिने त्याला हलक्या आवाजात बजावलं, "काही बोलायचं नाही अं." मग तिने त्याच्या तोंडावरची पट्टी पुनः काळजीपूर्वक बांधून टाकली.

त्याने पुनः हात वर उचलून तोंडाकडे नेला, पण पुनः पट्टी सोडण्याचं त्राण नसल्यामुळे त्याने तो हात तसाच अगतिकपणे खाली पडू दिला. तरी त्या पट्टीतूनही त्याचं पुटपुटणं सुरूच होतं.

"मी हे कधी विसरणार नाही, समजलात—तो येण्यापूर्वी तितोविच नावाचा विद्यार्थी होता, तो आम्हाला शिकवायचा... अर्थशास्त्र शिकवायचा... पण त्याला अटक झाली..."

आईने इवानच्या खांद्यावरून हात टाकून त्याला जवळ ओढलं व त्याचं मस्तक आपल्या छातीवर टेकवलं. तितक्यात त्याचं शरीर तिच्या अंगावर पडलं व तो एकदम गप्प झाला. आई घाबरली व तिने हळूच बाहेर नजर टाकली. तिला सारखी भीती वाटत होती की कुठल्या तरी कोपऱ्यातून अचानक शिपाई धावत येतील व इवानचा पट्टी बांधलेला चेहरा पाहून त्याला धरून त्याचा प्राण घेतील.

"फार प्यालाय वाटतं?" गाडीवानाने थोडं मागे वळून व हसून विचारलं.



"हं! सोसणार नाही इतकी घेतलीन्—" आईने उत्तर दिलं व सुटकेचा उसासा टाकला.

"मुलगा तुमचा?"

"हं. चांभाराचं काम करतो. मी स्वैपाकिणीचं—"

"फार खडतर आहे जीवन तुमचं, नाही?"

त्याने चाबूक हवेत उडवला व तो पुन्हा मागे वळून हलक्या आवाजात बोलू लागला:

"आता थोड्या वेळापूर्वी स्मशानभूमीत दंगल झाली ते ऐकलंत तुम्ही? असं म्हणतात की ते कोणा तरी राजकीय पुढाऱ्याचं दफन करायला आले होते—बड्या लोकांच्या विरुद्ध चळवळ करणाऱ्यांपैकी होता तो—त्याचं दफन करायला जमलेले लोकही तसलेच असणार! मग म्हणे ते ओरडू लागले 'बडे अधिकारी मुर्दाबाद! हेच लोकांना लुबाडतात!' वगैरे. मग पोलिस आले न् त्यांनी मारहाणीला सुरुवात केली. काही लोकांना तर त्यांनी मरेपर्यंत मारलं म्हणतात. पण पोलिसही तसे सुटले नाहीत, त्यांनाही प्रसाद मिळालाच!"

मग किंचित् थांबून तो दुःखपूर्ण स्वरात, मान हालवीत उद्गारला, "पहा ना! मेलेल्या लोकांना सुद्धा सोडत नाहीत! स्मशानात गाडलेल्यांना सुद्धा शांती लाभू देत नाहीत!"

रस्त्यावरच्या दगडांवरून गाडी ठेचाळत होती तसं इवानचं मस्तकही आईच्या छातीवर आदळत होतं. गाडीवान अर्धवट मागे वळूनच गाडी चालवीत होता व त्याचं पुटपुटणं सुरूच होतं:

"लोकात असंतोष पसरतो आहे—जिकडे तिकडे धामधूम, दंगली वाढताहेत. काल रात्रीच शिपायांनी आमच्या शेजारी राहाणाऱ्या एका माणसाच्या घरी झडती घेतली, सारी रात्र धुडगूस घातल्यावर एका लोहाराला धरून नेलं त्यांनी. लोक बोलतात की ते रात्री त्याला नदीवर नेऊन बुडवून टाकतील! तो लोहार चांगला माणूस होता बिचारा."

"काय नाव होतं त्याचं?" आईने विचारलं.

"त्या लोहाराचं? सावेल येवचेन्को. आहे तरुणच, पण ज्ञान पुष्कळ आहे बरं का. पण इतकं ज्ञान न् माहिती असणं हाच गुन्हा ठरू लागलासं दिसतंय! तो नेहमी आम्हाला म्हणायचा, 'अरे गाडीवानांनो! काय तुमचं हे जिणं!' मग आम्ही म्हणत असू, 'कुत्र्यापेक्षाही वाईट!'"

"हं, आलोच घराजवळ! गाडी उभी करा!" आई म्हणाली.

गाडीच्या हादऱ्याने इवानला जाग आली व तो हलकेच कण्हू लागला.

"चांगलीच चढली आहे बरं का!" गाडीवान उद्गारला. "हे वोड्काचे प्रताप!"

मोठ्या कष्टाने चालत इवान आवारात पोचला. तरी तो म्हणतच होता,

"मला काही झालेलं नाही. मी एकटा चालू शकेन. सोडा मला..."

## १३

सोफिया आधीच घरी आलेली होती. ती काहीशी घाबरलेली व उत्तेजित झालेली होती. तोंडातली सिगारेट तिने दातांच्या मध्ये दाबून धरलेली होती.

त्यांनी त्या जखमी मुलाला पलंगावर ठेवल्यावर लगेच सोफियाने त्याची पट्टी सोडली व सिगारेटच्या धुरातून डोळे किलकिले करून पाहात तिने भराभर हुकूम सोडण्याला प्रारंभ केला.

"हं, त्यांनी याला आणलंय बरं का, इवान दानिलोविच! निलोव्ना, तुम्ही दमून गेला असाल, नाही? घाबरलात का? बरं, आता पडा तुम्ही. निकोलाय, निलोव्नाला एक प्याला पोर्टवाइन दे पाहू."

आई नुकतीच ज्या प्रसंगातून गेली होती त्यामुळे तिला चांगलाच धक्का बसला होता. तिला नीट श्वास घेणंही जड जात होतं व छातीत कळ आल्यासारखं वाटत होतं.

"माझी नका फिकीर करू तुम्ही," ती पुटपुटली. पण खरं म्हणजे तिला वाटत होतं, यावेळी कुणीतरी आपल्याकडे लक्ष देऊन मायेने आपली सेवा केली तर किती छान होईल!

निकोलाय पलिकडच्या खोलीतून आत आला. त्याच्या हाताला पट्टी बांधलेली आईने पाहिली. डॉक्टर इवान दानिलोविचही त्याच्याबरोबर होता. डॉक्टरचे केस पिंजारलेले होते. तो आत येताच सरळ पलंगावर झोपलेल्या इवानकडे गेला व वाकून त्याला तपासू लागला.

"पाणी आणा," तो म्हणाला. "पुष्कळ पाणी आणा. अन् कापूस न् स्वच्छ कपडाही घेऊन या."



आई स्वयंपाकघरात जायला निघाली, पण निकोलायने तिचा हात धरून तिला जेवणघरात नेलं.

"ते काम त्याने सांगितलं सोफियाला, तुम्हाला नव्हे," तो मार्दवपूर्ण स्वरात म्हणाला. "तुम्हाला फारच धक्का बसलाय, खरं ना आई?"

निकोलायच्या शोधक नजरेत सहानुभूती भरलेली होती; त्याच्या नजरेशी नजर भिडताच आईला आपल्या भावनांवर नियंत्रण ठेवणं अशक्य झालं व ती हुंदके देत उद्गारली,

"काय झालं हे! लोकांना कसं बेदम मारलं न् बडवलं त्यांनी..."

"मी पाहिलंय ते!" निकोलाय, मद्याचा पेला आईच्या हाती देत म्हणाला. "दोन्ही बाजूंच्या लोकांची माथी भडकली होती. पण तुम्ही चिंता करू नका. पोलिसांनी तलवारीच्या पात्यांच्या सपाट बाजूनेच प्रहार केले. फक्त एकालाच जबर दुखापत झाली असावीसं दिसतं. मी ते प्रत्यक्ष पाहिलं अन् त्या माणसाला दंगलीतून बाहेरही काढलं."

निकोलायचं हे मृदु स्वरातील बोलणं व त्या खोलीतील प्रकाश व ऊब यांचा परिणाम होऊन आईच्या मनावरील ताण पुष्कळच कमी झाला. तिने कृतज्ञतापूर्ण नजरेने त्याच्याकडे पाहिलं.

"त्यांनी तुम्हालासुद्धा मारलं का?" तिने विचारलं.

"नाही, मला वाटतं माझ्याच हातून झालं असावं हे. मीच निष्काळजीपणाने हात कशावर तरी आपटला व त्यामुळे कातडं सोलून निघालं. बरं, हा चहा घ्या पाहू. बाहेर फारच गारठा पडलाय न् तुमच्या अंगावर गरम कपडेही नाहीत."

तिने चहाचा कप घेण्यासाठी हात पुढे केला तोच बोटांवर वाळून गेलेलं रक्त तिला दिसलं. एकदम तिचा हात खाली झाला व तिच्या मांडीवर पडला. तिचं वस्त्रही ओलसर लागत होतं. तिच्या भुवया वर चढल्या व तिने डोळे ताणून आपल्या बोटांकडे पाहिलं. तिची छाती धडधड करू लागली व तिला भोवळ आल्यासारखं वाटू लागलं. तिच्या मनात विचार आला:

'पावेल—त्याला सुद्धा असंच मारतील ते!'

इवान दानिलोविचने त्याचवेळी त्या खोलीत प्रवेश केला. त्याने कोट काढून टाकला होता व नुसतं जाकिट अंगावर ठेवलं होतं व त्याच्या शर्टच्या

अर्ध्या बाह्या वर चढवलेल्या होत्या. निकोलायने काही न बोलताच नजरेने पृच्छा केली त्याचं त्याने मोठ्या आवाजात उत्तर दिलं,

"त्याच्या तोंडाची जखम फारशी गंभीर नाही, पण त्याच्या कवटीला भेग पडली आहे—तीही तशी फारशी गंभीर नाही. तो तसा धष्टपुष्ट पोरगा आहे, पण रक्तस्राव पुष्कळ झाला आहे. त्याला इस्पितळात पाठवू या का?"

"कशाला? राहू दे की इथंच!" निकोलाय म्हणाला.

"ठीक आहे. आजच्या दिवस राहू दे. फार तर आणखी उद्याचा दिवस. पण नंतर तो इस्पितळातच असला तर मला सोईचं होईल. मला घरोघर जायला वेळ मिळणार नाही. बरं पण तू स्मशानभूमीतल्या प्रकाराबद्दल पत्रक लिहून काढशील?"

"हो, ते करतो मी!"

आई गुपचाप उठून स्वयंपाकघरात जायला निघाली.

"तुम्ही कुठं निघालात, आई?" निकोलाय तिला अडवीत म्हणाला. "सोफिया सगळं पाहून घेईल. तुम्ही तसदी घ्यायची नाही आज."

आईने त्यांच्याकडे पाहिलं, विचित्रपणे हसून खांदे उडवले व ती म्हणाली,

"माझे सगळे कपडे रक्ताने माखले आहेत. ते पाहिलं का?"

आई स्वतःच्या खोलीत कपडे बदलीत असता मनाशीच बोलून आश्चर्य व्यक्त करीत होती की इतका भयंकर प्रकार होऊनही हे लोक शांत कसे? यांना याचं काहीच का वाटत नाही?

या विचारांनी तिच्याही अन्तःकरणातली खळबळ शांत झाली व तिची भीती नाहीशी झाली.

जखमी इवानला ठेवलेलं होतं त्या खोलीत आईने प्रवेश केला तेव्हा सोफिया इवानच्या अंगावर वाकून काहीतरी बोलत होती.

"हं, मूर्खासारखं बोलायचं नाही बरं का!" ती म्हणत होती.

"नाही. पण उगाच माझा अडथळा होईल की!" तो क्षीण आवाजात म्हणाला.

"आता बोलायचं नाही बिलकुल—म्हणजे तुला लवकर बरं वाटेल."

आई सोफियाच्या मागे उभी राहिली व तिच्या खांद्यावर हात ठेवून इवानच्या पांढऱ्याफटक पडलेल्या चेहऱ्याकडे पहात किंचित् हसून बोलू



लागली. गाडीत इवान कशी बडबड करीत होता व तिला कशी बतावणी करावी लागली हे तिने सोफियाला सांगितलं.

इवानचे डोळे लाल झाले व तो शरमिंदा होऊन म्हणाला, "मी खरंच किती मूर्ख आहे, नाही?"

"आम्ही आता इथून चाललोच," सोफिया त्याच्या अंगावरचं ब्लँकेट नीट करीत म्हणाली. "तू स्वस्थ झोप आता."

त्या दोघी बैठकीच्या खोलीत जाऊन त्या दिवशीच्या प्रकाराबद्दलच्या चर्चेत भाग घेऊ लागल्या. ती चर्चा बराच वेळ चालली होती व जे घडलं होतं ते घडून जणू काय फार काळ लोटला आहे अशा वृत्तीने ते सर्वजण शांतपणे त्याबद्दल चर्चा करीत होते व तितक्याच विश्वासाने भविष्यकाळातील कामाचे बेत आखीत होते. त्यांच्या चेहऱ्यावर थकवा दिसत असला तरी त्यांच्या बोलण्यातून त्यांची हिंमत व आत्मविश्वासच व्यक्त होत होता, शिवाय आपल्या कामाविषयी चर्चा करताना स्वतःविषयीचं असमाधान लपवून ठेवण्याचाही कुणीच प्रयत्न करीत नव्हतं.

डॉक्टर इवानची खुर्चीत बसल्याबसल्या चुळबूळ सुरू होती.

"हल्लीचा प्रचार फार अपुरा पडतो!" आपल्या कर्कश आवाजात शक्य तितकं मार्दव आणण्याचा प्रयत्न करीत तो उद्गारला. "तरुण कामगार म्हणतात ते बरोबर आहे. आपल्याला प्रचाराचं प्रमाण वाढवलंच पाहिजे. कामगारांचं म्हणणं बरोबर आहे—हो, मला पटतं ते!"

निकोलायने कपाळाला आठ्या चढवल्या व एखाद्या डॉक्टरने रोगाचं निदान करावं तशा पद्धतीने तो सांगू लागला,

"सगळीकडून तक्रारी येताहेत की आपलं वाङ्मय पुरेशा प्रमाणात मिळत नाही, अन् तरीसुद्धा आपल्याला एक चांगलासा छापखाना काही उभा करता आलेला नाही. लुद्मिला मर मरेतो काम करते आहे, अन तिच्या मदतीला आपण कोणी देऊ शकलो नाही तर ती नक्कीच आजारी पडेल!"

"पण वेसोव्श्चिकोव नाही का उपयोगी पडणार?" सोफियाने विचारलं.

"त्याला इथं शहरात राहाता येणार नाही. आपला नवा छापखाना सुरू झाला म्हणजे मगच तो काम करू शकेल. पण ते करण्यापूर्वी एका माणसाची गरज आहे."

"माझा नाही का उपयोग होणार?" आई मध्येच पण शांतपणे म्हणाली.

तिघेही जण एकदम काही न बोलता तिच्याकडे पाहात राहिले.

"हो, चांगली कल्पना आहे की!" सोफिया उद्गारली.

"ते काम तुम्हाला फार त्रासाचं होईल, निलोव्ना!" निकोलाय शुष्कपणे म्हणाला. एक तर तुम्हाला दुसरीकडे राहावं लागेल. म्हणजे पावेलची भेट घेता येणार नाही. शिवाय इतरही दृष्टचा..."

"पण पावेलला त्याचं फारसं वाटणार नाही. अन् माझं विचाराल तर खरं सांगायचं म्हणजे हे भेटीला जाणं एक प्रकारचं दिव्यच वाटायला लागलं आहे मला. मला त्याच्याशी बोलू देतच नाहीत. फक्त वेडयासारखं त्याच्याकडे पाहात राहायचं, अन् शिवाय मी जे बोलू नये ते बोलते की काय हे पाहाण्यासाठी ते शिपाई माझ्याकडे पाहात उभे असतात!"

गेल्या काही दिवसांतल्या घटनांचा आईच्या मनावर फार ताण पडला होता, त्यामुळे असल्या शहरी घडामोडींपासून दूर राहाण्याची संधी मिळण्याची शक्यता दिसताच तिने तात्काळ त्या संधीचा फायदा घेण्याचं ठरवलं.

पण निकोलायने एकदम निराळाच विषय काढला. तो डॉक्टरकडे वळून म्हणाला,

"तुझा कसला विचार चाललाय, इवान?"

डॉक्टर इवानने खाली केलेली मान वर केली. तो म्लान वदनानेच म्हणाला, "मी विचार करीत होतो की आपण किती थोडे लोक आहोत! आपण अधिक तडफेने काम करायला हवं. तसंच पावेल न् आंद्रेइ दोघांनीही निसटून येणं जरूर आहे हेही त्यांना पटवून द्यायला हवं. त्यांच्यासारख्यांनी तिथं नुसतं बसून राहाणं म्हणजे आपलं फार नुकसान आहे!"

निकोलायच्या कपाळावर आठ्या चढल्या व त्याने आईकडे एक दृष्टिक्षेप टाकला. आपल्यासमोर पावेलबद्दल बोलण्यात त्यांना संकोच वाटतो आहे हे ओळखून आई तिथून उठून गेली. शिवाय आपल्या इच्छेकडे त्यांनी दुर्लक्ष केलं हे पाहून तिला थोडा रागही आला होता. डोळे उघडे ठेवून अंथरुणावर पडल्या पडल्या त्यांच्या बोलण्याचा अस्पष्ट आवाज कानावर येत असता तिचं अन्तःकरण भीतीने व्यापलं जात होतं.

आजच्या सबंध दिवसात विलक्षण, अनाकलनीय व भविष्यकाळाविषयी



चिंता वाटायला लावणाऱ्या घटना घडल्या होत्या. पण यावेळी आई त्या घटनांचा विचार करीत नव्हती. ते सर्व दुःखद विचार बाजूला सारून ती केवळ पावेलचा विचार करीत होती. त्याची सुटका व्हावी असं अर्थातच तिला वाटत होतं, पण त्याचबरोबर तिला भीतीही वाटत होती. तिला असं वाटू लागलं होतं की तिच्याभोवती ज्या घटना घडत आहेत, त्यांचा वेग वाढून लवकरच काहीतरी प्रसंग ओढवणार आहे. लोक आजवर शांतपणे सर्व सहन करीत होते, पण आता वातावरण तंग होऊन लवकरच काहीतरी घडणार अशी चिन्हे दिसू लागली होती. लोक अन्यायाची चीड व्यक्त करू लागले होते. सगळीकडे संतापाचे उद्गार ऐकू येऊ लागले होते व असंतोष धुमसत होता. प्रत्येक पत्रक बाहेर पडलं की त्याची प्रतिक्रिया लगेच दिसून येई; बाजारात, दुकानात, नोकरवर्गात, कारागिरांच्या बैठकीत, सगळीकडे त्यावर जोराचे वाद सुरू होत. शहरात कुणालाही अटक झाली की भीतीचे व चिंतेचे उद्गार ऐकू येत व कधी कधी लोकांना नकळत त्यांच्या अन्तःकरणात त्या अटकेला कारणीभूत असलेल्या चळवळीबद्दल आपुलकीची भावना उत्पन्न होई. उठाव, सोशलिस्ट, राजकारण वगैरे एकेकाळी तिला घाबरवून सोडणारे शब्द अलिकडे अनेकदा अगदी साधे लोक सुद्धा उपयोगात आणू लागले होते. कधी कधी उपहासाने ते शब्द उच्चारले गेले तरी त्यातसुद्धा कुतूहल व्यक्त झाल्यावाचून राहात नसे; कोणी द्वेषबुद्धीने त्याविषयी बोललं तरी त्या द्वेषाआड भीती लपलेली असे; कुणी विचारपूर्वक बोलत असलं तर त्यात आशा व धमकी व्यक्त होई. अशा प्रकारे त्या संथ जीवनाच्या गहिऱ्या पाण्याच्या पृष्ठभागावरील असंतोषाची वर्तुळं विस्तार पावत चालली होती. सुप्तावस्थेतील विचार जागृतावस्थेत येत होते व रोजच्या जीवनाचं चक्र हे असंच चालायचं, या पूर्वीच्या अगतिकतेच्या प्रवृत्तीला हादरा बसला होता. जीवन किती खडतर असू शकते याचा फारच कटु अनुभव असल्यामुळे आईला हे परिवर्तन इतरांपेक्षा अधिक स्पष्टपणे जाणवू लागलं होतं व आता लोकांच्या विचारात बदल होऊन त्यांच्या असंतोषला तोंड फुटू लागलं होतं हे पाहून तिला आनंद होत होता व भीतीही वाटत होती. आनंद होत होता तो यामुळे की या स्थित्यंतरामागे आपल्या पुत्राची मोठी कामगिरी आहे हे तिला स्पष्ट दिसत होतं, व भीती वाटती होती ती अशी की पावेल तुरुंगातून निसटून आलाच तर पुनः जिथं सर्वात जास्त धोका असणार अशाच मोक्याच्या जागी तो काम करणार,

हे ती जाणून होती. अन् अशा स्थितीत पावेलचा अंत होईल, हे तिच्या मनाने घेतलं होतं.

कधीकधी तिच्या मुलाचं तिच्या कल्पनासृष्टीत असं विशाल चित्र रेखाटलं जाई की तो एखाद्या कथाकादंबरीतल्या नायकाचं रूप धारण करी, आणि तिने आजवर ऐकलेले स्फूर्तिदायक व उदात्त उद्‌गार व तिला आदरणीय वाटणाऱ्या सर्व व्यक्तींमधला सर्व भव्य-दिव्यपणा व शौर्यधैर्यादी गुण त्याच्या ठायी एकवटल्याचा तिला भास होई. अशा वेळी तिचं अन्तःकरण त्याच्याविषयीच्या अभिमानाने व मायेने भरून येई व ती शांतचित्ताने त्याच्याविषयी विचार करण्यात निमग्न होऊन जाई. मग तिला वाटे, सर्व काही चांगलंच होईल, चिंतेचं काही कारण नाही.

पण मग एकदम तिच्यातली माता जागृत होऊन विशाल मानवतेच्या भावनेवर मात करी व त्या आईच्या मायेच्या धगधगणाऱ्या आगीत ती विशाल भावना हळूहळू जळून भस्म होऊन जाई आणि त्या दिव्य भावनेच्या राखेतून एकच चिंता तिला सतत भेडसावू लागे की "त्याला ते ठार करतील... ते त्याला खचित ठार करतील!"

## १४

एके दिवशी दुपारच्या वेळी आई तुरुंगात पावेलच्या भेटीला गेली होती. पावेलच्या दाढी वाढलेल्या चेहऱ्याकडे व धुंद डोळ्यांकडे पाहात ती हाताच्या बोटांत दडवून ठेवलेली चिठ्ठी त्याच्या स्वाधीन करण्यासाठी योग्य संधी शोधत होती.

"मी अगदी मजेत आहे, अन् इतरही सगळे जण," पावेल संथपणे म्हणाला व त्याने विचारलं,

"तुझं कसं चाललं आहे, आई?"

"ठीक चाललंय. हो येगोर इवानोविच वारला." तिने कसंबसं सांगून टाकलं.

"आं!" पावेल उद्‌गारला व त्याने हळूच मान खाली केली.

"त्याच्या अंत्यविधीच्या वेळी पोलिसांनी तंटा सुरू केला व एकाला अटक केली," आई भाबडेपणाने सांगू लागली. इतक्यात तुरुंगाधिकाऱ्याचा दुय्यम बाजूला होता तो चक्‌चक् करून पुढे सरसावला व आईला म्हणाला,



"असल्या गोष्टी इथं बोलायच्या नाहीत हे माहीत नाही का तुम्हाला? राजकारणाबद्दल बोलण्याची सक्त मनाई आहे इथं!"

आईही उठली व ओशाळल्यागत होऊन म्हणाली,

"मी राजकारणाबद्दल बोलत नव्हते. नुसतं एका मारामारीचं सांगत होतं. त्यांनी खरंच फार मारहाण केली. एका पोराचं डोकं सुद्धा फोडलं—"

"म्हणजे तेच. तुम्ही त्याबद्दल काहीसुद्धा बोलायचं नाही. तुमच्या स्वतःबद्दल—म्हणजे तुमचं कुटुंब, घर, असल्या गोष्टींखेरीज इतर काहीच बोलायचं नाही—

आपणही उगाच या बोलण्यात गुंतलो अशा विचाराने त्याने हे बोलणं एवढ्यावरच सोडून मेज गाठलं व तो पुनः कागद चाळू लागला.

"असल्या गोष्टींची जबाबदारी माझ्यावरच येते ना मग!" तो जरा संत्रस्तपणे उद्‌गारला.

आईने आपली त्याच्यावर रोखलेली नजर तशीच ठेवून हळूच बोटातली चिठ्ठी पावेलच्या हातात ठेवून दिली व मग सुटकेचा निःश्वास टाकला.

"तुम्हाला काय बोलायची परवानगी आहे हे सुद्धा समजत नाही!' तो तुरुंगाधिकाऱ्याचा दुय्यम उद्‌गारला.

"हो ना! मला सुद्धा!" पावेल हसत हसत म्हणाला.

"मग भेटीला यावंच कशाला?" तो दुय्यम चिडून बोलला. "काय बोलावं हे माहीत नाही तर मग यावंच कशाला? निष्कारण दुसऱ्याला त्रास—"

"का हो? याचा खटला लवकरच सुरू होईल का हो?" आईने विचारलं.

"सरकारी वकील थोड्या दिवसांपूर्वी इथं आला होता. तो म्हणत होता खरा की खटला लवकरच सुरू होईल म्हणून—"

आई मुद्दामच त्याच्याशी आणखी थोडं बोलत राहिली. हे बोलणं चालू असता पावेलची प्रेमळ नजर आपल्याकडे लागलेली आईने पाहिली. तो नेहमीप्रमाणे अगदी शांत होता. त्याच्यात कसलाच बदल झालेला दिसत नव्हता. फक्त त्याचे हात जरा अधिक पांढुरके दिसत होते व दाढी वाढल्यामुळे तो जरा वयस्क भासत होता. तिला निकोलाय वेसोव्श्चिकोवबद्दलची आनंदाची बातमी त्याला सांगायची होती. तेव्हा

आतापर्यंतच्या भाबडेपणाच्या बोलण्याच्या पद्धतीने सहज बोलल्यासारखं ती म्हणाली,

"तुझा तो मानलेला मुलगा भेटला होता बरं का—"

पावेलने प्रश्नार्थक नजरेने तिच्याकडे पाहिलं. तिने आपल्या गालावर बोटं फिरवून खुणेने त्याला वेसोवृश्चिकोवच्या देवीच्या वणांची कल्पना दिली व ती म्हणाली, "त्या पोराचं ठीक चाललंय बरं का. लवकरच त्याला काम लागणार आहे."

तिचा आशय पावेलच्या ध्यानात आला व त्याने मान हालवली. त्याच्या डोळ्यांत हसू भरलेलं होतं.

"मग फार छान!" तो उद्‌गारला.

"झालं, एवढंच सांगायचं होतं!" असं म्हणून ती उठली. ती स्वतःवर फारच खूष होती व पावेल आनंदित झालेला पाहून मनातून फार सुखावली होती.

पावेलने निरोप देताना तिचा हात प्रेमाने दाबला व तो म्हणाला, "बराय, आई!"

पावेल अन्तःकरणाने आपल्या फार जवळ आला आहे या जाणिवेने तिला मनस्वी हर्ष झाला व जणू काय कडक मद्याचा प्रभाव पडावा अशी ती भारून गेली. त्याच्या शब्दांना साद देण्याला तिला शब्दच सुचेनात, म्हणून तिने काही न बोलताच फक्त हात दाबून त्याचा निरोप घेतला.

ती घरी आली तर साशा तिची वाटच पहात होती. ती तुरुंगात भेटीला जाई त्या दिवशी बहुधा ती घरी यायचीच. ती पावेलबद्दल स्वतः होऊन कधीच बोलत नसे, आणि आईसुद्धा त्याबद्दल काही बोलली नाही तर आईच्या डोळ्यांत निरखून पाहून ती आपलं कुतूहल पूर्ण करून घेई. पण या खेपेला मात्र तिने चतुरतेने सरळच प्रश्न केला:

"पावेल कसा आहे?"

"ठीक आहे."

"तुम्ही चिठ्ठी दिली त्याला?"

"हो. मी किती सफाईने ती त्याच्या हाती दिली ते पाहायला हवं होतं तुम्ही."

"मग वाचली ती त्याने?"

"तिथंच? तिथं कशी वाचील?"



"हो खरंच, विसरलेच मी!" साशा हिरमुसली होऊन म्हणाली. "आता एक आठवडा थांबावं लागणार—सात दिवस! बरं पण तो कबूल होईलसं वाटतं का तुम्हाला?"

साशाच्या कपाळावर आठ्या पसरल्या होत्या व ती आईकडे निरखून पाहात होती.

"कुणी सांगावं!" आई विचारमग्न होत बोलू लागली. "पण त्यात काही धोका नसेल तर का कबूल होणार नाही तो?"

साशाने मानेला एक झटका दिला. मग ती एकदम आईला म्हणाली,

"बरं, पण आपल्या घरच्या रोग्याला काय काय खायची परवानगी आहे हे ठाऊक असेल ना तुम्हाला? त्याला भूक लागली आहे."

"सगळं काही खाऊ शकतो तो. एक मिनिटात मी—"

आई स्वयंपाकघरात गेली व साशाही तिच्या पाठोपाठ गेली.

"मी काही मदत करू का?"

"वा! काही नको!"

आईने वाकून शेगडीवरचा एक वाडगा उचलला.

"पण—" साशा हळूच म्हणाली.

तिचा चेहरा फिकट दिसू लागला व ती व्याकुळ नजरेने पहात थरथरत्या ओठांनी अगदी हलक्या आवाजात बोलू लागली,

"मला विचारायचं होतं—तो कबूल होणार नाही अशी माझी खात्री आहे—पण तुम्ही त्याला ते पटवून द्यायला हवं—द्याल ना पटवून? त्याची फारच आवश्यकता आहे आपल्याला! आपल्या चळवळीसाठी हे करायलाच हवं असं सांगा त्याला. त्याच्या तब्येतीचीसुद्धा मला काळजी वाटते म्हणून पण सांगा. तुम्ही पाहाताच आहा—अजून तर खटल्याची तारीखसुद्धा ठरली नाही—"

तिला हे बोलून टाकणं फार जड जात होतं हे स्पष्टच होतं. ती बोलताना अडखळली, एकदम ताठ उभी राहिली, तिने नजर बाजूला वळवली व मग डोळे गच्च मिटून घेऊन ओठ चावला. तिने हाताच्या मुठी घट्ट बांधल्या त्यावेळी बोटं कडाकड मोडली तेही आईला ऐकू आलं.

साशाचं हे काकुळतीचं, भावनावेगाचं बोलणं ऐकून आईच्या मनातही खळबळ माजली. पण तिने साशाचं मन ओळखलं व तिला मायेने जवळ ओढलं.

"पोरी!" ती खिन्नपणे उद्गारली. "तो कुणाचं—स्वतःशिवाय कुणाचंही ऐकणार नाही!"

त्या दोघी एकमेकींना चिकटून स्तब्ध राहिल्या.

मग साशाने हळूच आईच्या मिठीतून स्वतःला सोडवून घेतलं.

"तुम्ही म्हणता ते बरोबर आहे," ती अंगावर शहारे आल्यासारखं होऊन म्हणाली. "माझं बोलणं मूर्खपणाचं होतं—मी फारच भावनांच्या आहारी गेले—"

नंतर एकदम शांत होऊन ती म्हणाली,

"बरं, आपण त्या आजारी पोराला खायला देऊ या."

इवानच्या शेजारी बसल्यावर तिने त्याला विचारलं, "तुझं डोकं अजून दुखतंय का रे?"

"फार नाही, पण अजून सगळंच कसं पुसट पुसट दिसतं—अन् अशक्तपणाही आहे," तो म्हणाला. त्याला जरा संकोचल्यासारखं होत होतं, ते भाव लपविण्यासाठी त्याने अंगावरचं ब्लँकेट हनवटीपर्यंत ओढून घेतलं व जणू काय प्रकाशाचा त्रास होत असल्यासारखे डोळे अर्धवट मिटून घेतले. याला आपल्यासमोर बसून खाण्याला संकोच होत आहे हे साशाने ओळखले व ती तिथून बाहेर निघून गेली.

इवान उठून बसला व तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पहात स्वतःशीच उद्गारला, "किती सुरेख आहे हिचं रूप!"

इवानचे नेत्र निळ्या रंगाचे होते व त्यात एक प्रकारची चमक होती, त्याचे दातही लहानसेच होते पण त्यांची ठेवण अत्यंत नीट व सुरेख होती व त्याचा आवाजही अजून फुटला नव्हता. त्यामुळे त्यात एक प्रकारचं मार्दव होतं.

"काय वय आहे रे तुझं?" आईने विचारलं.

"सतरा."

"अन् आईवडील कुठं असतात तुझे?"

"खेड्यात. मी दहा वर्षांचा झाल्यापासून इथंच असतो. शाळा संपवून इकडेच निघून आलो. अन् तुमचं नाव काय आहे, कॉमरेड?"

आईला कोणीही कॉमरेड म्हटलं की तिला त्याची गंमत वाटे व बरंही वाटे.

"काय करायचंय नाव कळून तुला?" आईने हसून विचारलं.

इवान जरा संकोचला व किंचित् थांबून म्हणाला,



"नाही, त्याचं असं की आमच्या अभ्यासमंडळातल्या एका विद्यार्थ्याने म्हणजे आम्हाला शिकवणाऱ्यांपैकी एकाने आम्हाला पावेल व्लासोव या कामगाराच्या आईबद्दल सांगितलंय. ते मे-दिनाचं निदर्शन आठवत असेल ना तुम्हाला?"

आईने मान डोलावली व ती त्याचं बोलणं लक्षपूर्वक ऐकू लागली.

"पावेलनेच आमचा झेंडा पहिल्या प्रथम उघडपणे रस्त्यातून मिरवत नेला!" इवान मोठ्या अभिमानाने सांगत होता व त्या अभिमानाच्या भावनेचे पडसाद आईच्या हृदयातही उमटत होते.

"मी तिथं नव्हतो त्यावेळी," तो मुलगा पुढे सांगू लगाला. "आम्ही पण आमची एक मिरवणूक काढणार होतो, पण ते जमलं नाही. आम्ही फार थोडे लोक होतो ना, म्हणून! पण आम्ही पुढच्या वर्षी खचितच करून दाखवू ते. पाहाल तुम्ही!"

त्या कल्पनेने तो इतका भारून गेला की त्याला नीटपणे श्वासोच्छ्वासही करता येईना.

"तर काय की मी व्लासोवच्या आईबद्दल म्हणत होतो," हातातला चमचा उडवीत तो म्हणाला. "ती सुद्धा त्यानंतर पार्टीत आली आहे. ती फारच विलक्षण बाई आहे असं म्हणतात."

आई तोंड भरून हसली. त्या पोराच्या तोंडून आपली स्तुती ऐकून तिला बरं वाटलं. पण त्याचबरोबर तिला संकोचल्यासारखंही झालं. तिला एकदा वाटलं, याला सांगून टाकावं की तू म्हणतोस ती व्लासोवची आई मीच! पण ती तसं बोलली नाही. उलट ती स्वतःला उद्देशून मनात म्हणाली, 'तू अगदीच मूर्ख आहेस की बये!' मग ती उघडपणे त्याला म्हणाली,

"हं, हे थोडं आणखी खाऊन घे पाहू. तुला चळवळीत भाग घ्यायचाय ना? मग तू लवकर बरं व्हायला पाहिजे, समजलास!"

ती वाकून त्याला भरवीत असता पुष्कळच उत्तेजित झाली होती.

इतक्यात रस्त्याच्या बाजूचा दरवाजा उघडला गेला व रात्रीचा गार वारा आत शिरला. आईने तिकडे पाहिलं तो सोफिया तिथं उभी होती. तिचा चेहरा स्मिताने खुललेला व प्रफुल्लित दिसत होता.

"बाई बाई! हे पाहिलंत? हे इतके हेर माझ्या पाळतीवर आहेत की एखाद्या श्रीमंताच्या कन्येभोवती गोंडा घोळणारे विवाहेच्छूच जसे काही! तेव्हा आता इथून जायलाच हवं मला...बरं, पण इवान, तुझं कसं आहे आता?

बरं वाटतंय ना? अन् पावेलची काय खबरबात, निलोव्ना? न् साशा आहे ना इथंच?"

सोफिया आपल्या घाऱ्या डोळयांनी अत्यंत प्रेमाने आई व इवानकडे पाहात होती व सिगारेट शिलगावून भराभर प्रश्न विचारीत होती. त्या प्रश्नांच्या उत्तरांची तिला अर्थात अपेक्षा नव्हतीच.

तिच्याकडे पाहात असता आईच्या चेहऱ्यावर स्मित विलसत होतं व ती स्वतःशीच म्हणत होती, "मला आता हे लोक आपल्यापैकीच मानायला लागले तर!"

मग ती पुनः वाकून इवानला म्हणाली,

"आता अगदी लवकर बरं व्हायचं बरं, बेटा!"

आई उठून जेवणघरात गेली. तिथं सोफिया साशाशी बोलत होती. ती म्हणत होती,

"तीनशे प्रती तर तयार केल्यासुद्धा तिने. इतकं काम करीत राहिली तर खलासच होईल ती. तिची खरोखरच कमाल आहे. अशा लोकांच्या बरोबर राहायची व त्यांचं कॉमरेड बनून त्यांच्या जोडीने काम करायची संधी मिळणं हे खरोखर भाग्यच म्हणायला पाहिजे, नाही साशा?"

"हो ना, खरं आहे ते," साशा हळूच म्हणाली.

संध्याकाळी सर्वजण चहा प्यायला बसले होते, त्यावेळी सोफिया आईकडे वळून म्हणाली,

"तुम्हाला पुनः एकदा प्रवासाला जावं लागणार बरं का."

"ठीक आहे. केव्हा जायचं?"

"तीन दिवसात जाऊन येता येईलसं वाटतं का तुम्हाला?"

"हो, होईल की."

"या खेपेला तुम्ही भाड्याची गाडी करून जा, अन् शिवाय मार्गही निराळा घ्यायला हवा; निकोल्स्कोये विभागातून जा तुम्ही," निकोलायने सूचना दिल्या. त्याचा चेहरा गंभीर व त्रस्त दिसत होता. त्याच्या नेहमीच्या शांतवृत्तीला ते बिलकुल साजेसं नव्हतं.

"निकोल्स्कोये भागातून—म्हणजे फारच लांबची चक्कर पडेल!" आई उद्गारली. "अन् घोडे न् गाडी..."

"खरं म्हणजे यावेळी तिकडे जाण्याच्या मी विरुद्धच आहे," निकोलाय बोलू लागला. "सध्या तिकडचं वातावरण प्रक्षुब्ध आहे. धरपकडही झाली



आहे—कुणा एका मास्तरला पकडलंय म्हणतात—तेव्हा आपण जास्त काळजी घ्यायला हवी. खरंच, आपण काही दिवस थांबलो तर चालण्यासारखं नाही का?"

"आपल्याला त्यांना सतत साहित्य पुरवीत राहायलाच हवं," सोफिया मेजावर बोटांनी ताल धरीत म्हणाली. मग ती एकदम आईकडे वळून म्हणाली,

"तुम्ही जायला घाबरताहात का?"

आईला हा प्रश्न खटकला. ती उत्तरली,

"मी कधीतरी घाबरले आहे का? मी प्रथम गेले तेव्हासुद्धा घाबरले नव्हते, अन् आता—तुम्ही असं का—" आईने ते वाक्य अर्धवटच सोडून मान खाली घातली.

ते लोक तिला ज्या वेळी तुम्हाला भीती वाटते का, तुमची हरकत तर नाही ना, किंवा तुम्ही अमुक गोष्ट करू शकाल का, असं विचारीत, त्यावेळी तिला वाटे हे लोक आपल्याला आपल्यापैकी न समजता निराळं मानून विनंती करताहेत, व हेच तिला खटके.

थोडं थांबून ती रुद्ध कंठाने पुनः म्हणाली,

"मी भिते आहे की काय असा प्रश्न मलाच का विचारता तुम्ही? तुम्ही आपापसात तर कधी बोलत नाही असं. मग मलाच का विचारता?"

निकोलायने आपला चष्मा काढून हातात घेतला व तो पुनः नाकावर ठेवून तो बहिणीकडे टक लावून पाहू लागला. हे दोघेही गप्प बसलेले पाहून आईलाच ओशाळल्यागत झालं व ती उठून उभी राहिली. ती काही बोलणार तो सोफियानेच तिचा हात धरून तिला थांबवीत म्हटलं,

"क्षमा करा अं मला. पुनः कधी असं करणार नाही मी."

सोफियाच्या आवाजात यावेळी विलक्षण मार्दव भरलेलं होतं.

आईच्या चेहऱ्यावर एक सौम्य स्मित उमटलं व थोड्याच वेळात ते तिघेही त्या प्रवासाच्या तपशीलाची चर्चा करण्यात निमग्न होऊन गेले.

## १५

हिवाळी पावसाने रस्ता धुवून निघाला होता. पहाटेची वेळ होती. एक घोडागाडी रस्त्यावरून धावत होती. आई त्याच गाडीत बसून आपल्या कामगिरीवर निघाली होती. वारा अंगाला झोंबत होता व सगळीकडे चिखल

उडत होता. गाडीवान आपल्या जागेवरच थोडा मागे वळून आईशी बोलत होता. किंचित् नाकात बोलत तो तक्रारवजा सुरात सांगत होता,

"म्हणून मी त्याला—माझ्या भावाला—म्हणालो की आपण वाटून खायला हवं. मग आम्ही वाटून खायला लागलो—"

मध्येच त्याने हातातला चाबूक डाव्या बाजूच्या घोड्याच्या पाठीवर फटकारला व तो रागाने ओरडला,

"नीट चाल रे ए, सूवरका बच्चा!"

थंडीचा गार वारा सूंऽऽ करीत होता. बाजूच्या शेतातल्या उघड्यानागड्या जमिनीत कावळे उडत होते. गार वाऱ्याचा मोठ्या धीराने सामना करीत ते एका जागी बसत तोच वाऱ्याने त्यांचे पंख फडफड उडू लागत व त्यांना रोवलेले पाय उचलून दुसरी जागा पकडणं भाग पडे.

इकडे गाडीवानाची बडबड सुरूच होती,

"मी एवढं म्हटलं तर तो पठ्ठा माझाही वाटा खाऊन बसतो अन् मी आपला कोरडाच्या कोरडाच..."

जणू काय स्वप्नात असल्यासारखं आई त्याचं बोलणं ऐकत होती. गेल्या काही वर्षांतल्या घटनांचा चित्रपट तिच्या मनश्चक्षूसमोरून सरकत होता व त्या घटनात आपण प्रत्यक्ष भाग घेतल्याचा अनुभव तिला येत होता. पूर्वी तिच्याभोवतालची परिस्थिती कुणातरी अज्ञात शक्तीने निर्माण केलेली होती. त्या परिस्थितीचा निर्माता कोण होता व त्याचा हेतू काय, याचा तिला बोध होत नव्हता. परंतु आता या परिस्थितीत कितीतरी बदल घडून येत होता. तोही तिच्या डोळ्यांदेखत, अन् तो बदल घडवून आणण्यात तिचाही हात होता, या कल्पनेने तिला फार बरं वाटलं. पण तरी आपल्या स्वतःच्या सामर्थ्याविषयी ती साशंकच होती. त्यामुळे तिचं मन बुचकळ्यांत पडलं होतं व ती खिन्न झाली होती.

तिचा प्रवास सुरू होता. भोवतालचं जग मंदगतीने धावत होतं. आकाशातले दाट ढग विचारमग्न होत्साते एकमेकांचा पाठलाग करीत होते, रस्त्याच्या दुतर्फाची ओलसर झाडं आपल्या पर्णहीन फांद्या सहजगत्या हलवीत होती, शेतांच्या रांगा जाऊन छोट्या छोट्या टेकड्या दिसू लागल्या होत्या व आता त्याही नाहीशा होत होत्या.

गाडीवानाचं नाकातलं बोलणं, घोड्याच्या लगामाला लावलेल्या घुंगरांची किणकिण, दमट वाऱ्याचं घोंघावणं, या सर्व ध्वनींचे एक विचित्र मिश्रण बनून तो कारारा आवाज शेतांवरून घुमत जात होता.



गाडीवान बसल्या जागेवर डुलत डुलत बोलता होता,

"तो माणूस फार श्रीमंत आहे, पण त्याला स्वर्गाची संपत्तीसुद्धा कमीच वाटते, म्हणून त्याने माझी गरिबाची लुबाडणूक करायलाही कमी केलं नाही, अन् सगळे बडे अधिकारी पडले त्याचे दोस्त..."

त्याचं विश्रांतीचं ठिकाण आलं तेव्हा गाडीवानाने घोडे सोडले व तो काकुळतीच्या स्वरात आईला म्हणाला,

"जरा पाच कोपेक द्याल तर थोडा घसा ओला करीन म्हणतो..."

आईने पाच कोपेकचं नाणं दिलं ते उंच उडवून हातात झेलीत तो उद्गारला,

"यातले तीन कोपेक वोड्कासाठी, अन् उरलेल्या दोन कोपेकचा घ्यायचा पाव!"

संध्याकाळ होण्याच्या सुमारास आई निकोल्स्कोये गावी येऊन पोचली. त्या लहानशा गावात तिने प्रवेश केला तेव्हा ती चांगलीच गारठून न् गळून गेली होती. गाडी थांबली तेव्हा ती चहा प्यायला म्हणून तिथल्या विश्रामगृहात गेली व आपली जड सूटकेस खाली ठेवून खिडकीजवळच्या एका बाकावर बसली. खिडकीतून तिला बाहेरचं चौकोनी पटांगण दिसत होतं, त्यातलं पिवळं गवत दबलेलं होतं व पलिकडे एक कलत्या छपराची जुनाट इमारत दिसत होती. ती स्थानिक कचेरी होती. तिथं बाहेरच्या सोप्यात एक टक्कल पडलेला शेतकरी नुसताच सदरा घालून चिलीम ओढत बसला होता. बाहेरच्या पटांगणात एक डुक्कर चरत होतं. ते सारखं कान फडफडवीत व मान हलवीत, जमिनीत तोंड खुपशीत होतं.

आकाशात काळ्या ढगांचे पुंजके हळूहळू सरकत होते. वातावरण अगदी शांत पण भकास वाटत होतं. तिथलं जीवन जणू कशाची तरी वाट पाहात तिष्ठत होतं.

अकस्मात एक पोलिस सार्जंट घोडा दौडवीत पटांगणात आला व कचेरीजवळ जाऊन त्याने घोडा थांबवला. हातातला चाबूक हवेत उडवीत तो त्या शेतकऱ्यावर खेकसला. त्याच्या ओरडण्याच्या आवाजामुळे खिडकीची काच हादरली, पण त्याचे शब्द आईला कळले नाहीत. शेतकरी उठून उभा राहिला व त्याने हाताने दूर पलिकडे निर्देश केला. पोलिस अधिकाऱ्याने घोड्यावरून खाली उडी टाकली, लगाम त्या शेतकऱ्याकडे फेकला, व मग

पायऱ्या चढता चढता अडखळल्यामुळे कठडा धरून त्याने वर सोपा गाठला आणि तो लगेच दारातून आत शिरून दिसेनासा झाला.

पुन: सर्वत्र स्तब्धता पसरली. घोड्याने दोनदा आपल्या खुरांनी खालची भुसभुशीत जमीन उकरली.

एक तेरा चौदा वर्षांची पोरगी आई बसली होती त्या खोलीत आली. तिचा चेहरा वाटोळा होता, तिच्या डोळ्यांत मार्दव होतं, व तिने आपल्या पिंगट रंगाच्या केसांची लहानशी वेणी घातलेली होती. ती बऱ्याच बशांनी भरलेली एक थाळी घेऊन येत असता सारखं डोकं हालवीत व ओठ चावीत होती.

"नमस्ते!" आई म्हणाली.

"नमस्ते!" ती मुलगी उत्तरली.

चहा व फराळाचे पदार्थ मेजावर ठेवून होताच ती मुलगी अचानकपणे मोठ्या उत्साहाने सांगू लागली,

"आत्ताच एक चोर पकडला गेला आहे म्हणे—अन् त्याला इकडेच घेऊन येताहेत!"

"कोण आहे तो?"

"ते माहित नाही मला—"

"कोणाची चोरी केली त्याने?"

"ते पण माहित नाही मला. फक्त त्याला पकडलंय एवढंच ऐकलं मी. रखवालदार गेलाय पोलिस अधिकाऱ्याला बोलवायला."

आईने खिडकीतून बाहेर नजर टाकली. पटांगणात शेतकरी जमा होत होते. काही जण हळूहळू गंभीर मुद्रेने येत होते, तर काही जण धावतपळत, कोटाची बटणं लावीत, घाईने येत होते. सगळेजण त्या इमारतीच्या समोर जमून डाव्या बाजूला नजरा वळवून उभे होते.

त्या मुलीनेही खिडकीतून बाहेर नजर टाकली व मग ती धावतच खोलीच्या बाहेर पडली. तिने जाताना धाडकन् दरवाजा लोटून घेतला. त्या आवाजाने आई दचकली व तिने आपली सूटकेस बाकाखाली आणखी आत ढकलली. मग डोक्यावरून एक शाल ओढून घेत ती लगबगीने दारातून बाहेर पडली. खरं म्हणजे तिला पळावंसंच वाटत होतं, पण तिने मोठ्या प्रयासाने ती इच्छा दाबून टाकली.

ती बाहेर व्हरांड्यात येऊन पोचली न पोचली तोंच अणू काय भयंकर



गारठा छातीला झोंबावा तसा तिच्या छातीत गोळा उठला. तिला धड श्वासोच्छ्वासही करवेना. तिचे पायही लटपटू लागले. समोर पटांगणातून पोलिस एका माणसाला धरून आणीत होते. तो माणूस दुसरातिसरा कोणी नसून रिबिन होता. त्याचे हात मागे बांधलेले होते व त्याच्या दोन्ही बाजूला एकेक पोलिस शिपाई हातातल्या काठ्या जमिनीवर आपटत चालत होते. लोकांचा जमाव ते दृश्य पाहात सोप्याच्या समोर स्तब्ध उभा होता.

आई ते पाहून स्तिमितच झाली. तिची नजर समोर खिळून राहिली. रिबिन काही तरी बोलत होता. त्याचा आवाज तिच्या कानात शिरत होता. परंतु तिच्या काळोख दाटलेल्या रित्या अन्तःकरणात त्याच्या शब्दांना साद मिळत नव्हती.

तिने एक दीर्घ श्वास घेतला व मग भानावर येऊन स्वतःला सावरले. सोप्याच्या जवळच निळ्या डोळ्यांचा व भली मोठी सुंदर दाढी असलेला एक शेतकरी तिच्याकडे टक लावून पाहात उभा होता. ती किंचित् खाकरली व भीतीने कापणाऱ्या हातांनी गळा चोळू लागली.

"काय प्रकार आहे हा?" तिने कसंबसं अवसान आणून त्याला विचारलं.

"तुम्हीच पहा!" तो उत्तरला व त्याने नजर वळवली. तेवढ्यात दुसरा एक शेतकरी समोरून येऊन तिच्या बाजूला उभा राहिला.

रिबिनला घेऊन चाललेले पोलिस शिपाई जमावाच्या समोर येऊन थांबले. जमाव वाढत असला तरी लोक शांत होते. अचानकपणे त्या जमावाच्या पलिकडून रिबिनचा आवाज ऐकू आला:

"सज्जन हो! आपणा शेतकऱ्यांच्या जीवनाची सत्यस्थिती सांगणाऱ्या पत्रकांबद्दल तुम्ही ऐकलं असेल. त्या पत्रकांबद्दलच ही शिक्षा भोगतो आहे मी. ती पत्रकं मीच वाटली होती!"

लोक रिबिनच्या निकट आले. त्याचा आवाज शांत व गंभीर होता. त्यामुळे आईही भानावर आली.

"ऐकलंस?" निळ्या डोळ्यांचा शेतकरी शेजाऱ्याला हलवीत म्हणाला. शेजाऱ्याने काहीच न बोलता मान वर करून आईकडे एक नजर टाकली. दुसऱ्या इसमानेही तिच्याकडे पाहिलं. तो त्या पहिल्या इसमापेक्षा वयाने लहान होता व त्याची दाढीही काळी व लांब होती. त्याचा चेहरा निमुळता होता व त्यावर पुष्कळसे व्रण होते.

थोड्याच वेळात ते दोघेही तिथून निघून गेले.

"घाबरलेले दिसतात दोघंही!" आई स्वत:शीच उद्‌गारली.

आई आता अधिक लक्षपूर्वक रिबिनकडे पाहू लागली. ती उभी होती तिथून तिला त्याचा काळवंडलेला जखमी चेहरा व त्याच्या अन्त:करणातील भावनांचा आवेग व्यक्त करणारी नेत्रांतली चमकही स्पष्ट दिसत होती. आपणही त्याला दिसावं अशा हेतूने ती टाचा व मान उंचावून त्याच्याकडे पाहू लागली.

जमावातले लोक साशंक नजरेने त्याच्याकडे पहात होते. कोणीच काही बोलत नव्हतं. फक्त जमावाच्या अगदी मागच्या बाजूला हलक्या आवाजात थोडीशी कुजबुज सुरू होती.

"शेतकरी बंधूंनो!" रिबिन आपल्या आवाजाला ताण देत उंच सुरात बोलू लागला. "त्या पत्रकात जे लिहिलं आहे त्यावर विश्वास ठेवा. मला कदाचित् त्यासाठी प्राणही गमवावे लागतील! ती पत्रकं मला कुठून मिळाली हे मी सांगावं म्हणून त्यांनी मला मारलं. माझे भयंकर हाल केले, अन् अजूनही पुन: ते मला मारतीलच. पण मी हा सगळा छळ सहन करायला तयार आहे. कारण त्या पत्रकांत जे जे सांगितलं आहे ते सर्व सत्य आहे, अन् सत्य हे आपल्या वीतभर पोटाच्या खळगीपेक्षा अधिक महत्त्वाचं आहे, म्हणूनच माझी या सर्व हालअपेष्टांना तोंड देण्याची तयारी आहे!"

"हे सर्व कशाला बोलतोय हा?" व्हरांड्याजवळ उभा असलेला एक शेतकरी उद्‌गारला.

"आता सगळं सारखंच!" निळ्या डोळ्यांचा इसम म्हणाला. "नाहीतरी मरण हे फक्त एकदाच येतं, मग भ्यायचं कशाला?"

जमावातले लोक अजूनही स्तब्ध उभे राहून रिबिनकडे पाहात होते. कुठल्यातरी अदृश्य दडपणाखाली दबून जावं तसे ते जागच्या जागी खिळले होते.

पोलिस सार्जंट धडपडत व्हरांड्यात आला.

"कोण बोलतंय इथं?" तो दारूच्या धुंदीत ओरडला.

मग तो कसातरी पायऱ्या उतरून खाली आला व रिबिनचे केस धरून त्याला गदगदा हालवीत त्याच्यावर खेकसला,

"तू बोलत होतास का रे? ए कुत्तेकी अवलाद!"

लोक चुळबुळ करू लागले व हलक्या आवाजात पुटपुटू लागले. आईला ते दु:ख असह्य झालं व तिने असहायपणे मान खाली घातली. पुन: रिबिनचा खणखणीत आवाज ऐकू येऊ लागला,



"हे पहा, लोक हो!.."

"गप बैस!" सार्जंटने त्याच्या कानशिलात जोराची थप्पड ठेवून दिली. रिबिनचा तोल गेला, पण त्याने खांदे हालवून स्वत:ला कसंबसं सावरून धरलं.

"एखाद्याचे हात जखडून बांधून मग त्याचा असा छळ करतात..."

"न्या त्याला इथून! ए शिपायांनो! अन् तुम्ही सगळेजण घरी जा पाहू!"

तोंडात हाडूक घेतलेल्या कुत्र्याने उड्या माराव्या तसा तो सार्जंट रिबिनच्या समोर उड्या मारीत होता व त्याच्या तोंडावर, छातीवर, पोटावर, ठोशामागून ठोसे लगावीत होता.

"ए! मारू नकोस त्याला!" जमावातून कुणीतरी ओरडला.

"काय म्हणून मारतोस त्याला?" कुणीतरी दुसऱ्याने साथ दिली.

"चला आपण जाऊ या," निळ्या डोळ्यांचा शेतकरी आपल्या सोबत्याला म्हणाला. ते दोघेही हळूच निघून गेले व आई स्नेहपूर्ण नजरेने त्यांच्या पाठमोऱ्या आकृत्यांकडे पाहात राहिली. पोलिस सार्जंट कसातरी धडपडत पायऱ्या चढून व्हरांड्यात येत होता ते पाहून तिने सुटकेचा नि:श्वास टाकला.

"त्याला इकडे आणा! मग दाखवतो साल्याला!" तो मुठी वळवीत ओरडत होता.

"हं! ऐकू नका त्याचं!" जमावातून कुणीतरी जोरात सांगितलं. आईने पाहिलं तर तो निळ्या डोळ्यांचा शेतकरी बोलत होता.

"त्याला नेऊ देऊ नका, मित्र हो! त्यांनी त्याला नेलं तर ते त्याला बेदम मारून जीव घेतील त्याचा! अन् वर लोकांनीच मारलं म्हणून सांगून मोकळे होतील! नेऊ देऊ नका त्याला!"

"शेतकरी बंधूंनो!" रिबिनची गर्जना ऐकू आली. "तुमचं जीवन कसं आहे हे पाहाताहात तुम्ही! ते तुम्हाला कसं लुबाडतात, कसं फसवतात, अन् कसं रक्त शोषून घेतात, हे दिसत नाही का तुम्हाला? सगळ्या गोष्टींची पैदास करता तुम्ही–पृथ्वीवरची सर्वात मोठी शक्ती म्हणजे तुमची–अन् तरी सुद्धा तुम्हाला कोणते हक्क आहेत? हक्क असेल तर तो एकच–उपाशी मरण्याचा!"

मग एकदम अनेक शेतकरी बोलू लागले.

"अगदी खरं सांगतोय, नाही?"

"ए, पोलिसांच्या बड्या अधिकाऱ्याला बोलवा की! तो लेकाचा कुठं दडून बसलाय?"

"पोलिस सार्जंट गेलाय त्याला बोलवायला!"

"कोण, तो दारुड्या?"

"उं! बड्या अधिकाऱ्यांना बोलवायचं काम आमचं थोडंच आहे!"

गलका वाढत चालला.

"बोल रे तू! आम्ही त्यांना तुझ्या अंगाला हात लावू देणार नाही!"

"सोडा रे त्याचे हात!"

"हं, सांभाळा! पकडलं जायचं नाही बरं का!"

"या दोरखंडांनी माझं हात दुखताहेत," त्या कोलाहलातही ऐकू येईल इतक्या उंच व खणखणीत आवाजात रिबिन ओरडला. "पण मी पळून जाणार नाही, बंधूंनो! मला सत्यापासून दूर जाऊन लपून बसायचं नाही! ते सत्य माझ्या हृदयात वास करीत आहे!"

जमावातले काही थोडे लोक पलिकडं होऊन एका बाजूला उभे राहिले. ते काहीतरी बोलत होते व माना डोलावीत होते. पण अंगावर फाटकेतुटके कपडे घातलेले बरेचसे लोक उत्तेजित होऊन धावत येत होते. त्यांनी रिबिनच्या भोवती गर्दी केली होती व एखाद्या जंगलातल्या देवळाच्या कळसाप्रमाणे रिबिन त्या घोळक्यात उंच उठून दिसत होता. त्याने हात वर उंच उचललेले होते व तो ओरडत होता:

"धन्यवाद! लोक हो! फार आभारी आहे मी तुमचा! आपण एकमेकांचे हात मोकळे केले नाहीत तर मग कोण करील?"

त्याने आपली दाढी पुसली व रक्तबंबाळ हात उंच करून लोकांना दाखवीत तो जोरात म्हणाला,

"हे पहा माझं रक्त — सत्यासाठी सांडलेलं रक्त आहे हे!"

आई पायऱ्या उतरून खाली आली, पण मग गर्दीतून रिबिन दिसेना म्हणून ती पुनः वर चढली. कसलातरी अव्यक्त आनंद तिच्या अंतःकरणात उचंबळून आला होता.

"शेतकरी बंधूनो!" रिबिन बोलत होता. "ही पत्रकं मिळतील तेव्हा ती वाचून काढा! हे सत्य सांगणारे लोक पाखंडी न् बंडखोर आहेत असं तुम्हाला पाद्री न् अधिकारी सांगतील, पण त्यांच्यावर विश्वास ठेवू नका!



सत्य सध्या गुप्तपणे पृथ्वीवर संचार करीत आहे व लोकांच्या अंतःकरणात वसतिस्थान शोधत आहे. सत्य हे अधिकाऱ्यांना अग्नी व तलवारीसारखं भासतं. ते सत्याचा स्वीकार करूच शकत नाहीत. सत्य त्यांच्या प्राणावर बेतेल व त्यांना भस्मसात् करून टाकील! तुम्हाला सत्याची भीती नाही, सत्य तुमच्याशी मैत्री करील, पण त्यांचं सत्याशी कट्टर वैर आहे! म्हणूनच आज सत्याला जगभर गुप्त संचार करणं भाग पडत आहे!"

पुनः जमावातून उद्गार ऐकू येऊ लागले.

"ऐका! लोक हो, ऐका!"

"तुला फार छळ सहन करावा लागेल, दोस्त!"

"कोणी पकडून दिलं रे तुला?"

"पाद्र्यानं!" एका पोलिस शिपायाने सांगितलं.

दोघा शेतकऱ्यांनी पाद्र्याच्या नावाने एक अर्वाच्य शिवी हासडली.

"हं, सावध! तिकडे पहा!" कुणीतरी सावधगिरीचा इशारा दिला.

## १६

पोलिसांचा वरिष्ठ अधिकारी जमावाच्या दिशेने येत होता. तो चांगला उंच, धट्टाकट्टा, वाटोळ्या चेहऱ्याचा इसम होता. त्याने डोक्यावरची टोपी एका कानावर कलती ठेवलेली होती. त्याच्या मिशांचं एक टोक वर व दुसरं खाली वळवलेलं होतं. त्यामुळे त्याचा चेहराच कलता व विचित्रपणे हालत असलेला भासत होता. त्याच्या डाव्या हातात तलवार होती व उजव्या हाताचे जोराचे हातवारे सुरू होते. त्याच्या जोरदार पावलांचा खाड्खाड् आवाज सर्वांनाच ऐकू आला. त्याला वाट करून देण्यासाठी लोक बाजूला झाले व सांडलेलं पाणी जमिनीत मुरून जावं तसा सगळा गलकाही एकदम शांत झाला. लोकांचे चेहरे गंभीर दिसू लागले. आईला आपल्या डोळ्यांची आग होत असल्यासारखं व कपाळाच्या शिरा ताडताड उडू लागल्यासारखं वाटू लागलं. आपण पुनः जमावात जाऊन मिसळावं असं तिला वाटू लागलं. ती काहीशी वाकली व आपली उत्सुकता ताणून निश्चल उभी राहिली.

"हे काय?" पोलिस अधिकारी रिबिनच्या समोर थांबून त्याच्याकडे

न्याहाळून पाहात उन्मत्तपणे ओरडला. "याचे हात का बांधलेले नाहीत? बांधा ते!"

त्याचा आवाज जोरदार व मोठा होता, पण त्यात रुबाब नव्हता.

"ते बांधलेलेच होते. पण लोकांनी सोडले!" एका शिपायाने माहिती पुरवली.

"काय? लोकांनी? कोणत्या लोकांनी?"

आपल्यासमोर अर्धवर्तुळाकार उभ्या असलेल्या जमावाकडे अधिकाऱ्याने नजर रोखली.

"कोण होते ते लोक?" आपल्या रुक्ष आवाजात यत्किंचित्‌ही बदल न करता त्याने विचारलं.

आपल्या तलवारीच्या पात्याने त्या निळ्या डोळ्यांच्या शेतकऱ्याला स्पर्श करीत तो म्हणाला,

"काय रे, चुमाकोव, लोक म्हणजे तूच असशील, नाही? हं, लोक म्हणजे आणखी कोण कोण? तू आहेस का रे, मिशिन?"

उजव्या हाताने मिशिनची दाढी पकडून त्याने त्याला पुढे खेचलं. "तुम्ही सगळे इथून चालते व्हा बरं! बदमाष लेकाचे! जा पाहू! नाहीतर दाखवीन इंगा!"

त्याच्या आवाजात धमकीचा वा दरडावणीचा सूर नव्हता. तो शांतपणे बोलत होता व त्याने आपल्या सराईत पद्धतीने आपले लांब हात लोकांवर उगारले होते. लोक खाली माना करून व तोंडं वळवून मागे सरले.

"काय रे, तुम्ही कशासाठी आहात तर मग?" तो पोलिस शिपायांना उद्देशून बोलू लागला. "चला, बांधा त्याचे हात! पाहाता काय?"

त्याने शिव्यांची सरबत्ती सुरू केली व मग रिबिनकडे वळून तो खेकसला,

"ए, हात मागे घे! चल, लवकर आटप!"

"माझे हात बांधण्याची बिलकुल गरज नाही!" रिबिन म्हणाला. "मी पळून जाणार नाही की मारामारी पण करणार नाही. मग हात कशाला बांधायला हवेत?"

"काय?" तो अधिकारी ओरडला व रिबिनच्या जवळ आला.

"लोकांचा छळ करणं आता बंद करा तुम्ही, समजलात, दांडगटांनो!" रिबिन जोरात म्हणाला. "लवकरच तुम्हाला या पापाची फळं भोगावी लागतील!"



तो अधिकारी रिबिनकडे टक लावून पाहात होता व रागामुळे त्याच्या मिशा थरथरत होत्या.

"कुत्तेकी अवलाद! तुझी ही हिंमत! बरीच जीभ चालते की तुझी!" तो अधिकारी चकित होत चिडून उद्‌गारला व एक पाऊल मागे सरकला.

मग अचानकपणे त्याने हात उचलून रिबिनच्या चेहऱ्यावर एक जोराचा ठोसा लगावला.

"असल्या ठोशांनी सत्य मरणार नाही!" रिबिनने त्याच्या दिशेने पुढे सरसावीत गर्जना केली. तो पुढे म्हणाला, "अन् मला मारण्याचा तुला हक्क नाही, समजलास का रे कुतरड्या!"

"काय, मला हक्क नाही? मला?" पोलिस अधिकारी किंचाळला.

त्याने पुनः मूठ वळून रिबिनच्या मस्तकावर प्रहार केला, पण रिबिनने पटकन् खाली वाकून तो हल्ला चुकवला. अधिकाऱ्याचं पित्त त्यामुळे अधिकच खवळलं. जमावात कोणी तरी खाकरलं व रिबिन पुन्हा संतप्त आवाजात ओरडला,

"ए सैताना! मला हात लावलास तर याद राखून ठेव!"

पोलिस अधिकाऱ्याने भोवताली नजर टाकली तो त्याला आढळून आलं की लोकांनी त्यांच्याभोवती दाट कडं केलं होतं.

"निकिता!" तो अधिकारी ओरडला. "ए, निकिता!"

एक लोकरीचा कोट घातलेला ठेंगणा, लठ्ठसा शेतकरी गर्दीतून पुढे आला. त्याचं भलंमोठं, गुळगुळीत हजामत केलेलं डोकं खाली वाकलेलं होतं.

"निकिता!" पोलिस अधिकाऱ्याने मिशांच्या आकड्यांना पीळ भरीत हुकूम सोडला. "याच्या कानशिलात एक सणसणीत ठेवून दे पाहू—चांगली जोरदार!"

तो शेतकरी पुढे झाला. रिबिनच्या समोर थांबून त्याने मस्तक वर केलं. तेवढ्यात रिबिन जोरदार आवाजात लोकांना उद्देशून म्हणाला,

"पहा, लोक हो! हे सैतान आपल्याला आपल्याच हातांनी आपल्या लोकांच्या माना कशा मुरगळायला लावतात, पहा! पहा अन् विचार करा यावर!"

त्या शेतकऱ्याने मंदपणे आपला हात वर उचलला व रिबिनच्या मस्तकावर हळूच प्रहार केला.

"असा ठोसा देतात होय, बदमाषा?" अधिकारी खेकसला.

"ए, निकिता!" जमावातून एक आवाज आला. "देव जागा आहे अन् तो सारं पाहात असतो बरं का!"

"चल, लगाव जोरात!" अधिकाऱ्याने निकिताची मानगूट पकडून फर्मावलं.

पण निकिताने मस्तक खाली केलं व तो दूर झाला.

"केलं हेच पुष्कळ केलं मी!" तो पुटपुटला.

"काय?" तो अधिकारी दातओठ खात चिडून ओरडला. संतापाने लाल होऊन त्याने पाय दाणकन् आपटले व तो एक शिवी हासडीत रिबिनच्या अंगावर धावून गेला मग एक थाड् असा आवाज आला अन् त्या भयंकर प्रहाराने रिबिन कोलमडला. त्याने हात उचलण्याचा प्रयत्न केला, पण तेवढ्यात दुसरा प्रहार झाला व तो खाली कोसळला. तो खाली पडताच पोलिस अधिकाऱ्याने त्याच्या छातीत, पेकाटांत, डोक्यावर लत्ताप्रहार सुरू केले.

या प्रकाराने जमावातले लोक संतप्त झाले व त्यांच्यात खळबळ माजली. लोक खवळून आपल्यावर चाल करून येणार हे त्या अधिकाऱ्यानेही हेरलं; तो लगेच चपळाई करून मागे झाला व त्याने तलवार हवेत फिरवण्याला सुरुवात केली.

"हा काय प्रकार आहे? तुमचं बंड आहे वाटतं हे? अस्सं काय? ठीक!" तो चिडून उद्गारला.

त्याचा आवाज चिरकला व घसा इतका दाटला की त्याला बोलवेनासं झालं. त्याने ओरडण्याचा प्रयत्न केला, तोही व्यर्थ गेला. त्याच्या आवाजाप्रमाणेच त्याच्या शक्तीनेही त्याला दगा दिला. त्याची मान कलंडली, खांदे ढिले पडले व तो कावऱ्याबावऱ्या नजरेने लोकांकडे पाहात पाहात मागच्या मागे पळ काढण्याचा प्रयत्न करू लागला.

"असा प्रकार आहे तर!" तो घोगऱ्या आवाजात ओरडला. "न्या त्याला इथून! मी हा चाललो! ए! तो राजबंदी आहे हे ठाऊक नाही का तुम्हाला हरामखोरांनो? तो झारबादशहाविरुद्ध लोकांना चिथावण्याचा राजद्रोह करतो आहे हे माहीत नाही तुम्हाला? तरीसुद्धा त्याला साथ देता तुम्ही? मग तुम्ही लोकसुद्धा बंडखोर आहात तर! ठीक!"

आई हा सर्व प्रकार पाहात इतकी निश्चल उभी होती की तिच्या डोळ्याचं पातंही लवत नव्हतं. तिची सर्व शक्ती जणू काय तिला सोडून गेली



होती. तिचं मनही पार शून्यवत् झालं होतं. काही तरी भयंकर स्वप्न पाहिल्यावर भीतीने केविलवाणी अवस्था व्हावी तसं तिचं झालं होतं. लोक चिडून संतापून ओरडत होते त्या आरोळ्या तिच्या मेंदूपर्यंत पोचेपर्यंत मधमाशीच्या गुणगुणण्याइतपत क्षीण होऊन जात होत्या. पोलिस अधिकाऱ्याचा कंप सुटलेला आवाज तिला ऐकू येत होता. त्याचबरोबर आणखी कुणाचा तरी आवाज कुजबुजल्याप्रमाणे तिच्या कानात शिरत होता.

"तो गुन्हेगार असेल तर त्याच्यावर खटला करा..."

"त्याच्यावर दया करा, सरकार..."

"कुठल्याही कायद्याने असा छळ करण्याला परवानगी दिलेली नाही हे सत्य आहे..."

"परवानगी नाहीच मुळी! पसं असतं तर मग कुणीही कुणाला बेदम बडवीत सुटलं असतं. अन् तसं झालं म्हणजे झालंच!..."

लोकांचा जमाव दोन गटांत विभागला गेला. एका गटाने पोलिस अधिकाऱ्याला गराडा घातला व ते लोक त्याच्यावर ओरडू लागले व त्याचबरोबर रिबिनला सोडून देण्यासाठी गळ घालू लागले. दुसरा गट कमी लोकांचा होता. ते लोक खाली पडलेल्या रिबिनच्या भोवती गोळा होऊन पुटपुटत आपली चीड व्यक्त करू लागले. त्यातल्या काही लोकांनी रिबिनला उठून बसायला मदत केली व पोलिस शिपाई त्याचे हात बांधायला पुढे सरसावले तेव्हा ते संतापून म्हणाले,

"इतकी घाई कशाची झाली आहे तुम्हाला, सैतानांनो?"

रिबिनने आपल्या तोंडावरची व दाढीला लागलेली माती व रक्त पुसून टाकलं व काही न बोलता भोवताली नजर टाकली. अचानक आईकडे त्याची नजर गेली. ती थोडी पुढे झाली व त्याच्याकडे पाहून ओणवी होत तिने स्वतःला नकळत हात हालवला. पण त्याने तोंड फिरवून घेतलं. थोड्या वेळाने पुनः त्याची नजर तिला धुंडाळू लागली. तो उठून ताठ बसला व त्याने मस्तक वर उचललं. त्याचे रक्तबंबाळ गाल थरथरत असावेत असं तिला वाटलं.

"त्याने ओळखलं मला—खरंच का ओळखलं असेल मला त्याने?"

तिने त्याच्याकडे पाहून मान हालवली. कसल्यातरी जोरदार आशेने तिचं सारं अंग थरारलं. पुढच्याच क्षणी तिच्या दृष्टीस पडलं की तो निळ्या

डोळ्यांचा शेतकरी रिबिनच्या बाजूला उभा होता व तिच्याकडे त्याचीही नजर लागली होती. एक क्षणभर तिला त्याच्या त्या नजरेची भीती वाटली.

"मी काय करते आहे हे?" ती स्वतःशीच म्हणाली. "अशाने ते मलाही धरून नेतील की!"

तो शेतकरी रिबिनला काहीतरी म्हणाला व त्याने मान हालवूनच त्याला उत्तर दिलं. मग त्याचा आवाज तिला ऐकू आला. त्या आवाजात कंप असला तरी तो स्पष्ट व धीरगंभीर होता,

"ठीक आहे!" रिबिन म्हणत होता. "या जगात मी एकटा नाही! संपूर्ण सत्याला पकडून अटक करणं त्यांना आजन्म शक्य होणार नाही. मी जिथं जिथं राहून जाईन तिथं सर्वत्र माझी आठवण कायम राहील... त्यांनी सगळं घरटं जरी उध्वस्त केलं असेल... सगळ्या कॉमरेड्सना ज़री पकडलं असेल..."

"तो हे मलाच उद्देशून म्हणत असावा—" आईने तर्क केला.

"पण एक दिवस असा येईल की सगळे गरूड पक्षी पुनः स्वैर भराऱ्या मारू लागतील—लोक आपल्या शृंखला तोडून टाकून स्वतंत्र होतील—"

इतक्यात एक बाई बादलीत पाणी घेऊन आली व रिबिनचं तोंड धुवून स्वच्छ करू लागली. तसं करताना तिला रडू आवरत नव्हतं. रिबिन काहीतरी बोलत होता पण त्याचे शब्द तिच्या रडण्याच्या आवाजात मिसळून जात होते त्यामुळे त्याच्या म्हणण्याचा आईला बोध होत नव्हता.

शेतकऱ्यांचा एक घोळका तिथं आला. पोलिस अधिकारी त्यांच्या अग्रभागी होता.

"या कैद्याला घेऊन जाण्यासाठी एक गाडी आणा पाहू! हे, चला कोणाची पाळी आहे आज?" कुणीतरी ओरडून म्हणालं.

मग पोलिस अधिकाऱ्याचा आवाज ऐकू आला. यावेळी त्याचा आवाज निराळाच होता. तो चिडून म्हणत होता,

"मी मारू शकतो तुला, पण तू मला मारू शकणार नाहीस! तुझी तसं करायची हिंमत नाही—काय रे ए, मठ्ठ डोक्याच्या?"

"असं का ते? तू कोण समजतोस स्वतःला? परमेश्वर?" रिबिननेही ओरडूनच विचारलं.

दबलेल्याच आवाजात पण अनेकांच्या तोंडून आश्चर्योद्गार बाहेर पडले, त्या आवाजात रिबिनचे शब्द मिसळून गेले.



"त्याच्याशी वाद घालू नकोस बाबा! तो बडा अधिकारी आहे!"

"त्याच्यावर रागावू नका, सरकार! तो सध्या भानावर नाही!"

"गप्प बस रे, ए भोळसटा!"

"तुला शहरात नेणार आहेत रे हे आता!"

"इथल्यापेक्षा शहरातच न्याय मिळेल!"

लोकांच्या बोलण्यात काकुळतीचा व मिळतं घेण्याचा सूर होता. त्या उद्गारांमुळे निर्माण होणाऱ्या गोंगाटातून फारशी आशा मात्र व्यक्त होत नव्हती.

पोलिस शिपायांनी रिबिनचे हात धरून त्याला उठवलं व कचेरीच्या इमारतीच्या पायऱ्या चढवून दरवाजातून आत नेलं. बाहेर जमलेले शेतकरी एकेक करीत निघून जाऊ लागले, पण तो निळ्या डोळ्यांचा शेतकरी मात्र आपल्याकडे येऊ लागलेला आईला दिसला. त्याचे नेत्र खाली वळलेले होते, पण तरीसुद्धा तो भुवयांच्या खालून तिच्याकडे पहात होता. तिचे पाय डगमगू लागले व तिचं अंतःकरण निराशेने व्यापून टाकलं. आपल्याला मळमळत असल्यासारखं तिला वाटू लागलं.

"मी इथून जाता कामा नये—" ती स्वतःशीच उद्गारली. "उं हूं! नाहीच जायचं!"

तिने कठडा घट्ट धरला व ती ताटकळत उभी राहिली.

पोलिस अधिकारी व्हरांड्यात उभा राहून जोरात हातवारे करीत चिडून बोलत होता. मात्र त्याचा आवाज आताही मघासारखाच निर्जीव व शुष्क भासत होता.

"तुम्ही अगदीच गाढव आहात! कुत्तेकी अवलाद! आपला काही संबंध नाही तिथं उगाच तोंड खुपसतात लेकाचे! हा सरकारी मामला आहे, समजलात, हरामखोरांनो? माझे आभार मानायला हवेत तुम्ही! तुम्हाला इतकी दया दाखवली म्हणून पाया पडायला हवं माझ्या, समजलात! माझ्या मनात आलं असतं तर तुम्हा सगळ्यांना जहाजात भरून खडी फोडायला रवाना करू शकलो असतो मी, काय?"

दहावीस उघडे बोडके किसान त्याचं बोलणं ऐकत उभे होते. आकाशात ढग खाली सरकत होते व पृथ्वीवर काळोख पसरत होता.

निळ्या डोळ्यांचा किसान आता आई उभी होती तिथं येऊन पोचला.

"पाहिलंत काय चाललंय ते?"

"हो ना!" आई हळूच उत्तरली.

"तुम्ही कशाला आला होतात इथं?" त्याने आईकडे पाहात विचारलं.

"मी शेतकऱ्यांच्या बायकांकडून लेस विकत घेते अन् विणलेला कपडा सुद्धा!"

त्या शेतकऱ्याने हळूहळू दाढी थोपटल्यासारखं केलं व तो निर्विकारपणे कचेरीच्या इमारतीच्या दाराकडे पाहात म्हणाला,

"आमच्या बायका तसलं काही करीत नाहीत!"

आईने त्याच्याकडे एक दृष्टिक्षेप टाकला व ती आत जाण्यासाठी अनुकूल संधीची वाट पाहू लागली.

त्या शेतकऱ्याचा चेहरा देखण्या लोकात जमा होण्यासारखा होता. यावेळी तो विचारमग्न होता व त्याच्या नेत्रांत दुःखाची छटा होती. तो चांगला उंच व धट्टाकट्टा होता. त्याच्या अंगावर एक ठिगळं लावलेला कोट, एक स्वच्छ कापडाचा सदरा व घरीच विणलेली तपकिरी रंगाची विजार होती व त्याने पायांत मोजे न घालता नुसतेच जोडे घातलेले होते. तेही जुने व जीर्ण दिसत होते.

आईला काय वाटलं कुणास ठाऊक, पण तिने अचानक सुटकेचा निःश्वास टाकला.

"मला तुमच्या घरात रात्रभर राहू द्याल का?" आईने अचानक प्रश्न केला. तिच्या गोंधळलेल्या मेंदूलाही अचानकच ही कल्पना सुचली होती. तिच्या तोंडातून हे शब्द बाहेर पडले खरे, पण पुढच्याच क्षणी तिचं सर्वांग ताठरलं. तिच्या नसा ताणल्या गेल्या. ती एकदम ताठ उभी राहिली व समोरच्या माणसाकडे नजर रोखून पाहू लागली. अंतर्यामी अत्यंत भयानक विचार तिला काटचाप्रमाणे बोचत होते. तिला वाटत होतं, "माझ्यामुळे निकोलाय इवानोविच संकटात सापडणार खास! अन् खूप खूप दिवसपर्यंत पावेलही माझ्या दृष्टीला पडणार नाही. चांगलीच मारहाण करतील मला ते."

तिचा प्रश्न ऐकल्यावर त्या शेतकऱ्याने आपल्या कोटाची कॉलर ओढून घेतली व खाली वळलेली नजर वर न करताच सावकाशपणे उत्तर दिलं,

"तुम्हाला रात्रीपुरतं राहू द्यायचं? हात्तिच्या, त्यात काय मोठंसं? पण माझी आपली गरिबाऊ झोपडी आहे हो!"

"मी पण काही महालात राहाणारी नाही!" आई म्हणाली.



"ठीक!" शेतकरी म्हणाला. त्याने नजर वर करून आईला नीट पाहून घेतलं. दिवस पार मावळला होता व त्या सायंकाळच्या काळोखात त्याचा चेहरा व डोळे दोहोत एक विचित्र चमक दिसत होती.

"मग मी ही निघालेच. पण तुम्ही ही माझी एवढी बॅग घ्याल?" आईने हळूच विचारलं. आपण फारच घसरत चाललो अशी कल्पना आईच्या मनात येऊन गेली.

"हो, घेतो की."

त्याने खांदे उंच करून कोट पुनः नीट केला.

"ही गाडी आलीच पहा," तो म्हणाला.

रिबिन व्हरांड्यात उभा होता. त्याच्या तोंडावर व डोक्यावर करड्या रंगाचं आवरण होतं व त्याचे हात बांधलेले होते.

धूसर संधिप्रकाशातून व गारठ्यातून त्याचा आवाज ऐकू आला,

"बरंय येतो मी! दोस्त हो! सत्याचा शोध करून त्याचं जतन करून ठेवा! तुमच्याकडे सत्याचा संदेश घेऊन येणाऱ्या व्यक्तीवर विश्वास ठेवा व सत्याच्या रक्षणासाठी जिवापाड झटा! बस!"

"ए, बडबड बंद कर तुझी!" पोलिस अधिकारी गरजला. "ए शिपाई! मूर्खा! चाबूक हाण की घोड्यांच्या पाठीवर!"

"अन् तुमचं नुकसान झालं तरी काय होणार? आहेच काय तुमच्या जवळ?" गाडी चालू झाली तसा दोन शिपायांच्यामध्ये बसलेला रिबिन पुनः आवेशाने बोलू लागला. "तुम्ही स्वतंत्र झालात तर पोटाला मिळेल न् न्यायही मिळेल! बराय, येतो मी! मित्र हो! नमस्कार!"

चाकांचा खडखडाट, घोड्याच्या टापांचा आवाज व पोलिस अधिकाऱ्याचं ओरडणं, या सर्व गडगडाटात त्याचे शब्द मिसळून गेले.

"संपलं सारं!" आईजवळ उभा असलेला तो शेतकरी उद्गारला, व त्याने तिला सांगितलं "जरा दोन मिनिटं इथंच थांबा. मी हा आलोच."

आई आतल्या खोलीत गेली व चहादाणी व फराळाचं ठेवलेल्या मेजाशी बसली. तिने पावाचा एक तुकडा उचलला, त्याच्याकडे पाहिलं व पुनः बशीत ठेवून दिला. तिची अन्नावरची वासनाच नाहीशी झाली होती; तिला पुनः मळमळल्यासारखं होऊ लागलं होतं. उकडायला लागल्यासारखं दाटून ती अस्वस्थ झाली होती. त्या मळमळीपायी तिला पार गळून गेल्यासारखं वाटत होतं. आपल्या अंगातलं सारं रक्त नाहीसं झालं आहे व डोकं गरगरा

फिरत आहे असं तिला वाटत होतं. तिला त्या निळ्या डोळयांच्या शेतकऱ्याचा चेहरा सारखा नजरेसमोर दिसत होता. तो चेहरा काहीतरी विचित्र व अपुराच असल्यासारखा तिला भासत होता व त्याच्याविषयी तिचं मन साशंक होऊ लागलं होतं. एकीकडे तिला वाटत होतं, तो दगाबाजी करील असा विचार मनात आणणं बरं नव्हे, पण तरी सुद्धा ती शंका तिच्या मनात घर करून बसली होती व ती काही केल्या नाहीशी होत नव्हती.

"त्यानेच मला पाहिलं," ती क्षीणपणे स्वतःशीच उद्गारली. "हो, त्याने मला पाहाताच सर्व ताडलेलं दिसतंय!"

पण हे विचारचक्र इथंच थांबलं. तिला मळमळत होतं व ती हताशही झाली होती, त्यामुळे तिला पुढे विचारही करवेना.

बाहेरच्या पटांगणात नुकत्याच संपलेल्या धांदलीनंतर आता नीरव शांतता पसरली होती, त्यावरून गावकरी भिऊन गेले असावेत असंच दिसत होतं व त्यामुळे तिला भासणाऱ्या एकाकीपणाची जाणीव तीव्रतर होत होती. राखेच्या ढिगाऱ्यासारखा कळकट निराशेचा ढीग तिच्या मनात साचला होता.

मघाची ती मुलगी पुनः दारात उभी होती.

"अंडी तळून आणू का तुमच्यासाठी?" तिने विचारलं.

"नाही, काही त्रास घेऊ नकोस. मला खायची इच्छाच उरली नाही. त्यांच्या ओरडण्यानं अन् किंचाळण्यानं छातीच दडपली माझी."

ती मुलगी मेजाजवळ आली व उत्तेजित होऊन हलक्या आवाजात सांगू लागली, "त्या पोलिस अधिकाऱ्याने त्याला कसं बेदम मारलं हे पहायला हवं होतं तुम्ही! मी जवळच उभी होते ना! त्याचे दातच पाडलेन् त्यानं! अन् मग तो रक्त ओकला. कसं दाट न् काळसर रक्त साचलं होतं! त्याचे डोळेही हे अस्से सुजून आले! तो डांबराचं काम करतो. अन् पोलिस सार्जंट वर दारू पिऊन तर्र होऊन पडला आहे! आणखी दारू मागणं सुरूच आहे त्याचं! तो म्हणतोय की चांगली मोठी टोळी आहे म्हणे त्यांची. अन् तो दाढीवाला म्हणे त्यांचा मुख्य आहे. टोळीचा सरदार असतो तसा! तिघे सापडले अन् एकजण मात्र निसटला! त्यांच्याच टोळीतल्या एका शाळामास्तरलाही पकडलंय म्हणतात. या लोकांचा म्हणे देवावर विश्वास नाही न् लोकांनाही ते सांगतात की देव नाहीच म्हणून! असं लोकांना नास्तिक बनवून चर्चची मालमत्ता लुटायची आहे त्यांना! असे आहेत हे लोक! आमच्या काही शेतकऱ्यांना वाईट वाटलं त्यांना पकडलं म्हणून, पण



दुसरे काही लोक म्हणतात की त्यांना फासावरच लटकवायला हवं! असे दुष्ट शेतकरी पुष्कळ आहेत हो!"

आई लक्षपूर्वक त्या मुलीची ती असंबद्ध बडबड ऐकत होती व आपल्या भीतिदायक कल्पना मनातून काढून टाकण्याचा तिचा यत्न सुरू होता. त्या मुलीला मात्र आपलं बोलणं ऐकून घेणारं कुणीतरी सापडलं याचाच फार आनंद झाला होता व तिने आपली बडबड उत्साहाने सुरूच ठेवली होती.

"माझे बाबा म्हणतात की पीकपाणी वाईट झालं की हे असं व्हायचंच. गेली दोन वर्षं जमिनीतून पीकच निघालं नाही त्यामुळे शेतकरी बिचारे हवालदील झाले आहेत. म्हणूनच ते असे चिडले आहेत. गावकीच्या सभेत सुद्धा ते ओरडतात न् मारहाण करतात! परवा असंच कर्जापायी वासुकोववर डिक्री काढली तर त्याने पंचाच्या थोबाडीत ठेवून दिली! अन् वर म्हणाला की ही घे माझ्या कर्जाची भरपाई! असं आहे बघा!"

दाराबाहेर दाणदाण पाय वाजले. आईने हाताने मेज धरून ठेवलं व ती कशीबशी उभी राहिली.

निळ्या डोळ्यांचा शेतकरी आत आला. त्याने आत येताना टोपी काढून हातात घेण्याचा शिष्टाचारही पाळला नाही.

"तुमची बॅग कुठंय"? त्याने विचारलं.

त्याने ती बॅग सहज उचलून हालवून पाहिली.

"रिकामीच! मार्का, या बाईंना माझ्या झोपडीकडे घेऊन चल बरं."

एवढं बोलून तो बाहेर पडला. त्याने जाताना मागे वळूनसुद्धा पाहिलं नाही.

"तुम्ही रात्री इकडेच राहाणार आहात का?" त्या मुलीने आईला विचारलं.

"हो—मी लेस घ्यायला आले होते. लेस विकत घेण्याचंच काम करते मी—"

"पण इथं लेस करीत नाहीत—तिन्कोवो न् दार्यिना या गावी लेस करतात, पण इथं नाही—" त्या मुलीने माहिती पुरवली.

आईने चहाचे पैसे चुकते केल्यावर तीन कोपेकच्या नाण्याची बक्षिशी देऊन त्या मुलीलाही खूष केलं. नंतर त्या दोघी बाहेर पडल्या. त्या मुलीने आपले अनवाणी पाय हलकेच ओलसर जमिनीवर ठेवीत आईला म्हटलं,

"तुम्ही म्हणाल तर मी दार्यिना गावी जाऊन तिथल्या बायांना लेस

घेऊन इथंच यायला सांगेन. म्हणजे तुमची तितकीच चक्कर वाचेल. नाही म्हटलं तरी चारपाच कोस असेल ते गाव इथून!"

"नाही, तुला कशाला त्रास, पोरी!" आई झपाझप पावलं उचलीत तिच्या बरोबर येत म्हणाली.

बाहेरच्या गार हवेने तिला बरं वाटू लागलं होतं व कसला तरी दृढनिश्चय तिच्या मनात घर करू लागला होता. ती कल्पना अजून अस्पष्ट होती व हळूहळू आकार धारण करीत होती, पण त्या कल्पनेचा आधार वाटून तिला आशा वाटू लागली होती व ती आशा दृढ व्हावी म्हणून ती स्वत:शीच म्हणत होती,

"काय करू मी आता? सगळं खरंखरं सांगून टाकू का?"

रात्रीच्या त्या हवेत गारठा व दमटपणाही होता. समोरच्या झोपड्यांच्या खिडक्यांतून दिव्यांचा मंद लालसर प्रकाश दिसत होता. धनगरांच्या आरोळ्या अन् गुरांच्या हंबरण्याचे आवाज त्या शांततेचा भंग करीत होते. सारं गाव काळोखात न् चिंतनात बुडून गेलं होतं.

"हे आलं बरं का आपलं ठिकाण!" ती मुलगी म्हणाली. "रात्रीच्या वसतीसाठी फारच भिकार ठिकाण शोधलंत तुम्ही. फारच गरीब शेतकरी आहे बिचारा तो!"

तिने काळोखात चाचपडत दरवाजा ठोठावला.

"तात्याना मावशी!" तिने मोठ्याने हाक दिली.

एवढंच करून तिने पळ काढला.

"येते बरं!" काळोखातून आलेला तिचा आवाज आईच्या कानात शिरला.

## १७

आईने आत प्रवेश केला व झोपडीचं नीट निरीक्षण करण्यासाठी डोळ्यांवर आडवा हात धरून ती पाहू लागली. झोपडी होती लहानशीच, पण तिथली स्वच्छता डोळ्यांत भरण्यासारखी होती. एक तरुण स्त्री तिथं चुलीच्या ओटयामागे उभी असलेली दिसली. तिथूनच तिने आईकडे दृष्टी टाकली, काही न बोलता मानेनेच आईला खुणावलं व ती पुन: अदृश्य झाली.



झोपडीत मेजावर एक दिवा जळत होता. झोपडीचा धनी तिथंच बसून मेजावर बोटांनी चाळवाचाळव करीत होता व आईच्या डोळ्यांकडे शोधक नजरेनं पहात होता.

"आत या ना," जरा वेळाने तो म्हणाला. "तात्याना, तू प्योत्रला बोलावून आण बरं. जा, लवकर!"

ती बाई आईकडे न पहाता बाहेर पडली. आई आत येऊन त्या माणसाच्या समोरच एक बाक होता त्यावर बसली व भोवताली पाहू लागली. तिची बॅग कुठंच दिसत नव्हती. झोपडीत विचित्र शांतता पसरली होती. मधूनमधून दिव्याची वात फडफडायची, तेवढाच काय तो आवाज ऐकू येत होता. त्या शेतकऱ्याचा चिंतातुर चेहरा तिला अंधुक दिसत होता तो पाहून ती अधिकच बुचकळ्यात पडली.

"माझी बॅग कुठं आहे?" ती एकदम म्हणाली. आपल्या या प्रश्नाने ती स्वत:सुद्धा दचकली.

शेतकऱ्याने खांदे उडवले व तो हलक्या आवाजात सांगू लागला, "ती हरवायची नाही. तिथं मी मुद्दामच त्या मुलीला ऐकू जावं म्हणून ती रिकामी आहे असं म्हणालो होतो. पण ती बॅग रिकामी नव्हती. चांगलीच जड होती की ती!"

"बरं, मग त्याचं काय?"

तो उठला व तिच्याजवळ येऊन त्याने वाकून अगदी हळूच विचारलं, "त्या माणसाला ओळखता ना तुम्ही?"

"हो," आई खंबीरपणे उत्तरली. पण त्या प्रश्नाने ती चकित झाली होती यात शंका नाही. त्या एकाक्षरी शब्दाने तिच्या अंतर्यामी एकदम लख्ख उजळल्यासारखं झालं व सगळं कसं स्पष्ट दिसू लागल्यासारखं वाटलं. तिने सुटकेचा नि:श्वास टाकला व ती आपली चुळबूळ थांबवून शांत चित्ताने बाकावर नीट बसली.

त्या शेतकऱ्याचा चेहरा खुलला व तो म्हणाला,

"तुम्ही त्याला खूण केली न् त्याने तुम्हाला खुणेनं उत्तर दिलं तेव्हाच अंदाज केला मी. मी त्याच्या कानात बोलून त्याला विचारलं सुद्धा की व्हरांड्यात उभी असलेली व्यक्ती तुझ्या परिचयाची आहे का म्हणून."

"मग काय — काय म्हणतो तो?" आईने आतुरतेने विचारलं.

"तो म्हणाला–आम्ही खूप खूप जण आहोत–खूप जण आहेत असं म्हणाला तो."

तो शेतकरी पाहुण्या बाईकडे पाहू लागला तेव्हा त्याच्या नजरेत मिस्किलपणा भरलेला होता.

"तो आहे खराच मर्द गडी!" तो हसून म्हणाला. "खरोखरच शूर आहे पठ्ठा! सरळ सांगतो की मीच तो म्हणून. अन् एवढी मारहाण सुरू होती तरी त्याला जे बोलायचं होतं ते बोललाच तो!"

त्याचं क्षीण व कापऱ्या आवाजातलं बोलणं, त्याचा अस्पष्ट दिसणारा चेहरा, त्याचे फिक्कट डोळे व त्यातली प्रामाणिक नजर, हे सर्व पाहून आईच्या मनावरचं दडपण नाहीसं होत होतं. हळूहळू तिचं भय व आश्चर्य नाहीसं होऊन रिबिनविषयीच्या अनुकंपेनं तिचं अंतःकरण भरून आलं.

"ते अगदी दुष्ट आहेत! दैत्य मेले!" ती चिडून उद्गारली. एवढंच बोलता बोलता तिला रडू कोसळलं.

तो शेतकरी दुःखी नजरेने पाहात मान हालवीत बाजूला झाला व उद्गारला,

"अधिकाऱ्यांच्या अशा वागणुकीमुळे उलट ते ज्यांचा छळ करतात ते लोकांना जास्तच प्रिय झाले आहेत!"

मग पुनः आईकडे वळून त्याने हलक्या आवाजात विचारलं, "त्या बॅगेत वर्तमानपत्रंच आहेत ना?"

"हो आहेत," आईने आपले अश्रू पुसून टाकीत उत्तर दिलं. "मी त्याला देण्यासाठीच ती आणली होती."

त्याने भुवया चढवल्या, आपली दाढी हातात आवळून धरली व तो कोपऱ्यात टक लावून पाहात उभा राहिला. थोडं थांबून तो म्हणाला,

"मागे आमच्यापर्यंत ती येऊन पोचली होती. अन् पुस्तकंसुद्धा. अन् आम्ही त्या माणसालाही ओळखतो–आम्ही पाहिलंय त्याला."

थोडं थांबून, विचार करून तो पुनः म्हणाला,

"तुम्ही आता त्या–त्या बॅगेचं काय करणार?"

"तुमच्याजवळ ठेवून जाणार, दुसरं काय?" ती त्याच्याकडे रोखून पहात आव्हानपूर्वक म्हणाली.

त्याने काही आक्षेप घेतला नाही व आश्चर्यही व्यक्त केलं नाही. उलट तो म्हणाला, "मग छान!"



मानेने संमती दर्शवीत तो मेजापाशी बसून बोटांनी दाढीचे केस विंचरू लागला.

बेदम मार बसलेली व रक्तबंबाळ अशी रिबिनची मूर्ती आईच्या मनश्चक्षूसमोरून काही केल्या हलेना. त्यामुळे दुसरे सगळे विचार पार नाहीसे झाले. दुःख व संताप यांनी इतर सर्व भावनांचं उच्चाटन करून टाकलं. त्यामुळे बॅगेचा व इतर कसलाच विचार करण्याची तिच्या मनाची तयारी नव्हती. तिच्या नेत्रांतून घळघळा अश्रू वाहात होते. पण तिचा चेहरा मात्र कठोर होता. ती दृढतापूर्वक उद्गारली, "माणसासारख्या माणसांना ते लुबाडतात न् वर अपमान करतात! ही पापं कुठं फेडणार हे लोक?"

"त्यांची ताकद फार मोठी आहे," तो शेतकरी थंडपणे उद्गारला. "फार, फार मोठी आहे ताकद त्यांची."

"कुठून येते त्यांची ही ताकद तरी?" आई रागाने म्हणाली. "आपल्यापासून–आपणा सामान्य लोकांपासूनच ही ताकद येते त्यांना! सगळं काही आपलंच घेतात ते!"

त्या शेतकऱ्याच्या चेहऱ्यावरील प्रेमळ पण प्रश्नचिन्हात्मक भाव पाहून तिला थोडासा रागच आला.

"हो," तो विचारमग्न होत म्हणाला, "हे चक्र..."

ते वाक्य अर्धवटच सोडून त्याने कान टवकारले व तो दरवाजाच्या बाजूला वाकला.

"ते येताहेत!" तो म्हणाला.

"कोण?"

"आपले मित्रच असावे तसं दिसतं."

त्याची बायको आत आली व तिच्या पाठोपाठ एका शेतकऱ्याने प्रवेश केला. त्याने आत येताक्षणीच आपली टोपी कोपऱ्यात भिरकावली व तो मेजाजवळ येऊन बसला.

"काय?" त्या नवख्या इसमाने विचारलं.

पहिल्याने नुसती मान हालवली.

"स्तेपान!" त्याची पत्नी चुलीजवळ उभी होती तिथूनच म्हणाली, "आपल्या पाहुण्याबाईंना भूक लागली असेल, नाही?"

"नाही, मला भूक नाही," आई म्हणाली.

तो नव्याने आलेला शेतकरी तिच्याकडे वळून बोलू लागला,

"मी स्वतःची ओळख करून देतो," तो चाचऱ्या आवाजात पण भरभर बोलत होता. "माझं नाव प्योत्र येगोरोविच रियाबिनिन – पण मला 'ऑल' या टोपणनावानेच ओळखतात सगळे. तुमच्या कामातलं थोडंबहुत समजतं मला. लिहावाचायलाही येतं – अगदीच काही अडाणी नाही मी."

तिने हात पुढे केला तो हातांत घेऊन त्याने हस्तांदोलन केलं.

"हे बघ स्तेपान," तो पुनः बोलू लागला. "वार्वारा निकोलायेवना ही बाई तशी मायाळू आहे, पण ती म्हणते की हे सगळं काम मूर्खपणाचं न् धोक्याचंही आहे. हे तरुण लोक न् विद्यार्थी हे लोकांच्या डोक्यात काही भलभलतं भरवून देताहेत असं म्हणते ती. पण आज त्यांनी त्याला पकडलं तो तर अस्सल किसान होता हे तुम्ही आम्ही आपल्या डोळ्यांनी पाहिलंय. अन् याही पाहा ना – या बाई चांगल्या वयस्क आहेत न् सुशिक्षित श्रीमंतांपैकी पण दिसत नाहीत त्या. काय, खरंय ना माझं म्हणणं?"

तो श्वाससुद्धा न घेता भरभर पण स्पष्ट बोलत होता. त्याची दाढी थरथर हलत होती व त्याची नजर आईच्या चेहऱ्यावर व सर्वांगावर भिरभिर फिरत होती. त्याचे कपडे फाटलेले अन् जीर्ण झालेले होते व त्याचे केस पिंजारलेले होते. तो जणू नुकतीच लढाई जिंकून आलेला विजयी वीर भासत होता. त्याची तडफ आणि आपल्या मनात असेल ते सरळ न् स्पष्टपणे सांगून टाकण्याचा त्याचा स्वभाव आईला फार आवडला व त्याच्या प्रश्नाला होकारार्थी उत्तर देताना तिने त्याच्याकडे पाहून स्मित केलं. त्याने पुन्हा तिचा हात जोराने हलवला व शुष्कपणे हसून तो बोलू लागला,

"हे काम फार चांगलं अन् पवित्र आहे. लोकातूनच ही चळवळ उदयाला येते असं मी म्हणालो होतो ना तुला? पण ती बाई – ती काही खरं बोलत नाही. तिनं खरं सांगितलं तर त्यामुळे तिचंच नुकसान होईल. नाही, म्हणजे तसा तिच्याबद्दल मला आदर आहे – ते अर्थात् सांगायला नकोच – ती बाई तशी फार चांगली आहे. आपल्याला जमेल तितकी मदत करायची इच्छाही असते तिची. पण ते सगळं स्वतःला काही तोशीस न लागू देता! सामान्य लोकांचं तसं नसतं – ते बिचारे स्वतःला कुठं लागेल, दुखावेल याची तमा न बाळगता सरळ उडी घेतात! हा फरक आहे, समजलास? त्यांना बिचाऱ्यांना काही न केलं तरी इजा होतच असते – त्यामुळे त्यांना ते सगळं सारखंच! कोणत्याही बाजूला वळलं तरी त्यांना तोच इशारा – 'थांबा!'"



"हूं!" स्तेपान मान हलवीत उद्गारला. नंतर तो म्हणाला, "या बाईना आपल्या बॅगची काळजी पडली आहे!"

रियाबिनिनने आईकडे पाहून डोळे मिचकावीत खूण केली.

"तुम्ही काही काळजी करू नका!" त्याने तिला आश्वासन दिलं. "सगळं काही ठीक होईल, आई. तुमची बॅग माझ्या घरी आहे. तुम्ही या कामासाठीच आला आहात अन् त्या माणसालाही ओळखता असं याने मला सांगितलं तेव्हाच मी त्याला म्हटलं की स्तेपान, असल्या कामी भलती चूक करता कामा नये बरं का! पण तिथं आम्ही तुमच्या बाजूला उभे होतो तेव्हाच आम्ही कोण हे तुम्ही ओळखलं असावंसं दिसलं. अन् बरोबरच आहे. – कोण प्रामाणिक आहे न् कोण नाही हे नुसतं पाहूनसुद्धा ओळखणं काही कठीण नाही – खरं म्हणजे, इमानदार लोक फारसे नाहीतच! हो, तुम्ही तुमच्या बॅगविषयी बिलकुल चिंता करू नका!"

तो तिच्या शेजारी जाऊन बसला व प्रश्नार्थक नजरेने पाहू लागला. तो म्हणाला,

"त्या बॅगेत जे काय आहे त्याची विल्हेवाट लावायची असेल तर आम्ही आनंदाने मदत करू तुम्हाला. त्या पुस्तकांचा उपयोग करू आम्ही."

"ती सगळी आपल्यालाच देऊन जाणार आहेत त्या," स्तेपान म्हणाला.

"मग फारच चांगलं, आई. आम्ही सगळं व्यवस्थित करून टाकू."

किंचित् हसून तो एकदम उडी मारून उठला व येरझारा घालू लागला.

"नशीब जोरावर आहे म्हणायचं! तसा काही मोठासा चमत्कार नाही म्हणा – दोरी एका ठिकाणी तुटली तरी दुसरीकडून पक्की राहिली एवढंच. ते वर्तमानपत्र फार चांगलं आहे, आई. त्याचा परिणामही होतोय. लोकांच्या डोळ्यांवरची झडपं दूर होऊ लागली आहेत. मात्र बड्या लोकांना ते आवडत नाही बरं का. इथून तीनचार कोसांवरच मी एका श्रीमंत बाईकडे चाकरीला असतो – सुतारकाम करतो मी. बाई तशी चांगली आहे. आम्हाला पुस्तकं वाचायला देते ती. कधीकधी आपले डोळे चक्क उघडतात असं एखादं पुस्तक सुद्धा हाती येतं. एकंदरीने आमच्यावर फार लोभ आहे तिचा. पण एकदा मी हे आपलं वर्तमानपत्र तिला दाखवलं – त्यावेळचा तिचा रौद्रावतार पाहाण्यासारखा होता! 'प्योत्र! असलं भलतंसलतं काही वाचत जाऊ नकोस' असं बजावलंन् तिने. 'काही मूर्ख शाळकरी पोरं हे लिहीत असतात

न् ते वाचून तू फुकट खड्डयात मात्र पडशील—सैबेरियात हद्दपारी तुरुंगवास भोगावा लागेल,' असाही इशारा दिलान् तिनं मला!"

एक मिनिटभर स्तब्ध राहून मग त्याने विचारलं.

"आई, आज त्याला धरून नेलं तो तुमच्या नात्याचा आहे का कुणी?"

"उं हूं!" आई म्हणाली.

प्योत्र गालातल्या गालात हसला व कशाचा तरी आनंद झाल्यागत त्याने मान हलवली.

"माझ्या नात्याचा नाही तो," आई पहिल्या उत्तरात दुरुस्ती करण्यासाठी घाईघाईने सांगू लागली, "पण फार दिवसांपासूनच परिचय आहे त्याचा, अन् मी त्याला अगदी माझ्या भावासारखं—वडील भावासारखं—मानते."

रिबिनशी नातं नाही असं सांगण्यात काही तरी चुकलं असं वाटून तिने ही दुरुस्ती केली होती. तरी आपल्या भावना व्यक्त करण्याला योग्य शब्द सुचले नाहीत या जाणिवेने ती दुःखी झाली व पुनः तिच्या नेत्रांतून अश्रू वाहू लागले. त्या झोपडीत एकदम गंभीर शांतता पसरली. मनावर काहीतरी दडपण यावं व काहीतरी कुतूहल वाटू लागावं असं वातावरण निर्माण झालं. कान देऊन काहीतरी ऐकत असावं तसा प्योत्र मान खाली घालून उभा होता. स्तेपान मेजावर कोपर टेकून अस्वस्थपणे बोटांची चाळवाचाळव करीत होता. त्याची पत्नी चुलीच्या ओटयापाशी उभी होती व तिची नजर आपल्यावरच खिळली असल्याचं आईला दिसत होतं. आई स्वतःसुद्धा मधूनमधून त्या बाईच्या तोंडाकडे पाहात होती. तिचा चेहरा लांबट व तांबूस वर्णाचा होता. तिचं नाक सरळ व हनुवटी निमुळती, सुरेख होती. हिरव्या रंगावर असलेले तिचे डोळेही पाणीदार व तीक्ष्ण होते.

"म्हणजे तो तुमचा मित्र आहे तर!" प्योत्र विचारमग्न अवस्थत म्हणाला. "चांगला हुशार न् स्वतंत्र बुद्धीचा आहे तो. तो स्वतःला फार मोठा समजतो, अन् ते बरोबरच आहे. खरंच, तात्याना! काय गुणी माणूस आहे तो! अन् तरी तू म्हणतोस की—"

"लग्न झालंय का त्याचं?" तात्यानाने मध्येच विचारलं. ते बोलताना तिच्या चिंचोळ्या तोंडाच्या लहानशा ओठांना मजेशीर मुरड पडली होती.

"विधुर आहे तो," आई खिन्नपणे म्हणाली.

"तरीच इतका शूर आहे तो," तात्याना म्हणाली. तिचा आवाज



फारच गोड पण खणखणीत होता. "लग्न झालेल्या संसारी माणसाला ही जबाबदारी घेताच यायची नाही. त्याला या मार्गाने जायची भीती वाटेल."

"मग माझं काय?" प्योत्र उद्‌गारला. "मी नाही का संसारी माणूस?"

"वा, वा! काय पण!" तात्याना मिस्किलपणे हसत बोलली. त्याच्या नजरेला नजर न भिडवता ती पुढे म्हणाली, "काय करता हो तुम्ही? नुसतं बोलता तेवढं! अन् कधीकधी एखाद दुसरं पुस्तक वाचता! तुम्ही न् स्तेपान कुठंतरी अंधाऱ्या कोपऱ्यात हळूहळू काय बोलत असता त्याचा लोकांना काही फायदा होतो का?"

"पुष्कळ लोक ऐकतात मी सांगतो ते!" प्योत्र कडवटपणे म्हणाला. तिने तुच्छतापूर्वक जो टोमणा मारला त्याचा त्याला राग आला होता. "मी आपला शांतपणे इथं काम करीत असतो. तू असं बोलायला नको बरं—"

स्तेपानने काही न बोलता आपल्या पत्नीकडे पाहिलं व पुनः नजर खाली वळवली.

"शेतकरी लग्न करतो ते कशासाठी?" तात्याना म्हणाली. "कारण त्याला राबायला बाई हवी असते म्हणून. अन् राबणं किती अन् कशासाठी?"

"तुला काही काम नाही वाटतं दुसरं?" स्तेपान मलूलपणे उद्‌गारला.

"या कामात तरी काही अर्थ आहे का? अर्धपोटी राहून नित्य राबायचं, बस! पोरंबाळं असली तरी कामाच्या रगाडयापायी धड त्यांच्याकडे सुद्धा लक्ष देता येत नाही! अन् इतकंही करून पोटाला पुरेसं नाही ते नाहीच!"

ती आईजवळ जाऊन तिच्या शेजारी बसली व पुनः बोलू लागली. पण तिच्या बोलण्यात तक्रारीचा सूर नव्हता की दुःखाचीही छटा नव्हती.

"मला दोन मुलं झाली. त्यातलं एक मूल दोन वर्षांचं असतानाच भाजून मेलं, अन् दुसरं मेलेलंच जन्मलं. अन् हे सगळं कामाच्या रगाडयापायीच. मला काय सुख मिळालं त्यापासून? म्हणून मी म्हणते की शेतकऱ्याने लग्नच करू नये. चांगलं मन मानेल तसं राहायला मिळतं, सुखी जीवनासाठी झगडता येतं, पण लग्न केल्याने त्या मार्गाने अडथळे येऊन हातपाय जखडल्यासारखं होतं. तसा अडथळा नसला म्हणजे सरळ

त्या माणसासारखं सत्याचा पाठपुरावा करायला मोकळीक राहाते. मी म्हणते ते खरंच ना, आई?"

"खरं आहे ते," आई म्हणाली. "खरं आहे ते, पोरी. तसं केलं नाही तर आपल्याला या जीवनात बदल होईल अशी आशाच करायला नको."

"तुमचे घरधनी असतील ना?"

"नाही, ते देवाघरी गेले. मला एक मुलगा आहे..."

"तो तुमच्या जवळच रहातो का?"

"तुरुंगात आहे तो," आईने सांगितलं.

या उद्गारात नेहमी दुःखाची छटा असे, तिच्या जोडीला या वेळी अभिमानाचंही मिश्रण होतं.

आई पुढे सांगू लागली,

"त्याची तुरुंगात जाण्याची ही दुसरी खेप. अन् का तर तो लोकांमध्ये देवाघरच्या न्यायाचा व सत्याचा प्रचार करतो म्हणून! तो तरुण आहे, दिसायला देखणा आहे अन् हुशार पण आहे. तुम्ही हे वर्तमानपत्र वाचता ते काढायची कल्पना त्याचीच. मिखाइलो इवानोविच रिबिन वयाने त्याच्या दुप्पट असला तरी हा योग्य मार्ग त्यानेच रिबिनला दाखवला. लवकरच माझ्या मुलावर खटला भरून ते नक्कीच त्याला सैबेरियात पाठवतील. पण तो तिथून निसटून येईल न् पुनः इकडचं आपलं काम करू लागेल..."

बोलता बोलता मुलाविषयीच्या वाढत्या अभिमानाने तिचं अन्तःकरण भरून येत होतं, आणि तिच्या त्या कहाणीच्या आदर्श नायकाचं स्पष्ट चित्र तिच्या मनश्चक्षूंसमोर उभं राहात होतं, व त्यामुळे वर्णनाचे शब्द इतके भराभर सुचून तिचा गळा दाटून येत होता. तो दिवसच असा काही विलक्षण गेला होता व त्या दिवशी तिला पाहाव्या लागलेल्या भयंकर व निरर्थक क्रौर्यामुळे तिच्या मनावर इतकं विलक्षण दडपण आलं होतं की ती काळीकुट्ट भयाणता घालवून लावण्यासाठी काहीतरी उजळ, बुद्धीला पटणारं व चैतन्यमय असं हवंच होतं. आणि तिच्या आत्म्याची ही न्याय्य मागणी पूर्ण करण्यासाठी म्हणूनच की काय, जे जे काही पवित्र व उज्ज्वल होतं ते एकत्र करून तिने अशी काही प्रखर ज्योती निर्माण केली की त्या अग्नीच्या प्रखरतेने ती स्वतःच दिपून गेली.



"अन् माझ्या मुलासारखेच शूर अनेक कार्यकर्ते आहेत," ती सांगत होती. "पुष्कळ, पुष्कळजण आहेत अन् असंख्य नवे कार्यकर्ते तयार होत आहेत; ते सर्वजण अखेरपर्यंत सत्य व स्वातंत्र्यासाठी प्राणपणाने लढत राहणार आहेत..."

या बोलण्याच्या भरात तिला नेहमीची सावधगिरी बाळगण्याचं भानच राहिलं नाही. पिळवणुकीपासून मुक्तता करण्यासाठी चाललेल्या गुप्त चळवळीबद्दल तिला जे माहीत होतं ते सगळं तिने सांगून टाकलं. फक्त नावं तेवढी सांगितली नाहीत. आपल्याला अत्यंत प्रिय असलेल्या त्या लोकांची माहिती सांगताना तिच्या शब्दांत विलक्षण सामर्थ्य व अर्थपूर्णता आली होती. तिच्या जीवनाने अनेक नागमोडी वळणं घेतल्यानंतर मग फार उशीरा ज्या प्रीतीचा मळा तिच्या अन्तरंगात बहरला होता, त्या प्रीतीतूनच त्या शब्दांना हे सामर्थ्य प्राप्त होत होतं. आणि आपल्या मनश्चक्षूंसमोर उभ्या रहाणाऱ्या त्या व्यक्तींच्या मूर्ती पाहून ती स्वतः सुखावत होती व तिच्या भावनेच्या उजाळ्याने त्या मूर्ती प्रकाशमान होऊन तेजोमय भासत होत्या.

"अन् हे कार्य पृथ्वीच्या पाठीवर सर्वत्र, प्रत्येक शहरात न् खेड्यात सुरू आहे." ती पुढे म्हणाली. "सज्जनांचं सामर्थ्य वाढतच जाईल व अखेर आपल्या विजयाचा सुदिन उगवेल यातही संशय नाही."

तिच्या ओघवत्या वाणीतून शब्दांचा प्रवाह अस्खलितपणे वाहात होता. त्या दिवशीच्या निर्घृण रक्तमय घटना व त्यातील मलीनता यामुळे तिला जे मनोमालिन्य आलं होतं ते नाहीसं करण्याच्या तिच्या तीव्र इच्छेपायी तिच्या तोंडचे शब्द माळेच्या मण्यांप्रमाणे झरझर बाहेर पडत होते. तिच्या बोलण्याचा त्या शेतकऱ्यांवर चांगलाच परिणाम होत होता, ते तिच्या चेहऱ्यावर दृष्टी खिळवून निश्चल बसून तिचं म्हणणं ऐकत होते, हे तिला दिसत होतं. तिच्या शेजारी बसलेल्या तात्यानाचा श्वास जोराने चालत होता तोही तिला ऐकू येत होता. त्यामुळे ती जे बोलत होती, त्या लोकांपुढे जे आशादायक चित्र उभं करीत होती, त्यावरचा तिचा स्वतःचा विश्वास व निष्ठाही दृढतर होत होती.

"ज्यांना ज्यांना म्हणून खडतर जीवन जगावं लागतं, ज्यांना दारिद्र्यात पिचावं लागतं, ज्यांना धनिक लोक व त्या धनिकांचे चाकर अन्यायाने पिळून काढतात—अशा सगळ्या लोकांनी त्यांच्यासाठी तुरुंगात छळ सहन करणाऱ्या व प्राणार्पण करणाऱ्या कार्यकर्त्यांना साथ दिली पाहिजे. हे

कार्यकर्ते स्वतःचा काडीइतकाही विचार न करता सर्व लोकांना सुखी करण्याचा मार्ग दाखवतात; कुणाचीही फसवणूक न करता ते स्पष्टपणे सांगतात की त्यांचा हा मार्ग हालअपेष्टांनी भरलेला व खडतर आहे, ते कुणालाही तो मार्ग स्वीकारण्याची सक्ती करीत नाहीत. पण जो कोणी एकदा त्यांच्या खांद्याला खांदा लावून लढायला सज्ज होतो, तो कधीच त्यांना सोडून जात नाही, कारण त्याला ही जाणीव झालेली असते की त्याची भूमिका न्यायाची आहे व त्याचा मार्ग हाच खरा मार्ग आहे, दुसरा मार्गच नाही!"

फार फार दिवसांपासून जे करायला मिळावं अशी तिची तीव्र इच्छा होती ते करण्याची संधी मिळाल्यामुळे तिच्या चित्तवृत्ती थरारल्या होत्या. ती स्वतः आज लोकांना सत्य सांगत होती!

"तुम्ही बिनधोकपणे अशा लोकांच्या मागे जाऊ शकता. अल्पस्वल्प लाभाने ते संतुष्ट होणार नाहीत. सारी फसवणूक, सारा स्वार्थ न् लोभीपणा अन् सगळ्या वाईट गोष्टींचं संपूर्ण उच्चाटन झाल्याशिवाय ते थांबणार नाहीत. जगातल्या सगळ्या लोकांची एकी करून ते सगळे लोक जोपर्यंत एकसुरात असा घोष करणार नाहीत की 'आम्हीच आमचे स्वतःचे धनी आहोत, अन् सर्वांना समान लेखणारे कायदे आम्ही स्वतःच करणार!' तोपर्यंत हे लोक हात जोडून स्वस्थ बसणार नाहीत."

इतकं बोलल्यावर तिला एकदम थकवा आल्यासारखं वाटलं. ती बोलणं थांबवून आपल्या श्रोत्यांकडे पाहू लागली. आपलं बोलणं व्यर्थ गेलेलं नाही हे पाहून तो हर्षित झाली.

ते सगळेजण मोठ्या उत्सुकतेने तिच्याकडे पाहात होते. प्योत्र छातीवर हात बांधून डोळे बारीक करून बसला होता व त्याच्या ओठांवर स्मित विलसलं होतं. स्तेपानने कोपर मेजावर टेकलेला होता व अजूनही तो बोलणं ऐकत असल्याप्रमाणे पुढे रेलून बसला होता. त्याचा चेहरा उजेडात नव्हता, पण त्यामुळे की काय आता त्याच्या चेहऱ्याला पूर्णता आल्यागत भासत होते. त्याची पत्नी आईच्या शेजारीच गुडघ्यांवर कोपर टेकून जमिनीचं निरीक्षण करीत बसली होती.

"असं आहे तर एकूण!" प्योत्र बाकावर आडवा होत श्वास रोखून उद्गारला.

स्तेपान नीट उठून बसला, त्याने पत्नीकडे पाहिलं व हात असे लांब



पसरले की जणू काय तो तिथं बसलेल्या सर्वांना आपल्या मिठीत कवटाळू पाहात होता!

"एकदा का अशा चळवळीत भाग घ्यायला सुरुवात केली," तो विचारपूर्वक म्हणाला, "की मग त्यात प्राणपणाने पडायलाच हवं!"

"मग माघार घेण्याची शक्यता नाही!" प्योत्र जरा साशंकपणे उद्गारला.

"पुष्कळच लोक या चळवळीत आहेतसं दिसतं!" स्तेपान उद्गारला.

"अरे, सगळं जगच आहे की!" प्योत्र म्हणाला.

## १८

आई भिंतीला टेकून, डोकं मागं कलतं ठेवून बसली होती व खेड्यातले लोक साध्या शब्दांत आपली मतं मांडत होते ते ऐकत होती. मधूनच तात्याना उठली, तिने भोवताली नजर टाकली व पुनः बसली. तिने तिथल्या पुरुषमाणसांकडे तिरस्काराने व नाराजीने भरलेली नजर टाकली तेव्हा तिच्या हिरव्या रंगाच्या डोळ्यांत एक प्रकारची थंड चमक होती. मग ती एकदम आईकडे वळन म्हणाली,

"तुम्ही बोलता ते ऐकायला फार आवडतं मला. तुमचे शब्द काळजाला जाऊन भिडतात अगदी. तुमचं बोलणं ऐकलं म्हणजे असं वाटतं की देवा, या सांगतात तसल्या लोकांचं दर्शन मला कधी तरी होईल का रे? अन् तुम्ही वर्णन करता त्या जीवनाचं सुद्धा! इथं काय आहे? आम्ही सगळेजण म्हणजे नुसते मेंढ्यांच्या कळपासारखं राहातो झालं! माझंच पाहा ना. मला लिहावाचायला येतं अन् मी पुस्तकं वाचते न् खूप विचार सुद्धा करते. कधीकधी तर मी रात्रीच्या रात्री विचार करीत पडून राहाते. पण काय उपयोग आहे त्याचा? मी विचार करायचं सोडून दिलं तर माझं सारं जिणं फुकट जाईल, अन् विचार करीत राहिले तरी व्यर्थच!"

तिच्या नेत्रांत मिस्किलपणाची चमक होती व ती बोलताना मधूनमधून एखादा दोरा दातांनी चावावा तसे चावून शब्द उच्चारीत होती. तिथं बसलेले दोघे पुरुष काहीच बोलले नाहीत. बाहेर वारं सुटलं होतं ते खिडक्यांवर आदळत होतं, धुराड्यात शिरून हलकेच शीळ घालीत होतं व छपरावरच्या गवतातून सळसळत होतं. मध्येच एक कुत्रं भुंकलं. मधूनच

पावसाचा एखाददुसरा थेंब खिडकीवर पडून टप् आवाज होई. दिव्याची वात फडफडून विझण्याच्या बेतात आली, पण पुन: लगेच मोठी होऊन पूर्वीपेक्षाही अधिक प्रकाश देत संथपणे जळू लागली.

"तुमचं बोलणं ऐकल्यावर मला वाटू लागलं की याला म्हणतात आयुष्याचं सार्थक करणं!" तात्यानाच पुन: बोलत होती. "अन् तुम्हाला सांगितलं तर गंमत वाटेल अन् हसूही येईल, पण मला आपलं ते सारं माहीत असल्यासारखंच वाटत होतं बघा. पण खरोखरच मी असं काही पूर्वी कधी ऐकलेलं नाही, व माझ्या स्वत:च्या डोक्यात अशा कल्पनाही कधी आल्या नाहीत."

"आपण सगळे आता काहीतरी खाऊन घेऊ अन् मग दिवा मालवू या!" स्तेपान कपाळावर आठ्या चढवून सावकाशपणे म्हणाला. "चुमाकोव कुटुंबात वाजवीपेक्षा जास्त वेळ दिवे जळत होते ही गोष्ट लोकांच्या नजरेतून सुटणार नाही. आपल्याला नाही, पण या बाईंना त्यामुळे त्रास होण्याची शक्यता आहे."

तात्याना उठून चुलीकडे गेली.

"हो बाबा, हल्लीच्या दिवसात सावधगिरीनेच पावलं टाकली पाहिजेत," प्योत्र हसून उद्गारला. "ही वर्तमानपत्रं सांपडली की लगेच—"

"मी माझ्या स्वत:बद्दल विचार करीत नाही," स्तेपान म्हणाला. "मला पकडलं तरी फारसं काही बिघडणार नाही."

स्तेपानची बायको मेजाजवळ येऊन म्हणाली,

"हं, उठा पाहू."

तो उठला व ती मेजावर जेवणाची तयारी करीत होती ते पाहू लागला.

"तू न् मी—" तो उपरोधिकपणे हसून बोलू लागला. "दोस्त, आपल्यासारखे लोक पायलीचे पन्नास भेटतील. पाच कवड्यांनासुद्धा कुणी विचारणार नाही आपल्याला!"

आईला त्याची कीव आली. त्याची जसजशी चांगली ओळख पटू लागली तसा तो तिला अधिकाधिक आवडू लागला. ती आज जे बोलली होती त्या बोलण्यामुळे सबंध दिवसभर मनात सांचून राहिलेलं मालिन्य साफ धुवून निघालं होतं. ती स्वत:वर प्रसन्न झाली होती व इतरांविषयीच्या सदिच्छांनी तिचं अन्त:करण भरून आलं होतं.

स्तेपानच्या बोलण्यावर ती म्हणाली,



"तुमचं हे म्हणणं बरोबर नाही. तुमचं रक्त शोषून घेणारे लोक तुम्हाला कवडीमोल लेखतात म्हणून तुम्हीही तसंच समजणं चूक आहे. तुम्ही स्वत:ची नीट पारख केली पाहिजे, आपल्या आत्म्याचं खरं मूल्य ओळखलं पाहिजे. आपले मित्र करतील ती खरी किंमत – शत्रू करील ती नव्हे!"

"आम्हाला मित्र तरी कोण आहेत?" स्तेपान उद्गारला. "साध्या चतकोर भाकरीच्या तुकड्यासाठीसुद्धा आम्ही आपापसात भांडत असतो!"

"पण तुम्हाला मित्र आहेत म्हणून मी सांगतेय ना!" आई म्हणाली.

"असतील, पण इथं नाहीत!" स्तेपान विचारमग्न होत म्हणाला.

"पण इथंच मित्र का शोधून काढत नाही तुम्ही?"

स्तेपान क्षणभर थांबून मग म्हणाला,

"हं... खरं आहे. मला वाटतं, तसंच करायला हवं आता."

"हं, चला. जेवण तयार आहे," तात्याना म्हणाली.

आईच्या बोलण्याने प्योत्र फारच प्रभावित झाला. जेवताना तो फारच उत्साहाने बोलत होता.

"तुम्ही पहाटेच निघून जायला हवं, आई. म्हणजे कुणाच्या लक्षात येणार नाही," तो म्हणत होता. "शहरातून न जाता सरळ पुढच्या मुक्कामालाच जा तुम्ही. गाडी घेऊनच जा म्हणजे झालं."

"त्यांना कशाला गाडी घ्यायला हवी? मी नेऊन पोचवीन की त्यांना!" स्तेपान म्हणाला.

"अं हं. तू नको जायला. मग ते विचारतील, रात्री तुझ्याकडे होती का ती बाई मुक्कामाला? तू सांग हो म्हणून! म्हणजे ते विचारतील, आता कुठंय ती? तसा तू सांग की मीच तिला पुढच्या मुक्कामावर पोचवून आलो! मग ते म्हणतील, अस्सं! तिला निघून जायला मदत करणारे आपणच म्हणायचे! अन् मग तुझी तुरुंगात रवानगी! असंच ना? अरे बाबा, तुरुंगात जायची एवढी घाई करायचं काहीच कारण नाही. सगळं कसं योग्य वेळी व्हायला हवं. म्हणतात ना, वेळ आली म्हणजे झार बादशहा सुद्धा जायचाच! पण असं दिसायला हवं की या आपल्या आल्या, रात्रभर राहिल्या, घोडे भाड्याने घेतले, न् निघून गेल्या! आपलं गाव हमरस्त्यावर असल्यामुळे पुष्कळ लोक इथं रात्री मुक्कामाला रहातात, तसं!"

"इतका भित्रेपणा कोणी शिकवला तुला, प्योत्र?" तात्याना उपरोधिकपणे म्हणाली.

"बाई ग! माणसाला सगळंच माहीत असायला हवं! भ्यायचं केव्हा, शूर केव्हा बनायचं, सगळं ठाऊक पाहिजे!" गुडघ्यावर हाताने थोपटीत प्योत्र उद्गारला. "वागानोवजवळ ते वर्तमानपत्र सापडलं तेव्हा त्यांनी त्याला कसा बडवला ते आठवतंय ना? अन् परिणाम काय झाला? त्याची पुस्तकांची आवड खलास झाली! आता तुम्ही पैसे दिलेत तरी तो पुस्तक हातात धरायला तयार नाही! पण तुम्ही माझ्यावर भरवसा ठेवा, आई. तसा मी अट्टल बदमाष आहे, म्हणाल तितकी वर्तमानपत्रं न् पत्रकं मी अगदी योग्य ठिकाणी पोचती करतो बघा. आमच्या लोकांना बहुतेकांना वाचता येत नाही, न् ते घाबरतात, हे सगळं खरं आहे, पण तरीसुद्धा पुष्कळदा परिस्थितीच इतकी बिकट होते की मग आपोआप डोळे अघडतात न् आता काय करावं असं विचारणं भाग पडतं. अन् या पत्रकात स्पष्ट बजावलेलं असतं की विचार करा! आपल्या मेंदूचा उपयोग करा! काही वेळा तर ज्यांना वाचायला येतं अशापेक्षा वाचता न येणाऱ्यांनाच जास्त समजतं. विशेष म्हणजे हे वाचायला येणारे लोक पोटभर खाऊन ढेकरा देणारे असले तर नक्कीच अशिक्षितांना त्यांच्यापेक्षा जास्त माहिती असते! मी या भागात सगळीकडे हिंडलेलो आहे अन् सगळं पाहिलेलं आहे. आम्ही सगळं व्यवस्थित करू, पण सुरवातीलाच पकडलं जायला नको असेल तर डोकं वापरून हुशारीने काम करायला हवं. शेतकरी आता पूर्वीसारखा राहिलेला नाही, तो आपल्याला मानेनासा झालाय, त्याने आपल्याकडे पाहून हसणं बंद केलंय, आपल्याबद्दल त्याला मुळीच आपुलकी उरली नाही, असा आता अधिकाऱ्यांनाही सुगावा लागला आहे. एकंदरीने पाहाता शेतकऱ्याला आता सरकारविरुद्ध बंड पुकारावंसंच वाटू लागलं आहे असं दिसतंय. परवाचीच गोष्ट घ्या ना. इथून जवळच स्मोल्याकोवो नावाचं एक गाव आहे. तिथं अधिकारी करवसुलीसाठी गेले होते. पण शेतकरी आपले दांडकीच घेऊन सामोरे गेले! पोलिस अधिकारी स्पष्टवक्ता होता. त्याने सरळच ओरडून त्यांना विचारलं की, 'तुम्ही लोक झारच्या विरुद्ध आहात काय रे, हरामखोरांनो?' यावर स्पिवाकिन नावाचा एक शेतकरी सरळ उलटून म्हणाला की 'तू न् तुझा झार दोघंही खड्डचात जा! आमच्या अंगावरचा बोटभर कपडा काढून घेणारा हा कसला झार?' तर आई, सांगायचं असं की गोष्टी इतक्या थराला गेल्या आहेत. त्यांनी स्पिवाकिनला तुरुंगात डांबलं खरं, पण त्याचे शब्द तर ते तुरुंगात अडकवू शकत नाहीत ना? तो काय बोलला ते



बारकी पोरं सुद्धा विसरलेली नाहीत. त्याचे शब्द जिकडे तिकडे घुमताहेत!"

प्योत्रचं खाण्याकडे लक्ष नव्हतं. तो सारखा बोलतच होता. हलक्या आवाजात हे सांगत असता त्याचे चमकदार डोळे सारखे भोवताली हिंडत होते. एखाद्या पैशाच्या पिशवीतून सांडलेली नाणी दाखवावी तसा तो शेतकऱ्यांच्या जीवनाचे त्याचे स्वतःचे अनुभव आईला सांगत सुटला होता. मधून दोनदा स्तेपानने त्याला थांबवून म्हटलं, "तू काही खा की रे!"

दोन्ही वेळा प्योत्रने पावाचा तुकडा व चमचा नुसता उचलून घेतला, पण बुलबुल पक्षी जसा गाण्यात तल्लीन होऊन जातो तद्वत तो गोष्टी सांगण्यातच रंगून गेला होता.

जेवण आटोपल्यावर मात्र तो ताडकन उठून उभा राहिला व म्हणाला "बरीच रात्र झाली. घरी जायलाच हवं मला आता. बरं, येतो आई!". आईशी हस्तांदोलन करून तिचा निरोप घेताना तो म्हणाला, "आपली कदाचित् पुनः कधीच गाठभेट होणार नाही, पण तुमची भेट झाली व तुमचं बोलणं ऐकलं यामुळे फार फार बरं वाटलं. बरं पण तुमच्या बॅगमध्ये वर्तमानपत्रांखेरीज आणखी काही आहे का? काय, लोकरीची शाल? ठीक, शालच ना! स्तेपान, तेवढं लक्षात ठेवायचं बरं का. आता एक मिनिटात तो तुमची बॅग घेऊन येईल. चल, स्तेपान बराय, येतो! तुमचा प्रवास निर्विघ्न पार पडो हीच ईच्छा! अच्छा!"

ते निघून गेल्यावर तेथे शांतता पसरली. झुरळांची धावपळ व खडबड ऐकू येऊ लागली. वारा छपरावर आदळत होता व धुरांड्यात भोंऽऽ करून घुमत होता. पावसाच्या सरी खिडकीवर आदळत होत्या. तात्यानाने फळी-वरची पांघरुणं काढून ती बाकावर पसरून आईसाठी अंथरूण तयार केलं.

"फार उत्साही तरुण दिसतो हा" आई म्हणाली.

"बडबड पुष्कळ करतो, पण त्यात फारसा अर्थ नसतो."

"अन् तुझा नवरा?" आईने विचारलं.

"तो चांगला आहे—स्वभावानेही सज्जन आहे. दारू सुद्धा पीत नाही. आमचं जमतंही नीट. पण तो स्वभावाचा फारच गरीब न् दुबळा आहे."

तिने एकदम बोलणं आवरतं घेतलं. थोडं थांबून ती म्हणाली, "आम्ही काय करायला हवं आता? बंड करायला हवं ना? अर्थात् हव. सगळ्यांना तसंच वाटतंय, पण प्रत्येकजण स्वतःशीच तेवढं असं बोलून दाखवतो. पण

सगळ्यांनी हे विचार मोठ्याने बोलायला पाहिजेत. कुणीतरी पुढाकार घेऊन पहिलं पाऊल उचलायलाच हवं!"

मग ती बाकावर बसून बोलू लागली :

"तुम्ही म्हणता की बड्या लोकांच्या घरच्या तरुण मुली अशा चळवळीत भाग घेतात म्हणून. कामगारांत जाऊन मिसळणं, त्यांना वाचून दाखवणं, वगैरेही करतात, होय ना? पण हे काम त्यांच्या मानाने फार हलकं नाही का? अन् त्यांना भीती नाही का वाटत?"

आईने या प्रश्नाचं उत्तर दिलं ते ऐकून तिने एक सुस्कारा सोडला व मान खाली करून नजर खाली वळवली. मग ती सांगू लागली,

"एका पुस्तकात मी 'निरर्थक जीवन' हे शब्द वाचले अन् त्या शब्दांचा अर्थ मला ताबडतोब ध्यानात आला. असं जीवन हे कशा प्रकारचं असतं ते मला चांगलं ठाऊक आहे. त्यात अर्थ असतो, पण कशाचा कशाला मेळ नसतो—धनगर नसला म्हणजे मेंढ्यांची अवस्था होते तसा प्रकार होऊन जातो. 'निरर्थक जीवन' हे असंच असतं. मला जर शक्य झालं असतं तर मी अशा जीवनापासून एकदम दूर पळून गेले असते अन् एकदाही मागे वळून पाहिलं नसतं. सगळं काही समजत असलं म्हणजे मग फारच त्रास होतो मनाला!"

तात्यानाच्या मनाला होणाऱ्या वेदना तिच्या हिरव्या डोळ्यांतील शुष्क चमकेत व तिच्या कापऱ्या आवाजात प्रतिबिंबित होत असलेल्या आईला प्रतीत होत होत्या. तिचं सांत्वन करण्याच्या हेतूने आई तिला म्हणाली,

"पण तुला तर त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग दिसू लागलाय ना, बाळ!"

"अं हं! तेवढं पुरेसं नाही. कसं तेही समजलं पाहिजे ना—" तात्याना मध्येच अत्यंत शांतपणे म्हणाली. "बरं, पण तुमचं अंथरूण तयार आहे."

एवढं बोलून ती उठली व चुलीच्या ओट्याजवळ जाऊन न बोलता निमूट उभी राहिली—शांत, गंभीर व विचारमग्न अवस्थेत!

आई नेसत्या कपड्यानिशीच अंथरुणावर पडली. ती इतकी दमून गेली होती की तिचं सारं अंग आंबून गेलं होतं, त्यामुळे ती किंचित् कण्हत होती.

तात्यानाने दिवा मालवला व झोपडीत सर्वत्र काळोख पसरल्यावर ती पुनः शांत, हलक्या आवाजात बोलू लागली. अंधाराच्या सपाट चेहऱ्यावर जणू तिच्या आवाजाचा हलका हात फिरत होता. ती म्हणाली,





"तुम्ही झोपताना देवाचं नाव घेत नाही वाटतं! माझा सुद्धा देवावर विश्वास नाही—अन् चमत्कारांवर पण नाही!"

आई कुशीवर वळून तात्यानाच्या दिशेने पाहू लागली. तिथला काळामिट्ट काळोख खिडकीतून आत शिरून सरळ तिच्याकडे रोखून पाहात होता. बारीक सारीक आवाज व खुट्ट खुट्ट ध्वनी त्या शांततेचा भंग करीत सरपटत आत प्रवेश करीत होते.

आईने अगदी हलक्या, कानांत कुजबुजल्यागत आवाजात तात्यानाच्या प्रश्नाला उत्तर दिलं,

"देवाचं विचारशील तर मला पक्कं सांगता येणार नाही. पण येशू ख्रिस्ताला मात्र मी मानते. त्याने सांगितलं आहे, 'आपल्या शेजाऱ्यावर स्वतःप्रमाणेच प्रेम करा.' या त्याच्या शब्दांवर माझा विश्वास आहे. त्यावर श्रद्धा आहे माझी."

तात्याना काही बोलली नाही. चुलीच्या काळ्या रंगाच्या पार्श्वभूमीवर करड्या रंगाची भासणारी तिची उभी आकृती अंधुकशी आईला दिसत होती ती निश्चल उभी होती. आईने खिन्नपणे डोळे मिटून घेतले. अचानक तिला तात्यानाचे थंडपणे उच्चारलेले शब्द ऐकू आले.

"माझ्या मुलांच्या मृत्यूबद्दल मी ना देवाला ना माणसाला, कुणालाच क्षमा करणार नाही—नाही, कधीच नाही!"

आई अस्वस्थ होऊन उठून बसली. तात्यानाच्या शब्दांमागील वेदना तिच्या आत्म्याला जाणवल्या होत्या. ती स्निग्धपणे म्हणाली,

"तुझं अजून वय गेलं नाही, मुली. अजून मुलं होतील तुला."

"आता कधीच नाही!" किंचित् थांबून तात्याना म्हणाली. "माझ्यात काहीतरी दोष आहे. डॉक्टरनी सांगितलंय आता मला मुलं होता कामा नये."

एक उंदीर खडबड करीत पलिकडे गेला. वीज चमकल्यासारख्या कड्कड् आवाजाने त्या निश्चल शांततेचा भंग केला. त्या पाठोपाठ छपरावर पावसाची सळसळही ऐकू आली. अस्वस्थपणे केसांतून बोटांची चाळवाचाळव करावी तसे पावसाचे थेंब छपरावरील गवतातून फिरत होते. आणि पावसाचं पाणी सुद्धा त्या हिवाळी रात्रीप्रमाणेच संथ व सावकाश खाली पडून त्याचा टप्टप् आवाज होत होता.

आईचा डोळा लागतो न लागतो तोच बाहेर पावलांचा आवाज आला. ती पावलं दरवाजापर्यंत आली. अगदी हळूच दार उघडलं गेलं.

"तू झोपलीस का, तात्याना?" पुरुषी आवाजात प्रश्न विचारला गेला.

"नाही अजून."

"त्या झोपल्या?"

"हो वाटतं."

काडी पेटली, जरा फुरफुरली व लगेच काळोखाने तो प्रकाश गिळंकृत केला. स्तेपान आईच्या अंथरुणापाशी आला व तिने पायावर टाकलेला कोट त्याने नीट केला. त्याने आपली इतकी काळजी वाहावी हे पाहून आईला फार बरं वाटलं व तिने डोळे गच्च मिटून घेतले तरी तिच्या ओठांवर स्मित उमटलं होतं.

स्तेपानने काही न बोलता कपडे काढले व तो झोपण्याच्या फळीवर जाऊन पडला. पुन: सर्वत्र शांतता पसरली.

आई बिलकुल हालचाल न करता स्वस्थ पडून होती व त्या स्वप्नाळू शांततेची आंदोलने कान देऊन ऐकत होती. रिबिनचा रक्तबंबाळ चेहरा हळूहळू तिच्या डोळ्यापुढं उभा राहात होता.

फळीवर किंचित् हालचाल ऐकू आली. तात्याना नवऱ्याला म्हणत होती.

"पाहिलंस, कसे न् कोणते लोक चळवळीत पडतात ते? ज्यांनी सारं आयुष्य काबाडकष्ट करण्यात न् हालअपेष्टा भोगण्यात घालवलं अशी म्हातारी माणसं ही कामं अंगावर घेतात! खरं म्हणजे विश्रांती घेत स्वस्थ पडून राहायचे दिवस त्यांचे, पण ते बापडे हे करत फिरतात. अन् तुझ्यासारखी हुशार न् तरुण माणसं – ए, स्तेपान!"

"मला आधी विचार केला पाहिजे, समजलीस!" तो धीरगंभीर आवाजात उत्तरला.

"अनेकदा ऐकलंय मी हे तुझं!"

एक मिनिटभर दोघंही स्तब्ध होती. मग स्तेपान बोलू लागला,

"हं, अशीच सुरुवात करावी – प्रथम शेतकऱ्यांशी अलगअलग बोलावं, उदाहरणार्थ, अलेक्सी माकोव. त्याला वाचायला येतं, आहेही तडफदार अन् शिवाय अधिकाऱ्यांवर रागही आहे त्याचा. सेर्गेई शोरीन सुद्धा हुशार शेतकरी आहे. क्न्याझेव देखील प्रामाणिक न् बेडर आहे. सुरुवातीला हे इतकेच बस झाले. तिने आपल्याला सांगितलं तसल्या लोकांची गाठ घ्यायला हवी. मी आपला कुऱ्हाड घेऊनच शहरात जाईन म्हणजे जसा काही जादा कमाईच्या आशेने लाकडं तोडायचं काम शोधायलाच निघालो आहे असंच



कुणालाही वाटावं. हो, तशी खबरदारी घ्यायला हवीच, आपली किंमत आपणच केली पाहिजे हे तिचं म्हणणं खरं आहे. आजच्या त्या माणसाचंच पाहा ना. प्रत्यक्ष परमेश्वरासमोर उभं केलं तरी तो बधायचा नाही अन् त्या निकिताने सुद्धा चांगलीच जाणीव दाखविली – तो तसं वागेल असं कधी वाटलं होतं का?"

"हूं! तुमच्या डोळ्यांदेखत त्यांनी त्याला बेदम मारलं – अन् तुम्ही आपलं पाहात उभे राहिलात –"

"थांब ग! त्याला आम्हीच खूप मारलं नाही हेच पुष्कळ झालं की!"

तो पुष्कळ वेळ हलक्या आवाजात बोलत होता. कधीकधी तर तो इतकं हळू बोले की आईला त्याचे शब्द समजत नसत. पण थोडाच वेळ तशा आवाजात बोलल्यावर तो पुन: नेहमीच्या मोठ्या आवाजात बोलू लागे. मग तात्याना त्याला दटावी: "हं! अशाने त्यांची झोपमोड होईल ना!"

एखादा ढग खाली उतरून त्याने वर उचलून न्यावं, तशीच निद्रादेवी प्रकट झाली व थोड्याच वेळात आईला गाढ झोप लागली.

पहाटेच्या वेळी अंधुक प्रकाशाची किरणं खिडकीतून झोपडीत शिरली व रात्र संपत आल्याचा इशारा देणाऱ्या चर्चच्या घंटेच्या पेंगुळलेल्या लहरी थंडगार शांततेतून तरंगत तिथवर येऊन पोचल्या तेव्हा तात्यानाने आईला उठवलं.

"मी चहा ठेवलाय बरं का. चांगला गरम चहा घ्या. तशाच जायला निघालात तर गारठून जाल तुम्ही."

स्तेपान उठून आपली दाढी फणीने विंचरत होता. त्याने आईला तिचा शहरातला पत्ता विचारून घेतला. तिने त्याच्याकडे पाहिलं तसं तिला वाटलं, रात्रीतून याचा चेहरा पुष्कळच बदलला आहे अन् त्याला पूर्णाकार आला आहे!

"हा सगळा प्रकार म्हणजे किती विचित्र योगायोग आहे, नाही?" ते सगळे चहा प्यायला बसले तेव्हा स्तेपान हसून उद्गारला.

"कसला योगायोग?" तात्यानाने विचारले.

"यांचा आपला परिचय झाला हा. तोही किती सहजासहजी!"

"आमच्या कामात सगळंच कसं विलक्षण साधं न् सरळ असतं!" आई म्हणाली.

त्या पतिपत्नींना आईला निरोप देताना फारच वाईट वाटलं. ती दोघं

फारसं बोलत नव्हती, पण लहान लहान गोष्टीतसुद्धा तिची गैरसोय होऊ नये म्हणून त्यांची जी खटपट चालली होती त्यावरूनच त्यांच्या भावना व्यक्त होत होत्या.

आई गाडीत बसून निघाल्यावर विचार करू लागली तेव्हा तिच्या मनात आलं की स्तेपान कामाला सुरुवात करील ती अगदी मुंगीच्या पावलाने, गुपचाप, व सावधगिरीने, पण एकदा सुरुवात केल्यावर तो माघार घ्यायचा नाही. त्याच्या पत्नीचं गाऱ्हाणंही सतत त्याच्या कानी पडतच राहील; तिच्या हिरव्या डोळ्यांतून सतत अग्निवर्षाव होत राहील, आणि आपल्या बालकांच्या मृत्यूच्या वेदना व त्याबद्दलची सूडाची भावनाही तिच्या जिवात जीव असेतो कधीही नाहीशी होणार नाही.

मग आईला रिबिनचं स्मरण झालं. त्याच्या जखमा, त्याचा चेहरा व त्याचे जळजळीत नेत्र व शब्द तिला आठवू लागले. त्याचा इतका अमानुष छळ होऊनही आपण काही करू शकलो नाही या असहायतेच्या जाणिवेने तिचं हृदय तडफडू लागलं. ती शहरात जाऊन पोचेपर्यंतच्या सबंध प्रवासात सतत रिबिनची मूर्ती तिच्या नजरेसमोर तरळत होती. सभोवतालच्या मलूल वातावरणाच्या पार्श्वभूमीवर ती मूर्ती प्रकर्षाने उठून दिसत होती. त्याचं धट्टंकट्टं शरीर, काळीकुळकुळीत दाढी, फाटलेला सदरा, रक्ताळलेला माथा, मागे बांधलेले हात—अन् तरीसुद्धा आपल्या ध्येयावरच्या अढळ निष्ठेच्या तेजाने तळपणारा संतप्त चेहरा, अशी त्याची तेजस्वी मूर्ती जणू काय समोरच उभी आहे असा तिला भास होत होता.

पृथ्वीच्या पाठीवर मरगळून पडलेली असंख्य खेडी, कधीतरी न्यायाचा उदय होईल अशी मनोमन आशा बाळगून जगणारे लोक, आणि कसल्याही सुखाची आशा न बाळगता निमूटपणे व अर्थशून्य जीवन जगणारे हजारो लोक या सर्वांचा आई विचार करीत होती. आणि जीवन म्हणजे जणू काय नांगर घेऊन येणाऱ्या शेतकऱ्याची वाट पहात असलेलं विस्तीर्ण शेत असावं अशी कल्पना तिच्या मनात डोकावून गेली. अन् तिला ते शेत जणू काय असं म्हणत असल्याचा भास झाला की "स्वतंत्रतेच्या भक्तांनो! प्रामाणिक माणसांनो! या! सत्य अन् न्यायाच्या बीजांची पेरणी करा! म्हणजे मी तुम्हाला शंभरपट पीक देऊन तुमच्या श्रमांचं सार्थक करीन!"

मग तिने स्वतः केलेल्या प्रयत्नांना जे उज्ज्वल यश आलं होतं त्याची जाणीव होऊन तिचं अन्तःकरण आनंदाने व अभिमानाने भरून आलं. पण तिने विनयशीलपणे तो अभिमान बाजूला सारला.



## १९

निकोलाय तिला दार उघडायला आला तेव्हा त्याचे कपडे अव्यवस्थित होते व हातात एक पुस्तक होतं.

"इतक्या लवकर परत आलात?" त्याने तिचं सहर्ष स्वागत केलं. "आत्ताच तुम्ही याल अशी कल्पना नव्हती."

त्याच्या चष्म्याच्या भिंगांच्या आडून त्याचे प्रेमळ डोळे चकाकत होते. त्याने तिचं सामान उचलून ठेवण्यात तिला मदत केली व मग तो सस्मित वदनाने तिच्याकडे पहात राहिला.

"आपल्या घराची रात्री झडती घेतली गेली!" तो सांगू लागला. "त्यामुळे तुम्हाला पकडलं बिकडलं की काय अशी मला भीती वाटत होती. पण त्यांनी मला अटक केली नाही. तुम्हाला पकडलं असतं तर त्यांनी नक्कीच मलाही अटक केली असती."

आईला जेवणघरात घेऊन जाता जाता त्याचं बोलणं सुरूच होतं.

"माझी नोकरी जाणार हे अर्थात् नक्कीच! पण त्याचं मला वाईट वाटत नाही. कारण नाही तरी टेबलाशी बसून स्वतःच्या मालकीचे घोडे नसलेल्या शेतकऱ्यांची मोजदाद करीत बसायचा मला कंटाळाच आला होता."

त्या खोलीचं स्वरूप असं काही दिसत होतं की एखाद्या अजस्र राक्षसाने संतापाच्या भरात त्या भिंती मुळापासून हालवून सगळ्या जिनसांची उलथापालथच करून टाकली आहे. भिंतीवरच्या तसबिरी जमिनीवर पडल्या होत्या. भिंतीवर चिकटवलेल्या कागदाच्या चिंध्या न् लक्तरं लोंबत होती, एका ठिकाणी जमिनीची फरशी उचकटून काढून टाकलेली होती, एका खिडकीचा ओटा मोडून टाकलेला होता, अन् शेगडीतली राख जमिनीवर सर्वत्र पसरलेली होती. हे दृश्य आईला अपरिचित नव्हतं. तो प्रकार पाहून तिने मान डोलावली व निकोलायच्या अंगच्या काहीतरी नव्या गुणाची ओळख पटून ती त्याच्याकडे कौतुकानं पाहू लागली.

मेजावर चहादाणी व चहाची न विसळलेली भांडी तशीच पडून होती; चीझ, सॉसेजेस इत्यादी वस्तू प्लेटऐवजी कागदावर ठेवलेल्या होत्या, आणि एका फडताळावर पुस्तकं, पावाचे तुकडे व कोळसे पडलेले होते. ते पाहून आईने मंद स्मित केलं व निकोलायनेही कडवट हास्य करून तिला प्रत्युत्तर दिलं.

"या सगळ्या गोंधळात मी माझ्याकडून भर घातली आहेच," तो म्हणाला. "पण ते जाऊ द्या. त्याचं असं झालं की मला वाटलं, एखाद वेळ ते परतसुद्धा येतील, म्हणून मी हे सर्व असंच अव्यवस्थित पडू दिलं! बरं पण तुमचा प्रवास कसा काय झाला?"

या प्रश्नाने ती दचकली. रिबिनची मूर्ती तिच्या डोळ्यांपुढे उभी राहिली व त्याच्याबद्दल आपण येताक्षणीच सांगून टाकलं नाही या जाणिवेने ती वरमली—नंतर ती बोलू लागली. ते बोलत असता एकीकडे आपल्या मनावर ताबा ठेवण्याचा व दुसरीकडे त्यातला कोणताही प्रसंग न सोडता सर्व हकीगत संपूर्ण सांगण्याचा ती प्रयत्न करीत होती.

"त्याला पकडून नेलं." हे तिचे उद्‌गार ऐकताच निकोलायचा चेहरा खर्रकन् उतरला व तो उद्‌गारला, "खरंच?"

आईने हातानेच खूण करून त्याला थांबवलं व तिने आपलं निवेदन सुरू ठेवलं. जणू काय आपण प्रत्यक्ष न्यायदेवतेसमोरच उभे आहोत व एका मानवी प्राण्यावर करण्यात आलेल्या अमानुष अत्याचाराचा निषेध करीत आहोत अशा आवेशाने ती बोलत होती. निकोलायचा चेहरा फिक्कट पडला होता व तो खुर्चीत रेलून बसून दातांनी ओठ चावत होता. त्याने सावकाश-पणे चष्मा काढून मेजावर ठेवला व एखादं अदृश्य कोळिष्टक झटकून टाकावं तसा तोंडावरून हात फिरवला.

त्याच्या चेहऱ्यावरचे भाव एकदम बदलले. त्याच्या गालाची हाडं ठळकपणे वर दिसू लागली व नाकपुड्या थरथरू लागल्या. त्याचा चेहरा असा उग्र झालेला आईने कधीच पाहिला नव्हता, त्यामुळे ते रौद्र स्वरूप पाहून ती घाबरली.

तिचं बोलणं संपल्यावर तो उठून उभा राहिला व दोन्ही मुठी खिशात खोल खुपसून येरझारा घालू लागला.

"तो फार महान् पुरुष असला पाहिजे," तो दातांवर दात पक्के आवळून धरून उद्‌गारला. "तुरुंगात त्याची फार अनुकंपनीय स्थिती होईल. हे असले लोक फार हाल करून घेतात स्वतःचे."

स्वतःला शांत करून संयम राखण्यासाठी म्हणून तो मुठी आवळून आपटीत होता, पण त्याची बेचैनी आईला दिसत होती, व ती स्वतःही तशीच बेचैन होत होती. त्याने आपले डोळे इतके आकुंचित केले की ते खंजिराच्या टोकांसारखे दिसू लागले. तो बोलत होता तेही थंडपणे पण संतप्त होऊन, आणि बोलता बोलताही त्याचं येरझारा घालणं सुरूच होतं.

"किती भयंकर प्रकार आहे पहा! लोकांवरची आपली जुलमी सत्ता टिकवून धरण्यासाठी मूठभर मठ्ठ लोक वाटेल त्याला मारहाण करतात न् ठार सुद्धा मारतात! हा रानटीपणा आता वाढू लागला आहे अन् अत्याचा-राची राजवट सुरू झाली आहे! किती भयंकर! त्यांच्यापैकी काही तर हिंस्र पशूंसारखे गुरगुरतात, कारण आपल्याला कायद्याचं बंधन नाही हे त्यांना ठाऊक आहे! दुसऱ्यांचा छळ करण्यातच त्यांना आनंद होतो! श्रृंखलांतून मुक्त झालेल्या जंगली गुलामांना आपल्या हिडीस मनोवृत्तीचं व पाशवी वासनांचं प्रदर्शन करावंसं वाटतं, तसं थैमान घालतात ते! दुसरे काही जण सूडाच्या भावनेने भारावले जातात! आणखी इतर काही असे असतात की त्यांना स्वतःला चाबकाचे फटके खावे लागल्यामुळे त्यांच्या भावना मरून गेलेल्या असतात! अशा प्रकारे लोकांना—सगळ्या लोकांना बिघडवून टाकताहेत ते!"

तो क्षणभर थांबला व त्याने दात घट्ट आवळून धरले. मग तो म्हणाला, "या अशा भयंकर पाशवी जीवनाच्या वातावरणात कोणीही चांगला माणूस सुद्धा पशूच बनायचा!"

महत्प्रयासाने त्याने आपल्या भावनांना लगाम घातला व मग तो अश्रू गाळीत असलेल्या निलोव्नाकडे पाहू लागला. आता त्याची नजर शांत व स्निग्ध दिसू लागली होती.

"बरं, पण आता आपण मुळीच वेळ दवडता कामा नये, निलोव्ना! आपण स्वतःला सावरून पुढची व्यवस्था नीट करायला हवी."

खिन्नपणे हसत तो आईकडे गेला व त्याने प्रेमाने तिचा हात दाबला.

"तुमची बॅग कुठं आहे?"

"स्वयंपाकघरात."

"आपल्या घराबाहेर हेर बसवलेले आहेत तेव्हा त्यांची नजर चुकवून इतकं सगळं साहित्य नेता येणार नाही, अन् इथं ते लपवायलाही जागा नाही. आज रात्री पुनः ते झडती घेतील असा माझा अंदाज आहे. तेव्हा आपल्याला कितीही वाईट वाटलं तरी ते सगळं जाळून टाकण्याखेरीज दुसरा उपाय नाही."

"काय जाळून टाकायचे?" आईने विचारलं.

"तुमच्या बॅगेतलं सगळं साहित्य!"

त्याला काय वाटत होतं हे तिच्या लक्षात आलं व मग त्या दु:खी मन:स्थितीतही तिच्या चेहऱ्यावर अभिमानाचं स्मित उमटल्यावाचून राहिलं नाही.

"बॅगेत काऽही नाही, एक पत्रक सुद्धा नाही!"

आईने त्याला त्याबाबतची सगळी हकीकत सांगायला आरंभ केला, व ते सांगता सांगता तिची सर्व नाहीशी झालेली शक्ती पुन: प्राप्त झाल्यासारखं तिला वाटू लागलं.

सुरुवातीला निकोलायच्या चेहऱ्यावर चिंता व्यक्त होऊन कपाळावर आठयांचं जाळं पसरलं होतं, पण लवकरच त्या जागी आश्चर्य व्यक्त झालं व अखेर तो इतका उत्तेजित झाला की मध्येच तिला थांबवून उद्‌गारला:

"खरंच! तुमचं नशीब फारच जोरावर होतं की!" त्याने उतावीळपणे तिचे दोन्ही हात धरले व तो म्हणाला, "तुमचा लोकांवरचा विश्वास खरोखरच वाखाणण्याजोगा आहे! मला तुम्ही इतक्या आवडता—की तुम्ही माझ्याच आई आहातसं वाटू लागतं!"

त्याच्याकडे पाहात ती हसली. तो इतको भावनावश होऊन उत्तेजित कसा झाला याचंच तिला आश्चर्य वाटलं.

"एकंदरीत परिस्थिती बरीच अनुकूल आहेसं दिसतं." तो हातावर हात चोळीत स्मितवदनाने म्हणाला. "गेले काही दिवस मीही असाच खुषीत आहे. कामगारांशी बोलण्याच्या, त्यांना वाचून दाखविण्याच्या व त्यांचं निरीक्षण करण्याच्या कामात नवाच आनंद मिळू लागला आहे मला. त्यांच्या सहवासाने मन कसं स्वच्छ, निर्मळ होऊन जातं! किती छान लोक असतात ते म्हणून सांगू, निलोव्ना! विशेषत: तरुण कामगार—इतके धट्टेकट्टे अन् तरी इतके संवेदनाक्षम असतात, अन् सगळं नवं शिकायला उत्सुक! त्यांच्याकडे पाहिलं म्हणजे अशी खात्री पटल्यावाचून राहात नाही की एक दिवस रशिया हा जगातला सर्वात पुढारलेला लोकशाहीप्रधान देश होणार हे निश्चित!"

तो क्षणभर थांबला व शपथ घेत असल्याप्रमाणे हात वर करून बोलू लागला:

"पण जवळ जवळ गेलं सबंध वर्ष पुस्तकं वाचण्याच्या अन् आकडेमोडीच्या कामात माझ्या मनावर एक प्रकारचं पटल आल्यासारखं झालं होतं. छे! फारच भयंकर! कामगारांत वावरायची सवय झाली आहे मला,



त्यामुळे इतरत्र कुठंही मला बरंच वाटत नाही, सारखा मनावर कसला तरी ताण असल्यासारखं वाटून मी बेचैन होतो. पण आता मी पुन: स्वतंत्र माणसासारखा जगू लागेन! सारा वेळ कामगारांच्या सान्निध्यात राहून त्यांच्याबरोबरच काम करीन. समजतंय ना तुम्हाला मी काय म्हणतो ते? नव्या कल्पना जिथं जन्माला येतात तिथं—तारुण्याची तडक व निर्मिति-क्षमता यांच्या सान्निध्यातच आता मी वास्तव्य करीन! ते जीवन किती साधं अन् सुंदर असतं! विलक्षण उत्साह अन् उमेद वाटू लागते त्या वातावरणात. तिथं राहून अंगात तारुण्याचा व शक्तीचा संचार होऊ लागतो. खरोखरच फार स्फूर्तिदायक जीवन असतं ते, निलोव्ना!"

तो मोकळेपणाने हसला. त्याच्या हास्यात चैतन्य व स्वत्वाची जाणीव होती. आईला त्याच्या हर्षाचा खरा अर्थ समजला होता व तीही त्याच जाणिवेने भारली गेली होती.

"अन् तुम्ही? तुम्ही सुद्धा फार, फारच छान आहात!" निकोलाय उद्‌गारला. "तुम्ही लोकांचं वर्णन करता ते तरी किती हुबेहूब असतं! तुम्ही त्यांना उत्तम तऱ्हेने ओळखता!"

तो आईच्या शेजारी येऊन बसला, पण आपला उजळलेला चेहरा त्याने संकोचाने बाजूला वळवला व आपली अस्वस्थता लपविण्यासाठी तो केसातून बोटं फिरवू लागला. मग ती साध्या शब्दांत आपल्या अनुभवांचं उत्साहपूर्ण वर्णन करू लागली तेव्हा तो पुन: तिच्याकडे पाहू लागला.

"फारच नशीबवान आहात तुम्ही!" तो उद्‌गारला. "तुम्हाला सुद्धा तिथं अटक होणं सहज शक्य होतं. पण झालं उलटंच—हो, शेतकऱ्यांत जागृती होऊ लागली आहे म्हणायची. अन् ते स्वाभाविकच आहे म्हणा. तुम्ही वर्णन केलंत ती बाई—मला स्पष्ट चेहरा सुद्धा दिसतोय तिचा!.. खेड्यांतून काम करायला खास लोक पाठवायलाच हवेत आता. पण लोक? लोक आहेत कुठं पुरेसे? आपल्याला शेकडो लोक लागतील!"

"पावेल बाहेर असता तर! अन् आंद्रेइ सुद्धा!" आई हळूच म्हणाली.

त्याने तिच्याकडे एक दृष्टिक्षेप टाकला व मग नजर खाली वळवली. तो बोलू लागला,

"मी सांगतो ते ऐकून तुम्हाला फार कष्ट होतील, निलोव्ना! पण मी पावेलला चांगला ओळखतो. तो तुरुंगातून निसटून जायला कधीच कबूल व्हायचा नाही. त्याला तो खटला चालायला हवा आहे. आपल्या व्यक्ति-

मत्वाची छाप पाडण्याची संधी त्याला हवी आहे, तेव्हा तो ती संधी कधीही हातची जाऊ देणार नाही. अन् का म्हणून घालवावी त्याने? नंतर सैबेरियातून परत येईल तो, पण आता नाही."

"हं, त्याचं त्याला योग्यायोग्य समजतंच आहे!" आई सुस्कारा सोडून म्हणाली.

"तुमचा तो शेतकरी लवकर इथं येईल तर बरं होईल," एक क्षणभर थांबून आपल्या चष्म्यातून तिच्याकडे पहात निकोलाय म्हणाला, "आपल्याला शेतकऱ्यांत वाटण्यासाठी रिबिनच्या संबंधी एक पत्रक लिहून काढायला हवं. तो स्वतःच इतका स्पष्टवक्ता आहे तेव्हा त्याला त्यामुळे काही जास्त त्रास होण्याचा संभव नाही. मी आजच ते पत्रक लिहून काढतो म्हणजे लुद्‌मिला लगेच छापूनही टाकील. पण ती पत्रकं पोचती कशी करायची त्यांना?"

"मी घेऊन जाईन की."

"अं हं. तुम्ही नको." निकोलाय लगेच म्हणाला. "पण वेसोव्श्चिकोव नाही का करू शकणार हे काम?"

"मी बोलेन त्याच्याशी हवं तर."

"जरूर. अन् कसं, तेही शिकवा त्याला."

"पण मग मी काय करायचं?"

"तुमच्यासाठी काढू की काम शोधून."

तो लिहिण्याच्या मेजाशी जाऊन बसला. ती टेबलावरचं सामान आवरता आवरता हळूच त्याच्याकडे पहात होती तेव्हा त्याच्या बोटात धरलेलं पेन थरथरत असल्याचं तिला दिसून आलं. मधूनच त्याच्या मानेचे स्नायू एकदम हालत, तर मधूनच तो आपलं मस्तक मागे वळवून डोळे मिटून घेई तेव्हा त्याची हनुवटी थरथरत असल्याचं तिला दिसून येई. ते पाहून तिला काळजी वाटू लागली.

"हं, हे तयार झालं पत्रक!" अखेर तो उठून म्हणाला.

"हे कुठंतरी तुमच्या अंगावरच लपवून ठेवा—पण पोलिस आले तर ते तुमची सुद्धा झडती घेणारच—मग—"

"खड्डयात गेले पोलिस!" आई बेफिकिरीच्या स्वरात म्हणाली.

त्या दिवशी संध्याकाळी डॉक्टर इवान दानिलोविच त्यांच्या घरी आला. आल्याबरोबर तो जोरजोराने येरझारा घालू लागला व म्हणाला,

"हे अधिकारी असे एकदम का बिथरले आहेत कुणास ठाऊक? काल



रात्री त्यांनी सात ठिकाणी झडत्या घेतल्या. बरं, पण माझा पेशंट कुठंय?"

"तो कालच घरी गेला!" निकोलायने उत्तर दिलं. "आज शनिवार आहे, अन् आजची अभ्यासमंडळाची बैठक चुकविण्याची तयारी नव्हती त्याची."

"कमाल झाली आता मूर्खपणाची! इकडे डोकं फुटलेलं अन तसाच अभ्यासमंडळाला जाणार वाटतं तो?"

"मी त्याला समजावण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, पण तो ऐकेचना..."

"त्याला नक्कीच तिथं जाऊन फुशारकी मिरवायची असेल, की 'पहा मी जखमी झालो' म्हणून!" आई म्हणाली.

डॉक्टरने एक दृष्टिक्षेप तिच्याकडे टाकला व खोटचा कठोरपणाचा आव आणून तो म्हणाला,

"अरेरे! किती निष्ठुर आहे हो अन्तःकरण तुमचं!"

"बरं, इवान! तुला इथं थांबण्याचं काहीच काम नाही. अन् इथं पाहुणे येण्याची शक्यता आहे. तर तू चालू लाग कसा! निलोव्ना, ते पत्रक देऊन टाका बरं त्याच्याजवळ!"

"काय, पुनः नवं पत्रक?" डॉक्टरने आश्चर्याने विचारलं.

"हो. ते घे अन् छापखान्यात छापायला देऊन टाक."

"मी ते घेतलंय न् देऊनही टाकीन. आणखी काही?"

"आणखी काही नाही. मात्र फाटकाशी एक हेर उभा आहे बरं का."

"मी पाहिलंय त्याला. माझ्या दाराशीसुद्धा एकजण आहेच. बराय, येतो, नमस्कार! निष्ठुर बाई, तुम्हालाही नमस्कार बरं का! बरं पण, मंडळी, ती स्मशानभूमीतल्या दंगलीची भानगड अखेर पथ्यावर पडली बरं का! सगळ्या गावभर तीच चर्चा आहे. तू लिहिलंस ते पत्रकही फार चांगलं होतं, अन् निघालं पण अगदी वेळेवर! अगदी मच्चड शांततेपेक्षा चांगली लढाई परवडली असं मी नेहमी म्हणतो तेच खरं!"

"बरं, ठीक. तू जा पाहू आता!"

"तुझी पाहुणचाराची न्यारीच तऱ्हा आहे की! बरं, तुमचा हात द्या पाहू, निलोव्ना! त्या पोराने केला तो खास मूर्खपणाच म्हटला पाहिजे! तो कुठं राहातो ते ठाऊक आहे का तुम्हाला?"

निकोलायने पत्ता सांगितला.

"मी उद्या जाऊन भेटेन त्याला. छान पोरगा आहे, नाही?"

"खूपच छान!"

"त्याची काळजी घ्यायला हवी आपण!" डॉक्टर बाहेर पडता पडता म्हणाला. "त्याचं डोकं फार चांगलं आहे. त्याच्यासारख्या लोकांमधूनच खरेखुरे कामगारवर्गीय बुद्धिजीवी लोक तयार होतील, अन् आपण त्या दुसऱ्या जगात–जिथं वर्गभेद नसावेत अशी माझी कल्पना आहे–जायला निघालो म्हणजे आपली जागा तेच भरून काढतील!"

"तुझी बडबड अलिकडे फारच वाढलेली दिसतेय, इवान!"

"त्याचं कारण म्हणजे सध्या मी फार खुषीत आहे. बरं, पण तू तुरुंगात जाण्याच्या तयारीने बसला आहेस ना? मग चांगली विश्रांती मिळेल की!"

"धन्यवाद! पण मी काही थकलो नाही."

त्या दोघांनाही कामगारवर्गातल्या त्या मुलाबद्दल इतकी काळजी वाटत असल्याचं पाहून आईला फार बरं वाटलं.

डॉक्टर निघून गेल्यावर ती व निकोलाय दोघं जेवायला बसली. सावकाशपणे जेवण व बोलणं सुरू होतं. खरं म्हणजे ती रात्रीच्या पाहुण्यांचीच वाट पहात होती. निकोलायने आपल्या अनेक कॉमरेड्सची तिला माहिती दिली. हद्दपार झालेले सहकारी, तिथून पळून येऊन खोटया नावाने वावरून चळवळीत भाग घेणारे सहकारी, अशा कित्येकांचं त्याने वर्णन केलं. जगाची पुनर्रचना घडवून जाणण्याच्या महान ध्येयासाठी आत्मार्पण करणाऱ्या त्या साध्यासुध्या वीरांच्या कहाण्यांवर एकदम विश्वास बसणं सुद्धा कठीण होतं म्हणूनच की काय त्याचे शब्द तिथल्या उघडया बोडक्या भिंतींवरून परावर्तित होऊन परत येत होते. त्या सर्व अपरिचित लोकांविषयीच्या ममतेने आईचं हृदय भरून आलं. तिच्या कल्पनासृष्टीत हे सर्व लोक मिळून एकच एक अशी प्रचंड, बेडर व्यक्ती तयार झाली; ती व्यक्ती मंदगतीने पण निर्धारपूर्वक पुढे सरसावत होती, व शतकानुशतकं चढलेली असत्याची पुटं काढून टाकून लोकांना जीवनाचं सत्य व स्पष्ट दर्शन होण्याचा मार्ग मोकळा करीत होती. आणि या महान सत्याचा पुनर्जन्म झाला म्हणजे मग सगळेच्या सगळे लोक–एकाचाही अपवाद न राहाता–त्या सत्याच्या निशाणाखाली एकत्र येतील आणि मग लोभ, द्वेष व असत्य या जगाला भेडसावून सोडणाऱ्या व गुलामगिरीत डांबणाऱ्या तीन दैत्यांपासून मानवतेची मुक्तता होईल, असा चित्रपट तिच्या मनश्चक्षूंसमोरून सरकू लागला. या नव्या मूर्तीच्या दर्शनाने तिला अनिर्वचनीय आनंद झाला. पूर्वीच्या आयुष्यात



एखादा दिवशी रोजच्यापेक्षा कमी छळ व कमी हाल सहन करावे लागले तर ती ज्या कृतज्ञताबुद्धीने व आनंदाने प्रभू येशूच्या मूर्तीपुढे विनम्र होई, तसल्याच हर्षाच्या भावनेने आजही तिचं अन्तःकरण भरून आलं. पूर्वायुष्यातले ते दिवस ती आता विसरून गेली होती, पण त्या दिवसांनी जे भाव तिच्या ठायी निर्माण केले, तेच आता अधिक प्रकाशमान व आनंददायक होत होते, तिच्या आत्म्यापर्यंत पोचून तिथं रुजून सजीव वस्तूंप्रमाणे बहरून येऊ लागले होते.

"पोलिसांचा पत्ताच नाही!" निकोलाय अचानक उद्गारला.

"ते गेले खड्डयात, खरंच सांगते मी!" आई त्याच्याकडे एक दृष्टिक्षेप टाकून म्हणाली.

"जाऊ देत त्यांना तिकडेच–पण तुमची आता झोपायला जायची वेळ झाली की! तुम्ही फारच दमला असाल. तुमची शरीरयष्टी फारच मजबूत आहे म्हणायची! ही इतकी संकटं न् धावपळ–तरीसुद्धा तुम्ही शांतपणे राहाता! पण तुमचे केस मात्र पांढरे व्हायला लागलेत बरं का. पण ते असू द्या, तुम्ही जाऊन झोपाच आता."

## २०

कोणी तरी स्वयंपाकघराचं दार ठोठावीत होतं, त्या आवाजाने आईला जाग आली. जी कोण व्यक्ती दार ठोठावीत होती तिने चिकाटीने ते काम चालू ठेवलं होतं. बाहेर अजून काळोखच होता व ही जोराची धाड्धाड् कसल्या तरी संकटाची निदर्शक होती हे नक्की. आईने लगबगीने उठून खांद्यावरून काहीतरी लपेटून घेतलं व ती स्वयंपाकघरात जाऊन दाराशी कानोसा घेत उभी राहिली.

"कोण आहे ते?" आईने विचारलं.

"मी!" अनोळखी आवाजात उत्तर आलं.

"मी कोण?"

"आधी दार उघडा!" त्या व्यक्तीने हलक्या आवाजात विनवणी केली.

आईने कडी काढून पायाने दार लोटलं. इग्नात आत आला.

"म्हणजे मी चुकलो नाही तर!" तो आनंदाने ओरडला.

त्याचा कमरेपर्यंतचा भाग चिखलाने माखला होता. त्याचा चेहरा

पांढरा फिक्कट दिसत होता, डोळे खोल गेलेले होते, व त्याचे कुरळे केस टोपीतून बाहेर येऊन जागोजाग चिकटले होते.

"आमच्यावर संकट आलं आहे," तो आतून दार लावून घेत म्हणाला.

"माहीत आहे मला."

इग्नातला ते ऐकून आश्चर्य वाटलं. त्याने डोळे विस्फारले, "म्हणजे? तुम्हाला कसं ठाऊक?"

आईने त्याला रिबिनच्या अटकेवेळी आपण तिथं हजर असल्याचं सांगितलं. नंतर तिने विचारलं,

"त्या तुझ्या दुसऱ्या दोघा कॉमरेड्सना पण धरून नेलं का रे?"

"ते नव्हतेच तिथं. ते लष्करात रिक्रूट म्हणून दाखल होऊन कामावर रुजू व्हायला गेले आहेत. मिखाइलो काका धरून एकूण पाच जण पकडले गेले."

त्याने दीर्घ श्वास घेतला व किंचित् हसून तो म्हणाला,

"मीच एकटा राहिलोय. माझ्या शोधातच असतील ते."

"तू कसा रे निसटलास?" आईने विचारलं.

पलिकडच्या खोलीचं दार किंचित् किलकिलं झालं.

"मी?" इग्नात एक बाकावर बसला व भोवताली नजर फिरवीत तो बोलू लागला. "ते येऊन पोचण्याच्या एकदोनच मिनिटं अगोदर जंगल-खात्याचा नाकेदार धावत आला व खिडकीवर टक्टक् करून त्याने ओरडून सांगितलं की सांभाळा रे लेकांनो, तुमच्या मागावर येताहेत ते!"

त्याने मंदस्मित केलं व अंगावरच्या शालीने तोंडाचा घाम पुसला.

"पण मिखाइलो काका घाबरतो थोडाच!" तो पुढे सांगू लागला. "मला तो म्हणाला, 'इग्नात! शहरात जा बरं अगदी धावतपळत! ती वयस्क बाई आठवते ना' म्हणून विचारीत त्याने बोलताबोलताच एक चिठ्ठी खरडली. ही चिठ्ठी नेऊन दे म्हणून त्याने ती माझ्या हाती देताच मी धूम ठोकून जंगलात पळालो. तितक्यात त्यांची धाड आलीच. ते सगळे मिळून खूपच लोक होते. अन् सगळ्या बाजूंनी सरपटत येत होते. सैतान लेकाचे! त्यांनी आमच्या डांबराच्या कारखान्याला गराडा घातला. मी झाडीत गुपचाप पडून राहिलो होतो. ते माझ्या अगदी जवळून पुढे गेले. ते पुढे गेल्यावर मी उठलो अन् पाय नेतील तितक्या जोराने पळत निघालो. दोन रात्री न् एक दिवस सारखा कुठंही न थांबता चालत आलो मी."



तो स्वतःवर फार खूष झाल्याचं उघडच दिसत होतं. त्याच्या घाऱ्या डोळ्यांत हास्य चमकत होतं व त्याचे लालचुटुक ओठ सारखे वळवळत होते.

"मी आता तुला चहा करून देते हं!" आई चहादाणीकडे जात म्हणाली.

"ही घ्या ती चिठ्ठी."

मोठ्या प्रयासाने त्याने पाय उचलून बाकावर ठेवला. तसं करताना त्याला फार वेदना झाल्या असाव्यात हे त्याने तोंड वेडंवाकडं केल्यावरून व त्याच्या कण्हण्यावरून स्पष्टच होतं.

तितक्यात पलिकडच्या खोलीचे दार उघडून निकोलाय आत आला.

"नमस्ते, कॉमरेड्!" तो डोळे बारीक करून म्हणाला. "थांब, मी तुला मदत करतो."

तो खाली वाकून इग्नातच्या पायाला गुंडाळलेल्या घाणेरड्या चिंध्या सोडू लागला.

"नको!" तो पोरगा आपला पाय मागे घेत उद्‌गारला व आश्चर्य-चकित मुद्रेने आईकडे पाहू लागला.

"त्याच्या पायाला स्पिरिट चोळायला हवं," त्याच्या पाहाण्याकडे लक्ष न देता आई निकोलायला म्हणाली.

"अर्थात्‌च!" निकोलाय उत्तरला.

इग्नातने संकोचाने आवंढा गिळला.

निकोलायने चिठ्ठी उचलली. तो चोळामोळा झालेला हिरवट रंगाचा कागद नीट करून अगदी डोळ्यांजवळ नेऊन तो आतला मजकूर वाचू लागला.

"आई, आपलं कार्य सोडू नका. अन् त्या उंच स्त्रीला सांगा की आपल्या कामाबद्दल खूप खूप लिहायला विसरू नका. बरंय, नमस्कार — रिबिन."

निकोलायने चिठ्ठी धरलेला हात खाली पडू दिला.

"विलक्षणच आहे!" तो पुटपुटला.

इग्नात त्या दोघांकडे पाहात स्वतःच्या उघड्या पायांची घाणेरडी बोटं साफ करीत बसला होता. आईच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले ते लपविण्याचा यत्न करीत तिने एका घमेल्यात पाणी आणलं व इग्नातच्या समोर वाकून ती त्याचा पाय धुण्यासाठी हातात घेऊ लागली.

"अं हं, नको!" तो घाबरून ओरडला व त्याने पाय आणखीच मागे घेतला.

"चल, तुझा पाय इकडे कर पाहू झटपट!"

"मी स्पिरिट घेऊन येतो," निकोलाय म्हणाला.

इग्नातने आपला पाय बाकाखाली अधिकच आत दडवला.

"हे काय इस्पितळ आहे की काय?" तो पुटपुटला.

आई त्याचा दुसऱ्या पायाच्या चिंध्या सोडू लागली.

इग्नात जोराने विव्हळला व मान वळवून आईकडे पाहात राहिला.

"मिखाइलो इवानोविचला फार मारलं रे त्यांनी!" आई कापऱ्या आवाजात सांगू लागली.

"होय?" इग्नातने संथपणे विचारलं.

"हो ना. त्यांनी त्याला निकोल्स्कोयेला आणलं तेव्हाच त्याची पार दुर्दशा झालेली होती, अन् मग तिथं सुद्धा पोलिस अधिकारी न् फौजदार दोघांनी त्याला खूप मारलं, त्याच्या तोंडावर ठोसे लगावले न् लाथाही मारल्या–अगदी त्याचं सर्वांग रक्तबंबाळ होईतो मारलं!"

"हं, तेवढंच येतं त्यांना!" इग्नात चिडून उद्‌गारला. त्याने खांदे उडवले व तो पुढे म्हणाला, "मी तर त्यांना इतका घाबरतो की हजार सैतान पुरवले पण हे दैत्य नकोत! का हो, आणखी त्या शेतकऱ्यांनी पण मारलं का त्याला?"

"पोलिस अधिकाऱ्याने हुकूम दिला म्हणून एकाने मारलं. पण बाकीच्यांनी काही केलं नाही. उलट त्याचीच बाजू घेऊन ते भांडत होते. त्याला मारायचा तुम्हाला अधिकार नाही असं पोलिसांना ओरडून बजावीत होते."

"म्हणजे कोण कोणाच्या बाजूचं आहे अन का, ते शेतकऱ्यांना समजू लागलं तर!"

"त्यांच्यातही समजूतदार लोक असतात की!"

"त्यांच्यातही समजूतदार लोक सगळीकडेच असतात. पण दारिद्र्य माणसांना वाईट बनवत असतं. समजूतदार लोक असतातच, प्रश्न असतो तो त्यांना शोधून काढण्याचा."

निकोलायने स्पिरिटची बाटली आणली, शेगडीत थोडे कोळसे घातले व तो पुनः थोडा बाहेर गेला.



इग्नात स्तब्धपणे त्याच्या हालचालींचं निरीक्षण करीत होता. तो बाहेर गेल्यावर त्याने आईला विचारलं,

"हे साहेब कोण? डॉक्टर आहेत का ते?"

"इथं साहेबबिहेब कोणी नाही. आपण सगळे कॉमरेड्सच आहोत!"

"सगळं विचित्रच वाटतंय मला!" इग्नात म्हणाला. त्याच्या चेहऱ्यावर स्मित होतं, पण त्याची गोंधळलेली व साशंक मन:स्थितीच त्यातून व्यक्त होत होती.

"काय विचित्र दिसतंय?"

"एकंदरीत सगळंच! एक दिवस एकजण नाकावर ठोसा लगावून रक्तबंबाळ करतो, तर दुसऱ्या दिवशी दुसरा एकजण पाय धुतो, सगळंच विलक्षण! पण मग याच्या मधली अवस्था कोणती?"

तितक्यात दार उघडून आत येत असलेल्या निकोलायनेच या प्रश्नाचं उत्तर दिलं,

"मधली अवस्था ना? मधल्या अवस्थेचे लोक असतात ते तुमच्या नाकावर ठोसे लगावणाऱ्यांचे हात चाटतात अन् ज्यांना ठोसे लगावले जातात त्यांचं रक्त शोषून घेतात! मधल्या अवस्थेतले लोक हे असे असतात, समजलं?"

इग्नात आदराने त्याच्याकडे पाहू लागला. मग किंचित् थांबून तो म्हणाला,

"तुमचं म्हणणंच पुष्कळसं बरोबर असावं, मला वाटतं."

तो उठून उभा राहिला व त्याने थोडं चालून पाहिलं.

"अगदी नवे पाय आल्यासारखं वाटतंय," तो म्हणाला. "फार फार आभारी आहे मी तुमचा."

मग ते तिथून उठून चहासाठी जेवणघरात गेले. तिथं इग्नातने आपली कहाणी त्यांना सांगितली. तो अगदी गंभीरपणे बोलत होता. त्याने सांगितलं,

"मीच आपलं वर्तमानपत्र वाटत असे चालण्याच्या बाबतीत माझी कोणी बरोबरी करू शकणार नाही."

"तिकडे खेड्यांतले पुष्कळ लोक वाचतात का ते?" निकोलायने विचारलं.

"ज्यांना ज्यांना म्हणून वाचायला येतं ते सगळे–श्रीमंत लोकसुद्धा. अर्थात् श्रीमंतांना ते वर्तमानपत्र मिळतं ते आमच्याकडून नव्हेच. त्यांच्यात

एवढ समजण्याइतकी हुशारी नक्कीच आहे की शेतकरी जमीनदारांचं रक्त सांडून त्यांच्या जमिनी त्यांच्याकडून हिसकावून घेतील. एकदा ते झालं की मग शेतकरी सगळ्या संपत्तीची वाटणी करून टाकतील, म्हणजे मग कोणी जमीनदार न् मालक नाही अन् कोणी मजूर नाही! हे होणार हे तर उघडच आहे—हो, नाहीतर लढा करायचाच कशाला?"

त्याला स्वतःलाच आपला अपमान झाल्यासारखं वाटलं व तो प्रश्नार्थक व साशंक नजरेने निकोलायकडे पाहू लागला. निकोलाय काहीच बोलला नाही, त्याने नुसतं स्मित केलं.

"हो ना! आज समजा आपण सगळ्या जगाविरुद्ध लढलो अन् जिंकलो सुद्धा—पण उद्या पुनः जर श्रीमंत न् गरीब असे भेद व्हायचे असतील तर मग उपयोगच काय?" इग्नात आवेशाने बोलत होता. "उं हूं. पुरे आता—हं तर काय बरं? आम्ही इतके मूर्ख नाहीत! संपत्ती म्हणजे कोरड्या वाळूसारखी असते—ती एका ठिकाणी कधीच राहात नाही, ती सारखी निरनिराळ्या दिशांना पसरत असते. अं हं! आम्ही ते चालू देणार नाही!"

"बरं बरं, एवढा चिडतोस कशाला, बाबा?" आई हसून म्हणाली.

निकोलाय म्हणाला, "रिबिनच्या अटकेसंबंधीचं आमचं पत्रक लवकरात लवकर तुझ्या तिकडच्या लोकांकडे कसं पोचतं करायचं याचीच मला काळजी पडली आहे."

इग्नातने कान टवकारले व विचारलं,

"असं पत्रक आहे म्हणता?"

"होय."

"मग मला द्या ते. मी घेऊन जातो ते!" इग्नातने हात चोळीत स्वतःच जायची तयारी दाखवली.

आईने त्याच्याकडे न पाहाता नुसतंच स्मित केलं.

"पण तू फार दमला आहेत," ती म्हणाली. "अन् शिवाय तुला भीती वाटते असंही म्हणाला होतास ना तू?"

"भीतीचा न् कामाचा काय संबंध?" त्याने अगदी व्यवहारी भाषेत प्रश्न केला व आपल्या रुंद पंजाने आपले कुरळे केस मागे वळवले. "पण तुम्ही हसताहात काय? म्हणजे तुमची तरी कमालच आहे!"

"वेडा पोरगा!" आई उद्गारली. त्याच्या बोलण्याने तिला झालेला आनंद दिसू नये असा तिचा प्रयत्न होता.



"हूं! म्हणे पोरगा!" इग्नात नापसंती व्यक्त करीत उद्गारला.

"तुला तिथं परत जायचं नाही रे!" निकोलाय प्रेमळपणे डोळे मिचकावीत त्याला म्हणाला.

"नाही? का बरं? मग कुठं जाऊ मी?" इग्नातने बेचैन होत विचारलं.

"पत्रकं आणखी कोणीतरी घेऊन जाईल. तू फक्त त्याने कसं अन् कुठं जायचं वगैरे तपशीलवार सूचना द्यायच्या; देशील ना?"

"ठीक आहे!" इग्नातच्या स्वरात तीव्र निराशा स्पष्ट व्यक्त होत होती.

"आम्ही तुला नवा पासपोर्ट देऊ अन् जंगलच्या चौकीदाराचं कामही मिळवून देऊ."

इग्नातने चटकन वर पाहिलं. तो अस्वस्थ होऊन म्हणाला,

"शेतकरी सर्पणासाठी लाकूडफाटा चोरायला आले तर मी काय करू? त्यांना पकडून देऊ? अं हं—असली नोकरी जमायची नाही आपल्याला!"

आई व निकोलाय दोघंही हसली. त्यामुळे इग्नातला पुनः अपमान झाल्यासारखं वाटलं व तो बेचैन झाला.

"तुला शेतकऱ्यांना पकडावं लागणार नाही," निकोलायने त्याचं सांत्वन केलं. "तू त्याबद्दल बेफिकीर राहा."

"मग ठीक!" इग्नात हायसं वाटून हसत म्हणाला. "पण मला कारखान्यात काम करायला आवडेल. कारखान्यातले लोक फार हुशार असतात म्हणे."

आई उठून खिडकीजवळ गेली.

"जीवन तरी किती विचित्र!" ती विचारमग्न होत म्हणाली. "रोज पाच वेळा हसायचं न् पाच वेळा रडायचं! बरं, तुझं संपलं ना इग्नात? थोडी झोप घे बरं आता."

"पण मला झोपच आलेली नाही."

"हं चल. चल पाहू!"

"तुम्ही फार कडक आहात, नाही? बरं बुवा, आलोच! तुम्ही चहा दिलात... इतकं चांगलं वागवलंत... खरोखर फार चांगले आहात तुम्ही लोक..."

तो आईच्या अंथरुणावर जाऊन पडल्या पडल्या डोकं खाजवीत होता व स्वतःशीच बडबडत होता:

"आता या सगळ्या चिरगुटांना डांबराचा वास येईल... अं, इतकी काळजी करण्यात काहीच अर्थ नाही... अं हं, मला झोप आलेली नाही... मधल्या अवस्थेतल्या लोकांचं त्याने किती झटपट वर्णन केलं... हं, सैतान..."

आपल्याला केव्हा झोप लागली हे कळण्यापूर्वीच तो जोरजोराने घोरू लागला होता; त्याचं तोंड अर्धवट उघडं होतं व भुवया वर चढलेल्या होत्या...

## २१

त्या दिवशी संध्याकाळी तो एका लहानशा तळघरवजा खोलीत निकोलाय वेसोव्श्चिकोवच्या समोर बसून काही तरी रहस्यमय भाषेत त्याला सांगत होता,

"मधल्या खिडकीवर चार वेळा..."

"चार वेळा?" निकोलायने चिंताग्रस्त होत विचारलं.

"पहिल्यांदा तीन वेळा—हे असं—" त्याने मेजावर टिचक्या वाजवून दाखवल्या "एक, दोन, तीन—मग जरा थांबायचं, अन् मग पुन: एक वेळ."

"अस्सं?"

"एक पिंगट केसांचा शेतकरी दार उघडील न् विचारील, 'तुम्ही दाईला बोलवायला आलात ना?' मग तुम्ही म्हणायचं, 'हो, मालकीणबाईसाठी बोलावलंय!' बस्स, एवढं झालं की तो समजून जाईल."

ते दोघे डोक्याला डोकं भिडवून बसले होते. दोघेही चांगले धट्टेकट्टे, मजबूत तरुण होते. ते खालच्या आवाजात बोलत बसले होते व आई हात बांधून त्यांच्याकडे पाहत बसली होती. इग्नात ज्या रहस्यमय टिचक्यांच्या खुणा व परवलीचे शब्द सांगत होता ते ऐकून तिला मौज वाटत होती.

"अगदी लहान पोरांसारखं आहे यांचं!" ती स्वत:शीच उद्गारली.

तिथल्या जमिनीवर काही तुटक्याफुटक्या बादल्या व लोखंडी पत्र्याचे तुकडे पडले होते, त्यांवर भिंतीवरच्या एका दिव्याचा प्रकाश पडलेला होता. त्या खोलीत लोखंडाचा जंग, रंग व दमटपणाचा वास येत होता.

इग्नातने एका केसाळ कपड्याचा ओव्हरकोट घातला होता व तो त्याला फार आवडत असल्याचे दिसत होतं. आईने त्याच्याकडे पाहिलं तेव्हा



तो बाहीवर हात फिरवीत होता व मान वळवून कोटाच्या खांद्यांकडे कौतुकाने पाहात होता.

"अगदी मुलंच!" ती पुटपुटली. "अल्लड पोरं..."

"बस, इतकंच!" इग्नात सांगून झाल्यावर उठता उठता म्हणाला. "गेल्याबरोबर प्रथम मुरातोवकडे जायला विसरू नका, अन् आजोबांना भेटायचंय म्हणून सांगा."

"नाही विसरणार!" वेसोव्श्चिकोवने सांगितलं.

पण इग्नातचं समाधान झालं नव्हतं. त्याने सर्व टिचक्या, खुणा, परवलीचे शब्द यांची फिरून एकवार उजळणी केली व मग हस्तांदोलनासाठी हात पुढे केला.

"त्यांना माझा नमस्कार सांगा बरं का!" तो जाता जाता म्हणाला. "ते फार चांगले लोक आहेत—तुम्हाला दिसेलच म्हणा."

त्याने पुन: आपल्या कोटाकडे नजर टाकली व तो स्वत:वरच खूष झाला.

"आता जायची वेळ झाली माझी?" त्याने आईला विचारलं.

"तुला रस्ता सापडेल नीट?"

"नक्की! बराय, येतो कॉमरेड्स!"

तो बाहेर पडला तेव्हा त्याचे खांदे रुंदावले होते, छाती पुढे आली होती, नवी हॅट एका कानावर कलती ठेवलेली होती व त्याने आपले दोन्ही हात मोठ्या ऐटीने खिशांत खुपसले होते. त्याच्या पिंगट कुरळ्या केसांची झुलपं कानशिलावर रुळत होती.

"आता कुठं मला काम मिळालं म्हणायचं!" वेसोव्श्चिकोव सावकाश आईकडे येत म्हणाला. "मला फारच कंटाळा येऊ लागला होता. असं वाटायला लागलं होतं की तुरुंगातून उगीच पळालो आपण! इथं काय, रात्रंदिवस लपून बसायचं, बस! यापेक्षा तिथं मी काही शिकत तरी होतो. पावेल आम्हाला आमची डोकी चालवायला लावायचा. बरं पण त्यांच्या निसटून येण्याचा काय बेत ठरला, निलोव्ना?"

"मला माहीत नाही," हे बोलताना तिच्या तोंडून एक सुस्कारा बाहेर पडला.

निकोलायने आपला जाडजूड हात तिच्या खांद्यावर ठेवला व जरा पुढे वाकून तो म्हणाला,

"तुम्ही त्याच्या गळी उतरवाच ही गोष्ट. तुमचं नक्की ऐकेल तो. खरंच, अगदी सोपं आहे ते काम. हे पहा, ही अशी तुरुंगाची भिंत, न् हा शेजारीच बाहेरच्या रस्त्यावरचा दिव्याचा खांब. रस्त्याच्या पलिकडे एक मोकळा जमिनीचा तुकडा, डावीकडे स्मशानभूमी, अन् उजवीकडे रस्ते न् घरं! रोज तो दिवाबत्तीवाला दिवा साफ करायला येतोच. त्याने असं करायचं की भिंतीला शिडी टेकून वर चढल्यावर अगदी वरच्या विटांपैकी एका विटेला एका दोराच्या शिडीचं टोक पक्कं बांधून टाकायचं न् ती शिडी द्यायची सोडून खाली तुरुंगाच्या आवारात – की झालंच! आत तुरुंगातल्या आपल्या लोकांना हे केव्हा व्हायचं ते ठाऊक असेलच, तेव्हा लगेच त्यांनी साध्या गुन्हेगारांना सांगून काहीतरी दंगल माजवायची – किंवा त्यांनी स्वतः सुद्धा ते केलं तरी चालेल – म्हणजे सगळे पहारेकरी अडकून पडतील न् पळून जाणाऱ्यांना सहज शिडीवरून चढून निसटता येईल! एक, दोन, तीन! बस! चुटकीसरसं काम फत्ते!"

ही योजना समजावून सांगत असता तो हातांनी सगळं दाखवीत होता, व ती योजना खरोखरच साधी, सोपी व विचारपूर्वक आखलेली दिसत होती. आजपर्यंत नेहमीच आई त्याला एक मंदबुद्धीचा, मठ्ठ माणूस समजत आली होती. त्याच्या नजरेतही जगाविषयी चीड व संशय भरलेला असायचा. पण आज त्याचे डोळे निराळेच भासत होते. तो तिला आपलं म्हणणं पटवून देत असताना त्या नेत्रांत निराळीच प्रेमळपणाची चमक दिसत होती.

"अन् यात मुख्य गोष्ट अशी की हे सगळं करायचं ते भर दिवसा! अगदी दिवसाढवळ्या, समजलात! एखादा कैदी अगदी दिवसाढवळ्या, सगळ्या तुरुंगात जागता पहारा असता, पळून जाण्याचा प्रयत्न करील अशी कुणाला शंका तरी येईल का? तुम्हीच सांगा!"

"पण त्यांनी गोळ्या झाडल्या तर?" त्या नुसत्या कल्पनेनेच घाबरून जाऊन आईने विचारलं.

"कोण झाडणार? तिथं सैनिक नाहीतच, अन् पहारेकऱ्यांना फक्त खिळे ठोकण्याखेरीज इतर कशासाठी पिस्तुलांचा उपयोग ठाऊकच नाही!"

"खरंच, अतिसोपं दिसतंय की मग!"

"पहालच तुम्ही. पण तुम्ही तेवढं त्यांना पटवून द्याच. माझ्याजवळ सर्व तयार आहे. शिडी, वर अडकवायचं हूक, सगळं! अन् माझा घरमालक दिवाबत्तीवाला बनेल!"



बाहेर दाराच्या पलिकडे कुणीतरी खाकरलं, पायाची चाळवाचाळव झाली व धातूंच्या तुकड्यांची खडबड ऐकू आली.

"तोच तो!" निकोलाय म्हणाला.

दारात पत्र्याचं एक टब दिसू लागलं व घोगऱ्या आवाजात कोणीतरी पुटपुटलं, "मधून दूर हो बरं, ए मूर्खा!"

त्या टबच्या वर एक चेहरा दिसू लागला. बटबटीत डोळे, पांढरे केस व मिशा यांनी भरलेला तो चेहरा भल्या माणसाचा दिसत होता.

निकोलायने त्याला टब उचलून आत आणायला मदत केली. तो उंच पण खाली वाकलेला माणूस आत आला. त्याने कोरडं खोकून गाल फुगवले तो बाजूला थुंकला व मग आपल्या घोगऱ्या आवाजात त्यांना म्हणाला,

"नमस्कार! काय ठीक आहे ना?"

"हं, याला विचारा हवं तर!" निकोलाय एकदम म्हणाला.

"काय विचारायचं मला?"

"ते – तुरुंगातून पळून जाण्याच्या योजनेबद्दल!"

"हं! ते –" तो लोहार रंगलेल्या बोटांनी मिशा पुसत उद्गारला. "ते काम इतकं सोपं असेल यावर यांचा विश्वास बसत नाही बघ, याकोव वासिलेविच!"

"नाही? का बसत नाही? मला वाटतं त्यांना ते नकोच असेल! पण तुला न् मला ते हवं आहे, म्हणून आपला विश्वास बसतोय!" तो लोहार शांतपणे म्हणाला. तेवढ्यात त्याला खोकल्याची उबळ येऊन तो ओणवा झाला. ती उबळ गेल्यावर तो खोलीच्या मध्यभागी उभा राहून छाती चोळू लागला व आपल्या बटबटीत डोळ्यांनी आईचं निरीक्षण करू लागला.

"पावेल न त्याचे कॉमरेड्स मिळून ठरवतील काय करायचं ते!" आई म्हणाली.

निकोलायची मान खाली वळली.

"पावेल? – तो कोण आहे?" लोहाराने एका ठिकाणी बसता बसता विचारलं.

"माझा मुलगा."

"आडनाव?"

"व्लासोव."

त्याने मान हालवली व तो बटवा काढून पाइपमध्ये तंबाखू भरू लागला.

"ऐकलंय खरं त्याच्याबद्दल," तो म्हणाला. "माझा पुतण्या ओळखतो त्याला. माझा पुतण्याही तुरुंगातच आहे. येवचेंको—ऐकलंय नाव त्याचं? माझं नाव गोबुन. लवकरच सगळ्या तरुण मंडळींना तुरुंगाच्या कोठडीत बंद व्हावं लागेलसं दिसतंय. म्हणजे आम्हा म्हाताऱ्यांना इथं बाहेरचं जग मोकळं! एका शिपायाने मला सांगितलं की माझ्या पुतण्याला लवकरच सैबेरियात पाठवणार आहेत म्हणे! नक्कीच करतील ते तसं—हरामखोर लेकाचे!"

तो निकोलायकडे वळला व पाइप ओढीत मधून मधून जमिनीवर थुंकत बोलू लागला:

"यांना नकोय का ते? मर्जी त्यांची. पण माणूस बाहेर असला की बसायचा कंटाळा आला म्हणजे चालायला येतं अन् चालून दमला की बसायला येतं! उलट आत काय? त्यांनी लुबाडलं तरी डोळेझाक करा, मारलं तरी रडू नका, अन् ठार मारलं तरी तिथं पडून राहायचं! सगळ्यांनाच ठाऊक आहे ते! पण ते काही असलं तरी मी माझ्या पुतण्याला नक्कीच बाहेर आणणार हे तू पक्कं समजून असं!"

तो आपली वाक्यं ज्या पद्धतीने ओरडून उच्चारीत होता त्याचं आईला आश्चर्य वाटलं, पण त्याने अखेरचं वाक्य ज्या निर्धाराने व आत्मविश्वासाने उच्चारलं, त्याबद्दल मात्र त्याचा तिला हेवा वाटल्यावाचून राहिला नाही.

तेथून बाहेर पडून अंगाला झोंबणारा गार वारा व पाऊस यांना तोंड देत रस्त्यावरून चालताना ती निकोलायबद्दल विचार करीत होती व स्वतःशी म्हणत होती:

"किती आश्चर्यकारक बदल झालाय त्याच्यात!" अन् त्या लोहाराची आठवण झाली तेव्हा तर जणू देवाची प्रार्थनाच करीत असल्यासारख्या भावनेने ती उद्गारली:

"म्हणजे जीवनाचा नवा अर्थ सापडलेली मी एकटीच नाही तर!"

मग ती पावेलचा विचार करू लागली. तिला वाटलं, तो कबूल झाला तर किती छान होईल!

## २२

त्यानंतरच्या रविवारी ती तुरुंगात पावेलचा निरोप घेऊ लागली तसा त्याने कागदाचा एक लहानसा बोळा आपल्या हातात सरकवल्यासारखं तिला



वाटलं. जणू आपला हात भाजतो आहे असं वाटून ती प्रश्नार्थक मुद्रेने त्याच्याकडे पाहू लागली, पण त्याच्या चेहऱ्यावर तिला काहीच उत्तर आढळलं नाही. त्याच्या निळ्या डोळ्यांत त्याचं नेहमीचं निर्धाराचं शांत स्मित विलसलं होतं.

"बरं, येते मी", ती सुस्कारा टाकून म्हणाली.

त्याने हस्तांदोलनासाठी पुनः हात पुढे केला, व यावेळी मात्र त्याच्या चेहऱ्यावर तिला मार्दव आढळलं.

"बराय, आई, नमस्कार!"

ती त्याचा हात तसाच हातांत धरून थांबली.

"तू काही काळजी करू नकोस. अन् रागावू नकोस अं!" तो म्हणाला.

हे त्याचे शब्द व त्याच्या दोन्ही भुवयांच्या मधोमध उमटलेली एक रेषा हेच तिच्या मघाच्या प्रश्नाचं उत्तर होतं.

"नाही रे बाळ," ती खाली पाहून पुटपुटली. "असं का म्हणतोस?—"

आपल्या डोळ्यांतले अश्रू व ओठांचं थरथरणं त्याच्या दृष्टीस पडू नये म्हणून ती त्याच्याकडे न पहाताच तडक बाहेर पडली. घरी जाईपर्यंत रस्त्यात सारखा तो कागदाचा बोळा धरलेला आपला हात दुखत असल्याचा तिला भास होत होता व खांद्यावर मार बसल्याप्रमाणे हात जड झाल्यासारखा वाटत होता. तिने घरी येताक्षणीच ती चिठ्ठी निकोलायच्या स्वाधीन केली. तो त्या कागदाचा बोळा नीट करून त्यावर नजर फिरवीत असता ती फार मोठ्या आशेने त्याच्याकडे पहात उभी होती. पण निकोलायने तिची निराशाच केली.

"मला ठाऊकच होतं ते!" तो म्हणाला. "पहा काय लिहिलंय ते—'कॉमरेड्स, आम्ही पळून जाण्याचा प्रयत्न करणार नाही. ते शक्यच नाही. आमच्यापैकी कोणीच नाही. आम्ही तसं केलं तर आमचा स्वाभिमान गमावल्यासारखं होईल. पण नुकताच पकडून आणलेला तो शेतकरी आहे त्याला मात्र मदत करण्याचा तुम्ही जरूर प्रयत्न करा. तुम्ही त्याच्यासाठी शक्य ते सर्व करायला हवं. इथं त्याची स्थिती फार वाईट आहे—अधिकाऱ्यांशी रोज भांडतो तो. आधीच त्याने चोवीस तास अंधारकोठडीत घालवले आहेत. ते हालहाल करून जीव घेतील त्याचा. तुम्ही त्याला जरूर मदत करा अशी आमची सर्वांची विनंती आहे. माझ्या आईला समजावून सांगा. तिला सगळं स्पष्ट सांगा म्हणजे तिला आमचं म्हणणं खात्रीने पटेल.'"

आईने वर पाहिलं.

"सगळं सांगायचं असं आहेच काय? मला आधीच समजलंय सारं!" तिच्या आवाजाला कंप सुटला होता.

निकोलायने काही न बोलता तोंड बाजूला वळवलं, हातरुमाल काढला व नाक शिंकरलं.

"मला पडसं झालंय वाटतं..." चष्मा कपाळावर सरकवून येरझारा घालीत तो पुटपुटला. "तुम्हाला खरं सांगू का—आता आपल्याला ते जमवून आणायला पुरेसा वेळ सुद्धा मिळाला नसताच."

"ठीक आहे, होऊन जाऊ देत खटला!" आई नाराजीने उद्‌गारली. तिची खिन्नता आता धुक्याप्रमाणे तिच्या अन्तःकरणात दाटली होती.

"बरं, पण आत्ताच सेंट पीटर्सबर्गहून एका कॉमरेडचं पत्र आलं आहे मला..."

"पण नंतर मग सैबेरियातून तर पळून येता येईल ना? की नाही?"

"अर्थात् येईल. या कॉमरेडने पत्रात लिहिलंय की या लोकांवरचा खटला लवकरच सुरू होईल, सैबेरियात हद्दपारीची शिक्षा द्यायचंसुद्धा नक्की ठरलंय. म्हणजे किती लबाडी पहा! न्यायकोर्ट म्हणजे सुद्धा नुसता फार्स! खटला सुरू व्हायच्या आधीच शिक्षा ठरून गेली—तीसुद्धा सेंट पीटर्सबर्गमध्ये! हद्द झाली की नाही बदमाषीची!"

"जाऊ देत, निकोलाय!" आई दृढतापूर्वक म्हणाली. "माझं सांत्वन करण्यासाठी काही सांगत बसायची जरूर नाही. पावेल करील ते बरोबरच असेल. तो निष्कारण स्वतःवर न् आपल्या सहकाऱ्यांवर त्रास ओढवून घेणार नाही. अन् माझ्यावरही किती माया आहे त्याची—पाहिलं ना माझी किती काळजी आहे त्याला! तिला समजावून सांगा, तिचं सांत्वन करा, असं मुद्दाम लिहिलंय..."

तिचं हृदय धडधडत होतं व मस्तक गरगरा फिरत होतं.

"तुमचा मुलगा फार थोर आहे, आई!" निकोलाय त्याच्या स्वभावाच्या अगदी विरुद्ध अशा मोठ्या आवाजात उद्‌गारला. "त्याच्याविषयी मला किती आदर वाटतो हे शब्दांनी सांगता येणं कठीण आहे."

"आपण रिबिनला मदत करायचा काही मार्ग शोधून काढायला हवा," आईने सुचवलं.



तिला त्या क्षणीच काहीतरी करावंसं वाटत होतं. दूर कुठंतरी जावं, न् थकेपर्यंत काहीतरी करावं अशी तिला प्रबळ इच्छा झाली होती.

"ठीक!" निकोलाय म्हणाला. त्याच्या येरझारा अजून सुरूच होत्या. "पण साशा यायला हवी..."

"ती येईल. मी पावेलच्या भेटीला जाते त्या दिवशी ती हमखास येतेच."

निकोलाय तिच्या शेजारी पलंगावर बसला. विचारात गढून जाऊन त्याने मान खाली वळवली होती व त्याचं ओठ चावणं व दाढी कुरवाळणं सुरू होतं.

"माझी बहीण इथं नाही हे फारच वाईट..."

"पावेल तिथं आहे तंवरच आपण हे काम पूर्ण करू शकलो तर फार छान होईल. त्याला फार बरं वाटेल त्यामुळे—" आई म्हणाली.

मग थोडा वेळ दोघंही काहीच बोलली नाहीत.

"पण त्याला ते का योग्य वाटत नाही हेच मला समजत नाही..." आई अचानकपणे म्हणाली.

निकोलाय ताडकन् उठून उभा राहिला व तितक्यात दारावरची घंटा वाजू लागली. त्या दोघांनी परस्परांकडे पाहिलं.

"बहुधा साशाच असेल!" निकोलाय हळूच म्हणाला.

"आपण काय सांगणार तिला?" आईने तितक्याच हळू आवाजात विचारलं.

"हूं—"

"कीव येते मला बिचारीची."

घंटा पुनः वाजली. पण यावेळी घंटेचा नाद तितका जोरदार नव्हता. कदाचित् घंटा वाजविणाऱ्या व्यक्तीच्या मनाचाच निश्चय झाला नसावा. निकोलाय व आई दोघंही एकदम दार उघडायला निघाली, पण स्वयंपाकघराच्या दाराशी जाऊन पोचल्यावर निकोलाय बाजूला झाला.

"तुम्ही एकट्यानेच गेलेलं बरं," तो म्हणाला.

आईने दार उघडताच साशाने आत प्रवेश करून मोठ्या हिंमतीने सरळ प्रश्न केला:

"तो नाही म्हणाला ना?"

"होय."

"मला माहीत होतं तो नाही म्हणेल," साशा हे बोलून गेली खरी, पण तिचा चेहरा पांढराफटक पडला. तिने कोटाच्या काही गुंड्या सोडल्या व तसाच कोट काढण्याचा प्रयत्न केला.

"सारं न् पाऊस – वाईट हवा पडली आहे!" ती म्हणाली. "तो ठीक आहे ना?"

"होय."

"तब्येत ठीक न् आनंदात – असंच ना?" साशा आपल्या हाताकडे पाहात हळूच म्हणाली.

"त्याने असं लिहून सुचवलंय की आपण रिबिनची सुटका करण्याचा प्रयत्न करावा," साशाकडे न पहाता आईने सांगितलं.

"हो, मग आपण ते करायचं ठरवलं तर मला वाटतं आपली ठरलेलीच योजना अमलात आणावी," साशा सावकाश म्हणाली.

"मला सुद्धा तसंच वाटतं!" निकोलाय अचानकपणे दारात प्रकट होऊन म्हणाला. "नमस्ते, साशा!"

साशाने हस्तांदोलनासाठी हात पुढे केला व ती म्हणाली,

"हो ना, त्याला काय हरकत आहे? ती योजना फार चांगली आहे असं सगळेच म्हणतात."

"पण ते करणार कोण? आपण सगळे तर इतके कामात आहोत..."

"मी करीन की –" साशा ताडकन् उठून म्हणाली. "मला आहे वेळ."

"बरं तर. पण तुला बाकीच्यांच्या भेटीगाठी वगैरे घ्याव्या लागतील."

"करीन की मी ते सारं. मी ही आत्ताच निघते."

तिने पुनः कोटाच्या गुंड्या लावायला सुरुवात केली, यावेळी तिची सडपातळ बोटं सफाईने फिरत होती.

"थोडी विश्रांती घेऊन मग जा की!" आई म्हणाली.

"मी थकले नाही मुळीच!" साशाने स्मित करून उत्तर दिलं.

मग काही न बोलता तिने हस्तांदोलन करून त्या दोघांचा निरोप घेतला व ती येताना आली तशीच थंडपणे व कठोर मुद्रा करून बाहेर पडली.

आई व निकोलाय खिडकीत जाऊन उभी राहिली. साशा बाग ओलांडून फाटकाच्या बाहेर पडेतोवर ती तिच्याकडे पहात उभी होती. मग निकोलाय हळूच शीळ घालीत मेजाजवळ बसून लिहू लागला.

"तिच्या मागे उद्योग असला तर तेवढंच तिला बरं वाटेल," आई विचारमग्न होत म्हणाली



"अर्थात् वाटेल!" निकोलाय म्हणाला. नंतर त्याच्या प्रेमळ चेहऱ्यावर स्मिताची रेखा उमटली व तो म्हणाला, "हा अनुभव तुमच्या वाट्याला आलाच नाही, होय ना? आपलं प्रेम असलेल्या पुरुषासाठी दुःख सहन करण्याचा प्रसंग तुमच्यावर आलाच नाही, खरं ना?"

"हूं!" आई हात उडवीत म्हणाली. "मला भीती वाटत होती ती एकाच गोष्टीची. ती म्हणजे माझं लग्न करून टाकतील याची!"

"तुमचं कोणावर मन जडलं नव्हतं का?"

"मला आठवत सुद्धा नाही. पण मला वाटतं तसं असावं. कोणीतरी मला आवडत असावं, पण आता पार विसरून गेले आहे मी. माझ्या नवऱ्याने मला इतकं मारलं की लग्नापूर्वीच्या सगळ्या आठवणींचं पार उच्चाटन करून टाकलं त्यानं!" आई खिन्नपणे निकोलायकडे पाहात म्हणाली.

निकोलाय पुनः मेजाजवळ सरकला. आई एक मिनिटभरासाठी बाहेर गेली. ती परत आली तेव्हा तो पूर्वस्मृतींचा चित्रपट पाहाण्यात रंगून गेला होता. आईला पाहिल्यावर तो प्रेमळपणे बोलू लागला,

"माझं विचाराल तर मला काहीसा साशासारखाच अनुभव आला आहे. माझं एका मुलीवर प्रेम होतं – फार चांगली मुलगी होती. तिची माझी ओळख झाली तेव्हा वीसएक वर्षांचा असेन मी. अन् तेव्हापासून माझं तिच्यावरच प्रेम आहे – अगदी अन्तःकरणापासून, कृतज्ञतापूर्वक न् अखंड प्रेम करीत राहीन मी तिच्यावर!"

त्याच्या शेजारीच आई उभी होती. तिथून तिला त्याच्या डोळ्यांतील प्रेमाची चमक स्पष्ट दिसत होती. तो खुर्चीच्या पाठीला धरून व हातावर डोकं टेकून बसला होता. त्याची नजर दूर कुठंतरी लागलेली होती. एखादं फूल सूर्याकडे आकर्षित व्हावं तसं त्याचं किडकिडीत पण सुदृढ शरीर दूरवर दिसणाऱ्या अदृश्य दृश्याकडे आकर्षित झालं होतं.

"मग तिच्याशी लग्न का केलं नाही तुम्ही?" आईने विचारलं.

"तिचं लग्न होऊन चार वर्षं झाली आता."

"पण त्यापूर्वीच का नाही तुम्ही दोघांनी लग्न केलं?"

तो एक क्षणभर विचारात पडला. मग तो सांगू लागला,

"ते जमलंच नाही बघा. त्याचं असं झालं की मी मोकळा होतो तेव्हा ती तुरुंगात नाहीतर हद्दपार असायची, न् ती बाहेर असली की मी तुरुंगात! साशा न् पावेलसारखंच नाही का हे? अखेर त्यांनी तिला दहा वर्षं हद्दपारीची सजा ठोठावून सैबेरियात पाठवलं – तेही थेट सरहद्दीच्या टोकाच्या

प्रदेशात. मला तिच्या पाठोपाठ जावंसं वाटत होतं, पण लाजही वाटत होती. तिलाही तसंच वाटलं. मग तिथं तिची दुसऱ्या एकाशी भेट झाली. तोही उमदा माणूस आहे–माझा कॉमरेडच आहे. ती दोघं बरोबरच तिथून निसटली व आता ती दुसऱ्या एका देशात राहाताहेत."

निकोलायने चष्मा काढून त्याची भिंगं पुसली, तो उजेडात धरून पाहिला व पुनः पुसून काढला.

"गरीब बिचारा!" आई मान हालवीत मायेने उद्गारली. तिला त्याच्याबद्दल वाईट वाटलं, पण त्याचबरोबर आईने मुलाकडे पाहून स्मित करावं तसंच त्याच्याकडे पाहून तिलाही हसू आलं.

त्याने खुर्ची वळवून एक लेखणी उचलली व त्या लेखणीला झटके देऊन ताल धरीत तो बोलू लागला.

"संसार म्हटला की क्रांतिकारकाची शक्ति खच्ची झालीच! त्याला इलाजच राहात नाही मग! पोरंबाळं, पुढची काळजी, बायकापोरांचं पोट भरण्यासाठी नोकरी–सगळं आलंच! क्रांतिकारकाने आपल्या कार्याचा व्याप वाढविण्यासाठी शक्तीचा व्यय न करता संचय केला पाहिजे. आज तसाच काळ आला आहे. आपण सर्वांच्या पुढे आघाडीवर राहिलं पाहिजे, कारण जुनं जग नष्ट करून नवीन जग निर्माण करण्याची महान कामगिरी इतिहासाने आपल्यावर सोपवली आहे. आपण जर गलितगात्र होऊन किंवा कसल्यातरी क्षुल्लक सुखाच्या वा लहानसहान यशाच्या मोहाला बळी पडून आपल्या कामात मागे पडलो तर तो चळवळीशी दगाबाजी केल्याइतकाच मोठा अपराध ठरेल. आपण कोणाची साथ मिळेल म्हणून वाट पाहात राहिलो तर आपल्या कार्याची हानी झाल्यावाचून राहाणार नाही. आणि आपल्याला लहानसहान यशावर समाधान मानता कामा नये, संपूर्ण विजय हेच आपलं ध्येय आहे हेही आपल्याला विसरून चालणार नाही."

त्याच्या आवाजात दृढनिश्चयाची प्रचीती होती, त्याचा चेहरा फिकट झाला होता व त्याच्या नेत्रांत त्याची नेहमीची गांभीर्याची चमक होती.

तितक्यात दारावरची घंटा पुनः वाजली.

लुद्मिला आत आली. तिचे गाल थंडीने लाल झाले होते. अंगातला साधा कोट थंडी निवारण्याला अगदीच असमर्थ असल्यामुळे ती थंडीने कापत होती.

आपले झिजलेले लाँगबूट काढता काढता ती तुटकपणे म्हणाली, "खटला पुढल्या आठवड्यात सुरू व्हायचाय!"



"खात्री आहे का तुझी?" निकोलायने आपल्या खोलीतून ओरडून विचारलं.

आई जवळजवळ धावतच त्या खोलीत गेली. आपल्या छातीत धडधडू लागलं ते भीतीमुळे की हर्षामुळे हे तिलाच समजेना. लुद्मिलाही तिच्या पाठोपाठ आत आली.

"होय, खात्री आहे माझी. फार काय, कोर्टातले लोक तर उघडपणे सांगतात की शिक्षा काय द्यायची ते सुद्धा आधीच ठरलंय म्हणून!" तिच्या आवाजात उपरोधाची छटा होती "आता काय म्हणणं आहे तुमचं? आपले अधिकारी आपल्या शत्रूला दया दाखवतील अशी सरकारला भीती तर वाटत नाही? आपल्या नोकरवर्गाची मनं बिथरवून भ्रष्ट करण्यासाठी इतका वेळ न् इतकी शक्ती खर्च करून सुद्धा ते लोक ऐन वेळी सज्जनांसारखे वागतील अशी भीती वाटते की काय सरकारला?"

ती पलंगावर बसली व आपल्या हातांनी आपले बसके गाल खसखसा चोळू लागली. ती बोलत होती तसतसा तिच्या आवाजात अधिकाधिक तिरस्कार व्यक्त होत होता व ती अधिकाधिक चिडून बोलत होती.

"उगाच शक्ती वाया दवडू नकोस, लुद्मिला!" तिला शांत करण्याच्या दृष्टीने निकोलाय म्हणाला. "तुझं बोलणं त्यांच्या कानांपर्यंत पोचणार नाही हे समजतं ना तुला?"

हे सारे शब्द आईच्या कानांत शिरत होते, पण तिला अर्थबोध काहीच होत नव्हता. तिच्या मनात एकच विचार घर करून होता: "पुढच्या आठवड्यात खटल्याला सुरवात होणार!"

अन् मग तिला अचानक वाटू लागलं की कसली तरी प्रचंड, अमानुष शक्ती आपल्या अंगावर चाल करून येत आहे!

## २३

उदासीनता, अस्वस्थतापूर्ण उत्कंठा व काळजी यांच्या छायेतच आई वावरत होती. एक दिवस गेला, दुसराही तसाच गेला. तिसऱ्या दिवशी साशा आली. तिने निकोलायला सांगितलं,

"सगळी तयारी झाली आहे. आज दुपारी एक वाजता."

"इतक्या लवकर?" त्याने आश्चर्याने विचारलं.

"हे लवकर झालं? मला फक्त कपडे न् रिबिनला जाण्यासाठी जागा, एवढीच व्यवस्था करायची होती. बाकी सगळं गोबुनने केलं. रिबिनने कोपऱ्यापर्यंत पळत यायचं; तिथं वेसोव्श्चिकोव उभा असेल तो त्याला एक कोट न् टोपी देईल न् रस्ता दाखवील. मी आणखी पुढे दुसरे कपडे घेऊन उभी राहीन."

"ठीक. पण हा गोबुन कोण?" निकोलायने विचारलं.

"तुझ्या माहितीचा आहे तो. तू ते मेकॅनिक लोकांचं अभ्यासमंडळ घेत होतास ते त्याच्याच खोलीत."

"आठवलं आता. जरा विचित्र प्राणी आहे तो."

"तो फौजेतून सेवानिवृत्त झालेला शिपाईगडी आहे. आता लोहारकाम करतो. तसा अगदी साधाभोळा आहे तो, पण सर्व प्रकारच्या हिंसेचा मनापासून तिटकारा आहे त्याला. काहीसा तत्त्वज्ञानीच आहे म्हणेनास." साशा विचारमग्न होऊन बोलता बोलता खिडकीतून बाहेर पहात होती.

आई हे ऐकत असताना आपल्या मनाशी काहीतरी निर्धार पक्का करीत होती.

"गोबुनला आपल्या पुतण्याला सोडवायचं आहे," साशा पुढे सांगू लागली. "तो येवचेंको आठवतो का तुला? नेहमी स्वच्छ अन् टापटिपीने राहायचा तो?"

निकोलायने मानेनेच होकार भरला.

"त्या गोबुननेच सगळी व्यवस्था केलीय," साशा सांगू लागली. "पण हा प्रयत्न यशस्वी होणं कठीण आहे असं मलाच वाटू लागलं आहे. कैद्यांना आवारात हिंडायला मोकळं सोडतात त्यावेळी हे काम उरकायचं आहे, त्यामुळे ती शिडी आत दिसली की त्यांच्यापैकी सुद्धा कित्येकांना तिचा उपयोग करण्याची इच्छा होईल अशी मला भीती वाटतेय..."

साशाने डोळे मिटून घेतले व ती स्तब्ध झाली. आई तिच्याजवळ सरकली.

"अन् अशा रीतीने सगळाच बेत फिसकटून जाईल!"

ती तिघंही खिडकीत उभी होती. निकोलाय व साशा पुढे, व आई त्यांच्यामागे. त्या दोघांचं भरभर बोलणं ऐकून तिच्या मनात निरनिराळे भाव उचंबळून येत होते.

"मी सुद्धा जाणार!" ती एकदम म्हणाली.



"का?" साशाने विचारलं.

"नका, तुम्ही कशाला? काहीतरी भलतंच घडून येऊन तुम्ही त्यात सापडाल! तुम्ही नकोच!" निकोलायने सल्ला दिला.

आई त्याच्याकडे पाहू लागली.

"नाही, मी जाणारच!" ती हळूच पण निर्धाराने म्हणाली. त्या दोघांनी परस्परांकडे पाहिलं.

"समजलं मला," खांदे उडवीत साशा म्हणाली. मग तिने आईकडे वळून तिचा हात धरला.

"पण उगाच आशा करण्यात काय अर्थ आहे बरं?" ती इतक्या सरळपणे म्हणाली की त्यातील भावना आईच्या अन्तःकरणाला स्पर्शून गेल्या.

"मला ठाऊक आहे ग ते," थरथरत्या हातांनी तिला जवळ ओढून घेत आई म्हणाली. "पण तरीसुद्धा मला बरोबर नेच तू. माझी तुम्हाला बिलकुल अडचण होणार नाही. मला गेलंच पाहिजे! असं पळून जाणं शक्य असतं हेच खरं वाटत नाही मला—म्हणूनच येणार आहे मी!"

"त्यांना येऊ देत आमच्याबरोबर!" साशा निकोलायला म्हणाली.

"ठीक आहे, तू म्हणशील तसं!" निकोलाय खाली नजर करून म्हणाला.

"बरं. पण आपण दोघी एकत्र दिसता कामा नये," साशा आईला सूचना देऊ लागली. "तुम्हाला तुरुंगाची भिंत दिसू शकेल. पण तुम्हाला कोणी विचारलं तर काय सांगाल?"

"काही तरी उत्तर सुचेल मला!" आई लगबगीने उत्तरली.

"बरं, पण तुरुंगाचे पहारेकरी तुम्हाला ओळखतात हे विसरू नका बरं का?" साशाने बजावलं. "अन् त्यांनी तुम्हाला तिथं पाहिलं तर—"

"त्यांना मी दिसणं शक्य नाही!"

आईच्या अन्तःकरणात एक वेडी आशा सुप्तावस्थेत पडून होती ती आता एकदम वर उफाळून आली व तिचं सारं अंग थरारलं. ती स्वतःशीच म्हणाली,

"तो सुद्धा निसटण्याचा संभव आहेच—कुणी सांगावं?"

तासाभराच्या आत ती तुरुंगाजवळच्या इमारतीजवळ पोचून ठरल्याजागी उभी राहिली. सोसाट्याचा वारा सुटल्यामुळे तिचे कपडे उडत होते. तो वाऱ्याचा झोत बर्फाच्छादित जमिनीवर आदळत होता, बाजूचं बागेचं जीर्ण

कुंपण डुगुडुगू हालत होतं व त्याच वाऱ्याचा मारा तुरुंगाच्या भिंतीवरही होत होता. तुरुंगाच्या आवारातील आरोळ्यांचे ध्वनीही त्या वाऱ्याबरोबर गरगर फिरत जाऊन गिरक्या घेत आकाशात उड्डाण करीत होते. त्याच वाऱ्यामुळे आकाशातील ढग जणू शर्यत लागल्याप्रमाणे पळत होते व मधूनच त्यांच्यामधून पलिकडच्या नील अवकाशाचं ओझरतं दर्शन होत होतं.

आईच्या मागे एक बाग, समोर स्मशानभूमी व उजव्या बाजूला सुमारे सत्तर फूट अंतरावर तुरुंगाची भिंत होती. स्मशानभूमीच्या जवळ एक शिपाई घोड्याला पळवीत होता व दुसरा एक शिपाई त्याच्या शेजारीच उभा होता. त्याचं जमिनीवर पाय आपटणं, ओरडणं, हसणं-खिदळणं व शीळ घालणं सुरू होतं. तुरुंगाच्या आसपास आणखी कोणीच नव्हतं.

आई त्या शिपायांच्या बाजूने पुढे निघाली व स्मशानभूमीच्या कुंपणाजवळ येऊन आणखी काही नाही ना हे तिने हळूच मागे व बाजूला नजर टाकून पाहून घेतलं. एकाएकी तिचे पाय खचून गेले व जमिनीत रुतून बसल्यासारखे वाटून ती स्तब्ध उभी राहिली. पलिकडे कोपऱ्याला वळसा घालून एक वाकलेला दिवाबत्तीवाला खांद्यावर शिडी टाकून दिवाबत्तीवाल्याच्या पद्धती-प्रमाणे लगबगीने येताना तिच्या दृष्टीस पडला. आईने कावऱ्याबावऱ्या नजरेने त्या शिपायांकडे पाहिलं. ते त्याच जागी उभे होते व तो घोडा त्यांच्याभोवती पळत होता. मग तिने त्या शिडी घेऊन येणाऱ्या माणसाकडे पाहिलं. तो ती शिडी भिंतीशी टेकवून ठेवून सावकाश वर चढत होता. थेट वर पोचल्यावर त्याने हाताला एक झटका दिला, व मग तो लगबगीने खाली उतरला व पुनः कोपऱ्याला वळसा घालून दिसेनासा झाला. आईचं हृदय कालगतीपेक्षाही वेगाने धावू लागलं, कालसुद्धा मागे पडला. तुरुंगाच्या भिंतींचा रंग जवळजवळ पार उडालेला होता, पुष्कळसे डागही पडलेले होते, व चुना उडून गेलेल्या ठिकाणी आतल्या विटा दिसत होत्या तिथं खड्डे पडल्यासारखं भासत होतं. अशा त्या कळकट भिंतीच्या पार्श्वभूमीवर शिडी जवळजवळ दिसतच नव्हती. तरी आईचं लक्ष तिथंच केंद्रित झालेलं होतं. एकदम एक डोकं तिथं भिंतीवर अंधुक दिसू लागलं, मग शरिराची आकृती दिसली. त्या व्यक्तीने धडपड करून भिंतीचं वरचं टोक गाठलं व मग सरपटत तो माणूस भिंतीवरून खाली आला. त्या पाठोपाठच केसाळ टोपी घातलेलं एक दुसरं डोकं दिसू लागलं व अस्पष्टपणे एका माणसाची गाठो-ड्यासारखी आकृती खाली उतरून जमिनीवरून सरपटत पुढे गेली व



कोपऱ्याला वळसा घालून दिसेनाशी झाली. मिखाइलो रिबिन उठून उभा राहिला, त्याने भोवताली नजर टाकली व मान हालवली...

"पळा, पळा!" आई कुजबुजली व तिने जमिनीवर पाय आपटला.

तिच्या कानात घण्ण् आवाज शिरला व जोरजोराने दिलेल्या आरोळ्या तिला ऐकू आल्या. भिंतीच्या वर एक तिसरं डोकं दिसू लागलं. आईने छाती घट्ट आवळून धरली व ती श्वास रोखून पाहू लागली. डोक्यावर पिंगट रंगाचे केस असलेल्या व मिसरूडही न फुटलेल्या एका कोवळ्या मुलाचं तोंड भिंतीवरून दिसू लागलं; पण कुणाच्या तरी पकडीतून सुटका करून घेतल्यासारखं अचानकच ते वर आलं व तितक्याच अचानकपणे भिंतीच्या मागेच पुनः अदृश्य झालं. आतल्या आरोळ्या व शिट्ट्यांचे कर्कश आवाजही हवेत घुमू लागले.

रिबिन ह्या वेळेपर्यंत भिंतीचं अंतर ओलांडून गेला होता. तिच्या अंगावरून पुढे जाऊन तुरुंग व शहरातली घरं यांच्यामधलं मैदानही त्याने ओलंडलं होतं. आईला वाटलं, आता त्यानं आणखी जलद चालायला पाहिजे व आपलं डोकं इतकं वर न उचललं पाहिजे! त्याचा चेहराही असा होता की एकदा पाहिल्यावर तो कुणी विसरू शकलं नसतं.

तुरुंगाच्या भिंतीच्या पलिकडल्या भागाला काहीतरी पडल्याचा व काचा फुटल्याचा आवाज तिच्या कानांत शिरला. पलिकडच्या त्या दोघा शिपा-यांपैकी एक जण जमिनीवर पाय रोवून घोड्याला बांधलेली दोरी खेचत होता. दुसऱ्या शिपायाने तोंडाला हात लावून तुरुंगाच्या दिशेने आरोळी ठोकणं सुरू केलं होतं. मग त्याने ओरडणं थांबवून आपल्या हाकेला काय उत्तर येतं ते ऐकण्यासाठी हवेच्या दिशेने कान टवकारले.

आई चिंतातुर नजरेने भोवताली पाहात होती. सगळीकडे वळून पहात असता तिच्या डोळ्यांना सर्व काही दिसत होतं, पण तिला काहीच खरं वाटत नव्हतं. ही घटना विलक्षण गुंतागुंतीची, रहस्यमय व अत्यंत धोक्याची असणार अशी तिने मनाशी कल्पना केली होती, पण तो सर्व प्रकार इतका साधा व झटपट घडून आलेला पाहून ती स्तिमित होऊन तिचा मेंदू बधिर झाला होता. रिबिन केव्हाच अदृश्य झाला होता. आता लांब कोट घेतलेला एक उंच माणूस रस्त्याने जात होता व एक तरुण मुलगी त्याच्यापुढे पळत होती.

इतक्यात तुरुंगाच्या कोपऱ्याकडून तीन पहारेकरी पळत येताना दिसले.

ते एकमेकांच्या जवळून धावत होते व तिघांनीही आपापले उजवे हात लांब केलेले होते. त्यांना पाहून त्या दोन शिपायांपैकी एक जण त्यांना भेटायला धावत निघाला. दुसरा शिपाई घोड्याभोवती फेर धरून त्याच्या पाठीवर उडी मारून स्वार होण्याचा प्रयत्न करू लागला, पण त्या अवखळ जनावराने उंच उडी मारली व त्याबरोबर भोवतालच्या सर्वच वस्तू हवेत उडाल्याचा भास झाला.

आता शिट्ट्याचे कर्कश आवाज फारच जोराने व लागोपाठ ऐकू येऊ लागले होते. त्या अतिकर्कश आवाजाने आई भानावर आली व तिला त्या संकटाची एकदम तीव्रतेने जाणीव झाली. तिचं अंग शहारलं व ती स्मशान-भूमीच्या कुंपणाच्या कडेने चालू लागली. तिची नजर त्या पहारेकऱ्यांकडे लागली होती, पण क्षणार्धातच ते तिघेजण व दोघे शिपाईसुद्धा तुरुंगाच्या दुसऱ्या कोपऱ्याआड अदृश्य झाले. त्यांच्यापाठोपाठच एक माणूस अंगातल्या कोटाच्या गुंड्याही न लावता गडबडीने धावत चाललेला दिसला. तो तुरुंगाचा दुय्यम अधिकारी होता हे तिने तेव्हाच ओळखलं.

वाऱ्याचं थैमान सुरूच होतं. तो जणू काय हर्षोन्माद झाल्याप्रमाणे गिरक्या घेत होता. तोच वारा दूरवरच्या आरोळ्यांचे व शिट्ट्यांचे तुटक आवाज तिच्या कानांत आणून सोडीत होता...

त्या सर्व गोंधळ–गडबडीने आई हर्षित झाली व त्या आनंदाच्या भरात ती लगबगीने पाय उचलू लागली.

"त्याला सुद्धा हे सहज करता आलं असतं," ती स्वतःशीच म्हणाली.

अचानकपणे दोन पोलिस शिपाई कोपऱ्याला वळसा घालून पळत आले.

"थांब, ए!" त्यांच्यापैकी एक जण धापा टाकीत ओरडला. "एक माणूस जाताना पाहिला का? असा–दाढीवाला? –"

तिने बागेच्या दिशेने बोट दाखवलं व ती शांतपणे म्हणाली,

"त्या तिकडे पळाला–पण का?"

"येगोरोव! शिट्टी वाजव!"

आई घरी जायला निघाली. ती मनातून कष्टी झाली होती. तिचं अन्तःकरण कटुतेने व दुःखाने व्यापलं होतं. ती त्या इमारती ओलांडून पलिकडच्या रस्त्यावर पोचल्यावर एक घोडागाडी तिच्या बाजूने गेली. तिने आत पाहिलं, पिंगट रंगाच्या मिशा असलेला, थकल्याभागल्या चेहऱ्याचा एक तरुण माणूस आत होता. त्यानेही तिला पाहिलं. तो एका बाजूला



वळून बसलेला होता, त्यामुळे त्याचा उजवा खांदा डाव्या खांद्यापेक्षा उंच दिसत होता.

घरी पोचल्यावर निकोलायने तिला दार उघडलं. तिला पाहून त्याला फार आनंद झाला व त्याने विचारलं,

"काय? काय झालं मग?"

"सगळं नीट पार पडलं."

मग तिने शक्य तेवढा सर्व तपशील आठवून झालेल्या प्रकाराचं वर्णन केलं. पण ते सांगताना आपण दुसऱ्याच कोणीतरी सांगितलेली हकीकत सांगत आहोत असं तिला वाटत होतं. स्वतः सांगितलेल्या हकीकतीवर तिचाच विश्वास बसत नव्हता.

"नशिबाने आपल्याला साथ द्यायचं ठरवलेलं दिसतंय," निकोलाय हातावर हात चोळीत उद्‌गारला. "तुम्ही कशा सुखरूप परत येणार याची मला किती काळजी लागली होती म्हणून सांगू? बरं, ऐका, निलोव्ना, तुम्ही माझं ऐका न् त्या खटल्याची धास्ती बाळगणं पण सोडून द्या. जितक्या लवकर खटला सुरू होईल तितक्या लवकर पावेल मोकळा होईल. कदाचित् हद्दपारीवर नेलं जात असतानासुद्धा तो निसटेल. अन् खटल्याचं विचाराल तर ते असं असतं की–"

मग खटला कसा चालतो ते तो सांगू लागला. तो बोलत असताना तिच्या हे लक्षात आलं की तो आपलं समाधान करण्याचा प्रयत्न करीत असला तरी त्याला स्वतःलाच कशाची तरी भीती वाटत होती.

"मी जे बोलायला नको असं भलतंच काहीतरी कोर्टात बोलून जाईन अशी भीती वाटतेय का तुम्हाला?" तिने अचानकपणे विचारलं. "किंवा काहीतरी मागणी करेन असं वाटतं का?"

तो ताडकन् उठला व तिच्या प्रश्नाबद्दल हाताने नापसंती व्यक्त करीत नाराजीच्या सुरात म्हणाला,

"अर्थात् नाही!"

"मला भीती वाटतेय हे खरंय. मी नाही म्हणत नाही. पण कशाची ते मात्र माझं मलाच समजत नाही."

ती बोलायची थांबून खोलीत भिरभिरा नजर फिरवू लागली.

"कधी कधी मला भीती वाटते की ते पावेलवर खसकन् ओरडतील,

अन् म्हणतील, 'ए नांगऱ्या! ए किसामाच्या कार्ट्या! काय विचार आहे तुझा!' पावेल मोठा स्वाभिमानी पोरगा आहे, तो त्यांचं ऐकून न घेता उलटून बोलणारच. नाहीतर आंद्रेइ ताडकन् काहीतरी फटकळासारखं बोलेल. त्यांचे इतर सहकारीही तापट आहेतच. मग त्या लोकांना हे त्यांचं बोलणं सहन न होऊन त्यांनी त्यांना दुसरीच सजा दिली तर? मग आपल्याला ते पुनः दिसायचे सुद्धा नाहीत!"

निकोलायने काहीच उत्तर दिलं नाही. त्याने कपाळावर आठ्या चढवून दाढीशी चाळा सुरू केला.

"खरंच कितीही प्रयत्न केला तरी अशा कल्पना माझ्या डोक्यात येतच राहातात," ती हलक्या आवाजात सांगू लागली. "त्यामुळेच त्या खटल्याला मी एवढी घाबरते. एकदा का सगळी नीट चौकशी करून त्याचं महत्त्व काय हे मोजमाप त्यांनी केलं, की–खरंच, किती भयंकर! त्या शिक्षेपेक्षा मला खटल्याचीच खरी भीती वाटते! कसं सांगावं तेही कळत नाही मला–"

तिला काय वाटत होतं ते निकोलायच्या ध्यानात येत नव्हतं हे तिला चक्क दिसत होतं व त्यामुळे आपली भीती शब्दांनी व्यक्त करणं तिला अधिकच बिकट जात होतं.

## २४

तिची भीती आतल्या आत वाढत होती व त्यामुळे तिचा कोंडमारा सुरू होता. खटल्याच्या दिवशी ती कोर्टात गेली तेव्हा तर तिच्या अंगी मान वर करून पाहाण्याचं किंवा ताठ चालण्याचंही त्राण उरलं नव्हतं.

कारखान्यांच्या वसाहतीतील ओळखीच्या लोकांनी तिला अभिवादन केलं, पण गर्दीतून वाट काढता काढता ती फक्त मानेने त्याचा स्वीकार करून पुढे निघाली. बाहेर व्हरांड्यात व कोर्टाच्या खोलीतही तिला खटल्यातील आरोपींचे नातेवाईक भेटले. ते लोक हलक्या आवाजात बोलत होते. तिला वाटलं, हे सगळे शब्द निरर्थक आहेत. तिला त्या शब्दांपासून काही बोधही होत नव्हता. सर्वांचं दुःख एकच होतं. आईला ती जाणीव होऊन ती अधिकच कष्टी झाली.



"बसा की," म्हातारा सिझोव आपल्या बाकावर सरकून तिला जागा करून देत म्हणाला.

ती निमूटपणे तिथं बसली व आपले कपडे नीट करीत भोवताली नजर फिरवू लागली. तिच्या डोळ्यांपुढे लालहिरवे ठिपके व पट्टे व बारीक पिवळ्या रेषा नाचू लागल्या.

"तुमच्या मुलानेच आमच्या ग्रिशाला या चळवळीत ओढलं," तिच्या शेजारीच बसलेली बाई तिला उद्देशून पुटपुटली.

"बडबड बंद कर पाहू, नाताल्या!" सिझोव तिरसटपणे म्हणाला.

आईने त्या बाईकडे पाहिलं. ती सामोइलोवची आई होती. तिच्या शेजारी तिचा नवरा बसला होता. त्याच्या डोक्याला टक्कल असलं तरी तो दिसायला चांगला होता. त्याचा चेहरा उभट न् बारीक होता व पिंगट रंगाची दाढी त्याच्या छातीवर रुळत होती. तो डोळे बारीक करून समोर टक लावून पाहात होता व त्याची दाढी हालत होती.

त्या खोलीच्या भिंतीत उंच जागी असलेल्या खिडक्यांवर बाहेरच्या बाजूला बर्फ साचलं होतं. व त्यातून मंद प्रकाश आत येत होता. चकाकणाऱ्या सोनेरी चौकटीत मढवलेली झार बादशहाची तसबीर खिडक्यांच्या मधोमध होती व खिडक्यांना लावलेल्या जाड रेशमी पडद्यांच्या टोकांनी तसबिरीच्या दोन्ही बाजू झाकल्या गेल्या होत्या. तसबिरीच्या समोर एक भलंमोठं मेज होतं. जवळजवळ दोन्ही भिंतींना भिडलेल्या त्या मेजावर उंची हिरवा कपडा पसरलेला होता. उजव्या बाजूच्या भिंतीशी एका आडव्या कठड्याच्या मागे दोन लाकडी बाक ठेवलेले होते व डाव्या बाजूच्या भिंतीशी दोन ओळीत जाड गाद्या असलेल्या आरामखुर्च्या ठेवलेल्या होत्या. हिरव्या कॉलरी व सोन्याच्या गुंड्या असलेल्या पोषाखाचे चोपदार गुपचाप इकडून तिकडे हिंडत होते.

लोकांची कुजबुज व औषधाचा वास यामुळे तिथलं आधीचंच कुंद वातावरण अधिकच कुंद भासत होतं. ते रंगीबेरंगी चकचकीत वातावरण, तिथले आवाज, वास, हे सर्व आईच्या नेत्रांना व कानांना खुपत होतं व तिच्या श्वासोच्छ्वासाबरोबर तिच्या रोमरंध्रांत भिनून जाऊन कसल्यातरी नसत्या भीतीने ती व्याकुळ होत होती.

अचानक कुणीतरी मोठ्या आवाजात काही तरी बोललं. आई दचकली

व बाकी सगळेजण उभे राहिलेले पहाताच तीही सिझोवचा हात धरून उभी राहिली.

डाव्या बाजूचं एक उंच दार उघडलं गेलं व एक चष्मा घातलेला वृद्ध गृहस्थ हळूहळू आत आला. त्याच्या सुरकुत्या पडलेल्या गालांवर पांढऱ्या केसांच्या कल्ल्यांची बारीक टोकं रुळत होती. त्याचा श्मश्रू केलेला वरचा ओठ दंतहीन तोंडावर दाबलेला होता. त्याची हनुवटी व जबडा त्याच्या कोटाच्या कॉलरवर असा गच्च बसलेला होता की मध्ये मान जणू नाहीच असा भास होत होता. तो एका राकट, वाटोळ्या व तुकतुकीत चेहऱ्याच्या तरुण माणसाच्या आधाराने चालत होता. त्यांच्या मागोमाग सोनेरी किनारीचा गणवेष घातलेले तिघेजण व साधा मुलकी पोषाख केलेले तिघेजण येत होते.

ते लोक त्या लांब मेजाशी बसले. त्या बसण्यातच बराच वेळ गेला. ते झाल्यावर मग एक बिनदाढीचा व रुक्ष चेहऱ्याचा इसम वाकून आपले गुबगुबीत ओठ हालवीत त्या वृद्ध गृहस्थाला हलकंच काही सांगू लागला. तो वृद्ध गृहस्थ ते ऐकत असता अगदी ताठ व निर्विकार चेहऱ्याने बसला होता व त्याच्या चष्म्याच्या भिंगांच्या मागे दोन रंगहीन ठिपके लुकलुकत होते.

त्या मेजाच्या एका टोकाशी लिहिण्याचं मेज होतं, त्यापाशी एक उंच, अर्धवट टक्कल पडलेला गृहस्थ कागदपत्र चाळीत बसला होता व तो सारखा खाकरत होता.

तो वृद्ध गृहस्थ पुढे वाकून बोलू लागला. त्याचे सुरवातीचे शब्द स्पष्ट उच्चारलेले होते, पण नंतर तो बोलला ते इतकं भरभर की त्याचा स्पष्ट बोध होणं कठीणच होतं.

"मी असं जाहीर करतो... त्यांना हजर करा..."

"बघा!" सिझोव कोपराने आईला हालवीत व स्वतः उभा राहात पुटपुटला.

कठड्यापाठीमागचं दार उघडलं गेलं. एक नंगी समशेर घेतलेला शिपाई पुढे आला व त्याच्यापाठोपाठ पावेल, आंद्रेइ, फ्योदोर माझिन, दोघे गुसेव बंधू, सामोइलोव, बुकिन, सोमोव, व आईला ज्यांची नावं माहीत नव्हती असे पाच जण आत आले. पावेलने आईकडे पाहून स्मित केलं. आंद्रेइने हसून मान हालवली. त्यांचं ते स्मित व हसतमुख चेहरे व हावभाव यामुळे कोर्टातलं उदास, कृत्रिम, वातावरण काहीसं निवळलं. सोनेरी किनारीचा



झगमगाटही मागे पडला. आरोपींनी ज्या आत्मविश्वासाने व तडफदारपणे आत प्रवेश केला त्यायोगे आईलाही पुनः धीर वाटू लागला. मागच्या बाकांवरचे लोक इतका वेळ थंड बसले होते त्यांच्यातही कुजबुज सुरू झाली.

"ते मुळीच घाबरले नाहीत बरं का!" सिझोव पुटपुटला. सामोइलोवच्या आईचीही चुळबुळ सुरू झाली.

"हं, बोलणं बंद!" कडक आवाजात इशारा आला.

"मी ताकीद देतो..." वृद्ध गृहस्थ म्हणाला.

पावेल व आंद्रेइ समोरच्याच बाकावर जवळजवळ बसले होते. माझिन, सामोइलोव व गुसेव बंधू त्यांच्या शेजारी त्याच बाकावर होते. आंद्रेइने दाढी काढून टाकली होती व मिशा वाढविल्या होत्या. त्या खाली लोंबत होत्या त्यामुळे त्याचा वाटोळा चेहरा एखाद्या मांजरीच्या तोंडासारखा दिसत होता. त्याचा चेहराही निराळाच भासत होता. त्याची जिवणी अधिक रेखीव दिसत होती व त्याची नजर खाली वळलेली होती. माझिनच्या वरच्या ओठावर एक काळी रेषा उमटली होती व त्याचा चेहरा वाटोळा दिसू लागला होता. सामोइलोवचे केस पूर्वीसारखेच कुरळे होते व इवान गुसेवच्या चेहऱ्यावर पूर्वीप्रमाणेच हास्य विलसलं होतं.

"ए, फ्योदोर, फ्योदोर!" सिझोव घोगऱ्या आवाजात पुटपुटला.

तो वृद्ध गृहस्थ आरोपींना उद्देशून, पण त्यांच्याकडे न पाहाताच तोंडातल्या तोंडात पुटपुटत काही प्रश्न विचारीत होता. त्याची मानही त्याच्या कॉलरवर कडक व निश्चल बसलेली होती. पावेलने शांतपणे त्या प्रश्नांना जी अगदी मोजकी उत्तरं दिली ती ऐकून आईला वाटू लागलं की मुख्य न्यायाधीश व त्याचे दुय्यम यांना आपल्या मुलाशी दुष्टपणाने वागणं शक्यच होणार नाही. खटल्याच्या निकालाविषयी अंदाज बांधण्याच्या उद्देशाने ती त्या भल्या मोठ्या टेबलाच्या मागे बसलेल्या लोकांचे चेहरे न्याहाळून पाहू लागली तशी तिला आपल्या अन्तःकरणात आशेचा उदय झाल्याची जाणीव होऊ लागली.

त्या तुकतुकीत चेहऱ्याच्या अधिकाऱ्याने एक कागद वाचून दाखवला. तो त्याने असा निर्विकारपणे व कंटाळवाण्या पद्धतीने वाचला की श्रोतृसमुदायातील लोक स्तिमित होऊन बघतच राहिले. मग चार वकील जोरजोरात आरोपींशी काही बोलू लागले. त्यांच्या हालचाली इतक्या जोरदार

व झटपट होत्या की आईला तिने पाहिलेल्या मल्यामोठ्या काळ्या पक्ष्यांची आठवण झाली.

त्या वृद्ध गृहस्थाच्या एका बाजूच्या आरामखुर्चीवर एक गलेलठ्ठ न्यायाधीश कसाबसा शरीर आकुंचित करून बसला होता. त्याचे इवलाले डोळेसुद्धा त्याच्या गुबगुबीत, मांसल चेहऱ्यात अदृश्य झाले होते. वृद्ध गृहस्थाच्या दुसऱ्या बाजूला एक गोल खांद्याचा न्यायाधीश बसला होता. त्याचा चेहरा फिकट होता व त्याच्या पिंगट मिशांचे लांब आकडे वळवलेले होते. त्याने गळून गेल्याप्रमाणे आपलं डोकं खुर्चीच्या पाठीवर टेकवलेलं होतं व डोळे अर्धवट मिटून त्याने आपल्या विचारांना मोकाट सोडलं होतं. सरकारी वकिलाचा चेहराही गळून गेल्यासारखा व संत्रस्तच दिसत होता.

न्यायाधीशांच्या मागच्या रांगेत बसलेल्या तिघांतला एक शहराचा नगराध्यक्ष होता. तो चांगला धष्टपुष्ट व रुबाबदार माणूस होता व सारखा आपल्या हातांनी गाल थोपटीत बसला होता. दुसरा दरबारचा अधिकारी होता. त्याचे केस पांढरे झालेले पण गाल लालबुंद होते; त्याला लांब दाढी होती व त्याच्या डोळ्यांत भलेपणाची चमक होती. तिसरा होता तो जिल्हाप्रमुख. त्याचं पोट फारच सुटलेलं होतं, त्याचा त्यालाच त्रास होत असावा, कारण तो सारखा आपल्या कोटाच्या टोकांनी पोट झाकण्याचा प्रयत्न करीत होता व ती टोकं सारखी बाजूला निसटून जात होती.

"इथं कोणी गुन्हेगार नाहीत व कोणी न्यायाधीशही नाहीत." पावेल गंभीरपणे म्हणत होता. "इथं फक्त आम्ही बंदिवान व आम्हाला बंदीत टाकणारे लोक आहेत."

सगळीकडे एकदम स्तब्धता पसरली. काही क्षण तर आईला भराभर चालणाऱ्या लेखणीचा आवाज व तिच्या स्वतःच्या हृदयाची धडधड याखेरीज काहीच ऐकू आलं नाही.

मुख्य न्यायाधीश सुद्धा काय होतं त्याची वाट पहात ऐकतच राहिला. त्याचे दुय्यम चुळबुळ करू लागले. अखेर तोच म्हणाला,

"हं... आंद्रेइ नाखोद्का! तुला आपला गुन्हा कबूल आहे का?"

आंद्रेइ सावकाश उठून उभा राहिला, त्याने खांदे उडवले, मिशांच्या टोकांना पीळ भरला व आपल्या भुवया आकुंचित करून त्या वृद्ध गृहस्थाकडे पाहिलं.

"मला गुन्हा कबूल असण्याचा प्रश्नच कुठं येतो?" त्याने खांदे उडवून



आपल्या कर्णमधुर आवाजात सावकाश उत्तर दिलं. "मी कुणाचा खून केला नाही की कसली चोरी केली नाही. ज्या समाजपद्धतीमुळे लोक परस्परांना लुबाडण्याला व जीव घेण्याला उद्युक्त होतात त्या समाजरचनेला माझा विरोध आहे इतकंच."

"उत्तरं थोडक्यात न् आटोपशीर हवीत!" वृद्ध गृहस्थाने काहीशा प्रयासाने बजावलं.

मागच्या बाकावर कुजबुज सुरू झाली. लोक आपापसांत कुजबुजू लागले व त्यांची हालचाल सुरू झाली. त्या तुकतुकीत चेहऱ्याच्या इसमाने जे शब्दजाल विणून त्यात त्यांना अडकवून ठेवलं होतं त्यातून जणू त्यांची आता मुक्तता झाली होती.

"ते काय म्हणतात ते ऐकलं?" सिझोव पुटपुटला.

"हं, फ्योदोर माझिन, उत्तर दे..."

"मी उत्तर देणार नाही!" ताडकन् उठून फ्योदोर म्हणाला. त्याचा चेहरा लाल झाला होता, त्याचे डोळे चकाकत होते, व का कुणास ठाऊक पण तो हात मागे बांधून उभा होता.

सिझोव आ वासून पाहातच राहिला. आईनेही आश्चर्याने डोळे विस्फारले.

"मी बचावासाठी वकील द्यायचं नाकारलं व आताही मी काही सांगणार नाही. हा खटलाच बेकायदेशीर आहे असं मी मानतो. तुम्ही कोण? तुम्हाला जनतेने आमचा निवाडा करण्याचा अधिकार दिला आहे का? नाही, जनतेने तुम्हाला तो अधिकार दिलेला नाही! म्हणून मलाही तुमचा अधिकार मान्य नाही!"

तो खाली बसला व त्याचा लालबुंद चेहरा आंद्रेइच्या खांद्याआड दिसेनासा झाला.

लठ्ठ न्यायाधीशाने सरन्यायाधीशाकडे पाहून मान डोलावली व त्याच्या कानात काहीतरी सांगितलं. दुसऱ्या बाजूच्या फिकट चेहऱ्याच्या न्यायाधीशाने डोळे उघडले, आरोपींकडे एक ओझरता दृष्टिक्षेप टाकला व समोर पडलेल्या कागदावर पेन्सिलीने काहीतरी खरडलं. जिल्हाधिकाऱ्याने मस्तक हालवलं व आपलं पोट गुडघ्यावर टेकवण्यासाठी पाय सरकवून पोट हातांनी झाकून घेतलं. वृद्ध गृहस्थाने आपलं मस्तक ताठ ठेवून फक्त आपलं शरीर त्या फिकट चेहऱ्याच्या न्यायाधीशाच्या बाजूला वळवलं व आवाज न होऊ देता

ओठांची हालचाल केली. त्या फिकट चेहरेवाल्याने मस्तक लववून मान्यता दर्शवली. दरबारच्या अधिकाऱ्याने सरकारी वकिलाला काही तरी सांगितलं ते ऐकण्यासाठी नगराध्यक्ष महाशयांनी कान टवकारले. अर्थात ते ऐकता ऐकता त्यांचं हाताने गाल थोपटणं सुरू होतंच. मग पुन: सरन्यायाधीश महाराजांचं नीरस स्वरातलं बोलणं सुरू झालं.

फ्योदोरच्या उद्गारांनी चकित झालेला सिझोव आईला म्हणाला, "ऐकलं ना कसं सुनावलं त्याने? खरंच तोच सगळयात जोरदार निघाला!"

आईने स्मित केलं, पण ती बुचकळयात पडली होती. तिच्या लेखी आत्ता जे जे घडत होतं ते म्हणजे लवकरच घडून येणाऱ्या भयंकर गोष्टीची नुसती कंटाळवाणी सुरुवात होती व त्या पुढे होणाऱ्या घटनेच्या अमानुष क्रौर्याखाली ते सर्व चिरडले जाणार होते. पण पावेल व आंद्रेइचे शब्द इतके निर्भयपणे व खंबीरपणे उच्चारलेले होते की या कोर्टाच्या खोलीऐवजी कामगार वस्तीतल्या लहानशा घरातच ते दोघे बोलत असल्यासारखे आईला वाटलं. फ्योदोरने काढलेल्या आवेशपूर्ण उद्गारांनी तीही उत्तेजित झाली या खटल्यात काहीतरी जोरदार, बहादुरीचे प्रकार घडून येत असल्याचं दिसून येऊ लागलं होतं व तिच्या मागे बसलेल्या मंडळीतही खळबळ माजली होती, तीवरून पाहाता ही जाणीव झालेली ती एकटीच नव्हती हेही उघड होतं.

"तुमचं मत काय आहे?" वृद्ध गृहस्थाने विचारलं.

डोक्याला टक्कल पडलेला सरकारी वकील उठून उभा राहिला. मेजावर एक हात टेकून त्याने भराभर बोलण्याला सुरुवात केली. त्याच्या भाषणात आकडयांची रेलचेल होती, परंतु त्याच्या आवाजात भीतिदायक असं काहीच नव्हतं.

तरीसुद्धा आईला आपल्या हृदयात सारखं काहीतरी खुपत असल्यासारखं वाटत होतं. तिला अशी अस्पष्ट जाणीव होती की त्या वातावरणात एखादी दुष्ट शक्ती वावरत आहे, ती एकदम मुठी वळून वसकन् अंगावर येत नाही, परंतु नकळत व अदृश्यपणे ती भयानक रूप धारण करीत आहे. न्याया-धीशांच्या भोवतालचं वातावरणही त्या शक्तीने भारून टाकलं होतं व असं काही दाट वलय त्यांच्याभोवती निर्माण केलं होतं की त्याबाहेर घडणाऱ्या घटनांचा यत्किंचितही संपर्क त्यांना पोचू शकत नव्हता. आईने त्या न्याया-धीशांकडे पाहिलं, पण तिला त्यांच्या अंतरंगाचा ठाव लागेना. तिला ते जसे



वागतीलसं वाटलं होतं, तसे ते मुळीच वागले नाहीत, ते पावेल व फ्योदोरवर रागावले नाहीत, त्यांनी त्यांचा उपमर्द केला नाही, व त्यांनी जे प्रश्न विचारले त्या प्रश्नांनाही त्यांच्या दृष्टीने फारसं महत्त्व असल्याचं दिसलं नाही. ते अगदी तटस्थपणे वागत होते, व प्रश्नांची उत्तरं ऐकून घेत होते ते सुद्धा जुलुमाचा रामराम असल्यासारखे! जणू त्यांना सर्व काही आधीच ठाऊक होतं व कोर्टात काहीही झालं तरी त्याला काही अर्थ नव्हता.

आता एका पोलिसाची साक्ष सुरू होती. तो खणखणीत आवाजात सांगत होता,

"पावेल व्लासोवच या चळवळीचा मुख्य सूत्रधार आहे म्हणतात..."

"अन् नाखोद्काचं काय?" त्या लठ्ठ न्यायाधीशाने सुस्तपणे विचारलं.

"तो सुद्धा..."

वकिलांपैकी एकजण उठला.

"मी थोडं बोलू का?" त्याने विचारलं.

"काही हरकत उपस्थित करायची आहे का?" वृद्ध गृहस्थाने विचारलं.

न्यायाधीशांपैकी सगळयांच्याच तब्येती नादुरुस्त असाव्यात असं दिसत होतं. त्यांच्या वागणुकीत व आवाजात एक प्रकारची शिथिलता व्यक्त होत होती व त्यांच्या चेहऱ्यावरही तसलेच ढिलाईचे व कंटाळल्याचे भाव दिसत होते. आपले खास गणवेष, ते अवजड पोषाख चढवून कोर्टात बसणं, ते पोलिस, वकील, आरामखुर्च्यात बसून प्रश्न विचारणं व खटल्याचं कामकाज पाहाणं, —या सर्वच गोष्टींचा त्यांच्या मनावर एक प्रकारचा ताण पडत असावा हे स्पष्ट दिसत होतं.

आईच्या परिचयाचा पीतवर्ण पोलिस अधिकारी न्यायाधीशांसमोर उभा राहून साक्ष देऊ लागला. पावेल व आंद्रेइ यांसंबंधी त्याला जेवढी माहिती होती ती तो आपल्या भसाडया आवाजात सांगत होता.

त्याची साक्ष ऐकून आई स्वत:शीच उद्गारली, "अरे बाबा, फारसं काहीच माहीत दिसत नाही तर तुला!"

कठडयाच्या मागे उभ्या असलेल्या आरोपींकडे पाहाताना आता तिला त्यांची काळजी वाटत नव्हती व कीवही करावीशी वाटत नव्हती. त्यांची कीव करणं तिला शक्यच नव्हतं. त्यांच्याबद्दल आता फक्त ममता व विस्मय — अबोल विस्मय व तीव्र ममत्व हेच भाव तिच्या मनात निर्माण होत होते.

भिंतीला टेकून बसलेले ते सर्व आरोपी तरुण व दणकट होते; सा-

क्षीदार व न्यायाधीशांच्या नीरस बडबडीकडे किंवा वकीलमंडळींच्या सरकारी वकिलाशी सुरू असलेल्या वादाकडे त्यांचं बिलकुल लक्ष नव्हतं. मधूनच त्यांच्यापैकी कोणीतरी उपरोधिकपणे हसून आपल्या सहकाऱ्यांना उद्देशून काहीतरी बोले, व मग सर्वांच्याच चेहऱ्यांवर तसलं उपरोधिक हास्य क्षणभर उमटून नाहीसं होई. आदल्याच रात्री निकोलायकडे आलेला एक वकील आईने पाहिला होता, त्याच्याशी पावेल व आंद्रेइ सारखं काहीतरी हलक्या आवाजात बोलत होते. माझिन जरा इतरांपेक्षा अधिक अस्वस्थ व उत्तेजित झालेला दिसत होता व तो त्या वकिलाशी पावेल–आंद्रेइचं चाललेलं संभाषण लक्षपूर्वक ऐकताना दिसत होता. सामोइलोव मधूनच इवान गुसेवला काहीतरी सांगे व मग गुसेव त्याला कोपराने ढोसून स्वतःला येत असलेलं हसू दाबून टाकण्यासाठी इतका संयम करी की त्याचा चेहरा लालबुंद होऊन गाल फुगून येत व त्याला मान खाली घालणं भाग पडे. तरी दोनदा त्याचं हसू बाहेर फुटलंच व मग तो पुनः आत्मसंयमन करण्यासाठी म्हणून थोडा वेळ गप्प बसून राहिला. ते सगळे कैदी तरुणच होते व त्यांचं तारुण्य त्यांच्या संयमनाच्या प्रयत्नांना दाद न देता वारंवार उफाळून येत होतं.

सिझोवने हळूच आईच्या कोपराला स्पर्श केला. तिने वळून पाहिलं तर तो खूष झालेला पण काहीसा चिंतातुर दिसला.

"ही पोरं किती धीट आहेत पहा तरी!" तो कुजबुजला. "बड्या सरदारांचीच ऐट आपली आहे त्यांनी!"

कोर्टाचं काम सुरूच होतं. साक्षीदारांच्या झटझट संपणाऱ्या नीरस जबान्या व न्यायाधीशांचं मोठ्या नाखुषीचं व निर्विकार बोलणं, हे सर्व चालूच होतं. लठ्ठ न्यायाधीशाला सारख्या जांभया येत होत्या व आपला लठ्ठ, केसाळ हाताचा पंजा तोंडावर ठेवून तो त्या दाबून टाकत होता. लाल कल्लेवाला न्यायाधीश मघापेक्षाही फिक्कट दिसत होता व मधूनमधून तो कानशिलावर बोट दाबून आपली शून्य नजर आढ्याकडे लावून खिन्नपणे पहात होता. एखाद्या वेळी सरकारी वकील कागदावर काहीतरी खरडून दरबारच्या अधिकाऱ्याशी अगदी हलक्या आवाजात बोलू लागे व ते अधिकारी महाशय आपली करड्या रंगाची दाढी कुरवाळत, मोठाले चमकदार डोळे गरगरा फिरवीत व किंचित् हसून मानेची कमान करीत पाहू लागत. नगराध्यक्ष महाराज पायावर पाय ठेवून बसलेले होते व एका गुडघ्यावर बोटांनी ताल धरून त्या बोटांकडे न्याहाळून पाहात होते. जिल्हाधिकाऱ्याने



आपल्या पोटाचा नगारा गुडघ्यांवर टेकवून हातांनी झाकून ठेवलेला होता व बहुधा तिथं सुरू असलेली कंटाळवाणी भाषणं तो एकटाच ऐकत असावा. अर्थात् हवा अगदी पडलेली असताना हवेची दिशा दाखवणारं चक्र जसं निश्चल असतं, तितकेच निश्चल बसलेले सरन्यायाधीशही कदाचित् ती बडबड ऐकत असतील हे शक्य होतं.

हा सर्व प्रकार इतका वेळपर्यंत असाच चालला होता की श्रोत्यांना मनस्वी कंटाळा येऊन बसल्याबसल्या शरीरं बधिर झाल्यासारखी वाटू लागली होती.

मग सरन्यायाधीश उठून उभा राहून म्हणाला,

"मी जाहीर करतो की..."

त्याचे बाकीचे शब्द त्याच्या पातळ ओठांच्या आतच उच्चारले गेल्यामुळे कुणालाच नीट कळले नाहीत.

मग सुस्कारे, आश्चर्योद्गार, खोकला व पायांची खसखस ऐकू आली. कैद्यांना बाहेर नेण्यात आलं. जातेवेळी त्यांनी आपल्या आप्तेष्टांकडे व मित्रांकडे पाहून स्मित केलं व माना डोलावल्या.

"धीर सोडू नकोस्, येगोर!" इवान गुसेव ओरडून म्हणाला.

आई व सिझोव बाहेर व्हरांड्यात गेली.

"आपण उपहारगृहात जाऊन चहा घेऊ या का?" वृद्ध सिझोवने विचारलं. "आता चांगला दीड तास वेळ आहे."

"मला खरोखर काहीच नको आहे."

"मलाही नकोच आहे. बरं पण, या पोरांबद्दल काय म्हणाल तुम्ही? जणू पृथ्वीतलावर आहोत ते आपणच, इतरांना काहीच किंमत नाही, अशा रुबाबात बसलेले असतात! त्या फ्योदोरने तर कमाल केली!"

तितक्यात सामोइलोवचे वडील हॅट हातात धरून त्यांच्याजवळ आले.

"माझ्या ग्रिगोरीला पाहिलंत ना?" त्याने खिन्नपणे हसून म्हटलं. "त्याने बचावासाठी वकील देण्याचं साफ नाकारलं. तो वकिलांशी बोलायला सुद्धा तयार नाही! हे करणारा तो पहिलाच. तुमच्या मुलाचं मत वकील लावण्याच्या बाजूचंच होतं बरं का पेलाग्येया! पण माझा पोरगा ऐकायला तयार नाही! अन् त्याने नाही म्हटल्यावर आणखी चौघांनी त्याचंच अनुकरण केलं!"

त्याची बायको त्याच्याजवळ उभी होती. ती सारखी आपले अश्रू आवरून धरण्यासाठी डोळ्यांची उघडझाप करीत होती व रुमालाने नाक पुशीत होती.

"काय गंमत आहे पहा," सामोइलोव दाढी हातात धरून व जमिनीवर नजर खिळवून बोलू लागला. "या पोरांकडे पाहिलं म्हणजे असं वाटतं की निष्कारण बिचारे या भानगडीत पडले! पण पुनः असं वाटतं की, कुणी सांगावं, त्यांचंच म्हणणं खरं असेल! विशेषतः कारखान्यांत अशा लोकांची संख्या वाढत चालली आहे त्यावरून तर फारच वाटायला लागतं. पोलिस एकामागून एकाला पकडताहेत, तरीसुद्धा नदीतल्या माशांसारखी या लोकांची संख्या वाढतेच आहे! त्यामुळे त्यांची ताकद पुष्कळच असावी असं वाटायला लागतं."

"असल्या गोष्टींचा खरा अर्थ लावणं आपल्याला फारच कठीण आहे, स्तेपान पेत्रोविच!" सिझोव म्हणाला.

"हो; कठीण आहे हे तर खरंच!" सामोइलोवलाही ते म्हणणं पटलं.

"पण सगळे जण मेले आहेत कसे टंच!" त्याची पत्नी जोराने सूं सूं करीत उद्‌गारली व ती आपल्या गोबऱ्या चेहऱ्यावर हसू आणून आईकडे पाहू लागली.

"माझ्यावर नाराज होऊ नका अं, निलोव्ना!" ती आईला म्हणाली. "थोड्या वेळापूर्वी मी तुमच्या मुलाला दोष देत होते. पण सगळ्यात जास्त जबाबदार खरोखरच कोण आहे ते देवच जाणे! त्या पोलिसांनी न् गुप्त हेरांनी आमच्या ग्रिगोरीबद्दल काय सांगितलं ते ऐकलंत ना? त्याचाही वाटा त्यात आहेच! दिवटा कार्टा!"

तिला खरं म्हणजे आपल्या मुलाचा अभिमान वाटत होता, पण त्या गोष्टीची तिची तिलाच नीटशी कल्पना नव्हती. पण आईने तिच्या भावना ओळखल्या व म्हणून तिने तिच्याकडे पाहून प्रेमळ स्मित केलं व कळकळीने म्हटलं,

"सत्याची ओळख खरोखरी तरुणांनाच लवकर पटते..."

अनेक लोक व्हरांड्यात हिंडत होते. ते गटागटांनी उभे राहून हलक्या आवाजात पण उत्तेजित होऊन आपापसांत चर्चा करीत होते, एकटा असा बहुधा कोणीच नव्हता. सर्वचजण स्वतः बोलायला, प्रश्न विचारायला व दुसऱ्यांचं म्हणणं ऐकायला उत्सुक असल्याचं त्यांच्या चेहऱ्यांवरून दिसून येत होतं. भिंतींच्या मधल्या त्या अरुंद वाटेतून जणू काय जोरदार वाऱ्याने ढकलावं तसं ते इकडून तिकडे हिंडत होते व कशाचा तरी भक्कम आधार शोधत असल्यासारखे दिसत होते.



बुकिनचा मोठा भाऊ त्याच्यासारखाच गोरापान व उंच होता. तो जोराने हातवारे करून मोठ्या आवेशाने आपला मुद्दा प्रतिपादन करीत होता,

"तो क्लेपानोव नावाचा जिल्हाधिकारी आहे तो इथं काय म्हणून?"

"हं, कोन्स्तन्तिन, आता गप बस पाहू!" त्याचा ठेंगणा म्हातारा बाप तिथंच होता त्याने आजूबाजूला सावधगिरीने नजर टाकून पोराला दटावलं.

"काय म्हणून गप बसू मी? आपल्या एका कारकुनाच्या बायकोवर त्याची नजर होती म्हणून गेल्या वर्षी त्याने त्या कारकुनाला ठार केलं अन् आता त्या बाईला त्याने आपल्या घरात आणून ठेवली आहे असं सगळेच लोक बोलतात! या प्रकाराला काय नाव द्याल तुम्ही? शिवाय तो पक्का चोर आहे हे सुद्धा सर्वांनाच ठाऊक आहे..."

"ए बाबा! कोन्स्तन्तिन! कृपा करून गप राहा ना!"

"बरोबर!" सामोइलोव म्हणत होता. "अगदी बरोबर! खटल्याचं काम निःपक्षपातीपणाने चाललंय असं म्हणता येणार नाही—"

त्याचं बोलणं ऐकून बुकिन तिथं आला व त्याच्या मागोमाग इतरही बरेच जण आले. त्याचा चेहरा लाल झाला होता व तो जोरजोराने हातवारे करून बोलतच होता,

"खून नाहीतर चोरीचा खटला असेल तरी सुद्धा ज्यूरी नेमतात— शेतकरी, शहरचे लोक, अधिकारी सगळे ज्यूरीत असतात. पण अधिकाऱ्यांच्या विरुद्ध चळवळ करणाऱ्यांवरचा खटला असला म्हणजे मात्र हे अधिकारी स्वतःच खटला चालवायला बसतात! याला काय म्हणाल तुम्ही? समजा, तुम्ही माझा अपमान केला म्हणून मी तुम्हाला एक ठोसा लगावला, पण कोर्टात जर तुम्हीच न्यायाधीश बनलात तर अर्थात् तुम्ही मलाच गुन्हेगार ठरवाल. पण पहिला गुन्हा करणारे कोण? अर्थात् तुम्हीच!"

एक पांढऱ्या केसाचा, आकड्यासारख्या नाकाचा, छातीवर पुष्कळ बिल्ले लावून मिरवणारा पहारेकरी गर्दी हटविण्यासाठी पुढे सरसावला व बुकिनकडे बोट करून त्याने दटावलं,

"ए! ओरडू नकोस! ही काय धर्मशाळा समजलास की काय!"

"हो, हो! ते समजतंय मला! पण समजा, मी तुम्हाला मारलं न् मीच न्यायाधीश असलो तर काय..."

"तुला आता इथून बाहेरच घालवून द्यावं लागेलसं दिसतंय!" पहारेकऱ्याने दम भरला.

"मला बाहेर घालवणार? काय म्हणून?"

"आरडाओरडा केल्याबद्दल! रस्त्यावर नेऊन सोडू तुला!"

बुकिनने आसपास उभ्या असलेल्या लोकांकडे पाहिलं व तो खालच्या आवाजात उद्गारला,

"बस! लोकांची तोंडं बंद पाडणं, एवढं एकच ठाऊक आहे त्यांना!"

"हो तर! दुसरं काय वाटलं होतं तुला?" तो म्हातारा पहारेकरी चिडून म्हणाला.

बुकिनने खांदे उडवले व आपल्या स्वरात मार्दव आणून तो बोलू लागला,

"अन् सगळ्या लोकांना हजर राहायला का परवानगी नसावी? फक्त नातेवाईकच का? तुम्ही जर खटला न्यायाने चालवणार असाल तर सर्वांना येऊ द्या की ऐकायला! तुम्हाला एवढी भीती कशाची वाटते?"

"हा खटला न्यायाने चाललेला नाही हे स्पष्टच आहे!" वृद्ध सामोइलोवने ठामपणे सांगितलं.

निकोलायने त्या खटल्याबद्दल जे आधीच सांगितलं होतं ते आता आईला सांगावंसं वाटलं. पण एक तर तिला ते सगळं नीट समजलं नव्हतं व शिवाय जे ऐकलं, त्यातलेही काही शब्द ती विसरून गेली होती. ते शब्द आठवण्याचा प्रयत्न करीत ती तेथून निघाली. चालता चालता तिला एक बारीक मिशांचा तरुण इसम आपल्याकडे पाहात असलेला दिसला. त्याने उजवा हात पाटलोणीच्या खिशात खुपसलेला होता व त्यामुळे त्याचा डावा खांदा उजव्या खांद्यापेक्षा कमी उंच दिसत होता. ही विशिष्ट लकब तिला ओळखीची वाटली. पण तिने लगेच त्याच्याकडे पाठ वळवली व आपल्याच विचारात निमग्न झाल्यामुळे तिला त्याचा विसरही पडला.

पण एका मिनिटाने कोणीतरी हळूच काही तरी विचारीत असल्याचं तिच्या कानी आलं.

"तीच?"

"होय," उत्तर.

तिने वळून पाहिलं. एक खांदा वर उचललेला तो इसम लांडा कोट व लाँग बूट घातलेल्या एका काळ्या दाढीवाल्या इसमाशी बोलत होता.

ती जरा अस्वस्थ झाली. आपण याला कुठं पाहिलं असावं हे आठवण्याचा ती प्रयत्न करू लागली. पण तिला ते आठवलं नाही ते नाहीच.



आपल्या मुलाच्या चळवळीबद्दल लोकांशी बोलावं असं तिला फार जोरात वाटत होतं. ते त्याविरुद्ध काय बोलतात ते समजलं म्हणजे खटल्याचा अंदाज करता येईल असा तिचा तर्क होता.

"ही काय खटला चालवण्याची रीत झाली?" ती हताशपणे सिझोवला म्हणाली. "कोणी काय केलं याची चौकशी करण्यातच ते सगळा वेळ घालवताहेत. त्यांनी जे केलं ते का, कशासाठी, हे ते पाहातच नाहीत! अन् ते आहेतही सगळेच म्हातारे! तरुणांचा खटला चालवायला तरुण लोकच हवेत!"

"खरंच आहे तुमचं म्हणणं!" सिझोव म्हणाला. "आपल्यासारख्यांना ते समजणं फार, फारच जड जातं."

इतकं बोलून त्याने विचारमग्न होत मान डोलावली.

पहारेकऱ्याने कोर्टाचं दार उघडलं.

"नातेवाईक मंडळी! प्रवेशपास दाखवा!" तो ओरडला.

"प्रवेशपास म्हणे!" एकजण खवचटपणे उद्गारला. "सर्कसच आहे जणू!"

लोक जरासे चिडलेलेच दिसत होते. यावेळी वातावरण इतकं तंग नव्हतं, लोक मघापेक्षा जास्त बोलत होते व पहारेकऱ्याशी सारखा वाद घालीत होते.

## २५

सिझोव बाकावरच्या आपल्या जागेवर बसत काहीतरी पुटपुटला.

"काय म्हटलंत?" आईने विचारलं.

"काही विशेष नाही. मी एवढंच म्हटलं की लोक मूर्ख आहेत..."

खण्ण् घंटा वाजली.

"गडबड बंद!"

न्यायाधीश मंडळी मघाच्याच क्रमाने आत येऊन आपापल्या जागेवर बसेपर्यंत सर्वजण उभे राहिले.

आरोपींना आत आणून त्यांच्या जागांवर बसविण्यात आलं.

"आता नीट ऐका अं!" सिझोव हलक्या आवाजात म्हणाला, "सरकारी वकील आता भाषण करणार आहे."

आता नक्कीच काही अनिष्टकारक घडणार अशा अंदाजाने आईने पुढे वाकून कान टवकारले.

सरकारी वकील न्यायाधीशांच्या उजव्या बाजूला, त्यांच्याचकडे तोंड करून, एक कोपर मेजावर टेकून उभा राहिला. त्याने एक दीर्घ श्वास घेतला, उजवा हात सफाईने हवेत फिरविला व मग भाषणाला प्रारंभ केला. त्याचे सुरुवातीचे शब्द आईला आकलन झाले नाहीत. त्याचा आवाज घोगरा व संथ होता, पण मधूनमधून तो भराभर बोलू लागे व कधी कधी अचानक त्याची गती मंद होई. थोडा वेळपर्यंत त्याची वाक्यं अगदी जड, कष्टाने उच्चारल्यासारखी मंद येऊ लागत, तर मग एकदम खडीसाखरेच्या खड्या-भोवती माशा घोंघाव्या तशी झपाझप गिरक्या घेत ती बाहेर पडत. पण त्यात दुष्ट, अमानुष असं आईला आढळलं नाही. ते शब्द बर्फाप्रमाणे थंड भासत होते; राखेप्रमाणे त्या खोलीच्या वातावरणात पसरत होते व धुळीच्या अगदी सूक्ष्म कणांप्रमाणे तेथील वातावरण अप्रसन्न करून टाकीत होते. सरकारी वकिलाचं हे भावनाहीन पण वक्तृत्वपूर्ण भाषण पावेल व त्याच्या सहकाऱ्यांपर्यंत मात्र जणू पोचतच नव्हतं. त्या भाषणाचा त्यांच्यावर यत्किंचित्सुद्धा परिणाम झालेला दिसत नव्हता. ते आपल्या जागी अगदी शांतपणे बसून होते. ते हळूहळू आपापसांत बोलत होते, मधूनमधून स्मित करीत होते, व आपलं हास्य लपविण्यासाठी मोठ्ठाले डोळे करून कपाळाला आठ्या चढल्याचा आव आणीत होते.

"धडधडीत खोटं सांगतोय हा!" सिझोवने अभिप्राय देऊन टाकला.

आईला ते तितकंसं पटलं नाही. सरकारी वकील कोणालाही न वगळता सर्वच आरोपींवर दोषारोप करीत होता. पावेलबद्दल सांगून झाल्यावर तो फ्योदोरकडे वळला व त्याच्याबद्दल बोलून झाल्यावर तो बुकिनविषयी बोलू लागला. त्या सर्वांना तो पद्धतशीरपणे एका माळेत गोवीत होता. त्याच्या शब्दांनी आई चिडली नाही की घाबरली नाही, पण त्याच्या नुसत्या शब्दांनी तिचं समाधान झालं नाही; यापेक्षाही कितीतरी भयंकर असा कितीतरी अर्थ त्यांत असावा असं तिला वाटत होतं व त्याचा चेहरा, त्याचे डोळे, त्याचा आवाज, फार काय सफाईने हातवारे करणारा त्याचा श्वेतवर्ण हात, यांत कुठंतरी, त्या शब्दांच्या पलिकडे, ते 'काहीतरी' शोधण्याचा तिचा प्रयत्न सुरू होता. ते भयंकर 'काहीतरी' त्यांत होतं हे खासच, पण तिला



ते हस्तगत होत नव्हतं, त्याचं निश्चित स्वरूप ठरविता येत नव्हतं—फक्त तिच्या अंतर्यामी तिला ते जाणवत होतं.

तिने न्यायाधीशांकडे पाहिलं. त्यांना त्या भाषणाचा पार कंटाळा आलेला स्पष्ट दिसत होता. त्यांचे करड्या व पिवळसर रंगांचे निर्जीव चेहरे मात्र अगदी मख्ख होते, त्यांवर कसलेही भाव व्यक्त होत नव्हते. सरकारी वकिलाच्या शब्दांनी एक अदृश्य धुकं निर्माण केलं होतं; त्या धुक्यात ते न्यायाधीश गुरफटलेले होते व त्यायोगे ते पूर्णपणे निर्विकार बनले होते व ते भाषण संपण्याची वाट पहात ताटकळत बसून कंटाळलेही होते. सरन्याया-धीश महाशय अगदी ताठ मान करून बसले होते व अधूनमधून त्यांच्या चष्म्यांच्या भिंगामागील करडे ठिपके त्यांच्या रंगहीन चेहऱ्याच्या विशाल प्रदेशात लुप्त होऊन जात होते.

न्यायाधीशांचा हा थंडपणा, त्यांच्या निर्विकार मुद्रा व भावनाशून्य तटस्थता पाहून 'हे लोक खरोखरच न्यायदानासाठी बसले आहेत का?' असाच आईला प्रश्न पडल्यावाचून राहिला नाही.

या प्रश्नामुळे तिला असा धक्का बसला की तिचं हृदय आकुंचन पावू लागलं व हळूहळू तिच्या भीतीचं उच्चाटन होऊन फक्त घोर अन्यायाची जाणीव मात्र तीव्र होत गेली.

सरकारी वकिलाने आपलं भाषण अचानक आवरतं घेतलं. त्याने शेवटी एकदमच थोडक्यात समारोप करून टाकला व न्यायाधीशांना अभिवादन करून तो हात चोळीत खाली बसला. दरबारच्या अधिकाऱ्याने त्याच्याकडे पाहून मान डोलावली व डोळे गरगर फिरवले; नगराध्यक्षाने हस्तांदोलनासाठी हात पुढे केला व जिल्हाधिकाऱ्याने फक्त स्वतःच्याच पोटाकडे एक नजर टाकून स्मित केलं.

पण न्यायाधीश मंडळी मात्र सरकारी वकिलाच्या भाषणावर खूष नसावी. त्यामुळे त्यांनी काहीच हालचाल केली नाही.

मग सरन्यायाधीश साहेब आपल्या तोंडाजवळ एक कागद धरून म्हणाले, "आता फेदोसेयेव, मार्कोव व झागारोव या आरोपींच्या वकिलाला भाषण करण्याला कोर्टाची परवानगी आहे."

आईने ज्याला निकोलायच्या घरी पाहिलं होतं तो वकील उभा राहिला. त्याचा चेहरा रुंद व आकर्षक होता. त्याचे डोळे इतके लहानसे होते व असे चमकत होते की जणू काय त्याच्या पिंगट पापण्यांखालून सुरीची दोन

धारदार पातीच पुढे येऊन वाऱ्याला कापत आहेत असा भास होत होता. तो चांगला मोठ्या आवाजात, सावकाश व स्पष्ट बोलत होता, तरीसुद्धा आईला त्याचं भाषण समजत नव्हतं.

"तो काय म्हणतोय ते समजलं?" सिझोव तिच्या कानाशी लागून म्हणाला. "समजलं का? तो म्हणतो की या आरोपींची डोकी ताळ्यावर नाहीत म्हणून ते असं वागले. उं! माझा फ्योदोर तर तसा नाही!"

आईच्या मनात इतकी कटुता आली होती की तिने काहीच उत्तर दिलं नाही. इथं अन्यायच होत आहे ही तिची भावना इतकी दृढ झाली होती की तिचं अन्तःकरण त्या भाराखाली दडपून गेलं होतं. आता तिला हे उमजलं की आपण आतापर्यंत न्याय मिळेल अशी आशा धरून बसलो होतो, ते व्यर्थ होतं. तिची अशी अपेक्षा होती की तिचा मुलगा व त्याच्यावर आरोप करणारे लोक यांचं योग्य मोजमाप होऊन प्रामाणिकपणे न्याय देण्यात येईल. तिला अशीही भोळी आशा वाटत होती की न्यायाधीश मंडळी पावेलची तपशीलवार व कसून तपासणी घेऊन त्याचं अंतरंग जाणून घेण्याचा प्रयत्न करतील, आणि त्याचे सर्व विचार व कृती यांचं चिकित्सक बुद्धीने निरीक्षण व परीक्षण करतील; व अशा प्रकारे त्यांना सत्य दिसून आलं म्हणजे मग ते मोठ्या आवाजात जाहीर करतील की, "हा माणूस म्हणतो तेच योग्य व बरोबर आहे!"

पण असं काहीच घडून आलं नाही, आरोपी व न्यायाधीश यांच्या दरम्यान फार मोठं अंतर होतं व आरोपींच्या दृष्टीने हे न्यायाधीश अगदी कुचकामाचे होते.

हे सर्व पाहून आईला इतकं गळून गेल्यासारखं वाटू लागलं की तिला त्यांच्या कामकाजाकडे लक्ष देण्याची इच्छाच उरली नाही; त्यामुळे कोण काय बोलत होतं याचा तिला काहीच बोध होत नव्हता.

"या प्रकाराला चौकशी तरी कसं म्हणायचं?" ती स्वतःशीच खिन्नपणे उद्गारली.

"हं, असंच सुनव त्यांना!" सिझोव मोठ्या खुषीत म्हणत होता.

आता एक दुसराच वकील भाषण करीत होता. तो होता ठेंगणासाच, पण त्याचा चेहरा विलक्षण करारी, फिकट व उपरोधिक हास्याने चमकत होता. न्यायाधीश मंडळी सारखी त्याच्या भाषणात अडथळे आणीत होती.

मध्येच सरकारी वकील एकदम उठून उभा राहिला व साक्षीपुराव्याच्या



क्रमाबद्दल त्याने कसलासा मुद्दा उपस्थित केला. पण सरन्यायाधीशाने त्याला सौम्य शब्दांत दटावून खाली बसवलं. हे होईतो अदबीने मान लववून उभ्या असलेल्या आरोपीच्या वकिलाने आपलं भाषण पुनः सुरू केलं.

"अजून खोलात शिरायला पाहिजे!" सिझोव म्हणाला.

त्या वकिलाचं भाषण सुरू असता श्रोतृवर्गात पुनः चैतन्य निर्माण होऊन हळूहळू लोकांना चेव येऊ लागला होता. त्या वकिलाच्या सडेतोड भाषणाने न्यायाधीशांच्या गेंड्यासारख्या जाड कातडीतूनही आत प्रवेश करून त्यांना डिवचलं होतं. त्याच्या वक्तृत्वाच्या पल्लेदार हल्ल्याने ते बेचैन होऊन व चिडून जाऊन तो हल्ला परतवून लावण्यासाठी एकमेकांचा आधार घेत होते.

नंतर पावेल बोलायला उठला. तो उभा राहाताच कोर्टात निःस्तब्ध शांतता पसरली आई पुढे वाकून त्याचं भाषण ऐकण्यास सज्ज झाली. पावेल अगदी शांतपणे बोलू लागला:

"पार्टी सभासद या नात्याने मी फक्त माझ्या पार्टीचाच निर्णय मानतो, त्यामुळे मी इथं माझ्या बचावाचं भाषण करणार नाही. परंतु ज्या माझ्या सहकाऱ्यांनी माझ्याप्रमाणेच बचाव देण्याचं नाकारलं आहे, त्यांच्या सांगण्यावरून मी तुम्हाला ज्या काही गोष्टी आकलन झालेल्या नाहीत त्या समजावून सांगण्याचा यत्न करणार आहे. समाजसत्तावादाच्या निशाणाखाली आम्ही जी मिरवणूक काढली ती राज्यसत्तेविरुद्ध बंडाळी होती, असं सरकारी वकिलाने म्हटलं व आम्ही लोक झारला उलथून पाडू पाहाणारे लोक आहोत असं त्याचं मत आहे. मी हे स्पष्ट करू इच्छितो की ही एकतंत्री सत्ता ही काही आपल्या देशाला बंधनात ठेवणारी एकच एक साखळी नाही. ती फक्त पहिली साखळी आहे. त्या बंधनापासून जनतेला मुक्त करणं हे आम्ही आमचं प्रथम कर्तव्य समजतो."

पावेल दृढनिश्चयाने बोलत असता कोर्टातील वातावरण अधिकच शांत व गंभीर झालं होतं. ती खोलीही विशाल झाल्यासारखी भासू लागली व पावेलही उंच उचलला जाऊन इतरांपेक्षा श्रेष्ठ भासू लागला.

न्यायाधीश मंडळी विचारमग्न व अस्वस्थ होऊन बसल्या जागी चुळबुळ करू लागली. दरबारचा अधिकारी निर्विकार चेहऱ्याच्या न्यायाधीशाच्या कानात काहीतरी कुजबुजला, त्या न्यायाधीश महाशयांनी मान डोलावून

सरन्यायाधीशाच्या उजव्या कानात काहीतरी सांगितलं व त्याचवेळी पलिकडचा आजारी दिसणारा न्यायाधीश सरन्यायाधीशाच्या डाव्या कानाशी लागला. उजव्या व डाव्या दोन्ही बाजूंनी कोंडीत पकडलेल्या त्या वृद्धाने मोठ्यानेच काहीतरी म्हटलं, परंतु पावेलच्या संथ व आवेशपूर्ण भाषणाच्या प्रवाहात ते शब्द कुणाला ऐकूच आले नाही. पावेल म्हणत होता:

"आम्ही समाजसत्तावादी आहोत. याचा अर्थ असा की आम्ही खाजगी मालमत्तेच्या विरुद्ध आहोत. कारण खाजगी मालमत्ता ही अशी चीज आहे की तीमुळे समाजाचा अधःपात होतो, लोक परस्परांचे वैरी बनतात, निरनिराळ्या हितसंबंधात कधीही न मिटणारे परस्परविरोध निर्माण होतात, हे विरोध झाकून ठेवण्यासाठी किंवा त्यांचे समर्थन करण्यासाठी असत्याचा आश्रय घेतला जातो, आणि एकंदरीने सर्वच लोकांमध्ये खोटेपणा, दंभ व द्वेषभाव यांची वाढ होऊन त्यांची अधोगती होत जाते. आमचं म्हणणं असं आहे की ज्या समाजात व्यक्ती हे केवळ इतरांना धनवान बनविण्याचं साधन समजलं जातं तो समाज अमानुष व आमच्या हिताला बाधा आणणारा आहे. या असल्या समाजाचे असत्यावर व ढोंगीपणावर आधारलेले नीतिनियम आम्ही कधी मान्य करणार नाही. व्यक्तीला कःपदार्थ लेखण्याच्या या प्रवृत्तीचा आम्ही धिक्कार करतो. अशा समाजात व्यक्तीवर शारीरिक व नैतिक गुलामगिरी लादण्याचे जे जे प्रकार प्रचलित आहेत, त्यांच्याविरुद्ध आणि स्वार्थापायी व लोभापायी माणसांना चिरडून टाकणाऱ्या सर्व साधनांच्या विरुद्ध झुंज देणं हे आम्ही आमचं कर्तव्य समजतो व म्हणून त्याविरुद्ध लढण्याचा आमचा निर्धार आहे. आम्ही कामगार आहोत; मुलांच्या खेळण्यांपासून ते अजस्र यंत्रांपर्यंत सर्व वस्तू आमच्याच श्रमाने तयार होतात, पण असं असूनही आमच्या मानवी प्रतिष्ठेचं रक्षण करण्याचा आमचा हक्क हिरावून घेण्यात आलेला आहे. कोणीही स्वतःच्या स्वार्थासाठी आम्हाला राबवावं व लुबाडावं अशी आज स्थिती आहे. सध्या आमचं उद्दिष्ट हे आहे की शेवटी सर्व सत्ता आम्हाला आमच्या हाती घेता येण्याच्या दृष्टीने आवश्यक तेवढं स्वातंत्र्य आम्हाला मिळवलं पाहिजे. आमच्या घोषणाही साध्याच असतात: 'खाजगी मालमत्तेचं उच्चाटन करा!' 'उत्पादनाची सर्व साधनं जनतेच्या मालकीची करा!' 'सर्व सत्ता जनतेच्या हाती!' 'प्रत्येकाने काम केलंच पाहिजे!' या आमच्या घोषणा काय दर्शवितात? आम्ही नुसते बंडखोर नाहीत!"



पावेलने क्षणभर थांबून किंचित् हास्य केलं व केसांतून बोटं फिरवली. त्याचे तेजस्वी निळे नेत्र अधिकच तेजाने तळपू लागले.

"तू मुद्दा सोडून बोलू नकोस! मुद्याला धरून बोल!" सरन्यायाधीश महाशयांनी दटावलं. यावेळी त्यांचा स्वर मोठा व उच्चार स्पष्ट होते. तो पावेलकडे न्याहाळून पाहू लागला तेव्हा त्याच्या निस्तेज डाव्या डोळ्यांत क्षणभर हावरेपणाची व दुष्टपणाची सूक्ष्म चमक तरळून गेल्याचा आईला भास झाला. आता सगळ्याच न्यायाधीशांच्या नजरा तिच्या मुलावर खिळलेल्या होत्या. ते जणू काय आपल्या दुर्बळ शरीरांत घालण्यासाठी त्याची शक्ती शोषून घेत होते व त्यांना त्याच्या रक्ताची तहान लागल्याचं दिसत होतं. पण त्याच्यावर काही परिणाम न होता तो तसाच उंच व ताठ उभा होता; त्याचं शरीर तसंच दणकट होतं; तो तसाच शूर दिसत होता. आपला हात लांब करून तो पुढे बोलू लागला:

"आम्ही क्रांतिकारक आहोत, आणि जोपर्यंत काही लोकांनी फक्त हुकुम सोडावे व इतरांनी फक्त राबावं अशी परिस्थिती कायम आहे तोपर्यंत आम्ही क्रांतिकारकच राहू. ज्या समाजाच्या हितसंबंधांचं रक्षण करण्याच्या कामीं तुम्हा न्यायाधीशांची नेमणूक झाली आहे त्या समाजाच्या आम्ही विरुद्ध आहोत, त्या समाजाचे व त्याचबरोबर तुमचेही आम्ही कट्टर शत्रू आहोत, आणि आमचा लढा यशस्वी होईपर्यंत आपली काहीही तडतोड होणं शक्य नाही. अन् अखेर आम्हा कामगारांचाच विजय होणार यात तिळमात्र संशय नाही! तुमच्या धन्यांना वाटतं तितकं त्यांचं सामर्थ्य मोठं नाही! ज्या खाजगी मालमत्तेच्या संचयासाठी ते आपल्या सत्तेखाली असलेल्या लक्षावधी लोकांचा बळी देतात, ज्या शक्तीमुळे ते आम्हावर सत्ता गाजवतात, तीच शक्ती त्यांच्या आपापसांतही कलह माजवीत असते व त्यातच त्यांचा भौतिक व नैतिक विनाशही अटळ आहे. त्यांना खाजगी मालमत्तेच्या संरक्षणाची किंमतही फार जबर द्यावी लागणार आहे. खरी गोष्ट तर अशी आहे की तुम्ही सर्वजण—आमचे धनी—आमच्यापेक्षा अधिक गुलाम आहात. आम्ही फक्त शरीराने गुलाम आहोत, पण तुमचे आत्मे देखील गुलामगिरीत खितपत पडले आहेत. तुमच्या मानेवर बसलेलं परंपरेचं व पूर्वग्रहांचं जूं झुगारून देण्याची तुमची प्राज्ञा नाही, हे जूं मानेवर बसल्याने तुमचे आत्मे तुम्हाला सोडून गेले आहेत—आत्मिक दृष्ट्या तुमचा मृत्यु झालेला आहे. पण आमच्या आत्म्यांवर कसलंही बंधन नाही. तुम्ही आम्हाला जे विष प्राशन करायला

लावता त्यापेक्षा तुम्हीच – अर्थात्‌च तुमच्या इच्छेविरुद्ध – आमच्या मनात त्या विषाचा जो उतारा निर्माण करता तो अधिक प्रभावी आहे. सत्याविषयीचं आमचं ज्ञान सतत वाढत आहे आणि त्या सत्याकडे सर्व सत्प्रवृत्त लोक, शुद्ध व निर्मळ अन्त:करणाचे सर्व लोक, फार काय तुमच्यातले सुद्धा सज्जन लोक, आकर्षित होत आहेत. हेच पहाना, की तुमच्या वर्गाचं तत्त्वज्ञान प्रतिपादन करणारे तत्त्ववेत्ते आज तुम्हाला कोणीच मिळत नाहीत; इतिहाससिद्ध न्यायाच्या रगाड्याखाली तुम्ही चिरडले जात असता तुमचे बचावाचे व स्वसमर्थनाचे सर्व मुद्दे आता संपुष्टात आले आहेत; नवे विचार निर्माण करण्याला तुम्ही असमर्थ ठरला आहात; वैचारिक व आत्मिक दृष्ट्या तुम्ही वांझोटे बनला आहात! याउलट आमच्या विचारांची निर्मिती व त्याचं सामर्थ्य वाढत आहे, ते विचार जनतेला स्फूर्ती देऊन स्वातंत्र्यसंग्रामासाठी संघटित होण्याला तिला प्रवृत्त करीत आहेत. कामगारवर्गाला एक महान्‌ कामगिरी पार पाडायची आहे व ही जाणीव जगातल्या सर्व कामगारांना एकत्र आणून त्यांची महान शक्ती एकवटवीत आहे. आणि जगात पुन: चैतन्य निर्माण करण्याचं कार्य कामगारवर्ग करीत आहे. त्या कार्याचा प्रतिकार करण्याचंही फक्त क्रूर दडपशाही व कुचेष्टा याखेरीज दुसरं कोणतंच साधन तुमच्याजवळ राहिलेलं नाही. परंतु कुचेष्टेचा अर्थ आता लपून राहात नाही व क्रूर दडपशाहीचा परिणाम आगीत तेल ओतण्यासारखाच होतो. आज आमच्या मानगुटीवर बसलेले हातच उद्या सहकार्यासाठी पुढे होणार आहेत. तुमची शक्ती ही फक्त सोन्याचीं अनेकपटींनी वाढ करीत जाणारी यांत्रिक शक्ती आहे; त्यापायी तुमच्यात आपसात फूट पडून तुमचे गट पडतात व ते परस्परांना गिळंकृत करू पाहातात. याउलट सर्व कामकरी जनतेच्या ऐक्याची जिवंत व वाढती जाणीव हीच आमची शक्ती आहे. तुम्ही जे जे करता ते सर्व गुन्हेच असतात. कारण त्यामुळे लोक गुलामगिरीत जखडले जातात. तुमचा खोटेपणा, लोभीपणा व दुष्टपणा यांतून दैत्यांचं व राक्षसांचं एक आसुरी जग निर्माण झालं आहे व ते जनतेला दडपून टाकण्याचा यत्न करीत आहे. या दैत्य व राक्षसांपासून जनतेची मुक्तता करणं हे आमचं काय आहे. तुम्ही मानवाला जीवनापासून तोडून काढून त्याचा सत्यानाश केला आहे; पण तुम्ही विध्वंस केलेल्या या जगातूनच पुन: एक संपूर्ण नवं, महान्‌ जग निर्माण करण्याची कामगिरी समाजसत्तावादाला पार



पाडायची आहे, आणि तुम्ही जंगजंग पछाडलेत तरी तुम्ही समाजसत्तावादाचा हा मार्ग थोपवून धरू शकणार नाही!"

पावेल क्षणभर थांबला व पुन्हा तेच शब्द त्याने आवेशाने पण सावकाश उचारले:

"तुम्ही हा मार्ग थोपवून धरू शकणार नाही!"

न्यायाधीशांनी आपापसांत काही कुजबुज करून तोंडं वेडीवाकडी केली. पण हे करतानाही त्यांनी पावेलवर खिळवलेल्या भेदक नजरा मात्र तशाच रोखलेल्या होत्या. ते पाहून आईला वाटलं, पावेलची सुदृढ शरीरयष्टी, त्याचं सामर्थ्य व त्याची टवटवीत कांती यांविषयीच्या असूयेने त्यांच्या विषारी नजरा भरलेल्या आहेत, तेव्हा त्यांची दृष्ट लागून पावेलचं शरीर दूषित तर होणार नाही?

कठड्यामागील आरोपी आपल्या सहकाऱ्याचं हे भाषण कान टवकारून ऐकत होते. त्यांचे चेहरे फिकट होते, पण त्यांच्या नेत्रांत हर्षाची चमक होती. आईने तर आपल्या पुत्राचा शब्द न्‌ शब्द हृदयसंपुटात साठवून ठेवला, त्या शब्दांचे थरच्या थर तिच्या अन्त:करणावर कोरले गेले.

म्हाताऱ्या सरन्यायाधीशाने अनेकदा पावेलला मध्येच अडवून स्पष्टीकरण विचारलं, व एकदा तर खिन्न स्मिताची रेखाही त्याच्या चेहऱ्यावर उमटली. अशा प्रत्येक वेळी पावेल थांबे खरा, पण तो पुन: भाषण सुरू करी ते अशा खंबीरपणे की त्याचं म्हणणं ऐकायलाच पाहिजे असंच सर्वांना वाटे व न्यायाधीशांच्या इच्छाशक्तीलाही त्याच्या प्रभावी इच्छेपुढे मान वाकविणं भाग पडे.

तरी शेवटी तो म्हातारा किंचाळला व त्याने हात लांब करून पावेलला थांबायला सांगितलं. तेव्हा पावेलच्या स्वरात उपरोधाची छटा उमटली व तो म्हणाला,

"माझं बोलून झाल्यासारखंच आहे. तुम्हाला व्यक्तिश: दुखवावं अशी माझी मुळीच इच्छा नाही; उलट ज्याला तुम्ही खटला म्हणता तो चौकशीचा फार्स मी माझ्या इच्छेविरुद्ध इथं बसून पाहात असता मला तुमची कीवच करावीशी वाटत होती. कारण तुम्ही आमचे विरोधक असलात तरी अखेर माणसंच आहात, आणि पाशवी शक्तीच्या सेवेपायी माणसांची माणुसकी नष्ट होऊन त्यांचा इतका अध:पात व्हावा व मानवी प्रतिष्ठेची त्यांची जाणीव नष्ट व्हावी हा माणुसकीचा उपमर्दच आहे."

पावेल न्यायाधीशांकडे न पाहताच खाली बसला. आई मात्र श्वास रोखून त्या लोकांकडेच पाहात होती.

पावेल खाली बसताच आंद्रेइने त्याचा हात जोराने दाबला. आंद्रेइचा स्वतःचा चेहराही उजळून निघालेला होता. सामोइलोव, माझिन व इतर सहकाऱ्यांनीही पावेलच्या बाजूला वाकून नजरेनेच त्याचं अभिनंदन केलं. त्या कौतुकाने पावेलला जरा संकोचल्यासारखं झालं. त्याने आईकडे पाहिलं व मान हालवली. ती नजर आईला विचारीत होती: "तुझं समाधान झालं की नाही?"

तिने उत्तरादाखल एक समाधानाचा सुस्कारा टाकला व तिच्या चेहऱ्यावर प्रेमाची स्निग्धता पसरली.

"आता खटल्याला खरी सुरुवात झाली!" म्हातारा सिझोव पुटपुटला. "त्याने सगळं कसं अगदी स्पष्ट सांगितलं, नाही?"

यावर तिने काही उत्तर न देता नुसतीच मान डोलावली. आपल्या मुलाने इतक्या निर्भिडपणे भाषण केलं यामुळे ती हर्षित झाली होती – किंवा कदाचित् त्याचं भाषण संपलं होतं याचा आनंद किंचित अधिकच असावा.

पण आता एक प्रश्न सारखा तिच्या मनात उचल खात होता की, "आता हे काय निर्णय देतील?"

## २६

वस्तुतः पावेल जे बोलला त्यात आईला नवीन असं काहीच नव्हतं. त्याचे सर्व विचार व मतं तिला परिचित होती, पण त्याच्या ध्येयाबद्दल इथं, कोर्टात, तिला जे विलक्षण आकर्षण वाटलं ते तिला नवीन होत. पावेलने ते भाषण करताना जो कमालीचा समतोलपणा व संयम दाखवला तो पाहून ती विस्मित झाली व त्याचं भाषण म्हणजे आपल्या ध्येयावरील त्याची अढळ निष्ठा व अंतिम यशाविषयी दुर्दम्य विश्वास प्रतिबिंबित करणारा ध्रुवताराच असल्यासारखं तिला वाटलं. तिला वाटलं, आता हे न्यायाधीश याच्याशी वाद घालतील, रागारागाने त्याची मतं खोडून काढून स्वतःची मतं प्रतिपादन करण्याला पुढे सरसावतील. पण तसं काही झालं नाही. उलट आंद्रेइच उठून उभा राहिला. त्याने खांदे हलवले, डोळे आकुंचित करून न्यायाधीशांकडे पाहून घेतलं व मग त्याने बोलण्यास आरंभ केला:



"सन्माननीय आरोपी हो..."

"तू ज्यांना उद्देशून बोलतो आहेस ते न्यायाधीश आहेत, आरोपी नव्हेत – समजलास!" तो वृद्ध न्यायाधीश चिडून म्हणाला.

आईने आंद्रेइकडे पाहिलं. त्याच्या चेहऱ्यावर बेडरपणाची छटा होती. त्याच्या मिशा हालत होत्या व त्याच्या डोळ्यांत तिला परिचित असलेली मिस्किलपणाची चमक होती. त्याने आपल्या लांब, किडकिडीत हाताने डोकं खसाखसा खोळलं व मग एक सुस्कारा टाकून मान हालवीत तो म्हणाला,

"असं? मला तर खास वाटतं की तुम्ही न्यायाधीश नसून आरोपीच आहात!"

"मुद्याला सोडून बोलू नकोस!" वृद्ध न्यायाधीश महाशय शुष्कपणे उद्गारले.

"मुद्याला धरून बोलू? समजा क्षणभर मी हे कबूल केलं की तुम्ही लोक खरोखरच न्यायाधीश आहात, प्रतिष्ठित आहात, स्वतंत्र बुद्धीने चालणारे आहात..."

"कोर्टाला तुझ्या शिफारसपत्राची गरज नाही..."

"असं? पण तरी मी आपला देतोच तुम्हाला शिफारसपत्र. तर आपण असं समजू या की तुम्ही अगदी निःपक्षपाती, पूर्वग्रहांना थारा न देणारे, हा आपला व हा परका असा भेदभाव न करणारे, अगदी सज्जन लोक आहात. अन् असं समजा की दोघंजण तुमच्यासमोर न्याय मागायला आले. एकाचं म्हणणं असं की त्या दुसऱ्याने मला लुबाडलं न् खूप मारलं; दुसरा म्हणतो की लोकांना लुबाडायचा न् मारायचा मला हक्कच आहे, कारण मजजवळ चाबूक आहे..."

"मुद्याला धरून असं तुला काहीच सांगायचं नाही का?"

हे बोलताना त्या वृद्धाचा आवाज बराच चढला होता. त्याचा हात कापत होता. तो असा संतापलेला पाहून आईला बरं वाटलं. पण तिला आंद्रेइचं वागणं मात्र आवडलं नाही. पावेलच्या भाषणाच्या पातळीशी त्याचा बिलकुल मेळ बसत नव्हता. आंद्रेइचं बोलणं सुद्धा गंभीर व उच्च पातळीवर असायला हवं होतं.

आंद्रेइने आपलं भाषण पुढे चालू करण्यापूर्वी शांतपणे त्या वृद्ध न्यायाधीशाकडे एक नजर टाकली.

"मुद्याला धरून?" त्याने गंभीरपणे विचारलं व कपाळावरचा घाम पुशीत तो पुढे म्हणाला, "काय म्हणून मी तुमच्याशी मुद्याला धरून बोलू? तुम्हाला सध्या जेवढं माहीत व्हायला हवं तेवढं माझ्या या कॉमरेडने सांगितलंच आहे. योग्य वेळ आली की बाकीचे लोक आणखीही सांगायचं ते सांगतीलच."

तो वृद्ध न्यायाधीश बसल्या खुर्चीतच उंच झाला व ओरडला,

"खाली बैस तू! ... नंतर कोण? हं, ग्रिगोरी सामोइलोव!"

खोखोलने आपले ओठ गच्च आवळून धरले व तो सावकाश खाली बसला. सामोइलोव त्याच्या बाजूलाच होता, तो उठून उभा राहिला व त्याने मानेला झटका देऊन आपले कुरळे केस मागे वळवले.

"सरकारी वकिलाने माझ्या सहकाऱ्यांना रानटी म्हटलं, संस्कृतीचे शत्रू म्हटलं..."

"तुझ्या स्वतःवरील आरोपांबद्दल तुला काय म्हणायचं असेल तेवढंच सांग!"

"या गोष्टीचा त्याच्याशी संबंध आहेच. प्रामाणिक लोकांचा सगळ्याच गोष्टींशी संबंध असणार. अन् कृपा करून मधेमधे बोलून मला अडथळा करू नका. बरं, तुम्ही संस्कृती कशाला म्हणता ते तरी ऐकू द्या एकदा!"

"आम्ही तुझ्याशी वाद घालू इच्छित नाही! अन् खटल्याशी संबंध नसलेल्या कोणत्याच गोष्टीची इथं जरूर नाही!"

हे बोलताना त्या वृद्धाचे खालचे दात स्पष्ट दिसत होते.

आंद्रेइच्या वागणुकीमुळे न्यायाधीशांमध्ये एक प्रकारचा बदल झाला होता. जणू काय त्यांच्या चेहऱ्यावरचा पापुद्रा निघून गेल्यासारखं भासत होतं. त्यांचे चेहरे संतापाने लाल झाले होते, व त्यांच्या नेत्रांतही चीड व रागाची चमक स्पष्ट प्रतीत होत होती. त्यांना पावेलच्या भाषणाचाही राग आला होता, परंतु त्याच्या शब्दांतच असं काही विलक्षण सामर्थ्य होतं की त्यांनाही त्याच्याविषयी आदरच वाटला व त्यामुळे त्यांना वरकरणी शांतता धारण करणं भाग पडलं. पण खोखोलच्या वागणुकीने त्यांचे हे मुखवटे गळून पडले व त्यांचं खरं स्वरूप स्पष्ट झालं. मग त्यांच्यात एरवी कधीच दिसली नव्हती एवढ्या तडफेने ते आपापसांत कुजबुजू लागले.

सामोइलोव पुढे बोलू लागला,



"तुम्ही लोकांना गुप्त हेर व्हायला शिकवता, तुम्ही बायकापोरींना बिघडवता, तुम्हीच लोकांना चोरदरोडेखोर न् खुनी बनवता! दारू, लढाया, लबाडी, व्यभिचार, रानटी अत्याचार, यांचं विष तुम्हीच लोकात पसरवता! हीच तर तुमची संस्कृती! आम्ही अर्थातच अशा संस्कृतीचे वैरी आहोत!"

"बंद कर ही बडबड! मी तुला बजावून ठेवतो..." तो वृद्ध चिडून ओरडला.

पण सामोइलोवने तितक्याच आवेशाने त्याला सुनवलं,

"ज्या लोकांना तुम्ही तुरुंगात डांबून त्यांचा अनन्वित छळ करता व ज्यांना संतापाने बेभान होऊन वेड लागावं अशी तुमची खटपट असते असे लोक ज्या दुसऱ्या नव्या संस्कृतीचा पुरस्कार करतात, त्या संस्कृतीविषयीच आम्हाला अभिमान व आदर आहे, समजला –"

हे बोलताना त्याचा चेहरा लालबुंद झाला होता व त्याचे डोळे चमकत होते.

"तू खाली बैस! हं, नंतर कोण? फ्योदोर माझिन!"

लहानसा भासणारा, किडकिडीत शरीरयष्टीचा फ्योदोर एकदम उठून ताठ उभा राहिला.

"मी ईश्वराला साक्ष ठेवून सांगतो की मी आजन्म हे कार्य करीत राहीन."

हे बोलताना त्याचा श्वास जोराने चालत होता व त्याचा चेहरा इतका पांढराफटक पडला होता की त्याचे फक्त डोळेच काय ते दिसत होते.

"मला शिक्षा द्यायचं तुम्ही आधीच ठरवून ठेवलं आहे हे मी जाणतो. पण मी ईश्वराला स्मरून सांगतो की तुम्ही मला कुठंही पाठवलंत तरी मी पळून येईन व सतत, अगदी आजन्म माझं कार्य करीत राहीन."

मग शपथ घेतल्याप्रमाणे हात लांब करून तो उद्‌गारला, "हे मी शपथेवर सांगतो!"

सिझोवने एक भलीमोठी जांभई दिली व बसल्या जागी चुळबुळ केली. श्रोतृसमुदायातही चैतन्य निर्माण होऊन त्यांची उत्कंठा ताणली गेली होती व ते आपापसांत सूचक उद्‌गार काढून कुजबुजू लागले होते. एक बाई तर हुंदके देऊ लागली होती व दुसऱ्या कुणाला तरी खोकल्याची उबळ आली

होती. पोलिस शिपाई आरोपींकडे विस्मयाने व लोकांकडे रागाने पहात होते. न्यायाधीश लोक उगीचच शरीराला मागेपुढे हेलकावे देत होते.

"नंतरचा आरोपी – इवान गुसेव!" वृद्धाने फर्मावलं.

"मला काही सांगायचं नाही!"

"पुढे कोण – वासिली गुसेव!"

"मला पण काही सांगायचं नाही!"

"फ्योदोर बुकिन!"

फिकट, पांढुरक्या चेहऱ्याचा बुकिन कसाबसा उठून उभा राहिला. व जोरजोराने मान हालवीत तो बोलू लागला,

"तुम्हाला खरोखरच शरम वाटायला पाहिजे. मी तसा मंदबुद्धीचा माणूस आहे, पण मला सुद्धा न्यायअन्याय समजतो!"

त्याने एक हात डोक्याच्या वर उंच नेला व तो अर्धवट डोळे मिटून दूरवर काहीतरी पहात असल्यासारखा शांत उभा राहिला.

"हा काय प्रकार आहे?" वृद्ध न्यायाधीश आश्चर्यचकित होऊन, खुर्चीवर रेलून संतापाने ओरडला.

"मसणात जा तुम्ही!"

बुकिन एकदम चिडून बोलला व खाली बसला. त्याच्या त्या शब्दांना विलक्षण धार होती. वस्तुतः ते अगदी भोळेपणाचे व व्यथित अन्तःकरणाने चिडून काढलेले उद्‌गार होते, पण तरीही त्यांत विलक्षण अर्थ भरलेला होता. ते उद्‌गार ऐकणाऱ्या सर्वांनाच ते जाणवले व आता जणू काय बुकिनच्या शब्दांचा प्रतिध्वनी उमटेल व तो मूळ शब्दांपेक्षाही त्यातला अर्थ अधिक स्पष्ट करील अशा अपेक्षेने न्यायाधीशांनी सुद्धा कान टवकारले.

कोर्टात नीरव स्तब्धता पसरली. कुणी तरी हळूच रडत असावं असं सूचित करणारा हुंदक्यांचा अस्पष्ट आवाजच काय तो त्या शांततेचा भंग करीत होता.

मग सरकारी वकिलाने खांदे उडवून किंचित हसल्यासारखं केलं व दरबारच्या अधिकाऱ्याने खोकल्यासारखं केलं, मग लोकांमध्येही कुजबुज सुरू झाली.

"आता हे न्यायाधीश काही बोलतील का?" आईने हळूच सिझोवला विचारलं.

"उं हूं. आता फक्त शिक्षेची सुनावणी राहिली. बाकी सगळं संपलं!"



"सगळं?"

"सगळं."

तिचा यावर विश्वासच बसेना.

सामोइलोवच्या आईने बसल्या जागी बाकावर चुळबुळ केली व तिनं कोपराने व खांद्याने आईला बाजूला ढकललं.

"म्हणजे? सगळं संपलं? खरंच?" तिने आपल्या पतीला विचारलं.

"हो, ते शक्य आहे. तुला दिसेलच की आता."

"आपल्या ग्रिशाला शिक्षा देतील ते?"

"बडबड बंद!"

काही तरी चुकलं आहे, काही तरी तुटल्यासारखं, कशाचा तरी भंग झाल्यासारखं दिसत आहे हे प्रत्येकाला जाणवत होतं. लोक डोळे किलकिले करून आश्चर्याने पहात होते. जणू एकादी प्रचंड आग लागून तिच्या प्रखर तेजाने डोळे दिपावे, पण काय जळत आहे हे मात्र नीट दिसू नये, फक्त त्या घटनेचा भयंकरपणा तेवढा जाणवावा, असं लोकांना वाटत होतं. असं काही तरी अचाट न् अफाट एकदम दृष्टीसमोर आलं की ते आकलन न झाल्यामुळे लोक बिचारे त्यांना जे काही समजलं होतं त्या क्षुल्लक गोष्टींबद्दलच बोलून आपल्या भावनांना वाट करून देत होते.

"ए, त्यांना का बोलू दिलं नाही रे त्यांनी?" बुकिनच्या मोठ्या भावाने जरा मोठ्यानेच विचारलं. "सरकारी वकिलाला मात्र वाटेल ते न् वाटेल तितका वेळ बोलू दिलं!"

त्या बाकाच्या जवळच एक अधिकारी उभा होता, त्याने लोकांना हाताने गप्प रहाण्यास खुणावलं व जोरात दम भरला, "स्स्! गप बसा!"

म्हातारा सामोइलोव आपल्या पत्नीच्या पाठीशी वाकून पुटपुटला:

"ठीक आहे, मी म्हणतो, आहेत ते गुन्हेगार! पण त्यांना आपली बाजू मांडायची तर संधी द्या! ते कोणाच्या विरुद्ध आहेत हे तरी कळू देत, मी म्हणतो! माझे सुद्धा काही उद्देश आहेतच..."

"स्स्!" त्या अधिकाऱ्याने सामोइलोवकडे बोट करून त्याला दटावलं.

सिझोवने खिन्नपणे मान डोलावली.

आईचे डोळे सारखे त्या न्यायाधीशांवर खिळलेले होते. ते आपापसांत बोलत असता अधिकाधिक उत्तेजित होत असल्याचं तिला दिसत होतं. त्यांच्या बोलण्याचा थंड, ओलसर ध्वनी तिच्या चेहऱ्याला स्पर्श करीत होता

त्यामुळे तिचे गाल थरथरत होते व तिला आपले तोंड कडू झाल्यासारखं वाटत होतं. कां कोण जाणे, पण तिला वाटत होतं की हे आपला मुलगा व त्याचे सहकारी यांच्या तारुण्याने मुसमुसणाऱ्या शरीरांबद्दल, तरुण रक्त सळसळत असलेल्या त्यांच्या अवयवांबद्दल व पिळदार स्नायूंबद्दल बोलत असावेत. स्वतःची शरीरं गलितगात्र असल्यामुळे त्यांना या तरुणांची पिळदार शरीरं पाहून हेवा वाटत असावा, अशी तिची कल्पना झाली. भरपूर काम करण्याला समर्थ असलेली, श्रम करून पुष्ट होणारी, जगातील आनंदाचा आस्वाद घेऊ शकणारी, अशी ही निर्मितिक्षम शरीरं पाहून त्या न्यायाधीशांच्या तोंडाला पाणी सुटत असावं, व तशी शरीरं आपल्याला हवी अशी हाव सुटत असावी. आता ही शरीरं दैनंदिन व्यवहाराच्या जगापासून दूर नेण्यात येणार असल्यामुळे त्यांच्यावर ताबा गाजविणं, त्यांना राबवून घेणं व कामाला जुंपणं शक्य होणार नव्हतं. त्यामुळे अगदी गलितगात्र व अस्थिपंजर झालेल्या जनावरांपुढे ताजं अन्न ठेवलं तरी ते तोंडात घेण्याचं सुद्धा त्राण नसल्याकारणाने त्या जनावरांचा जसा चडफडाट व संताप होतो, आणि इतर प्राण्यांची शक्ती शोषून घेण्याची ताकद न उरल्यामुळे आपल्या तोंडचा घास हिरावून गेल्याबद्दल ते जसे गुरगुरतात व फूत्कार टाकतात तसाच त्या न्यायाधीशांचाही त्या तरुणांना पाहून संताप व चडफडाट होत असावा, असा आईला भास झाला.

आईचं मन या विचित्र कल्पनांशी चाळा करीत होतं व ती जसजशी त्या न्यायाधीशांचं अधिक लक्षपूर्वक निरीक्षण करीत होती, तसतसे हे विचित्र विचार तिच्या मनात अधिकाधिक रुजत होते. मेजवानीची चव माहीत असूनही शरीर जर्जर बनल्यामुळे अन्न खाण्यास असमर्थ ठरलेले हतबल प्राणी जसे व्यर्थ चडफडतात तशाच दुर्बलांच्या संतापाने या बुभुक्षित न्यायाधीशांनाही झपाटलं होतं, इतकंच नव्हे, तर ते आपला संताप लपविण्याचाही प्रयत्न करीत नव्हते.

ती स्वतः एक स्त्री व माता होती. मातेला तर स्वतःच्या आत्म्यापेक्षा आपला पुत्र अधिक प्रिय असतो. त्यामुळे त्या बुभुक्षितांची नजर आपल्या पुत्राच्या चेहऱ्यावरून फिरावी, त्याच्या छातीला भिडावी, त्याच्या खांद्याला व हाताला तिचा स्पर्श व्हावा, त्या नजरेने त्याच्या मांसल शरिराशी लगट करावी, व जणू काय या अशा घर्षणाने आपल्या काष्ठवत् झालेल्या रक्तवाहिन्यांतून व निर्जीव स्नायूंतून पुनः गरम रक्त सळसळू लागेल अशा



आशेने त्यांनी आपल्या मुलावर दृष्टी फिरवावी, याची आईला फारच चीड आली. त्या वृद्धांना असंही वाटत असावं की या तरुणांना आपणच जबर शिक्षा ठोठावणार असल्यामुळे त्यांची सतेज शरीरं पुनः कधीच दृष्टीला पडणार नाहीत, व त्यामुळे त्या वृद्धांची लोभस व हावरट नजर त्या शरीरांवरून सारखी फिरत असावी. तसंच या वृद्धांच्या दमट व अपवित्र नजरस्पर्शाची पावेलला स्वतःला सुद्धा जाणीव होऊन त्याचं अंग शहारलं व त्याने आपल्याकडे पाहिलं, असाही आईला भास झाला.

तो तिच्याकडे शांत व प्रेमळ नजरेने पहात होता. त्याला थकवा आल्याची एक सूक्ष्म छटाही त्याच्या नजरेत होती. तो मधूनमधून तिच्याकडे पाहून मान हालवीत होता व स्मित करीत होता.

"लवकरच मी मुक्त होणार!" असंच जणू त्याची ती नजर म्हणत होती व त्यामुळे तिला मुलाला प्रत्यक्ष कुरवाळल्याच्या सुखाचा अनुभव प्राप्त होत होता.

तिच्या मनात हा विचार आला त्याच क्षणी न्यायाधीश उठले. तीही उठून उभी राहिली.

"ते पहा चालले!" सिझोव म्हणाला.

"निकाल काय द्यायचा ते ठरवायला?" आईने विचारलं.

"हो ना!"

आतापर्यंत तिच्या मनावर जे दडपण होतं ते एकदम निघाल्यासारखं होऊन तिला थकून जाऊन घेरी आल्यासारखं वाटलं. तिच्या पापण्या थरथरल्या व दरदरून घाम सुटून कपाळावर घामबिंदू उभे राहिले. तीव्र निराशेचा व दुःखाचा अन्तःकरणावर आघात होऊन तिला ते कोर्ट व ते न्यायाधीश यांच्याविषयी घृणा व तिरस्कार वाटू लागला. भयंकर कपाळदुखीने हैराण होऊन तिने आपल्या हाताने कपाळ घट्ट दाबून धरून वर पाहिलं. आरोपींचे आप्तेष्ट कठड्यांपाशी गेले होते व त्या खोलीत अनेक लोक एकदम बोलू लागल्यामुळे गोंगाट सुरू झाला होता. तीही पावेलच्या जवळ गेली, व त्याचा हात धरून अश्रू गाळू लागली. तिच्या अन्तःकरणात दुःख आणि हर्ष अशा परस्परविरोधी भावनांचा मिश्र कोलाहल माजला होता. पावेल मात्र शांतपणे तिच्याशी बोलत होता व खोखोल तर चांगलाच हसून खेळून बोलत थट्टामस्करीही करीत होता.

तिथं जमलेल्या आप्तेष्टांतल्या सर्व बायका रडत होत्या, पण त्या रडण्याला त्यांच्या दुःखापेक्षा स्त्रीस्वभावच अधिक कारणीभूत होता.

अदृश्य व अनपेक्षितपणे कोसळणाऱ्या दुःखाने स्तिमित व्हावं तसं त्या लोकांचं झालेलं नव्हतं. आपली मुलं आता आपल्याला दुरावणार यामुळे साहाजिकच त्यांना खेद होत होता. पण त्यातसुद्धा त्या दिवशीच्या अनुभवांनी त्यांना थोडासा विरंगुळाच मिळाला होता. आईबापांच्या मनात मुलांकडे पाहून संमिश्र भावनांचे तरंग उठत होते. तरुणांबद्दलची नेहमीची साशंक वृत्ती व स्वतःच्या श्रेष्ठत्वाची कल्पना तर होतीच, पण त्याचबरोबर त्या मुलांविषयी त्यांना एक प्रकारचा आदरही वाटत होता. आपल्या आयुष्याचं कसं होईल याविषयीचे दुःखदायक विचारही त्यांच्या मनात येत होते, नाही असं नाही; परंतु हे तरुण लोक दुसऱ्याच प्रकारच्या सुखी जीवनाची शक्यता व्यक्त करताना ज्या धडाडीने व निर्भयपणे बोलत होते ते त्यांचं शौर्य पाहून वाटणाऱ्या विस्मयापुढे व कौतुकापुढे हे दुःखदायक विचार टिकणंच शक्य नव्हतं. मनातल्या भावना व्यक्त करण्याला शब्दच सुचेनात, त्यामुळे त्या भावना ते लोक तशाच दडपून टाकीत होते व कपडे, त्यांची धुलाई, प्रकृती वगैरे मामुली गोष्टींबाबत अघळपघळ शब्दांची खैरात होत होती.

थोरला बुकिन हातवारे करून भावाला म्हणत होता:

"न्याय मिळणं हेच महत्त्वाचं! बाकी मग काहीही होवो!"

"बरं, पण मैनेची काळजी घ्या बरं का!" धाकटा भाऊ म्हणाला.

"घेईन तर!"

सिझोवने आपल्या पुतण्याचा दंड धरून त्याला म्हटलं,

"फ्योदोर, पोरा! तू दूर चाललास अं आम्हाला सोडून!"

फ्योदोरने खाली वाकून त्याच्या कानांत काहीतरी सांगितलं. ते सांगताना त्याच्या चेहऱ्यावर हास्य विलसलं होतं. त्यावर जवळच्या पहारेकऱ्यानेही स्मित केलं, पण त्याने लगेच स्वतःला सावरून गंभीर चेहरा करीत घसा साफ करण्याचं सोंग केलं. पेलाग्येयासुद्धा इतर बायांप्रमाणे कपडे, प्रकृती वगैरेच्याच गोष्टी पावेलशी बोलत होती, परंतु तिच्या मनातून मात्र तिला साशाविषयी, स्वतःविषयी व त्याच्याविषयी बोलून त्याला शेकडो प्रश्न विचारावंसं वाटत होतं. त्याहीपेक्षा जास्त म्हणजे तिच्या अन्तःकरणात त्याच्याबद्दलचं प्रेम दाटून आलं होतं व ज्यायोगे त्याला बरं



वाटेल, तो प्रसन्न होईल असं काहीतरी करण्याच्या तीव्र इच्छेने ती व्याकुळ झाली होती. पुढे घडणाऱ्या भयानक घटनांची भीती मागे पडली होती व ते न्यायाधीश व त्यांच्यापुढे चाललेला खटला याबद्दलच्या कटू पण अगदी पुसट आठवणी शिल्लक उरल्या होत्या. तिच्या अन्तःकरणात अत्यंत सुखद व उज्ज्वल असं काहीतरी उदयाला आलं होतं; ते काय असावं याचा तिला बोध होईना, म्हणून ती विमनस्क मनानेच त्या हर्षोन्मादकारी भावनेचा विचार करीत होती.

तिने खोखोलकडे पाहिलं. तो लोकांशी बोलत होता, परंतु पावेलपेक्षा त्यालाच मायेच्या ओलाव्याची अधिक गरज आहे याची जाणीव असल्यामुळे ती त्याच्याशी बोलू लागली.

"तुमच्या या खटल्यात मला तरी काहीच अर्थ वाटला नाही बाबा!" ती म्हणाली.

"कां बरं?" तो कृतज्ञतापूर्वक हसून म्हणाला, "गिरणी जुनीच असली तरी ती भरडून काढतेच आहे ही!"

"त्यात कुणाला भीती तर वाटलीच नाही, पण त्यांच्याही काहीच हाती लागलं नाही त्यात! मग बरोबर कोण, अन् चूक कोण?" ती जरा बिचकत बिचकत म्हणाली.

"अस्सं? म्हणजे हे पहायचं होतं तर!" आंद्रेइ उद्‌गारला. "त्यांना खरोखरच सत्य शोधून काढायचं होतं अशी तर कल्पना नाही ना तुमची?"

"मला आपली सारखी भीती वाटत होती की खटला म्हणजे भयंकरच प्रकरण असेल!" ती दीर्घ श्वास घेत व हसत हसत म्हणाली.

"हं! कोर्टातली गडबड बंद! सगळे जाग्यावर चला!"

लोक आपापल्या जागांवर जाऊन उभे राहिले.

सरन्यायाधीशाने मेजावर एक हात टेकून दुसऱ्या हातातला कागद डोळ्यांसमोर धरला. मग तो आपल्या बारीक, किरट्या आवाजात वाचू लागला,

"निकाल वाचून दाखवताहेत बरं का!" सिझोवने आईला सांगितलं व तो लक्षपूर्वक ऐकू लागला.

कोर्टात स्तब्धता पसरली. सगळेजण उभे होते व सर्वांचे डोळे त्या वृद्ध न्यायाधीशावर खिळलेले होते. त्याची लहानशी, सरळ, कृश शरीरयष्टी एखाद्या अदृश्य हातातल्या काठीसारखी भासत होती. इतर न्यायाधीशही

उभे होते. जिल्हाधिकाऱ्याची मान एका बाजूला कललेली होती व त्याची नजर वर आढ्याकडे लागलेली होती; नगराध्यक्ष महाशय छातीवर हात बांधून उभे होते; दरबारच्या अधिकाऱ्याचे हात दाढी कुरवाळण्यात गुंतले होते; आणि आजाऱ्यासारखा दिसणारा न्यायाधीश, त्याचा गलेलठ्ठ सहकारी न्यायाधीश व सरकारी वकील हे तिघे आरोपींकडे टक लावून पहात होते.

न्यायाधीशांच्या मागच्या तसबिरीतील झार बादशहाची स्वारी हा सर्व प्रकार पहात होती. चमकदार लाल पोषाख चढविलेल्या त्या सरकारस्वारीच्या श्वेतवर्ण मुखावर बेफिकिरीचा भाव दिसत होता व त्या मुखावर या क्षणी एका माशीचं भ्रमण सुरू होतं.

"हद्दपारी!" सिझोव एक सुटकेचा निःश्वास टाकून उद्‌गारला. "चला देवदयेने सगळं संपलं, बरं झालं! मला भीती होती, सक्तमजुरी देतात की काय? हे त्यापेक्षा बरं झालं, आई!"

"मला माहीत होतं की असंच होणार!" आई शिणलेल्या आवाजात म्हणाली.

"हो, पण आता पक्कं झालं. ते काय करतील याचा काही भरवसा होता थोडाच!"

पोलिस आरोपींना बाहेर नेत होते तिथे जाऊन सिझोव ओरडला,

"बराय, फ्योदोर! नमस्कार मंडळी! देव तुमचं भलं करो!"

आईने काही न बोलता नुसती मान हलवून पावेलला व त्याच्या सहकाऱ्यांना निरोप दिला. तिला रडावंसं वाटत होतं, पण स्वभावसुलभ लज्जा आडवी आली व तिने रडू आवरून धरलं.

## २७

आई कोर्टाच्या खोलीतून बाहेर पडली तेव्हा काळोख पडलेला पाहून तिला नवल वाटलं. रस्त्यावर कोपऱ्यातले दिवे लागलेले होते व आकाशात तारे चमकत होते. कोर्टाच्या इमारतीसमोर पुष्कळच लोकांची गर्दी होती व ते गटागटांनी उभे होते. हवेत गारठा होता व बर्फ पडल्याचा आवाज होत होता. तरुण लोकांचं बोलणं ऐकू येत होतं. करड्या रंगाचा ओव्हरकोट व



टोपी घातलेला एक इसम सिझोवला पाहून त्याच्याजवळ आला व त्याने विचारलं,

"काय शिक्षा दिली हो त्यांनी?"

"हद्दपारी."

"सगळ्यांना?"

"हो."

"बरं."

तो इसम निघून गेला.

"पाहिलंत?" सिझोव म्हणाला. "किती उत्सुक आहेत लोक निकाल ऐकायला!"

इतक्यात दहाबारा तरुण मुलामुलींनी त्यांच्या भोवती घोळका केला व त्यांच्या मोठमोठ्याने काढलेल्या उद्‌गारांमुळे इतर लोकही तिकडेच आले. आई व सिझोव उभे राहिले, शिक्षा काय झाली, आरोपी कसे वागले, भाषणं कोणी कोणी केली, ते काय बोलले, वगैरे प्रश्नांचा भडिमार सुरू झाला. त्या प्रश्न विचारणाऱ्यांची कळकळ व प्रामाणिकपणाही इतका स्पष्ट होता की आईलाही त्यांची उत्तरं देण्यात आनंदच वाटला.

"लोक हो! ही पावेल व्लासोवची आईच आहे!" कोणीतरी अचानक म्हणालं व क्षणात शांतता पसरली.

"मी हस्तांदोलन करणार तुमच्याशी!"

कुणाच्या तरी बळकट हाताने आईचा हात धरून बोटं दाबली व कुणीतरी उत्तेजित आवाजात म्हणालं, "तुमच्या मुलाने शौर्याचं फार मोठं उदाहरण घालून दिलं आहे आम्हाला!"

"रशियन कामगार चिरायु होवो!" जोरात घोषणा झाली.

मग अनेक कंठांतून घोषणा ऐकू येऊ लागल्या. कोणीतरी घोषणा देई व सगळे त्याला साथ देत. शिवाय सगळ्या बाजूंनी लोक धावत येऊन सिझोव व आईच्या भोवतीच्या जमावात सामील होत होते, पोलिसांच्या शिट्ट्याही सुरू झाल्या, पण घोषणा थांबल्या नाहीत. सिझोव हसत होता. आईला तर आपण एखादं सुंदर स्वप्नच पहात आहोत असं वाटत होतं. तीही हसत होती व हस्तांदोलनासाठी पुढे होणारे हात दाबून अश्रुपूर्ण नयनांनी लोकांच्या अभिवादनाचा स्वीकार करीत होती. तिला गळून गेल्यासारखं वाटून पाय दुखत होते, पण तिच्या अन्तःकरणात मात्र एखाद्या

सरोवराच्या पृष्ठभागावर उसळणाऱ्या चमकदार लाटांप्रमाणे भावना उचंबळून येत होत्या.

तिच्या जवळच उभा असलेला एकजण स्पष्ट पण कापऱ्या आवाजात बोलू लागला,

"कॉमरेड्स! रशियन जनतेला ग्रासू पहाणाऱ्या राक्षसाने आज आपला जबडा वासून आपल्याला गिळंकृत करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे..."

"चला, आता आपण जाऊ या, आई," सिझोव म्हणाला.

इतक्यात साशा तिथं आली व तिने आईचा हात धरून तिला रस्त्याच्या पलिकडे नेलं.

"आता दंगल नाही तर धरपकड सुरू होण्यापूर्वीच इथून निघून चला बरं तुम्ही!" ती आईला म्हणाली. मग तिने एकदम विचारलं, "हद्दपारीच ना? सैबेरियातच?"

"हो."

"त्याचं भाषण कसं झालं? पण मला ठाऊक आहेच म्हणा—त्याचंच भाषण सगळ्यात जोरदार न् सगळ्यात स्पष्ट न् सरळ असणार! सगळ्यात कणखर न् कठोर वागणंही त्याचंच असणार! खरं म्हणजे त्याचं अन्तःकरण फार भावनाप्रधान न् मृदू आहे पण त्याला ते उघड दाखवायची भीती वाटते."

प्रेमाने ओथंबलेले व अत्यंत उत्साहाने बाहेर पडलेले तिचे हे उद्‌गार ऐकून आईच्या अन्तःकरणातली खळबळ शांत झाली व तिला नवी शक्ती प्राप्त झाल्यासारखं वाटलं. तिने साशाच्या दंडाला धरून तिला प्रेमाने विचारलं. "आता तू केव्हा जाणार त्याला साथ द्यायला?"

"माझ्या इथल्या कामाची जबाबदारी सांभाळायला कोणी मिळालं की लगेच जाईन मी!" साशा तिच्या नजरेला नजर भिडवून निर्धाराने म्हणाली. "मला सुद्धा अटक होऊन शिक्षा होण्याचा संभव आहेच. अन् बहुधा सैबेरियात हद्दपारीचीच पाळी येणार असा अंदाज आहे माझा. तसं झालं तर तो जिथं असेल तिथंच मलाही पाठवा म्हणून त्यांना सांगेन मी."

"तसं झालं तर माझा त्याला नमस्कार सांग बरं का!" सिझोवचा आवाज ऐकू आला. "फक्त सिझोव नाव सांग म्हणजे झालं. तो ओळखतो मला. मी फ्योदोर माझिनचा चुलता आहे."

साशाने वळून पाहिलं व त्याच्याशी हस्तांदोलन केलं.



"फ्योदोरशी परिचय आहे माझा. माझं नाव साशा."

"वडिलांचं नाव?"

तिने त्याच्याकडे रोखून पाहिलं.

"वडील नाहीत मला."

"वारले?"

"उं हूं. वारले नाहीत!" साशाच्या आवाजात कठोरपणा आला होता व चेहराही खंबीर दिसू लागला होता. "माझा बाप एक जमीनदार आहे व आता त्या खेडेविभागाचा मुख्य अधिकारी आहे. शेतकऱ्यांची लुबाडणूक करतो तो."

"अं... अं..." सिझोव अस्वस्थपणे उद्‌गारला. मग काही वेळ कोणीच बोललं नाही. तो साशाच्या बाजूने चालता चालता मधून मधून तिच्याकडे पहात होता.

"बरं आहे आई! येतो मी," काही वेळाने तो म्हणाला. "मला इकडे या बाजूला जायचंय. बराय, पोरी! तू आपल्या बापाबद्दल जरा निर्दयपणे बोललीस मघाशी... अर्थात तो तुझा प्रश्न आहे म्हणा—"

"तुमचा मुलगा वाईट निघाला, तो लोकांचा छळ करू लागला अन् तुम्हाला त्याचा तिटकारा वाटू लागला तर तुम्ही त्याचं नाव टाकणार नाही का?" साशाने त्याला व्याकुळतेने विचारलं.

"अं... शक्य आहे, हो, शक्य आहे तसं होणं!" म्हातारा सिझोव किंचित् थांबून म्हणाला.

"तुमच्या मुलापेक्षा तुम्हाला सत्याची न् न्यायाची जास्त चाड असेल तर नक्कीच तसं कराल तुम्ही. मलाही माझ्या वडिलांपेक्षा न्याय अधिक प्रिय आहे..."

सिझोवने स्मित केलं व मान हलवली. मग तो एक सुस्कारा सोडून म्हणाला,

"तुझं फार कडक काम दिसतंय बरं का! तू ही तडफ कायम राखलीस तर अजून म्हाताऱ्यांपैकी चांगले लोक तू आपल्या बाजूला वळवून घेऊ शकशील! तुझी हिंमत खरोखरच वाखाणण्याजोगी आहे. बरं येतो आता! तुला आशीर्वाद आहे माझा! अन् हे बघ, लोकांकडे इतक्या कठोरपणे न पाहता जरा सहानुभूतीने पहावं, बाळ! बराय निलोव्ना! येतो मी. पावेलची भेट झाली म्हणजे मी त्याचं भाषण ऐकलं म्हणून सांगा अं त्याला!

सगळं समजलं नाही मला ते. त्यातला काही भाग पचनी पडणं व पटणंही जरा अवघडच होतं, पण एकंदरीने झकास भाषण होतं ते."

त्याने टोपी किंचित् उचलून त्यांचा निरोप घेतला व कोपऱ्यावर वळून तो दिसेनासा झाला.

साशा आपल्या मोठ्या डोळ्यांनी त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहात स्निग्ध स्वरात आईला म्हणाली, "फार चांगला माणूस दिसतोय हा!"

साशाचा चेहरा नेहमीपेक्षा कितीतरी अधिक स्नेहार्द्र व मार्दवपूर्ण दिसत होता हे आईच्या नजरेतून सुटलं नाही.

त्या दोघी घरी पोचून कोचावर बसल्या व साशा पावेलच्या भेटीला जाण्याच्या शक्यतेबद्दल बोलू लागल्या. घरातलं शांत वातावरण त्यांना फार बरं वाटलं. साशा आपल्या दाट भुवया उंच करून दूर नजर लावून बसली होती. तिचे मोठाले, स्वप्नाळू डोळे कशावर तरी खिळलेले होते. तिचा पांढुरका चेहरा शांत व विचारमग्न दिसत होता.

आई तिला म्हणत होती, "मग तुम्हाला मुलंबाळं झाली म्हणजे मीही तिकडे येईन व त्यांना सांभाळण्याचं काम करीन. अन् तिथं सुद्धा इथल्यापेक्षा जास्त त्रास तो काय असणार? पावेल कुठंही सहज काम मिळवील—तो सगळ्या प्रकारच्या कामात तरबेज आहे..."

साशा प्रश्नार्थक मुद्रा करून आईकडे पाहू लागली.

"म्हणजे तुम्ही आताच त्याच्याबरोबर जाणार नाही?" तिने विचारलं.

"त्याला माझा काय उपयोग होणार?" आई एक निःश्वास टाकून म्हणाली. "उलट त्याला निसटून जायचं असलं तर माझी अडचणच व्हायची. मी बरोबर येऊ नये असंच म्हणेल तो."

साशाने मान डोलावली.

"बरोबर आहे तुमचंच. तुम्हाला न्यायचा नाहीच तो."

"शिवाय मला इथलं माझं काम आहेच की!" आई अभिमानाने म्हणाली.

"हो, तेही आहेच. अन् तेही महत्त्वाचं आहे."

मग काहीतरी ओझं एकदम टाकून द्यावं तसं करून साशा शांतपणे व संथपणे म्हणाली,



"तो काही फार दिवस तिथं राहायचा नाही खास. नक्कीच निसटेल तो तिथून."

"अन् मग तुझं काय? अन् मूलबाळ असलं म्हणजे?"

"पाहू वेळ येईल तेव्हा. त्याने माझ्याबद्दल विचार करीत राहायची गरज नाही. मी त्याला माझी अडचण कधीच होऊ देणार नाही. त्याच्यापासून दूर होणं जड जाईल मला, पण ते करीन मी. कधीच त्याच्या मार्गात आडवी येणार नाही मी!"

साशा म्हणाली ते शब्द कृतीत उतरवण्याचं मनोधैर्य तिच्या अंगी नक्कीच होतं याची आईला पूर्ण जाणीव झाली व तिला त्या कोवळ्या पोरीची दया आली. तिला जवळ घेऊन कुरवाळीत आई म्हणाली, "फार कठीण जाईल ग पोरी तुला ते!"

साशाच्या चेहऱ्यावर मंदस्मित झळकलं व ती आईच्या कुशीत शिरली.

त्या क्षणी निकोलायने प्रवेश केला. तो अगदी दमूनभागून आलेला दिसत होता. आत येऊन कोट काढता काढताच तो साशाला उद्देशून म्हणाला,

"अजून वेळ आहे तोवरच तू इथून जा कशी, साशा! सकाळपासून दोन हेर माझा पाठलाग करताहेत. ते इतक्या उघडपणे माझ्यामागे लागले आहेत की मला आज नक्कीच पकडणार असा रंग दिसतोय. माझा अंदाज चुकायचा नाही. काहीतरी भानगड आहे हे नक्की. बरं, ते राहू द्या. ही पावेलच्या भाषणाची प्रत. ते छापून काढायचं ठरवलंय आम्ही. हे तू लुद्मिलाकडे घेऊन जा अन् तिला म्हणावं अगदी शक्य तितक्या लवकर हे पुरं कर. पावेलने फारच सुंदर भाषण केलं, आई! बरं, तू हेरांपासून सावध राहा अं, साशा!"

हे बोलत असताना तो गारठलेल्या हातांना ऊब यावी म्हणून ते खसखसा चोळत होता. मग तो मेजापाशी जाऊन एकेका खणातून कागद बाहेर काढू लागला. त्यातले काही त्याने फाडून टाकले व काही बाजूला ठेवले. त्याच्या चेहऱ्यावर थकवा स्पष्ट दिसत होता व तो चिंताग्रस्तही होता.

"फार दिवसांत या खणांची आवराआवर केली नाही मी. हे इतके कागद कुठून आले कुणास ठाऊक! आई, माझ्या मते तुम्ही आज रात्री इथं नसला तरच बरं. तुमचं काय म्हणणं आहे? तो सगळा प्रकार पहात

बसण्यात काहीच मौज नाही. शिवाय तुम्ही इथं असलात तर कदाचित् तुम्हालाही पकडतील. अन् बाहेर तुम्हाला काम आहे. पावेलच्या भाषणाच्या प्रती वाटाव्या लागतील—त्यासाठी तुमची फार गरज आहे—"

"मला पकडून काय फायदा होईल त्यांचा?"

निकोलायने हात झटकला.

"मी अचूक कोळखतो त्यांचे डावपेच," तो दृढतापूर्वक म्हणाला, "अन् तुमची लुद्‌मिलाला फार फार मदत होईल. तुम्ही असा धोका पत्करता कामा नये."

आपल्या मुलाचं भाषण छापून काढण्याच्या कामी मदत करता येईल या कल्पनेने आई फारच सुखावली.

"तसं असेल तर जाते मी," ती म्हणाली. नंतर ती स्वतःला नकळत एकदम बोलून गेली, "आता मला कशाची भीती वाटत नाही—देवाची कृपाच म्हणायची!"

"उत्तम!" निकोलाय वर नजर न करताच उद्‌गारला. "बरं, पण जाण्यापूर्वी माझी बॅग न् कपडे कुठे आहेत ते मात्र सांगून जा अं. तुम्ही असा काही या घराचा ताबा घेतला होता की माझ्या वस्तूसुद्धा मला आता सापडत नाहीत!"

बरेचसे कागद शेगडीत जाळून टाकून ती राख कोळशात मिसळून टाकण्याच्या उद्योगात साशा मान होती.

"साशा, तुला जायलाच हवं आता!" निकोलाय तिला म्हणाला व तिला निरोप देण्यासाठी त्याने हस्तांदोलनाकरिता हात पुढे केला.

"अच्छा, नमस्कार! काही चांगली पुस्तकं प्रसिद्ध होतील ती मला पाठवायला विसरू नकोस बरं का! बराय, नमस्कार कॉमरेड! तू सांभाळून राहा अं!"

"तुम्हाला बरेच दिवस तुरुंगात राहावं लागेल का?"

"कुणी सांगावं? तशी शक्यता आहे खरी. माझ्याविरुद्ध भक्कम पुरावा आहे त्यांच्याजवळ. बराय, आई, तुम्ही सुद्धा हिच्याबरोबर निघालात तर कसं? दोघींचा एकदम पाठलाग करणं कठीण जाईल त्यांना."

"बराय," आई म्हणाली. "मी कोट न् हॅट घालून निघालेच."

तिने निकोलायकडे निरखून पाहिलं, पण त्याच्यात फारसा बदल झालेला दिसत नव्हता. त्याच्या नेहमीच्या प्रेमळ व स्नेहार्द्र मुद्रेवर किंचित् काळजीची



झाक दिसत होती एवढंच. तो घाबरलेला किंवा गोंधळलेला बिलकूल दिसत नव्हता. तिला इतरांपेक्षा निकोलाय जास्त आवडू लागला होता. तो सर्वांकडे सारखंच लक्ष देई व त्याचा स्वभाव अत्यंत प्रेमळ व शांत होता. त्याची वृत्ती पण अगदी समतोल व कटाक्षाने गंभीर राहाण्याची होती. आतासुद्धा तो सर्वांशी पूर्वीप्रमाणेच वागत होता. तरीही इतरांपेक्षा निराळा होता. आतल्या आत स्वतःचं असं गूढ जीवन तो जगत होता, व त्या बाबतीत तो इतरांच्यापेक्षा फार निराळा होता. हा माणूस आपल्यासारखाच आहे याची तिला जाणीव झाली होती व तिला त्याच्याविषयी फार जिव्हाळा व आत्मीयता वाटू लागली होती; पण त्या भावनेचा सगळा अर्थ तिचा तिलाही कळत नव्हता. आता तिला त्याची फार कीव आली, पण ती भावना व्यक्त करण्याचा तिला धीर होत नव्हता. कारण तसं केलं तर निकोलायला संकोचल्यासारखं होऊन तो काहीसा हास्यास्पद दिसला असता व तसा तो दिसायला तिला नको होता.

आई आत जाऊन परत आली तेव्हा निकोलाय साशाशी हस्तांदोलन करीत तिला निरोप देत म्हणत होता: "फारच छान! त्याच्या व तुझ्या असं दोघांच्याही दृष्टीने उत्तम होईल ते! थोडंसं वैयक्तिक सुख मिळणं हे चांगलंच. बरं, तुमची तयारी झाली ना, आई?"

तो आपला चष्मा वर करीत सस्मित मुद्रेने आईकडे पाहात तिच्याजवळ आला.

"बराय! तीन किंवा—फार तर सहा—महिन्यांनी भेटू आता! मला वाटतं की बहुधा सहा महिन्यांच्या वर असणार नाही. हो, सहा महिने म्हणजेही पुष्कळच काळ झाला की! बरं पण तुम्ही स्वतःला सांभाळा! जपून राहा अं! बराय!"

तो दिसायला कृश व नाजुक दिसत होता, पण त्याने आईच्या खांद्यावर हात ठेवले तेव्हा तो चांगला बळकट हातांचा स्पर्श होता. त्याने आईच्या नजरेला नजर भिडवून म्हटलं,

"तुम्हाला असं धरायचं म्हणजे—जसं काही तुमच्यावर प्रेमच करतोय मी!"

तो जोराने हसला.

आईने काही न बोलता त्याच्या कपाळावर व गालांवर ओठ टेकवले. पण तिचे हात मात्र थरथरा कापत होते. त्याच्या ते ध्यानात येऊ नये म्हणून तिने चटकन् हात मागे घेतले.

"उद्याचा दिवस जास्त सावध राहा, बरं का!" तो म्हणाला, "सकाळी आधी एखादा छोकरा पाठवा इथं काय परिस्थिती आहे ते पाहून जायला. लुद्‌मिलाला माहीत आहे असा एक पोरगा. अच्छा, कॉमरेड्स्, नमस्कार. अगदी सगळं व्यवस्थित आहे–"

त्या दोघी बाहेर पडल्यावर साशा हळूच म्हणाली, "त्याला मृत्यूच्या वाटेने जायची वेळ आली तरी तो असाच शांतपणे चालत जाईल–थोड्या लगबगीनेच! अन् मृत्यू त्याच्याकडे पाहू लागेल तेव्हा तो असाच चष्मा वर करून मृत्यूच्या स्वाधीन होण्यापूर्वी म्हणेल, फारच छान!"

"माझा फार जीव जडलाय त्याच्यावर!" आई म्हणाली.

"मला त्याचं आश्चर्य वाटतं, पण त्याच्याबद्दल प्रेम वाटत नाही मला. त्याच्याविषयी अतिशय आदर आहे माझ्या मनात. तो तसा फार प्रेमळ आहे व कधीकधी तर फारच हळूवारही होतो, पण त्याच्यात असं काहीतरी आहे की तो निर्विकारच असावा असं वाटतं... मनुष्य स्वभावाला अनुसरून पाहिजे तितका ओलावा आढळत नाही त्याच्या ठिकाणी... पण ते आपल्या पाळतीवर आहेतसं दिसतंय... आपण एकमेकींचा निरोप घ्यावा हेच बरं. अन् तुमचा पाठलाग सुरूच आहे असं वाटलं तर लुद्‌मिलाकडे जाऊ नका."

"नाही जाणार."

"नकाच जाऊ!" साशाने आग्रहपूर्वक सांगितलं. "मग माझ्याकडेच निघून या तुम्ही. बरं, येते मी. सध्या तरी निरोप घेऊ या."

ती झटकन् मागे वळली व आल्या रस्त्यानेच निघून गेली.

## २८

थोड्याच वेळानंतर आई लुद्‌मिलाच्या लहानशा खोलीत शेगडीशी शेकत बसली होती. लुद्‌मिलाने काळा झगा पेहरला होता व त्यावर एक चामड्याचा पट्टा बांधला होता. ती हळूहळू इकडून तिकडे येरझारा घालीत होती. तिच्या वस्त्रांची सळसळ व तिचा रुबाबदार आवाज खोलीत घुमत होता.

शेगडीतला जाळ आपल्या श्वासागणिक हवा शोषून घेऊन तडतडत व फुरफुरत होता व त्या पार्श्वभूमीवर लुद्‌मिला संथपणे एकाच सुरात बोलत होती,



"लोक तसे दुष्ट नसतात, पण मूर्ख असतात. आपल्या अगदी डोळ्यांसमोरचं, सहजासहजी आकलन होईल तेवढंच त्यांना दिसतं. पण स्वतःच्या अगदी जवळ, हाताशी असेल त्याची किंमत त्यांना वाटत नाही. दूरचं, दुर्लभ असेल तेच लोकांना फार मोलाचं वाटतं. अगदी खोलात जाऊन पाहिलं तर असं दिसत की हे जीवन जर बदललं... अन लोक जर समजूतदार झाले तर प्रत्येकजण अधिक सुखी होईल अन् सर्वांची परिस्थितीसुद्धा सुधारेल. पण ते घडवून आणायला फार काळ लागेल."

ती अचानक आईच्या समोर थांबली व ओशाळल्यागत होऊन दिलगिरीच्या स्वरात म्हणाली, "माझी कुणाशी फारशी भेट होत नाही, अन् होते तेव्हा मी अशी बडबड करीत सुटते! माझं डोकंच फिरलंय असं वाटत असेल तुम्हाला, नाही?"

"का ते?" आईने विचारलं. ही बाई पत्रकं कुठं छापीत असावी हे तिची नजर धुंडाळत होती, पण तिला काहीच पत्ता लागेना. ही खोली तर रस्त्याला लागूनच होती व त्या बाजूला तीन खिडक्याही होत्या. खोलीत एक कोच अन् एक पुस्तकांचं छोटं कपाट, एक मेज, काही खुर्च्या व एक पलंग, एवढं सामान होतं. एका कोपऱ्यात सांडपाण्याचं भांडं व दुसऱ्या कोपऱ्यात चूल होती. भिंतीवर तसबिरी लटकवलेल्या होत्या. प्रत्येक वस्तु नीटनेटकी, स्वच्छ व टापटिपीने ठेवलेली होती. खोलीच्या धनिणीच्या गंभीर व्यक्तिमत्वाची छाप प्रत्येक वस्तूवर व त्या वातावरणावर उमटलेली होती.

इथंच काहीतरी दडवलेलं आहे असं आईला वाटत होतं. पण ते कुठं हे तिला उमजेना. तिने दारांकडे शोधक नजर टाकली. त्यांपैकी एका दारातून ती आली होती. त्या दाराच्या पलिकडे लहानसा दिवाणखाना होता व चुलीजवळच्या दारातून आत शिरल्यावर एक उंच व अरुंद खोली होती.

लुद्‌मिला आपल्याकडे न्याहाळून पाहाते आहे ही जाणीव होऊन काहीशा संकोचाने आई उद्‌गारली, "एका कामासाठी आले होते मी."

"ठाऊक आहे मला. कामाशिवाय कोणीच येत नाही इथं मला भेटायला."

तिचा आवाज आईला विचित्र वाटला. आईने तिच्याकडे निरखून पाहिलं. तिच्या बारीक ओठांवर स्मिताची एक रेखा अस्पष्ट उमटली होती व तिच्या चष्म्याच्या भिंगांतून तिच्या स्थिर नेत्रांतली चमक दिसत होती

आईने तिच्या चेहऱ्यावरची नजर काढून घेतली व तिने पावेलच्या भाषणाचे कागद पुढे केले.

"हे घ्या. हे अगदी शक्य तितक्या लवकर छापून हवंय म्हणून सांगितलंय."

मग तिने निकोलायला अटक होण्याचा संभव असल्याचंही सांगितलं.

लुद्मिलाने काही न बोलता ते कागद कंबरपट्ट्यात खोचले व ती खाली बसली; आगीच्या ज्वाळांचा तांबूस प्रकाश तिच्या चष्म्याच्या भिंगांवर चकाकत होता व तिचा निर्विकार, निश्चल चेहरा त्या प्रकाशात उजळून निघाला होता.

"ते मला पकडायला आले तर मी गोळी घालीन त्यांना!" आईचं बोलणं संपल्यावर ती शांतपणे व निर्धाराने उद्गारली. "मला जुलूम व हिंसेचा प्रतिकार करून स्वतःचं संरक्षण करण्याचा हक्क आहे व इतरांना मी ज्याअर्थी लढ्याचं आव्हान देते त्या अर्थी मला स्वतःला देखील लढा द्यावाच लागेल."

ज्वालेच्या प्रकाशाचा उजाळा आता तिच्या चेहऱ्यावर दिसत नव्हता, व तिची मुद्रा पुनः नेहमीसारखीच कठोर व उग्र दिसत होती.

"याला काय जगणं म्हणायचं!" आईला तिच्याविषयी दयेचा उमाळा येऊन ती स्वतःशीच उद्गारली.

लुद्मिलाने सहज म्हणून पावेलच्या भाषणाचे कागद काढून त्यावरून नजर फिरवायला आरंभ केला. पण ती जसजशी वाचू लागली तसतसं तिला ते आवडू लागलं व मग तिने ते आधाशासारखं सबंध वाचून काढलं. ते वाचून संपताच ती उठली, तिने खांदे झटकले व ती आईपाशी येऊन म्हणाली,

"फारच चांगलं भाषण आहे हे."

एक क्षणभर थांबून विचारमग्न होत व खाली पहात ती पुढे म्हणाली,

"तुमच्या मुलाबद्दल तुमच्याशी बोलू नये असं मला वाटत होतं. एकतर मी त्याला कधी पाहिलेलं नाही अन् दुसरं म्हणजे कुठल्याही दुःखाच्या गोष्टीबद्दल बोलायला मला आवडत नाही. आपल्या अगदी जवळच्या माणसाला हद्दपारीची शिक्षा झाली म्हणजे कशी कालवाकालव होते ते जाणते मी. पण—पण मी विचार करीत होते की—आपला मुलगा असा निघाला म्हणून तुम्हाला आनंद न् अभिमान वाटतो ना?"



"फार वाटतो."

"भीती नाही ना वाटत?"

"आता नाही," आई म्हणाली. हे म्हणतेवेळी तिच्या चेहऱ्यावर शांत, गंभीर हास्य विलसलं होतं.

लुद्मिलाने डोक्यावरून हात फिरवून केस नीट बसवल्यासारखं केलं व ती खिडकीकडे वळली. तिच्या मुखावर एक क्षणभरच कसलीतरी—बहुधा वर येता येता मागे परतवलेल्या स्मिताची—छाया उमटून गेली.

"मी आता भराभर हे सगळं कंपोज करून टाकते. तुम्ही पडा आता. आजचा सगळा दिवस तुमच्यावर फार ताण पडला आहे, तेव्हा तुम्ही फार दमला असाल. या इथं याच अंथरुणावर झोपा तुम्ही. मी काही आज झोपायची नाही, अन् गरज पडली तर माझ्या मदतीला म्हणून तुम्हाला पण उठवीन. झोपायची तयारी झाली म्हणजे हा दिवा मालवून टाका म्हणजे झालं."

तिने शेगडीत दोन ढलपे टाकले व ती छोटा दरवाजा उघडून पलिकडे गेली. जाताना तिने ते दार घट्ट बंद करून घेतलं. ती जाईपर्यंत तिच्याकडे पाहून मग आई कपडे बदलून झोपण्याची तयारी करू लागली. तिच्या मनात लुद्मिलाबद्दल विचार येत होता,

"हिला कसलं तरी दुःख होत आहे खास!"

आई फारच थकून गेली होती हे खरं, पण तिच्या चित्ताला मात्र शांत न् प्रसन्न वाटत होतं. आपल्याभोवती सर्वत्र कसलातरी सौम्य, शांत प्रकाश पसरला आहे, प्रत्येक वस्तु त्या प्रकाशाने उजळून निघाली आहे व आपलं अंतरंगही त्याने उजळून टाकलं आहे असं तिला वाटत होतं. अशी प्रसन्न शांतता यापूर्वीही तिने अनुभवली होती. मनावर फार ताण पडून भावनांचा कोलाहल माजला की त्यानंतर नेहमीच तिला असं शांत वाटे. एक काळ असा होता की असली शांतताच तिला भेडसावीत असल्यासारखी वाटे, पण आता मात्र तिला अशावेळी फार प्रसन्न वाटे, तिचं मन विशाल होई व भावनांच्या तीव्र आवेगाने ऊर भरून येऊन तिची जीवनावरील श्रद्धा दृढ होण्याला मदत होई.

तिने दिवा मालवून त्या थंडगार झालेल्या अंथरुणावर अंग टाकलं; ब्लँकेट अंगावर ओढून घेताच त्या उबेने तिला फार बरं वाटलं व लवकरच तिला झोप लागली.

तिने डोळे उघडले तेव्हा एक सुंदर हिवाळी सकाळ उजाडली होती व खोलीत सर्वत्र स्वच्छ प्रकाश पसरला होता. लुद्‌मिला कोचावर एक पुस्तक वाचत पडली होती, तिने आई उठलेली पाहाताच वर पाहिलं व तिच्या चेहऱ्यावर फार क्वचित आढळणारं स्मित विलसू लागलं.

"बाई, बाई! शर्थ झाली माझी!" आई संकोचून उद्‌गारली. "काय मेली झोप तरी माझी! फार उशीर झाला का हो?"

लुद्‌मिला म्हणाली, "दहा वाजायला आले. उठा आता, म्हणजे चहा घेऊ आपण."

"तुम्ही उठवलं का नाही मला?"

"मी उठवणारच होते, पण मी तिथं आले तर झोपेतच तुमच्या तोंडावर असं मधुर स्मित उमटलं होतं की तुम्हाला जागं करण्याला माझा जीवच झाला नाही."

लुद्‌मिला झटपट कोचावरून उठून पलंगापाशी गेली व आईच्या अंगावर ओणवी झाली. तिच्या थंड डोळ्यांत सुद्धा आईला तिच्या परिचयाचा व मनाला समाधान देणारा भाव दिसला.

"तुमच्या झोपेत व्यत्यय आणणं बरं वाटेना मला. तुम्हाला बहुधा एखादं सुरेखसं स्वप्न पडत असावं!"

"नाही, तसं काही नव्हतं."

"नसेना, पण तुमच्या चेहऱ्यावरचं स्मित मला फार आवडलं. इतकं शांत न् प्रसन्न होतं ते... कुणालाही भारून टाकणारं..."

लुद्‌मिला हे उद्‌गार काढून हसली. तिच्या हास्यातही मखमलीच मार्दव होतं.

"त्यामुळे मी तुमचाच विचार करू लागले. तुमचं जीवन फार खडतर न् कष्टी आहे, होय ना?"

तिचे हे उद्‌गार यथार्थ आहेत किंवा नाहीत याचा आई विचार करू लागली व तिच्या पापण्या थरथरू लागल्या.

"असणारच तसं!" लुद्‌मिलाच पुनः म्हणाली.

"माझं मलाच सांगता येत नाही!" आई सावकाश सांगू लागली. "कधीकधी वाटतं, फार खडतर आहे हे आयुष्य. पण इतकं सारखं काहीतरी घडत असत—अन् प्रत्येक गोष्ट इतकी महत्त्वाची न् आश्चर्यकारक असते—शिवाय एकामागून एक घटना अशा काही वेगाने घडत असतात की—"



अलिकडे बऱ्याच वेळा आई असं बोलताना फार उत्तेजित होत असे, तसंच याही वेळी झालं. अनेक विचार, कल्पना व दृश्यांनी तिच्या मनात गर्दी करून सोडली. मग ती अंथरुणावरच बसली व संथपणे मनातले विचार शब्दांनी व्यक्त करण्याचा प्रयत्न करू लागली.

"असं सारखं सुरूच असतं—सगळ्याचा हेतु एकच... पण कधीकधी फारच ताण पडून मनाला फार त्रास होतो. लोकांचा छळ होतो, त्यांना मारहाण होते—अगदी निर्दयपणे मारतात... अन् त्यांना सुखाने जगूच देत नाहीत. हे फार फार कठीण वाटतं!"

लुद्‌मिलाने मान मागे टाकली व आईकडे प्रेमळ नजरेने पाहात ती म्हणाली,

"पण हे काही तुम्ही तुमच्या स्वतःविषयी सांगत नाही."

आई अंथरुणातून उठून कपडे चढवू लागली.

"आपल्याला जर सर्वांबद्दलच आपुलकी वाटत असेल तर स्वतःचा एकट्याचा विचार कसा करता येईल बरं? हाही आपला, तोही आपला, सगळेच आपले... सगळ्यांचीच काळजी वाटते व सगळ्यांच्याच आठवणी मनात गर्दी करून सोडतात... मग स्वतःला त्यांच्यापासून निराळं कसं काढायचं?"

आईचे कपडे पूर्ण घालून झाले नव्हते. ती तशीच बोलत व विचारमग्न अवस्थेत खोलीच्या मध्यभागी उभी होती. तिला वाटत होतं की तिच्या मुलाचं रक्षण व्हावं म्हणून धडपडणारी, त्याच्या काळजीने व्याकुळ होणारी स्त्री आपण नव्हेच! ती पूर्वीची स्त्री आता अस्तित्वातच नव्हती, त्या स्त्रीने आता आपला अवतार संपवला असावा, किंवा ती कुठंतरी दूर निघून गेली असावी, किंवा कदाचित् स्वतःच्याच भावनांच्या होमात तिची आहुती पडली असावी व त्या प्रखर अग्निदिव्यामुळे ती तावून सुलाखून शुद्ध होऊन बाहेर पडली असावी व त्यामुळे तिला नवी शक्ती प्राप्त झाली असावी. पण पूर्वीच्या निलोव्‌नाचे अवशेष तर कुठं शिल्लक नाहीत ना अशा भीतीने आई आपल्या अन्तःकरणाचा ठाव घेत होती.

"कसला विचार करताहात तुम्ही?" लुद्‌मिलाने आईच्याजवळ जाऊन विचारलं.

त्या दोघींनी काही न बोलता परस्परांकडे पाहिलं व दोघी हसल्या.

मग लुद्‌मिला खोलीतून आत जायला निघाली. ती जाता जाता उद्‌गारली,

"तिकडे चहाच्या आधणाचं काय झालंय कोण जाणे!"

आई खिडकीतून बाहेर पाहू लागली. बाहेर हिवाळ्यातलं सुरेख कोवळं ऊन पडलं होतं. तिचं चित्तही प्रसन्न होतं. तिला सगळ्याच विषयांवर सारखं बोलावंसं, उत्साहाने बोलतच राहावंसं वाटत होतं. खूप बोलून मन मोकळं करावं, आणि आपल्या अन्तःकरणाला नवा उजाळा आणून देण्याला, तिथं उषेची प्रभा फाकल्यासारखा प्रकाशझोत टाकण्याला कारणीभूत असणाऱ्या व्यक्तीबद्दल वाटणारी कृतज्ञतेची भावना बोलून दाखवावी असं तिला वाटत होते. फार दिवसांनी आज तिला पुनः प्रार्थना करण्याचीही तीव्र इच्छा झाली. तिच्या अन्तश्चक्षूंसमोर एका तरुण व्यक्तीचा चेहरा तरळू लागला व त्या व्यक्तीच्या मुखातून निघालेले शब्द तिच्या कानात घुमू लागले: "ही पावेल व्लासोवची आई!"

मग तिला साशाचा ओलसर, तजेलदार चेहरा दिसू लागला, रिबिनची मूर्ती तिच्या नजरेसमोर उभी राहिली, मग तिच्या मुलाचा धातूच्या पुतळ्यासारखा निग्रही चेहरा दिसू लागला, त्यापाठोपाठ निकोलायचे काहीसे लाजाळू, मिस्किलपणे पाहाणारे डोळे तिला दिसू लागले—आणि मग अचानक या सगळ्या दृश्यांचं एका दीर्घ निःश्वासात रूपांतर होऊन त्यातून इंद्रधनुष्याच्या रंगांच्या छटा असलेला एक विरळ, पारदर्शक मेघ निर्माण झाला. त्या मेघाच्या दृश्यात तिच्या सर्व आठवणी व कल्पना सामावून गेल्या व मग तिच्या चित्ताला शांतता व समाधान लाभलं.

"निकोलायचा अंदाज बरोबर ठरला!" लुद्‌मिला खोलीत येता येता म्हणाली, "त्याला पकडून नेलंय त्यांनी. तुम्ही सांगितलंत त्याप्रमाणे त्या पोराला तिकडे पाठवलं होतं मी. त्या मुलाने येऊन सांगितलं की तिथं बागेत पोलिस होते व एक पोलिस शिपाई फाटकाच्या आड लपून बसलेलाही पाहिला त्याने. गुप्त हेर सगळीकडेच हिंडताहेत. तो पोरगा ओळखतो त्यांना."

"बिचारा!" आई मान हलवीत उद्‌गारली.

तिने सुस्कारा सोडला, पण तो दुःखाचा नव्हता ही जाणीव होऊन तिचं तिलाच आश्चर्य वाटलं.

"अलिकडे तो गावात कामगारांचे अभ्यासवर्ग घ्यायला लागला होता. तेव्हा तो पकडला जाण्याची लक्षणं दिसतच होती!" लुद्‌मिला स्पष्टवक्तेपणाने म्हणाली. तिच्या कपाळावर किंचित् आठ्याही पडलेल्या दिसत होत्या. "त्याच्या सहकाऱ्यांनी त्याला इथून निघून जायला सांगितलं होतं, पण त्याने ऐकलं नाही. मला तर आता वाटायला लागलंय की अशावेळी कॉमरेड्सना पटवून देण्याच्या भानगडीत न पडता सक्तीने पाठवून दिलं पाहिजे!"

इतक्यात एक पोरगा दारात येऊन उभा राहिला. त्याचे केस काळेभोर होते, गाल लाल झालेले होते, त्याचे डोळे सुरेख निळ्या रंगाचे होते व नाकही सरळ, धारदार होतं.

"चहाचं आणू का मी?" त्याने विचारलं.

"हो. आण बरं, सर्गेइ," लुद्‌मिलाने त्याला सांगितलं. मग ती आईकडे वळून म्हणाली, "माझ्याकडेच असतो हा."

आईला आज लुद्‌मिला निराळ्याच रूपात दिसत होती. तिची वागणूक नेहमीपेक्षा सरळ, साधी व मनमिळाऊ होती. तिच्या पिळदार शरीराच्या हालचालीत एक प्रकारची मोहकता व सुंदरता होती, व त्यायोगे तिची फिकट, कठोर मुद्राही काहीशी सौम्य भासत होती. रात्रभर कामापायी जागरण झाल्यामुळे तिच्या डोळ्यांभोवती काळी वर्तुळं उमटली होती व तिच्या अंतरंगातही कसलीतरी खळबळ माजून मनाची तार ताणली गेली असावी असं दिसत होतं.

त्या मुलाने चहादाणी आणली.

"मी तुझी ओळख करून देते अं, सर्गेइ! यांचं नाव पेलाग्येया निलोव्ना. काल ज्या कामगारांना शिक्षा झाली त्यांपैकी एकाच्या आई आहेत ह्या."

सर्गेइने काही न बोलता मान हालवून आईला अभिवादन केलं, तिच्याशी हस्तांदोलन केलं व तो खोलीतून बाहेर गेला. क्षणार्धातच तो पाव घेऊन परत आला व मेजापाशी आपल्या जागेवर बसला. लुद्‌मिला कपात चहा घालीत असता आईला हे पटवून देण्याचा प्रयत्न करीत होती की पोलिस कोणासाठी थांबले होते हे नक्की समजेपर्यंत आईने घरी जाणं योग्य होणार नाही.

"कदाचित् तुमच्यासाठीच थांबले असतील ते. तुमच्याकडून माहिती काढण्यासाठी तुम्हाला पोलिस ठाण्यावर नेण्याचा इरादा असेल त्यांचा."

"असू देत!" आई उद्गारली. "अन् मला धरून नेणार असतील तरी नेऊ देत. काही फारसं बिघडणार नाही त्यामुळे. पण त्यापूर्वी पावेलचं भाषण तेवढं वाटलं गेलं असतं तर बरं झालं असतं."

"कंपोजिंग झालं आहे त्याचं. उद्या आपल्याला शहरात न् कामगारांच्या वस्तीत वाटायला पुरेशा प्रती मिळतील. तुम्ही नाताशाला ओळखता का?"

"अर्थात् ओळखते."

"त्या प्रती तिच्याकडे नेऊन द्यायच्या तुम्ही."

तो पोरगा वर्तमानपत्र वाचीत बसला होता व त्यांच्या बोलण्याकडे लक्ष नसल्यासारखं दाखवीत होता, पण मधूनमधून सारखी त्याची नजर आईकडे वळत होती. तिलाही त्याचे तेजस्वी डोळे फार आवडले व तिने त्याच्याकडे पाहून स्मित केलं. लुद्मिला निर्विकारपणे निकोलायविषयी बोलत होती व तिचा हा रुक्षपणा पाहून आईलाही आश्चर्य वाटलं नाही. बोलता बोलता वेळ झपाट्याने निघून गेला व ते न्याहारी संपवून उठले तेव्हा दुपारी बारा वाजायचा सुमार झाला होता.

"किती उशीर झाला हा!" लुद्मिला उद्गारली.

इतक्यात दारावर कोणीतरी गडबडीने टक् टक् करीत असल्याचा आवाज आला. सर्गेइ उठला व प्रश्नार्थक नजरेने लुद्मिलाकडे पाहू लागला.

"उघड दार, सर्गेइ. कोण असेल बरं?"

ती बिलकुल विचलित न होता खिशात हात खुपसून उभी होती. तिने शांतपणे आईला सूचना दिल्या:

"यदाकदाचित् जर पोलिसच असले तर तुम्ही त्या तिथं कोपऱ्यात उभ्या रहा, आणि तू, सर्गेइ–"

"मला ठाऊक आहे ते," असं म्हणत सर्गेइ बाहेर दार उघडायला गेला.

आईने स्मित केलं. या असल्या सावधगिरीची आता तिला संवय झाली होती. आणि आज संकट येईल असंही तिला वाटत नव्हतं.

झालंही तसंच. दार उघडल्यावर आत आली ती त्या ठेंगण्या डॉक्टरची मूर्ती.

"पहिलं असं की–" तो लगबगीने सांगू लागला. "निकोलायला पकडून नेलंय त्यांनी. अरे वा! तुम्ही इथं आहात वाटतं, निलोव्ना? त्याला पकडलं तेव्हा घरी नव्हता तुम्ही?"



"त्याने आधीच इकडे पाठवलं मला."

"हूं! पण त्याचा फारसा उपयोग होईलसं दिसत नाही. अन् दुसरं असं की काही तरुण मंडळींनी सायक्लोस्टाइलवर त्या भाषणाच्या सुमारे पाचशे प्रती काढल्या आहेत. मी पाहिल्या त्या. काही वाईट नाहीत. स्पष्ट वाचता येतात. त्या लोकांचा विचार या प्रती रात्रीच शहरात वाटून टाकायचा आहे, पण मला ते पसंत नाही. माझं म्हणणं असं आहे की छापलेल्या प्रती शहरात वाटाव्या अन् या त्यांच्या प्रती कुठं तरी दुसरीकडे वाटण्यासाठी राखून ठेवाव्या."

"मी नाताशाकडे घेऊन जाईन त्या!" आई काहीशी उतावळेपणानेच म्हणाली. "मला द्या त्या!"

आपल्या मुलाच्या भाषणाच्या प्रती शक्य तितक्या लवकर वाटून टाकाव्या, त्याचे शब्द पृथ्वीवरच्या सर्व लोकांपर्यंत नेऊन पोचवावे, यासाठी ती फार आतुर झाली होती. आपल्या म्हणण्यावर डॉक्टर काय उत्तर देतो हे पाहण्यासाठी ती त्याच्या चेहऱ्यावर नजर खिळवून उभी होती व तिचे नेत्र त्याची काकुळतीने आर्जवं करीत होते.

"तसं करणं बरोबर होईल की नाही देव जाणे!" तो अनिश्चित स्वरात उद्गारला व खिशातून घड्याळ काढून वेळ पहात म्हणाला, "बारा वाजायला वीस मिनिटं आहेत आता. दोन वाजून पाच मिनिटांनी एक गाडी आहे, ती सव्वापाचला पोचेल तिथं. म्हणजे संध्याकाळच, पण फार उशीर नाही. पण मुख्य प्रश्न आहे तो तो नव्हे–"

"नाही, तो नव्हेच–" लुद्मिला नाखुषीने म्हणाली.

"काय आहे महत्त्वाचा प्रश्न?" आईने त्याच्याजवळ सरकून विचारलं. "काम व्यवस्थित पार पडलं पाहिजे हाच ना?"

लुद्मिलाने शोधक नजरेने आईकडे पाहिलं.

"तुम्ही ते करण्यात धोका आहे," ती कपाळावर हात फिरवीत म्हणाली.

"का?" आईने अट्टाहासाने विचारलं.

"त्याचं कारण असं की," डॉक्टर अडखळत बोलू लागला, "निकोलायला अटक होण्यापूर्वी एकच तास आधी तुम्ही तिथून निघालात. आता समजा, तुम्ही कारखान्यात गेलात–तिथं तुम्हाला निकोलायची आत्या

म्हणून ओळखतातच. त्यानंतर थोड्याच वेळाने तिथं बेकायदेशीर पत्रकं सापडली म्हणजे तुमची मान अडकलीच की –"

"उं – मला कोणी पाहाणार नाही –" आई उतावीळपणे सांगू लागली. "अन् परत येते वेळी मला त्यांनी अटक केली अन् कुठं गेली होतीस म्हणून विचारलं तर –"

आई जरा विचारात पडली. पण क्षणभरच थांबून ती पुनः सांगू लागली, "तर काय सांगायचं ते ठाऊक आहे मला. तिथून मी सरळ कामगारवस्तीत सिझोव नावाचा म्हातारा राहातो, त्याच्या घरी जाईन. अन् मला कुणी विचारलं तर सांगेन की त्याच्या पुतण्यालाही काल सजा झाली म्हणून मी त्याच्या घरी गेले होते, खटला संपल्यावर आम्ही दोघंही समदुःखी म्हणून एकमेकांचं सांत्वन करीत होतो. मी असं सांगितलं तर सिझोव माझ्या म्हणण्याचं समर्थन करील –"

एवढं सांगितल्यावर तरी ते आपलं म्हणणं कबूल करतील अशा खात्रीने व त्यांनी लवकर निर्णय घ्यावा या अपेक्षेने ती त्यांना ते पटवून देण्याचा प्रयत्न करू लागली.

"बरं तर, न्या तुम्हीच! मग तर झालं?" अखेर डॉक्टरने संमती दिली.

लुद्‌मिला काहीच बोलली नाही. ती विचारात गढून जाऊन येरझारा घालीत होती. तिचा चेहरा उतरलेला व गळून गेलेला दिसत होता. तिला आपलं मस्तक छातीवर पडू न देता ताठ ठेवण्यासाठी किती कष्ट पडत होते हेही तिच्या मानेच्या शिरा फुगल्या होत्या त्यावरूनच स्पष्ट होत होतं.

तिची ही अवस्था ओळखून, आई हसत हसत तिला म्हणाली, "तुम्ही माझी काळजी करता, पण स्वतःची मात्र मुळीच फिकीर करीत नाही."

"नक्कीच करतो आम्ही!" डॉक्टर म्हणाले. "करावीच लागते आम्हाला स्वतःची काळजी. इतकंच काय पण जे स्वतःची शक्ती व्यर्थ वाया दवडतात त्यांच्या बाबतीत फार कडकपणे वागतो आम्ही. बरं, पण – तुम्हाला स्टेशनवर त्या प्रती मिळतील."

त्या बाबतीतला तपशील त्याने आईला समजावून दिला. शेवटी तो म्हणाला,

"अच्छा! तुम्ही सर्व काम पार पाडून सुखरूप परत या हीच इच्छा!"

पण तो बाहेर गेला तेव्हा कशाबद्दलची तरी नाखुषी त्याच्या चेहऱ्यावर दिसत होती.



लुद्‌मिला आईजवळ येऊन मंदस्मित करीत तिला म्हणाली, "मला तुमचं मन समजतं."

तिने आईचा हात हातात घेतला व तिला जोडीला घेऊन खोलीतल्या खोलीत येरझारा घालणं सुरू केलं.

"मला सुद्धा एक मुलगा आहे," ती सांगू लागली, "तो तेरा वर्षांचा आहे, पण त्याच्या वडिलांजवळ राहातो तो. माझे पती सहायक सरकारी वकील आहेत. त्यांच्याजवळच असतो मुलगा आमचा. त्याचं काय होईल हा विचार नेहमी माझ्या मनात येतो –"

तिचा कंठ दाटून आला.

"मी ज्या लोकांसाठी झटते व जी जनता जगातल्या सर्व लोकात फार चांगली आहे असं मानत असल्यामुळे मला फार आवडते त्या जनतेच्या एका कट्टर शत्रूकडे माझा मुलगा राहातो, त्या वातावरणात वाढून माझा मुलगा माझाच शत्रू होणं सुद्धा अशक्य नाही. पण मला तर त्याला जवळ ठेवणं शक्य नाही. मी स्वतःच खोटं नाव धारण करून राहातेय. माझ्या मुलाला गेल्या आठ वर्षांत पाहिलं नाही मी – आठ वर्षं! किती दिवस झाले!"

ती खिडकीपाशी थबकली व बाहेर फिकट, शून्य आकाशाकडे तिने दृष्टी लावली.

"तो माझ्याजवळ राहात असता तर माझं मन आणखीच पक्कं झालं असतं. माझ्या मनाला ही सारखी व्यथा लागून राहिली आहे ती राहिली नसती... यापेक्षा तर तो मरून गेला असता तरी मला इतकं जड गेलं नसतं..."

"अरेरे! किती अभागी!" आई उसासा टाकून म्हणाली. तिचं मातृहृदय त्या करुण कहाणीने शतशः विदीर्ण झालं होतं.

"तुम्ही किती भाग्यवान्!" लुद्‌मिला स्मित करून उद्‌गारली. "आई अन् मुलगा एकाच कार्यात खांद्याला खांदा लावून लढताहेत हे दृश्य किती विलोभनीय आहे – आणि असं उदाहरण फार क्वचित सांपडतं."

"हो, आहे खरंच विस्मयजनक!" आई म्हणाली व तिचं तिलाच आश्चर्य वाटलं. मग एखादं गुपित सांगावं तसं ती खालच्या आवाजात म्हणाली, "आपण सगळेच – तुम्ही, निकोलाय इवानोविच, सत्याचा शोध घेण्यासाठी धडपडणारे सगळेचजण, आपण सर्वच खांद्याला खांदा लावून

लढत आहोत! अचानकपणे आपलं सगळ्याचं हे नातं जुळलं – मला तुम्हा सर्वांचं मन कळतं. तुम्ही काय म्हणता ते सगळंच्या सगळं मला नेहमी समजतं असं नाही, पण बाकी इतर सगळं मात्र मला समजतं."

"हो – आहे काहीसं तसंच –" लुद्‌मिला पुटपुटली. "हो – तसंच आहे –"

आईने लुद्‌मिलाच्या छातीवर हात ठेवला व जणू काय आपण जे बोलत आहोत ते मनश्चक्षूंसमोर प्रत्यक्षच चित्र दिसतंय अशा रीतीने ती कुजबुजल्यागत बोलू लागली.

"आपली मुलं जगात सगळीकडे हिंडताहेत – मला दिसतंय ते – हो जगात सगळीकडेच अन् सगळे एकाच ध्येयाच्या दिशेने जाताहेत. अन्तःकरणाने अत्यंत शुद्ध, मनाने अत्यंत निर्मळ व बुद्धीने अत्यंत हुशार असलेले हे सर्वजण जे जे म्हणून वाईट व दुष्ट त्याच्याविरुद्ध लढत आहेत व असत्याला आपल्या पायाखाली चिरडून काढीत आहेत. ते तरुण व सशक्त आहेत व त्यांची सर्व शक्ती एकच गोष्ट प्राप्त करण्यासाठी खर्ची पडत आहे – ती गोष्ट म्हणजे न्याय! ते या जगातून मानवी दुःखाचं कायमचं उच्चाटन करण्यासाठी, पृथ्वीच्या पाठीवरून दारिद्र्य व दुर्दैव ही चीज नामशेष करण्यासाठी सज्ज झालेले आहेत, कुरूपतेवर, विद्रूपतेवर मात करण्यासाठी ते झटत आहेत, व या लढ्यात ते विजयी होणार यात तिळमात्र संशय नाही! त्यांच्यापैकी एकजण म्हणाला त्याप्रमाणे ते एका नव्या सूर्याला प्रकाशमान करू पाहात आहेत – व ते ते करतीलच! सर्व दुःखी व गांजलेल्या अन्तःकरणाच्या, भंगलेल्या हृदयाच्या लोकांना एक करणं हे त्यांचं ध्येय आहे, व हे ऐक्य ते साधतीलच!"

मध्यंतरीच्या काळात तिला ज्या प्रार्थनांचा विसर पडला होता त्यातील शब्द तिला पुनः आठवू लागले; ते शब्द स्फुल्लिंगांप्रमाणे वर उडून तिच्या अंतरंगात एक नव्या निष्ठेची ज्योत प्रज्वलित होऊ लागली.

ती पुढे बोलतच होती,

"आपली मुलं सत्याच्या व न्यायाच्या मार्गाने जात आहेत; मानवी अन्तःकरणात प्रेमाचा स्रोत वाहवून लोकांना एका नव्या स्वर्गाचं दर्शन घडवीत आहेत व पृथ्वीवर एका नव्या प्रकाशाचा – कधीही न मालवणाऱ्या आत्म्याच्या प्रकाशाचा – अग्नी प्रज्वलित करीत आहेत. या अग्नीच्या ज्वालांतून एक नवं जीवन उदयाला येत आहे, आपल्या मुलांच्या अन्तःकरणात अखिल



मानवतेविषयी वाहाणाऱ्या अखंड प्रेमाच्या झऱ्यातून या नव्या जीवनाचा ओघ सर्वत्र फैलावत आहे. ह्या प्रेमाचा दीप कोण मालवू शकेल? कोण? ते नष्ट करण्याचं सामर्थ्य कोणत्या शक्तीत आहे? कोणतीही शक्ती त्या प्रेमाला विरोध करण्याला समर्थ आहे का? धरतीमातेनेच या प्रेमाला जन्म दिला आहे व प्रत्यक्ष जीवनालाच या प्रेमाच्या दिग्विजयाची तळमळ लागून राहिली आहे – प्रत्यक्ष जीवनाला!"

आपल्या या भावनांचा आवेग तिचा तिलाच असह्य होऊन आई दूर जाऊन एकदम खाली बसली. तिचा श्वास जोराने चालत होता.

लुद्‌मिलाही दूर गेली पण ती शांत, सावध होती. आपल्या हातून कशाची तरी मोडतोड तर होणार नाही, अशीच जणू तिला भीती वाटून ती जपून चालत होती. सावकाशपणे ती खोलीत येरझारा घालीत होती. तिची निर्विकार दृष्टी समोर रोखलेली होती. ती अचानक जास्त उंच, ताठ व कृश झाल्यासारखी दिसत होती. तिचा कृश, गंभीर चेहरा तिची एकाग्रता दर्शवीत होता व तिने आपले ओठ गच्च आवळून धरले होते.

खोलीतल्या त्या शांततेमुळे आईच्या मनातली खळबळही लवकरच थांबली. लुद्‌मिलाची अस्वस्थता पाहून तिला अपराध्यासारखं वाटून ती म्हणाली,

"मी काहीतरी जे बोलायला नको असं बोलले तर नाही ना?"

लुद्‌मिलाने वळून दचकल्याप्रमाणे तिच्याकडे पाहिलं. मग काहीतरी थोपवून धरीत असल्यासारखा हात पुढे करून ती लगबगीने म्हणाली,

"नाही, तसं काही नाही. तुम्ही म्हणालात ते खरंच आहे. पण आता आपण त्याबद्दल आणखी बोलू नये हेच बरं. तुम्ही म्हणालात तेवढंच पुरे सध्या."

मग ती बरीच शांत होऊन आईला म्हणाली, "तुम्हाला लवकर निघायलाच हवं. फार लांब जायचंय तुम्हाला."

"मला किती आनंद झालाय म्हणून सांगू मी! माझ्या स्वतःच्या मुलाचे, माझ्या रक्तामांसापासून बनलेल्या पोटच्या पोराचे शब्द इतरांना ऐकविण्यात किती अवर्णनीय सुख आहे! आपल्या स्वतःच्या आत्म्याचा अंशच दान करण्यासारखं आहे ते!"

तिच्या चेहऱ्यावर स्मित उमटलं, पण त्या स्मिताचं फारच अंधुक प्रतिबिंब लुद्‌मिलाच्या चेहऱ्यावर व्यक्त झालं. आईला वाटलं की या

आपल्यापेक्षा लहान स्त्रीने जो संयम धारण केला आहे त्यामुळे आपल्या स्वतःच्या आनंदावरही विरजण पडत आहे. मग एकदम आईला अशी तीव्र इच्छा झाली की आपल्या अन्तःकरणातील हा भावनांचा आवेग व या ऊर्मी तिच्या कठोर हृदयातही घुसवल्याच पाहिजेत व आपल्या अन्तर्यामी ओसंडून राहिलेल्या आनंदाला या स्त्रीची साद मिळवलीच पाहिजे. या इच्छेने भारावून जाऊन तिने लुद्‌मिलाचे दोन्ही हात हातांत घेऊन ते जोराने दाबीत तिला म्हटलं,

"बाई ग! असा एक प्रकाश आहे की जो सर्वांना मार्ग दाखवतो व एक वेळ अशी येईल की सर्वांना तो मार्ग दिसू लागेल व सर्वजण अन्तःकरणपूर्वक त्या मार्गाचं अनुकरण करतील—ही जाणीव असणं हीच किती आनंदाची गोष्ट आहे!"

आईचा रुंद, प्रेमळ चेहरा क्षणभर उजळल्यासारखा झाला, तिचे डोळे चमकू लागले व जणू त्या तेजःकणाला उंच भरारी मारण्याला मदत व्हावी म्हणून पापण्याही पंखांप्रमाणे फडफडू लागल्या. तिच्या अन्तरंगात अत्यंत उच्च व उदात्त विचारांना भरती आली होती व त्या विचारांशी समरस होऊन ती आपलं सर्वस्व, आपला आजवरचा सर्व अनुभव, सर्व दुःख त्यात मिसळून टाकत होती. या विचारांचं सार काढून त्याला शब्दांचं रूप देण्यासाठी, तेजस्वी रत्नांप्रमाणे चमकणाऱ्या उज्ज्वल शब्दांनी ते विचार व्यक्त करण्यासाठी, ती धडपडत होती. ते शब्द तिच्या अन्तःकरणात सूक्ष्म स्वरूपात उदयाला येऊन विशाल रूप धारण करीत होते, व वसंतऋतूतल्या सूर्याच्या तेजाने प्रकाशमान होऊन त्यांची अधिकाधिक उज्ज्वल प्रभा फाकली जात होती.

"एखादा नवीन ईश्वरच मानवाच्या पोटी जन्माला यावा तसं झालंय हे!" ती पुढे सांगत होती, "प्रत्येक वस्तु सर्वांसाठी—अन् सर्वजण प्रत्येकासाठी! मला तरी त्याचा अर्थ समजतो तो हा. सत्य गोष्ट अशी आहे की आपण सर्व कॉमरेड्स आहोत, परस्परांशी निगडित असे बांधव आहोत व एकाच धरतीमातेची लेकरं आहोत—व ही धरतीमाता हेच सत्य आहे!"

आई पुनः भावनांच्या आवेगाने भारावून गेली. ती क्षणभर थांबली. तिने दीर्घ श्वास घेतला व दोन्ही हात लांब करून ती म्हणाली,



"आणि मी जेव्हा स्वतःशीच 'कॉमरेड्स' हा शब्द उच्चारते तेव्हा ते सर्व पुढे जात असल्याचा आवाज माझ्या अन्तःकरणात घुमू लागतो!"

तिच्या मनातला हेतू सफल झाला होता. लुद्‌मिलाचा चेहरा उजळून निघाला होता, तिचे ओठ थरथरत होते व तिच्या गालांवरून मोठाले अश्रुबिंदू ओघळत होते.

आईने तिला जवळ घेऊन कुरवाळलं व हृदयातील विजयाच्या आनंदाची भावना व्यक्त करणारं मंदस्मित आईच्या मुखावर विलसू लागलं.

त्या दोघींनी एकमेकींचा निरोप घेतला तेव्हा लुद्‌मिला आईच्या मुखाकडे दृष्टिक्षेप टाकून हळूच उद्‌गारली,

"तुमच्या सहवासाचा लाभ म्हणजे किती मोठा सुखाचा ठेवा आहे हे तुम्हाला ठाऊक तरी आहे का?"

## २९

आई बाहेर पडली तसा हवेतला चावरा गारठा तिच्या अंगाला झोंबू लागला. तिच्या नाकाचा शेंडा लाल झाला व तिला श्वास घेणं कठीण झालं. ती उभ्या जागी थांबून भोवताली पाहू लागली. कोपऱ्यावर केसाळ टोपी घातलेला एक घोडागाडीचा कोचमन उभा होता. त्याच्या पलिकडे एक माणूस कुबड निघाल्यासारखा वाकून रस्त्याने चालला होता. त्याच्यापुढे एक सैनिक हाताने कान चोळीत पळत जात होता.

"या शिपायाला दुकानात पाठविलेलं दिसतंय त्यांनी!" असं स्वतःशीच म्हणत आई आपल्या रस्त्याने चालू लागली. चालताना पायाखाली बर्फ सरकून त्याचा खसखस आवाज येत होता तो ऐकून तिला फार बरं वाटत होतं.

गाडी सुटण्याच्या वेळेच्या पुष्कळच आधी ती स्टेशनवर पोचली. घाण, धुराने काळवंडलेली तिसऱ्या वर्गाच्या उतारूंसाठी असलेली वेटिंगरूम माणसांनी गच्च भरली होती. कडाक्याच्या थंडीमुळे बाहेर लाइनवर काम करणारे कामगार, तसेच गाड्यांचे कोचमन व पुष्कळसे घरदार नसलेले, कसेबसे कपडे अंगावर चढविलेले असे लोकही तिथंच एकत्र झाले होते. त्या गर्दीत प्रवासाला निघालेले उतारूही अर्थात् होतेच. त्यात काही शेतकरी होते, लोकरीचा जाड कोट घातलेला एक गलेलठ्ठ व्यापारी होता, एक पाद्री

व तोंडावर देवीचे वण असलेली त्याची मुलगी होती. पाचसहा सैनिक होते, व काही सारख्या तक्रारी करणारे धंदेवाले लोकही होते. काही लोक धूम्रपान करीत बडबड करीत होते; तर काहींचं चहापान व काहींचं वोद्‌का पिणं सुरू होतं. मधूनच उपहारगृहात कुणी तरी खदखदा हसताना ऐकू येत होतं. सगळ्या वातावरणात धूर भरलेला होता. दार उघडताना कर्रकर्र आवाज होत होता, व ते जोरात आपटून बंद की खिडक्यांची तावदानं थाड् थाड् आपटत होती. तंबाखू व खारवलेले मांस यांच्या उग्र वासाने सगळं वातावरण कुंद झालं होतं.

दाराजवळच सहज दिसू शकेल अशी एक जागा पकडून आई बसली व गाडीची वाट पाहू लागली. दार उघडलं की थंडगार वाऱ्याची झुळुक येई ती तिला फार आल्हादकारक वाटे व ती दीर्घ श्वास घेऊ लागे. आत येणाऱ्यांपैकी बहुतेकांजवळ सामानाची बोचकी असत ती हटकून दारात अडकत. लोक चिडून शिव्याशाप देत ती बोचकी खाली जमिनीवर अथवा बाकांवर पटकून देत, व कपड्याच्या बाह्या व कॉलरीवर आणि दाढीमिशांवर साचलेलं पांढरं बर्फ झटकून टाकता टाकता धापा टाकीत उभे राहात.

काही वेळाने एक तरुण हातात एक तांबडी चामड्याची बॅग घेऊन दारातून आत आला; त्याने क्षणार्धात आजूबाजूला पाहून घेतलं व मग तो सरळ आईजवळ येऊन उभा राहिला.

"मॉस्कोला चाललात?" त्याने विचारलं.

"हो, तान्याकडे जातेय," तिनं उत्तर दिलं.

"हे घ्या."

त्याने ती बॅग बाकावरच तिच्या बाजूला ठेवली, एक सिगारेट शिलगावली, डोक्यावरची हॅट नीट केल्यासारखं केलं व तो दुसऱ्या दरवाजाने निघून गेला. आईने बॅगेच्या चामड्यावरून हात फिरवला व त्यावर कोपर ठेवून ती समाधानी मुद्रेने भोवतालच्या लोकांचं निरीक्षण करू लागली. मिनिटभराने ती तिथून उठली व बाहेर पडण्याच्या दाराजवळच्या एका बाकाकडे निघाली. तिथं जाताना ती मान ताठ करून आजूबाजूच्या लोकांचे चेहरे न्याहाळीत चालत होती. तिच्या हातातली बॅग फारशी जड नव्हतीच, त्यामुळे तिला ती उचलताना श्रम पडत नव्हते.

अचानक एक लांडा कोट घातलेला व कॉलर ओढून घेतलेला तरुण



इसम तिच्या समोर येऊन थांबला. तो काही न बोलता बाजूला झाला व त्याने आपली हॅट किंचित् वर उचलली. त्याचा चेहरा आईला ओळखीचा वाटला. तिने मागे वळून पाहिलं तो तो मान उंचावून आपल्या निस्तेज डोळ्यांनी तिच्याकडे पाहात होता. त्याची ती नजर सुरीच्या तीक्ष्ण पात्यासारखी तिला बोचली. ज्या हाताने तिने बॅग धरली होती त्या हाताला झटका बसल्यासारखं होऊन ती बॅग एकदम तिला फार जड भासू लागली.

"मी याला कुठंतरी पाहिलं आहे खास!" ती स्वतःशीच उद्‌गारली. त्याच्या भेदक नजरेने ती अस्वस्थ झाली होती, पण आपण त्याला कुठं पाहिलं असावं हे आठवण्याचा प्रयत्न करून ती अस्वस्थता घालविण्याचा तिचा प्रयत्न सुरू होता. कसला तरी भयंकर विचार तिची छाती दडपून टाकीत होता, व तो विचार झटकून टाकण्याची तिची धडपड सुरू होती. पण त्या प्रयत्नाला न जुमानता ती कल्पना तिच्या मनात घर करून तिला जोरात भेडसावू लागली होती. तिच्या घशाला व तोंडालाही कोरड पडली होती. तिला न राहवून तिने पुनः मागे वळून त्याच्याकडे पाहिलं: तो तिथंच उभा राहून काय करावं अशा विचारात पडल्यासारखा पायांची चाळवाचाळव करीत होता. त्याने आपला डावा हात खिशात खुपसला होता व उजवा हात कोटाच्या गुंड्यांच्या मध्ये अडकवलेला होता. तो असा उभा होता की त्याचा उजवा खांदा डाव्या खांद्यापेक्षा उंच दिसत होता.

आईने पुढे जाऊन एका बाकावरची जागा पकडली व अगदी हळूच, जणू काही तिच्या अन्तर्यामी काही तरी फार नाजुक वस्तू असून तिला धक्का लागू नये अशी काळजी घेतल्यासारखं सावकाश, ती खाली बसली. मनात शंकाकुशंकांनी घर केल्यामुळे ती स्मरणशक्तीला ताण देऊन या इसमाला आपण पूर्वी कुठं पाहिलं असावं याची आठवण करू लागली. मग तिला एकदम आठवलं की एकदा नव्हे, चांगला दोनदा तिला तो दिसला होता. एकदा रिबिन तुरुंगातून निसटला तेव्हा गावाबाहेरच्या मोकळ्या मैदानात व दुसऱ्यांदा खटल्याच्या वेळी कोर्टाच्या आवारात. मग तिला हेही आठवलं की रिबिन तुरुंगातून निसटला त्यावेळी ज्या पोलिस अधिकाऱ्याला रिबिन त्या मार्गाने गेला असं सांगून भलत्याच दिशेला आपण पिटाळलं होतं तो अधिकारी कोर्टात तिच्या बाजूलाच उभा होता. मग तिला एकदम तीव्रतेनं जाणवलं की त्यांनी खात्रीने तिच्यावर पाळत ठेवून तिचा पाठलाग सुरू ठेवला आहे.

"म्हणजे सापडले का मी तावडीत?" तिने स्वतःच्या मनाला प्रश्न केला.

"अजूनही निसटणं शक्य आहे की!" ती किंचित् थरारून स्वतःच उत्तरली.

"उं हूं! सापडलेच मी!" वस्तुस्थितीला तोंड देण्याच्या निर्धाराने ती पुनः उद्‌गारली.

तिची नजर भोवताली फिरत होती, पण तिला दिसत मात्र काहीच नव्हतं. नाना विचार व कल्पना मात्र आगीतून बाहेर पडणाऱ्या ठिणग्यांप्रमाणे तिच्या मनात येऊन जात होत्या.

"ही बॅग इथंच ठेवून निघून जाऊ का मी?"

मग तिच्या मनात लगेच एक दुसरा विचार आला.

"काय? माझ्या मुलाचे शब्द टाकून निघून जायचं? ते या अशा लोकांच्या हाती पडू द्यायचे?"

तिने दोन्ही हातांनी ती बॅग गच्च धरली.

"ही बॅग घेऊन पळून जाऊ का?" हे विचार तिला कुठल्या तरी बाहेरच्या शक्तीने आपल्यावर लादल्यासारखे, आपल्या शत्रूसारखे भासले, तिचं काळीज फाडून जळत्या दोऱ्याने टाके घालावे तसे बोचले तिला. ते दुःख तिला इतकं तीव्रतेने जाणवू लागलं की तिला स्वतःचा विसर पडला, इतकंच नव्हे तर पावेलचा व तिला जे जे म्हणून प्रिय झालं होतं त्या सर्वांचा काही वेळ विसर पडला. कसला तरी भयंकर दाब आपल्या खांद्यांवर व छातीवर पडून आत्यंतिक भीतीमुळे आपले प्राण कंठाशी आले आहेत असं तिला वाटू लागलं. तिच्या कानशिलाच्या शिरा ताडताड उडू लागल्या व ती उष्णता मस्तकात भिनून केसांच्या मुळांपर्यंत जाऊन पोचली.

मग अचानकपणे तिने आपल्या इच्छाशक्तीचे सर्व बळ एकवटून हे विचार दूर झुगारून दिले व या सर्व क्षुद्र कल्पनांची उचलबांगडी करून ती स्वतःलाच उद्देशून स्वतःची तीव्र निर्भत्सना करीत उद्‌गारली, "धिक्कार असो तुझा!"

हे करताच तिला फार बरं वाटलं. तिला मोठा धीर आला व ती स्वतःला सावरून उद्‌गारली, "बाई ग! तुझ्या मुलाच्या उज्ज्वल कीर्तीला कलंक लागेलसं तू काही करता कामा नये! तुला कशाची भीती वाटते ग, अं?"



तिच्या मनश्चक्षूंसमोर एक मंद, संथ, बुजरी नजर उभी राहिली. रिबिनचा चेहरा तिला दिसू लागला. काही क्षण तिची जी चलबिचल झाली तीमुळे तिचा निर्धार पक्का झाला होता. आता तिच्या हृदयाचे ठोके संथपणे पडू लागले होते.

"आता काय होईल बरं?" ती सभोवताली दृष्टिक्षेप करीत स्वतःशीच म्हणाली.

तिचा पाठलाग करणाऱ्या त्या हेराने स्टेशनवरच्या एका पहारेकऱ्याला बोलावलं व डोळ्याने तिचा निर्देश करून त्याच्या कानात काहीतरी सांगितलं. त्या पहारेकऱ्याने त्या इसमाकडे पाहिलं व मग काढता पाय घेतला. मग दुसरा पहारेकरी तिथं आला व त्याने त्या हेराचं म्हणणं ऐकून घेतलं; मग त्याच्या कपाळावर आठ्यांचं जाळं पसरलं. हा दुसरा पहारेकरी म्हातारा होता; त्याची अंगकाठी उंच होती, त्याचे केस पांढरे झाले होते व दाढी वाढलेली होती. त्याने त्या हेराकडे पाहून मान हालवली व मग तो आई बसली होती त्या बाकाकडे जायला निघाला. तिकडे तो हेर अदृश्य झाला.

तो पहारेकरी सावकाश पावले टाकीत, आईकडे रागाने पहात येत होता. आईचा बसल्या जागीच जीव गोळा झाला.

"हे मला मारणार तर नाहीत?" ती स्वतःशीच म्हणाली.

तो तिच्या समोरच येऊन उभा राहिला, पण एक मिनिटभर काहीच बोलला नाही.

"कशाकडे पहातेस तू?" त्याने अखेर तोंड उघडून विचारलं.

"कशाकडे नाही."

"अस्सं! चोरच्या चोर अन्–या वयात असले धंदे?"

त्याचे शब्द–ते शब्द नव्हतेच; सुरीचे तीक्ष्ण वार होते ते. त्याची वाणी इतकी गलिच्छ व दुष्ट होती की कोणीतरी गालांची साल ओढून ते रक्तबंबाळ करावे किंवा डोळे काढावे अशा भयंकर दुःखाने ती विव्हळ झाली.

"कोण, मी? मी चोर? साफ खोटं आहे ते!" ती ह्या गलिच्छ आरोपाने संतापून जाऊन आवेशाने ओरडली. ती रागाने कापू लागली. तिने हातातल्या बॅगला एक झटका देताच तिचं झाकण मोकळं झालं.

"पहा! सगळेजण पहा हो!" ती ओरडली व मूठभर पत्रकं काढून तो हात उंच करून ती ताडकन् उडी मारून उभी राहिली. तिच्या कानांत

तिचं स्वतःचंच ओरडणं घुमत होतं तरी सगळ्या बाजूंनी लोक धावत येऊन आश्चर्योद्गारं काढू लागले ते तिला स्पष्ट ऐकू येत होते.

"काय झालं?"

"त्या तिथं—एक हेर—"

"काय—काय?"

"ते म्हणतात ती चोर आहे—"

"दिसते तर चांगली सभ्य बाई! चक्, चक्!"

"मी चोर नाही!" आई जोरात ओरडली. आपल्या भोवती गर्दी जमा झालेली पाहून भावनांच्या आवेगाने तिचा कंठ दाटून आला होता.

"काल एक राजबंद्यावरचा खटला झाला—" ती सांगू लागली, "त्यात माझा मुलगाही एक होता. त्याचं नाव पावेल व्लासोव. त्याने एक भाषण केलं. ते भाषणच आहे हे. लोकांनी हे भाषण वाचून सत्य समजून घ्यावं म्हणून लोकांना देण्यासाठीच मी प्रती आणल्या आहेत या!"

कोणीतरी कुतूहलाने तिच्या हातातलं एक पत्रक घेतलं. तिने ती पत्रकं हवेत उडवून जमावात फेकून दिली.

"तुम्हाला नक्कीच या गुन्ह्याबद्दल कडक सजा देतील ते!" कुणी एकजण भेदरलेल्या आवाजात उद्गारला.

लोकांनी उत्सुकतेने ती पत्रकं घेऊन कोटात व खिशात दडवली. ते पाहून आईला पुनः धीर व उत्साह आला. ती आता अधिक आवेशाने पण संथपणे बोलू लागली. तिच्या हृदयात अभिमान व आनंद उचंबळून येत होता व त्या जाणिवेने तिला फार आत्मविश्वास वाटत होता. ती बोलता बोलताच बॅगेतून पत्रकं काढून डावीउजवीकडे उधळीत होती व लोक आतुरतेने ती हस्तगत करण्यासाठी पुढे हात करीत होते.

"माझा मुलगा व त्याचे सहकारी यांच्यावर त्यांनी खटला कशासाठी भरला ते ठाऊक आहे का तुम्हाला? मी सांगते तुम्हाला. मी एक आई आहे हे लक्षात घ्या व माझे पांढरे केस पाहा, म्हणजे मी खोटं सांगणार नाही हे पटेल तुम्हाला. या तरुणांनी सत्य लोकांसमोर ठेवलं हाच काय तो त्यांचा अपराध! अन् काल मी हे पाहिलं की त्या सत्याचा इन्कार करण्याची मात्र हिंमत कुणाची नाही—अगदी कुणाची सुद्धा नाही!"

लोकांची गर्दी वाढत होती व सगळेजण शांत होते. आता त्यांच्या देहांचं एक कडंच आईच्या भोवती उभारलं गेलं होतं.



"लोक काम करतात न् मरमर राबतात, त्या मोबदल्यात काय मिळतं त्यांना? तर दारिद्र्य, उपासमार अन् रोगराई! आपल्या नशिबी सदा कष्ट न् दुःखच! सारा जन्म नुसता राबण्यात जातो, एक दिवस चुकत नाही ते—अगदी रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत कष्ट करावे, अन् तरी सुद्धा मिळकत काय तर सदैव घाणीत राहावं, सदैव फसवणुकीला व लुबाडणुकीला बळी पडावं, हीच! आमच्या श्रमाचा लाभ दुसरेच घेतात, तेच चैनीत न् सुखात राहातात, अन् आपल्याला मात्र साखळीला बांधलेल्या कुत्र्याप्रमाणे अज्ञानाच्या साखळीने डांबून ठेवतात—त्यामुळे आम्हाला काहीच समजत नाही—आम्हाला सदैव भीती दाखवून भेडसावीत राहातात, त्यामुळे आपल्याला सारखी प्रत्येक गोष्टीची भीतीच वाटत राहाते. अशा प्रकारे आपलं आयुष्य म्हणजे कधी न संपणारी काळरात्रच वाटते आपल्याला!"

"खरं आहे ते!" कुणीतरी थंडपणे म्हणालं.

"तिचं तोंड बंद करा रे!"

गर्दीतल्या लोकांच्या मागच्या बाजूला तो हेर दोन शिपायांना घेऊन येत असलेला आईला दिसला. तिने भराभर उरलेली पत्रकं वाटून टाकण्याच्या हेतूने बॅगमध्ये हात घातला तर कुणाचा तरी हात तिच्या हाताला लागला.

"घ्या, घ्या!" ती ओणवी होत म्हणाली.

"चालते व्हा इथून! दूर हटो!" ते शिपाई लोकांना बाजूला हटवीत ओरडले. लोक अनिच्छेनेच मागे सरकू लागले, पण तसं करतानाही त्यांच्या रेटारेटीमुळे ते शिपाई मागे रेटले गेले. लोकांना नकळतच ते शिपाई अडवले गेले व लोक मात्र आईच्या दिशेने पुढे लोटले गेले. डोक्यावर पांढरे शुभ्र केस, प्रेमळ चेहरा, मोठाले तेजस्वी डोळे, अशी आईची मूर्ती त्यांना दिसत होती. जीवनात एकमेकांशी काही संबंध नसलेले असे निरनिराळ्या क्षेत्रांतले व भिन्न ठिकाणचे लोक तिथं एकत्र आले होते व आईच्या तोंडचे ज्वलंत उद्गार ऐकून त्यांच्या चित्तवृत्ती थरारून येत होत्या. त्या लोकांपैकी अनेकांना प्रत्यक्ष जीवनातल्या कटु अनुभवामुळे ज्या शब्दांची तहान लागली असावी असेच ते शब्द होते.

आईच्या अगदी निकट उभे असलेले लोक स्तब्ध उभे होते. ती आणखी काय बोलते हे ऐकण्यासाठी ते अत्यंत उत्सुकतेने तिच्या नजरेशी नजर भिडवून उभे होते, व त्यांच्या उष्ण श्वासांचा स्पर्श आईच्या मुखाला होत होता.

"ए म्हातारे! जा, जा इथून!"

"आत्ता पकडतील ते तुला!"

"बाई मोठी धीराची आहे, नाही?"

"ए चला, दूर व्हा इथून! जा आपापल्या जागांवर. जा, चला!" शिपाई गर्दीतून मार्ग काढून पुढे येत ओरडले. आईच्या समोर उभे असलेले लोक हलले व एकमेकांना धरून उभे राहिले.

आईला वाटलं, हे लोक आपलं बोलणं ऐकून घ्यायला उत्सुक असावेत, त्यांना आपल्याबद्दल विश्वास वाटत असावा, म्हणून तिनं ठरवलं की आता बिलकुल वेळ न घालवता आपल्याला माहित असलेलं सगळं काही, ज्या विचारांच्या सामर्थ्याची प्रचीती आपल्याला आली आहे, ते सर्व या लोकांना सांगून टाकावं. तिच्या अन्तःकरणाच्या गाभाऱ्यातून ध्वनी उठले व त्यांचं एक आर्त गीत गुंफलं गेलं. पण मग तिला अचानक अशी जाणीव झाली की आपल्याला हे गीत गाऊन दाखवता येणार नाही, कारण तिचा आवाजच एकाएकी कापरा व चिरचिरा बनला होता.

"माझ्या मुलाचे शब्द म्हणजे आपला आत्मा न विकणाऱ्या एका इमानदार कामगाराचे शब्द आहेत. त्या शब्दांतील निर्भयता हीच त्यांच्या प्रामाणिकपणाची कसोटी आहे!"

यौवनसुलभ उत्साह ज्यातून ओसंडत होता असे दोन डोळे तिच्या चेहऱ्यावर खिळलेले होते व त्यांत भीती व हर्ष चमकत होता.

कुणीतरी तिच्या छातीत एक ठोसा लगावला व ती बाकावर पडली. शिपायांच्या हातांचे प्रहार गर्दीतल्या लोकांच्या मस्तकांवर पडू लागले. त्यांनी कुणाच्या कपड्यांच्या कॉलरी पकडल्या, कुणाला खांद्याला धरलं, लोकांना बाजूला ढकललं, कुणाच्या टोप्या हिसकावून घेतल्या व काहींना धक्के मारून त्या विश्रामगृहाच्या दुसऱ्या टोकाला नेऊन सोडलं.

आईच्या डोळ्यांपुढे अंधारी आल्यासारखं होऊन सगळं जग गरगरा फिरल्यासारखं तिला वाटू लागलं, पण तरीसुद्धा तिने स्वतःला सावरून अंगात असेल नसेल तेवढं बळ एकवटलं व शक्य तितक्या उंच सुरात ती ओरडली,

"सज्जन हो! एक व्हा! सगळ्यांची शक्ती एकवटून प्रतिकार करा!"

एका शिपायाने आपल्या राठ जाडजूड हाताने तिची मानगूट पकडली व तिला गदगदा हालवलं.



"बंद कर तुझी बडबड!"

तिचं डोकं मागे भिंतीवर आपटलं. एक क्षणभर तिच्या डोळ्यांपुढे काजवे चमकले व ती भेदरली, पण क्षणार्धातच ती भीती पळून गेली व तिला पुनः धीर आला.

"हं, चल पाहू!" शिपाई ओरडला.

"कशालाही घाबरू नका!" ती पुनः आवेशाने म्हणाली. "तुम्ही जे जीवन जगता त्यापेक्षा अधिक हलाखीची स्थिती तरी काय होणार तुमची?"

"ए, बंद कर पाहू बडबड!"

शिपायाने तिचा हात पकडून तिला खाली ओढलं. लगेच दुसऱ्या शिपायाने तिचा दुसरा हात धरून खेचला व ते दोघे तिला ओढून नेऊ लागले.

"...तुम्हाला रोज जाळून काढणारी चिंता व कटुता... तुम्हाला रोज घोर लावणाऱ्या काळज्या..." ती बोलतच होती.

तो हेर तिच्या पुढे धावत होता व मूठ वळवून तिला धमकावीत होता.

"गप्प बैस! ए रांडे!"

तिचे डोळे खदिरांगारासारखं लाल झाले व तिचे ओठ थरथरू लागले.

"ते माझा आत्मा चिरडू शकत नाहीत–माझा आत्मा असाच जिवंत राहील!" खालच्या निसरड्या फरशीवर पाय आपटून ती ओरडली.

"ए रांडे!" हेराने पुनः शिवी हासडून तिच्या तोंडावर ठोसा लगावला.

"बरं झालं! असंच पाहिजे या थेरडीला!" कुणीतरी खुनशी वृत्तीचा इसम ओरडला.

एक क्षणभर आईच्या डोळ्यांपुढे हिरवे निळे ठिपके नाचू लागून तिला काही दिसेनासं झालं व रक्ताच्या खारट चवीने तिचं तोंड भरून गेलं. मग कोणाचे तरी उद्गार तिच्या कानी पडून तिला धीर आला.

"हं, खबरदार तिला हात लावाल तर!"

"चला, लोक हो!"

"ए, हरामखोरांनो–"

"हं लगवा त्याला!"

"पण आमची मनं तर रक्तबंबाळ करू शकत नाहीत ते!"

त्या शिपायांनी तिच्या पाठीत, मानेवर, खांद्यावर, डोक्यावर, सर्वत्र भराभर ठोसे लगावले. तिच्या मस्तकात भयंकर आवाज घुमू लागले.

आरडाओरडा, किंकाळ्या, शिट्या, यांचा एकच गोंधळ माजला. तिच्या कानठळ्या बसल्या, गळा दाटून येऊन जीव गुदमरला व पायाखालची जमीन सरकू लागल्यासारखी होऊन तिच्या गुडघ्यांतलं त्राण नाहीसं झालं. तिच्या सर्वांगाला भाले खुपसल्यासारखा ठणका लागून तिचं अंग जड झालं व ती असहाय होऊन झोकांड्या खाऊ लागली. तरीसुद्धा तिच्या नेत्रांतली चमक कायम होती. ती डोळे उघडे ठेवून भोवतालच्या लोकांच्या नजरेला नजर भिडवीत होती. त्या सर्वांच्या नेत्रांत तिच्या ओळखीची व तिला सुखविणारी तेजस्वी ज्योत तळपत होती.

ते शिपाई तिला दरवाजातून ओढीत बाहेर घेऊन गेले.

तिने झटका देऊन एक हात मोकळा करून घेतला व त्या हाताने दरवाजाची मूठ पकडली.

"रक्ताच्या नद्या वाहवल्यात तरी सुद्धा सत्य त्यात बुडून नाहीसं होणार नाही!" ती ओरडली.

त्यांनी तिच्या हातावर प्रहार केला.

"तुमच्या अशा वागणुकीने आमच्या मनात तुमच्याबद्दलची घृणा व तिटकाराच वाढत जातो, समजलात! अन् या सर्व अत्याचाराचे परिणाम तुम्हाला भोगावे लागतीलच लागतील."

एका शिपायाने तिची मानगूट पकडली व तो तिची मुस्कटदाबी करू लागला.

"क्षुद्र प्राणी..." ती कसाबसा श्वास घेत उद्गारली.

कुणीतरी जोराचा हुंदका देऊन तिला साद दिली.

१९०६-१९०७

## समारोपादाखल दोन शब्द

गोर्कीच्या कादंबरीतील नायकांची आपण ज्या क्षणाला रजा घेतो, तो क्षण त्यांच्या दृष्टीने फार कठीण आहे. पावेल सैबेरियात हद्दपार होण्याची वाट पहात आहे. त्याला जन्मठेप झाली आहे. त्याच्या आईला म्हणजे निलोव्नाला बेकायदा वाङमयाने भरलेल्या सूटकेससह पोलिसांनी धरले आहे. हे वाङमय म्हणजे पावेलच्या कोर्टातील भाषणाच्या हस्तपत्रिका आहेत. तिला मार बसला आहे; तिचा अपमान करण्यात आला आहे; आणि अशा या परिस्थितीत भोवताली जमलेल्या लोकांना जीवनातील सत्य ओरडून सांगण्याची तिला घाई झाली आहे. तिचा छळ करणाऱ्यांच्या तोंडावर ती बेडरपणे सांगत आहे:

"रक्ताच्या नद्या वाहवल्यात तरी सुद्धा सत्य त्यात बुडून नाहीसं होणार नाही! ... तुमच्या अशा वागणुकीने आमच्या मनात तुमच्याबद्दलची घृणा व तिटकाराच वाढत जातो, समजलात!"

ज्यांच्या जीवनावरून या पुस्तकातील प्रमुख पात्रे रेखाटली गेली त्या प्योत्र आणि अन्ना झलोमोवांचे पुढे काय झाले, हे जाणून घेण्याची वाचकांच्या मनात जरूर उत्सुकता असेल.

प्योत्र झलोमोव खूप खूप म्हातारा होईपर्यंत जगला; वयाच्या ७८ व्या वर्षी इ. स. १९५५ मध्ये तो कालवश झाला. त्याची आई अन्ना किरिलोव्ना झलोमोवा हीही दीर्घायुषी ठरली. गोर्कीनीं तिच्याविषयी लिहिले आहे: "निलोव्नाचे चित्र मी प्योत्र झलोमोवच्या आईवरून रंगविले आहे. प्योत्रला सोर्मोवो शहरी मे-दिनाची मिरवणूक काढल्याबद्दल इ. स. १९०२ साली शिक्षा झाली होती. प्योत्रची आई संघटनेत काम करी; यात्रेकरूचा वेष घेऊन ती बेकायदा वाङमयाची ने-आण करी."

अन्ना किरिलोव्नाचा जन्म इ. स. १८४९ साली एका चांभाराच्या कुटुंबात झाला. तिचे जीवन अतिशय कष्टात गेले. पति वारल्यानंतर तर तिला फारच कष्ट करावे लागले; कारण पदरात सात लहानगी मुले होती. ते सर्वजण एका अंधाऱ्या खोलीत थंडीत कुडकुडत रहात. घराचे नाव होते 'विधवा गृह'. बाई अत्यंत उद्योगी आणि धीराची होती म्हणूनच केवळ हे कुटुंब कसेबसे एकत्र राहिले. मुले हळूहळू वाढू लागली. थोरले मुलगे कामावर जाऊ लागले; धाकटे शाळेत जाऊ लागले. प्योत्र एका क्रांतिकारक मंडळात दाखल झाला आणि त्याबरोबर 'आमच्या जीवनात एकाएकी एक जोमदार झोत शिरला.' पुढे लहानपणच्या आठवणी सांगताना प्योत्रच्या धाकट्या बहिणीने काढलेले हे उद्‌गार आहेत. लवकरच सबंध झलोमोव कुटुंबच्या कुटुंब क्रांतिकारक चळवळीत भाग घेऊ लागले.

सन १९१७ ची क्रांती झाली; त्यानंतर अन्ना किरिलोव्ना आपल्या मुलांबरोबर राहू लागली. कधी कधी ती आपल्या मुलांबरोबर सोर्मोवो येथे राही; तर कधीकधी लेनिनग्राडला आपल्या मुलीकडे राही.

ती एक ठेंगणीशी म्हातारी बाई होती, तिचे डोळे अतिशय बोलके होते; आणि तिच्या चेहऱ्यावर स्नेहभावाचे स्मित झळके. तिचे केस पांढरे झाले होते; त्यावर ती काळ्या लेसचा एक जुन्या पद्धतीचा रुमाल घाली. आपल्या पूर्वायुष्यातील जीवनाविषयी, आपल्या स्वतःच्या क्रांतिकारक कार्याविषयी व आपल्या मुलाविषयी ती अनेक मंडळींशी बोलत असे. लेनिनग्राडमधील, निझ्नी नवगरोदमधील शाळकरी मुले, सोर्मोवोचा कामगार वगैरे ही मंडळी होती. त्यांच्या स्मृतिपटलावर ती दिसत असे ती अशी.

अन्ना किरिलोव्ना इ. स. १९३८ साली मृत्युवश झाली.

आता जरा प्योत्र झालोमोवचे पुढे काय झाले तिकडे वळू या... झारच्या कोर्टाने त्याला इ. स. १९०३ साली हद्दपारीची शिक्षा दिली आणि त्याची सैबेरियात रवानगी केली; हजारो किलोमीटर अंतर इतर कैद्यांबरोबर त्याला पायी चालावे लागले; एक वर्षानंतर तो येनिसेई नदीच्या तीरावर पोहोचला आणि क्रास्नोयार्स्क पासून ३०० किलोमीटर अंतरावर माक्लाकोव्का या लहानशा खेड्यात राहू लागला. आपल्या आठवणी सांगताना त्याने लिहिले आहे: "मी हद्दपारीत दोन वर्षे काढली. स्थानिक शेतकऱ्यांत प्रचाराचे माझे काम चालूच होते. गावचा कारकून आणि त्याचे दोन मदतनीस यांनाही मी आपल्यासारखे बनवून टाकले. गोर्की मला ८ रूबल पाठवीत असत. पण जिल्ह्याचा पोलिस ऑफिसर नेमाने ते स्वतःच खाऊन जाई. मी जेमतेम जगत असे. उपासमार तर पाचवीलाच पुजलेली होती. पुढे माझे दात बिघडले."

आणि मग १९०४ मधील मार्च महिन्यातील 'तो' दिवस उजाडला. प्योत्रच्या जीवनातील सर्वोच्च सुखाच्या दिवसांपैकी तो दिवस होता. आपल्या छोट्याशा खोलीत तो फरच्या स्की (जनावरांच्या उबदार कातड्यांच्या बिनचाकी घसरगाड्या) बनवीत होता. "माझी छाती धडधडली. शांत व स्वस्थपणे... एकाएकी दरवाजा उघडला. जुने गरम कपडे घातलेली, थंडीपायी लाललाल झालेली, जोसेफाईन एद्वार्दोव्ना आत आली. हजारों मैलांचे अंतर पायी तुडवून ती आली होती."

जोसेफाईन गाशर ही फ्रेंच तरुणी होती. ती इ. स. १९०१ साली मॉस्कोत शिक्षिका म्हणून काम करीत असताना प्योत्रची तिच्याशी गाठ पडली होती. कामगारांच्या सभा चालत; अभ्यासमंडळे चालत; तेथे त्यांची गाठ पडे; पण एकमेकांविषयी वाटत असलेले गाढ प्रेम व्यक्त करण्याचे धैर्य ह्या दोन धैर्यवंत क्रांतिकारकांना दीर्घकाळपर्यंत झाले नाही. प्योत्रला अटक झाली; मॉस्कोच्या बुतिर्स्कीया तुरुंगात त्याला ठेवण्यात आले; आणि त्यानंतर त्याची 'प्रियतमा' म्हणून जोसेफाईन गाशर जेलमध्ये त्याला भेटायला आली.

लवकरच गोर्कीच्या मदतीने प्योत्र झलोमोवने हद्दपारीतून पलायन केले.

लवकरच १९०५ च्या उन्हाळ्यात त्याची गोर्कीशी पहिल्यांदाच गाठ पडली. गोर्की त्यावेळी पीटर्सबर्ग शहराजवळ कुओक्काला या गावी रहात असत.

आगामी कादंबरीचे लेखक गोर्की आणि पावेल व्लासोव या पात्राच्या मागची वास्तव व्यक्ती प्योत्र झालोमोव हे दोघेजण एकमेकांना अनेक वर्षांपासून ओळखत होते. इ. स. १९०२ च्या सोर्मोवो मधील मे-दिनाच्या निदर्शनाच्याही आधी गोर्की झलोमोवची गाठ घेऊ पहात होते. पण एक धोकेबाज मनुष्य म्हणून पोलिसांची प्योत्रवर पूर्वीपासून नजर होती. म्हणून आपली भेट गोर्कींना महाग पडेल आणि पोलिस या क्रांतिकारक लेखकाला पकडण्याची एकही संधी हातची जाऊ देणार नाहीत, अशी प्योत्रला भीती वाटत होती.

त्यानंतर निदर्शन झाले; पुढाऱ्यांची धरपकड झाली तेव्हा गोर्कींनी प्योत्र आणि त्याच्या मित्रांविषयी फार आस्था दाखविली. 'काळजी करू नका!

मी आहे' असा त्यांनी अन्ना झलोमोवाला निरोप पाठविला. ठरलेली रक्कम सैबेरियात झलोमोवला पाठवायला ते एकदाही कधी विसरले नाहीत. नंतर झलोमोवचा विवाह होऊन त्याला एक मूल झाल्याचे त्यांना कळल्यावर त्यांनी ही रक्कम दुप्पट केली. आणि शेवटी 'त्याला पळून जाण्यासाठी' ३०० रूबल त्यांनीच पाठविले.

आता ही स्वारी पळून पीटर्सबर्गला आली आणि आल्याबरोबर त्याने घेतलेल्या पहिल्या गाठीभेटींत गोर्की यांचा अंतर्भाव होता.

योग्य स्टेशन येण्याच्या आधीच झलोमोव गाडीतून उतरला, पोलिसच्या हेरांच्या हातावर तुरी देणे हा त्याचा हेतू होता. तो लागलीच रानात शिरला आणि त्याने जंगल तुडविण्यास सुरुवात केली. शेवटी एकदाचे त्याला हवे होते ते घर मिळाले. त्याने गोर्कींचे फोटो पूर्वीच पाहिलेले होते. बागेत त्याला एक उंच किडकिडीत व्यक्ती दिसली. हेच गोर्की हे त्याने ओळखले.

त्याने हाक मारली "अलेक्सेइ मक्सिमोविच! मी आलो आहे" आणि त्याने स्वतःची ओळख करून दिली.

गोर्की पाहुण्याचे स्वागत करण्यासाठी धावत पुढे आले. त्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वहात होता. त्यांनी एकमेकांना आलिंगन दिले.

प्योत्रकडे मोठ्या आनंदाने पहात यजमान म्हणाले "हूं! एकंदरीत तुम्ही असे दिसता तर!"

आता ते आरामात खुर्च्यांवर बसले—गप्पासप्पांना सुरुवात झाली. गोर्की पडले जातिवंत कादंबरीकार. त्यांनी त्याचे जीवन, मातापिते, क्रांतिकारक कार्य आणि सोर्मोवोचे निदर्शन यांची संपूर्ण माहिती त्याच्याकडून काढून घेतली. त्यांचा पाहुणा उत्कृष्ट प्रचारक होता; क्रांतिकारक होता. त्याने सर्व हकिकत मोठ्या खुषीने सांगितली. स्वतःच्या भावनांविषयी मात्र तो फारच थोडे बोलला; भावी स्वप्नांविषयी तर एकही अक्षर बोलला नाही. त्यांची ही मुलाखत अत्यंत मित्रभावाच्या वातावरणात संपली. दोघांनीही पुनः पुनः भेटण्याचे मान्य केले. या काळात मित्राला लिहिलेल्या एका पत्रात गोर्की लिहितात: "सोर्मोवोहून एक दोस्त भेटायला आला होता; मोठा छान मुलगा आहे तो!"

प्योत्रला पक्षाची जबाबदारीची कामे देण्यात आली. "मॉस्कोत सशस्त्र दले उभारण्याचे काम माझ्यावर सोपविण्यात आले होते. मॉस्कोचा उठाव होण्याच्या काही दिवस आधी माझी पत्नी जोसेफाईन हिच्या मदतीने मी



बॉबची कवचे बनविली. ती आमच्या दहा महिन्यांच्या बाळीला घेऊन सैबेरियातून परत आली होती... उठावात मी मोर्चावर लढलो—इ. स. १९०६ च्या उन्हाळ्यात खोकताना माझ्या तोंडातून रक्त पडू लागले; मज्जातंतूंना कमालीचा थकवा आला होता. तेव्हा आता नाइलाजाने मी भूमिगत जीवनातून बाहेर आलो."

झलोमोवला आता कुटुंबासह राजधानीपासून दूर कुर्स्क भागात सुझा या लहानशा गावी पाठविण्यात आले. तेथे प्रत्यक्षात तो हद्दपारच झाल्यासारखा होता; गाव सोडायचे नाही, आणि कसलाही नोकरीधंदा करायचा नाही, असे बंधन त्याच्यावर घालण्यात आले होते. पोलिस तर एकसारखे मागावर असत. उपासमार, तुरुंगवास आणि हद्दपारी काढून काढून प्रकृती आधीच ढासळली होती. ती आता फारच खालावली. जोसेफाईन गावातील माध्यमिक शाळेत शिक्षिका म्हणून काम करी आणि कुटुंब संभाळी. जीवनातील या काळच्या आठवणी सांगताना प्योत्र म्हणतो: "१९१७ ची फेब्रुवारी क्रांती होईपर्यंत सी. आय. डी. आणि पोलिसांची माझ्या हालचालींवर सक्त नजर असे. त्यामुळे शेतकऱ्यांत जाऊन प्रचार करण्याचे काम मला करता आले नाही."

फेब्रुवारी क्रांती झाली; तिच्या मागोमाग ऑक्टोबर १९१७ चे तुफान उठले. झलोमोव सोर्मोवोचा झेंडा-रक्षक खंबीर क्रांतिकारक होता. त्याने ताबडतोब रिंगणात उडी घेतली. सुझाला पहिली प्रचंड सभा झाली—या सभेत त्याने एक अत्यंत स्फूर्तिदायक भाषण केले—सभेत पुष्कळ कामगार आणि शेतकरी आले होते. पीटर्सबर्गला चाललेल्या घडामोडींचा अर्थ त्याने त्यांना समजावून सांगितला.

आपला भाऊ अलेक्झांडर याला लिहिलेल्या एका पत्रात त्याने क्रांती व यादवी युद्धाच्या काळातील आपल्या जीवनाचे वर्णन केले आहे ते असे:

"१९१७ साली आमच्या जिल्ह्यात सोविएत सत्ता स्थापन करण्याच्या कामात मी भाग घेतला आणि लवकरच कामगार कॉमिसार म्हणून माझी निवड झाली.

"सफेद दलांनी सुझावर कब्जा केला—त्या काळात त्यांनी मला अनेकवार फासावर चढविण्याचे प्रयत्न केले. पण मी दर खेपेस त्यांच्या हातावर तुऱ्या दिल्या. अखेर मला देनिकिनच्या लोकांनी पकडले आणि माझ्यावर लष्करी खटला भरला. जेलर माझी दररोज चेष्टा करीत आणि

सांगत 'याद राख बेट्या. तुझ्या गळ्याभोवती लवकरच फास बसेल; नाहीतर गोळी खाऊन मरावे तरी लागेल...' ही धमकी पोकळ नव्हती. ती त्यांनी नक्कीच खरी करून दाखविली असती. पण तेवढ्यात लाल फौज आली आणि त्यांचे मनातले मांडे मनातच जिरले."

लाल फौजेने प्योत्रला मरणाच्या दारातून खेचून बाहेर काढले. पण त्याची प्रकृती खूप ढासळली होती. वैद्यकीय उपचार करणे भाग होते. तो मॉस्कोला गेला आणि तेथे त्याला एका इस्पितळात दाखल करून घेण्यात आले. तेथे त्याला बरेच दिवस रहावे लागले. हळू हळू गेलेली शक्ती परत आली; जुने संबंध पुनः प्रस्थापित झाले, (लेनिन यांचे सहकारी आणि एक प्रमुख क्रांतिकारक ग्लेब कर्झिझानोव्स्की यांच्या कुटुंबाशी पुनः एकदा संबंध जुळले.) आणि गोर्कीच्या नायकाने जीवनाच्या एका नव्या अवस्थेत प्रवेश केला.

प्योत्र झलोमोव हा जन्मजात प्रचारक होता. त्याने आता शेतकऱ्यांत जोमाने काम करायला सुरुवात केली. तो त्यांना वर्तमानपत्रे वाचून दाखवी आणि ग्रामीण भागात सोविएत सत्ता कोणते धोरण चालवू पहात आहे ते साध्या शब्दांत त्यांना समजावून सांगे. सरकारचे नवे जाहीरनामे आणि निर्णय समजावून सांगे.

त्यानंतर सामुदायिक शेतीची मोहीम सुरू झाली. प्योत्र झलोमोवने आता सुद्धा येथे 'लाल ऑक्टोबर' या नावाने एक सामुदायिक शेत उभारले. कित्येक वर्षे तो त्याचा अध्यक्ष होता; नंतर बोर्डाचा सभासद झाला.

भयंकर दुखणी येत; डॉक्टर ओरडत; पण प्योत्रने आपले कार्य कधीच थांबवले नाही. तरुणपणी केलेले क्रांतिकार्य, गोर्कीशी घडलेल्या गाठीभेटी, याविषयींच्या आठवणी त्याने लिहून काढल्या. गोर्कीच्या 'आई' या कादंबरीच्या वाचकांशी त्याचा दांडगा पत्रव्यवहार चाले. कर्झिझानोव्स्की कुटुंब म्हणजे त्याचे मोठेच मित्र; त्यांना लिहिलेल्या एका पत्रात त्याने जीवनाविषयीचे आपले विचार पुढील शब्दांत व्यक्त केले आहेत:

"हात बांधलेल्या अवस्थेतही ज्या गुलामाने आपल्या दुःखी जीवनाची भीती घेऊन थरथर कापण्याचे सोडून दिले आहे आणि स्वातंत्र्यासाठी लढण्याचा निश्चय केला आहे, तो आधीच मुक्त झाला आहे, असे मी समजतो. मला वाटते सगळे गुलाम नष्ट व्हावेत; मला गुलामीचा अत्यंत तिटकारा आहे, स्वातंत्र्यसैनिकांविषयी मला प्रेम वाटते; मुक्त मानवाचे धैर्य ज्यांच्या अंगी वास करते असे लोक मला आवडतात."

प्योत्र झलोमोव हा क्रांतीचा एक साधासुद्धा शिपाईगडी होता. त्याने आपल्या काळात गोर्कीचे हृदय जिंकले होते. आमच्या नजरेलाही तो एक आदर्श व्यक्ती म्हणून दिसतो. त्याच्या उदात्त इच्छाआकांक्षा आणि नैतिक पावित्र्य यामुळे तो आम्हाला आदर्श वाटतो. विसाव्या शतकातील वर्गजागृत कामगार क्रांतिकारकाचा तो एक उत्कृष्ट नमुना होता.